## प्रस्तावना

**(भाग २)**

श्रीसद्गुरु मेहेरबाबांच्या स्फूर्तिप्रद व अध्यात्मपर लेखांपैकी बऱ्याचशा लेखांचा मराठी अनुवाद पहिल्या भागांत प्रसिद्द झालाच आहे. सम्पूर्ण लेखसंग्रह तीन भागांत प्रकाशित होईल. हा दुसरा भाग जनता जर्नादनास सादर समर्पण करण्यास आम्हांस फार आनंद वाटत आहे. मुळचा 'Meher Baba' मासिकांत व इतरत्र इंग्रजी भाषेत प्रसिध्द झालेल्या लेखांचा व सन्देशांचा क्रम अनुवादामध्ये कित्येक कारणांमुळे ठेवता आला नाही. परिशिष्ठ नं.१ मधील प्रवचनें श्री मेहेरबाबांनी मेहेराबादला फळीवरुन दिली आहेत व परिशिष्ट नं.२ मधील प्रश्नोत्तरें श्री सी.बी. परदॉमच्या पुस्तकांतील झुरिचमधील भेटींच्या वृत्तातातून व Meher Baba the Awakener ह्या पुस्तकांतून घेतलीं आहेत. ह्या दोन्ही परिशिष्टांतील अनुवाद श्री मेहेरबाबांच्या मराठी चरित्रांत (ले.डॉ.प्रो.च.ध.देशमुख) पूर्वी आलेला आहे. श्रीसद्गुरु मेहेरबाबांच्या प्राच्य व पाश्चिमात्य देशांत दिलेल्या अनेक दिव्य संदेशांचाहि अनुवाद ह्या भागांत प्रकाशित झाल्यामुळे त्याला एक विशेष वैशिष्ट्य आलें आहे. सर्व कार्य श्रीगुरुकृपेनेच तडीस गेलें आहे. हा भागही श्री सद्गुरु मेहेरबाबांच्या जन्मदिवशींच जनता जनार्दनास समर्पित करण्यांत आनंद वाटतो.

श्री सदंगुरु मह्रेरबाबांचे लेख प्रत्यक्ष अनुभूतीवर अधिष्ठित असून, त्यांच्यांत मानवतेस जागृत करण्याचे सामर्थ्य ओतप्रेत भरलेले असल्यामुळे, त्यांचे श्रेष्ठतम महत्व चिरकाल टिकणारे आहे. त्यांचा अनुवाद इतर सर्व भारतीय व जागतिक भाषांमधून व्हावयास पाहिजे.

ह्या लेखसंग्रहाचें प्रकाशन करण्याबद्दल, श्री आदि के. इराणी पब्लिकेशन कमिटी, मेहेरबाबा जागतिक अध्यात्मिक केंद्र, अहमदनगर व तो लेखसंग्रह सुबक रीतीने छापून देण्याबद्दल 'महेश्वर प्रेस' अमरावती यांचे व त्याचप्रमाणे या ईश्वरार्पित कार्याला इतर अनेक प्रकारची मदत करणारे श्री.पु.गो. निजसुरे व इतर सर्व मित्रमंडळी यांचे आम्ही कृतज्ञापूर्वक आभार मानतो.

अमरावती
२५ फेब्रुवारी, १९४८

चक्रधर धरणीधर देशमुख
सौ. इंदुमती देशमुख

# अवतार मेहेर बाबा
# यांचे
# अध्यात्मपर लेख व संदेश
## (भाग १ व २)




**दुसरी आवृत्ती (मूळ ग्रंथाची)**

**मराठी अनुवाद**

**प्रथम आवृती (५००)**
भाग - १ २५ फेब्रुवारी १९४६
भाग - २ २५ फेब्रुवारी १९४८
मुद्रक - महेश्वर प्रेस, अमरावती.

**प्रकाशक -**
आदि के. ईराणी
मेहेरबाबा जागतिक आध्यात्मिक केंद्र
किंग्स् रोड, अहमद नगर.

**मराठी अनुवादक -**
डॉ.प्रो.चक्रधर धरणीधर देशमुख
M.A. (Phil) Ph.D (London)
सौ. इंदुमती देशमुख
M.A. B.T.

**द्वितीय आवृती (५००)**
भाग - १ व २, २५ फेब्रुवारी २०२२

**पुर्नमुद्रण -**
(अ.मे.बा.प.प. ट्रस्ट चे लेखी परवानगीने)
कॉपीराईट : २०२२ अवतार मेहेरबाबा परपेच्युअल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, अहमद नगर, म.रा. ४१४००१ (भारत)

डॉ. राजेंद्र वामनराव निस्ताने
अ.मे.बाबा आध्यात्मिक केंद्र,
अमरावती (महाराष्ट्र)
मो. ९८२२९२५९७९, ९९२०२५५७६१

**मुद्रक -**
जय प्रिंटर्स
गांधी चौक, अमरावती
मो. ९४२०१८७८६८, ७९७२३१३२०५

**सर्वाधिकार सुरक्षित-**
या पुस्तकाच्या कोणताही भाग, अंशतः वा पूर्ण, अवतार मेहेरबाबा परपेच्युअल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट अहमदनगर यांच्या लिखित पूर्व परवानगीशिवाय पुर्नप्रकाशित वा पुर्नमुद्रित करण्यास तसेच संगणकाद्वारे वा कोणत्याही प्रकारे ईलेक्ट्रानिक, यांत्रिक, छायाप्रती वा रेकॉर्डींग स्वरुपात राखून ठेवण्यास वा पुर्नप्रकाशित करण्यास मनाई आहे.

टिप - या प्रकाशनाचा हेतू स्पर्धात्मक किंवा कोणत्याही प्रकारचा नफा मिळविण्याचा नसुन केवळ अवतार मेहेरबाबा द्वारा प्रदत्त आध्यात्मपर लेख आणि दिव्य व स्फूर्तिदायक संदेशांचे

## प्रस्तावना
### (भाग १)

'Meher Baba' मासिकांत व इतरत्र इंग्रजी भाषेमध्ये प्रसिध्द झालेल्या श्री सद्गुरु मेहेरबाबांच्या स्फूर्तिप्रद व अध्यात्मपर लेखांपैकी कांही लेखांचे मराठी भाषांतर यापूर्वीच 'अवतार मेहेरबाबा माले' मधील सात पुष्पांमध्ये प्रसिध्द झाले आहे. उरलेल्या लेखांच्या व संदेशांच्या मराठी भाषांतराचें महत्वाचें कार्यहि श्रीगुरुकृपेनेच तडीस गेलें आहे. आम्ही केवळ निमित्तमात्र आहो. मूळच्या इंग्रजी लेखांतील क्रम अनुवादायमध्ये कित्येक कारणांमुळे ठेवतां आला नाही.

हा लेखसंग्रह दोन भागांत प्रसिध्द होत असून, हा पहिला भाग श्रीसदंगुरु मेहेरबाबांच्या जन्मदविशीच जनताजनार्दनास सादर समर्पण करण्यात आम्हांस आनंद वाटतो. श्रीसदंगुरु मेहेरबाबांचे लेख प्रत्यक्ष अनुभूतीवर अधिष्ठित असून, त्याच्यांत मानवतेस जागृत करण्यांचे सामर्थ्य ओतप्रोत भरलेलें असल्यामुळे, त्यांचे श्रेष्ठतम महत्व चिरकाल टिकणारें आहे. त्यांचा अनुवाद इतर सर्व भारतीय व जागतिक भाषांमधून व्हावयास पाहिजे.

ह्या लेखसंग्रहाचें प्रकाशन करण्याबद्दल, श्री आदि के. इराणी पब्लिकेशन कमिटी, मेहेरबाबा जागतिक अध्यात्मिक केंद्र, अहमदनगर व तो लेखसंग्रह सुबक रीतीने छापून देण्याबद्दल 'महेश्वर प्रेस' अमरावती यांचे व त्याचप्रमाणे या ईश्वरार्पित कार्याला इतर अनेक प्रकारची मदत करणारे श्री.पु.गो. निजसुरे व इतर सर्व मित्रमंडळी यांचे आम्ही कृतज्ञापूर्वक आभार मानतो.

अमरावती
२५ फेब्रुवारी, १९४६

चक्रधर धरणीधर देशमुख
सौ. इंदुमती देशमुख

| | | |
|---|---|---|
| २१ | जन्मपरंपरा आणि कर्म (भाग १ ला) : मृत्युचे महत्व | १२४ |
| २२ | जन्मपरंपरा आणि कर्म (भाग २ रा) : स्वर्ग आणि नरक | १३० |
| २३ | जन्मपरंपरा आणि कर्म (भाग ३ रा) : गत जन्मांचे अस्तित्व आणि त्यांची स्मृति | १३६ |
| २४ | जन्मपरंपरा आणि कर्म (भाग ४ था) : जन्माच्या परिस्थितिविशेषांना निश्चित करणाऱ्या घटना | १४१ |
| २५ | जन्मपरंपरा आणि कर्म (भाग ५ वा) : स्त्री आणि पुरुषजन्मांची आवश्यकता | १४५ |
| २६ | जन्मपरंपरा आणि कर्म (भाग ६ वा) : लागोपाटच्या जन्मजन्मांतरामधून कर्माची क्रियाशीलता | १४९ |
| २७ | जन्मपरंपरा आणि कर्म (भाग ७ वा) : जन्मांतरांचा अनुभव घेणाऱ्या जीवात्म्याची भवितव्यता | १५५ |
| २८ | मला प्राप्त करण्याचे बारा मार्ग | १६० |
| २९ | मंडल | १६२ |
| ३० | माया (भाग १ ला) : मिथ्या मूल्यें | १६७ |
| ३१ | माया (भाग २ रा) : मिथ्या विश्वास | १७२ |
| ३२ | माया (भाग ३ रा) : मायाजनित भ्रमांच्या पार जाणे | १७८ |
| ३३ | माया (भाग ४ था) : परमात्मा व माया | १८१ |

## – मनोगत व ऋणनिर्देश –

कृपासिंधु अवतार मेहेरबाबांचे "अध्यात्मपर लेख व संदेश" प्रत्यक्ष अनुभूतिवर अधिष्ठित असून त्यांच्यात मानवतेस जागृत करण्याचे सामर्थ्य ओतप्रोत भरलेले आहे. त्यामुळेच ते श्रेष्ठतम असल्याने त्यांचे महत्वही चिरकाल टिकणारे आहे. यामुळेच त्या सर्वांचा अनुवाद इतर सर्व भारतिय व जागतिक भाषांमधुन व्हावयास पाहिजे असे स्पष्ट प्रतिपादन प्रकाशक व अनुवादक यांनी पुस्तकाच्या या दोन्ही भागांच्या प्रस्तावनेतुन ७५ वर्षापुर्वी केले आहे.

काळाच्या ओघात-समाजमनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे म्हणा अथवा प्रत्येक गोष्ट प्रियतम बाबांचे इच्छेनुसारच होत असल्याने ७५ वर्षांच्या प्रदिर्घ विलंबाने का होईना मानवाजातीला नव संजीवनी देणारे सुप्तावस्थेतील मौलिक संदेश व विचारधन मराठी पुस्तक रुपाने आज पुन्हा प्रज्वलीत होत आहे. अवतार मेहेरप्रभुंच्या विश्वव्यापी प्रकटीकरणाची ही नांदी तर नसेल ? काय असले ते असो ! परंतु लुप्त होत असलेल्या या मूळ पुस्तकाचे पुर्नमुद्रण करुन दुसरी आवृत्ती मराठी भाषीक बाबा प्रेमीयांचे हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. एक सुखद योगायोग आहे की या दोन्ही आवृत्यांचे प्रकाशन आणि मुद्रण अमरावती येथुनच व बाबांच्या जन्मदिनीच होत आहे.

सुबुध्द बाबा प्रेमिंना, या पुस्तकातील लेखनाचे साधर्म्य बरेचदा इंग्रजीतील "DISCOURSES" व हिंदीमधील "अखंडज्योती" या पुस्तकातील लेखनाशी मिळतेजुळते आढळून येईल. तथापि या मूळ इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद विद्यावाचस्पती कृपापात्र लेखक आदरणीय डॉ. सी.डी. देशमुख यांचे सिध्दहस्त लेखनीतून झाला असल्याने ते वारंवार वाचनाची गोडी निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. अध्यात्मा सारख्या क्लिष्ट विषयाचे एकाच वेळी वाचन व आकलन होणे तसे कठिणच असले तरी ते अत्यंत सुलभ झाल्याचा प्रत्यय वाचकांना येत राहतो.

ज्या प्रमाणे सद्गुरु ज्ञानेश्वर माऊलींनी संस्कृत भाषेतील भगवदगीता बहुजनांच्या हितासाठी मराठीतून प्रस्तुत करुन आध्यात्मिक ज्ञानाची कवाडे उघडली तशाच प्रकारचे लोकोत्तर कार्य या पुस्तकाच्या माध्यमातून झाल्याचे भविष्यात पहायला मिळेल. एवढेच नव्हे तर यामुळे " God Speaks" सारखा समजण्यास कठिण असलेला ग्रंथही आकलनास सोपी जातो.

श्रृष्टि-निर्मितीच्या क्षणापासून-सर्व सचिव व निर्जीव जीवांच्या उद्गमनाचे प्रयोजन, सृजन व त्यांच्या जिवनमुक्तिपर्यंतचा प्रवास (Evolution and involution) तसेच **श्रृष्टिचा आरंभ व अंत, उत्क्रांती, जन्म परंपरा, मोक्ष मार्ग, सत्याची अनंतता, आत्मजिवन, आत्मसाक्षात्कार, आध्यात्मिक उन्नतीची प्रक्रिया, अध्यात्म जिवनातील गुढ विद्येचे स्थान, ईश्वराचा शोध, व ईश्वरप्राप्तीचे मार्ग** इत्यादी विषयांवरील गहण तत्वज्ञानाची उकल करण्यात

आलेली आहे. प्रत्यक्ष स्वानुभवातून जीवनातील सत्याची अनुभूती करुन देणारे हे मार्गदर्शक पुस्तक भविष्यात "ग्रंथ राजाच्या" ठिकाणी विराजमान होईल याची खात्री पटते.

**वस्तुतः आध्यात्मिक ज्ञानाने प्रकाशित झालेले नविन जीवन म्हणजे सत्याचाच पुरस्कार होय व असे नवजीवन कल्पनेच्या साम्राज्यातील नसुन पूर्णपणे व्यवहार्य आहे** याची खात्री पटून येणाऱ्या पिढ्यांसाठी ते दिपस्तंभासारखे कार्य करीत राहील.

पुस्तक पुर्नमुद्रणाचा हेतू मुख्यत्वेकरुन स्वयं बाबांद्वारे प्रदान अध्यात्मीक ज्ञानाचे प्रत्येक मुमुक्षूला शुध्द स्वरुपात (Pure and first hand knowledge) आकलन होवून त्याचा पुढे तसाच प्रसार व प्रचार व्हावा हीच आहे. आणि त्याकरीता ते "ना नफा-ना तोटा" या तत्वावर छापून प्रकाशित केल्या जात आहे. अशा या अत्यंत उपयुक्त ग्रंथांची प्रत नित्य वाचनासाठी "संदर्भग्रंथ" म्हणून प्रत्येक मराठी भाविक बाबा प्रेमियांच्या संग्रही असणे काळाची गरज आहे. तसेच त्यांनी ती आपले आप्तेष्ट व स्नेही जनांना उपलब्ध करुन देवून त्या सर्वांचे जीवनही अमृतमय करण्यास सहाय्यभूत व्हावे. जेणेकरुन प्रियतम बाबांचे प्रेम प्रसारण कार्यात सहभागी होण्याचे भाग्य आम्हा सर्वांना आपसूकच लाभू शकेल.

वाचकांचे सोईसाठी या मूळ पुस्तकांच्या दोन्ही भागाचे एकत्रीकरण केले असून, पुर्नमुद्रण प्रक्रियेत अ.मे.बा.प.प. ट्रस्टच्या सर्व निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात आले आहे. तद्वतच-मूळ पुस्तकाचे प्रकाशक, अनुवादक आणि मुद्रक या सर्वांचे अधिकार अबाधित ठेवून सर्व लेखन सामग्री व प्रकरणांची मांडणी तसेच प्रत्येक मूळ शब्द व अक्षर यथास्थितीत पुर्नमुद्रीत करण्याचा मनोभावे व सर्वकश प्रयत्न केलेला आहे. तरीपण काही चूका आढळल्यास वाचकांनी उदार अंतकरणाने माफ करावे ही विनंती. काही ठिकाणी केवळ बाबा प्रेमी मुद्रकाचे प्रेमाखातर मुखपृष्ठ व अन्यत्र बाबांची रंगीत छायाचित्रे समाविष्ठ करण्याचा मोह टाळता आला नाही.

या पुस्तकाच्या "द्वितीय आवृत्ती" प्रकाशनाची निकड ओळखून तशी प्रेरणा दिल्याबद्दल, "मेहेर ब्रम्हपरिवारात" सुदूर परिचीत असलेल्या ठाणे निवासी सौ. मेहेरकृपाताई पालवे आणि पुर्नमुद्रणास तत्काळ परवानगी दिल्याबद्दल अ.मे.बा.प.प. ट्रस्ट अहमदनगर यांचे आम्ही आभारी आहोतच. परंतु ट्रस्टचे अध्यक्ष आद. श्रीधरजी केळकर यांनी त्यांच्या व्यक्तिगत संग्रहातील या दुर्मिळ पुस्तकाचे दोन्ही भाग या कार्यासाठी प्रियतम बाबांचे समाधी स्थळी स्वयं प्रेरणेने उपलब्ध करुन देऊन कृतकृत्य केल्याबद्दल त्यांचे विशेष आभारी आहोत.

तसेच नियोजीत कालावधी मध्ये हा लेखन संग्रह सुबक रीतीने छापुन दिल्याबद्दल जय प्रिंटर्स अमरावती यांचे व ईश्वरार्पित कार्यात क्षणोक्षणी मदत करणारे आमचे परममित्र श्री नंदकिशोर बोरखडे यांचे आम्ही कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

अमरावती
२५ फेब्रुवारी २०२२

प्रियतम बाबांच्या सेवेत
डॉ. राजेंद्र वामनराव निस्ताने
सौ. जयश्री रा. निस्ताने
९८२२९२५९७९, ९९२०२५५७६१

## अनुक्रमणिका


| क्रमांक | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | ईश्वराचा शोध | १ |
| २ | प्रेम | ६ |
| ३ | खरी शिष्यता | १३ |
| ४ | आत्मसाक्षात्काराप्रत आगमन | १९ |
| ५ | ईश्वरनुभूति | २४ |
| ६ | कामवासनेची समस्या | २९ |
| ७ | वैवाहिक जीवनाचें पवित्रीकरण | ३४ |
| ८ | साधनेचे गंभीरतर स्तर | ४० |
| ९ | मोक्षपंथातील टप्पे | ४७ |
| १० | सद्‌गुरुंची न्यारी रीत | ५४ |
| ११ | क्रीयाशीलता आणि निष्क्रियता | ६१ |
| १२ | हिंसा आणि अहिंसा | ६३ |
| १३ | आध्यात्मिक उन्नतीची प्रतिप्रक्रिया | ७२ |
| १४ | चांगले व वाईट | ७८ |
| १५ | परमेश्वरांचे अंतरहित प्रेमस्वरुप | ८४ |
| १६ | ईश्वरपुरुष (भाग १ ला) : साधक व ईश्वरप्राप्तपुरुष | ८९ |
| १७ | ईश्वरपुरुष (भाग २ रा) : ईश्वरपुरुषाची अवस्था | ९४ |
| १७ | (अ) ईश्वरपुरुष (भाग ३ रा) : ईश्वरपुरुषाचे कार्य | ९९ |
| १८ | अध्यात्मजीवनांतील गूढविद्येचे स्थान (भाग १ ला) : गूढ अनुभवांचे महत्व | १०५ |
| १९ | अध्यात्मजीवनांतील गूढविद्येचे स्थान (भाग २ रा) : अध्यात्मजीवनाचा गूढ आधार | १११ |
| २० | अध्यात्मजीवनांतील गूढविद्येचे स्थान (भाग ३ रा) : गूढविद्या व अध्यात्मिकता | ११७ |

(desperateness) अविचाराची जोड आहे, आणि जे विकारांना पूर्ण मोकळे सोडतात, अशांवरच हें संकट येतें. अगतिक व हताश वृत्तींतील अनियंत्रित शक्तीमुळे विनाशच प्राप्त होणार. परंतु अशाच परिस्थितीमध्ये विचारी मनुष्याच्या नैराश्याचा परिणाम निराळा होतो; कारण त्याच्या हताश वृत्तीपासून उत्पन्न झालेल्या शक्तीचे सुबुद्ध (intelligent) आणि सहेतुक नियंत्रण केले जाते. अशा **दिव्य आशाभग्नते** (divine desperateness) **च्या क्षणीं,** मनुष्य जीवनाचें ध्येय शोधण्याचा आणि ते मिळविण्याचा निश्चय करतो; व अशा रीतीने टिकाऊ व स्थायी मूल्यांकरिता खरा शोध सुरु होतो. यापुढे **'या सर्व गोष्टींचे अंतिम ध्येय काय?'** हा जळजळीत व अदम्य प्रश्न त्याच्यासमोर उभा राहतो.

दिव्यत्वाभिमुख आशाभग्नता हा आध्यात्मिक जागृतीचा प्रारंभ होय.

याप्रमाणे, मनुष्य जेव्हा आपलें सारें मन:सामर्थ्य जीवनाचें ध्येय शोधण्यात केंद्रित करतो, तेव्हाच तो आपल्या आशाभंगांत निर्माण झालेल्या शक्तीचा विधायक उपयोग करीत असतो. यापुढे, त्याला जगातील चंचल वस्तूंमध्ये समाधान वाटेनासें होतें; आणि आतापर्यंत ज्यांच्या ग्राह्यतेबद्दल त्याला किंचितहि शंका नव्हती, अशा सामान्य मूल्यांच्या महत्त्वाविषयी तो संशयग्रस्त होतो. कांही झालें तरी सत्याचा शोध करायचा हीच त्याची एकमेव इच्छा असते, आणि सत्याहून यत्किंचितहि विभिन्न अशा दुसऱ्या कोणत्याहि हीनतर वस्तूने त्याचें समाधान होऊ शकत नाही. **दिव्यत्वाभिमुख आशाभग्नता (divine desperateness) आध्यात्मिक जागृतीचा प्रारंभ आहे,** कारण तिच्यापासूनच ईश्वरानुभूति प्राप्त करण्याच्या आकांक्षेचा उदय होतो. पूर्ण आशाभंग होऊन सर्व गोष्टींचा फोलपणा त्याच्या प्रत्ययास आला, म्हणजेच तो मायारुपी पडद्याच्या मागे दडून राहिलेल्या अर्थपूर्ण रहस्याचा शोध करण्याकरिता, वाटेल ती जोखीम घेण्यास तयार होतो.

दोनच पर्याय :- एकतर परमेश्वर किंवा कांहीच नाही.

आतापर्यंत साऱ्याच सामान्य गोष्टी त्याचें खरें सांत्वन करण्यास असमर्थ ठरलेल्या असतात; परंतु असें असूनहि जीवन अर्थशून्य व असार आहे असे पूर्णपणे मानायला त्याची आंतरिक प्रज्ञा (inner voice) तयार होत नाही. **अद्यापपर्यंत त्याच्या कक्षेत न आलेलें असें प्रच्छन्न सत्य जर त्याने गृहीत धरलें नाही, तर त्याने ज्याकरिता या जगांत रहावें व जगावें असे कांहीच राहात नाही.** त्याच्याकरिता दोनच पर्याय असतात-एकतर सिद्धपुरुषांनी ज्याला ईश्वर म्हटलें आहे, अशा प्रच्छन्न आध्यात्मिक सत्याचें अस्तित्व मानणें, किंवा सर्वच कांही अर्थशून्य आहे असें समजणें. दुसऱ्या पर्यायाचा मनुष्याच्या सर्व अंगप्रत्यंगांतून इन्कार होत असतो; आणि म्हणून त्याला पहिल्या पर्यायाचा शोध करण्याशिवाय गत्यंतर नसतें. अशा रीतीने संसारात हताश झाल्यानंतरच मनुष्य ईश्वराकडे वळतो.

गृहीत ईश्वरत्वाच्या प्रकाशांत अनुभवाचें पुनर्मूल्यमापन

# १ : ईश्वराचा शोध

बहुतेक लोकांना ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल शंकाहि येत नाही व त्यांना त्याच्याबद्दल कांही कुतूहलहि नसते. दुसरे कांही परंपरेच्या प्रभावामुळे कोणत्या ना कोणत्या धर्मांचे वा पंथाचे अनुयायी असतात; व हा त्यांचा विश्वास त्यांनी आसपासच्या वातावरणांतून घेतला असतो. कांही विधिनियम व समारंभाचे पालन व कांही कट्टर मतांचे अवलंबन करावयास लावण्याइतकीच शक्ति त्यांच्या श्रध्देमध्ये असते; परंतु त्यांचा जीवनविषयक संपूर्ण दृष्टिकोण अगदी बदलून टाकण्याइतकें सामर्थ्य त्यांच्या श्रद्धेंत नसतें. इतर कांही लोकांची तत्त्वचिंतनाकडे प्रवृत्ती असते; व असे लोक इतरांच्या वाक्यावर विश्वास ठेऊन किंवा स्वत:च्या विचारामुळे ईश्वराचें अस्तित्व मानूं लागतात. त्यांच्याकरिता परमेश्वर म्हणजे जास्तीत जास्त एक बुद्धिनिर्मित कल्पना किंवा गृहीत तत्त्व (hypothesis) असतो. परंतु अशा प्रकारच्या शिथिल विश्वासामुळे ईश्वराचा खरा व कळकळीचा शोध करण्यास कोणीहि प्रवृत्त होत नाही. त्यांना ईश्वराचें प्रत्यक्ष ज्ञान नसतें; व त्यांना ईश्वराबद्दल तळमळ नसते व त्याच्या प्राप्तीकरिता ते प्रयत्नहि करीत नाहीत.

ईश्वर विषयक विश्वासाच्या कोटी

खरा मुमुक्षु आध्यात्मिक सत्यांच्या ऐकीव ज्ञानावर संतुष्ट रहात नाही. तसेंच अनुमानाने होणाऱ्या ज्ञानानेहि त्याचें समाधान होत नाही. खऱ्या मुमुक्षूस आध्यात्मिक सत्यें ही रिकामपणी विचार करण्याची गोष्ट वाटत नाही. तर त्या सत्यांचा स्वीकार अगर त्याग त्याच्या आंतरिक जीवनात दूरवर परिणाम करणार असतात, म्हणून त्यांच्याविषयी प्रत्यक्ष ज्ञान मिळविण्याचा त्याचा साहजिकच आग्रह असतो. एका ऋषीच्या जीवनावरुन हे अधिक स्पष्ट करुन सांगता येईल. आध्यामिक मार्गावर बऱ्याच प्रगत झालेल्या आपल्या मित्राशीं तो ऋषि एके दिवशी चर्चा करीत होता. ते असें चर्चेत गुंतले असतांना, त्यांचे लक्ष तिकडून नेल्या जाणाऱ्या

खरा मुमुक्षु आध्यात्मिक सत्याच्या प्रत्यक्ष ज्ञानाची इच्छा करतो.

एका प्रेताकडे गेले. 'हा शरीराचा अंत आहे, परंतु आत्म्याचा नव्हे' तो मित्र त्या प्रेताकडे पाहून म्हणाला. ऋषीने विचारले 'तूं आत्मा पाहिला आहेस काय?' मित्राने उत्तर केले, 'नाही'. शेवटी तो ऋषि आत्म्याविषयी संशयवादीच राहिला. कारण त्यास आत्म्याविषयी स्वानुभवाचें प्रत्यक्ष ज्ञान हवे होते.

परंतु मुमुक्षूचें जरी दुसऱ्यापासून मिळालेल्या ज्ञानाने अगर अनुमानाने समाधान होत नसलें, तरी आपल्या अनुभवांत जीं आलेली नाहीत, अशी आध्यात्मिक सत्यें नाहीतच, अगर त्यांचें अस्तित्व असूच शकणार नाही, असे तो मानीत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, **आपल्या व्यक्तिगत अनुभवाची मर्यादा तो जाणतो, व आपल्या या मर्यादित अनुभवासच तो जगांतील सर्व संभाव्यतेचें परिणाम मानीत नाही.** आपल्या अनुभवक्षेत्राबाहेरच्या सर्व गोष्टींविषयी तो आपलें मन खुले ठेवतो.

जिज्ञासु आपलें मन खुलें ठेवतो.

तो ऐकीव माहितीवर ज्याप्रमाणे विश्वास ठेवीत नाही, तसाच तो त्याबद्दल पूर्ण अविश्वास बाळगण्याचीहि घाई करीत नाही. हें खरें की, पुष्कळ वेळा अनुभवाच्या परिमिततेमुळे कल्पनेचा व्यापार मर्यादित होत असतो; आणि त्यामुळे मनुष्याला आपल्या गतानुभवाच्या टप्प्यांत न आलेली अशी कांही सत्यें असतील हे शक्य वाटत नाही. परंतु बहुधा त्याच्या आयुष्यांतच असे कांही प्रसंग येतात की, आपल्या कट्टर मतांचे कुंपण तोडून, त्यास बाहेर यावें लागते व मन खरोखर खुलें करावें लागते.

हेंच मानसिक अवस्थान्तर उपुर्यक्त ऋषीच्या उदाहरणावरुन अधिक स्पष्ट होईल. हा ऋषि पूर्वी राजकुमार होता. उपरिनिर्दिष्ट चर्चेच्या प्रसंगानंतर कांही दिवसांनी, तो एकदा घोड्यावर बसून चालला असतांना, त्याच्या विरुध्द दिशेने पायी येणारा एक मनुष्य त्याला भेटला. घोड्याचा मार्ग अशा तऱ्हेने अडवला गेल्यावर, राजकुमाराने जरा उद्धटपणानेच त्या मनुष्यास स्वत:चा मार्ग मोकळा करण्यास आज्ञा दिली. त्या मनुष्याने तसें करण्यास नकार दिल्यानंतर, राजपुत्र घोड्यावरुन उतरला; आणि त्या दोघांनी संभाषणास सुरवात केली. 'तूं कोण आहेस?' त्या पायी चालणाऱ्याने विचारलें. राजकुमाराने उत्तर केले, 'मी राजकुमार आहे' 'परंतु तूं राजपुत्र आहेस, हे मला माहीत नाही,' असें सांगून तो मनुष्य पुढे म्हणाला, 'तूं राजपुत्र आहेस, हे मला प्रत्यक्षपणे माहीत होईल, तेव्हांच मी तुला राजपुत्र म्हणून कबूल करीन. नाहीतर नाही.' या संभाषणावरुन या राजपुत्राच्या (ऋषीच्या) मनांत विचार आला की, ज्याप्रमाणे त्या पायी चालणाऱ्या मनुष्यास स्वानुभवावरुन तो राजपुत्र आहे हें माहीत नसलें, तरी तो राजपुत्र होताच; त्याचप्रमाणे, आपल्याला स्वानुभवावरुन ईश्वर आहे हे माहीत नसलें, तरी त्याचें अस्तित्व शक्य आहे. अशा रीतीने त्याचें मन ईश्वराच्या संभाव्य अस्तित्वाविषयी विचार करणास

दृष्टान्त.

सर्वसाधारण मनुष्य ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल उदासीनच असतो.



खुलें झाल्यामुळे, तो त्या प्रश्नाचा प्रामाणिक विचार करण्याच्या यत्नास जोराने लागला.

**एकतर ईश्वर आहे किंवा तो नाही. जर तो असेल, तर त्याविषयीचा शोध उचितच आहे. परंतु तो नसेल, तरी देखील त्याचा शोध केल्यापासून कांही नुकसान होण्यासारखें नाही.** परंतु साधारणत: मनुष्य एक आनंददायक आणि स्वयंस्फूर्त कार्य या दृष्टीने ईश्वराच्या खऱ्या शोधाकडे वळत नाही; तर ज्या ऐहिक गोष्टींचा त्याला मोह पडतो आणि ज्यांतून त्याला मन काढून घेतां येत नाही, अशा गोष्टींची भ्रामकता त्याला समजून आली म्हणजेच तो ईश्वराचा शोध करण्यास प्रेरित होतो. साधारणत: मनुष्य आपल्या भौतिक जगताच्या कार्यातच निमग्न राहतो; आणि आपल्या जीवनाच्या विविध सुखदु:खांचा अनुभव घेत असतां त्याला त्याहून अधिक गूढ सत्यांच्या संभाव्य अस्तित्वाची शंकाहि येत नाही. शक्य तितकें इंद्रियसुख मिळविण्याचा व निरनिराळ्या प्रकारचें दु:ख टाळण्याचा तों प्रयत्न करीत असतो.

विचारास प्रवृत्त करणारे प्रसंग.

'खावें, प्यावें आणि मजा करावी', हेच त्याचें तत्त्वज्ञान ! परंतु त्याचा सुखाचा शोध अखंडपणे चालू असला, तरी तो दु:खाला अगदीच टाळूं शकत नाही; एवढेंच नव्हें तर त्याला ज्यावेळीं सुख मिळविण्यांत यश येते, त्याचवेळीं सुखप्राप्तीमध्ये देखील त्याला एकप्रकारची अरुचि उत्पन्न होते. दैनिक अनुभवचक्रांत भ्रमण करीत असतांना, कित्येक वेळा असा एखादा प्रसंग उद्भवतो की, 'या साऱ्याचा अंतिम हेतु काय? असें तो स्वत:ला विचारूं लागतो. असें विचारण्याची वेळ कदाचित् एखाद्या वेळीं च्या प्रसंगाचा स्वीकार करण्यासाठी त्याची मानसिक तयारी झालेली नसते, असा प्रसंग आला असतांना येईल, किंवा ती कांही खात्रीच्या अपेक्षा सफल न झाल्याने होणाऱ्या मनाच्या गोंधळामुळे येईल, किंवा एखाद्या वेळी आपली वागण्याची आणि विचार करण्याची ठराविक पद्धति मोडून पुन्हा अगदी नवीन रीतीने व्यवस्थापित करावी लागेल अशा नवीन परिस्थितीत तो पडल्यास, अशी वेळ येईल. परंतु बहुधा मनांतील एखादी तीव्र वासना विफल झाली, म्हणजेच बहुधा 'या साऱ्याचा अंतिम हेतु काय?' असा प्रश्न मनांत येतो. अशा तीव्र वासनेच्या तृप्तीचा मार्ग पूर्णपणे अवरुद्ध होऊन तिच्या सफलतेबद्दल यत्किंचितहि आशा करण्यास मुळीच जागा नसेल, तर मनाला जोराचा धक्का बसतो; व ह्या वेळेपावेतों ज्या तऱ्हेंचे जीवन त्याने मनांत कोणतीहि शंका न आणतां घालविलें, त्याच प्रकारच्या जीवनाचा पुढेही अंगिकार करण्यास त्यांचें मन तयार होत नाही.

अनियंत्रित व तीव्र हताश स्थिति घातक असते; परंतु तीच वृत्ति ईश्वराकडे झुकली तर विधायक होते.

अशा परिस्थितींत मनुष्याचा मनोभंग होऊन, तो अगदींच हताश होऊन जातो; आणि या चित्तक्षोभांत उत्पन्न झालेली प्रचंड शक्ति जर अनिर्बंध आणि अनिर्दिष्ट राहिली, तर तिच्यामुळे मनुष्याच्या मनात घातक अव्यवस्था (derangement) उत्पन्न होऊं शकते; व कधी कधी तर तो आत्महत्या करण्यासहि प्रवृत्त होतो. ज्यांच्या तीव्र नैराश्याला

बदलत्या अशा विविधतापूर्ण आकृती दिसतात, त्याचप्रमाणे मनाच्या घटकावयवांच्या नवनवीन संयोगामुळे प्रेमाच्या क्षेत्रांतहि असंख्य गुणभेद (qualitative variety) दृष्टीस पडतात. आणि ज्याप्रमाणे फुलांच्या रंगांच्या छटांमध्ये अनंत सूक्ष्म प्रकार असतात, त्याचप्रमाणे मानवी प्रेमाचेहि विविध आणि सूक्ष्म भेद आहेत.

प्रेमाच्या निम्नतर श्रेणी

मानवी प्रेम हें मोह, कामेच्छा, लोभ, क्रोध व मत्सर इत्यादीं सारख्या अवरोधक घटकांनी घेरलेलें असतें. एका अर्थानें, हे अवरोधक घटक म्हणजे निम्नतर (lower) प्रेमाचींच रुपें आहेत, किंवा या निम्नतर प्रेमप्रकारांचे अनिवार्य **आनुषंगिक परिणाम** आहेत. मोह, कामेच्छा आणि लोभ ही निम्नतर प्रेमाचींच विकृत रुपें म्हणावयास हरकत नाही. मोहामध्ये, मनुष्य भोग्य वस्तूवर **आसक्त** होतो; कामेच्छेमध्ये, तो त्या वस्तूपासून संवेदनेची लालसा धरतो, आणि लोभामध्ये, तो ती **वस्तु स्वाधीन करुन घेण्याची** इच्छा करतो. निम्नतर प्रेमाच्या या तीन प्रकारांमधील लोभाची प्रवृत्ति मूळ भोग्य वस्तु सोडून ती वस्तु मिळविण्याच्या साधनावर प्रसुत होत जाते. अशा रीतीने, मनुष्य धन, कीर्ति आणि सत्ता यांचा लोभ धरतो, कारण ते सर्व त्याच्या वांच्छित वस्तुलाभाचीं साधनें होऊ शकतात. जेव्हा या निम्नतर प्रेम प्रकारांना अवरोध होतो, किंवा त्यांच्या अवरोधाची शक्यता उत्पन्न होते, तेव्हा क्रोध आणि मत्सर निर्माण होतात.

निम्नतर उच्चतराचा शत्रु आहे.

निम्नतर प्रेमाचे हे प्रकार पवित्र प्रेमाच्या प्रवाहास रोधक असतात. प्रेमसरिता ही निम्नतर प्रेमाच्या ह्या विकृत आणि बंधनकारक रुपांपासून विमुक्त झाल्याशिवाय कधीहि पूर्णपणे निर्मल आणि स्थिर होऊं शकत नाही. **निम्नतर हे उच्चतराचा शत्रु आहे.** जाणीव जर निम्नतरांशी संबद्ध झाली, तर ती स्वत:च उत्पन्न केलेल्या चाकोरीमध्ये फसते; व तिला त्या चाकोरींतून विमुक्त होऊन, पुढे प्रगत होणे कठीण जातें. अशा रीतीने निम्नतर प्रेमप्रकार हे उच्चतर प्रेम प्रकारांच्या संवर्धनामध्ये अडथळे आणीत राहतात; आणि उच्चतर प्रेमाचा विमुक्त आविष्कार होण्याकरता, निम्नतर प्रेमाचा त्याग करावाच लागतो.

प्रेम व मोह.

निम्नतर प्रेमाच्या शिंपल्यांतून उच्चतर प्रेमाचा उदय होण्याकरिता प्रेमाला **विवेकाची अविरत** साथ पाहिजे. म्हणून मोह, कामेच्छा, लोभ आणि क्रोध या अवरोधक घटकांपासून प्रेम निराळें आहे, हे ओळखले पाहिजे. मोहामध्ये, मनुष्य वस्तूच्या कल्पित आकर्षणाच्या जादूचा **निष्क्रिय** (passive) बळी असतो; परंतु **प्रेमामध्ये मनुष्य प्रीतिविषयाच्या अंगीभूत स्वारस्याचे क्रियाशील (active) होऊन रसस्वादन करतो.**

प्रेम व विषयवासना

प्रेम हें विषयवासनेहूनहि निराळें आहे. विषयवासना इंद्रियांच्या विषयांवर अवलंबून असते, म्हणून तिच्यामुळे



आता ज्या प्रच्छन्न सत्यावर त्याने विश्वास ठेवलेला असतो, त्या सत्याप्रत त्याला सरळ प्रवेश न मिळाल्यामुळे तो आपल्या पहिल्या अनुभवांनाच त्या **परात्पर गरिमे** (Significant beyond ) प्रत पोचविण्याची संभाव्य साधनें मानतो; आणि अशा रीतीने आध्यात्मिक मार्गावर प्रकाश मिळण्याकरिता, तो आपल्या नेहमीच्या अनुभवाकडेच परत वळतो. परंतु यामुळे तो आता या अनुभवांकडे नवीन दृष्टिकोणांतून पहातो, आणि त्याचा अर्थहि त्याला निराळा भासतो. **यापुढे तो अनुभव घेतो, इतकेंच नव्हे तर तो त्या अनुभवाचा आध्यात्मिक अर्थहि जाणण्याचा प्रयत्न करतो.** अनुभवाचें स्वरुप काय आहे याचाच तो केवळ विचार करीत नाही; तर जीवनांतील प्रच्छन्न ध्येयाप्रतच्या जीवन यात्रेंत त्या अनुभवाचा अर्थ काय आहे, याचाच तो विचार करतो. आणि अशा रीतीने, या नवीन शोधास सुरुवात करण्यापूर्वी, जी प्रज्ञा (insight) त्याला येऊं शकली नसती, ती सर्व अनुभवांच्या मूल्यांच्या विवेकशील पुनर्मापनामुळे प्राप्त होते.

नवीन प्रज्ञेंत मन अनुभूत मूल्यांविषयी प्रयोगशील बनतें.

अनुभवमूल्यांच्या पुनर्निश्चितीमुळे ज्ञानवृद्धि होते; आणि आध्यात्मिक ज्ञानांत वेळोवेळीं होणाऱ्या वृद्धीमुळे, जीवनाकडे पहाण्याचा साधारण दृष्टिकोण हटकून बदलत जातोच. म्हणून ईश्वराच्या अगर प्रच्छन्न आध्यात्मिक सत्याच्या बौद्धिक आणि सैद्धान्तिक शोधाचे प्रतिध्वनि त्याच्या व्यावहारिक जीवनांत उमटूं लागतात. आणि त्याचें जीवन म्हणजे नवानुभूत आध्यात्मिक मूल्यांचा प्रयोग बनतें.

ईश्वराची प्राप्ति म्हणजे स्वत:च्या आत्म्याप्रत आगमन करणे होय.

आपल्या जीवनांमध्ये, तो जों जों असे विवेकशील व हेतुपुरस्सर प्रयोग करीत जातो, तों तों त्याला जीवनाचा खरा अर्थ अधिकाधिक समजत जातो, व अशा रीतीने मानसिक दृष्ट्या तो पूर्णपणे बदलत जात असतांना, त्याला जीवनाचे खरें स्वारस्य समजण्याची दृष्टि येत होती, असें त्याला आढळून येते. जीवनाचें यथार्थ स्वरुप आणि खरें मूल्य यांच्या स्पष्ट आणि प्रशान्त दर्शनामुळे, आपण **ज्याच्या शोधासाठी इतका अटोकाट प्रयत्न करीत होतों, तो ईश्वर कांही कोणी प्रच्छन्न किंवा परका नाही, असें साधकाला समजून येतें. तो एखादें गृहीत तत्त्व (hypothesis) नसून, स्वत:च सत्य आहे;** निर्मळ दृष्टीने पाहिलेली अंतिम सद्वस्तु म्हणजेच ईश्वर आहे, व तो स्वत: त्या ईश्वराचाच एक अंश असून त्यामध्ये त्याचें अस्तित्व सम्मिलित आहे, आणि त्याच्याशींच तो वास्तविक अभिन्न व एकरुप आहे. **अशा तऱ्हेने साधक जरी कांहीतरी नवीन शोधण्यास म्हणून निघतो, तरी त्याला पूर्ववर्ति सद्वस्तूचेंच नवीन ज्ञान प्राप्त होतें.** आध्यात्मिक प्रवास म्हणजे कांहीतरी अगदी नवीन ध्येयाप्रत पोचणें, अगर साधक जें पूर्वी नव्हता, तें बनणें नव्हे. तर आध्यात्मिक जागृति म्हणजे साधकाचे स्वत:विषयीचें व जीवनाविषयीचें अज्ञान हळूहळू नाहीसें करणें होय. **ईश्वराची प्राप्ति म्हणजे स्वत:च्याच आत्म्याप्रत आगमन करणें होय.**

# २ : प्रेम

जीवन आणि प्रेम हीं परस्परांपासून अविभाज्य आहेत. जेथे जीवन आहे, तेथे प्रेम आहे. अत्यंत प्राथमिक अवस्थांमध्येदेखील, जाणीव आपल्या मर्यादांचे अतिक्रमण करुन दुसऱ्या रुपांशी एकता अनुभवण्याचा प्रयत्न करते. जरी प्रत्येक रुप दुसऱ्या रुपाहून भिन्न असतें, तरी ती सर्व रुपें एकाच जीवनाचीं रुपें असतात; आणि या अप्रकट व अन्तर्गत जीवनैक्यसत्याचा प्रसुप्त भाव एका रुपास दुसऱ्या रुपाबद्दल जें आकर्षण वाटतें, त्यामधून या भ्रममय जगांत देखील व्यक्त होतो.

प्रेम विश्वव्यापि आहे.

सर्व ग्रह आणि तारे ज्या नियमाने बांधले गेले आहेत, तो गुरुत्वाकर्षणाचा नियम देखील एक प्रकारें विश्वाच्या प्रत्येक भागाला व्यापीत असलेल्या प्रेमाचेंच अस्पष्ट प्रतिबिंध आहे. खरें पाहिले असतात, प्रतिसारक शक्ति (repulsion) देखील प्रेमाचीच अभिव्यक्ति आहे, कारण कोणत्या तरी दुसऱ्या वस्तूकडे आकर्षण झाल्यामुळेच वस्तु एकमेकांस विमुख होऊन, एकमेकांपासून प्रतिसारल्या जातात. प्रतिसारक शक्ति आकर्षणाचाच एक निषेधरूप परिणाम आहे. पदार्थांमध्ये असलेली **संसक्तिशीलता** (cohesion) आणि **साम्यशीलता** (affinity) या प्रेमाच्याच स्पष्ट अभिव्यक्ति होत. या अवस्थेंतील प्रेमाचें एक विशेष उदाहरण म्हणजे चुंबकाचे लोहाकर्षण हे होय. प्रेमाचे हे सर्व प्रकार सर्वात खालच्या दर्जांच्या अगदी अविकसित जाणिवेंत दिसून येत असल्यामुळे, सर्वात कमी प्रतींचे असतात.

जड जगतांतील प्रेमाचे राज्य.

पशुयोनीमध्यें हे प्रेम सभोवतींच्या पदार्थांकडे निर्दिष्ट होणाऱ्या सचेतन प्रवृत्ती (conscious impulses) च्या रुपांत अधिक स्पष्ट होते. हे प्रेम **निसर्गप्रेरित** (instinctive) असतें; आणि योग्य पदार्थांना स्वाधीन करुन इच्छापूर्ती करण्याच्या रुपाने प्रकट होतें. जेव्हा वाघाला हरिणास खाण्याची इच्छा होते, तेव्हा खरोखरच त्याला त्याविषयी प्रेम वाटत असतें. या अवस्थेंत काम-वासना हेंहि एक प्रेमाचेंच दुसरें रुप आहे. या अवस्थेंतील प्रेमाच्या

पशुयोनीतील प्रेम.



प्रादुर्भवनामध्ये एक गोष्ट मात्र सामान्य असते; आणि ती म्हणजे **त्या सर्वांमध्ये आपल्या प्रीतिविषयाच्या द्वारा कोणती तरी निसर्गप्रेरणा किंवा शारीरिक इच्छा तृप्त करुन घ्यावयाची असते.**

सर्व कनिष्ठ कोटींतील प्रेमापेक्षा मानवी प्रेम हें अधिक उच्चप्रकारचें असतें, कारण मनुष्याला पूर्णविकसित जाणीव असते. जरी मानवी प्रेम व उपमानवी प्रेम यात अखंडता असली, तरी तें मानवी प्रेम उपमानवी (sub-human) प्रेमापासून निराळे असतें, कारण यापुढे त्याचे व्यापार बुद्धिरुपी एका नवीन घटकाच्या साहचर्यात होतात. कधी कधी मानवी प्रेम बुद्धीपासून **विश्लिष्ट** (divorced) शक्तीच्या रुपात दिसतें; आणि बुद्धीशीं समानन्तर राहतें. कधी कधी प्रेम बुद्धीशी सम्मिश्रित होतें व त्याचा बुद्धीशीं संघर्ष होतो. आणि अखेरीस **बुद्धि आणि प्रेम दोन्ही समभार होऊन त्यांचे एकाच अखंड एकतेंत सायुज्य होतें;** व ते दोन्हीहि सुसंवादी पूर्णतेचें एक अंग बनतात.

मानवी प्रेमाला एका नवीन तत्त्वाबरोबर-बुद्धीबरोबर जुळणी करुन घ्यावी लागते.

अशा रीतीने मानवी प्रेम आणि बुद्धि यांचे तीन प्रकारचें मीलन होऊं शकते. **पहिल्या** प्रकारांत, प्रेमाचें क्षेत्र आणि विचारांचें क्षेत्र शक्य तोंवर अलग अलग ठेवलें जातें, - म्हणजे प्रेमाच्या क्षेत्रांत बुद्धीच्या व्यापाराला जवळजवळ पूर्ण मज्जाव असतो, आणि बुद्धिच्या क्षेत्रांत प्रीतीला जवळजवळ पूर्ण बंदी असते. परंतु आत्म्याच्या या दोन अंगांमध्ये पूर्ण पृथकत्व राहू शकत नाही. परंतु जेव्हा बुद्धि आणि प्रेम यांचे व्यापार अदलूनबदलून (alternately) चालू असतात आणि दोघांचेंहि प्राधान्य आंदोलनशील असतें, तेव्हा **प्रेम बुद्धीने प्रकाशित झालेलें नसतें, आणि बुद्धि प्रेमाने उल्लसित झालेली नसते. दुसऱ्या** प्रकारामध्ये, बुद्धि आणि प्रेम यांचे व्यापार एकसमयावच्छेदेंकरुन चालू असतात, परंतु ते परस्परांशी सुसंवादी नसतात. त्यांच्या या संघर्षामुळे गोंधळ उत्पन्न होत असला, तरी बुद्धि आणि प्रेम यांचा खरा समन्वय करणाऱ्या उच्चतर स्थितीचा विकास साधण्याकरिता असा संघर्ष आवश्यकच आहे. **तिसऱ्या** प्रकारांत, **प्रेम आणि बुद्धि यांचा समन्वय ही एक सिद्ध स्थिति होऊन जाते व त्यामुळे प्रेम आणि बुद्धि या दोहोंमध्ये इतकें परिवर्तन घडून येतें की नेहमीच्या सामान्य चेतनेहून श्रेष्ठतर असा एक नवीनच चेतनास्तर** (level of consciousness) उद्भूत होतो; व ह्या अवस्थेला अतिचेतना (super consciousness) अगर अतिमानवी जाणीव म्हणतात, ते यथोचितच आहे.

प्रेम आणि बुद्धि यांचे तीन प्रकारचे मीलन.

मानवी प्रेम, असंख्य वासनांनी भरलेल्या आहंकारिक चेतने (ego-consciousness) च्या साच्यात प्रकट होतें. या घटकांच्या विविधतेमुळे प्रेमात निरनिराळे रंग उत्पन्न होतात. ज्याप्रमाणे चारुदर्शकामध्ये (kaleidoscope) आपल्याला साध्या मूल घटकांच्या भिन्न संयोगाने असंख्य आणि नित्य

प्रेमाचे विविध गुणभेद

दिव्यतेचा जाणीवपूर्वक अनुभव येत असल्यामुळेच ईश्वर या द्वैतपूर्ण व भ्रामक जगतांत उतरतो. प्रेमाचा विकास द्वैतनिष्ठ ओढीवर अवलंबून असून द्वैताच्या आधारानेच तो अधिक वाढतो. प्रेमाची ही क्रीडा चालू रहाण्याकरिता, ईश्वरास नाना आत्म्यांचे भासमान भिन्नत्व धारण करावें लागतें. नाना जीव हीं त्याचींच रुपें असतात; आणि त्यांच्याकरिता तोच दैवी प्रेमिक आणि ईश्वरी प्रियतम या दोहोंचीहि एकाच वेळी भूमिका घेत असतो. प्रियतम बनून तोच त्यांचा सत्य आणि अंतिम आराध्य होतो; आणि दैवी प्रेमिक बनून तोच त्यांना स्वत:कडे परत ओढून घेणारा उद्धारकर्ता होतो. अशा रीतीने सर्व द्वंद्वात्मक विश्व भासमात्रच असलें तरी हा भास कांही महत्त्वपूर्ण अर्थसिद्धि (significant purpose) साठी उत्पन्न झालेला आहे.

प्रेम आणि बुध्दि यांचे तिन प्रकारचे मिलन

**प्रेम हें द्वंद्वात्मक जगांतील ईश्वराच्या एकतेचें प्रतिबिंब आहे.** हेंच सृष्टीचें रहस्य आहे. जीवनांत जर प्रेम नसेल तर विश्वांतील सर्व आत्मे परस्परांस बहिर्भूत होतात; आणि अशा प्रेमहीन जगतांतील परस्परांचे सर्व संभाव्य संबंध केवळ वरवरचे, अर्थहीन आणि यंत्रसम बनतात. प्रेमामुळेच व्यक्तिव्यक्तींतील संबंध अर्थपूर्ण होतात; आणि या द्वंद्वयुक्त विश्वांतील घटनांना प्रेमामुळेच अर्थ आणि महत्त्व येते. परंतु **द्वैतमय जगतांत प्रेमामुळेच स्वारस्य उत्पन्न होत असलें, तरी त्या प्रेमातच द्वैताचा धिक्कारहि चिरकाल अभिप्रेत असतो.** प्रेम जसजसें प्रबल होत जाते, तसतसें ते निर्मितिक्षम व क्रियाशील विव्हलता (creative restlessness) उत्पन्न करतें; आणि ते आध्यात्मिक गतिशीलतेला संचालित करणारी प्रमुख शक्ति बनून, **जाणिवेमध्ये सत्ताविस्ताराची मूळची एकता (original unity) पुन:प्रस्थापित करते.**



आत्म्यावर **विषयांचा** पगडा बसतो व त्यात आध्यात्मिक पारतंत्र्य असतें; परंतु प्रेमामुळे आत्म्याच्या नामरुपात अंतर्भूत असलेल्या सद्वस्तूशींच प्रत्यक्ष संबंध जडतो, व त्यात मानसिक गुलामगिरी नसते, म्हणून विषयवासना जड (heavy) व प्रेम हलके (light) भासतें. विषयवासनेंत जीवन **संकुचित** होतें, तर प्रेमांत **विशालतेचा** अनुभव येतो. एका माणसावर प्रेम करणें, **म्हणजे त्याचें जीवन तुमच्या जीवनांत मिळवून घेणें होय.** जणू काय तुमचें जीवन **द्विगुणित** होऊन ते आता दोन केंद्रांमधे स्पंदमान होतें. तुम्ही अखिल जगतावर प्रेम केलें, तर एका अर्थानें तुमचें जीवन अखिल जगतांत व्यापलेलें राहील. परंतु विषयवासनेमुळे जीवनरुपी समुद्रास ओहोटी लागते, व स्वत:हून निराळ्या समजल्या जाणाऱ्या रुपांवर अवलंबून असण्याचा अनुभव येतो. याप्रमाणे विषयवासनेंत **द्वैत व दु:ख यांचा परिपोष होतो;** परंतु प्रेमांत **एकत्व व आनंद** यांचा परिपोष होतो. विषयवासनेंत **ऱ्हास** असतो, तर प्रेमांत नित्य नवीन दिसणारी **विपुलता** असते. विषयवासना ही इंद्रियाची तहान आहे, तर प्रेम हे आत्म्याचें प्रकाशन आहे. विषयवासनेंत **प्रक्षोभ** आहे, तर प्रेमांत शांति आहे. विषयवासनेंत **तृप्तीची** वासना आहे, तर प्रेमांत **तृप्त स्थितीचा अनुभव** आहे.

प्रेम आणि लोभ.

प्रेम हे लोभाहूनहि निराळें आहे. लोभ हा त्याच्या सर्व स्थूल आणि सूक्ष्म रुपांमध्ये ग्रहण-लोलुपता (possessiveness) आहे. तो स्थूल गोष्टी आणि व्यक्ति यांच्या ग्रहणाची इच्छा करतो, एवढेंच नव्हे तर कीर्ति आणि सत्ता यासारख्या अमूर्त आणि सूक्ष्म गोष्टी स्वाधीन करण्याची आकांक्षाहि बाळगतो. प्रेमामध्ये स्वत:च्या वैयक्तिक जीवनांत दुसऱ्या व्यक्तींच्या परिग्रहाचा सवालच नसतो. उलट प्रेमांत स्वत:साठी कोणतीहि अपेक्षा न ठेवतां, मनुष्यापासून आपल्या प्रीतिविषयाच्या अन्त:करणास उल्लसित आणि पुन:परिपूरित करील असा विमुक्त आणि निर्मायक चित्स्त्रोत उत्पन्न होत असतो. शिवाय एक विरोधाभासपूर्ण सत्य असें आहे की, **लोभामध्ये दुसऱ्यास आधीन करुन घेण्याचा प्रयत्न असला, तरी खरें पाहतां मनुष्य स्वत:च त्या दुसऱ्याच्या आधीन होतो; आणि प्रेमामध्ये, मनुष्य दुसऱ्यास आत्मसमर्पण करण्याची इच्छा करीत असला, तरी त्यांत खरोखर प्रीतिविषयाचे प्रेमिकाच्या जीवनामध्येच आध्यात्मिक संमीलन होतें. लोभामध्ये, आत्मा वस्तूवर आपलें प्रभुत्व स्थापन करण्याची इच्छा करतो; परंतु वस्तुत: ती वस्तूच आत्म्यावर आपलें आध्यात्मिक प्रभुत्व प्रस्थापित करते. आणि प्रेमामध्ये आत्मा स्वत:साठी कांही न ठेवतां प्रीतिविषयास पूर्णपणें स्वसमर्पण करतो; परंतु तें करतांनाच, या समर्पणद्वारा, आपला प्रीतिविषय आपल्यांतच समाविष्ट झाला असल्याचें त्यास आढळून येते.**

पवित्र प्रेम अनुग्रहद्वारा जागृत होते.

मोह, कामेच्छा आणि लोभ हे सर्व अध्यात्मिकतेच्या दृष्टीने व्याधीच आहेत. क्रोध आणि मत्सर हीं या व्याधींचीं उग्रता वाढविणारीं बाह्य लक्षणें होत; आणि त्यामुळे ती

व्याधि अधिकच भयंकर होते. यांच्या अगदी उलट, शुध्द प्रेम आध्यात्मिक पूर्णतेची प्रफुल्लता आहे. मानवी प्रेम या बंधनकारक विकारामुळे इतकें ग्रस्त होऊन जातें की अंत:करणांतून पवित्र प्रेमाचें प्रकटीकरण अशक्य होऊन जातें. म्हणून साधकाच्या अंत:करणांत अशा पवित्र प्रेमाचा उदय होतो, तेव्हा ती खरोखर एक प्रकारची देणगीच समजली पाहिजे. **सद्‌गुरुच्या अनुग्रहास जबाब म्हणूनच साधकाच्या अंत:करणांत पवित्र प्रेमाचा उदय होतो.** जेव्हा पवित्र प्रेम हें प्रसादरुपाने सद्‌गुरुकडून साधकास मिळतें, तेव्हा ते सुपीक क्षेत्रभूमींतील बीजाप्रमाणे त्याच्या जाणीवेंत राहतें; आणि योग्य समय येतांच त्या प्रेमाचें रोप वाढीस लागून कालान्तराने त्याचा मोठा वृक्ष बनतो.

साधकाची आध्यात्मिक पूर्वतयारी ही सद्‌गुरुच्या अनुग्रहावतरणास आवश्यक आहे.

अनुग्रहास पात्र होण्याकरिता आध्यात्मिक पूर्वतयारी.

ही अनुग्रहासाठी लागणारी आध्यात्मिक तयारी साधकाने आपल्या अंत:करणांत कांही दिव्य गुणांचा विकास करीपर्यंत पूर्ण होत नाही. जेव्हा मनुष्य दुसऱ्यांच्या पाठीमागे त्यांची निंदा करण्याचे सोडून देतो, आणि त्यांच्या दुर्गुणांपेक्षा सद्‌गुणांचा अधिक विचार करुन व परमसहिष्णुतेचा अवलंब करुन स्वत:ची हानि होत असतांनाहि दुसऱ्याचे कल्याण चिंतितो, तेव्हाच तो सद्‌गुरुकृपेस पात्र होतो. या आध्यात्मिक तयारींतील सर्वात मोठें विघ्न म्हणजे चिंता. परंतु जेव्हा हें चिंतेचे महान् विघ्न भगीरथ प्रयत्नांनी उल्लंघिलें जातें, तेव्हा शिष्याच्या आध्यात्मिक पात्रतेस आवश्यक असलेल्या दैवी गुणांच्या संवर्धनाचा मार्ग सुगम होतो. **शिष्याची तयारी पूर्ण होतांच गुरुप्रसादाचें अवतरण होतें. सद्‌गुरु हा दैवी प्रीतीचा अथांग सागरच असल्याने, आपला अनुग्रह ज्यावर सुफलित होईल. अशा आत्म्याची तो वाटच पाहत असतो.**

सद्‌गुरुप्रसादाने उत्पन्न होणारें प्रेम म्हणजे एक दुर्लभ विशेषाधिकार आहे. आपल्या

पवित्र प्रेम दुर्लभ आहे.

अपत्याकरिता सर्वस्वदानास आणि मृत्यूचाहि स्वीकार करण्यास तयार होणारी माता, व आपल्या देशासाठी प्राणार्पण करण्यास तयार असणारा हुतात्मा हे दोघेहि अत्यंत थोर आहेत. परंतु सद्‌गुरुच्या अनुग्रहाने उत्पन्न होणाऱ्या या पवित्र प्रेमाचा आस्वाद त्यांनी घेतलाच असतो असें नाही. एवढेंच नव्हे, तर मोठमोठ्या जटाजूटधारी, आणि पर्वतदऱ्यांतून बसणाऱ्या आणि गाढ समाधींत पूर्णपणें निमग्न असणाऱ्या योग्यांमध्ये देखील हे अमोल प्रेम असतेंच असें नाही.

इतर कोणत्याहि साधनांपेक्षा सद्‌गुरुकृपेने जागृत झालेलें विमल प्रेम हे साधकांचे

पवित्र प्रेम सर्वात उत्तम अनुशासन आहे.

अधिक मोलाचें साधन आहे. या प्रेमांत सर्व प्रकारच्या अनुशासनां (disciplines) चे गुणविशेष असतात. इतकेंच नव्हे, तर साधकास आपल्या ध्येयाप्रत नेण्याकरिता प्रेम हें इतर सर्व अनुशासनांपेक्षा अधिक प्रवीण आणि समर्थ असतें. जेव्हा या प्रेमाचा उदय



होतो तेव्हा साधकास एकच इच्छा उरते– आणि ती म्हणजे आपल्या गुरुस्वरुप दैवी प्रियतमाशीं सायुज्य पावणें ही होय. इतर सर्व इच्छांना आपल्या जाणिवेंतून अशा रीतीने काढून टाकल्याने, असीम पावित्र्य प्राप्त होतें. प्रेमाइतकें दुसरें कोणतेंहि साधन साधकास पूर्णपणें पवित्र बनवूं शकत नाही. गुरुत्वरुप ईश्वरी प्रियतमास सर्वस्व अर्पण करण्यास साधक सतत सिद्ध असतो; आणि त्याच्याकरिता कोणताही त्याग त्यास कठिण वाटत नाही. त्याचे सर्व विचार स्वत:पासून विमुख होऊन, त्याच्या दैवी प्रियतमावर पूर्णपणें केंद्रित होतात. आणि **सततवर्धमान प्रेमाच्या उत्कटतेमुळे साधक मर्यादित 'मी' च्या शृंखला तोडून, आपल्या प्रियतमाशीं एकरुप होतो.** हीच ईश्वरत्व प्रकाशित करणारी प्रेमाची परिपूर्ति आहे.

ईश्वरी प्रेम मानवी प्रेमाहून श्रेष्ठ आहे.

ईश्वरी प्रेम हे मानवी प्रेमाहून अगदी निराळ्या प्रकारचें आहे. मानवी प्रेम हे एकाच तत्त्वांतील अनेक रुपांवर असतें. तर ईश्वरी प्रेम हे अनेक रुपांतील एका तत्त्वावर असतें. मानवी प्रेमात अनेक प्रकारची विकृति व गुंतागुंत आहे, तर ईश्वरी प्रेमांत विकाररहितत्व व मुक्त स्थिति आहे. **ईश्वरी प्रेमांतील तत्त्वपर व व्यक्तिपर भाग समस्थितींत असतात. परंतु मानवी प्रेमांत यांपैकी कोणत्यातरी एका भागास वैषम्यजनक प्राधान्य असतें.** मानवी प्रेमांतील व्यक्तिनिष्ठ भागाला प्राधान्य असेल, तेव्हा मनुष्य जीवनाच्या इतर रुपांतील आंतरिक सारपूर्णता (intrinsic worth) जाणू शकत नाही; आणि कर्तव्य भावनेने प्रेरित होऊन प्रेमांत तत्त्वनिष्ठेचें प्राधान्य असेल, तर ती मनुष्याला शुष्क, कठोर व यंत्रसम बनविते. कर्तव्याची भावना ही मनुष्याला बाह्य नियंत्रणाप्रमाणे वाटते; परंतु ईश्वरी प्रेमांत हे दोन्हीहि भाग परस्परांत विलीन झालेले असतात; व त्यामुळे ईश्वरी प्रेमाच्या अनुभवांत किंवा आविष्कारांत अनंतता असते.

दैवी प्रेमांत प्रियतम आणि प्रेमिक यांचे मिलन होते.

सर्वोत्कृष्ट कोटीचें मानवी प्रेम देखील वैयक्तिक स्वभावधर्माने परिमित होत असतें आणि हा वैयक्तिक स्वभाव (individual nature) सातव्या भूमिकेपर्यंत असतोच. **परंतु व्यक्तिमन नष्ट झाल्यावरच दैवी प्रेमाचा उदय होत असल्यामुळे तें व्यक्तिस्वभावाच्या शृंखलांपासून विमुक्त असतें.** मानवी प्रेमांत, प्रेमी आणि प्रियतम यांमधील द्वैत कायमच असतें; पण **ईश्वरी प्रेमांत त्या दोघांचे सायुज्य होतें.** या अवस्थेत साधक द्वैताची सीमा उल्लंघून ईश्वराशीं एकरुप होतो, कारण दैवी प्रेम म्हणजेच ईश्वर होय. प्रेमी आणि प्रियतम ऐक्य पावतात, तेव्हा तोच अंत असून प्रारंभहि आहे.

प्रेमासाठीच विश्वाची रचना झाली आहे.

प्रेमासाठीच या सर्व विश्वाची उत्पत्ति झालेली आहे; आणि प्रेमासाठीच तें चाललें आहे. प्रेमी आणि प्रियतम यांच्या भासमान द्वंद्वाच्या द्वारा ईश्वराला स्वत:च्या

शिष्याला स्वत:ला सद्‌गुरुच्या ईश्वरत्वाचा जो अनुभव असतो, त्या अनुभवावर त्याची श्रद्धा अढळपणें अधिष्ठित राहिली पाहिजे. थोड्याशा वाऱ्याच्या झुळुकेबरोबर इतस्तत: वाहवत जाणाऱ्या गवताच्या काडीप्रमाणे न बनतां तुफान वादळांतहि अचल राहणाऱ्या पर्वताप्रमाणे तो स्थिरमति राहिला पाहिजे. गुरुवरील खऱ्या श्रद्धेचें मर्म कल्याणच्या गोष्टीवरुन स्पष्ट होईल. कल्याण हा शिवाजीस समकालीन असणाऱ्या पूर्ण सद्‌गुरु रामदासस्वामींचा शिष्य होता. गुरूचें सर्व शिष्यांवर अपवादरहित प्रेम असतें; परंतु कांही शिष्य त्याला विशेषत: प्रिय असूं शकतात. ह्याला दृष्टान्त म्हणजे मनुष्याचें आपल्या देहाच्या सर्वच भागावर प्रेम असतें, पण बोटांपेक्षा त्याला आपले डोळे अधिक प्रिय असतात. रामदासस्वामींना पुष्कळ शिष्य होते; परंतु त्या सर्वांमध्ये कल्याणवर त्यांची मर्जी अधिक होती. कल्याण हा सर्व शिष्यांहून अधिक प्रिय कां आहे, हे दुसऱ्या शिष्यांना बरोबर समजेना.

कल्याणची गोष्ट.

एकदा रामदासस्वामींनी शिष्यांच्या भक्तीची कसोटी पाहिली. त्यांनी सर्व शिष्यांना जवळ बोलावून मरणोन्मुख आजारीपणाचे सोंग केले. त्यांनी आपल्या गुडघ्याला एक आंबा पट्ट्यांनी अशा रीतीने बांधला की तो मोठ्या गळू प्रमाणे दिसूं लागला. रामदासस्वामींनी ही सूज शिष्यांना दाखविली व तो एक दूषित गळू असून, कोणी तरी त्यातील विषारी पू चोखून घेण्यास तयार झाल्याशिवाय आपण जिवंत राहण्याचा मुळीच संभव नाही, असें सांगितलें; व त्याबरोबरच त्यांनी सर्व शिष्यांना हेंहि स्पष्ट केलें की जो कोणी त्या गळूंतील विषारी पू चोखील, तो तत्काल मरण पावेल. नंतर स्वत:चा प्राण अर्पण करुन त्यांतील विष चोखण्यास कोणी शिष्य तयार आहे काय असे त्यांनी शिष्यगणास विचारलें. हे आमंत्रण मिळाल्यावर बाकीचे सर्व शिष्य कांकू करूं लागले; परंतु कल्याण एकदम उठला व गळूं चोखूं लागला. आपण चोखीत असलेला विषारी पू नसून, तो अत्यंत मधुर आम्ररस आहे, हे पाहून कल्याणला फार आश्चर्य वाटलें. शिवाय रामदास्वामींनी त्याची आत्मदानपर प्रेम व अचल श्रद्धा असल्याबद्दल यथोचित प्रशंसाहि केली. आपल्या प्रियतमाच्या सुखाकरिता मरणाचाहि स्वीकार करण्यास तयार असणें, यालाच खरें प्रेम म्हणतात. कल्याणसारखी संदेहरहित श्रद्धा, अचल प्रेम व अव्यभिचारी एकनिष्ठता गुरुकृपेनेच प्राप्त होतात.

सद्‌गुरुबद्दल अव्यभिचारी निष्ठा ही शिष्याचें जीवनक्षेत्र कोणत्याहि दृष्टीने संकुचित करीत नाही. **सद्‌गुरुची सेवा म्हणजे सर्व भूतांच्या ठायीं असलेल्या स्वत:च्याच अंतरात्म्याची सेवा असते.** सद्‌गुरुची जाणीव सर्वव्यापक असून, तो सर्वाचें आध्यात्मिक हित इच्छितो. अखिल जीवनाची सेवा असणाऱ्या गुरुकार्यात भाग घेणें म्हणजेच सद्‌गुरुची सेवा करणें होय. गुरुकार्यात भाग घेण्याकरिता शिष्याला जगाशीं संबंधहि ठेवावा लागेल; परंतु या प्रकारें नियत कार्यास अनुसरुन, तो जगांत वावरत असला, तरी त्याचा अनंत

सेवेच्या द्वारा सद्‌गुरुची आंतरिक प्राप्ति होते.

# ३ : खरी शिष्यता

जेव्हा साधक स्वेच्छेने सद्‌गुरुंशी संबद्ध होतो, तेव्हा तो शिष्य बनतो. पण जर हा संबंध केवळ औपचारिक असेल, तर त्याला खरें शिष्यत्व म्हणतां येणार नाही. **तोंडी झालेल्या करारामुळे अगर लेखी करारनाम्यामुळे ज्यांत हक्क आणि जबाबदारी उत्पन्न होते. अशा कायदेशीर संबंधाहून गुरुशिष्यांचे नातें अगदी निराळे असतें.** प्रगत साधकाच्या जीवनाचा शिष्यत्व हा एक प्रमुख प्राथमिक स्वभावगुण आहे. कोणत्याही कृत्रिम उपायांनी तो उत्पन्न होऊ शकत नाही; **तर आध्यात्मिक जीवनाच्या मूल आधारभूत नियमांनुसार तें उत्पन्न होते.** सामाजिक जीवनाच्या साच्यांत प्रवाहप्राप्त सहवासामुळे किंवा तात्पुरत्या करारामुळे उत्पन्न होणाऱ्या व्यावहारिक संबंधापेक्षा तो संबंध कितीतरी अधिक महत्त्वाचा असतो. बरेचसे ऐहिक संबंध साधकाच्या कूटस्थ आध्यात्मिक जीवनांत प्रविष्ट होत नाहीत, कारण ते केवळ वरवरचे व महत्त्वशून्य असतात. उदाहरणार्थ, जोंपर्यंत तुम्ही विकत घेतलेल्या मालाची किंमत घेतां, तोंपर्यंत तो माल तुम्ही कोणत्या दुकानदाराकडून घेतां याला फारसें महत्त्व नाही; त्याचप्रमाणे जोपर्यंत तुम्ही गन्तव्य स्थानास जाऊन पोहोचतां तोंपर्यंत तुम्ही कोणत्या बोटीने प्रवास करतां यालाहि फारसें महत्त्व नाही. परंतु अशा प्रकारचे व्यवहार सुद्धा सांस्कारिक संबंध व कर्मनियम यांनीच निश्चित होत असतात; त्यामुळे याहि संबंधांमध्ये मुळीच आध्यात्मिक रहस्य नसते असें मात्र नाही. परंतु हे संबंध स्वभावत:च वरचेवर व तात्पुरते असल्यामुळे, **त्यांची साधकाच्या जीवनास सारपूर्णता व दिशा देण्यास समर्थ असलेल्या शिष्यत्वरुपी मार्मिक संबंधाशीं कोणत्याहि दृष्टीने तुलना होऊं शकत नाही.**

शिष्यत्व हा एक जिव्हाळ्याचा संबंध आहे.

**गुरुशिष्यांचें नातें हा साधकाच्या जीवनांतील अंतर्गत स्थितिविशेषाचा अपरिहार्य परिणाम आहे.** हे नातें प्रथमत: प्रेमी व त्याचा ईश्वरी प्रियतम यामधील संबंध आहे; व आध्यात्मिक दृष्टीने इतर सर्व संबंधांहून अधिक रहस्यपूर्ण आहे. प्रेम हेंच शिष्यत्वाचें मर्म आहे;

*शिष्यत्वांत अंतर्भूत असलेले प्रेम अनुपम असते.*

परंतु हें प्रेम साधारण सामाजिक संबंधांत व्यक्त होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारांच्या प्रेमाहून सर्वश्रेष्ठ व अतुलनीय असतें. ऐहिक प्रेम ही दोन अजागृत ईश्वरत्वाच्या केंद्रामधील परस्परविषयक क्रीडा आहे; परंतु **शिष्यत्वांतील प्रेम हा अजागृत (unconscious) ईश्वराचा जागृत (conscious) ईश्वराबद्दल जिव्हाळा आहे.** प्रत्येकजण परमात्माच आहे, परंतु कांही लोक ईश्वरत्वाविषयी अचेतन असतात; काहींना ईश्वरत्वाची आंशिक जागृति असते; व कांही फारस थोडेसे लोक पूर्ण जागृत ईश्वरावस्थेंत असतात. जे स्वत:च्या ईश्वरत्वाबद्दल अचेतन असतात. त्यांना परमात्मभावाची यत्किंचित्हि कल्पना नसते; त्यांना फक्त देहभाव असतो. ईश्वरानुभूतीचा वारसदार होण्याकरिता, साधकांना ईश्वरावस्थेत निरंतर निवास करणाऱ्या सद्‌गुरुचें प्रीतिपूजन करावें लागतें व त्याचें पथप्रदर्शन स्वीकारावे लागतें.

साधकाचें सद्‌गुरुवरील प्रेम म्हणजे सद्‌गुरुच्या साधकावर असलेल्या निरतिशय प्रेमास असलेला जबाब आहे; व **हे प्रेम शिष्याच्या अन्य प्रेमांमध्ये सर्वश्रेष्ठ समजलें पाहिजे.**

*सद्‌गुरुच्या हक्काची सर्वश्रेष्ठता*

सद्‌गुरु हा अनन्त परमात्म्याचें प्रातिनिधिक मूर्तिमान् स्वरुपच असल्याची जाणीव शिष्याला असते; व त्यामुळे गुरुप्रेम शिष्याच्या जीवनांतील केंद्रीय शक्ति बनते. सद्‌गुरुच्या व्यक्तिमत्तेस केंद्र बनवून, त्याच्या भोवती शिष्य आपल्या विचारांचे व आकांक्षांचे ताणेंबाणें विणतो. शिष्याला ज्या कांही अनेक कर्तव्यांची जाणीव असते, त्या सर्वात सद्‌गुरुविषयक कर्तव्य निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ बनतें; व **ह्या सर्वश्रेष्ठ हक्काच्या अधिकाराच्या द्वाराच सद्‌गुरु आध्यात्मिक शक्तिरुपी प्रभापुंजांचा केंद्रबिंदु बनून, स्वत:च्या दिव्य रश्मिराशींच्या विमोचनाने अज्ञानांधकार दूर करतो, व साधकाच्या हृदयांतील दोष नाहीसे करुन त्याला सत्यानुभूतीच्या मुक्तजीवनांत प्रविष्ट करतो.**

*सर्व प्रेम गुरुप्रत पोहोचविते.*

खऱ्या शिष्यत्वाची महत्त्वाकांक्षा ठेवणाऱ्या साधकामध्ये तर्कवितर्कशून्य गुरुप्रेम असलें पाहिजे; व मूलत: तेंच शिष्यत्वाच्या उमेदवारीकरिता अत्यावश्यक आहे. **सर्व प्रकारांच्या प्रेमसरिता अखेरीस गुरुप्रेमाच्या महासरितेस मिळून तीत लुप्त होतात.** मज्नूचें लैलावर प्रेम होते. त्यांचे तिजवरील प्रेम इतकें तीव्र होतें की त्यांचे मन सदैव तिच्याबद्दलच्या विचारांनी भरलेलें असे. तिच्याबद्दलच्या विचाराशिवाय त्याला खाणें, पिणें किंवा निजणें कांहीच सुचत नव्हतें. दुसऱ्या एखाद्या पुरुषाशीं लग्न केल्याने तिचें हित साधेल अशी त्याची खात्री झाली असती, तर तो त्यालाहि आनंदाने तयार झाला असता; व स्वत:च्या मरणाने तिच्या नवऱ्यास आनंद होईल असें त्याला वाटलें असतें तर त्याने मरणहि पत्करलें असतें. ह्या त्याच्या स्वार्थरहित व खऱ्या प्रेमामुळे, अखेरीस त्याला सद्‌गुरुची प्राप्ति झाली. आपल्या जीवनांतील प्रत्येक क्षणामध्ये त्याने स्वत:स विसरुन आपल्या प्रियेचाच विचार केला; व ह्यामुळे त्याच्या प्रेमाचे भौतिक व



बौद्धिक पातळीवरुन अध्यात्मनिष्ठ प्रेमांत उन्नयन झाले. त्याच्या प्रेमाची आध्यात्मिकता त्याला ईश्वरी प्रियतमाप्रत घेऊन गेली.

सद्‌गुरु हा ईश्वरी प्रियतम असतो; व एकदा सद्‌गुरुची गाठ पडली म्हणजे त्याच्यावर प्रेम करणें हेच शिष्याचें इतिकर्तव्य असते; कारण शिष्याचें सद्‌गुरुवर सर्वान्त:करणयुक्त प्रेम असेल, तर तो अखेरीस त्याच्याशीं निश्चितपणें ऐक्य पावतोच. आपले प्रेम कोणत्या

*प्रेम व शरणागति यांच्या द्वारा शुद्धि.*

दर्जाचें आहे, ह्याबद्दल त्याने चिंता करुं नये. स्वत:मध्ये आध्यात्मिक दुर्बलता असली तरी त्याने सद्‌गुरुवर प्रेम करीतच राहावे, व हृदय पूर्णपणें पवित्र होईपर्यंत प्रेमांत खंड पडूं देऊं नये. सद्‌गुरु हा परम पावन असतो; **व त्याच्यावर हृदय स्थिर करणें हीच आत्मशुद्धीची सुरुवात आहे.** जेव्हा शिष्य गुरुची एकनिष्ठ भक्ति करतो, तेव्हा तो गुरुप्रदत्त दिव्य प्रेमाचा ग्राहक बनतो; व त्यास प्राप्त होणाऱ्या ह्या दैवी प्रेमरुपी अग्नीमध्ये त्याचें सर्व प्रकारचें मनोदौर्बल्य भस्म होतें. परंतु सर्व दुर्बलता जाऊन अनंत व अविचल पावित्र्य संपादन करावयाचें असेल, **तर शिष्याने आपलें सर्व जीवन, सद्‌गुरुला मनांत कोणताहि किंतु न ठेवतां व निष्कपटपणें समर्पित केलें पाहिजे.** त्याने आपली नानाविध दुर्बलता व सामर्थ्य, आपले सद्‌गुण व दुर्गुणं, पाप व पुण्य गुरुला अर्पण करावेत; व ह्या अर्पणविधीमध्ये 'जर तर' किंवा 'किंतु परंतु' नको. त्याची शरणागति इतकी पूर्ण पाहिजे की त्याच्या मनात गुप्त स्वार्थपर इच्छेच्या छायेलाहि वाव मिळूं नये.

शिष्याची सद्‌गुरुवर अचल श्रद्धा असेल, तरच त्याला पूर्ण शरणागति व तर्कवितर्कशून्य प्रेम साध्य होते. **गुरुवर श्रध्दा नसेल, तर तें खरें शिष्यत्वच नव्हे.** मनुष्य स्वत:स मनुष्य

*श्रद्धेची महत्ति.*

म्हणून जाणतो, तेव्हा श्रद्धेचा प्रश्न नसतो, त्याचप्रमाणे ईश्वरानुभूतीनंतरहि श्रद्धेचा प्रश्नच उद्‌भवत नाही. परंतु अनुभूति होईपर्यंत, गुरुवरील श्रद्धाच, शिष्याचें पथप्रदर्शन करणारा प्रकाश असतो. अशी श्रद्धा जहाजाच्या सुकाणू प्रमाणे असते. ईश्वरानुभूति होईपर्यंत श्रद्धेला प्रत्यक्ष अनुभव अप्राप्य असला, **तरी श्रद्धेला अंध मानणें चूक आहे, कारण घोर अज्ञानापेक्षा तिचें दृष्टीशीं अधिक साम्य आहे.** इंग्रजी भाषेमध्ये सर्व धर्मांना 'Faiths' असें अकारण म्हणत नाहीत. साधकाच्या जीवनास श्रद्धा अत्यावश्यक आहे. श्रद्धा नानाविध रुपांत व्यक्त होते; परंतु मानसिक दृष्टीने ती जशीच्या तशी एकच असून, तिचे स्वतंत्र व उल्लेखनीय प्रकार करिता येत नाहीत. श्रद्धेमधील भेद हे सर्व अंशभेद आहेत. श्रद्धा जिवंत व दृढ असते; किंवा ती त्राणशून्य व दुर्बल असते. त्राणशून्य व दुर्बल श्रद्धा मनुष्यास फार तर विधिनियमांचे पालन करावयास प्रवृत्त करील. परंतु जिवंत व दृढ श्रद्धा साधकाला धर्माच्या बहिरंगापलीकडे नेते; व वरील साल फेकून आंतील अध्यात्मजीवनरुपी बीज मिळविण्याकरिता ती साधकास मदत करते. **जेव्हा सद्‌गुरुवर श्रद्धा बसते, तेव्हा ती स्वत:च्या अंतिम अधिष्ठानाचा आश्रय घेते व परासीमा गाठते.**

ज्या माध्यमा (medium) मधून चेतनारुपी प्रकाश कार्य करितो, त्याने त्याचें सीमाक्षेत्र निश्चित होतें. परंतु ज्याप्रमाणे पर्वतावरुन खाली येणाऱ्या जलप्रवाहांचे पात्र त्या पर्वताच्या आकारप्रकारांनी निश्चित होतें, त्याचप्रमाणे चेतनाप्रकाशाच्या विशिष्ट कार्याची रुपरेषा संचित संस्कारांनी निश्चित होते.

साधारण मनुष्याला फक्त स्थूल जगाचीच जाणीव असते.

साधारण माणसाच्या जीवनाचें व कार्याचें क्षेत्र स्थूल जगानेच मर्यादित होतें, कारण त्याचा चेतनाप्रकाश स्थूल शरीरावर पडून तद्वाराच कार्य करतो. स्थूल शरीराच्या साधनाशीं संबद्ध असल्यामुळे तो स्थूल जगांतील कोणत्याहि वस्तूचा परिचय करुन घेऊ शकतो; परंतु सूक्ष्म किंवा मानसिक वस्तूंना त्याची चेतना स्पर्श करूं शकत नाही. स्थूल जग हेंच साधारण मनुष्याची रंगभूमि असून, त्याचा सर्व आचारविचार त्याच्या कक्षेंतील जडपदार्थांकडेच प्रवृत्त होतो. व या अवधींत त्याचा चेतना प्रकाश सूक्ष्मदेह किंवा मनोदेह या माध्यमातून केंद्रित (focus) होत नसल्यामुळे, तो सूक्ष्म व अतिसूक्ष्म सत्ताक्षेत्रांबद्दल (spheres of existence) अचेतन राहतो.

जडदेहभाव.

या अवस्थेंत आत्म्याला जड जगताची जाणीव असली, तरी त्याला स्वत:च्या स्वरुपाचें पूर्ण अज्ञान असतें. **त्याचा चेतनाप्रकाश जड देहाशींच संबद्ध होतो; जड देहच त्याला शक्य असलेल्या सर्व क्रियांचे अधिष्ठान बनतो; व तो जड देहाशींच तादात्म्य पावतो. तो स्वत:ला स्वत:च्याच द्वारा जाणत नाही, तर तो स्वत:ला जड देहाच्या द्वारा जाणतो.** जें जें ज्ञान त्याला जड देहांतून मिळूं शकतें, ते सर्व ज्ञान जड देहच त्याच्या क्रियांचे केंद्र असल्याचें दर्शवितें; व म्हणून, **वस्तुत: त्याचें केवळ साधनमात्र असलेला तो जड देहच आपण आहों असें त्याला वाटतें.** त्यामुळे आत्मा स्वत:ला पुरुष किंवा स्त्री, तरुण किंवा वृद्ध मानतो व स्वत:वर देहाच्या अवस्था व उपाधि लादतो.

सूक्ष्मदेहभाव.

स्थूल जगाच्या चौकटीत अनेक जन्मचक्रांचा अनुभव घेतल्यावर सुखातिशय व दु:खातिशय इत्यादि द्वंद्वांचे चिरकाल आघात होऊन जड जगाबद्दलचे संस्कार दुर्बल होतात. संस्कार कच्चे पडले, म्हणजे चेतनाप्रकाश जड जगाच्या मोहकतेपासून हळूहळू परावृत्त होतो; व हीच आध्यात्मिक जागृतीची सुरवात समजावी. असें झाले म्हणजे स्थूल संस्कार सूक्ष्म बनतात; व **चेतनाव्यापारांचे अधिष्ठान (base) जड देहांतून उठून सूक्ष्म देहांत स्थिर होतें.** आता चेतनाप्रकाश सूक्ष्म देहावर पडतो, व त्याला माध्यम करुन कार्य करतो; परंतु यापुढे तो जडदेहांतून मुळीच कार्य करीत नाही. म्हणून सर्व जड सृष्टि आत्म्याच्या चेतनेच्या कक्षेंतून बाहेर जाते; व आत्म्याला केवळ सूक्ष्म जगाचीच जाणीव राहते. आता त्याचें जीवन सूक्ष्म सत्ताक्षेत्रांत व्यतीत होतें; सूक्ष्म देहच त्याच्या सर्व क्रियांचे केंद्र बनतो व दिसतो; व **आत्मा स्वत:ला सूक्ष्म देहच मानतो.** परंतु याप्रमाणे



सत्तारुप सद्गुरुशीं आंतरिक संबंध राहतो. म्हणून गुरुकार्यात भाग घेतल्यामुळे शिष्य सद्गुरुच्या अधिक सन्निध जातो, व त्याच्या जाणिवेचाच एक अंगभूत भाग होतो. सद्गुरुची सेवा करणें हा त्याची आंतरिक प्राप्ति करण्याचा (realising) शीघ्रतम मार्ग आहे.

गुरुकार्यात सहभागी होणे.

शिष्याने केलेली गुरुसेवा गुरुच्या जागतिक कार्यांशी संबद्ध असतेच; परंतु त्याबरोबरच, ती सेवा शिष्यास स्वत:च्या आध्यात्मिक ध्येयाच्या अधिक सन्निध नेणारें फलदायि साधन बनतें. शिष्याची सेवातत्परता स्वयंस्फूर्त, हार्दिक, निरपेक्ष व बिनशर्त असेल, तर त्याला त्या सेवेमुळे इतर कोणत्याहि साधनांपेक्षा अधिक आध्यात्मिक फायदा होईल. गुरुची सेवा करतांना देह व मन यांना दिव्यांतून जावें लागलें, तरी शिष्याला त्यात आनंदच वाटतो. त्रास व गैरसोय सहन करुन सेवातत्पर असणें ही शिष्याच्या भक्तीची कसोटी आहे. ही सेवा जितकी कष्टप्रद असेल तितकी ती सच्छिष्यास अधिक स्वीकरणीय वाटते, व तो निष्ठायुक्त गुरुसेवेकरिता शारीरिक व मानसिक दु:खाचा स्वेच्छेनेच अंगीकार करीत असल्यामुळे, तो आध्यात्मिक तृप्तीचा निरतिशय आनंद लुटतो.

मिथ्या अंतर्विरोध

सद्गुरु व त्याच्यांत मूर्तरुप होणारें तत्त्व यांचे यथार्थ ज्ञान झालें म्हणजे सद्गुरुविषयी बिनशर्त एकनिष्ठता शक्य होते. सद्गुरुचें पद व त्याचें कार्य याबद्दलचें शिष्याचें ज्ञान अपुरें असेल तर तो, स्वत:मधील उच्चतर अंतरात्म्यांत व सद्गुरुमध्ये मिथ्या अंतर्विरोध (false antithesis) उत्पन्न करण्याचा संभव असतो; व यामुळे त्याच्या मनातं दुसरीं न्यायोचित वाटणारी कर्तव्यें व सद्गुरुप्रतचीं कर्तव्यें यामध्ये कृत्रिम व काल्पनिक संघर्ष होतो. परंतु प्रथमपासूनच शिष्याने हें जाणून असावें की शिष्याच्याच अंतरात्म्याची अनुभूति शिष्याला व्हावी हा गुरुचा हेतु असतो, व खरें पाहतां, **सद्गुरु हा शिष्यांतील अंतर्गत शिवात्म्याचाच प्रतिनिधि असून, एकमेव सत्यस्वरुप सर्वभूतान्तर्गत आत्मदेवाहून भिन्न नसतो.** तेव्हा, गुरुनिष्ठा ही आत्मदेवावरील निष्ठेचें एक दुसरें रुप आहे. याचा अर्थ असा नव्हे की आत्मदेवावरील औपचारिक निष्ठा गुरुनिष्ठेचें कार्य यथोचित रीतीने करूं शकेल. ईश्वरानुभूति होईपर्यंत शिष्याला स्वत:मधील आत्मदेवाचें यथार्थ दर्शन होऊं शकत नाही; **व बहुधा त्याला जें स्वत:चे कर्तव्य वाटतें, ते त्याच्या आत्मदेवामध्ये व चेतना क्षेत्रामध्ये कपटाने प्रविष्ट होणाऱ्या संस्कारांचे प्रोत्साहन मात्र असतें.** परंतु सद्गुरु हा आत्मदेवाशी एकरुप असल्यामुळे त्याच्या मूल्यनिर्धारणा (valuation) मध्ये चूक होऊं शकत नाही.

संघर्षाचे प्रसंग.

तेव्हा शिष्याने नेहमी स्वत:ची आन्तरिक प्रेरणा गुरुप्रदत्त आज्ञेच्या किंवा कसोटीच्या आधाराने नीट तपासावी; व या दोहोंत संघर्ष झाल्यास त्याने स्वत:च्या विचारांत कुठे चूक आहे की काय यांचे पुनर्निरीक्षण करावें. बहुधा थोड्याशा निरीक्षणाने विचार पुरा केल्यास, **शिष्याला त्याच्या आत्मदेवाच्या**

**प्रेरणेमध्ये व सद्‌गुरुच्या आज्ञेमध्ये मुलभूत समस्वरता (basic harmony) असल्याचें आढळून येईल.** परंतु क्वचित् प्रसंगी तो त्या दोहोंत मेळ घालूं शकला नाही, तर स्वत:स अंतरात्म्याची प्रेरणा तरी बरोबर समजली नाही, किंवा सद्‌गुरुच्या आज्ञेचा खरा अर्थ तरी समजला नाही असें त्याने निश्चित जाणावें. अशा वेळी बहुधा शिष्याने वाटेल तें झाले तरी स्वत:च्या आंतरिक प्रेरणेसच अनुसरावें, अशी सद्‌गुरुचीच इच्छा असते. कधी कधी श्रेष्ठतर जीवनांत शिष्याने प्रविष्ट व्हावें म्हणून सद्‌गुरु त्याला कांही सूचना देतो; बहुधा अशाच प्रसंगी शिष्याला स्वत:ची प्रवृत्ति व गुरुप्रदत्त सूचना यांच्यांत तात्पुरता विरोध भासतो. परंतु बहुधा ज्याकरिता शिष्याची आगाऊ तयारी केलेली नाही, अशा सूचनाच सद्‌गुरु करीत नाही.

शिष्यत्वाचा खरा अर्थ.

सद्‌गुरु पूर्णपणें स्वार्थरहित असून, शिष्याची जाणीव व त्याचा अंतर्गत आत्मदेव या दोहोंमध्ये असलेल्या आवरणांना दूर करण्याकरिता तो सत्त्वशील राहतो. तेव्हा गुरुनिष्ठा व आत्मदेवावरील निष्ठा ह्या दोहोंत खरा विरोधच असूं शकत नाही. वस्तुत: आपलें अनुसंधान पूर्ण केल्यावर शिष्याला असें आढळून येतें की **सद्‌गुरु हा स्वत:मधील आत्मदेवाचेंच दुसरें रुप आहे.** असीम निरपेक्षता व अविच्छिन्न ईश्वरत्व यांनी सद्‌गुरु इतका परिपूर्ण असतो की त्याला स्वत:करिता असें काहीच अभिलषणीय नसतें; व शिष्याच्या बाबतींत त्याने श्रेष्ठतम सत्याच्या प्रकाशांत स्वत:ची पुनर्घटना करावी इतकेंच त्याचें उद्दिष्ट असतें. **शिष्य बनणें म्हणजे आध्यात्मिक ध्येयाचा पथ चालू लागणें.** शिष्यत्वाचा हाच खरा अर्थ होय.

# ४ : आत्मसाक्षात्काराप्रत आगमन

लहान अर्भकाचें शरीर नैसर्गिक रीत्याच हळूहळू वाढत जाऊन प्रौढ होते; त्याचप्रमाणे योग्य वेळ आली म्हणजे मनुष्याची आत्मसाक्षात्काराच्या बाजूची प्रगति स्वभावत:च होते. स्थूल शरीराची वाढ नैसर्गिक नियमांनी होते; व आत्मसाक्षात्काराप्रत

आत्मसाक्षात्काराकडील प्रगति बहुधा क्रमिक व अगोचर असते.

प्रगति, चेतनापरिवर्तन व चेतनामुक्ति यासंबंधीच्या आध्यात्मिक नियमांनुसार होते. अर्भकाचें स्थूल शरीर अगदी क्रमश:च वाढतें; व त्याची संवर्धनाची क्रिया दृष्टीला अगोचर असते; पथप्रविष्ट साधकाच्या बाबतींतहि हेंच खरें आहे. आपले शरीर कसें वाढतें हें मुलाला कळत नाही; साधकाला आपण आपल्या आध्यात्मिक ध्येयाप्रत कसे प्रगत होतो, हें कळून येत नाही. जीवनांतील नानाविध प्रसंगांमध्ये स्वत:च्या वर्तणुकीचें धोरण कसें राहत गेलें, याचीच जाणीव साधकाला असते; परंतु तो आत्मज्ञानाप्रत कोणत्या रीतीने अग्रेसर होत आहे, हे त्याच्या क्वचितच ध्यानांत येतें. परंतु न कळतच सुखदुःख, **हर्षविषाद, यश-अपयश, प्रयत्न व विश्रान्ति, त्याच्या जीवनांतील निर्भ्रान्त दृष्टीचे व संगतियुक्त सुनिश्चया (harmonised will) चे क्षण व त्याचप्रमाणे बावरलेल्या व संघर्षमय वृत्तीचे क्षण या सर्वांच्या द्वारा साधक आंतरिक पथ आक्रमण करुन, आत्मज्ञानाप्रत हळू-हळू प्रगत होत असतो.** हे सर्व त्याने आपल्या विगतजीवनांतून आणलेल्या विविध संस्कारांचे परिणाम आहेत. ज्याप्रमाणे पथिक घनघोर अरण्यांतून आपला मार्ग काढतो, त्याचप्रमाणे साधकहि या संस्कारजालाच्या गुंतागुंतीमधून आत्मज्ञानाप्रत प्रगत होतो.

चेतनेचें सीमाक्षेत्र व तिचे व्यापार.

मानवी चेतनेचे समोरील वस्तूंचे अस्तित्व व स्वरुप दाखविण्याऱ्या उजेडाशी बरेंच साम्य आहे. जहाजांत बसलेला मनुष्य पाण्याच्या पृष्ठभागावर वाटेल तेथे इतस्तत: भटकूं शकतो; पण आकाशांत किंवा जमीनीवरील विविध स्थानी त्याची पोहोच नसते; तसेंच

# ५ : ईश्वरानुभूति

खरा आत्मसाक्षात्कार मिळविणें म्हणजे ईश्वरानुभूति करणें होय. ईश्वरानुभूति ही अनुपमेय अवस्था आहे. इतर सर्व अवस्थांचा अनुभव व्यष्टिमनाच्या द्वारा येतो; परंतु ईश्वरानुभूति ही व्यष्टिमनावर किंवा दुसऱ्या कोणत्याहि साधनावर अवलंबून नसते; म्हणून ईश्वरानुभूति ही इतर अवस्थांहून अगदी निराळी आहे.

आत्मानुभूति म्हणजेच ईश्वरानुभूति होय.

स्वत:च्या अंतरात्म्याहून निराळ्या अशा कोणत्याहि पदार्थाचे मान होण्याकरिता साधनाची आवश्यकता असते; स्वत:चेंच ज्ञान होण्याकरिता साधनाची आवश्यकता नाही. खरें पाहतां, ईश्वरानुभूति प्राप्त करण्याकरिता चेतनेचा मनाशीं संसर्ग सहायक नसून, निश्चयत: बाधकच आहे. व्यष्टिमन हें पार्थक्यबोधाचें व अहंभावाचें आसन आहे. तेंच सीमित व्यक्तित्व निर्माण करतें; आणि हे सीमित व्यक्तित्व द्वैत, काल व परिवर्तनशीलता यांच्या भासाचा परिपोष करतें, व स्वत:हि त्या भासावर पुष्ट होतें. म्हणून आत्मज्ञान होण्याकरिता चेतना व्यष्टिमनाच्या मर्यादितेंतून मुक्त झाली पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे वैयक्तिक मन नाहीसें झालें पाहिजे; पण जाणीव मात्र कायम राहिली पाहिजे.

आत्म्याच्या गतकालीन जीवनेतिहासांत चेतनेचा विकास मनाबरोबरच झाला; व चेतनेचे सर्व व्यापारहि मनाच्या पार्श्वभूमीवरच होत आले. म्हणून चेतना वैयक्तिक मनांत दृढपणें बद्धमूल झाली; व मनाच्या कोंदणांत संलग्न झालेली

चेतनेची मनाशी संलग्नता

ही चेतना त्यांतून अलग करणें दुरापास्त होते. म्हणून मन निष्क्रिय असेल, तर चेतनाहि अंतर्धान पावते. ध्यानामध्ये मन स्थिर करण्याचा प्रयत्न केला, तर मनुष्याची अचेतन होण्याची प्रवृत्ति होते, यावरुनहि मन व चेतना या दोहोंमधील ग्रंथिसंबंध स्पष्टपणें दिसून येतो.

ध्यानावस्थेंतील मनाच्या क्रियेची मंदता निद्रेहून स्वभावत: भिन्न नाही; पण त्या दोहोंच्या उत्पत्तीमध्ये थोडासा फरक आहे. व्यष्टिमन द्वैतमय जगदाभिमुख असतें; व म्हणून त्यात नेहमीच



आत्मा सूक्ष्मचेतन झाला, तरी तो स्वत:चें खरें स्वरुप जाणत नाहीच, कारण तो स्वत:स स्वत:च्याच द्वारा प्रत्यक्षपणे न जाणतां, सूक्ष्मदेहरुपी साधनाच्या द्वारा जाणतो. परंतु त्याच्या कर्मभूमीचे जडांतून सूक्ष्मक्षेत्रांत झालेलें हे परिवर्तन बरेंच रहस्यपूर्ण ठरतें; कारण, **सूक्ष्म क्षेत्रांत जड जगांतील रुढ मानदंड (conventional standard) जाऊन, त्या जागीं सत्यास अधिक जवळ असलेले नवीन मानदंड येतात; आणि नवशक्तींच्या उदयामुळे व आध्यात्मिक स्फूर्तीच्या अधिक अनिर्बंध विमोचनामुळे जीवनाची पद्धत बदलून नवी होते.** सूक्ष्म जगांतील जीवन म्हणजे ध्येयापासून दूरच असून, आध्यात्मिक यात्रेंतील ती एक अस्थायी अवस्था आहे; परंतु लाखो जडचेतन जीवांमध्ये एखादाच सूक्ष्म चेतन होऊ शकतो.

तपस्येने किंवा योगक्रियांनी सूक्ष्म जगाबद्दलचे संस्कार सुद्धा जीर्ण होतात; व

मनोदेहभाव.

त्यामुळे चेतना अधिक अंतर्मुख होऊन, चेतनाप्रकाश मनोदेहावर पडतो व त्याच्या द्वारा कार्य करतो. चेतनेचा जडसूक्ष्म देहाशीं असलेला संबंध तुटल्यामुळे, चेतनेच्या कक्षेंतून सर्व जडसूक्ष्म सृष्टि बाहेर जाते. आता आत्म्याला मनोविशिष्ट (mental) जगताचीच जाणीव राहते; व **या नवीन क्षेत्रांत त्याला गंभीरतर आध्यात्मिक प्रबोध व सत्याचें अधिक स्पष्ट दर्शन शक्य होतें.** मनोक्षेत्राच्या या नवीन चौकटीमध्ये, आत्म्याला अविरत स्फूर्ति, गंभीर ज्ञप्ति (insight) व निश्चयात्मक अंत:प्रज्ञा (intuition) यांचा आस्वाद घेतां येतो व त्याचा आध्यात्मिक सत्याशीं प्रत्यक्ष संस्पर्श होतो. परंतु ईश्वराशीं असा प्रत्यक्ष संबंध आला असला, तरी त्याला स्वत:चें ईश्वरत्व प्रतीत होत नाही; कारण तो स्वत:ला स्वत:च्याच द्वारा प्रत्यक्षपणें जाणत नाही, तर व्यष्टिमनो (individual mind) रुपी साधनाच्या द्वारा जाणतो. तो स्वत:स व्यष्टिमनांतूनच जाणतो, व व्यष्टिमनच आपल्या सर्व क्रियांचे अधिष्ठान असल्याचें पाहतो; व म्हणून **तो स्वत:ला व्यष्टिमनच समजतो.** आता आत्मा जडसूक्ष्म क्षेत्रांतील स्थितीपेक्षा परमात्म्याच्या कितीतरी अधिक निकट असतो; परंतु असें असूनहि तो छायामय व भासमान जगतांतच असतो; व मन:क्षेत्रातील संस्कारांच्या पडद्यामुळे, तो स्वत: परमात्म्याहून भिन्न असल्याचे अनुभवत राहतो. चेतनाप्रकाशाचा व्यापार व्यष्टिमनाने मर्यादित झाला असल्यामुळे, तो आत्म्याचें **वास्तविक व यथार्थ स्वरुप** दाखवूं शकत नाही. परंतु आत्म्याला स्वत:च्या ईश्वरत्वाची अनुभूति झाली नसली, तरी मनोक्षेत्रांतील जीवन सूक्ष्मक्षेत्रांतील जीवनापेक्षा फार अधिक उन्नत असतें; व लाखो सूक्ष्मचेतन जीवांमध्ये एखादाच मनोक्षेत्राशीं संबोधस्पर्श (conscious contact) करुं शकतो.

सद्‌गुरुची आवश्यकता.

साधक केवळ स्वत:च्या प्रयत्नाने दुसऱ्याची मदत न घेता, मनोक्षेत्रापर्यंत चढूं शकतो. पण **मनोदेहाचा त्याग, म्हणजे व्यक्तिजीवनाचें विसर्जन करणें होय; व ही अखेरची पण सर्वांत अधिक महत्त्वाची पायरी ईश्वरप्राप्त पूर्ण सद्‌गुरुच्या साहाय्याशिवाय चढून जाणें अशक्य असते.** लाखो मन:क्षेत्रज्ञ

जीवांतून एखादाच स्वत:चा चेतनाप्रकाश व्यष्टिमनापासून परावृत्त करण्यास समर्थ बनतो; व असें चेतनापरावर्तन झालें म्हणजे आत्म्याच्या मन:क्षेत्रांतील जीवनाशीं संबद्ध असलेले संस्कारशेषहि पूर्णपणें नाहीसे होतात. जेव्हा चेतनाप्रकाश देहत्रयापैकी कोणत्याहि देहांत केंद्रित होत नाही, तेव्हाच तो आत्म्याचें सत्यस्वरुप प्रदर्शित करुं शकतो.

प्रत्यक्ष आत्मज्ञान.

**आता कोणत्याहि साधनाचा अवलंब न करितां, आत्म्याला स्वत:चे प्रत्यक्षज्ञान होतें; व तो स्वत:स सीमित देह न समजतां, स्वत:च अद्वितीय, सत्यस्वरुप व अंतरहित परमात्मा असल्याचें जाणतो.** तीनहि देहांचा संबंध पूर्णपणें तुटला, म्हणजेच आत्मजीवनांतील ही महान घटना शक्य होते, व निरनिराळ्या सत्ताक्षेत्रांची जाणीव तद्विशिष्ट देहाशीं संबद्ध असल्यामुळे, आता आत्मा अखिल सृष्टीविषयी अचेतन होतो. आता चेतनाप्रकाश कोणत्याहि बाह्य किंवा परकीय पदार्थावर केंद्रित न होतां आत्मस्थ होतो; व आत्मचेतन झाल्यामुळे आता आत्म्याला स्वत:चे ज्ञान झालेलें असतें.

मिथ्या आत्मज्ञानाचे भिन्न प्रकार खऱ्या आत्मसाक्षात्काराचे प्रतिनिधि असतात.

जडसूक्ष्म व मन:क्षेत्रांतून आत्मसाक्षात्काराप्रत प्रगति करीत असतांना, उन्नतिक्रमानुसार जड, सूक्ष्म किंवा मन:स्वरुप देहांशीं स्वत:चें तादात्म्य (identification) असल्याचें मिथ्या आत्मज्ञान (false self-knowledge) टाळतां येत नाही. आत्म्याला स्वचेतन करणें हा सृष्टीचा आदिहेतु आहे. आत्म्याला स्वत:चे खरें ज्ञान (साक्षात्कार) आध्यात्मिक प्रगतीच्या अखेरीसच मिळतें; व मध्यंतरीचे मिथ्या आत्मज्ञानाचे भ्रमपूर्ण प्रकार खऱ्या आत्मसाक्षत्काराचे **अस्थायी प्रतिनिधि** (temporary substiutes) असतात. हे आत्मसाक्षात्काराप्रत आगमन करण्याच्या मार्गातील, न टाळतां येणारे व आवश्यक भ्रम (necessary mistakes) आहेत. यात्रेच्या सर्व अवधीमध्ये चित्प्रकाश आत्म्यावर न पडतां, परिस्थितींतील वस्तूवर पडतो; व त्यामुळे आत्म्याची ह्या बाह्य वस्तूमध्येच निमग्न होऊन, स्वत:च्या अस्तित्वाविषयी व स्वस्वरुपाविषयी पूर्णपणें अचेतन राहण्याची प्रवृत्ति होते. **पूर्ण व नितांत आत्मविस्मृतीची भयावह शक्यता टाळण्याकरिता, आत्मा देहभावाच्याच द्वारा स्वत:चें प्रतिष्ठापन (Self-affirmation) करतो. कारण देहच चेतनाप्रकाशाच्या केन्द्रीकरणाचें अधिष्ठान (focal basis) असतो.** याप्रमाणे आत्मा स्वत:ला स्वत:चा देह मानतो; व इतर आत्म्यांना त्यांचे देह मानतो; व या भ्रमांत स्थापित झालेल्या द्वैतपूर्ण जगांत स्त्रीपुरुषभाव, चढाओढ, मत्सर, परस्परांची भीति व स्वार्थपूर्ण महत्त्वाकांक्षा आढळतात. चिन्हाश्रित किंवा खुणेच्या द्वारा ग्रहण केलेलें आत्मज्ञान (self-knowledge by means of a sign) हें गोंधळ, गुंतागुंत व बंधन यांना कारणीभूत होते.

कोहळ्याची गोष्ट.

कवि जामीने एका दोह्यामध्ये उल्लेखिलेली कोहळ्याची गोष्ट अशा प्रकारच्या गोंधळाचें सुंदर उदाहरण आहे. एकदा एक विस्मरणशील मनुष्य होता; व विसरभोळेपणाच्या बाबतीत त्याच्या तोडीचा दुसरा कोणीहि नव्हता. त्याला एक बुद्धिमान् व विश्वासु मित्र होता; व निदान स्वत:चें तरी स्मरण ठेवण्यात त्या विसरभोळ्याला मदत करण्याची त्या मित्राची इच्छा होती. त्या मित्राने विसरभोळ्याच्या गळ्याला एक कोहळा बांधला; व तो त्याला म्हणाला, ''म्हाताऱ्या, नीट ऐक. एखाद्या दिवशीं तूं पूर्णपणें हरवून जाशील व तुला स्वत:ची आठवणहि येणार नाही. तेव्हा खूण म्हणून हा कोहळा मी तुझ्या गळ्याशीं बांधतो; रोज सकाळी उठल्यावर तुला हा कोहळा दिसला म्हणजे तूं तेथे आहेसच असें जाण''. दररोज उठल्यानंतर तो विसरभोळा कोहळा पाही; व **''मी हरवलों नाहीं''** असें स्वगतच म्हणे. कालांतराने त्या विसरभोळ्यास कोहळ्याच्या साहाय्याने स्वत:स ओळखण्याची सवयच लागली. तेव्हा त्या मित्राने एका तिऱ्हाइताला त्या विसरभोळ्याजवळ राहण्यास व रात्रीं त्याच्या गळ्यांतील कोहळा काढून स्वत:च्या गळ्यांत बांधण्यास सांगितले. तिऱ्हाइताने त्याप्रमाणे केलें. मग जेव्हा तो विसरभोळा सकाळीं उठला, तेव्हा त्याला स्वत:च्या गळ्यांत कोहळा दिसेना. म्हणून **''मी हरवलों''** असें तो स्वगत म्हणाला. नंतर त्याला तो कोहळा त्या तिऱ्हाइताच्या गळ्यांत दिसला, तेव्हा तो त्याला म्हणाला, ''तूंच मी आहें; पण मग मी कोण?''



दृष्टान्ताचें स्पष्टीकरण.

देहभावरुपी मिथ्या आत्मज्ञानाचे जे भिन्न प्रकार आहेत, त्यांच्याशीं या कोहळ्याच्या गोष्टीचें फार साम्य आहे. स्वत:स देह समजणें म्हणजे स्वत:स कोहळ्याच्या द्वारा जाणण्यासारखें आहे. आपण स्वत: जड, सूक्ष्म किंवा मनोदेह नाही, हे कळल्यावर उत्पन्न होणारी अस्थिरता ही विसरभोळ्याला गळ्यांत कोहळा दिसला नाही, तेव्हाच्या त्याच्या मनांतील घोटाळ्या प्रमाणे आहे. द्वैतभावाचा लय म्हणजे तो विसरभोळा गळ्यांत कोहळा बांधलेल्या तिऱ्हाइताशीं तादात्म्य पावला, त्याप्रमाणे आहे. पुढे ह्या गोष्टींत तो विसरभोळा बाहेरच्या कोणत्याहि खुणेची मदत न घेतां स्वत:ला ओळखण्याचें शिकला असतां, तर त्याचें स्वत:बद्दलचें ज्ञान देहत्रयाहून स्वत:चें भिन्नत्व व अनंत परमात्म्याशीं स्वत:चे एकत्व अनुभवणाऱ्या आत्म्याच्या खऱ्या आत्मज्ञानासारखें झालें असतें. **अशा प्रकारच्या आत्मसाक्षात्काराप्रत पोचणें हें विश्वाचें ध्येयच आहे.**

सर्वथैव महिमामय बनविते. ईश्वरानुभूतिहीन आत्मा सीमित असण्याचा अनुभव घेतो व क्षणिक सुखदुःखरुप द्वंद्वांच्या आघाताने विकल होतो; परंतु अनुभूतिसंपन्न आत्मा द्वंद्वातीत होऊन, जागृत ईश्वरावस्थेचें अंतरहित ज्ञान व सीमारहित आनंद यांचे आस्वादन करतो.

ईश्वरानुभूतीचा महिमा.

ईश्वरानुभूतीमध्ये आत्मा स्वतःचा पृथग्भाव (separate consciousness) टाकून द्वैतातीत होतो; व तो स्वतः अनंत व सत्स्वरुप असण्याच्या शाश्वत ज्ञानांत स्थिर होतो. **व्यक्तिजीवनाच्या शृंखला भंग पावतात; छायामय जगताचा अंत होतो; भ्रमरुपी पडदा नेहमीकरिता उघडला जातो; सीमाबद्ध चेतनेच्या उद्योगांतील हायहाय व यातनामय नैराश्य जाऊन, तेथे सत्यप्रत्ययाची शांति व आनंद येतात; व कालबद्ध जीवनांतील क्षोभ व उद्वेग अनंतत्वाच्या अथांग व गंभीर शांतीमध्ये समाविष्ट होतात.**



संघर्ष असतो. आणि **जेव्हा तें अविश्रान्त संघर्षाने क्लान्त होतें, तेव्हा स्वतःच्या पृथक् सत्तेचा लोप करुन, अनंतत्वाप्रत परत जाण्याकरिता तें तृषित होतें.** नंतर मन स्वयंनिर्मित सृष्टीपासून परावृत्त होतें व त्याचे सर्व व्यापार मंदावतात; ह्या निद्रारुपी मंदतेच्या स्थितीत चेतना अवश्यमेव लुप्त होते.

निद्रेचे स्पष्टीकरण.

निद्रेत मनाचे व्यापार स्थगित झाल्यामुळे चेतनेचा पूर्ण लोप होतो; परंतु मनाच्या क्रियेचें व चेतनाव्यापारांचे हे थांबणे तात्पुरतेंच असते; कारण **मनांतील संचित संस्कार त्याला पुनः कार्यप्रवण करतात.** कांही वेळाने, संस्काराच्या आंतरिक प्रेरणेने मन चलायमान होतें; व तद्वारा चालणारा चेतनाव्यापार पुन्हा सुरु होतो. निद्रेनंतर जागृति व जागृतीनंतर निद्रा, क्रमाक्रमाने क्रिया व विश्रान्ति यांच्या क्रमनियमानुसार येतात. परंतु जोपर्यंत मनांतील सुप्त संस्कार पूर्णपणें नाहीसे होत नाहीत, तोंपर्यंत व्यष्टिमनाचा लय होत नाही व चेतनाहि विमुक्त होत नाही. झोपेंत मनाला स्वतःच्या सत्तेची विस्मृति होते; पण त्याची पृथक् सत्ता नाहीशी होत नाही. झोपेंतून जागे झाल्यावर मनुष्याचीं पूर्वीची बंधनें पुनः प्रस्थापित होतात. चेतना पुनरपि जीवित झाली तरी तिच्यावर मनाचें ओझें असतेंच.

पुनः जागृत होणे.

सीमीत मनाच्या भूमींत अहंकार दृढपणें बद्धमूल होतो; व अहंकार अनेक भ्रमांमध्ये फसला असल्यामुळे, तो अज्ञानास चिरंजीवि बनविण्याचा प्रयत्न करतो. अहंकार आत्म्यांतील सुप्त अनंत ज्ञान अनावृत्त होण्यामध्ये प्रतिबंध करतो; व तो ईश्वरप्राप्तीमधील भयंकर अडथळा आहे. ''अज्ञानरुपी पडदा फाडणें फार दुष्कर आहे, कारण ज्वालेवर एक मोठा दगड आहे'', या अर्थाची एक फारशी कविता आहे. अग्निशिखेवर मोठा दगड असला, तर ती फार उंचीपर्यंत पोचूं शकत नाही; त्याचप्रमाणे जोंपर्यंत चेतनेवर अहंकार आरुढ आहे, तोंपर्यंत आत्मज्ञानाची लालसा साधकास सत्यानुभूतीप्रत नेऊं शकत नाही. **आत्म्याच्या सर्व यात्रेंत सतत टिकून राहणारा अहंकार आत्मप्राप्तींत यश मिळविणें अशक्य करतो.** म्हातारपणीं, दुखत असलेला दांत हिरडीमध्येच दीर्घकाळ हलत राहून, कित्येक महिनेपर्यंत अतिशय दुःख देत राहतो, कारण तो सहजपणें मूळासकट उपटतां येत नाही. त्याचप्रमाणे प्रेम व तपस्या यांच्यामुळे अहंकार क्षीण झाला, तरी त्याचें उन्मूलन कठीण असल्यामुळे, तो शेवटपर्यंत टिकून राहतो. आत्म्याची पथांत जसजशी प्रगति होते तसतसा तो अधिक कच्चा होत जातो; पण सातव्या भूमिकेच्या अंतिम अवस्थेपर्यंत तो कायम राहतोच.

अहंकाराचा अडथळा.

अहंकार हा सर्व मानवी क्रियांचे केंद्र आहे; व स्वतःचा संहार करण्याचा अहंकाराचा प्रयत्न म्हणजे मनुष्याने स्वतःच्याच खांद्यावर उभे राहण्याचा प्रयत्न करण्यासारखें

अहंकारावर विजय मिळविण्यामधील अडचण.

आहे. डोळा स्वत:ला पाहू शकत नाही; त्याचप्रमाणे अहंकार स्वत:चा अंत करुं शकत नाही. स्वत:चा अंत करण्याकरिता तो जें जें करतो, त्यामुळे त्याचा विस्तारच अधिक वाढतो; **स्वत:विरुद्ध केलेल्या प्रयत्नांवरच तो पुष्ट होतो.** स्वत:च्या आणीबाणीच्या यत्नशीलतेने तो फार तर स्वत:चें रुपांतर करण्यास समर्थ होतो; पण तो स्वत:चा पूर्ण नाश करण्यास असमर्थ असतो. अहंकाराचें आसन असलेलें व्यष्टिमन जोंवर वितळून जात नाही, तोंपर्यंत अहंकाराचा लोप होत नाही.

मनाच्या बंधनांतून चेतना विमुक्त करणें, हीच ईश्वरानुभूतीची मुख्य समस्या आहे. व्यष्टिमनाचा लय झाला म्हणजे मनाच्या सापेक्षतेने भासणारे सर्व विश्व शून्यरुप होतें;

निद्रा व ईश्वरानुभूति यांमधील साम्य.

व चेतना कशाशींहि संबद्ध राहत नाही. आता चेतना सीमारहित व निर्भ्रान्त होऊन, अनंत सद्वस्तूचें स्वरुप प्रकाशित करतें. अनुभूतीच्या आनंदांत मग्न असतांना, विश्वांतील शब्दरुपादि विषयांचे मुळीच भान असत नाही; व ह्या बाबतींत अनुभूति गाढ निद्रेप्रमाणे आहे. परंतु बऱ्याच महत्त्वाच्या बाबतीत ईश्वरानुभूति गाढ निद्रेहून भिन्न आहे. निद्रेंत चेतना तहकूब (in abeyance) असते, व म्हणून विश्वभ्रमाचा निरास होतो. परंतु निद्रेंत अहंकाराचा पूर्ण लय न झाल्यामुळे व पूर्ण चेतना अंतिमसत्याभिमुख न होऊं शकल्यामुळे, ईश्वरानुभूति होत नाही. क्वचित् प्रसंगी, निद्रासातत्याचा भंग करणाऱ्या कांही क्षणिक अवकाशामध्ये आत्म्याची चेतना कोणत्याहि विशिष्ट पदार्थावर न जडतां कायम राहते. चेतना असते, पण ती विश्वाची चेतना नसते; ती **शून्यत्वा** (nothing) ची चेतना असते, अशा प्रकारचे अनुभव आगामी ईश्वरानुभूतीच्या आगाऊ सूचना असतात. ईश्वरानुभूतीमध्ये चेतना विश्वभ्रमापासून पूर्णपणें विनिर्मुक्त होऊन, आतापर्यंत अहंकाराने झाकलें गेलेलें असीम ज्ञान अनावृत्त करतें.

झोपेंत इतर सर्व गोष्टींबरोबर मन स्वत:सहि विसरतें; पण त्याचें अस्तित्व कायम असतें; व विलुप्त (submerged) चेतना व अंतरहित सद्वस्तु यांमध्ये मनांतील सुप्त संस्कारांचा पडदा असतो.

निद्रा व ईश्वरानुभूति यांमधील फरक.

याप्रमाणे, **निद्रेमध्ये चेतना व्यष्टिमनाच्या कोषांत विलुप्त होते; परंतु ती अजून कोष फोडून बाहेर पडण्यास समर्थ झालेली नसते.** म्हणून निद्रेमध्ये ईश्वरापासूनच्या स्वत:च्या पृथक्त्वाचा विसर पडून, आत्मा परमात्म्याशीं वस्तुत: एकत्व पावला असला, तरी त्याला ह्या एकत्वाची जाणीव येत नाही. परंतु, ईश्वरानुभूतीमध्ये मन स्वत:स विसरतें, इतकेंच नव्हे तर सर्व संस्कारांसह पूर्णपणे विलय पावून सत्ताशून्य होतें. व आतापर्यंत व्यष्टिमनाशीं जखडलेली चेतना बंधमुक्त होते, व अंतिम सद्वस्तूशीं प्रत्यक्षपणें संबद्ध होऊन, तिच्याशीं ऐक्य पावते. चेतनेंत व अंतिम सद्वस्तूमध्ये आता कोणताहि पडदा नसल्यामुळे ती केवळ तत्त्वाशीं संयुक्त होऊन,



तिचा त्यांतच अविच्छेद्य रुपाने चिरकालपर्यंत निवास राहतो; व त्यांतून अंतरहित ज्ञानाची व असीम आनंदाची अवस्था उत्पन्न होते.

ईश्वरानुभूति व्यक्ति-गत असते.

अंतरहित ज्ञानाचें व असीम आनंदाचे हे प्रादुर्भवन ईश्वरप्राप्त आत्म्यापुरतेंच असतें. ईश्वरप्राप्त आत्म्यांतील अनंत सद्वस्तूला स्वत:च्या सीमारहित्वाचें ज्ञान झालेलें असतें; परंतु ईश्वरानुभूति नसलेल्या व विश्वभ्रमांत फसलेल्या आत्म्यांतील त्याच सद्वस्तूला असें स्पष्ट ज्ञान प्राप्त होत नाही. याप्रमाणे ईश्वरानुभूति व्यक्तिगत (personal) नसती, तर कोणाहि एका आत्म्याला ईश्वरानुभूति झाल्याबरोबर सर्व सृष्टीचा अंत झाला असता. परंतु असें होत नाही. कारण **ईश्वरानुभूति ही मनाच्या क्षेत्राच्या पलीकडे पोहोंचलेल्या आत्म्याची व्यक्तिगत चेतनावस्था आहे.** दुसरे आत्मे बंधनांतच राहतात; व त्यांनाहि कधीतरी ईश्वरानुभूति खात्रीने मिळणारच असली, तरी ती मिळण्याकरिता, त्यांना चेतनेवरील अहंकाराचें ओझें फेकून व्यष्टिमनाच्या शृंखला तोडाव्या लागतात.

जे अनंतात प्रसुप्त असतें तेंच प्रगट होतें.

ईश्वरानुभूति प्राप्त झाल्यावर आत्म्याला असें आढळून येतें की **जें अंतरहित सत्य स्वत: असल्याचें तो आता जाणतो तेंच तो नेहमी होता;** व उत्क्रान्तीच्या व उन्नतीच्या कालांतील त्याचे स्वत:स सीमित मानणें भ्रममूल होतें. तसेंच ज्या अंतरहित ज्ञानाचा व आनंदाचा तो आता आस्वाद घेतो, तेंहि अनंत सद्वस्तूंत कालाच्या सुरवातीपासून प्रसुत होते व तें अनुभूतीच्या क्षणांत फक्त प्रगट झालें, हेंहि त्याला कळून चुकतें. याप्रमाणे ईश्वरप्राप्त पुरुष अनुभूतीपूर्वी जे होता, त्याहून वस्तुत: निराळा होत नाही. **जे तो पूर्वी होता, तेंच तो आताहि असतो; परंतु त्याला पूर्वी स्वस्वरुपाचें यथार्थ ज्ञान नव्हतें, व आता तें असतें, इतकाच फरक त्याच्यामध्ये अनुभूतीमुळे पडतो.** आता जें तो स्वत:स जाणतो, त्याव्यतिरिक्त दुसरें कांहीहि तो कधीहि नव्हता; व ज्या कांही अवस्थांतून तो आला, त्या सर्व फक्त स्वत:स जाणण्याच्या प्रक्रियेच्या पायऱ्या होत्या, हे त्याच्या ध्यानांत येते.

ईश्वरानुभूति प्राप्त करण्याची सर्व घटना म्हणजे एक खेळ मात्र आहे; व **ह्या खेळांतील सुरवात व अंत या दोहोंत भेद नाही.** तरी ही अनुभूतीची प्राप्ति हा आत्म्याला निश्चयात्मक फायदाच आहे. लाभ दोन प्रकारचे असतात.

दोन प्रकारचे लाभ.

**अप्राप्त वस्तूची प्राप्ति** हा एक लाभ; व **आपण वस्तुत: जे आहों, त्याचेंच यथार्थ ज्ञान व आस्वादन** हा दुसरा लाभ. ईश्वरानुभूतीचा लाभ दुसऱ्या प्रकारचा असला, तरी त्यामुळे ईश्वरप्राप्त मनुष्यांत व ईश्वरानुभूतिहीन मनुष्यांत महदंतर निर्माण होतें. ईश्वरप्राप्त पुरुषाला स्वत:जवळ पूर्वी नसलेलें असें दुसरें कांही नवीन प्राप्त होत नसलें, तरी तो जें होता, आहे व चिरकाल असणार याचे स्पष्ट ज्ञान ईश्वरानुभूतीला

**आंतरिक व स्वयंस्फूर्त त्याग करण्याची संवय करतो.** विवाह अगर ब्रह्मचर्य या दोहोंतहि पूर्ण होण्याचा मार्ग मुमुक्षूस मोकळाच असतो. परंतु, **ब्रह्मचर्यापासुन सुरुवात करावयाची किंवा वैवाहिक जीवनापासून सुरुवात करावयाची, हे मुमुक्षूच्या संस्कारांवर आणि कर्मबंधांवर अवलंबून असतें.** आपल्या पूर्वजन्मीच्या कर्मामुळे प्राप्त झालेल्या परिस्थितीचा तो आनंदाने स्वीकार करतो, एवढेंच नव्हें, तर जें ध्येय त्याला दृग्गोचर झालेलें असतें, त्या ध्येयाच्या प्रकाशांत अधिक आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी, तो त्या परिस्थितीचा उपयोग करुन घेतो.

स्पष्ट निवड करण्याची आवश्यकता.

मुमुक्षूने त्याला मोकळ्या असलेल्या या दोन मार्गापैकी एकाची निवड केली पाहिजे. त्याने एकतर ब्रह्मचर्य तरी स्वीकारलें पाहिजे; किंवा वैवाहिक जीवन तरी स्वीकारलें पाहिजे. परंतु वाटेल ते झालें, तरी या दोहोंमधील एखादा सोपासा मध्य साधण्याचें मात्र त्याने अगदी टाळलेंच पाहिजे. **कामेच्छेच्या उच्छृंखल व व्यभिचारशील तृप्तीमुळे, मनुष्याची अतीशय केविलवाणी व अनुकम्पनीय स्थिति होते; आणि त्यामुळे उद्भ्रांत होऊन, तो भयानक व अदम्य कामवासनेच्या गोत्यांत हटकून फसतोच.** अशी अनिर्बंध आणि अनेकमुखी (diffused and undirected) कामवासना उच्च मूल्यांना अवगुंठित करीत असल्यामुळे, बंधन व मानसिक गुंतागुंत यांना चिरस्थायी करते; आणि विषयेच्छेच्या आंतरिक व स्वयंस्फूर्त त्यागाच्या आध्यात्मिक मार्गात अनुल्लंघनीय अडचणी उत्पन्न करते. वैवाहिक जीवनांतील कामवासना ही विवाहबाह्य कामवासनेपेक्षा अगदी निराळी आहे. वैवाहिक जीवनांतील कामवासनेचे संस्कार बरेच फिके असतात; आणि ते अधिक सुलभतेने नष्ट होऊं शकतात. अनिर्बंध, बेजबाबदार व व्यभिचारशील स्त्रीपुरुषसंबंधापेक्षा, जबाबदारीची जाणीव, प्रेम आणि आध्यात्मिक ध्येय यांनी संपन्न असलेल्या स्त्रीपुरुष–सहवासा (sex-companionship) मध्ये कामवासनेच्या ध्येयोन्मुख उन्नयनाची (sublimation) किंवा उदात्तीकरणाची अधिक शक्यता असते.

व्यभिचारांतील धोका.

अनिर्बंध व्यभिचारशीलते (promiscuity) मध्ये, केवळ वासनापूर्तीसाठीच सहवास शोधण्याची प्रवृत्ति अदम्य होते. परंतु कामवासनेची हळूहळू प्रेमांत परिणति करुनच श्रेष्ठतर मूल्ये (higher values) सुसाध्य होतात; व त्या श्रेष्ठतर मूल्यांचे ज्ञान केवळ कामवासनेचें क्षेत्र अत्यंत परिमित केल्यानेच होऊं शकतें. उलटपक्षी, हे क्षेत्र वाढवूनच कामवासनेच्या यथार्थ स्वरुपाचें ज्ञान करुन घेऊं असें मन म्हणेल, तर त्याच्या भ्रान्तिशीलतेला अंत राहणार नाही, व कामवासनेच्या क्षेत्राच्या वाढीलाहि अंत नाही. विवाहबाह्य कामुकतेच्या जीवनामध्ये, मन प्रथम कामवासनेच्याच सूचनांना ग्रहणशील होतें; व **या आधीच विकृत व दूषित झालेल्या दृष्टीने मन सीमित झाल्यामुळे, त्याच्याकरिता गूढतर व अधिक रहस्यपूर्ण अनुभवांचें द्वार बंद झाल्याशिवाय**



# ६ : कामवासनेची समस्या

मनुष्याचें पाऊल जोंवर द्वंद्वांच्या प्रांताबाहेर पडत नाही, तोवर मानवी मनापुढे प्रामुख्याने येणाऱ्या ज्या अत्यंत महत्वपूर्ण समस्या आहेत त्यांत कामवासनेची समस्या एक आहे. मानवी स्वभावाच्या घडणीमध्येच ही उत्पन्न झालेली असते; आणि म्हणूनच

कामवासनेचा जन्म.

तत्संबंधी विचार करावा लागतो. जीवनांतील इतर साऱ्या गोष्टींप्रमाणेच मर्यादित मनाच्या परस्परविरोधी द्वंद्वांच्या द्वाराच कामवासनेचाहि विचार केला जात असतो. ज्याप्रमाणे मन सुख आणि दु:ख, बरे आणि वाईट, एकांत आणि सहवास, आकर्षण आणि तिटकारा या द्वंद्वांच्या बैठकींत जीवन बसविण्याचा प्रयत्न करतें, त्याचप्रमाणे कामवासनेच्या बाबतींतहि उपभोग आणि दमन या द्वंद्वाच्या द्वारा विचार करण्याची मनाची प्रवृत्ति असते; आणि यावाचून दुसरा मार्ग नाही असें भासतें. मनुष्याने जणू काय या दोहोंतून एकाचा स्वीकार केलाच पाहिजे असें भासलें तरीहि कोणत्या तरी एकाच द्वंद्वपक्षाचा स्वीकार करुन, मनुष्याचें पूर्ण समाधान होऊं शकत नाही. जर त्याने दमनाचा अंगीकार केला, तर विषयसुखाभावामुळे स्वत:च्या कमनशीबाबद्दल तो दु:खी राहतो; आणि जेव्हा तो उपभोगाचा अंगीकार करतो, तेव्हा स्वत:च्या इंद्रियाधीनतेची त्याला जाणीव होऊन, तो यंत्रसम व विवेकनिरपेक्ष (mechanical) दमना (repression) चा प्रयत्न करूं लागून इंद्रियवशतेपासून स्वातंत्र्य मिळवूं पाहतो. दोहोंमुळेहि मन असंतुष्टच राहतें; आणि अशा तऱ्हेने जीवनांतला एक अत्यंत महत्त्वाचा आणि गुंतागुंतीचा प्रश्न उत्पन्न होतो.

कामवासनेचा हा प्रश्न सोडविण्याकरिता, तृष्णेमुळे मूढ झालेल्या कल्पनेपासूनच

उपभोग व विवेकहीन दमन हे दोन्हीही द्वंद्वपक्ष सारखेच निराशाजनक आहेत.

उपभोग आणि दमन या द्वंद्वाची उत्पत्ति आहे, हें मनाला प्रथम समजलें पाहिजे. भोगामध्ये व दमनामध्ये दोहोंत तृष्णा ही गुप्तपणें असतेच. दोहोंतहि तृष्णेमुळे अगर

इंद्रियसंवेदनेच्या इच्छेमुळे येणारी जाणिवेची भ्रष्टता अनस्यूत असतेच. यामुळे भोग अगर दमन यांपैकी कोणत्याहि अवस्थेत मन अस्वस्थच असतें. ज्याप्रमाणे ढग आले म्हणजे सूर्यप्रकाशाचा अभाव नि वातावरणांत उदासता असते – मग पाऊस पडो अगर न पडो–त्याचप्रमाणे विषयेच्छा पुरी होवो अगर न होवो–त्या इच्छेचा प्रादुर्भाव मनांत झाला, म्हणजे जीवनाचा ऱ्हास नि खऱ्या सुखाचा अभाव होतो. तृष्णाक्रांत मन इच्छेच्या पूर्तीतच सुख आहे अशी भ्रामक कल्पना करुन घेतें; आणि इच्छापूर्तीनंतरहि असमाधानच कायम राहिलें म्हणजे आत्मा त्या इच्छेचें (represssion) दमन करुन स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करतो. अशा रीतीने, **सुख आणि स्वातंत्र्य यांच्या शोधांत मन उपभोग आणि दमन यांच्या द्वंद्वांत सापडतें; पण शेवटी उपभोग व दमन या दोहोंमध्ये त्याची निराशाच होते.** या द्वंद्वांपलीकडे मन जाऊं न शकल्यामुळे, त्याचें आंदोलन केवळ या द्वंद्वांतील उपभोगापासून दमनाकडे किंवा दमनाकडून उपभोगाकडे म्हणजे एका निराशेकडून दुसऱ्या निराशेकडेच होते.

द्वंद्वांचे मिथ्या आश्वासन.

विषयेच्छा याप्रमाणे कल्पनेचें कार्य बिघडवून मनापुढे उपभोग आणि दमन हे द्वंद्व उभें करतें; आणि तें दोन्हीहि प्रथम सुख मिळवून देण्याचें आश्वासन देत असले तरी अखेरीस सारखेच फसवे ठरतात. भोग आणि दमन यांमुळे वारंवार निराशा होऊनहि, दुःखाचें मूळ कारण जी विषयेच्छा तिचा त्याग मन करीत नाही. कारण तृप्तीनंतरहि निराशेचा अनुभव आला, म्हणजे दमनाच्या सुखप्रदानाच्या मिथ्या आश्वासनास तें बळी पडतें; आणि दमनामुळे निराशा झाली, म्हणजे भोगामुळे सुख होईल, या भ्रान्तीस ते बळी पडतें.

जागृति झाल्यावरच विषय–तृष्णेचा आंतरिक व सहज–स्फूर्त त्याग संभवतो.

हें म्हणजे एखाद्या पिंजऱ्यांत फिरण्याप्रमाणे होतें. सद्‌गुरुकडून जागृति मिळण्याचे भाग्य ज्यांना लाभलेलें नाही, अशांना विषयेच्छेच्या आंतरिक व स्वयंस्फूर्त त्यागाचा अध्यात्मपथ बंदच असतो. परंतु शाश्वत जीवनांतील चिरंतन सुख आणि स्वातंत्र्य यांच्याकडे यथाकाल पण निश्चितपणें नेणाऱ्या ज्ञानमार्गास लागणें हीच खरी जागृतीची सुरवात होय. **विवेकहीन व यंत्रसम दमनाकडे मन निराशेमुळे वळतें; परंतु, केवळ खरा भ्रमनिरास अगर खरी जागृति यांच्याच द्वारा तृष्णेचा आंतरिक आणि स्वयंस्फूर्त त्याग करण्याकडे मन वळूं शकतें.**

भोग व दमन ही द्वंद्वें तृष्णेवर अवलंबून आहेत.

विषयेच्छेचें स्वरुप यथार्थपणें कळलें नाही म्हणजे मन विवेकहीन दमन किंवा विषयोपभोग यांच्याकडे वळतें. मुमुक्षूला विषयेच्छेपासून होणाऱ्या बंधनाची आणि दुःखाची पूर्ण जाणीव होते, तेव्हाच समजूतदारपणाने त्याचें मन विषयतृष्णेच्या भारापासून स्वतःस मुक्त करण्याचा प्रयत्न करते. विषयेच्छा असेल तेव्हाच भोग अगर दमनाचा प्रश्न



उद्भवतो. **विषयेच्छाच पूर्णपणें नाहीशी झाली, तर तिच्या बरोबरच भोग व दमन या दोहोंचीहि जरुरी नाहीशी होते.** मन वासनारहित झालें, म्हणजे भोग किंवा विवेकहीन दमन यांच्या फसव्या सुखप्रलोभनांना मन भुलून जात नाही.

उपभोगापेक्षा दमन मुक्तांच्या अधिक जवळ आहे.

तरी देखील, **मुक्तजीवन हें भोगलोलुप जीवनापेक्षा संयमनिष्ठ जीवनास अधिक जवळचें आहे,** हें लक्षात ठेवले पाहिजे. मात्र गुणधर्मांच्या बाबतींत तें या दोन्ही प्रकारच्या जीवनांहून निराळें आहे. म्हणूनच आत्मनिरोधाची (self-repression) तीव्र जाणीव टाळून संयम साधत असेल, तर मुमुक्षूस वैवाहिक जीवनापेक्षा पूर्ण ब्रह्मचर्य हेंच श्रेयस्कर आहे. परंतु बहुतेक लोकांना अशा प्रकारचा संयम साधणें कठीण व कधी कधी अशक्यहि असतें; आणि त्यांच्यासाठी वैवाहिक जीवन हें ब्रह्मचर्यापेक्षा निःसंशय अधिक उपकारक असतें. ब्रह्मचर्याची विशेष क्षमता (aptitude) नसेल, तर साधारण लोकांना वैवाहिक आयुष्य हेंच खात्रीने श्रेयस्कर आहे.

ब्रह्मचर्य व विवाह ह्यांची संभाव्यता.

ज्याप्रमाणे ब्रह्मचर्यमय जीवनांत अनेक सद्‌गुणांची आवश्यकता असते व त्यांचा विकासहि होतो, त्याचप्रमाणे वैवाहिक जीवनांतहि अनेक सद्‌गुणांची आवश्यकता असते व त्यांचा परिपोषहि होतो. **ब्रह्मचर्यामुळे साध्य होणारी अनासक्ति, संयमशीलता व स्वतंत्रता यांच्यांत ब्रह्मचर्याची खरी महत्ती आहे.** परंतु विषयेच्छेपासून मन पूर्णपणें मुक्त झाल्याखेरीज, खरें आत्मस्वातंत्र्य मिळत नाही. त्याचप्रमाणे, **परस्परविषयक ऐक्यभाव व परस्परांशी स्वयंव्यवस्थापन (mutual adjustment) यांचे जे धडे वैवाहिक जीवनांत मिळतात, त्यांतच वैवाहिक जीवनाची महती साठवलेली आहे.** परंतु खरें ऐक्य किंवा द्वैतभावाचा लोक केवळ दैवी प्रीतीनेच होतो; आणि मनांत जोंपर्यंत विषयेच्छेची किंवा तृष्णेची यत्किंचित् छायादेखील आहे, तोंपर्यंत या दैवी प्रीतीचा उदय होत नाही. विषयतृष्णेचा आंतरिक व स्वयंस्फूर्त त्याग करण्याच्या पथाचा अवलंब करुनच खरी स्वतंत्रता आणि ऐक्य यांचा लाभ होऊं शकतो.

ब्रह्मचर्य व विवाह या दोन्हीहि स्थितीत पूर्णतेचा पथ मोकळा असतो.

विवाहित आणि ब्रह्मचारी या दोघांनाहि जीवनाचा आंतरिक मार्ग एकच असतो. मुमुक्षु एकदा सत्याकडे आकर्षित झाला म्हणजे त्याला कशाचीहि इच्छा राहत नाही, आणि सत्य जों जों त्याच्या अधिकाधिक टप्प्यांत येत जातें, तों तों विषयेच्छेच्या भारापासून तो स्वतःची अधिकाधिक मुक्तता करुन घेत जातो. ब्रह्मचर्याचा किंवा वैवाहिक जीवनाचा कशाचाहि त्याने अवलंब केलेला असला, तरी भोग अगर विवेकहीन दमन यांच्या कल्पनापासून मिळणाऱ्या सुखाच्या भ्रामक आश्वासनांना तो फसत नाही. आणि या भोग आणि दमनाच्या भ्रामक द्वंद्वापासून मुक्त होईपर्यंत, **तो विषयेच्छेचा**

वैवाहिक जीवन हे ईश्वरी योजनेस अनुकूल असावयास पाहिजे.

उथळ विचारांवर अधिष्ठित असेल, तर त्याचें अध:पतन सर्व जगाविरुध्द रचलेल्या केवळ स्वार्थपर कटाच्या स्वरुपांत होईल. परंतु जर वैवाहिक जीवन उच्च ध्येयवादाने उत्स्फूर्त झालें असेल, तर त्यांचे उन्नयन परस्परांसाठी अधिकाधिक त्यागशील बनणाऱ्या दृढ मैत्रीने होईल; एवढेंच नव्हें तर तें **अखिल मानवतारुपी कुटुंबाची प्रेमपूर्वक सेवा करण्याचे एक माध्यम होईल.** अशा रीतीने जेव्हा वैवाहिक जीवन मनुष्याच्या उन्नतीसाठी ईश्वरी योजनेला अनुकूल होतें, तेव्हा तें त्यांत निर्माण होणाऱ्या संततीला शुभ व केवळ कल्याणप्रदच ठरतें; कारण अशा जीवनांत मुलाबाळांना, त्यांच्या पृथ्वीवरील जीवनाच्या सुरवातीपासूनच आध्यात्मिक वातावरण आत्मसात् करण्याचा लाभ मिळतो.

संततीमुळे वैवाहिक जीवनांत पावित्र्य व संपन्नता येते.

मातापित्यांच्या वैवाहिक जीवनापासून अपत्यांना फायदा होत असला, तरी मुलांच्यामुळे ते वैवाहिक जीवन स्वत:हि अधिक संपन्न होतें, यांत शंका नाही. त्याग सुलभ आणि आनंददायक करणारें, व खरें आणि स्वयंस्फूर्त असें प्रेम व्यक्त करुन तें वाढविण्याची संधि आईबापांना मुलांमुळे मिळते. मातापित्यांच्या आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीने, त्यांच्या जीवनांत मुलांचे स्थान अतिशय महत्त्वाचें आहे. यासाठी मुलांचा जन्म होईल तेव्हा त्यांनी त्यांचे आनंदाने स्वागत केलें पाहिजे.

संततिनियमनाची चळवळ आपलें ध्येय दोषपूर्ण साधनांनी साधण्याचा प्रयत्न करते.

मुलांच्या वैवाहिक जीवनावर जो एक हक्क पोंचतो, त्या दृष्टीने अलीकडच्या संततिनियमनाच्या चळवळीचें नीट परीक्षण झालें पाहिजे. या प्रश्नाकडे कोणत्याहि विशेष व मर्यादित दृष्टीने न पाहतां, व्यक्ति आणि समाज यांच्या अंतिम कल्याणाच्या दृष्टीनेच पाहिलें पाहिजें. इतर सर्व गोष्टींप्रमाणे याहि प्रश्नासंबंधीचें मत आध्यात्मिक विचारधारेवर अधिष्ठित असलें पाहिजे. संततिनियमनाच्या चळवळीकडे पाहण्याची पुष्कळ लोकांची दृष्टि वारंवार बदलणारी आणि अनिश्चित असते, याचें कारण त्या चळवळींत चांगले आणि वाईट यांचे चमत्कारिक मिश्रण आहे. **लोकसंख्येचें नियमन करणे हे संततिनियमनाच्या चळवळीचें ध्येय योग्य असलें, तरी तें साधण्याकरिता, त्या चळवळींत पुरस्कृत केलेली साधनें भयावह व शोचनीय आहेत.** वैयक्तिक आणि सामाजिक कारणासाठी संततिनियमन इष्ट असतें, यांत संशय नाही. अनियमित संततीमुळे जीवनकलह तीव्रतर होतो; आणि त्यामुळे समाजांत कठोर चढाओढ सुरु होते. असंयत प्रजननामुळे, व्यवस्थितपणें पार न पाडतां येणारी जबाबदारी मातापित्यांवर पडते; व शिवाय लोकसंख्या अपरिमित झाल्यामुळे, ती पर्यायाने गुन्हे, युद्ध आणि दारिद्र्य यांसहि कारणीभूत होते. परंतु विवेकाच्या व सहृदयतेच्या दृष्टीने संततिनियमनाचे सर्व गंभीर प्रयत्न जरी न्याय्य ठरले, तरी संततिनियमनाकरिता भौतिक साधनें वापरणें मूलत:च



**राहत नाही.**

दाम्पत्यजीवनाचे विवेकयुक्त संचालन करुन अनंततेची प्राप्ति होऊ शकते.

जीवनाच्या पृष्ठभागावरच उडत उडत विचरण करुन, किंवा इतर व्यक्तींशी वरकरणी व अर्थशून्य संबंध वाढवून सत्य (truth) समजत नाही. तर सत्यप्राप्तीसाठी, मर्यादित करणाऱ्या विकारांपासून मनास स्वतंत्र करण्याची आणि निवडक अनुभवांवर मनाच्या शक्ति केंद्रित करण्याची तयारी असावी लागते. मनुष्याला **जीवनामध्ये खरी आणि प्रामाणिक रुचि असेल, व त्याचें लक्ष्य त्यांत पूर्णपणें केंद्रित झालें असेल, तरच त्याला सारासारविवेक साधतो;** आणि श्रेष्ठ व सारपूर्ण मूल्यांसाठी नि:सार व कनिष्ठ गोष्टींचा त्याग करणें त्याला शक्य होतें. परंतु मन एकाच प्रकारच्या अनुभवासाठी निरनिराळ्या विषयांच्या मागे भटकत राहण्याच्या आणि जीवनसमुद्रावरुन ओझरतेंच व वरवर धावत राहण्याच्या सवयींचे गुलाम झालें, तर जीवनाचा पुरा व खरा रसास्वाद घेणें अशक्य होतें. वैवाहिक जीवनांतील साथीदाराच्या सहवासांत अनुभवाचें क्षेत्र इतकें विशाल असतें, की त्या जीवनांत मनाला केवळ कामवासनेच्या सूचनाच प्रथम होत नाहीत; **तर अनुभवांना मर्यादित व विकृत करणाऱ्या गोष्टी ओळखण्याची व त्या नाहीशा करण्याची मनाला पूर्ण संधि मिळते.** याप्रकारें, कामवासनेचा हळूहळू क्षय करुन, आणि त्याग व प्रीति यांच्या अधिकाधिक व अर्थपूर्ण अनुभवांची वृद्धि करुनच मनुष्य प्रगत होत होत शेवटीं अनंतात पोचतो.

# ७ : वैवाहिक जीवनाचें पवित्रीकरण

बहुतेक लोक विवाह करायचा म्हणूनच करतात. परंतु विवाह जीवनांत साह्यकर होईल, की एक अडचण होईल, हे वैवाहिक जीवन ज्या तऱ्हेने घालविलें जाईल, त्या तऱ्हेवर अवलंबून राहील. कांही अत्यंत महत्त्वाच्या आध्यात्मिक गोष्टी वैवाहिक जीवनांत शक्य होतात, परंतु त्यांसाठी योग्य दृष्टिकोण मात्र हवा. आध्यात्मिक सत्याच्या दृष्टीने वैवाहिक जीवन पूर्णपणें निश्चित झालें, तरच तें यशस्वी होईल. 'करार' अगर 'बनियेगिरी' यातील भागिदारीच्या दृष्टीने, अगर केवळ विषयवासनेच्या दृष्टीने, वैवाहिक जीवनाकडे पाहिल्यास त्यापासून फारशी फलनिष्पत्ति होणार नाही. **वैवाहिक जीवन ही सर्वांत उत्तम प्रकारच्या जीवनाचा शोध करण्याकरिता स्वीकारलेली साहसपूर्ण व वस्तुत: अध्यात्मिकतेने संपन्न असलेली अशी महान योजना असावयास पाहिजे.** दोघेहि विवाहित जीवनसाथी आत्मजीवनांतील प्रसुप्त संभाव्यतांचा आविष्कार करण्यासाठी कृतसंकल्प होतात, तेव्हा त्यांनी आपला वैयक्तिक फायदा काय होईल आणि त्याचें स्वरुप काय राहील, याबद्दलच्या आकडेमोडीने अंगीकृत प्रयोगाला सुरवातीसच मर्यादित करणें इष्ट नसते.

वैवाहिक जीवन ही आध्यात्मिक व साहसपूर्ण योजना असावी.

वैवाहिक जीवनांत दोघांनाहि समजूतदारपणा ठेवून परस्परांशी जुळणी करुन घ्यावी लागते; पण कधीकधी त्यांच्या मूळ अपेक्षेबाहेरचे प्रश्न त्यांच्यासमोर येतात. आणि हे सर्वसाधारण जीवनासंबंधी जरी खरें असलें, तरी विशेषत: वैवाहिक जीवनासंबंधी हे अधिक खरें आहे. **विवाहित स्त्रीपुरुषांना एखाद्या स्वतंत्र इच्छेमुळे उत्पन्न झालेल्या प्रश्नापेक्षा कितीतरी अधिक बिकट असलेला असा संपूर्ण व्यक्तिमत्वा (personality) चा अत्यंत गुंतागुंतीचा प्रश्न सोडवावा लागतो.** कारण वैवाहिक जीवनांत, दोन जीव अनेक रीतींनी संबद्ध झालेले असतात. अनिर्बंध वैषयिक

वैवाहिक जीवन हे व्यभिचार-शीलतेहून अगदी भिन्न आहे.



संबंधाहून वैवाहिक जीवन अगदीच निराळे करणारा विशेष म्हणजे हाच होय. व्यक्तिमत्वाची वाढ होण्यासाठी जरुर असलेल्या इतर गोष्टींपासून कामवासनेच्या समस्येला विलग करणें व केवळ कामवासनेच्याच प्रश्नाची स्वतंत्रपणे सोडवणूक करण्याचा प्रयत्न करणें हे व्यभिचारशील व अनिर्बंध कामसंबंधा (promiscuous sex parternership) चे वैशिष्ट्ये आहे. अशी ही सोडवणूक जरी प्रथम सोपी वाटली, तरी ती केवळ वरवरची असते; व शिवाय ह्या सोडवणुकीमुळे, त्या प्रश्नाची खरी सोडवणूक करण्याच्या बाबतीत साधकाची दिशाभूल मात्र होते.

वैवाहिक जीवनांतील विविध हेतूंचा परस्परांवरील ताण (tension) उदात्तीकरणास (sublimation) कारण होतो.

मर्यादित व्यक्तिमत्वाच्या निरनिराळ्या अंगांचीं सापेक्ष मूल्यें जेव्हा परस्परांशी संबद्ध होतात, आणि निरनिराळ्या दृष्टिकोणांतून आणि विविध कोंदणांमधून दृष्टीस पडतात, तेव्हाच त्यांचे खरे महत्त्व समजून येतें. जर ती मूल्यें निरनिराळीं, मधूनमधून व अलगअलग पाहिलीं, तर त्यांत सारासारविवेक करणें कठीण जाते. वैवाहिक जीवनांत नानाविध अनुभवांना पुष्कळ जागा असते; आणि यामुळे मनांतील विविध प्रवृत्ति वैवाहिक जीवनाच्या मूर्तरुप योजनेभोवती संघटित होऊं लागतात. **या विविध हेतूंच्या संघटनेमुळे (organisation) उच्च आणि नीच मूल्यांबद्दल सारासार विवेक करण्यास मदत होते, एवढेच नव्हे तर त्यामुळे यशस्वी व विवेकसंपन्न उदात्तीकरणास आवश्यक असलेला मूल्यांचा परस्परांवर ताणहि उत्पन्न होतो.**

एका दृष्टीने वैवाहिक जीवन हें मानवी समस्यांना तीव्रतम करतें. व यामुळेच **वैवाहिक जीवन हें अज्ञानतिमिर व ज्ञानप्रकाश, यांचे म्हणजे आध्यात्मिक बंधन व आत्मस्वातंत्र्य देणाऱ्या शक्तींचें समरांगण बनतें.** सामान्य मनुष्यांचे वैवाहिक जीवन हें मिश्र हेतु व विचार यांनी ठरविलें जात असल्याने, त्यांत मनुष्यांतील आत्मदेव (higher self) व जीवात्मा (lowar self) यांच्यामध्ये अतिशय आग्रहपूर्ण विरोध असतोच; आणि हा विरोध 'मी' च्या हिणकस भागाचा क्षय करुन टाकण्यास व खऱ्या व दिव्य आत्मदेवाचा आविष्कार होण्यास आवश्यक असतो. वैवाहिक जीवनात, दोन आत्म्यांचे परस्परांस संबद्ध करणारे इतके धागेदोरे उत्पन्न होतात, की ते तोडून टाकावयाचे म्हटल्यास, साऱ्या जीवनांत अस्वस्थता आणि विस्कळीतपणा आल्याखेरीज राहत नाही; आणि एकमेकांपासून अलग होण्यापासून येणारी आपत्ती टाळण्याकरिता, आंतरिक जीवनांत पुन: तडजोडीचें व्यवस्थापन सत्वर करण्याची आवश्यकता उत्पन्न होते. त्यामुळे वैवाहिक जीवन हें वास्तविक पाहतां, अत्यंत गुंतागुंतीच्या कठीण आणि नाजूक परिस्थितीतहि टिकेल अशी परस्परविषयक जुळणी करण्याची एक प्रच्छन्न संधीच बनते.

वैवाहिक संबंधामध्ये आंतरिक जीवनांत शीघ्र परिवर्तन घडून येते.

नित्य व रोज घडणाऱ्या गोष्टी ठरविण्यांत ज्या प्रमुख घटकांचे प्राधान्य असतें, त्यांच्या स्वरुपावर वैवाहिक जीवनाचें आध्यात्मिक महत्त्व अवलंबून असतें. जर वैवाहिक जीवन

# ८ : साधनेचे गंभीरतर स्तर

बाह्य विधि व समारंभ टाकून साधनेच्या गंभीर-तर स्तरांमध्ये प्रवेश.

स्वत:च्या धर्मींत निर्दिष्ट केलेले बाह्य विधि व समारंभ यांचे पालन करणें, हीच बहुतेक लोकांची आध्यात्मिक साधना असते. आत्मशुद्धि व मनोनिग्रह यांच्या प्राप्तीकरिता, अशा प्रकारच्या विधिप्रधान बाह्य क्रिया प्रारंभीच्या अवस्थेंत पोषक असल्यामुळे, एका दृष्टीने महत्त्वाच्या असतात; परंतु अखेरीस साधकाला विधिनियमरुप बहिरंगाचें अनुसरण सोडून, साधनेच्या गंभीरतर स्तरांमध्ये प्रवेश करावा लागतो. असें झालें म्हणजे धर्माचे बाह्यांग गौण होऊन, साधकाला सर्व विश्वधर्मात निर्देशिलेल्या रहस्यपूर्ण तत्त्वांमध्ये गोडी वाटूं लागते. **खरी साधना म्हणजे आध्यात्मिक बोधावर आधारलेलें जीवन होय.** व ती आध्यात्मिक तत्त्वांमध्ये रुचि घेणाऱ्यांनाच प्राप्त होते.

साधनेचे प्रकारभेद.

कडक नियमानुसार चालणें हे साधनेचें रहस्य कधीहि होऊं शकत नाही. जीवनांत अपवादरहित सारखेपणा किंवा कडक नियमबद्धता असूं शकत नाही व असण्याची आवश्यकताहि नाही. **आध्यात्मिक क्षेत्रांत साधनेच्या प्रकारभेदांना मुबलक वाव आहे.** सर्वांचें आध्यात्मिक ध्येय एकच असलें, तरी कोणत्याहि एखाद्या विशिष्ट साधकाला कोणती साधना उपयुक्त ठरेल, ते त्याच्या स्वभावावर व संस्कारांवर अवलंबून असते; म्हणून प्रत्येक साधकाची साधना स्वतंत्र असूं शकते. परंतु सर्वांचे ध्येय एकच असल्यामुळे, साधनेच्या प्रकारभेदांना मौलिक महत्त्व देतां येत नाही; व असे कांही बाह्य भेद असले, तरी साधनेच्या गंभीरतर स्तरांचे महत्त्व सर्वांकरताच असतें.

आध्यात्मिक क्षेत्रांतील साधना ही भौतिक क्षेत्रांतील साधनाहून मूलत: भिन्नच राहणार; कारण आध्यात्मिक क्षेत्रांतील ध्येय हें भौतिक क्षेत्रांतील ध्येयाहून तत्त्वत:च भिन्न असते. भौतिक क्षेत्रांतील साध्य हें कालप्रवाहांत उत्पन्न होणारे असुन, त्याला आरंभ



असमर्थनीय व अत्यंत गर्हणीय आहे.

भौतिक साधनांचा अवलंब केल्यास मन:संयमास साधारणत: प्रेरक होणारा हेतून बाजूस सारल्या जातो.

संततिनियमनवाद्यांनी पुरस्कृत केलेलीं संततिनियमनाचीं भौतिक साधनें आध्यात्मिक दृष्टीने पूर्णपणें निषेधार्ह आहेत. या भौतिक साधनें आध्यात्मिक दृष्टीने पूर्णपणें निषेधार्ह आहेत. या भौतिक साधनांचा पुरस्कार मानवतेचें हित साधण्याच्या बुद्धीनेच केला जात असला तरी बहुतेक लोक, जवळजवळ नेहमीच, त्यांचा उपयोग केवळ स्वार्थांकरिता आणि मुलांच्या जननाची व संवर्धनाची जबाबदारी टाळण्याकरिता करतात. आणि कामवासनेला बळी पडण्याचा नैसर्गिक परिणाम इतक्या यशस्वी रीतीने सहज टाळतां आल्यामुळे, ज्यांच्यामध्ये उच्च मूल्यांची जागृतीच उत्पन्न झालेली नाही, अशा लोकांना आत्मसंयमन करण्यास कांही प्रेरणाच राहत नाही. अशा रीतीने ते वासनापूर्तीच्या अतिरेकास बळी पडून, पाशवी विकारांचे गुलाम झाल्यामुळे, मन:संयमाकडे दुर्लक्ष करुन आपली आध्यात्मिक, शारीरिक आणि नैतिक हानि करुन घेतात.

विकारक्षोमांतून शांतीप्रत जाण्याकरिता मन:संयम अवश्य आहे.

भौतिक नियमनसाधनांचा उपयोग करणें सोपें असल्यामुळे, या प्रश्नाची आध्यात्मिक बाजू तर दृष्टीआड होतेच, परंतु त्यांच्यामुळे मनुष्यास स्वत:च्या आध्यात्मिक गौरवाची व स्वातंत्र्यक्षमतेची जाणीव होणेंहि दुरापास्त होते. अविचारी आणि अनियमित उपभोगाची प्रतिक्रिया आध्यात्मिक बंधनाच्याच स्वरुपांत हटकून होते. म्हणून विशेषत: साधकांनी आणि सामान्य लोकांनीहि –कारण तेहि संभाव्य मुमुक्षूच असतात–**संततिनियमनासाठी भौतिक साधनांवर अवलंबून राहणें अनुचित आहे व त्याकरिता त्यांनी केवळ मन:संयमाचाच अवलंब केला पाहिजे.** ज्या हेतूंमुळे संततीनियमनाची चळवळ उत्पन्न होते, ते हेतु मन:संयमाच्या द्वारा सफल होतात; व संयमाचा अवलंब केल्यास, भौतिक साधनांमुळे होणाऱ्या आध्यात्मिक अनर्थापासूनहि मनुष्य बचावला जातो. मन:संयमाच्या द्वारा संततीचें नियमन शक्य होतें, एवढेंच नव्हे, तर मनुष्याच्या दैवी आत्मगौरवाची जागृति आणि आध्यात्मिक श्रेयाची प्राप्ति होण्याकरिताहि, मन:संयम अत्यंत आवश्यक आहे. **विवेकपूर्वक केलेल्या मन:संयमामुळे विकारजन्य क्षोभापासून शांतीप्रत, बंधनापासून मुक्ततेप्रत आणि पशुतेपासून पावित्र्याप्रत जाणें शक्य होतें.** विचारी लोकांनी या प्रश्नाच्या ह्या उपेक्षित बाजूचे योग्य महत्त्व जाणलें पाहिजे.

मातृपितृत्वाची संयुक्त जबाबदारी.

स्त्रियांना मुलांच्या जननाचा आणि जोपासनेचा त्रास व जबाबदारी सोसावी लागते; म्हणून मन:संयम न साधल्यास त्यांच्यावर पुरुषांपेक्षा अधिक अनिष्ट परिणाम होतो, असें प्रथम दर्शनी वाटतें. परंतु खरोखर पाहतां, स्त्रियांच्या बाबतीत हा अन्यायच

ठरतो असें नाही. स्त्रियांना जननाची व जोपासनेची जबाबदारी व त्रास सोसावा लागतो, हे खरें असलें, तरी त्यांच्या मोबदल्यामध्ये, त्यांना मुलांच्या लालनपालनाचा आनंदहि मिळतो. पितृत्वाच्या आनंदापेक्षा मातृत्वाचा आनंद अधिक असतो. याशिवाय पित्यावर मुलांच्या शिक्षणाची व आर्थिक जबाबदारीहित असतेच. वैवाहिक जीवनाचें यथोचित व्यवस्थापन केल्यास, त्यांतील मातृपितृत्वाच्या जबाबदारीची विभागणी अन्याय्य होण्याची शक्यता नाही. ती जबाबदारी स्त्री व पुरुष या दोघांनीहि वाटून घेतली पाहिजे. मातापित्यांना परस्परासंबंधीच्या जबाबदारीची जाणीव खरोखरच असेल, तर **ते दोघेहि अविचाराऐवजी स्वत:मध्ये पूर्ण मन:संयम साधण्याचा सहयोगशील प्रयत्न करतील** आणि एखाद्या वेळी हा प्रयत्न फसला, तर आपली क्रमप्राप्त मातृपितृत्वाची जबाबदारी ते आनंदाने आणि स्वेच्छेने पार पाडतील.

वैवाहिक जीवनांत संततीचें स्वागतच केलें पाहिजे.

जर एखाद्याला संततीची जबाबदारी नको असेल, तर त्याला एकच मार्ग मोकळा आहे. त्याने ब्रह्मचारी राहून पूर्ण मन:संयम पाळला पाहिजे. असा मन:संयम अतिशय कठीण असला, तरी अशक्य नाही. केवळ आध्यात्मिक दृष्टीने ब्रह्मचर्य हें उत्तम आहे. परंतु तें कठीण असल्याने फारच थोड्यांना साधतें. ज्यांना तें साधत नाही, त्यांच्यासाठी अनिर्बंध विषयवासनेस बळी पडण्यापेक्षा वैवाहिक जीवन हेंच श्रेयस्कर ठरतें. वैवाहिक जीवनामध्ये पाशवी विकारास ताब्यांत ठेवण्याचे शिकतां येतें. परंतु हे अर्थात् हळूहळूच होणार. **मन:संयम न साधल्यास, त्यांनी निसर्गाच्या व्यापारांत यांत्रिक व भौतिक साधनांच्या द्वारा ढवळाढवळ करुं नये.** निसर्गप्राप्त परिणामांचे आनंदाने स्वागत करुन, मुलांची जबाबदारी स्वीकारण्यास त्यांनी तयार असलें पाहिजे.

भौतिक साधनांचा अवलंब केल्यामुळे मानसिक शक्तीचा ऱ्हास होतो.

आध्यात्मिक दृष्टीने पाहतां, केवळ मन:संयमाच्या द्वाराच संततिनियमन केलें पाहिजे. **कोणत्याहि कारणास्तव, व कोणत्याहि परिस्थितींत (मन:संयमाचें ध्येय दृष्टीआड न करितां, तात्पुरतें साधन म्हणून देखील), संततिनियमनाकरिता भौतिक साधनें वापरणें अनिष्टच आहे. ती वापरल्यास, मन:संयम साधण्याची मनुष्याची खरी इच्छा असूनहिं तो साध्य करणें त्याला अशक्य होते.** उलट त्या भौतिक साधनांची त्याला सवय लागते, आणि त्यांचे तो समर्थनहि करुं लागतो. अधिक स्पष्टपणाने सांगावयाचें म्हणजे, पूर्ण मन:संयम साधेपर्यंतच व केवळ तात्पुरता उपाय म्हणूनच आपण ही भौतिक साधनें वापरीत आहोंत, असें मनुष्य स्वत:शी समजत असला, तरी तो तीं साधनें वापरण्याच्या सवयीचा गुलाम बनतो. आणि ह्या साधनांचा उपयोग करतांना, आपण मन:संयम वाढविण्याचा प्रयत्न करीत आहों, या भ्रमांत जरी तो कांही काल राहिला, तरी वास्तविक पाहतां, त्याच्या मन:संयमाच्या शक्तीचा हळूहळू



ऱ्हास होत जातो. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, **भौतिक साधनांचा अवलंब केल्यामुळे, मानसिक संयमाची शक्ति हटकून क्षीण होतेच.** अशा रीतीने, भौतिक साधनांचा उपयोग संयमाच्या वृद्धीस हानिकारक असुन, आध्यात्मिक प्रगतीस अपकारक आहे. म्हणून कोणत्याहि उत्तम हेतूने देखील भौतिक साधनांचा उपयोग करणें कधीहि इष्ट नसतें.

वैवाहिक जीवनांतून आध्यात्मिक प्रगति.

विवाहाच्या प्रारंभीच्या कालांत विवाहित जीवनांतील सोबती वैषयिक आकर्षणाने व त्याचप्रमाणे प्रेमाने परस्परांकडे ओढले जातात. परंतु जाणीवपूर्वक आणि सहेतुक अशा सहयोगाने, ते आपली कामेच्छा कमी करुन, प्रीतीची वाढ करुं शकतात. या उदात्तीकरणाच्या द्वारा, शेवटीं कामवासनेच्या जागीं गाढ प्रीति उत्पन्न होते. **सुखदु:खांत सहभागी होऊन, विवाहित दांपत्य एका आध्यात्मिक विजयानंतर दुसऱ्या आध्यात्मिक विजयाप्रत, आणि गाढ प्रीतीपासून गाढतर प्रीतीप्रत जातात; आणि अशा रीतीने प्रारंभीच्या मत्सरी व ममत्वबुद्धिप्रधान (possessive) प्रेमाऐवजी त्यांच्या हृदयांत त्यागशील व विशाल प्रीति उद्भवते.** खरोखर पाहतां, वैवाहिक जीवनाचा बुद्धियुक्त उपयोग करुन घेणारास, आध्यात्मिक मार्गावर इतकी प्रगति करुन घेतां येते की, शाश्वत जीवनाच्या तीर्थभूमींत प्रविष्ट होण्याकरिता, साधकाला केवळ सद्गुरुच्या स्पर्शाचीच आवश्यकता राहते.

ज्ञानसाधना सफल व्हावयाची असेल, तर त्याची पूर्ति, प्रत्येक पावलाला क्रियाशीलतेला प्राधान्य देऊन केली पाहिजे. दैनिक जीवन विवेकाने निर्दिष्ट असून, त्याच्या स्फूर्तीच्या मूळाशी श्रेष्ठ अंत:प्रज्ञा पाहिजे. **स्वत:चे वर्तन, निर्भयपणे व न कचरतां, अंत:करणातील सर्वोत्तम प्रज्ञेस अनुसरुन ठेवणे, हाच कर्मयोग.** साधने मध्ये केवळ सिद्धान्तांना महत्त्व नसून, **आचाराला** महत्त्व आहे. बौद्धिक ज्ञानापेक्षा सदाचार अधिक श्रेष्ठ आहे. सम्यक् ज्ञानावर आधारलेला आचार केव्हाहि जास्तच फलप्रद राहणार; परंतु **आचारांत घडलेली चूक देखील कधीकधी बोधप्रद ठरते.** केवळ बौद्धिक सिद्धान्त निभ्रान्त असले, तरी निष्फल असतात. जगातील सर्व तत्त्वज्ञान जाणणाऱ्या, पण त्या तत्त्वांचा आपल्या दैनिक जीवनावर मुळीच परिणाम न होऊ देणाऱ्या पंडितापेक्षा, एखादा अडाणी पण ईश्वराचे नाव अंत:करणपूर्वक घेणारा मनुष्य, ईश्वराच्या अधिक जवळ असतो.

(२) कर्ममार्गाचा महिमा.

साधनाक्षेत्रांत, बौद्धिक सिद्धान्तापेक्षा आचाराचे जे अधिक महत्त्व आहे, ते एका सुप्रसिद्ध गाढवाच्या गोष्टीवरुन स्पष्ट होईल. एक गाढव बराच वेळपर्यंत रस्ता चालून थकलें; व खूप भूक लागली असता, त्याला रस्त्याच्या उजव्या व डाव्या बाजूला कांही अंतरावर गवताच्या दोन गंजी दिसल्या. त्या गाढवाला असें वाटलें की त्या दोन गंजीपैकी कोणती गंजी निश्चितपणे अधिक ग्राह्य आहे, याचा निर्णय झाल्याशिवाय, त्या दोन गंजीपैकी एकीकडे जाणे, शहाणपणाचे होणार नाही, कारण पूर्ण विचार न करता व एक गंजी टाकून दुसरीची निवड करण्यास समर्थनक्षम कारण नसतांना, केलेली क्रिया विवेकजन्य न होता इच्छाप्रेरित ठरेल. तेव्हा त्याने प्रथम त्याच्या रस्त्यापासून त्या दोन्हीहि गंजी क्रमश: किती अंतरावर आहेत, याचा विचार केला. त्याच्या दुर्दैवाने विचारान्ती, त्याला असे आढळून आले, की त्या दोन्हीहि गंजी रस्त्यापासून सारख्याच अंतरावर आहेत. मग 'योग्य' निवड करण्याकरिता दुसरे एखादे कारण शोधीत असतांना, त्या गंजींच्या आकारांची तुलना करण्याचे त्याने ठरविलें. पण क्रियमाण होण्यापूर्वी सैद्धान्तिक खात्री करुन घेण्याचा हा त्याचा दुसरा प्रयत्नहि अगदी सारखाच आहे, असा त्याचा निर्णय झाला. नंतर गाढवास सुलभ असलेल्या तितिक्षेने व चिकाटीने, त्याने गवताची श्रेष्ठकनिष्ठता इत्यादि सर्व गुणविशेषांचाहि तुलनात्मक विचार केला, परंतु त्याच्या विचाराच्या क्षेत्रात येऊ शकणाऱ्या सर्व बाबतीत त्या दोनहि गंजी सारख्याच वांच्छनीय असल्याचे त्याला दिसले.

गाढवाची गोष्ट.

अखेरीस असे झाले की त्या गाढवाला त्याची निवड सैद्धांतिक दृष्टीने निर्दोष करण्याकरिता, एकहि निर्णयात्मक कारण सापडू शकले नाही. त्यामुळे गवताच्या त्या दोन गंजीपैकी एकाहि गंजीकडे न जाता, तो पूर्वीप्रमाणेच क्षुधित व क्लान्त राहून, सरळ तसाच पुढे गेला. त्या दोन गंजीमुळे त्याचा यत्किंचितहि फायदा झाला नाही. जर त्या गाढवाने सैद्धान्तिक निश्चया (theoretical certainty) ची पर्वा न करितां, एका गंजीची निवड केली असती, तर कदाचित् त्याने ग्रहण केलेली गंजी कनिष्टहि निघाली असती;



व शेवट असतो; परंतु आध्यात्मिक क्षेत्रांतील साध्य परिपूर्णता असून, ती कालप्रवाहाच्या बंधनांच्या पलीकडे असते. म्हणून भविष्यकालाच्या गर्भात असलेली वस्तु संपादन करणें, हे भौतिक साधनाचें लक्ष्य असतें; म्हणून प्रत्येक साधकाची साधना स्वतंत्र असूं शकते. परंतु सर्वांचें ध्येय एकच असल्यामुळे, साधनेच्या प्रकारभेदांना मौलिक महत्त्व देतां येत नाही. व असे कांही बाह्य भेद असले, तरी साधनेच्या गंभीरतर स्तरांचे महत्त्व सर्वाकरताच असतें.

आध्यात्मिक क्षेत्रांतील साधना ही भौतिक क्षेत्रांतील साधनाहून मूलत: भिन्नच राहणार; कारण आध्यात्मिक क्षेत्रांतील ध्येय हें भौतिक क्षेत्रांतील ध्येयाहून तत्त्वत:च भिन्न असतें. भौतिक क्षेत्रांतील साध्य हें कालप्रवाहांत उत्पन्न होणारें असुन, त्याला आरंभ व शेवट असतो; परंतु आध्यात्मिक क्षेत्रांतील साध्य परिपूर्णता असून, ती कालप्रवाहाच्या बंधनांच्या पलीकडे असते. म्हणून भविष्यकालाच्या गर्भात असलेली वस्तु संपादन करणें, हे भौतिक साधनाचें लक्ष्य असतें; व **जी सद्वस्तु नेहमीच होती, आताहि विद्यमान आहे व चिरकालपर्यंत राहणारच, तिची अनुभूति करणें, हें आध्यात्मिक साधनेंचे लक्ष्य आहे.**

आध्यात्मिक क्षेत्रांतील साधना भौतिक क्षेत्रांतील साधना-हून भिन्न आहे.

जीवनाच्या आध्यात्मिक ध्येयाचा शोध जीवनांतच केला पाहिजे, जीवनाबाहेर नाही; म्हणून आध्यात्मिक साधना अशी पाहिजे की तिने साधारण मानवी जीवन आत्मनिष्ठ बनविलें पाहिजे. एक दिवस चमकणाऱ्या, पण अखेरीस निष्प्रभ होऊन, नेहमीकरिता अंतर्धान पावणाऱ्या एखाद्या सीमित साध्याची प्राप्ति करणें, हे कांही आध्यात्मिक साधनेचे लक्ष्य नव्हे; तर त्या साधनेचें ध्येय म्हणजे साधारण मानवी जीवनाच्या स्वरुपांत आमूल परिवर्तन करुन, **अनंततेतील निरंतरच्या सद्य:क्षणां (eternal now) तच सत्यास अभिव्यक्त करणारें जीवन प्रस्थापित करणें,** हे होय. परमात्मस्थितीचे जाणीवपूर्वक आस्वादन करण्याचा जो दैवी हेतु आहे, त्या हेतूशीं व्यक्तीचें जीवन समस्वर (intime) करिता आले, म्हणजेच साधना सफल झाली. ध्येयाच्या ह्या स्वरुपाकरिता साधना सर्वथा अनुकूल बनली पाहिजे.

आध्यात्मिक साधनेच्या ध्येयाचें साधारण स्वरुप.

**जीवनाच्या सर्व स्तरांमध्ये ईश्वरत्व साधण्याचें लक्ष्य** गाठण्याच्या कामी आध्यात्मिक साधनेच्या प्रत्येक भागाचे व्यवस्थापन झाले पाहिजे; म्हणून एका दृष्टीने आध्यात्मिक साधनेच्या विविध स्तरांचे स्वत:चेच आध्यात्मिक पूर्ण स्थितीशी निरनिराळ्या अंशांत, साधर्म्य असावें लागतें, साधना ज्या मानाने आध्यात्मिक आदर्श व्यक्त करील, त्या मानाने ती पूर्ण असते; म्हणजे ज्या मानाने तिचे पूर्ण जीवनाशी सादृश्य असेल, त्या मानाने ती पूर्ण असते. याप्रमाणे ज्या मानाने साधना व तिचा आदर्श यांच्यात

साधना साध्यांत मिळून जाते.

अधिक अंतर असते, त्या मानाने साधना अपूर्ण असते; व हे अंतर जितके कमी असेल, तितकी ती पूर्ण असते. जेव्हा **साधना पूर्ण होते, तेव्हा तीन परिपूर्ण आत्मजीवनरुपी साध्यांत विलीन होते; आणि साधना व साध्य यांच्यातील भेद अभेदपर सत्ताविस्तारांतील अविकल संपूर्णतेमध्ये लुप्त होतो.**

**साधना ही साध्याची आंशिक सिद्धि आहे.**

साधनेचा साध्याशी असलेला हा संबंध भौतिक क्षेत्रांतील साधन व साध्य यामधील संबंधाहून अगदी निराळा आहे. भौतिक क्षेत्रामध्ये, साध्य हे साधनाच्या अगदी बाहेर पडते, व साधन व साध्य यांच्या स्वरुपात स्पष्ट फरक असतो. उदाहरणार्थ, बंदुकीचा चाप ओढणें हे मनुष्यास ठार मारण्याचे साधन होते; परंतु मनुष्यास ठार मारणे हे चाप ओढण्याहून स्वरुपत:च भिन्न आहे. परंतु आध्यात्मिक क्षेत्रांत साधना व साध्य हे एकमेकांशी पूर्णपणे बहिर्भूत नसतात; व त्यांच्या स्वरुपांत स्पष्ट भेद नसतो. आध्यात्मिक क्षेत्रांत साधना व साध्य ह्यामध्ये अनुल्लंघनीय अंतर ठेवतां येत नाही; व **त्यामुळे आध्यात्मिक क्षेत्रामध्ये साधनेचा अभ्यास म्हणजे साध्याची अंशत: सिद्धीच असते.** हा विरोधाभास येथे उत्पन्न होतो. या प्रकारें, कित्येक आध्यात्मिक साधनांना, जणूं काय त्या स्वत: साध्य आहेत, इतके महत्त्व कां दिले जाते, हेंहि स्पष्ट होते.

**ज्ञान, कर्म व प्रेम यांच्या द्वारा साधना**

आध्यात्मिक साधनेच्या गंभीरतर स्तरांच्या दृष्टीने, तिचे तीन भाग पडतात (१) ज्ञानमार्ग (२) कर्ममार्ग व (३) प्रेम किंवा भक्तिमार्ग, ज्ञानमार्गात तीन गोष्टींचा समावेश होतो – (क) यथार्थ बोधामुळे उत्पन्न होणारा अनासक्तीचा अभ्यास, (ख) निरनिराळे ध्यानप्रकार, व (ग) विवेक व अंत:प्रज्ञा यांचा सतत उपयोग. ज्ञान मिळविण्याच्या या तीनहि प्रकारांचे स्पष्टीकरण आवश्यक आहे.

**(१-क) अनासक्ति.**

जीवात्मा नामरुपात्मक जगांत फसतो; व स्वत: परमात्म्याचा अंश असल्याचें जाणत नाही. हे अज्ञान आत्म्याचें बंधन असून, हे बंधन तोडणें, हेंच आध्यात्मिक साधनेचें उद्दिष्ट असावयास पाहिजे. जगातील वस्तूंचा बाह्य त्याग बहुधा मुक्तिकारक साधना प्रकारात मोडला जातो. परंतु असल्या प्रकारचा बाह्य त्याग महत्त्वाचा असला तरी अगदी आवश्यक नाही. जगातील वस्तूविषयीची अंतस्थ तृष्णा टाकून देण्याची खरी आवश्यकता असते. तृष्णात्याग साधल्यास, आत्म्याने जगातील वस्तूंचा बाह्य त्याग केला किंवा न केला, तरी त्यास खास महत्त्व राहत नाही. भ्रमरुप नामरुपात्मक जगापासून तो आतून सुटला असतो व त्याची मुक्तीची पूर्वतयारी झाली असते. अनासक्ति हा ज्ञानसाधनेचा एक महत्त्वाचा भाग आहे.

**(१-ख) ध्यान.**

आध्यात्मिक ज्ञान प्राप्त करण्याकरिता ध्यान हा एक दुसरा उपाय आहे. ध्यानाला फक्त गुहेमधील मुनिजनांचीच साधना मानणें



बरोबर नाही. प्रत्येक मनुष्य कोणत्या ना कोणत्या प्रकारचें ध्यान करतच असतो; पण साधकाच्या ध्यानाचें वैशिष्ट्य हे आहे, की त्यात **आध्यात्मिक दृष्टीने रहस्यपूर्ण असलेल्या वस्तूंबद्दल सुसंगत व व्यवस्थित चिंतन असतें.** ध्यानरुपी साधना व्यक्तिपर (personal) किंवा व्यक्तिनिरपेक्ष (impersonal) असू शकते.

ध्यानाचा विषय जेव्हा आध्यात्मिक पूर्णावस्था प्राप्त झालेली व्यक्ति असते, तेव्हां तें व्यक्तिपर किंवा रुपाश्रित ध्यान होय. पूर्वीचे किंवा हल्लींचे अवतार किंवा सद्गुरु यांच्यापैकी कोणताहि विषय साधकाने सगुण ध्यानाकरिता निवडावा. सगुण ध्यानाच्या द्वारा, साधक हा सिद्ध पुरुषांचे आध्यात्मिक ज्ञान व दैवी संपत्ति यांचे ग्रहण करतो; व अशा ध्यानांत प्रेम व शरणागति अंतर्भूत असल्यामुळे, साधक अंतिम अनुभूति देण्यास समर्थ असलेल्या गुरुच्या अनुग्रहास आमंत्रित करतो. मूर्तिनिष्ठ ध्यानरुपी साधनेने साधकाला गुरुचें साधर्म्य तर लाभतेंच, पण सत्यस्वरुपांत सद्गुरुशीं ऐक्य पावण्याचा त्याचा मार्गहि खुला होतो.

परमात्म्याच्या निराकार व अपरिमित स्वरुपाचे चिंतन हे व्यक्तिनिरपेक्ष (impersonal) ध्यान होय. ह्या अव्यक्त चिंतनाने मनुष्य ईश्वराच्या रुपातीत स्थितीप्रत प्रगत होतो. परंतु साकार ध्यान व सदाचारसंपन्नता यांच्या व्दारा साधकाची योग्य तयारी झालेली नसल्यास, मूर्तिनिरपेक्ष अव्यक्त ध्यान हें नीरस व निष्फल होते. अनंततेच्या अंतिम अनुभूतीमध्ये, व्यक्तित्वाची सीमाबद्धताहि नसते, व शुभाशुभ द्वंद्वगत भेदहि नसतो; पण ती अनुभूति प्राप्त होण्यास, रुपांतून अरुपांत व दैवी संपत्तीमधून पापपुण्यातील ईश्वरावस्थेंत प्रविष्ट व्हावें लागतें. त्याचप्रमाणे सत्यानुभूति प्राप्त होण्याची दुसरीहि एक अट आहे; व ती म्हणजे साधकाला स्वत:चे मन पूर्णपणे निश्चल ठेवतां आले पाहिजे. परंतु मनातील सर्व संस्कार नाहीसे झाल्यावरच हे शक्य होते; व संस्काराचे अखेरचे परिमार्जन गुरुकृपेशिवाय अशक्य असल्याने, अव्यक्तचिंतन देखील गुरुच्या साहाय्याशिवाय यशस्वी होऊ शकत नाही.

**(१-ग) विवेक व अंत:प्रज्ञा.**

विवेकाचा निरंतर अभ्यास करुन, साधक जोवर श्रेष्ठ अंत:प्रज्ञा अनावृत करीत नाही, तोवर त्याची ज्ञानसाधना अपुरीच राहते. जो साधक स्वत:चा विवेक जागृत ठेवून, सत्य व शाश्वत मूल्यांविषयीच्या अंत:प्रज्ञेचा उपयोग करतो, त्याला ईश्वरानुभूति होते. **प्रत्येकामध्ये अपरिमित ज्ञान प्रसुप्त स्थितीत आहेच. परंतु ते आविष्कृत केले पाहिजे; व जो कांही बोध स्वत:ला झाला असेल, तो आचरणांत उतरविणे, हाच ज्ञानसंवर्धनाचा राजमार्ग आहे.** साधकाची जन्मजात मूल्यनिर्धारणशक्ति व तत्त्वदर्शी सिद्धांनी मानवतेस वेळोवेळी केलेला उपदेश, यांच्या व्दारा साधकाने पुढचे पाऊल कोणत्या दिशेत टाकावें, यावर यथेष्ट प्रकाश मिळतो. परंतु हे ज्ञान अमलांत आणणेच फार कठीण असते. स्वत:स प्राप्त असलेल्या ज्ञानाचा उपयोग करणे, हाच अध्यात्मज्ञान वाढविण्याचा सर्वश्रेष्ठ उपाय आहे.

तरी' भौतिक जगातील नानारंगांच्या वस्तुच आहेसे भासते. पण ह्या जगातील अनुभवाचा जरुर तितका परिपाक झाला, म्हणजे या वस्तूंबद्दलचा भ्रम पुन:पुन: नाहीसा होऊन, साधक ते हरवलेले श्रेयरुप 'कांही तरी' शोधण्याच्या खऱ्या मार्गावर येतो. त्या वेळेपासून, **साधक परिवर्तनशील नामरुपांहून अधिक गंभीरतर सत्याचा शोध करतो;** व ह्यालाच पथप्रवेश (initiation to the path) किंवा दीक्षा म्हणता येईल. पथप्रवेशानंतर, साधकाची स्वत:च्या उगमाशी पुन: युक्त होण्याची लालसा तीव्र व स्पष्ट होते. बोगद्यांतील पुढच्या टोकांतून आगगाडीमधील प्रवाशाला प्रकाशकिरण दिसला, तर पूर्ण प्रकाशाची त्याची तृष्णा अधिक तीव्र होते. त्याचप्रमाणे ध्येयाचें संदिग्ध दर्शन झाल्यावर, साधक ते ध्येय शक्य तितक्या शीघ्र गतीने गाठण्याची आकांक्षा बाळगतो.

अज्ञानरुपी पडद्याचे अनेक पदर.

मोक्षपथावर सहा स्टेशने असून, सातवे स्टेशन हे त्या पथांतील शेवटचे उद्दिष्ट गन्तव्य स्थान किंवा ध्येय आहे. मधले प्रत्येक स्टेशन आपल्या परीने त्या ध्येयाची अगाऊची कल्पनारचित पूर्वसूचना (imaginative anticipation) असेत. मिथ्या कल्पनारुपी पडद्यानेच मानव व ईश्वर यामध्ये अंतर पाडले असून, या पडद्याला अनेक पदर आहेत. पथप्रवेशापूर्वी, मानव या बहुरंगी कल्पनेच्या अनेक घड्यांच्या पडद्याने आवृत्त असतो; व त्यामुळे तो स्वत:स सीमित व पृथक् व्यक्तीव्यतिरिक्त दुसरे कांहीहि मानू शकत नाही. ह्या बहुरंगी व मिथ्या कल्पनेच्या विलासामधूनच मनुष्याची अहंचेतना (ego-consciousness) उत्पन्न होते; व ईश्वराशी ऐक्य पावण्याची जाणीवपूर्वक लालसा हा ह्या मिथ्याकल्पनारचित अहंचेतनारुपी इमारतीला पहिला धक्का आहे. **पथाक्रमण म्हणजे मिथ्या कल्पनाविलासाच्या परिणामांना निस्तारुन, अदम्य पृथग्भाव व अनिवार्य वियुक्त जीवन निर्माण करणाऱ्या अज्ञानरुपी पडद्याचे अनेक पदर एकामागून एक फेकून देणें.** आतापर्यंत मनुष्य आपल्या निराळ्या अस्तित्वाला दृढपणे चिकटून राहिला होता; व त्याची ती पृथक् सत्ता घोर अज्ञानाच्या भव्य भिंतीमागे संरक्षित होती. परंतु, यानंतर, तो जणू काय विशालतर सत्याशीं वार्तालाप सुरु करतो. ज्या मानाने तो सत्याशी अधिक संबद्ध होतो, त्या मानाने त्याचा अज्ञानरुपी पडदा अधिक विरळ होतो; व त्याचा पृथग्भाव व अहंकार ज्या प्रमाणांत क्रमश: जीर्ण होतो, त्या प्रमाणात तो विशालतर सत्यात अधिक लय पावल्याचे अनुभवतो.

मिथ्या कल्पनेची क्रिया उफराटी करणे.

कल्पनेच्या भराऱ्यांमुळे, तुटक वेगळेपणाच्या भासाची रचना होते; व हा स्वयंनिर्मित भिन्नभाव तोडून, सत्याशी पुन: एकत्व पावण्याकरिता, मिथ्या कल्पनेची प्रक्रिया उफराटावी लागते. कल्पना टाकून देण्याचा हा उपक्रम गाढ निद्रेंतून जागृत होण्याच्या प्रक्रियेप्रमाणे आहे; व मिथ्याकल्पनेच्या निरासातील निरनिराळ्या अवस्था गाढ झोप व पूर्ण जागृति, या दोहोंमध्ये पुलांचे कार्य करणाऱ्या अनेक स्वप्नांप्रमाणे आहेत. मिथ्या कल्पनेची नानाविध



स्वार्थरहित सेवा.

परंतु या बौद्धिक निर्णयांतील चुकीची भरपाई व्यावहारिक दृष्टीने पुरेपूर भरुन निघाली असती. अध्यात्मजीवनामध्ये, पथ चालण्यास सुरवात करण्यापूर्वीच त्या पथाचा संपूर्ण नकाशा जवळ असण्याची आवश्यकता नसते; उलटपक्षी, असे पूर्ण ज्ञान उपकारक न होतां, वास्तविकपणे अपकारकच ठरण्याचा संभव अधिक असतो. **स्वत:वर जोखीम घेऊन, जे वीरतापूर्वक प्रयोगशील होतात, त्यांनाच** अध्यात्मजीवनातील गूढ रहस्यविशेष प्रगट होतात. ज्या ऐदी लोकांना प्रत्येक पावलागणिक हमी (guarantee) पाहिजे असते, अशांना ते प्राप्त होत नाहीत. जो किनाऱ्यावरुन समुद्राचा विचार करतो, त्याला फक्त समुद्राच्या पृष्ठभागाचेंच ज्ञान होईल. परंतु ज्याला समुद्राच्या खोलीचा थांग घ्यायचा आहे, त्याने त्यात धाडसाने बुडी घेण्यासच तत्पर असलें पाहिजे.

( ३ ) प्रेम.

क्रियेचा उगम सत्यदर्शनांत असेल, तेव्हाच कर्मयोगरुप साधना परिपूर्ण होते. ज्ञानयुक्त क्रिया बंधनकारक होत नाही, कारण ती अहंमूलक नसून, स्वार्थरहित असते. स्वार्थपरायणतेंत अज्ञान प्रतिबिंबित होतें, व स्वार्थशून्यतेमध्ये सत्य प्रतिबिंबित होते. बाह्य फलांच्या किंवा परिणामांच्या दृष्टीने स्वार्थरहित सेवाजीवनाचा अंगीकार करावयाचा नसतो, तर ते जीवन त्यातील अर्थपूर्णतेमुळे स्वीकारावयाचे असते. परंतु स्वार्थरहित क्रियाशीलतेंतील अंतर्गत विलक्षणताच अशी आहे, की **अज्ञानजनित स्वार्थपरतेस कदापि साध्य नसलेला महत्तर लाभ साधकाला स्वार्थरहित क्रियाशीलतेमुळे मिळतो.** स्वार्थामुळे जीवन संकुचित होऊन, ते पृथक् व्यक्तित्वाच्या खोट्या कल्पनेभोवती भ्रमत राहते. परंतु स्वार्थरहित क्रियाशीलता ही भेदभ्रम लयास नेण्यास मदत करते; व सर्वात्मकते (all-selfness) ची अनुभूति ज्यात आहे, अशा सीमारहित जीवनाचे ती प्रवेशद्वार बनते. माणसाजवळ जे काही आहे, ते तो गमावू शकतो; व ज्याची तो इच्छा करतो, ते त्याला अप्राप्यहि असू शकते. पण जे काही त्याने ईश्वरार्पणबुद्धीने दिले असेल, ते त्याला तत्क्षणीच परतहि मिळून चुकले असते. कर्मयोगाची साधना ही अशी असते.

प्रयत्नशीलतेंतून सहजावस्थेची प्राप्ति.

ज्ञान व कर्म या साधनांपेक्षाहि प्रेम किंवा भक्ति ही साधना अधिक महत्त्वाची आहे. प्रेमाचे समर्थन प्रेमातच आहे. ते स्वयंपूर्ण आहे; व म्हणून, त्याची पूर्ति दुसऱ्या कशानेहि करण्याची आवश्यकता नाही. संतश्रेष्ठांनी भगवत्प्रेमांतच पूर्ण संतोष मानला; व दुसऱ्या कशाचीहि इच्छा केली नाही. ज्या प्रेमात आशा आहे, ते प्रेमच नाही. ईश्वरीय प्रेमाच्या तीव्रतेत प्रेमी प्रियतमाशी एकत्व पावतो. **प्रेमाहून मोठी साधना नाही; प्रेमाहून श्रेष्ठ कायदा नाही; व प्रेमाहून अधिक उंच दुसरे प्राप्तव्य नाही, कारण प्रेम भगवत्स्वरुप झाल्यावर अनंत होतें.** दैवी प्रेम व ईश्वर हे एकच आहेत; ज्याच्याजवळ दैवी प्रेम आहे, त्याला भगवंताची प्राप्ति झालीच.

प्रेमाला साधना व साध्य ह्या दोहोचे अंग मानता येईल; परंतु प्रेमाचे स्वयंसिद्ध

महत्त्व इतके स्पष्ट आहे, की त्याला अन्य वस्तूच्या प्राप्तीचे साधन मानणे, ही बहुधा चूक समजली जाते. दुसऱ्या कोणत्याहि साधनेने ईश्वरामध्ये इतक्या सहजतेने व पूर्णतेने लय होत नाही. प्रेमाच्या दिग्दर्शनात सत्याप्रत जाणारा पथ आनंदमय व आयासरहित होतो. साधारणत: साधनेमध्ये प्रयत्नशीलता अंतर्भूत असतेच; कधीकधी प्रलोभनांच्या सान्निध्यांत असतांना, विरक्ति टिकविण्याकरिता प्रचंड प्रयत्नहि करावे लागतात. परंतु प्रेमात प्रयत्नभावाला वाव राहत नाही, कारण ते सहजस्फूर्त असते; व सहजता ही अध्यात्मजीवनाचा प्राण आहे. चेतनेच्या श्रेष्ठतम व पूर्णपणे तत्त्वाकार झालेल्या स्थितिला सहजावस्था म्हणतात; व या सहजस्थितीत अनिर्बंधता व निरंतर आत्मानुभूति असते. **साधकाची सर्व कांही प्रयत्नशीलता शेवटची प्रयत्नशून्य व सहजसिद्ध अवस्था प्राप्त करण्याकरिताच असते, ही आध्यात्मिक साधनेची नवलाई आहे.**

कस्तूरीमृगाची गोष्ट.

आध्यात्मिक साधनेचे स्वरुप एका कस्तुरीमृगाच्या गोष्टीवरुन विशद होते. एकदा एक कस्तुरीमृग आपल्या दुर्गम व ओबडधोबड पर्वतप्रदेशांमध्ये स्वच्छंदाने क्रीडाविहार व संचरण करीत असतां, त्याला अकस्मात अननुभूत व मनोमुग्धकारि सुगंध प्रत्ययास आला. त्या सुगंधाने त्याचे हृदय इतके अस्थिर व उन्मत्त झालें, की त्याने त्या सुगंधाचे उगमस्थान शोधून काढण्याचे ठरविलें. गंधोन्मादाने त्याची उत्कंठा तीव्रतम झाली; व तो त्या शोधात पर्जन्यवृष्टि, तुफान वादळ, मेघांची घनघोर गर्जना व विजांचा कडकडाट, किंवा कडक थंडी व असह्य सूर्यताप यांची पर्वा न करता, रात्रंदिवस, अविश्रान्त शोधात व्याकूळ होऊन, इतस्तत: भटकूं लागला. न कचरतां व निर्भयपणाने, तो कस्तुरीमृग एका दरींतून दुसऱ्या दरीत व पर्वताच्या कड्यामुळ्यांवर उड्या मारीत बेगुमानपणे संचार करीत असतांना, एका उंच व धोक्याच्या सुळक्यावरुन पाय घसरुन खाली पडला; व त्याला प्राणघातक जखम झाली. पण त्याचे प्राणोत्क्रमण होत असतांना, त्याला आढळून आले, की ज्या सुगंधाने तो इतका व्याकुळ झाला होता, तो सुगंध त्याच्या स्वत:च्याच नाभिस्थानांतून निघत होता. परंतु त्याच्या जीविताच्या ह्या अखेरच्या क्षणी, तो कस्तूरीमृग हर्षातिशयाचा अनुभव घेत होता; व त्याच्या चर्येवर एक अनिर्वचनीय शांति होती !

स्व-स्वरुपानुभूति हेच साधनेचे साध्य आहे.

साधकाची सर्व काही आध्यात्मिक साधना त्या कस्तुरीमृगाच्या धडपडीप्रमाणे असते. साधकाचे अहंनिष्ठ जीवन संपुष्टांत आणणे, ह्यातच साधनेची सफलता आहे; परंतु त्याच क्षणामध्ये, साधकाला हीहि प्रतीति येते, की त्याच्या सुखदु:खांचे, जोखीमयुक्त साहसांचे, त्यागपर व बेगुमान यत्नशीलतेचे व व्याकुलतामय शोधाचे अंतिम उद्दिष्ट तो स्वत:च होता. सीमित व्यक्तित्व लयास नेऊन, **सर्वान्तर्गत ईश्वराशी ऐक्य-प्रत्यय देणारी स्व-स्वरुपाची अनुभूति मिळविण्याकरिताच सर्व साधना होती, हे साधकाला कळून चुकते.**



# ९ : मोक्षपथांतील टप्पे

सर्वांनाच बंधनाच्या स्थितीमधून जावें लागते; पण ही बंधनाची स्थिति जीवनाच्या विकासातील अर्थशून्य आख्यान नाही. स्वातंत्र्याचा खरा आस्वाद अनुभविण्याकरिता प्रथम कारागृहवासाचा अनुभव पाहिजेच. आपल्या सर्व जीवनविस्ताराच्या संपूर्ण अवधीमध्ये मासा पाण्याच्या बाहेर एकदाहि आला नाही, तर पाण्याचे स्वारस्य पारखू शकणार नाही. तो आजन्म पाण्यातच राहिला असल्याने, त्याला स्वत:च्या जीवनाकरिता असलेलें पाण्याचे महत्त्व कळत नाही. परंतु त्याला एक क्षणभर का होईना, पण पाण्याबाहेर काढलें, तर तो पाण्याकरिता तडफडतो व त्या अनुभवामुळे पाण्याच्या गुणग्राहकतेस समर्थ होतो. त्याचप्रमाणे, जीवन सुरवातीपासून शेवटपर्यंत बंधनरहितच असते व त्याला बद्धतेचा मुळीच अनुभव नसता, तर त्यात मुक्त स्थितीचा आनंदहि दुरावला असता. आध्यात्मिक बंधन व त्याच्या बाहेर पडण्याची उत्कट तळमळ हे दोन्हीहि आगामी मुक्तावस्थेच्या आनंदास्वादाची पूर्वतयारी आहेत.

बंधनामुळे मुक्तीचे महत्त्व वाढते.

पाण्याबाहेर काढलेला मासा परत पाण्याची इच्छा करतो, त्याचप्रमाणे साधकहि ध्येयदर्शनानंतर ईश्वराशी ऐक्य पावण्याची लालसा ठेवतो. वास्तविक पाहतां, आपल्या उगमस्थानी परत पोहोचण्याची प्रत्येक व्यक्तीला, तो त्या अज्ञानरुपी पडद्यामुळे वियुक्त झाल्यापासून तीव्र लालसा असतेच; पण साधक मोक्षपथांत प्रविष्ट होईपर्यंत, ती लालसा नकळत (unconscious) राहते. बोगद्यांतून काही कालपर्यंत आगगाडी गेल्यावर, त्यातील अंधार ज्याप्रमाणे अंगवळणी पडतो, त्याचप्रमाणे मनुष्याला एका अर्थाने अज्ञानाचीहि सवय होते; परंतु **आपण कशास तरी मुकलो आहों,** याबद्दल निश्चित अस्वास्थ्य व अस्पष्ट हुरहुरहि त्याच्या मनात असतेच. आणि ज्यापासून आपण वंचित आहों, ते **'कांही तरी'** अत्यंत सारभूत आहे, ही जाणीवहि त्याला असते. घोर अज्ञानाच्या अवस्थेत असावधपणामुळे ते 'काही

पथाचा प्रारंभ गंभीर तर सत्याच्या लालसे-मध्ये होतो.

पाचव्या भूमीतील मग्नतेला **'फना–ए–जब्रूति'** म्हणजे **'इच्छानाश'** म्हणतात. येथे निम्नतर बुद्धीची अविरत क्रिया शांत होते. तो (साधारण अर्थाने) विचार करीत नाही; परंतु, तो अप्रत्यक्षपणे दुसऱ्यांच्या मनाला अनेक विचारांची स्फूर्ति देतो. तो पाहतो, पण चर्मचक्षूने नव्हे. मन मनाशी बोलते; व संशय किंवा चिंता यांना स्थान राहात नाही. तो आध्यात्मिक दृष्टीने सुरक्षित असून, यापुढे त्यांचे अध:पतन होणे शक्य नसतें, तरीहि या उंच भूमीवरील कित्येक यात्रींना स्वत:स ईश्वरत्व प्राप्त झालें, अशा आत्मसंभ्रमाचें निवारण करता येत नाही. 'मी ईश्वर आहे,' असे तो या मिथ्याभासामुळे समजतो व म्हणतो. आपण आता आध्यात्मिक पथाच्या शेवटी आलो, असे तो मानतो. पण तो आणखी पुढे अग्रेसर झाला, तर त्याला स्वत:ची चूक कळून, तो सहावी भूमिका गाठतो. सहाव्या भूमिकेतील मग्नतेला **'फना–ए–महबूबी'**, म्हणजे **'प्रियतमांत जीवत्वनाश'** म्हणतात. साधारण मनुष्य जगांतील निरनिराळ्या वस्तू जसा प्रत्यक्षपणे व स्पष्ट पाहतो, त्याचप्रमाणे यात्रीला आता परमात्मा प्रत्यक्षपणे व स्पष्ट दिसतो; व हा ईश्वर दर्शनाचा आनंद निरंतर टिकून, त्यात एका क्षणाचाहि खंड पडत नाही. तरीहि तो यात्री परमेश्वराशी ऐक्य पावू शकत नाही.

फना–फिल्लाह किंवा निर्विकल्प समाधि म्हणजेच सचेतन ईश्वरत्व आहे.

यात्री सातव्या भूमीवर आरुढ झाला, म्हणजे तो **'फना–फिल्लाह'** नावाची अखेरची मग्नता अनुभवितो; व त्याच्या **ईश्वरानुभूतीमध्ये जीवत्वाचा मूलोच्छेद होतो.** या मग्नतेत यात्रीचें निराळे अस्तित्व लयास जाऊन, तो ईश्वराशी नेहमीकरता एकत्व पावतो. ईश्वराशी पूर्णैक्य झाल्यामुळे, तो स्वत: ईश्वराव्यतिरिक्त दुसरे काही अनुभवित नाही. सातव्या भूमिकेतील ही **'फना–फिल्लाह'**, म्हणजे आध्यात्मिक पथाचा शेवट असून, सर्व शोधांचे व प्रयत्नांचे ध्येय आहे. **ती जागृत ईश्वरत्वाची सहजसमाधि किंवा निर्विकल्प समाधि आहे.** हीच खरी जागृत स्थिती आहे. यात्रीने आता विशाल कल्पनासागराच्या पलीकडचा किनारा गाठलेला असतो. **हे अखेरचे सत्य हेच एकमेव सत्य असल्याचे तो जाणतो;** व पथांतील इतर सर्व टप्पे भ्रमात्मक होते, हेहि त्याला कळून चुकते. तो आपल्या अंतिम गन्तव्य स्थानाप्रत **पोहोचलेला** असतो.

जुलुमी तत्त्व नाही. पूर्वजन्मांतून मनुष्याच्या पाठीमागे लागत असणारें त्याचें स्वत:चें कर्म म्हणजेच नशीब होय. ज्याप्रमाणे नशीब पूर्वकर्माच्या द्वारां बनविलें जातें, त्याचप्रमाणे, वर्तमान जन्मांतील कर्माच्या योगाने त्यांत बदल होऊं शकतो, किंवा त्याचें पूर्ण निराकरणहि होऊं शकतें.

पृथ्वीवरील जीवनामध्ये केलेल्या कर्माचे स्वरुप अहंमनांतील संचित संस्कारांनी निश्चित होतें. व या उलट, भौतिक जीवनांतील कर्माच्या प्रकारविशेषामुळेच अहंमनांतील संस्कार निश्चित होतात. अहंचित्तांतील संस्कार आणि कर्माचा प्रकारविशेष, हे परस्परावलंबी



रचना मोडून टाकण्याची प्रक्रिया क्रमिक असून, तिच्या सात अवस्था आहेत. कल्पनारुपी पडद्याचा एक पदर टाकून देतांना, साधक सत्याच्या व प्रकाशाच्या अधिक जवळ निश्चितपणाने जातोच; परंतु ह्यात केवळ एका अधिक मिथ्या कल्पनेचा त्याग करुन, कमी मिथ्या कल्पनेचा स्वीकार केला जात असला, तरी त्याने साधकाचे सद्वस्तूशी पूर्णैक्य होत नाही. अहंचेतनेच्या तुटक पृथग्भावाच्या अंशभेदास अनुसरुन, कल्पनेच्या मिथ्यत्वाचेहि अंशभेद आहेत. **मिथ्या कल्पनेच्या निरासामधील प्रत्येक टप्प्यामध्ये, अहंभाव निश्चितपणाने जीर्ण होतो.** परंतु ध्येयप्राप्तीच्या पूर्वीचा मार्गातील प्रत्येक टप्पा गाठणे, म्हणजे **कल्पनेचे एक उड्डाण विसर्जन करुन, दुसऱ्या उड्डाणाचा अंगीकार करणे होय.**

कल्पनेच्या ह्या अनेक भराऱ्यांमुळे, आत्म्याच्या वास्तविक सत्तेमध्ये खरा बदल होत नाही. जो बदल होतो, तो आत्म्यांत नसून, आत्म्यासंबंधीच्या कल्पनेत होतो. कल्पना

पंथातील टप्पे कल्पनास्वरुप आहेत.

करा की दिवास्वप्नांत किंवा कल्पनारचित मनोराज्यात, तुम्ही स्वत:स चीनमध्ये असल्याचे मानता, पण तुमचे शरीर वास्तविकपणे हिंदुस्थानात आहे. ही कल्पनाशृंखला जेव्हा संपुष्टात येते, तेव्हा तुमचे शरीर वास्तविकपणे चीनमध्ये नसून, हिंदुस्थानातच आहे, हे तुमच्या ध्यानात येते. मानसिक (subjective) दृष्टीने, हे चीनमधून हिंदुस्थानात परत येण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे, पथांतील सर्व टप्पे सारखेच कल्पनारचित असले, तरी देहभाव क्रमश: सोडून, सर्वगत परमात्म्याशी वर्धनशील तादात्म्य पावण्याचा मार्ग वास्तविकपणे चालून जाण्याशी त्यांचे साम्य आहे.

उन्नतीचे सहाहि टप्पे द्वैताच्या साम्राज्यांतरच आहेत; पण **प्रत्येक टप्प्यावर भिन्नत्वाची पृथक्‌भावरचना तोडून, विशालतर सद्वस्तूमध्ये विलीन होण्याची जाणीव इतकी प्रबल व**

सत्यानुभूतीचा मिथ्याभास

**सुस्पष्ट असते, की साधकास कित्येक वेळा स्वत:स अंतिम सत्यानुभूतीच झाली असल्याचा मिथ्याभास (psuedo-sense) होतो.** ज्याप्रमाणे पर्वतारोहण करणारा मनुष्य एखाद्या गहन दरीपर्यंत आल्यास, तिच्या हृदयंगम दृश्यात रममाण झाल्यामुळे, त्याला अंतिम ध्येयाची विस्मृति होते व त्याला उद्दिष्ट स्थानच गाठल्याचा थोडा वेळ भास होतो, त्याचप्रमाणे साधकहि पथांतील मध्यंतरांतील टप्प्यांना अंतिम गन्तव्य स्थानच समजण्याची चूक करतो. परंतु ज्याचा पर्वतारोहणावर कटाक्ष आहे, त्याला थोड्याच वेळात दरीपलीकडे जाण्याची आवश्यकता प्रतीत होते, त्याचप्रमाणे साधकासहि लवकरच किंवा कालान्तराने, हा मधील टप्पा मागे टाकून, स्वत:स पुढे जावे लागणार, हे उमगून येते. **मधील टप्प्यांत उत्पन्न होणारा सत्यानुभूतीचा मिथ्याभास म्हणजे वास्तविकपणे जागे न होता, जागृत झाले असल्याबद्दलच्या केवळ** स्वप्नाप्रमाणे आहे. वास्तविकपणे जागे झाल्यावर, आपला पूर्वीचा जागे झाल्याचा भास स्वप्नरुप होता, हे त्याला दिसून येते.

उन्नतीचा प्रत्येक टप्पा म्हणजे जाणिवेची एक विशिष्ट अवस्था असते; व जाणीव एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत प्रवेश करीत असतांना, साधकाची अंतरुप भूमिका (plane) हि बदलते. ह्याप्रमाणे सातव्या भूमीत आरुढ होण्यापूर्वी, साधकाला सहा भूमिका व अवस्था ह्यांचा अनुभव घ्यावा लागतो. सातवी भूमिका ही पथाची अखेर असून, तेथेच साधकाला अंतिम ईश्वरानुभूति होते. तरीही, प्रत्येक स्टेशनवर आगगाडी कांही वेळ थांबतेच. अंतस्थ भूमिका ही स्टेशनप्रमाणे आहे; परंतु जाणिवेची अवस्था, ही प्रवाशाने त्या स्टेशनवर खाली उतरुन इतस्तत: फिरण्याप्रमाणे आहे.

भूमिका व अवस्था.

नविन भूमिकेंत प्रवेश केल्यावर, त्या भूमिकेमध्ये अनिर्बंध कार्यक्षमता येण्याकरिता, जाणिवेला थोडा वेळ लागतो. मानसिक जीवनाची सगळीच परिस्थिति बदलल्यामुळे, त्या साधकाचे मनोव्यापार एकप्रकारे स्थगित होतात; व ह्याच स्थितीला समाधि म्हणतात. अध्यात्मपथावरील यात्री जेव्हा नवीन भूमिकेमध्ये प्रवेश करतो, तेव्हा तो त्या भूमिकेमध्ये कांही कालपर्यंत मग्न राहतो. असा काही काल निमग्नतेत गेल्यानंतरच त्याला त्या भूमिकेची विशिष्ट अवस्था प्राप्त होते. प्रवासाने थकलेला पथिक जसा केव्हा केव्हा निद्रावश होतो, त्याचप्रमाणे, वरील भूमिकेत आरोहण करण्याचे परिश्रम केलेल्या जाणिवेचे मनोव्यापारहि अगदीच मंदावतात. **मनोव्यापारांच्या ह्या अत्यंत मंद स्थितीचे निद्रेशी साम्य असते;** परंतु, त्याचबरोबर समाधि निद्रेहून मूलत: भिन्न असते, कारण, **निद्रेत मनुष्य पूर्णपणे अचेतन (unconscious) असतो; पण समाधिमध्ये तो देहाबद्दल किंवा भोवतालच्या परिस्थितीबद्दल अचेतन असला, तरी त्याला आनंद, प्रकाश व शक्ति यांची जाणीव असतेच.** नवीन भूमिकेंत काही काल सापेक्षत: स्थगित झालेले मन, त्या भूमिकेत क्रियाप्रवण होऊन, त्या भूमिकेस विशिष्ट असणारी अवस्था अनुभविते; व ही नवीन अवस्था मागे टाकलेल्या अवस्थेहून अगदी निराळी असते.

'इस्तिग्राक' किंवा समाधीचे स्वरुप.

नवीन भूमिकेत प्रविष्ट झाल्यावर, साधक त्या भूमिकेंत निमग्न होतो; व तेव्हा, **मनोव्यापार मंदावत असतांना, साधकाच्या आहंकारिक जीवनाचा बराच ऱ्हास होतो.** आहंकारिक जीवनाचा हा ऱ्हास सातव्या भूमिकेत होणाऱ्या अहंभावाच्या पूर्ण मूलोच्छेदाहून निराळा असतो. पण सातव्या भूमिकेतील अंतिम अहंनिरासाप्रमाणेच, मधील सहा भूमिकांमध्ये होणारा अहंभावाचा ऱ्हासहि जरुर उल्लेखनीय आहे. कारण त्यांनाहि सापेक्ष महत्त्व आहेच. सूफी अध्यात्मपरंपरेमध्ये अहंभावाच्या अंतिम मूलोच्छेदाला **'फना–फिल्लाह'** म्हणतात; व अलीकडच्या द्वैतपूर्ण सहा भूमिकांमधील समाधीमध्ये, अहंकाराचा आंशिक लोप होत

पथांतील प्रत्येक टप्पा म्हणजे आहंकारिक जीवनाचा ऱ्हास असतो.



असल्यामुळे, त्यांनाहि 'फना' किंवा अहंलोपाचेच प्रकार मानतात.

या सर्व चढत्या 'फना' मधून प्रगतिपूर्ण सातत्य असून, चढावाच्या शेवटी अंतिम **'फनाफिल्लाह'** आहे. प्रत्येक **'फना'** चे नैज वैशिष्ठ्य असते. पहिल्या भूमिकेत आरुढ झाल्यावर, यात्रीला पहिल्या **'फना–ए–नासूती'**, म्हणजे **'जडत्वनिरासा'** च्या मग्नतेचा अनुभव येऊन, त्याच्या अहंनिष्ठ जीवनाचा थोडासा ऱ्हास होतो. सीमित व्यक्तित्वाची थोडा वेळ विस्मृति होऊन यात्री हर्षमग्न होतो. पहिल्या भूमिकेत मग्नता पावणाऱ्या कित्येक यात्रींना ईश्वरानुभूति झाल्याचा भास होऊन, ते तेथेच रुतून जातात. परंतु जर यात्रीने स्वत:ची या आत्मसंभ्रमा (self-delusion) पासून मुक्तता करुन घेतली, तर त्याला प्राप्त झालेली स्थिति ही यात्रेतील अवस्थांतर मात्र आहे, हे त्याला कळून चुकते; व तो पुढील पथ चालावयास लागून, दुसऱ्या भूमिकेप्रत पोहोचतो. दुसऱ्या भूमिकेतील मग्नतेला **'फना–ए–बातिली'** किंवा **'मिथ्यात्वनिरास'** म्हणतात. यात्री आता आनंदात व अनन्त प्रकाशात निमग्न होतो. काहींना ध्येयप्राप्तीच झाल्याचा भास होऊन, ते तेथेच रुतून बसतात. पण जेव्हा ते या मिथ्याभासापासून स्वत:स मुक्त करतात, तेव्हा ते पुढे चालू लागून, तिसऱ्या भूमिकेत प्रविष्ट होतात. तिसऱ्या भूमिकेतील मग्नतेला **'फना–ए–जाहेरी'** म्हणजे **'दिखाऊ वस्तुत्वाचा अंत'** म्हणतात. यात्री देह व जगत् यांच्याविषयी पूर्णपणे अचेतन होतो व अनंत शक्ति अनुभवतो. परंतु, जगाचे भान नसल्यामुळे, त्याला आपली शक्ति व्यक्त करण्याकरता संधीच मिळत नाही. ह्या स्थितीला दैवी मूर्च्छा किंवा झापड (coma) अथवा विदेह समाधि म्हणतात. ह्या स्थितीत जाणीव स्थूल जगापासून पूर्णपणे परावृत्त झालेली असते.

पहिले तीन 'फना'.

यात्री जर याही पलीकडे गेला, तर तो चवथ्या भूमिकेप्रत पोहोचतो. चवथ्या भूमिकेतील मग्नतेला **'फना–ए–मलकूति'** अथवा **'मुक्तिद्वार'** म्हणतात. ह्या भूमीतील विशिष्ट जाणिवेमध्ये साधक अनंत शक्ति अनुभवतो. इतकेच नव्हे, तर त्या शक्तीचा उपयोग करण्याचे प्रसंगहि त्याच्यावर पुष्कळ येतात. तो सर्व काही जाणू शकतो. उदाहरणार्थ, जगातील कोणत्याहि भागातील कोणताहि मनुष्य काय विचार करतो, किंवा कोणत्या कार्यात गुंतला आहे, हे तो जाणू शकतो. शिवाय स्वत:च्या शक्तीचा उपयोग करण्याची संधि त्याला मिळते, इतकेच नव्हे, तर ती शक्ति वापरण्याची निश्चित इच्छाहि त्याला होते. ह्या मोहास तो बळी पडला, तर तो आपली शक्ति व्यक्त करीत जातो व चवथ्या भूमिकेत शक्य असलेल्या चित्ताकर्षक बाबतीत फसून जातो. ह्या कारणामुळे, चवथी भूमि अत्यंत धोक्याची व दुस्तर आहे. येथे, यात्रीचा अध:पात होण्याची शक्यता असते; व तो चवथी भूमि तरुन, पाचवी भूमि गाठेपर्यंत, आध्यात्मिक दृष्टीने मुळीच सुरक्षित नसतो.

चवथ्या भूमिकेतील धोका.

पाचव्या व सहाव्या भूमिकेतील फना

जागी एक बकरीच येऊन, तो मुलगा वाचविला जाण्याचा चमत्कार घडला.

मौलाना रूमी नावाच्या आपल्या शिष्याला शम्सतब्रेज नावाच्या सद्गुरुने दारुच्या सार्वजनिक अड्ड्यांतून दारू आणण्याचा हुकूम दिला; व सद्गुरुची कृपा संपादन करण्याकरिता त्याने तो हुकूम न कचरता पाळला. त्या वेळी, इस्लामी जगातील एक अत्यंत मोठा व धर्मनिष्ठ पुरुष म्हणून मौलानाची ख्याती असून, त्याला पुष्कळ धार्मिक मुसलमान अनुयायी होते; व मुसलमान लोकांत दारू हराम (निषिद्ध) समजली जाते. तेव्हा, भर रस्त्यांत दारूचा घडा आपल्या खांद्यावरुन नेणे, म्हणजे मौलानाकरिता एक अग्निदिव्यच होते. पण त्यातूनहि तो पार पडला.

मौलाना रुमी.

गौसाली शाहच्या सद्गुरूंपैकी एकजण गंगाकिनारी राहत असे; व त्याने त्याला पिण्याचे पाणी नदीप्रवाहाच्या मध्यधारेतूनच आणण्याची आज्ञा दिली. ती वेळ मध्यरात्रीची असून, गंगानदीस पावसाळ्यामुळे महापूर आला होता. शिष्याने प्रथम थोडी कांकूं केली; पण अखेरीस, सद्गुरुच्या सर्वज्ञतेवर विश्वास टाकून, अशक्यप्राय वाटणारी गोष्ट करण्यास उद्युक्त होण्याचे त्याने धाष्ट्र्य केले. परंतु, गंगा नदींतील प्रक्षुब्ध जलराशींत त्याने पदार्पण केल्यावर, सर्वच परिस्थिति आश्चर्यकारक रीतीने एकदम बदलूनगेली. महापुराच्या उसळणाऱ्या व उत्तुंग लाटांच्या ऐवजी गंगानदी एक अत्यंत बारीक जलधारा बनली; व त्याचा पाण्याचा घडा नदीच्या तळाला जवळजवळ स्पर्श करुं लागला. गौसाली शहा मध्यधारेचा शोध करीत, जवळजवळ दुसऱ्या किनाऱ्यास पोहोंचला होता ! ह्याप्रमाणे कार्यमग्न असतांना, त्याचा गुरु तेथे आला व उशीर लागण्याचे कारण विचारूं लागला. 'मध्यधारा सापडत नाही', असें त्यांने सांगितल्यावर, गुरुने त्याला त्याच बारीक जलधारेंत घडा भरण्याची परवानगी दिली; व थोडा वेळ तो स्वत: त्याच पाण्याने घडा भरुं लागला. मग कांही तरी कारण सांगून, व घडा पाण्याने भरल्याबरोबर ताबडतोब मागोमाग येण्याची आज्ञा करुन, गुरु निघून गेला. नंतर, जेव्हा गौसाली शहा पाण्याने भरलेला घडा घेऊन झोपडीत परत आला, तेव्हा त्याला गुरुसन्निध असलेल्या शिष्यांकडून कळलें की, तो गेल्यापासूनच्या सर्व अवधीत, गुरु त्यांच्याशी त्यांच्याबद्दल सारखे बोलत होता, व त्याने झोपडी एक मिनिटभरहि सोडली नव्हती ! हे ऐकल्यावर त्याच्या आश्चर्यास सीमाच राहिली नाही.

गौसाली शाह.

वरील उदाहरणावरुन दिसून येईल की, कांही थोड्या प्रसंगी शिष्यांचे गर्वहरण करण्याकरिता, व त्यांना मार्गावर मदत करण्याकरिता, सद्गुरु आपल्या गूढ शक्तींचा (occult powers) उपयोग करुं शकतो. परंतु, साधारणत: **सद्गुरु आपल्या ईश्वरी शक्तींचा उपयोग फारच क्वचित् करतात; व आध्यात्मिक उद्दिष्टास अगदीच आवश्यक असेल, तरच ते त्यांचा असा उपयोग करतात.** साधारणपणे, जगांतील इतर लोकांच्या नेहमीच्या रीतींनींच ते आपले हेतु सिद्ध करतात. परंतु, असे करतांना, त्यांचे महान् ज्ञान, सूक्ष्म

सद्गुरु गूढ रीतीपेक्षा साधारण पद्धतच पसंत करतात.



आहेत. विविध अहंचित्तांतील संस्कार बनविण्यांत, व त्यांची पुनर्घटना करण्यांत आणि त्यांना गति देण्यांत, पृथ्वीवर केलेल्या कर्माचा महत्त्वाचा भाग असतो. कारण, कर्मामुळे अहंमनाला जी गति मिळते, तिच्यामुळेच मनुष्याचें भावि नशीब बनत असतें. उत्पादक आणि फलदायी कर्म, केवळ पृथ्वीवरील जीवनाच्या क्षेत्रांतच घडूं शकतें; व तेंहि जडदेहाच्या द्वारांच घडूं शकतें.

कर्म नियमांचे योग्य ज्ञान आणि त्याचा उपयोग, यांच्या योगाने विवेकयुक्त आणि ज्ञानयुक्त क्रियेच्या द्वारां, मनुष्यास स्वत:चा भाग्यविधाता (Master of the destiny) बनतां येतें. मनुष्य ज्या प्रकारचा असतो, त्याप्रकारचा तो असण्याचें कारण, म्हणजे स्वत:चीच पूर्वकर्मे होत. आणि स्वत:च्याच क्रियांच्या योगाने, जन्ममरणांमध्ये त्याचें नियंत्रण करणाऱ्या कर्मनियतींतून त्याला कायमचें मुक्त होतां येतें; व त्याला आपल्या इच्छेप्रमाणे स्वत:चें जीवन बनवितां येतें.

ठोकळ मानाने पाहतां, कर्म दोन प्रकारचें आहे - बंधनकारक होणारें, आणि आत्म-ज्ञान आणि मुक्ति मिळविण्यास मदत करणारें. जोवर कर्माची उत्पत्ति अहं-चित्तांतून होऊन, त्याला पुष्ट करते, तोंवर वाईट कर्माप्रमाणेच चांगली कर्मेहि बंधनकारकच असतात. परंतु, **जेव्हा योग्य ज्ञानांतून कर्माची उत्पत्ति होते, तेव्हा तें कर्म मुक्तीसाठी उपयुक्त अशी शक्ति बनतें.** कर्म-नियमांनी उत्पन्न झालेली गुंतागुंत, आत्म्याचा स्वभावविशेष व त्याची खरी पूर्ण भवितव्यता ज्ञानपूर्वक जाणणारे सद्गुरुच या बाबतींत योग्य ज्ञान देऊं शकतात.

चांगले आणि वाईट, यांतील भेदाचें ज्ञान मनुष्याला झाले, म्हणजेच ज्याला कांही महत्त्व आहे, असें कर्म अस्तित्वांत येते. बालपणाच्या पहिल्या सात वर्षात जे संस्कार अभिव्यक्त होतात, ते फार हलके असतात; आणि त्या हलक्या संस्कारांनी प्राप्त होणाऱ्या जाणिवेच्या ठिकाणी, जगांतील भेदाभेदाविषयी सापेक्षतेने कमी प्रत्युत्तरक्षमता (responsiveness) असते. म्हणून सातवर्षांखालील बालकांच्या क्रियांमुळे, अहंचित्तावर तितकेंसे प्रबल आणि परिणामकारक संस्कार उमटत नाहीत; आणि त्या बालकांचे भवितव्य बनविण्यांत, ते फार महत्त्वाचा भागही घेऊं शकत नाहीत. जेव्हा, **आत्म्याच्या ठिकाणीं, जबाबदारीची जाणीव उत्पन्न होते, तेव्हाच अहंमन आणि त्याचें भवितव्य बनविणाऱ्या परिणामकारक आणि खऱ्या कर्माला प्रारंभ होतो.** जबाबदारीची जाणीव

चांगले व वाईट, यांतील भेद समजू लागल्यावर कर्माचा प्रारंभ होतो.

# १० : सद्गुरुंची न्यारी रीत

सद्गुरुंची चेतना व्यक्तिनिरपेक्ष (impersonal) व विश्वगामी (universal) असते. परंतु, त्यांच्या आध्यात्मिक कार्याकरिता, ते आपले कार्यक्षेत्र मर्यादित करुं शकतात; व ते आपल्या अभिव्यक्त व्यक्तिमत्तेला आपल्या शिष्यांच्या आकांक्षांचें केंद्रस्थान बनू देतात. **जे शिष्य त्यांच्या सहवासांत राहतात, त्यांना मदत पोहोचविण्याकरिता, सर्व व्यक्तिगत संबंधांचा, ते रेखीव कालव्यांसारखा, साधन म्हणून उपयोग करतात.** ज्यांना त्यांच्या सहाय्याची आवश्यकता व पात्रता असते, अशा साधकांच्या शोधात ते नेहमीच असतात. कोणामध्ये आध्यात्मिक तळमळीचा लेशहि असला, तरी त्याच्याकडे ते दुर्लक्ष्य करीत नाहीत. साधकाच्या प्रगतीस ते हरतऱ्हेने प्रेरणा व प्रोत्साहन देतात; व त्याची रीत सर्वांना बरोबर कळली नाही, तरी ती खात्रीने परिणामकारक होते.

सद्गुरु सहाय्य करण्यास सदैव तयार असतात.

सद्गुरु साधकाच्या आध्यात्मिक यात्रेला निश्चित व सुरक्षित करुन, ध्येय प्राप्तीत एरव्ही लागणारा कालावधि कमी करतो. स्वतंत्र रीतीने शोध करणारा साधक मोक्षमार्गात बराच दूरवर जाऊ शकतो; परंतु तो सद्गुरुच्या मदतीशिवाय सहावी भूमिका उल्लंघूं शकत नाही. मधल्या भूमिकांतून वर चढत असतांनाहि, सद्गुरुचें सहाय्य अतिशय महत्त्वाचेच ठरते. **तो साधकाला आध्यात्मिक प्रवासपंथात मध्येच अटकूं देत नाही, किंवा त्यामधील भयानक खळग्यांमध्ये पडू देत नाही.** कबीराने मार्गाच्या तीन टप्प्यांची अग्नीच्या तीन स्थितींशी तुलना केली आहे. प्रथम धूर असतो, पण अग्नि नसतो; मग धुराने वेष्टिलेला अग्नि असतो; व शेवटी धुराशिवाय अग्नि असतो. त्याचप्रमाणे, मोक्ष मार्गातील प्रारंभीचा भाग केवळ घोर अज्ञानांध:कारानेच आवृत्त असतो; मध्यभागात ध्येयाचें अतिशय अस्पष्ट दर्शन होते; व अखेरीस निभ्रान्त सत्यानुभूति होते. मार्ग नानाप्रकारच्या भ्रमांमधून असल्याने, सद्गुरुचे दिग्दर्शन नसल्यास, साधकास धोका असतो; पण सद्गुरुला मार्गातील सर्व टप्प्यांचे ज्ञान असल्यामुळे, तो साधकाला त्या सर्वांमधून घेऊन जाऊ शकतो.

त्यांच्या सहाय्याचे स्वरुप.



अंतश्चक्षु उघडण्यापूर्वी, मन अनंततेच्या ध्येयाची कल्पना बनविते; व ही कल्पना आकाश किंवा सागर याप्रमाणे विशालता सूचित करणाऱ्या एखाद्या लाक्षणिक प्रतीकावर आधारलेली असते. अशा प्रकारची कल्पना निश्चित व सुस्पष्ट असली, तरी तिच्या ऐवजी अनंततेचे प्रत्यक्ष ज्ञान आले पाहिजे. आत्म्याचा अंतश्चक्षु उघडल्यावरच साधकाला प्रत्यक्ष आत्मदर्शन होते. परंतु त्यावेळी, मन चकित होऊन गोंधळून जाते; व त्यामुळे त्यांचे ज्ञान पूर्वीप्रमाणे स्पष्ट राहत नाही. आत्मदर्शनाने थक्क झाल्यामुळे, मनाची स्पष्ट विचार करण्याची शक्ति जाऊन, आत्मदर्शन म्हणजेच आत्मप्राप्ति किंवा आत्मानुभूति (realisation) आहे, असा त्याचा गैरसमज होतो; व म्हणून, साधक वास्तविक पाहतां मार्गाचें आक्रमण करीत असला, तरी आपण मार्गाची अखेर गाठली, असेच त्याला भ्रमाने भासते. मार्गाच्या ह्या विशिष्ट भागाला सूफी पंथांत '**मुकामे आफसन**' किंवा **भ्रमनिकेतन** म्हणतात. अशा प्रकारच्या मार्गातील कठीण भागामध्ये, सद्गुरु साधकाला कुशलतेने धक्का देऊन पुढे ढकलतात. म्हणजे तो साधक रस्त्यांतच अटकून न बसता, पुढे चालू लागतो.

भ्रमनिकेतन.

खरे पाहतां, अंतस्थ भूमिकांतील प्रत्येक भूमिकेवर, साधक अटकून राहण्याची भीति असतेच, कारण प्रत्येक भूमिकेमध्ये, एक विशिष्ट प्रकारचें आकर्षकत्व असून, ती साधकास सापळ्याप्रमाणे अडकवून ठेवते. परंतु, सद्गुरु त्याला ह्या भूमिकांच्या बाजूने, किंवा भूमिकांमधून, अनावश्यक विलंब न लावतां घेऊन जातो. **साधकाला आपला मार्ग स्वत:च आक्रमण करावा लागतो; पण साधकाच्या पूर्वप्राप्त ज्ञानास व अंत:प्रज्ञे (intuitions) स पक्के व स्थिर करुन, पुढील अनपेक्षित पण अनिवार्य अग्रगमनाकरिता, त्याच्या जाणिवेस त्वरित उद्युक्त करण्यांतच सद्गुरुचें खरे कर्तृत्व आहे.**

सद्गुरुचे कर्तृत्व.

शिष्याला मायेंतून काढण्याकरिता, सद्गुरु मायेचाच उपयोग करतो; व तो स्वत: चांगल्यावाईटाच्या पलीकडे असल्यामुळे, शिष्याला अप्रशस्त, अग्राह्य व विस्मयजनक वाटणाऱ्या आज्ञाहि देतो. अशा वेळी, शिष्याने त्या आज्ञा स्वत:च्या परिमित बुध्दीच्या न्यायासनासमोर न मांडता, संशयरहित श्रद्धा ठेऊन पाळाव्यात, हाच सर्वोत्कृष्ट मार्ग आहे. खालील उदाहरणावरुन चर्चेचा हा विषय अधिक स्पष्ट होईल.

शिष्याची संशय-रहित श्रद्धा.

आज्ञेस मान देऊन, इस्मायल नावाच्या आपल्या प्रियतम मुलाचें ईश्वराप्रीत्यर्थ बलिदान करण्यास उद्युक्त झालेल्या अब्राहमची कथा कुराणात आली आहे. श्रद्धायुक्त निश्चयाने अब्राहम आपल्या मुलास ठार मारण्यास तयार झाला; व त्याकरिता, त्याने आपला चाकू त्या मुलाच्या गळ्याशी धरला. इतक्यात, त्या मुलाच्या

अब्राहम.

व ज्या ठिकाणी, एकाच शिष्याला एकाहून अधिक सद्गुरु असतात, तेव्हा त्यांच्यांत त्या शिष्याच्या बाबतींतील आध्यात्मिक कार्याची विभागणी इतकी काळजीपूर्वक केली जाते, की त्यांच्यांत अधिकारक्षेत्रांबद्दल कोणताहि विरोध उत्पन्न होऊं शकत नाही.



विनोदवृत्ति, असीम तितिक्षा व पूर्ण व्यवहारकुशलता व्यक्त होतेंच. तसेंच, शिष्यांना मदत करण्याकरिता, ते अतिशय परिश्रम घेऊन, त्या परिस्थितीत जरुर असलेल्या नानाविध गोष्टी स्वीकारण्यांत लवचीकपणा दाखवितात.

या संबंधी कांही मुद्दे बहलूल नांवाच्या एका महान् गूढवाद्याच्या गोष्टीवरुन स्पष्ट होतात. कांही आंतरिक कारणाकरिता, बहलूलला इराणच्या कांही सरदार लोकांशी संबंध पाहिजे होता. ह्याकरिता एकच मार्ग खुला होता; व तो म्हणजे ज्या राजपुत्राच्या मेजवानीला हे सर्व सरदार जात असत, त्याच्याकडे जाणे. पण दुर्दैवाने बहलूलच्या डोक्याला टक्कल होते. आणि त्या दिवसांत, राजपुत्राने दिलेल्या मेजवानीला, केस नसलेल्या, म्हणजे टक्कल असलेल्या कोणासहि जाऊं दिलें जात नसे. राजपुत्राचे सर्व केस गेलेले होते. दुसऱ्या कोणास बिनकेसाचे पाहून, त्यास स्वतःच्या टक्कलाची आठवण होई; आणि त्यामुळे, त्याला मेजवानीचा आनंद लुटतां येत नसे. राजपुत्राची ही फार नाजुक बाब असल्यामुळे, टक्कल पडलेल्या कोणत्याहि मनुष्यास मेजवानीस मज्जाव असे; आणि म्हणून, टक्कल असलेल्या आणि अव्यवस्थित व मळके कपडे घालून गेलेल्या बहलूलला तेथून हाकलून देण्यांत आलें. परंतु मेजवानी तीन दिवस चालली होती. दुसरे दिवशीं बहलूलने चांगले कपडे व केसांचा टोप उसना आणला; व तो पुन्हा मेजवानीसाठी गेला.

बहलूलची गोष्ट.

मेजवानीमध्ये कोणीही बहलूलला ओळखलें नाही; आणि मेजवानीसाठी जन्मलेल्या पुष्कळशा थोर लोकांवर आपल्या उत्तम पोषाखाने त्याने वजन पाडलें. तो सर्वांना इतका प्रिय झाला की, प्रत्यक्ष राजपुत्रानेहि त्याचें अगत्यपूर्वक स्वागत करुन, स्वत: त्यास जवळ बसावयास बोलाविले. बहलूल तेथे जाऊन बसतांच, त्याने राजपुत्राकडे पाहून डोळे मिचकाविले. राजपुत्रास या डोळे मिचकाविण्याचा अर्थ कांहीतरी महत्त्वाचाच असला पाहिजे, व त्याला ताबडतोब प्रत्युत्तरहि दिलेंच पाहिजे, असें वाटून, त्यानेहि डोळे मिचकाविले. राजपुत्राच्या आसपास जी मंडळी बसली होती, त्यांनी हा प्रकार पाहिला; आणि त्यांनाहि त्यांचे अनुकरण करण्याचा मोह अनावर झाला. म्हणून, त्यांनीहि परस्परांकडे पाहून डोळे मिचकाविले. शेवटी सर्व समुदायांत हा प्रकार पसरुन, पांच मिनिटेंपर्यंत डोळे मिचकाविण्याखेरीज कोणासहि कांही दिसलें नाही. तेव्हा बहलूल म्हणाला, सद्गृहस्थांनो, थांबा. तुम्ही डोळे कां मिचकावितां? सरदारांनी उत्तर दिलें, 'आपण थोर लोकांनी डोळे मिचकाविले म्हणून आम्ही मिचकावित आहोंत. आम्ही केवळ आपलें अनुकरण करीत आहों.'' त्यावर बहलूलने आपला केसांचा टोप एकीकडे काढला. व तो म्हणाला, 'आम्हाला दोघांनाहि टक्कल आहे. आता आमचें अनुकरण करा.' ते सर्व सरदार लोक नंतर परत गेले; व तिसरे दिवशीं ते हजामती करुन आपले सर्व केस काढून आले. तेव्हा, बहलूल राजपुत्राकडे वळून म्हणाला, 'आपले टक्कल कायमचें आहे; परंतु यांना मात्र टक्कल ठेवण्याकरता, दररोज हजामत करावी लागेल.' अशा रीतीने, आपल्या विनोदवृत्तीने आणि युक्तीने, ज्यांना त्याला मदत करावयाची होती, त्यांच्याजवळ त्याने प्रवेश मिळवून घेतला.

*शिष्यांच्या दोषांचा परिहार.*

शिष्याशी संबंध आणून, त्याला अध्यात्मजीवनाकडे ओढून घेण्याकरिता, सद्गुरु अनंत परिश्रम करतो. शिष्याचे गुरुवरील प्रेम नष्ट झालें नाही, तरच त्याची प्रगती निश्चितपणे होते; व म्हणून, शिष्याच्या अंत:करणपूर्वक भक्तीच्या आड येणारे सर्व अडथळे तो अत्यंत काळजीपूर्वक रीतीने नाहीसे करतो. **एखाद्या वेळी, सद्गुरु शिष्याच्या व्यक्तिगत स्वभावाची स्तुति करीत असला, तर त्याच्या मुळाशी, शिष्याच्या व्यक्तिगत स्वभावाने गुरुशिष्य संबंधांत अडथळा आणूं नये, हाच उद्देश असतो.** कधी कधी, सद्गुरु शिष्यांच्या अहंभावास पुष्ट करीत असल्याप्रमाणे दिसेल. परंतु बलिदान करण्यापूर्वी प्राण्यांना खूप खाऊं पिऊं घालतात, तशांतलाच हा प्रकार आहे. शिष्याच्या अहंभावाचा हा दिखाऊ परिपोष, म्हणजे त्याच्या अज्ञानास दिलेली तात्पुरती सवलत असून, तो अखेरीस अहंभाव पूर्णपणे नष्ट करण्याची पूर्वतयारीच असतो. सद्गुरु हा चांगल्या वाईटाच्या पलीकडे असतो; व तो शिष्याच्या दोषांमुळे क्षुब्ध होत नाही. असीम तितिक्षेने व अनंत कालपर्यंत वाट पाहण्याचे सामर्थ्य अंगी ठेऊन, तो शिष्यांचे दोष सहिष्णुतापूर्वक चालूं देतो. एकदा शिष्याने पथप्रवेश केला, की त्या सर्व दोषांचा परिहार होण्यास कांहीच वेळ लागणार नाही, हे त्याला पक्के ठाऊक असतें.

*चित्तशुद्धीची रीत.*

परंतु, जेव्हा शिष्य मार्गांवर दृढतापूर्वक आल्याची सद्गुरुची खात्री पटते, तेव्हा तो शिष्याच्या मनांतील दोषपरिहारास सुरवात करतो. ज्याप्रमाणे शस्त्रवैद्य एकदा आपल्यावर विश्वस्त केलेल्या रोग्यावर, आपले शस्त्र चालवीत असतांना, रोग्याच्या विरोधाची मुळीच पर्वा करीत नाही, त्याचप्रमाणे **सद्गुरु शिष्याचे दोषपरिहार करीत असतांना, कठोर दिसण्याची पर्वा करीत नाही.** परंतु, तो जें कांही करतो, तें शिष्याच्या हिताकरिताच करीत असतो; व ह्याची जाणीव अखेरीस शिष्यालाहि झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून, शिष्यास दोषपरिहार क्वचित् दुःखद किंवा कंटाळवाणा वाटला, तरी त्यामुळे तो सद्गुरुपासून दूर न जातां, त्याच्या अधिक जवळच येतो.

*प्रशंसेच्या द्वारा मदत.*

परंतु **साधारणत: सद्गुरुची रीत प्रभावशाली असते, त्याचप्रमाणे ती प्रिय व मनोरमही असते.** शिष्य जेव्हा अध्यात्मजीवनांत विशेष प्रगती दाखवितो, तेव्हा सद्गुरुला संतोष होतो. योग्य बाबतींत **शिष्याची प्रशंसा करीत असतांना, सद्गुरु कांही दैवी गुणांना – (जे गुण शिष्य आत्मसात् करण्याचा प्रयत्न करीत असतो) – शिष्यामध्यें अधिक पक्के करतो; व त्याचप्रमाणे, तो त्यावेळीं शिष्यामध्यें कोणत्याहि परिस्थितीस तोंड देऊं शकणारा आत्मविश्वास जागृत करतो.** उदात्त भावनेचा उद्रेक आत्मदानाचा भाव, वीरोचित त्याग, किंवा असाधारण तितिक्षा, प्रेम किंवा श्रद्धा दर्शविणारी एखादी घटना– ह्यांपैकी कांहीहि सद्गुरुला संतोष देऊन, त्याची प्रशंसा मिळविण्यास कारणीभूत होते. शिष्याने संपादन केलेल्या दैवी संपत्तीची प्रगट



व स्पष्ट प्रशंसा करुनच सद्गुरु साधारणत: त्याच्या सद्गुणांना प्रोत्साहन देतो. शिष्यहि सद्गुरूच्या पसंतीचे खरें महत्त्व जाणूं लागतो; व सद्गुरुची मान्यता मिळविण्यामध्ये त्याला इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षा अधिक आनंद वाटतो. केवळ सद्गुरुला आनंद होईल, ह्या जाणिवेनेच तो महान् मोहावर विजय मिळविण्यास, किंवा एरव्ही अशक्यप्राय वाटणाऱ्या अग्निदिव्यांतून पार पडण्यास सिद्ध होतो.

*सर्व प्रश्नांची सोडवणूक.*

सद्गुरु हा साधकाकरिता सर्वांतर्यामी परमात्म्याचे प्रतीक असतो. म्हणून, गुरुप्रत स्वत:स यथोचित रीतीने व्यवस्थित करण्या (adjustment) च्या प्रश्नांत, स्वत:च्या अंतरात्म्याची अनुभूति (realisation) मिळविणें, व इतर अनेक रुपातुन अभिव्यक्त होत असणाऱ्या परमातम्याप्रत स्वत:स व्यवस्थित करणें–ह्या दोन्ही प्रश्नांचा अंतर्भाव होतो. हे सर्व प्रश्न वास्तविक मूळांत एकच आहेत, याची जाणीव साधक आपल्या गुरुनिष्ठेच्या द्वारां व्यक्त करीत असतो. **या सर्व प्रश्नांना अलग व स्वतंत्र न मानतां, ते सर्व एकाच प्रश्नांची निरनिराळीं अंगे असल्याचें तो जाणतो; व म्हणून, परस्परविरुद्ध हक्कामध्ये एखादी तात्पुरती जुळवाजुळव करण्याहून भिन्न असलेला, असा खरा समन्वय (integration) साधण्याकरिता, तो मानसिक डावपेचां (psychological strategy) च्या दृष्टीने समर्थ होतो.** हे अतिशय कठिण कार्य साधण्यांत, शिष्याला मदत व्हावी, म्हणून सद्गुरुला शिष्याच्या **सर्व आध्यात्मिक ध्येयवादाचे आश्रयकेंद्र** बनावें लागतें; कारण, साधक व त्याचें ध्येय, यांमधील अनेक प्रतिबंध तोडण्यासाठी, साधकाच्या मानसिक शक्तीचें अवधानपूर्वक व पूर्ण केंद्रीकरण होण्याची आवश्यकता असते.

*सद्गुरुचा सर्वश्रेष्ठ अधिकार.*

आपल्या स्वत:च्या सद्गुरुहून अन्य सद्गुरुंकरिता शिष्याला स्वाभाविकपणेच आदर वाटतो. परंतु, त्यामुळे स्वत:च्या सद्गुरुचा सर्वश्रेष्ठ अधिकार कमी होत नाही, किंवा कच्चा होत नाही. सर्व सद्गुरु आपल्या जाणिवेंत एकच असतात; व त्यांच्यांत श्रेष्ठकनिष्ठ भेद करणें, ही केवळ मूर्खता आहे. परंतु या दृष्टीने, एक सद्गुरु दुसऱ्या सद्गुरुहून मोठा नसला, तरी द्वैतसृष्टीचें संपूर्ण उल्लंघन होऊन, अखिल जीवनाच्या एकतेचा अनुभव येईपर्यंत, शिष्याने स्वत:च्या हिताकरितां, स्वत:च्या सद्गुरुचा अधिकार व हक्क (claim) इतर सद्गुरुंच्या अधिकार व हक्कापेक्षा अधिक श्रेष्ठ मानला पाहिजे. जीवनांतील अनेक परस्परविरोधी हक्कांमध्ये (claims) एक सर्वश्रेष्ठ हक्क निघाला नाही, तर मानसिक शक्तीचा, इतस्तत: अपव्यय व ऱ्हास होईल. म्हणून, शिष्याच्या इतस्तत: व्ययीभूत होणाऱ्या मानसिक शक्तीचें सद्गुरुवर पूर्णपणें केंद्रीकरण होणें, साधारणत: अपरिहार्यच असते. अगदी क्वचित्, व कांही विशिष्ट परिस्थितीमध्ये, एखाद्या शिष्याच्या बाबतींतील आध्यात्मिक कार्य सद्गुरुच आपसांत वाटून घेण्याचें ठरवितात. म्हणून, कांही अपवादात्मक शिष्यांना दोन किंवा दोन पेक्षा अधिक सद्गुरुंशी संबंध ठेवावा लागतो. पण हा नियम नसून, अपवाद आहे;

प्रयोगांतून उद्भवलेल्या कोणत्याहि प्रश्नांचे स्पष्टीकरण पूर्ण होणे शक्य नाही. तथापि, स्पष्टीकरणाकरिता, या शद्वांनी सूचित होत असलेल्या सर्वच भिन्न परिस्थितींची पूर्ण संख्या लक्ष्यांत घेण्याचें कारण नाही; तर विविध परिस्थितींची कांही प्रातिनिधिक (representative) उदाहरणे घेतली म्हणजे पुरे. 'हिंसा आणि 'अहिंसा' या शद्वांभोवतीचीं जीं मूल्यें आहेत, त्यावर पुढे दिलेल्या प्रातिनिधिक उदाहरणांनी चांगला प्रकाश पडेल.

बुडणाऱ्या माणसाचे उदाहरण.

**उदाहरण १ लें : –** कल्पना करा, कीं ज्या माणसाला पोहतां येत नाही, असा एक मनुष्य एखाद्या तलावांत पडला आहे, व जवळच त्याला वांचविण्याची इच्छा असलेला व पोहतां येऊ शकणारा एक दुसरा मनुष्य आहे. बुडणाऱ्या मनुष्याची प्रवृत्ति बहुधा त्याला वांचविण्याकरता येणाऱ्या माणसाला घट्ट पकडण्याची असते. कधी कधी, त्याची पकड इतकी विचित्र असते की, त्याला वांचविणे अशक्य होतें, एवढेच नव्हे, तर त्याच्या मदतीला म्हणून जो येतो, तो वांचविणाराहि त्या पकडीमुळे बुडण्याचा संभव असतो. म्हणून, ज्याला बुडत्याला वांचवावयाचे आहे, त्याने बुडणाऱ्याच्या डोक्यावर मारुन, त्याला प्रथम बेशुद्ध करावयाचे असतें, आणि नंतर त्याच्या सुटकेचे इतर प्रयत्न सुरुं करावयाचे असतात. अशा परिस्थितीत बुडणाऱ्याचे डोक्यावर मारणें, ही हिंसाहि नव्हे, अगर अहिंसाहि नव्हे.

शस्त्रक्रियेचे उदाहरण.

**उदाहरण २ रें :–** समजा, एक मनुष्य संसर्गजन्य रोगाने आजारी आहे, आणि तो केवळ शस्त्रक्रियेनेच बरा होऊं शकेल. अशा स्थितीत, त्याला बरा करण्याकरता, त्याचप्रमाणे त्या रोगापासून इतरांना वांचविण्याकरता, डॉक्टरला त्या मनुष्याच्या शरीराचे रोगदूषित भाग आपल्या शस्त्राने कापून काढावे लागतील. परंतु, त्याच्या या कापण्याच्या क्रियेला 'हिंसा' अगर 'अहिंसा', यापैकी कोणत्याहि सदरांत घालतां येणार नाही.

आक्रमक राष्ट्रांचे उदाहरण.

**उदाहरण ३ रें :–** समजा, एका आक्रमक धोरणाच्या राष्ट्राने स्वार्थासाठी एका दुबळ्या राष्ट्रावर स्वारी केली, आणि केवळ त्या दुर्बल राष्ट्राचे रक्षण करण्याच्या उदात्त हेतूनेच प्रेरित होऊन, दुसरें एक राष्ट्र त्या चढाऊ राष्ट्राचा सशस्त्र प्रतिकार करीत आहे. दुर्बल राष्ट्रांच्या रक्षणार्थं, असें लढणें हिंसाहि होणार नाही, किंवा अहिंसाहि होणार नाही. तर, ती अहिंसात्मक हिंसा (nonviolent violence) होईल.

पिसाळलेल्या कुत्र्याचे उदाहरण.

**उदाहरण ४ थे :–** समजा, एक पिसाळलेला कुत्रा बेफाम होऊन, सैरावरा धावत आहे, आणि शाळेतील विद्यार्थ्यांना तो चावण्याचा धोका आहे. अशा वेळी, मुलांच्या रक्षणासाठी, त्या शाळेतील शिक्षकांनी त्याला ठार मारलें, तर त्यामध्ये हिंसा होईल; परंतु, त्या हिंसेंत द्वेष नाही.



# ११ : क्रियाशीलता आणि निष्क्रियता

क्रमाने संचित अज्ञानाची वृद्धि होते.

ईश्वरानुभूतिकरता केल्या जाणाऱ्या बुद्धियुक्त कर्माव्यतिरिक्त इतर कोणतेंहि कर्म जाणीवेस बंधन उत्पन्न करते. ते केवळ संचित अज्ञानाची अभिव्यक्ति आहे, एवढेंच नव्हे, तर तें त्या संचित अज्ञानाची अधिक वृद्धि करते.

विधीसमारंभ हे आध्यात्मिक मार्गाची आडवाट बनतात.

धार्मिक विधि आणि समारंभ, त्याचप्रमाणे निरनिराळ्या संप्रदायांचे आदेश, बाह्य आचार आणि संघटित आध्यात्मिक संस्था इत्यादींची प्रवृत्ति साधारणत: प्रीति आणि पूजा या भावनांना पोषकच असते. आणि म्हणून, कांही एका सीमेपर्यंत, त्यांचा मानवी जाणीवेवरील अहंकारकवचा (ego-shell) चा ऱ्हास करण्यास उपयोग होतो. परंतु, विधिसमारंभांचे जर यांत्रिक आणि अंधानुसरण केलें, तर प्रीति आणि पूजा यांची आंतरिक भावना सुकून जाते; आणि असें झालें, म्हणजे **त्यांच्यामुळे अहंकारकवचाचा ऱ्हास होण्याऐवजी ते दृढ होण्यास मदत होते.** म्हणून, धार्मिक विविध आणि समारंभ हे मनुष्याला अध्यात्ममार्गावर फार दूरवर नेऊं शकत नाहीत. त्यांचे जर अंधानुसरण केलें, तर दुसऱ्या कोणत्याहि विवेकशुन्य क्रियाशीलतेने जसें बंधन उत्पन्न होते, तसेंच या अंधानुसरणानेहि होऊं शकतें. या धार्मिक विधिसमारंभांतील आंतरिक जीवन आणि अर्थ निघून जातो, तेव्हा तर ते इतर दुसऱ्या विवेकशून्य क्रियांहूनहि अधिक भयंकर बनतात. कारण, विविधसमारंभ ईश्वरानुभूती मिळविण्यास उपयोगी आहेत, अशा समजुतीनेच मनुष्य ते करीत असतो; परंतु खरें पाहतां, ते या कार्याकरता किंचित्‌हि उपयोगी नसतात. या आत्मवंचनेमुळे निर्जीव धार्मिक विधि आणि समारंभ ही अध्यात्ममार्गावरची आडवाट बनते; आणि कित्येक वेळा, केवळ संवयींच्या शक्तीनेच, या बाह्य आचारांच्या ठिकाणी, मनुष्य इतका आसक्त होऊन जातो, की तीव्र दु:खानुभूतिखेरीज, त्यांच्या भासमान सारपूर्णतेचा आणि मूल्यांचा त्याचा भ्रम नाहीसा होऊं शकत नाही.

विवेकशून्य क्रियाशीलतेपेक्षा निष्क्रियता अनेक प्रकारांनी बरी; कारण, निष्क्रियतेंत अधिक संस्कार न वाढविण्याचा आणि गुंतागुंत न करण्याचा गुण तरी असतो. सदाचारसंपन्न

स्वयंरचित बंधनाच्या गुंतागुंतीतून जीवन स्वत:स मुक्त करण्याचा प्रयत्न करते.

आणि उदार क्रियादेखील संस्कार उत्पन्न करते, आणि गतानुभव आणि गतक्रिया, यामुळे उत्पन्न होत असलेल्या जटिलते (complications) मध्ये, ती भर टाकते. **सर्व जीवन म्हणजे स्वयंरचित बंधनापासून मुक्त होण्याचा प्रयत्न आहे. अज्ञानामुळें जें निर्माण झालें आहे, त्याचा निरास करण्याची, पूर्व संचिताचा भार फेकून देण्याची, व तात्कालिक आणि अस्थायी, अशा अनेक नफानुकसानांच्या ढिगाऱ्या खालून, स्वत:स विमुक्त करण्याची – अखिल जीवन ही तीव्र धडपड आहे. जीवन पूर्वप्राप्त सीमाकारक संस्कारांना नाहीसे करण्याचा, व स्वयंरचित चक्रव्यूहांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करतें. भावी क्रियाशीलता शाश्वत सत्यामधूनच प्रत्यक्षपणे उत्स्फूर्त व्हावी, व तिच्यावर सीमारहित्व, निर्मलता आणि आंतरिक सत्‌संपन्नता यांचा शिक्का असावा, हें जीवनाचें उद्दिष्ट असतें.**

परमेश्वरप्राप्तीत मदत करणारी क्रियाशीलता खरोखर विवेकयुक्त (intelligent) आणि अध्यात्मदृष्ट्या फलदायक असते; कारण, त्या क्रियाशीलतेमुळे बंधनापासून मुक्ति मिळते.

निष्क्रियता ही विवेकरहित क्रियाशीलता आणि विवेकपूर्ण क्रियाशीलता, यांमधील आवश्यक स्थिति आहे.

केवळ प्रत्यक्ष ईश्वरानुभूतिनंतर स्वयंस्फूर्त होणाऱ्या क्रियाशीलतेशी तुलना केली, तरच ती दुय्यम दर्जाची ठरेल. इतर सर्व प्रकारच्या क्रिया – मग त्या जगदृष्टीने कितीहि चांगल्या अगर वाईट असोत, कितीहि प्रभावी किंवा प्रभावशून्य असोत – बंधनासच कारणीभूत होतात; आणि म्हणूनच त्या निष्क्रियतेहून कनिष्ठ दर्जाच्याच ठरतात. **निष्क्रियता ही विवेकपूर्ण क्रियाशीलतेपेक्षा बरी; कारण, तिच्यामुळे नवीन बंधने तरी निर्माण होत नाहीत. विवेकरहित** (unintelligent) **क्रियाशीलतेंतून विवेकयुक्त क्रियाशीलतेप्रत** (म्हणजे बंधनकारक कर्में सोडून, मुक्तिदायक कर्माकडे) प्रगति करतांना, मध्ये एक प्रकारची निष्क्रियतेची अवस्था असतेच. **शंका व संशय उत्पन्न झाल्यामुळे, विवेकरहित क्रियाशीलता स्थगित झाली आहे, परंतु, पुरेशा प्रेरणेच्या अभावी, विवेकसम्मत क्रियाशीलता मात्र सुरु झालेली नाही, अशी ही निष्क्रियतेची स्थिति असते. परंतु, आळस आणि जीवनाचे भय, यांपासून उत्पन्न होणारी सामान्य निष्क्रियता व आध्यात्मिक मार्गावरील प्रगतीमध्ये आवश्यक असलेली विशिष्ट स्वरुपाची निष्क्रियता, या दोहोंतील फरक लक्षात ठेवला पाहिजे.**



# १२ : हिंसा आणि अहिंसा

घोषणांच्या शब्दां (slogans) बद्दल आसक्ति वाटणें, ही मनुष्याची प्रवृत्तीच आहे; एवढेंच नव्हे, तर ज्या शब्दांबद्दल त्याला अशी आसक्ति वाटते, त्या शब्दांनी तो आपल्या

शब्दांबद्दल आसक्ति.

क्रिया एखाद्या यंत्रासारख्या नियंत्रित करुन घेतो. जीवनात शब्दांनाहि स्वत:चें स्थान आहेच. परंतु क्रिया जर सुबुद्ध, व विवेकपूर्ण व्हावयास हवी असेल, तर त्या शब्दांनी सूचित होत असलेल्या अभिप्रायाचे पृथक्करण करुन, त्याचा अर्थ निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. अशा तऱ्हेचें ज्यांचे अभ्यासपूर्वक परीक्षण व्हावयास पाहिजे, अशा शब्दांमध्ये, 'हिंसा' (violence) आणि 'अहिंसा' (nonviolence) या शब्दांइतक्या महत्त्वाचे दुसरे शब्द क्वचितच असतील. विचारधारे (ideology) च्या दृष्टीने, या शब्दांचे अतिशय महत्त्व आहे. त्यांचा क्रियांवर परिणाम होतो.

आध्यात्मिक जीवन ही अनुभवाची गोष्ट आहे. अत्यंत उच्च मूल्यांसाठी केलेल्या नियमांचे देखील, केवळ यांत्रिक अनुसरण करणें, हे आध्यात्मिक जीवनाचे लक्षण नव्हे;

आध्यात्मिक ज्ञान हे शब्द सूत्रांच्या पलीकडे आहे.

तर **अध्यात्मजीवनामध्ये, शब्दसूत्रांच्या पलीकडे असणारें ज्ञान अध्याहृत आहे.** सर्व शब्द किंवा सूत्रे यांची सत्याला सीमित करण्याची प्रवृत्ति असते. म्हणून, या सूत्रांतील गूढ भावार्थ ओळखण्याचा प्रयत्न ज्यांना करावयाचा आहे, त्यांना त्या सूत्रांतील चिकित्सात्मक पृथक्करण (analysis) करावें लागतें; आणि या पृथक्करणाचा जीवनांतील प्रत्यक्ष उदाहरणांशी सतत संबंध ठेवून, त्याला त्यांची पुष्टि द्यावी लागते. 'हिंसा आणि अहिंसा', या परस्पर, विरोधी कल्पनांच्या साह्याने, जी जीवनाची मार्गदर्शक तत्त्वें बनविलीं जातात, त्यासंबंधी तर हे विशेषत: खरें आहे.

प्रातिनिधिक परिस्थिती- पासून प्रारंभ.

व्यवहारांतील जीवनांत 'हिंसा आणि अहिंसा,' हे इतक्या विविध प्रकारांच्या परिस्थितींना उद्देशून वापरले जातात, कीं या परिस्थितींची दखल घेऊन, तो पुढील स्पष्टीकरणाचा आरंभबिंदू केल्याखेरीज, ह्या शब्दांच्या

**(चारित्र्य आणि मन यांच्या असीम दुर्बलतेवर अधिष्ठित)**

या श्रेणीमध्ये, जे आक्रमणाचा प्रतिकाररहित स्वीकार दुसऱ्या कोणत्याहि कारणास्तव करीत नसून, केवळ भीतिमुळेच करतात, असे लोक येतात.

# हिंसेचे प्रकार

## अहिंसात्मक हिंसा

(Non-violent Violence)

**(अपरिमित प्रेमावर अधिष्ठित)**

---

आत्मरक्षण अगर स्वार्थहेतु यांचा कांहीहि संबंध नसतांना, केवळ दुर्बलांच्या रक्षणासाठी केलेली हिंसा.

## नि:स्वार्थ हिंसा

(Self-less Violence)

**(परिमित मानवी प्रेमावर अधिष्ठित)**

केवळ विश्वासघाताने आक्रमण झालें असतां, इतर कोणत्याहि हेतूने नाही, तर केवळ आत्मरक्षणार्थ जी हिंसा होते ती. उदाहरणार्थ, जेव्हा एखाद्या विषयांधाकडून, एखाद्याच्या मातेचा अवमान होण्याच्या बेतांत असतो, आणि तो आपल्या मातेचें रक्षण ~~करतो. त्याचप्रमाणे, मातृभूमीची इभ्रत (honour) इरेस पडली आहे, अगर तिच्यावर~~ शत्रूंचे आक्रमण झालें आहे, अशा वेळचा तिचें संरक्षण करण्याचा नि:स्वार्थी राष्ट्रीय प्रयत्न, ही नि:स्वार्थ हिंसा होय.

## स्वार्थी हिंसा

(Selfish Violence)

**(व्देष आणि वासना यावर अधिष्ठित)**

सत्ता आणि स्वार्थाची प्राप्ती, या स्वार्थी हेतूंनी जेव्हा एखाद्या व्यक्तीकडून अगर राष्ट्राकडून हिंसा होते, तेव्हा ती या श्रेणींत येते.



**उदाहरण ५ वें :–** समजा, एका आरोग्यसंपन्न आणि सुदृढ मनुष्याचा कोणी एका उर्मट माणसाने त्याच्या अंगावर थुंकून अपमान केला, व तो बलशाली मनुष्य त्या उर्मट मनुष्याला चिरडून टाकण्याची शक्ति असूनहि, त्याला कांही शिक्षा न करतां, उलट शांतपणाने प्रीतीचें तत्त्वज्ञान शिकवितो. या क्रियेंत अहिंसा आहे. परंतु ती बलवंतांची अहिंसा (non-violence of the strong) आहे.

बलवंतांची अहिंसा.

उपरनिर्दिष्ट पहिल्या तीनहि उदाहरणांत (१) त्या त्या उदाहरणांतील परिस्थितींच्या विविध बारिकसारिक गोष्टींचा, व तसेंच, (२) क्रियेस प्रवृत्त करणाऱ्या हेतूंचा सूक्ष्म विचार केल्याखेरीज, त्या त्या क्रियेंत हिंसा आहे, की अहिंसा आहे हें सांगतां येणार नाही. उदाहरणांतील शेवटल्या दोन परिस्थितींत, ती क्रिया हिंसा आहे, की अहिंसा आहे, हे सांगणें शक्य असलें, तरी **त्यांमध्ये असे कांही घटक आहेत, की त्यांमुळे या शब्दांचा सामान्यत: जो अर्थ असतो, त्याहून कांही निराळ्याच अर्थाने ते वापरावे लागतात.**

सूक्ष्म विचाराची आवश्यकता.

पहिल्या उदाहरणांतील बुडत्या मनुष्यास कराव्या लागणाऱ्या आघाताच्या परिस्थितीचे सूक्ष्म पृथक्करण केले, तर असें दिसून येईल, की ज्यावर तो आघात केला जातो, त्याची पूर्वी परवानगी घेतलेली नसते. या परिस्थितींत, ज्या मनुष्याला टोला मारला जातो, त्याची प्रथम अनुमति घेतलेली नसते. परंतु, ही टोला देण्याची क्रिया बुडत्या मनुष्याच्या कल्याणासाठीच योजली जाते. त्याला इजा करावी, म्हणून कांही ती योजली जात नाही. तेव्हा या अर्थाने, ही क्रिया अहिंसात्मक आहे, असे म्हणतां येईल. या विशिष्ट दृष्टीने पाहतां, या क्रियेंत हिंसा आणि अहिंसा ही अनुक्रमें दोन्हीहि आहेत. परंतु, **सामान्य** अर्थाने, तिला हिंसाहि म्हणतां येणार नाही, किंवा अहिंसाहि म्हणतां येणार नाही.

संसर्गजन्य रोगावरील शस्त्रक्रियेचें उदाहरण (उदा. नं. २) बुडत्या मनुष्याच्या उदाहरणातुन थोडे निराळे आहे. या ठिकाणी देखील, बला चा उपयोग आहेच (इतका की येथे जोराने शरीराचा भाग कापला जातो); आणि ज्या व्यक्तिविरुद्ध तो बलाचा उपयोग केला जातो, त्याच्या कल्याणासाठीच तो असतो. परंतु, सामान्यत:, शस्त्रक्रियेपूर्वी रोगी आपली अनुमति बहुधा देत असतो. याशिवाय, या शस्त्रक्रियेंत, रोगापासून होणाऱ्या पुढील आपत्तीपासून रोग्याला वांचविणे, एवढाच एक हेतू नसून, त्या रोगाच्या संसर्गापासून **इतरांना** वांचविणे, हाहि एक हेतू असतो. तेव्हा रोग्याचें, व त्याचप्रमाणे त्याच्या सान्निध्यांत जे जे येतील, त्या सर्वांचें निर्भेळ कल्याण करण्याच्या हेतूने, हा बलाचा उपयोग प्रेरित झालेला असतो. या क्रियेंत इजा करण्याचा हेतू नसल्याने, सर्वसामान्य अर्थाने तिला हिंसा म्हणतां येणार नाही; परंतु, या क्रियेंत जिवंत शरीराचे भाग कापले जात असल्याने, तिला अहिंसा म्हणणेंहि योग्य होणार नाही.

आक्रमक देशाचे उदाहरण (उदा. नं. ३) तर याहूनहि मनोरंजक आणि उद्बोधक

आहे. या ठिकाणीं, लढाई ही कोणत्याहि स्वार्थी हेतूकरता नसते; किंबहुना ती केवळ दुर्बल राष्ट्राचे रक्षण करण्याकरताच असते. परंतु, त्यामुळे चढाऊ राष्ट्राची पुष्कळ हानी आणि संहार होण्याचा संभव असतो. आणि हा बलाचा उपयोग चढाऊ राष्ट्राविरुध्द असून, त्याच्या पूर्वीच्या अनुमतीशिवाय केलेला असतो, एवढेंच नव्हे, तर **त्या राष्ट्राच्या जाणीवयुक्त आणि बुद्धिपुरस्पर इच्छेच्याहि विरुद्ध** असतो. परंतु, याहि परिस्थितीला, आपणांस केवळ हिंसेचे निर्भेळ उदाहरण म्हणतां येणार नाही, कारण त्यांत हानी आणि हिंसा असली, तरी बलाचा उपयोग आक्रमक राष्ट्राचा बळी पडलेल्या दुर्बल राष्ट्राच्या कल्याणासाठी तर असतोच, परंतु त्या आक्रमक राष्ट्राच्याहि कल्याणासाठीच असतो. कारण, चढाऊ धोरणाचा प्रतिकार केल्यामुळे, दुबळ्या राष्ट्रांच्या दुर्बलतेचा अवास्तव फायदा घेऊन, त्यांच्यावर स्वारी करण्याची चढाऊ राष्ट्राची आध्यात्मिक दुर्बलता दर्शविणारी प्रवृत्ति ह्यामुळे हळूहळू कमी होत जाते. याकरिता, ही हिंसात्मक क्रिया नव्हे, तर अहिंसात्मक हिंसा (nonviolent violence) आहे.

**एक तुलना.**

आक्रमक राष्ट्राशी लढाई करण्याचे उदाहरण (उदा. नं. ३) आणि दूषित भागावरील शस्त्रक्रियेचें उदाहरण (उदा. नं. २) यात पुष्कळसे साम्य आहे. चढाऊ राष्ट्राशी सामना करण्याच्या उदाहरणांत, दुर्बल राष्ट्रांचे हित हा प्रमुख उद्दिष्ट परिणाम आहे, आणि ज्याच्या विरुद्ध बलाचा उपयोग होतो, त्या चढाऊ राष्ट्राचे हित हें दुय्यम उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे, शस्त्रक्रियेच्या उदाहरणांत, ज्याच्या विरुद्ध बलाचा उपयोग होतो, त्या रोग्याचें हित हें मुख्य उद्दिष्ट असून, इतरांचे हित हें दुय्यम आहे. परंतु हा भेद क्षुल्लक आहे. या दोन्ही उदाहरणांची तुलना आणि पृथक्करण केलें, तर बलाच्या उपयोगास बळी पडणारांचे व त्याचप्रमाणे इतरांचे हित साधण्यांत ती दोन्ही सारखींच परिणामकारक आहेत, असें आढळून येईल.

**दुर्बलांचे रक्षण हा निःस्वार्थ सेवेचा प्रकार आहे.**

दुर्बलांचे रक्षण हा एक निस्वार्थ सेवेचा महत्त्वाचा प्रकार आहे; तो एक कर्मयोगाचा भाग आहे. आणि यांसाठी केलेला शक्तीचा उपयोग, केवळ उद्दिष्ट हेतू साधण्याकरता, अपरिहार्य साधन म्हणून करणें, पूर्णपणे न्याय्य आहे. परंतु, अशा तऱ्हेच्या लढाईला निर्भेळ आध्यात्मिक महत्त्व येण्याकरता, ती केवळ दुर्बलांच्या रक्षणाकरतांच, आणि पूर्ण निःस्वार्थीपणानें आणि द्वेषरहित होऊन, लढली गेली पाहिजे. एखाद्या स्त्रीवर एखाद्या मनुष्याने दुष्ट हेतूने हल्ला केला असतां, त्यापासून तिला वांचवून, तिचा जीव आणि अब्रू रक्षण करणें, आणि त्या मनुष्यास शिक्षा करुन, त्याच्या मनांत पश्चात्ताप उत्पन्न करणें, - या परिस्थितीसारखीच उपरनिर्दिष्ट लढाईची परिस्थिति आहे.

**पिसाळलेला कुत्रा आणि बलवंतांची अहिंसा यांच्या उदाहरणांचे समालोचन.**

पिसाळलेल्या कुत्र्याच्या नाशाच्या उदाहरणांत (उदा.



नं. ४) हिंसा खासच आहे. परंतु, त्या कुत्र्याकडून ज्यांना इजा झाली असती, त्या मुलांच्या अधिक महत्त्वाच्या कल्याणासाठी ती केल्यामुळे, आणि त्यांत द्वेष नसल्यामुळे, ती न्याय्य आहे. सूड घेण्याऐवजी, केवळ प्रीतीचें तत्त्वज्ञान शिकविणाऱ्या बलवान मनुष्याच्या उदाहरणांत, अहिंसा आहे (उदा. नं. ५); परंतु ती निष्क्रियता नव्हे. तो दुबळेपणाहि नव्हे, किंवा निष्क्रियताहि नव्हे; तर त्यांत बळ असून, खरी विधायक आणि निष्काम स्वरुपाची क्रियाहि आहे. ही बलवंतांची अहिंसा होय.

# अहिंसेचे प्रकार

(Non-violence Pure and Simple)

## शुद्ध व अमिश्रित अहिंसा

**(दिव्य प्रेमावर अधिष्ठित)**

या अवस्थेंत, मनुष्य सर्वांकडे आत्मवत् पहात असून, शत्रुमित्रतेच्या पलीकडे जातो; आणि कोणत्याहि प्रकारचा हिंसात्मक विचार त्याच्या मनांत प्रविष्ट होत नाही.

## वीराची अहिंसा

(Non-violence of the Brave)

**(सीमारहित शुद्ध प्रेमावर अधिष्ठित)**

प्रत्यक्ष ज्ञानामुळे सर्व लोग आत्मवत् वाटू लागले नाहीत, तरी कोणासहि जे ~~आपले शत्रू समजत नाहीत, आणि आक्रमणकारी मनुष्यास देखील, जे प्रेमाने जिंकण्याचा~~ प्रयत्न करतात, आणि स्वतःवर हल्ला झाला असतांना सुद्धा, भीतीने नव्हे, तर प्रीतीने प्राणार्पण करतात, त्यांना ही अहिंसा लागू आहे.

## भित्र्यांची अहिंसा

(Non-violence of the Coward)

# १३ : आध्यात्मिक उन्नतीची गतिप्रक्रिया

संसारासक्त मनुष्याच्या दृष्टिकोनामध्ये आमूलाग्र परिवर्तन झालें, म्हणजे आध्यात्मिक उन्नतीस सुरवात होते. संसारासक्त मनुष्य बव्हंशी शरीराकरिताच जगत असतो. त्याच्या कांही व्यवसायांचा देहाशीं सरळ संबंध दिसला नाही, तरी अंतिम पृथ:करणात्मक निरीक्षणामध्ये, असें आढळून येतें, की अखेरीस त्याचीहि प्रेरणा देहविषयक वासनांशींच संबद्ध आहे. उदाहरणार्थ, तो खाण्याकरिता जगतो, जगण्याकरिता खात नाही. देहाहून स्पष्टपणे उच्चतर असलेले एखादें उद्दिष्ट त्याला सापडलेले नसतें. तेव्हा, सहजच त्याची सर्व धडपड देह व तद्विषयक सुखसोयी यांच्या भोवती केन्द्रित होते. परंतु, त्याला जेव्हा आत्म्यास प्राधान्य देणारी सारभूत महत्ता आढळते, तेव्हा देहं एकदम गौण होतो; व श्रेष्ठतर ध्येयाच्या प्राप्तीकरिता देह हा केवळ साधक बनतो. **जो देह आतापर्यंत अध्यात्मजीवनामध्ये अडथळा होता, त्याच देहावर श्रेष्ठतर जीवनाच्या विमोचनाकरिता ताबा मिळवण्यांत येतो.** दृष्टिकोनामध्ये हा बदल घडून आला, म्हणजे देहाचा आत्मविरोधी व्यापार क्षीण होत जाऊन, अखेरीस तो आत्म्याचें केवळ सहायक साधन बनतो. यानंतर, मनुष्य देहाच्या गरजांकडे लक्ष देत राहिला, तर असें करतांना, तो देहाशीं तादात्म्य पावत नाही. आगगाडीचा सारथी केवळ एंजीन चालून रहावें, याच हेतूने त्यांत कोळसा व पाणी टाकतो, तद्वतच तो मनुष्य देहयात्रा चालण्याकरिता, देहाच्या गरजांकडे लक्ष देतो.

श्रेष्ठतर जीवनाकरिता देहास स्वाधीन ठेवणे.

ज्याकरिता मनुष्याचें जीवन आहे, त्या ध्येयाचा तीव्र शोध चालू असल्याशिवाय, आध्यात्मिक उन्नतीला सुरवातहि होऊं शकत नाही. **मनुष्याच्या प्रेमाच्या व द्वेषाच्या व निरनिराळ्या सुखदु:खांच्या अनुभवांच्या मागे, न कळत, हा ध्येयाचा शोधच असतो.** परंतु, मनुष्य या दिव्य भवितव्यतेच्या अगम्य व अनिवार्य ओढीने आंदोलित झाला, तरी सत्यानुभूतीरुपी गिरिशिखरावर आरोहण

ध्येयाचा शोध.



शुद्ध आणि अमिश्रित अहिंसा म्हणजेच अनंत प्रेम. हेंच जीवनाचें ध्येय आहे. शुद्ध आणि अनंत प्रेमाच्या या स्थितीला पोचल्यावर, साधक परमात्म्याशीं युक्त होतो. या ध्येयाप्रत पोचण्यासाठी, तीव्र उत्कंठेची आवश्यकता आहे; आणि ज्या साधकास या उच्चतम स्थितीस पोचण्याची आकांक्षा असते, त्याला 'वीराची अहिंसा' आचरणांत आणण्यापासूनच प्रारंभ करावा लागतो. प्रत्यक्ष ज्ञानाने सर्वांशी एकरुप जे झालेले नाहीत, व सर्वाठायीं आत्मभाव ज्यांना दिसूं लागलेला नाही, परंतु जे कोणासहि शत्रूवत् लेखीत नाहीत, आणि आक्रमण करणाऱ्यास देखील प्रीतीनेच वश करण्याचा प्रयत्न करतात, व आक्रमण झाले असतांना, (भीतीने नव्हे, तर प्रीतीने) प्राणत्यागासहि तयार होतात, अशांना हें लागू आहे.

वर दर्शविल्याप्रमाणे 'वीराची अहिंसा', ही उच्चतम स्थितीच्या प्राप्तीची आकांक्षा असणाऱ्यांना आचरणीय आहे. सर्वसाधारण जनतेंत, ही आकांक्षा आढळत नाही. म्हणून, सर्वसाधारण जनतेस जर 'शुद्ध अहिंसे' साठी तयार करावयाचे असेल, तर त्यांची प्रथम 'वीराच्या अहिंसे' साठी तयारी करावी लागेल. हें ध्येय व्यवहारांत साध्य होण्यासाठी, त्यांच्याकडून 'अहिंसात्मक हिंसे, चे म्हणजे कोणताहि स्वार्थपर हेतू न धरतां, केवळ दुर्बलांच्या रक्षणार्थ, हिंसेचे आचरण होणे, आवश्यक आहे. प्रत्यक्ष युद्धाच्या काळीं, सर्वसाधारण जनतेस अनपेक्षित परिस्थिति दिसते, आणि सर्वश्रेष्ठ ध्येयाबद्दल आस्था ठेवण्याचा उपदेश ऐकून घेण्याच्याहि मन:स्थितींत ती नसते; तेव्हा, त्यांना अंतिम ध्येयाप्रत नेण्याचा व्यवहार्य मार्ग, म्हणजे त्यांच्यांत प्रथम, 'अहिंसात्मक हिंसे' चें तत्त्व रुजवून, नंतर त्यांना 'वीराच्या अहिंसे' कडे हळूहळू नेणें हा होय. आध्यात्मिक तयारी नसलेल्या सर्व साधारण जनतेस युद्धकाली 'वीराच्या अहिंसे' चा अवलंब करावयास लावले, तर तो असमयोचित प्रयत्न फसेल. तो साध्य होणार नाही, इतकेंच नव्हे, तर उलटपक्षी त्या प्रयत्नांत सर्वनाशी अशी 'भित्र्याची अहिंसा' येण्याची अतिशय भीति राहील. सारांश, जनता केवळ भयभीत होऊन, आक्रमणाचा प्रतिकार करणार नाही. अहिंसेचे आचरण करण्याकरता, जनता प्रतिकारशून्य बनेल, असे नव्हे.

'अहिंसात्मक हिंसे' ऐवजी 'नि:स्वार्थ हिंसे' चे तत्त्व आचरणांत आणूनहि जनतेस 'वीरांच्या हिंसे' प्रत नेतां येईल. विश्वासघाताच्या आक्रमणामध्ये, आत्मरक्षणार्थ जी हिंसा होते, ती नि:स्वार्थ हिंसा. येथे कोणत्याहि स्वार्थपर हेतूने, हिंसेला न्याय्य ठरविली जाण्याचा प्रयत्न होतां कामा नसे. उदाहरणार्थ, जेव्हा एखाद्या विषयांधाकडून एखाद्याच्या मातेचा मानभंग होण्याच्या बेतांत असतो, आणि प्रतिकाराकरिता हिंसेचा अवलंब करुन, तो तिचें रक्षण करतो, आणि प्रतिकाराकरिता हिंसेचा अवलंब करुन, तो तिचें रक्षण करतो, तेव्हा त्याने 'नि:स्वार्थ हिंसे' च्या तत्त्वाचे पालन केले, असें म्हणता येईल. त्याचप्रमाणे, मातृभूतीची इभ्रत धोक्यांत असेल, आणि तिच्यावर शत्रूचें आक्रमण झालें असेल, तर मातृभूमीच्या रक्षणार्थ केलेला राष्ट्राचा नि:स्वार्थ प्रयत्न, म्हणजे नि:स्वार्थ हिंसा होय. माता किंवा मातृभूमि ही स्वत:ची

असल्याने, येथे स्वार्थाची छटा असते, व या ठिकाणी व्यक्त झालेले प्रेम, हें मर्यादित मानवी प्रेम असते. 'भित्र्याची अहिंसा' व त्याचप्रमाणे 'स्वार्थी हिंसा' सर्वनाश करणारी असते. उदाहरणार्थ, व्यक्तीने अगर राष्ट्राने, सत्ता अगर इतर स्वार्थ, यासाठी केलेली हिंसा.

यावरुन असे दिसून येईल की, 'शुद्ध आणि अमिश्रित अहिंसा' हेंच जीवनांचे ध्येय असलें, तरी तें 'वीराच्या अहिंसे' चा अवलंब करुनच प्रत्येक आध्यात्मिक साधकास साध्य करुन घ्यावे लागते. सर्वसाधारण जनतेस ईश्वराशी ऐक्य पावण्याची तितकीशी तीव्र इच्छा नसते. म्हणून जनतेला हळूहळू व परिस्थितीप्रमाणे, 'अहिंसात्मक हिंसे' च्या अगर 'नि:स्वार्थ हिंसे' च्या द्वारा, त्या ध्येयाकडे न्यावें लागते. शेवटी, हे अगदी स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे की, अहिंसात्मक हिंसा' अगर 'नि:स्वार्थ हिंसा', ही जीवनाचें अंतिम ध्येय असलेली 'शुद्ध आणि अमिश्रित अहिंसा' अथवा 'अनंत प्रीति' साध्य करण्याची केवळ साधने आहेत. त्यांना प्रत्यक्ष ध्येय समजण्याचा घोटाळा होऊं देता कामा नये. उदाहरणार्थ, 'वीराची अहिंसा' आणि 'भीरुची अहिंसा' या दोन्हीहि अहिंसाच होत; परंतु, त्यामागे असलेल्या हेतूंमुळे, 'वीराची अहिंसा' ही प्रेमांतून उगम पावते, आणि 'भीरुच्या अहिंसे' चा उगम भीतीत असतो. भीती ही प्रीतीच्या अगदी उलट आहे. केवळ अहिंसेच्या दृष्टीने, प्रीति व भीती ह्या परस्परविरुद्ध नसल्या, तरी त्यांचे हेतू पूर्णपणे परस्परविरुद्ध असतात. 'वीराच्या अहिंसे' मधील हेतु अनंत पूर्णपणे परस्पर विरुद्ध असतात. 'वीराच्या अहिंस' मधील हेतु अनंत प्रीतीसाठी आत्मार्पण करणें हा आहे; तर 'भीरूच्या अहिंसे' मधील हेतु असीम तिरस्कारास पात्र होऊन, आत्मरक्षण करणे हा आहे. म्हणून 'भित्र्याची अहिंसा', ही 'प्रीतिशून्यता', या शीर्षकाखाली व 'शूराची अहिंसा', 'प्रीति' या शीर्षकाखाली घालणें योग्य आहे.

'अहिंसात्मक हिंसा' ही **प्रीती** या सदराखाली न्याय्य ठरत नसून, **कर्तव्य** या सदराखाली न्याय्य ठरते. कारण, नि:स्वार्थबुद्धीने दुसऱ्यासाठी केलेले कर्मयोगपर कर्तव्य अनंत पण मानवीच असलेल्या प्रेमाशी संयुक्त (linked) असते.

हिंसा व अहिंसा या, दोन परस्परविरुद्ध शक्तींमधील भेद नाहीसा होऊं शकत नाही; परंतु योग्य रीतीने आणि योग्य मार्गाने अभिव्यक्त केल्यास, एका शक्तीचे दुसऱ्या शक्तीत रुपांतर होऊ शकते. चुकीच्या पद्धतीने अन्नग्रहण केल्यास, त्याचे विष बनूं शकतें; आणि सोमलासारखे विष पुष्टिवर्धक म्हणून व कमी प्रमाणांत दिलें असतां, मज्जातंतूंना शक्ति देऊं शकतें. जरी प्रत्यक्ष अन्नाचें विष बनत नाही, अगर याउलटहि होत नाही, तथापि अभिव्यक्तिमुळे, क्रियेचे व परिणामांचे स्वरुप बदलून जातें.

वरील विविध परिस्थितींच्या सूक्ष्म परिक्षणावरुन असें दिसून येते की त्यांच्यांत हिंसा आहे की अहिंसा आहे, व ती न्याय्य आहे की अन्याय्य आहे, तसेच त्याचें



मूल्य खरें आहे की खोटें इ. प्रश्न केवळ तत्संबंधी एखादा सार्वत्रिक कायदा करुन सुटणार नाहीत. त्या परिस्थितींमध्ये, अनेक आध्यात्मिक स्वरुपाच्या नाजूक बाबी आणि गुंतागुंत आहे; आणि अहिंसा व हिंसा यांचे आध्यात्मिक मूल्यांतील स्थान समजण्यासाठी, परिस्थितीतील वस्तुगत खरा अर्थ पाहण्याचा दृष्टिकोन पाहिजे. यासाठी, केवळ हिंसा अगर केवळ अहिंसा, या संबंधीच्या अर्धवट कल्पनांवर आधारलेल्या घोषणांनीच (slogans) मग त्या कितीहि नादयुक्त असोत-क्रिया निश्चित होऊं नये. नियमातीत असणाऱ्या आध्यात्मिक ज्ञानांतून आणि द्वंद्वातीत असणाऱ्या दिव्य प्रेमांतून, कृति (action) ही स्वाभाविकपणे उत्स्फूर्त झाली पाहिजे.

मोठा टप्पा गांठला असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. परंतु, या सर्व उदाहरणांमध्ये, एक तर साधकाने पूर्वीच्या जन्मांमध्ये केलेल्या आत्मोन्नतीची तो केवळ उजळणी व पुन:प्राप्ति (recapitulation) करीत असतो; किंवा, त्याला सद्‌गुरुचें विशेष सहाय्य मिळालेलें असतें. पण, साधारणत: सर्व उन्नति क्रमश:च व्हावी लागते. **अभिमानाच्या जागीं नम्रता, उद्वेगपूर्ण वासनांच्या जागी स्थैर्याने वाढत जाणारा संतोष, व स्वार्थपरतेच्या जागीं स्वार्थरहित प्रेम उत्पन्न होत असतांना, अहंकाराचें, निरनिराळ्या अवस्थांमधून, क्रमिक रुपांतर व्हावें लागतें; व ह्याच रीतीने, सीमित अहंजीवन व सीमातीत अहंशून्य जीवन यांमधील महदंतर काटलें जाणें शक्य होते.**

अहंकार सद्‌गुरुच्या स्वाधीन झाला म्हणजेच सद्‌गुरुची मदत निश्चितपणे मिळूं शकते.

सद्‌गुरुस पूर्णपणे वश असलेला अहंकार, अनिवार्यत: आवश्यक असुन, आध्यात्मिकदृष्ट्या नुकसानकारक नसतो, इतकेंच नव्हे, तर तो साधकाच्या आध्यात्मिक उन्नतीला, प्रत्यक्षपणे पोषक होतो; कारण, त्याच्या द्वारा, नि:स्वार्थ प्रेम व सेवा करुन, साधक सद्‌गुरुच्या अधिकाधिक सन्निध जातो. यामुळे सद्‌गुरुचा आंतरिक सहवास त्याला प्राप्त होतो, व जी सहायता केवळ सद्‌गुरुच देऊं शकतो, ती मिळविण्याची त्याला संधि मिळते. जो साधक निरंकुश व मेदप्रवण अहंभावाचा त्याग करुन, सद्‌गुरुसमोर शरणागति स्वीकारतो, तो या नवीन, सद्‌गुरुस वश असणाऱ्या अहंभावाच्या द्वारां, सद्‌गुरुचें साधन बनतो. वास्तविक पाहतां, सद्‌गुरुच त्याच्या द्वारां कार्य करीत असतो. ज्याप्रमाणे, कार्य करीत असतांना, एखादें साधनीभूत उपकरण नादुरुस्त होऊं शकतें, त्याचप्रमाणे, साधकामध्येहि, तो जगांत कार्य करीत असतांना, बिघाड उत्पन्न होण्याचा संभव असतो. वेळोवेळी, उपकरणाची डागडूज करावी लागेल, तें स्वच्छ ठेऊन व त्याची पुनर्घटना करुन, त्याला दुरुस्तहि करावें लागे. त्याचप्रमाणे, **कार्य करीत असतांना, जर साधकाने नवीन विकृती, गुंतागुंत किंवा व्यक्तिपर अहम्‌ची आश्रयस्थानें निर्माण केली, तर पुढच्या आध्यात्मिक प्रवासाकरता सामर्थ्य यावें, म्हणून त्या साधकासहि पुन: सुव्यवस्थित व सुकार्यक्षम बनविण्याची आवश्यकता असतें.**

सद्‌गुरुचा सहवास वारंवार प्राप्त करुन घेण्याची आवश्यकता.

जो साधक गुरुसेवेच्या व्रताचा अंगिकार करतो, तो एकप्रकारचा सद्‌गुरुच्या हातांतील जगांतील घाण साफ करण्याचा फडा आहे. घाण साफ करीत असतांना, फड्यामध्येहि बरीच घाण साठवली जाणारच; व वेळोवेळीं, त्या फड्याला नवीन केलें नाही, तर कालांतराने त्याची कार्यक्षमता कमी होत जाते. जेव्हा जेव्हा साधक सद्‌गुरुकडे जातो, तेव्हा तेव्हा, त्याच्याजवळ नित्य नवीन आध्यात्मिक समस्यांचा बोजा असतोच. कीर्ति, संपत्ति किंवा इतर सांसारिक आकर्षणामध्ये तो फसला



करण्याकरिता, त्याला बराच वेळ लागतो. शिवाय, अखेरपर्यंत, पथामध्ये खळगे व पाय घसरविणारे सुळके विखरलेले असतातच. जे या गिरिशिखरावर जाण्याचा प्रयत्न करतात, त्यांना अधिकाधिक उंच चढावे लागतें. तसेच, **एखाद्या माणसाला, अत्युच्च स्थानी चढण्यांत यश आलेंच, तरीहि त्याच्या हातून एखादी लहानशी देखील चूक झाल्यास, त्याला तितक्याच उंचीहून खाली पडावें लागतें,** व आपल्या चढण्याच्या उपक्रमाला पुन: प्रारंभ करावा लागतो. तेव्हा, पूर्ण सद्‌गुरुच्या मार्गदर्शनाचा व सहाय्याचा लाभ नसेल, तर साधकास कधीहि खरी सुरक्षितता नसतेच. पूर्ण सद्‌गुरुला पथांतील बारीक-सारीक व अंतर्बाह्य माहिती असते. व तो साधकाचे अध:पतनापासून रक्षण करुं शकतो, इतकेंच नव्हे, तर त्याची टाळतां येणारी अवनति टाळून, त्याला अनुभूतीच्या ध्येयापर्यंत नेऊं शकतो.

उन्नतीमधील अडथळे.

ध्येयप्राप्तीस बद्धपरिकर झालेला साधक स्वत:चे भूतकालांतून आणलेले संस्कार बरोबरच ठेवतो; व त्याच्या तीव्र आध्यात्मिक तळमळीमुळे, त्याचे ते संस्कार, कांही कालपर्यंत, क्षीण होऊन तरंगत राहतात. परंतु, मधून मधून, जेव्हा आध्यात्मिक प्रयत्न शिथिल होतो, तेव्हा, **आतापर्यंत क्रियाप्रवण नसलेले संस्कार अधिक प्रबल बनून, व नवीन रीतीने व्यवस्थित होऊन, साधकाच्या उन्नतीमध्ये दुर्गम अडथळा उत्पन्न करतात.**

हे नदीच्या उदाहरणाने स्पष्ट होईल. नदीचा प्रबल प्रवाह आपल्या उगमस्थानांतील व किनाऱ्यांमधील झिजलेल्या मातीचे ढीग घेऊन जातो. जोंवर ही माती पाण्यांत मिसळून वहात राहते, तोंवर तिच्यामुळे नदीचा प्रवाह फार तर मंद होतो, पण अडून रहात नाही. परंतु, पुढे सपाट प्रदेशामध्ये, प्रवाहाचा आवेग कमी होतो, तेथे व विशेषत: मुखाजवळ, ही माती नदीतलावर बसूं लागून, तिच्यामुळे मोठमोठी बेटें व दोआब बनतात. व त्यांच्यामुळे, नदीचा प्रवाह अवरुद्ध होतो, किंवा त्याची दिशा बदलते, किंवा तो भंग पावून, त्याच्या अनेक धारा बनतात; व त्याची पूर्वीची प्रचंड शक्ति कमी होते. तसेच, नदीला पूर आलेला असल्यास, त्याच्याबरोबर मार्गातील झाडें, झुडपें व कचरा हे सर्व वाहून जातात; परंतु, हे सर्व, कांही प्रमाणांत एकत्रित झाले, म्हणजे त्यांचा प्रवाहास मोठाच अडथळा होऊं शकतो. त्याचप्रमाणे, उन्नतिपथदेखील **स्वयंनिर्मित अडथळ्यांनीच अवरुद्ध होऊं शकतो; व हे अडथळे केवळ सद्‌गुरुच्या मदतीनेच दूर होऊं शकतात.**

अभिमान नाहीसा झाला पाहिजे.

जेव्हा साधक, सद्‌गुरुमध्ये प्रतीत होणाऱ्या असीम जीवनाकरता, स्वत:च्या आहंकारिक जीवनाचा त्याग करतो, तेव्हा सद्‌गुरुची मदत अत्यंत प्रभावी होते. पूर्ण शरणागति ही अतिशय दु:साध्य आहे; परंतु, अहंभाव निम्नतर पायरी पर्यंत उतरविणें, ही एक आध्यात्मिक उन्नतीची आवश्यक अट आहे. मोठमोठी ‘कार्यें’ (works), हा कांही आध्यात्मिक उन्नतीचा

प्रथम उद्देश नाही; तर आहंकारिक चेतनेने सीमित नसलेल्या जीवनाचें गुणवैशिष्ट्य मिळविणें, हेंच आध्यात्मिक उन्नतीचे लक्ष्य आहे. साधकाने थोर व महान् कार्ये केली असतील; परंतु, सदासर्वकाळ तीं कार्यें माझीच आहेत, ही ममत्वबुद्धि जर त्याने ठेवली, तर त्याचा अहंकार या सर्व कर्मविपाकावर आरुढ होऊन, तो सीमातीत जीवनाच्या प्राप्तींतील एक भीषण बाधा बनतो. तेव्हा, विधिसमारंभांचे लोकाचार, परोपकाराची कृत्यें, बाह्य संन्यास व तप हे जर अहंभावमूलक असतील, तर ते सर्व व्यर्थ आहेत.

दुहेरी आपत्ति.

म्हणुन, 'मी हे करतो', व 'मी तें करतो', अशी कल्पना साधकाने आपल्या मनास मुळीच शिवूं देऊं नये. परंतु ह्या प्रकारचा अभिमान वाटेल, या भीतीने साधकाने पूर्ण निष्क्रियतेचा अंगिकार करावा, असा कांही याचा अर्थ नाही. ज्या अभिमानाचे संवर्धन, त्याने आधीच करुन ठेवले आहे, तो विदीर्ण करण्याकरता, त्याला क्रियापूर्ण जीवनहि स्वीकारावें लागेल. **साधक दुहेरी आपत्तीमध्ये सापडतो. निष्क्रियता स्वीकारली, तर ज्या आहंकारिक जीवनाच्या पिंजऱ्यामध्ये, तो अडकलेला असतो, तो मोडून टाकण्याकरता, त्याचा कोणताहि प्रयत्न होत नाही; व जर तो उद्योगशील बनला,** तर त्याचा अहंकार, त्याच्या ह्या नवीन उपक्रमांवरच, संक्रमित होऊन आरुढ होण्याची शक्यता असते.

अध्यात्मपथावरील प्रगति ही तलवारीच्या धारेवर चालण्याप्रमाणे आहे.

आध्यात्मिक उन्नतीकरता, साधकाला हे दोन्हीहि अतिरेक टाळावे लागून, रचनात्मक क्रियाशीलतेचे जीवन चालूं ठेवावे लागते. अध्यात्मपथ आक्रमण करणें, म्हणजे खोगीर असलेल्या घोड्यावर बसण्यासारखे नसून, तलवारीच्या धारेंवर चालण्यासारखे आहे. घोडेस्वार एकदा घोड्यावर बसला, की नंतर पुढच्या प्रगतीकरता, त्याला फारसें लक्ष द्यावें लागत नाही; व तो घोड्यावर आरामाने बसला तरी चालतें. पण, अध्यात्मपथावर चालतांना, अत्यंत दक्षतेने व काळजीपूर्वक लक्ष्य ठेवण्याची आवश्यकता असते. कारण, या मार्गात, विश्रामस्थानें किंवा आहंकारिक जीवनविस्तारास कोणत्याहि दिशेने अवकाश देणाऱ्या जागा नाहीत. **पथप्रविष्ट पथिक, आहे त्या जागीच थांबूं शकत नाही; व स्वत:चा तोलहि इकडे तिकडे जाऊं देऊं शकत नाही; हे तलवारीच्या धारेवर चालण्यासारखेंच आहे.**

सद्गुरुस वश राहणाऱ्या नवीन अहम्‌ची रचना.

एका बाजूला निष्क्रियता व दुसऱ्या बाजूला कर्तृत्वाचा अभिमान, ह्या दोन्ही आपत्ति टाळण्याकरता, साधकाला, खाली वर्णिलेल्या रीतीने, सद्गुरुस पूर्णपणे वश असणारा, एक तात्पुरता व कामचलाऊ, नवीन अहम्भाव निर्माण करावा लागतो. कोणताहि व्यवसाय सुरु करण्यापूर्वी, साधक असा विचार करतो, की तो स्वत: हे कार्य करीत नसून, सद्गुरुच तें त्याच्या द्वारां करुन घेत आहे. आणि तो व्यवसाय पूर्ण झाल्यावर, तो त्याचे फल



सद्गुरुला अर्पण करुन मुक्त होतो; व कर्मफलाचें कर्तृत्व स्वत:कडे घेण्यास किंवा कर्मफलाचा उपभोग घेण्यास, तो थांबत नाही. ही वृत्ति अंगांत बाणली, म्हणजे नवीन प्रकारचा अहम् (ego) निर्माण करण्यामध्ये, त्याला यश येतें; व हा अहम् जरी तात्पुरत्या व कामचलाऊ स्वरुपाचा असला, तरी तो खऱ्या क्रियाशीलतेमध्ये व्यक्त होणारा आत्मविश्वास, उत्साह व स्फूर्ति, यांचे उगमस्थान बनू शकतो. हा नवीन अहम्भाव अध्यात्मदृष्ट्या हानिकारक नसतो. कारण, त्याचें अस्तित्व व जीवन अनंततेचें प्रतिनिधित्व करणाऱ्या सद्गुरुमधून उदयास येतें; व योग्य वेळ आली, म्हणजे त्या अहम्भावाला, वस्त्राप्रमाणे फेकूनहि देतां येतें.

तेव्हा अहम् दोन प्रकारचा असतो. एक प्रकारचा अहम् केवळ आत्म्याचीं बंधनेंच वाढवीत जातो; व दुसऱ्या प्रकारचा अहम् विमोचनास मदत करतो. संसारासक्त मनुष्य जेव्हा, बंधनकारक अहंभाव सोडून, सीमातीत व निरहंकार जीवनांत प्रविष्ट होण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा, त्याच्या मार्गात, सद्गुरुमध्ये पूर्णपणे निष्ठावन्त असणाऱ्या अहंभावाची रचना होणे जरुर असते. **आध्यात्मिक उन्नतीच्या गतिप्रक्रिये (dynamics) मध्ये, सद्गुरुस पूर्णपणे वश असणाऱ्या नवीन अहंभावाच्या रचनेची अनिवार्य आवश्यकता आहे.**

अहंकार शून्य जीवनामध्ये एकाएकी प्रवेश मिळणे शक्य नसतें.

साधकाला जीवनांतील सारा उत्साह अहंप्रेरित असण्याची सवय झाली असल्यामुळे, आहंकारिक क्रियाशीलतेमधून, अहंतारहित क्रियाशीलतेमध्ये, एकदम परिवर्तन करणें, त्याला कंटाळवाणे व अशक्य होतें. **अहंचेतनेचे सर्वच प्रकार अगदीच टाळावयाचे, असा एकदम आग्रह धरल्यास, साधकाला, एकतर निषेधात्मक क्रियाशून्यते (Negative passivity) चा आश्रय घ्यावा लागेल, व अशा क्रियाशून्यतेमध्ये आत्माभिव्यक्तीच्या आनंदास जागा राहणार नाही; किंवा, त्याला निर्जीव यंत्राप्रमाणे, केवळ निसर्गप्रेरित क्रिया कराव्या लागतील, व त्यांत आत्मतृप्तीचा अभाव राहील.** साधकासमोर मुख्य प्रश्न असतो, तो हा की, त्याला सीमित अहंजीवन टाकून, अहंकाररहित जीवनाच्या अनंततेमध्ये प्रवेश करायचा असतो, पण असे करतांना, जीवनास ओहटी आणणारी गतिशून्य जडता टाळायची असते. अशा प्रकारच्या विमूढ जडतेमुळे, साधकाची अहंकारमय जीवनाच्या सीमाबद्धतेपासून, फार तर कांही कालपर्यंत, सुटका होईल. परंतु, केवळ जडतेच्याच द्वारा, साधक निरहंकार क्रियाशीलतेच्या अनंततेमध्ये, प्रवेश करुं शकत नाही. जडता किंवा मंदता, यांच्यामुळे सीमित जीवनाचा कोंडमारा होईल, पण अहंशून्य जीवनाची परिपूर्णता प्राप्त होणार नाही.

आध्यात्मिक उन्नति क्रमश: होत असते.

ह्याच कारणामुळे, बऱ्याचशा साधकांची आध्यात्मिक उन्नति क्रमाक्रमानेच होऊन, तिला बहुधा कित्येक जन्म घ्यावे लागतात. केव्हा केव्हा, साधकाने आध्यात्मिक उन्नतीचा बराच

चांगल्याचा स्वीकार करणें हा होय. परंतु, एखाद्या विशिष्ट वेळीं, मनुष्य चांगला राहील, की वाईट राहील, हे त्याच्या अनिवार्य संस्कारांच्या नियतीवर अवलंबून असतें.

पापी व पुण्यात्मा.

ह्या दृष्टीने पाहतां, विश्वांतील नियमांनीच नियत होऊन, कोणी पापी बनतो, तर कोणी पुण्यवान बनतो. पापी व पुण्यात्मा, यांचा दोघांचाहि प्रारंभ व अंत सारखाच असतो. **साधूला स्वत:च्या नैतिक विजयाबद्दल अभिमान बाळगण्याची आवश्यकता नाही; व पाप्यावर अवनतीचें व अधमतेचे चिरंतन लांछनहि असण्याची आवश्यकता नाही.** एखाद्या माणसांत कितीहि साधुत्व असलें, व त्याने सद्‌गुणराशीचें शिखरहि गाठले असलें, तरी त्याला हे सर्व नैतिक दुर्बलतेच्या जीवनानंतरच साध्य झालेलें असतें. स्वत:ची सुधारणा करुन, स्वत:ला कधीच चांगला बनवूं शकणार नाही, इतका वाईट कोणीच नसतो. अत्यंत दुराचारी मनुष्यहि हळूहळू सुधरत जाऊन, अखेरीस सर्व मानवांना आदर्श बनूं शकतो. सर्वांच्याबद्दल आशा करण्यास जागा आहेच. कोणीहि सर्वथैव पतित किंवा बेकाम नसून, कोणीहि हताश होण्याची आवश्यकता नाही; पण त्याबरोबरच हेंहि सत्यच आहे, की वाईटाचा त्याग करुन, चांगल्याचा स्वीकार करण्याच्या द्वारांच, ईश्वरत्वाकडे नेणारा मार्ग पुढे जातो.

चांगुलपणाचें क्रमिक अनावरण झालें, म्हणजे प्रेम, औदार्य व शांति प्राप्त होतात.

वाईट संस्कारांप्रमाणेच, सीमित जीवभाव चांगल्या संस्कारांतहि निवास करतो.

व ह्या गुणांच्या अभिव्यक्तीने उत्पन्न होणारे उत्तम संस्कार, तद्विरुद्ध असलेल्या, काम, लोभ व क्रोध, यांच्या वाईट संस्कारांना सर्वथा झाकतात, व तुल्यबल होतात. **जेव्हा चांगले व वाईट संस्कार समभार व तुल्यबल होऊन, परस्परानुप्रवेश करतात, तेव्हा दोन्हीहि प्रकारचे संस्कार एकदम नष्ट होतात; व चेतना बंधनांतून मुक्त स्थितीमध्ये प्रविष्ट होते.** हिशेब संपुष्टांत आणायचा असल्यास, जमाखातें व खर्चखाते, ही ठीक बरोबरीची झाली पाहिजेत. पण बहुधा खर्च तरी अधिक असतो, किंवा जमा तरी असते; व हिशेब चालूच राहतो. खर्च अधिक असल्यानेहि हिशेब चालू राहतो, हे लक्षांत ठेवणें फार महत्त्वाचें आहे. दोन्हीहि बाजू समतोल झाल्या, तरच हिशेब बंद करता येतो. पण संस्कारक्षेत्रांत अशा प्रकारचा समतोल क्वचितच घडून येतो. कोणत्याहि विशिष्ट वेळी, एक तर वाईट संस्कारांचे प्राधान्य राहतें, किंवा चांगल्या संस्कारांचे प्राधान्य राहतें. व जमा किंवा खर्च अधिक असल्याने, हिशेब चालू राहतो, त्याप्रमाणे, वाईट किंवा चांगले संस्कार अधिक असल्याने, सीमित जीवभावाचे जीवन चालूं राहून, पोषित होते. वाईट संस्कारांप्रमाणेच, चांगल्या संस्कारांच्या द्वारांहि, सीमित अहंभाव जिवंत राहतो, व त्याचा पूर्ण व अंतिम उच्छेद होण्याकरिता, चांगले व वाईट संस्कार एकमेकांवर पडून (overlap), समभार (balance) झाले पाहिजेत.

चांगल्या व वाईट संस्कारांमध्ये समीकरण व समतोल करण्याचा प्रश्न हा केवळ



गेला असेल. ह्या वस्तूंच्या मागे तो लागला, तर त्याला ह्या वस्तू मिळतील; परंतु, त्याला अत्यंत प्रिय असलेल्या परमात्म्याचा अनुभव त्याला मिळणार नाही. अशा प्रकारच्या आध्यात्मिक व्याधी केवळ सद्‌गुरुच्या हस्तक्षेपानेच दुरुस्त होऊं शकतात. **आध्यात्मिक व्याधी हरण करण्याचे कार्य शस्त्रवैद्याच्या शस्त्रक्रियेप्रमाणे असतें.** शस्त्रवैद्य रोग्याच्या प्राणशक्तीस घातक असलेल्या कारणांचे चिकित्सात्मक निदान चटकन करतो. जर माणसाला शारीरिक आधिव्याधी असतील, तर त्याने डॉक्टर किंवा शस्त्रवैद्य यांच्याकडे गेले पाहिजे; व जर त्याला आध्यात्मिक आधिव्याधी असतील, तर आध्यात्मिक उन्नतीच्या सर्व अवधीमध्ये, त्याने वारंवार सद्‌गुरुसमागमाचा आश्रय घेतला पाहिजे.

जेव्हा जेव्हा व्यक्तिपर अहंकार पुन: जिवंत होतो, तेव्हा तेव्हा सद्‌गुरुप्रत नवीन शरणागतीची आवश्यकता असते.

ज्या अचूक मार्गांनी, सद्‌गुरु साधकाला वश करुन घेतो, त्यांना जगरहाटीमध्ये तुलनाच नाही. पण, साधकाला जर सद्‌गुरुचें सहाय्य मिळवावयाचें असेल, तर त्याने सद्‌गुरुच्या ईश्वरी इच्छेस शरण जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सद्‌गुरुला प्रथम आत्मसमर्पण करण्यामध्ये, साधकाने ज्या वैयक्तिक अहंकाराचा त्याग केला असतो, तो नवीन रुपांत, पुन्हा प्रगट होऊं शकतो. व साधकाने जो सद्‌गुरुस वश असलेला, कृत्रिम अहंकार निर्माण केला असतो, त्यांत तो वैयक्तिक अहंकार शिरुन, त्याच्या व्यवस्थित कार्यात गोंधळ व विघ्नें आणतो. तेव्हा, ह्या सीमित व वैयक्तिक अहंकाराच्या पुनरुत्थापनाचा प्रतिकार करण्याकरता, सद्‌गुरुप्रत नवीन शरणागतीची आवश्यकता असते. जेव्हा जेव्हा वैयक्तिक अहंकाराचे पुनर्जीवन होतें, तेव्हा तेव्हा, सद्‌गुरुस पुनरपि शरण जाण्याच्या त्यागपर प्रक्रियेची आवश्यकता असतेच.

अखेरचा त्याग म्हणजे पृथग्भावाचा त्याग होय.

एक शरणागति मागे टाकून, अधिकतर शरणागतीचा स्वीकार करणें, म्हणजे एक विजय मागे टाकून, महत्तर विजय मिळविणें होय. अधिकाधिक पूर्ण प्रकारांमध्ये, जाणिवेच्या श्रेष्ठतर अवस्था व्यक्त होतात; कारण, त्यांच्या द्वारा साधक व सद्‌गुरु यांच्यामध्ये, अधिकाधिक संवादित्व (harmony) प्रस्थापित होऊन, सद्‌गुरुचें सीमारहित जीवन, साधकाच्या द्वारां, वाढत्या विपुलतेमध्ये प्रवाहित होते. **आध्यात्मिक उन्नति, म्हणजे क्रमाक्रमाने एका शरणागतिरुप आत्मसमर्पणानंतर दुसरें शरणागतिरुप आत्मसमर्पण, अशा प्रकारच्या निरन्तरतेची कथा आहे. पृथग्भावरुपी अहंजीवनाचा अंतिम व पूर्ण परित्याग करण्याचें ध्येय गांठीपर्यंत ही प्रक्रिया चालूच राहते. हे अखेरचें समर्पण, म्हणजेच पूर्ण समर्पण असतें. ज्या मीलनांत, साधक सद्‌गुरुशीं पूर्णैक्य पावतो, त्याचीच ही उलट बाजू आहे. म्हणून, एका अर्थाने पाहता, सद्‌गुरुस अहंकारसर्वस्वाचें अर्पण करणें, म्हणजे आध्यात्मिक प्रगतिपथाचें ध्येय असलेल्या सत्याची प्राप्तीच होय.**

# १४ : चांगले व वाईट

मानवी मन अनुभव घेत राहतें, इतकेंच नव्हे, तर तें सारखें या अनुभवांचे महत्त्वमापनहि करीत असतें. कांही अनुभव प्रिय असतात, व कांही अप्रि असतात; काही सुख देतात, तर कांही दुःख देतात; कांही अनुभवांमध्ये आनंद असतो, तर कांहीमध्ये यातना असते; कांही अनुभवांमध्ये, मानवी जीवन संकुचित झाल्याचें आढळून येतें, तर कांही अनुभवांमध्ये, मानवी जीवन संकुचित झाल्याचें आढळून येतें, तर काही अनुभव परिपूर्णता व मुक्तता, यांच्याकडे नेणारे दिसतात; व कांही अनुभवांना चांगले व काहींना वाईट मानण्यांत येतें. **जेव्हा मानवी कल्पना कोणता तरी दृष्टिकोण घेऊन, जीवनाचा परामर्श घेते, तेव्हा ती अशा प्रकारची द्वंद्वें निर्माण करतें.**

द्वंद्वांच्या द्वारा अनुभवांचे मूल्यमापन.

ग्राह्य काय व त्याज्य काय, याबद्दलच्या माणसाच्या कल्पना, ह्या त्याच्यामध्ये त्या विशिष्ट वेळीं, ज्या इच्छेचें प्राधान्य असतें, तिच्या गुणविशेषांना अनुसरुन, वेळोवेळीं बदलत व उत्क्रान्त होत जातात. परंतु जोंवर त्याच्या मनांत कोणत्याहि प्रकारची इच्छा आहे, तोंवर तो स्वतःच्या अनुभवाचें महत्त्व, त्या इच्छेच्या सापेक्षतेने निश्चित करण्यास प्रेरित होतो; व तो स्वतःच्या अनुभवामध्ये, विभागणी करुन, इच्छापूर्ती करणारा व म्हणून ग्राह्य, असा एक भाग व इच्छापूर्तीस विरोधक व म्हणून त्याज्य, असा दुसरा भाग करतो. **जीवन व जीवनामधील सर्व गोष्टी यांच्याशी संबद्ध न होतां, किंवा त्यांचा तिरस्कार न करतां, त्यांच्याशी निरपेक्षतेने सम्मुख होण्याऐवजी, मन कोणता तरी एखादा मानदंड (standard) निर्माण करुन, त्याच्या द्वारां जीवनाला दुभंग करतें; व त्यांतील एक भाग ग्राह्य होतो व दुसरा भाग त्याज्य होतो.**

ग्राह्य व त्याज्य हे दोन्हीहि वासनासापेक्ष आहेत.



मन जीं नाना द्वंद्वें निर्माण करतें, त्यांमध्ये चांगले व वाईट हें द्वंद्व सर्वात अधिक महत्त्वाचे आहे. मनुष्यांतील वासनाबंधांतून मुक्त होण्याच्या वासनेवर ते आधारलेलें आहे. ज्या कृतींमुळे व अनुभवांमुळे, वासनाबंध दृढ होतात ते सर्व वाईट समजले जातात; व ज्या कृतींमुळे व अनुभवांमुळे, मन बंधनकारक वासनांपासून मुक्त होतें, ते सर्व चांगले समजले जातात. परंतु, चांगल्या कृती व अनुभव, ह्यांचाहि वासनेशीच संबंध असल्यामुळे, वाईट कृती व अनुभव, यांच्याप्रमाणेच त्यांचेंहि बंधन होतें. सर्व बंधन नष्ट होण्याकरता, सर्व वासना नष्ट झाल्या पाहिजेत, व म्हणून, वासनाप्रेरित बद्ध जीवात्म्याच्या निवडीकरता, यत्किंचित अवकाश न ठेवतां, चांगले व वाईट जेव्हा समतोल होऊन, एकमेकांत विलीन होतात, तेव्हांच खरी मुक्तता लाभते.

चांगले देखील इच्छेला सापेक्ष असतें.

मानवी जाणीव पूर्णपणे अस्तित्वांत आली, म्हणजे तिच्यांत वाईट घटक असतातच; कारण उत्क्रांती (evolution) मधील उपमानव (subhuman) अवस्थांमध्ये, जाणीव कामक्रोधलोभादि बंधनकारक प्रवृत्तींनीच प्रेरित होत असते. अशा अहंकेंद्रित प्रवृत्तींनी निर्माण होणाऱ्या अनुभवांचे व कृतींचे संस्काररुप ठसे वाढत्या मनावर उमटलेलेच असतात. सिनेमा फिल्मवरील नटांच्या अभियादि क्रियांच्या उमटण्याप्रमाणे, मनावरहि हे संस्कार आधीच सांचलेले असतात. म्हणून वाईट होणे सोपे असून, चांगले होणें कठिण असतें. कांही पशूंमध्ये, स्वार्थत्याग प्रेम व तितिक्षा, या सद्गुणांची क्वचित् वाढ झालेली असली, तरी ज्या पशुजीवनांतून मानवी चेतना विकास पावते, तें बव्हंशी पाशवी कामवासना, पाशवी क्रोध व पाशवी लोभ, यांच्यामुळेच निर्धारित झालेले असतें. सर्वच पशुसंस्कार वाईट असते व त्यांतील कांहीच चांगले नसते, तर मानवी चेतनेमध्ये, सत्प्रवृत्तींचा उदय होणें, अशक्यच झालें असतें.

अधिकांशाने वाईट असलेल्या पाशवी संस्कारांपासून मानवी जीवन सुरु होते.

कांही पशुसंस्कार चांगले असले, तरी बरेचसे वाईटच असतात; व म्हणून, मानवी चेतनेतील प्रारंभीची प्रेरक शक्ति बव्हंशी वाईटच असते. **चांगले संस्कार, सांचलेल्या वाईट संस्कारांवर पूर्णपणे पसरुन,** त्यांच्यामुळे वाईट संस्कारांचा निरास व्हावा, म्हणून मानवी उत्क्रान्तीच्या प्रारंभापासूनच, चेतना विमुक्त करण्याची समस्या, म्हणजे उत्तम संस्कार वाढविण्याचा प्रश्न बनते. ज्या अनुभवांचे व कृतींचे पशुजीवनामध्ये प्राधान्य असतें, त्यांच्या विरुद्ध असलेल्या अनुभवांचा व कृतींचा परिपोष केला, म्हणजे चांगले संस्कार उत्पन्न होतात. कामाच्या विरुद्ध प्रेम, लोभाच्या विरुद्ध औदार्य, व क्रोधाच्या विरुद्ध सहिष्णुता, यांच्या आचरणाने, मनुष्य काम, लोभ व क्रोध, यांच्या प्रवृत्ती निरस्त करुं शकतो.

चांगले संस्कार वाढ-विण्याची आवश्यकता.

संस्कारांच्या दास्यांतून मोकळे होण्याचा सामान्य क्रम, म्हणजे वाईट टाकून,

# १५ : परमेश्वराचें अंतरहित प्रेमस्वरुप

जे लोक ईश्वराला, केवळ बुद्धीच्या द्वारा, जाणण्याचा प्रयत्न करतात, त्यांना ईश्वराच्या स्वरुपाविषयी, एखादी निर्जीव व रुक्ष कल्पना करण्यापलीकडे यश मिळत नाही; व अशा कल्पनेमध्ये, ईश्वरस्वरुपाचें खरे सार ग्रहण केलें जात नाही. परमात्म्याच्या स्वरुपांत,

प्रेम हेच ईश्वराचे सार आहे.

अनंत ज्ञान, अनंत अस्तित्व, अनंत शक्ति व अनंत आनंद यांचा समावेश होतो, हे खरे आहे. पण जोपावेतो, परमेश्वराचे अंतरहित प्रेमस्वरुप समजले नाही, तोपावेतों, त्याची खरी ओळख पटली असें आपणास म्हणतां येत नाही. ज्या परात्पर स्थितीमधून, सर्व विश्वाचा उगम होतो व जिच्यांत त्याचा लयहि होतो, त्या स्थितीमध्ये, परमेश्वर हा सदाचा अनंत प्रेमस्वरुपच आहे. जेव्हा ईश्वरीय प्रेम, मध्येच उत्पन्न होणाऱ्या भ्रमरुप द्वैतमय सृष्टीतील नामरुपात्मक साच्यांत पाहिले जातें, तेव्हाच त्या प्रेमाची अनंतता भंग पावल्याचा भास होतो.

ईश्वराचे प्रेम जेव्हा नामरुपात्मक विश्वांत अभिव्यक्त होऊन स्वत:चा अनुभव घेतें,

अभिव्यक्त प्रेमाचा विकासक्रम.

तेव्हा ते खालील तीन अवस्थांतून जातें :- (१) प्रेम, प्रथम स्वत:च्या आत्यंतिक सीमाबद्धतेचा अनुभव घेते नंतर (२) प्रेमाची स्वत:ची मर्यादितता कमी कमी होत जाऊन, ते अधिकाधिक अंतरहित प्रेमासारखे बनत असल्याचे अनुभवास येतें, व अखेरीस (३) प्रेमाचें जें वस्तुत: व तत्त्वत: अनंत स्वरुप आहे, ते जसेच्या तसें अनुभवास येते. **संस्कारजन्य अज्ञानामुळेच, प्रेम सीमित झाल्याचा अनुभव येतो; व हे संस्कार चेतनाविकासाचे पार्श्वपरिणाम (side-products) असतात. प्रेम अनंत होण्याच्या क्रमांत, हे संस्कारबंध क्रमश: गळून जातात.**

धातुमय जगतांतील, जवळ जवळ अचेतन स्थिति पार केल्यावर, प्रेम पशुयोनींतील कामवासनेच्या स्वरुपांत अभिव्यक्त होऊन, स्वत:चा त्या स्वरुपांत अनुभव घेते. मानवी



दोन संख्यापरिमाणांना (mathematical quantities) समान करण्यापुरताच नाही. वाईट संस्कार उत्पन्न होणे बंद किंवा मंद झाले, व त्याबरोबरच चांगल्या संस्कारांचा

चांगल्या व वाईट संस्कारांचे समीकरण व त्यांचा परस्परानुप्रवेश.

अविरत संचय केला, तर आज ना उद्या, चांगले संस्कार सांचलेल्या वाईट संस्कारांच्या बरोबरीचे होऊन समभार होतील. **परंतु, चेतना विमुक्त होण्याकरता, चांगले व वाईट संस्कार समभार व तुल्यबल तर झालेच पाहिजे, पण प्रत्येक बाबतींत व बिंदुबिंदूमध्ये (point to point), परस्परविरोधी द्वंद्वांनी एकमेकांना व्यापून टाकलें पाहिजे. तेव्हा प्रत्येक चेतनाकेंद्राची समस्या, गुणभेदांच्या विविधतेप्रमाणे, स्वतंत्र समस्या असते.**

चांगल्या संस्कारांचा संग्रह होत असतांना, प्रस्तुत संस्कारांचे गुणविषयक घटना

अहंभावाचे सत्प्रवृत्तीमध्ये स्थित्यंतर.

वैशिष्ट्य ध्यानांत घेतलें गेलें नाही, तर एका बाजूला, चांगल्या संस्कारांचें विशिष्ट दिशेने आधिक्य प्राप्त झालें, तरी दुसऱ्या बाजूला, निराळ्या प्रकारचे वाईट संस्कार राहू शकतात. उदाहरणार्थ, आत्मपीडन (self-mortification) किंवा खडतर तपश्चर्या, यांच्या द्वारा, कांही प्रकारच्या आसक्तींचें निराकरण होईल; परंतु अशा अभ्यासाने अन्य प्रकारच्या आसक्तींना धक्काहि बसणार नाही व त्या कायमच राहण्याचा संभव आहे. या वांचून राहिलेल्या आसक्तिप्रकारांकडे, **साधकाचें दुर्लक्ष्य होण्याचा संभव असतो, इतकेंच नव्हे, तर हाच आत्मपीडनाचा व तपाचा अभ्यास, तज्जन्य संस्कारांच्या गतिमत्तेमुळे, पुढेहि चालूच ठेवण्याचा संभव असतो. या सर्व बाबतींत, चांगल्या संस्कारांचें आधिक्य निर्माण होऊनहि, सीमित 'अहं' चा अंत होत नाही.** व नंतर, वांचून राहिलेल्या आसक्तिप्रकारांचे जरी निराकरण झालें, तरी अहंभाव या नवीन, चांगल्या संस्कारांवर आरुढ होऊन, त्यांच्या द्वारा जिवंत राहतो.

संस्कारांच्या कुशल व्यवस्थापनेची आवश्यकता.

**मुक्ति म्हणजे केवळ सद्गुणांचा संग्रह नव्हे; मुक्तीकरता संस्कारांचे कुशल व्यवस्थापन** (intelligent adjustment) **झालें पाहिजे. सत्यानुभूतीच्या मुक्तावस्थेकडे, प्रत्येक चेतनाकेंद्र न कळत आकर्षण पावत असून, आध्यात्मिक दृष्टीने, ज्या द्वंद्वाची आवश्यकता असते, तेंच स्वत:वर ओढून घेण्याची प्रवृत्ति मनामध्ये निसर्गत:च असते. परंतु ही प्रक्रिया यंत्रवत् व स्वभावप्रेरित (automatic) नसून, ती साधकाच्या बुद्धिपुरस्सर सम्यक्प्रयत्नांवर अवलंबून असते.** बहुधा, साधकाला, स्वत:करतां वास्तविकपणें काय आवश्यक आहे, हे उमगत नाही. त्याकरता गुरुचें नित्यप्रभावी साहाय्य पाहिजे, कारण, सद्गुरुला साधकास विशिष्ट परस्थितीमध्ये काय आवश्यक आहे, याचें यथार्थ व प्रत्यक्ष ज्ञान असतें.

**चांगले संस्कारहि रेंगाळणाऱ्या जीवभावाचे माध्यम बनूं शकतात, हें वर स्पष्ट झालेंच आहे. मनुष्य जेव्हा स्वत:ला मी वाईट नसून चांगला आहे, असे मानतो, तेव्हा तो द्वंद्वाच्या द्वारा अहंप्रतिष्ठापन (self affirmation) करीत असतो.**

सद्‌गुणांचा पिंजरा.

**एक सोडून, तो दुसऱ्याशीं तादात्म्य पावतो; व स्वत:ची पृथक् सत्ता (separative existence) कायम ठेवतो.** केव्हा, केव्हा, 'अहं' चें हें स्वयंनिर्मित गृह मोडून टाकण्यास अधिक दुष्कर असतें; कारण वाईटाशीं होणाऱ्या तदात्मकतेपेक्षा, चांगल्याशीं होणारी तदात्मकता (self identification) अधिक पूर्णपणें होत असते. वाईटाशीं झालेलें तादात्म्य अधिक सुलभतेने निस्तरता येते. वाईटाचा वाईटपणा ध्यानांत आल्याबरोबर, वाईटाची चेतनेवरील मगरमिठी शिथिल होते. परंतु, चांगुलपणाची मगरमिठी शिथिल होणें दुष्प्राप्य असतें; कारण, **वाईटाशीं असणाऱ्या चांगुलपणाच्या संतोषदायी वैधर्म्यामुळे, चांगुलपणामध्ये आत्मसमर्थना (self-justification) चा आभास असतो.** परंतु कालांतराने, साधकाला या नवीन कारागृहाचाहि कंटाळा येतोच; व हे दिसून आलें, म्हणजे तो चांगल्यावाईटाच्या द्वंद्वांच्या पलीकडे जाऊन, स्वत:च्या निराळ्या अस्तित्वाचें व पृथग्भावाचे विसर्जन करतो.

चांगले व वाईट यांची तुलना.

वाईटाशी तद्रूप होण्याचें घर सोडून, चांगल्याशीं तद्रूप होण्याच्या नवीन घरांत, 'अहम्' स्थापित होण्याचें मुख्य कारण, म्हणजे त्याला त्यात अधिक विस्तारा (expansion) चा अनुभव येतो. तरी, आज ना उद्या, साधकाला हे नवीन गृहहि बंधनकारकच असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. परंतु, हे नवीन गृह मोडून टाकणे, त्याला वाईटाशी तद्रूप होण्याच्या गृहापेक्षा, कमी कठीण जातें. **वाईटपणाच्या गृहासंबंधीची अडचण, मुख्यत: तें बंधनरुप आहे, हे ओळखण्याच्या बाबतीत नसून, ओळखल्यानंतरहि ते जमीनदोस्त करण्यामध्ये आहे; आणि चांगुलपणाच्या गृहासंबंधीची अडचण, मुख्यत: ते उघडून टाकण्याच्या बाबतींत नसून, ते वस्तुत: बंधनच आहे, हें ओळखण्याच्या बाबतीत आहे.** हा फरक होण्याचें कारण असे आहे की, पाशवी संस्कारांचा उगम फार पुरातन असून, त्यांचा संग्रह अधिक कालपर्यंत होत आलेला असतो, व त्यामुळे ते अधिक दृढमूल बनले असतात. परंतु, चांगुलपणाची शृंखला, ही तिची जखडून टाकण्याची शक्ति ओळखल्यावर तोडण्यास अधिक सुलभ असली, तरी बंधनकारकच असते, हे लक्षात ठेवणें फार महत्त्वाचे आहे.

चांगल्या व वाईट संस्कारांच्या परस्परानुव्याप्तीला दृष्टान्त.

वाईट संस्कारांच्या द्वारा, किंवा चांगल्या संस्कारांच्या द्वारा, किंवा त्यांच्या संमिश्रणाच्या द्वारा, 'अहम्' (ego) जिवंत राहतो. म्हणून चेतनेचें सर्व संस्कारांपासून विमोचन होण्याकरता, चांगल्या संस्कारांनी वाईट संस्कारांना आच्छादून (overlapping), ते त्यांच्याशी समभार झाले पाहिजेत; किंवा



कांही चांगले संस्कार कांही वाईट संस्कारांवर, व कांही वाईट संस्कार कांही चांगल्या संस्कारांवर पडून, त्यांच्याशीं तुल्यबल (balancing) झाले पाहिजेत. भांडे घाण असेल, तर ते स्वच्छ करण्याकरता, त्याला प्रथम साबणाने घासून, नंतर पाण्याने धुतां येते. ही प्रक्रिया वाईट संस्कारांवर चांगल्या संस्कारांचे आवरण घालण्यासारखी आहे. परंतु भांड्याच्या घाणीत चिकटपणा असेल, तर तो चिकटपणा जाण्याकरता, त्या भांड्याला प्रथम माती लावून, नंतर धुवावे लागते. मातीत चिकटपणा मुळीच नसतो व ती चिकटपणाला विरुद्ध व मारक असते; म्हणून, चिकट भांड्याला मातीचा लेप दिल्यावर, ते लवकर स्वच्छ होते. हें चांगल्या संस्कारांना वाईट संस्कारांनी आच्छादुन टाकण्यासारखें आहे.

अनुभूतीची अवस्था संस्काररहित असून, चांगल्यावाईटाच्या पलीकडे असते.

ज्यावेळी चांगले व वाईट संस्कार एकमेकांना व्यापून (Overlapping) समभार होतात, तेव्हा ते दोन्हीहि नाहीसे होतात; जिच्यावर कांहीच लिहिलेले नाही, अशी मन:स्थितीची कोरी पाटीच शिल्लक राहते; व ह्या अवस्थेंत, सत्याचे विकृतरहित प्रतिबिंब पडतें. प्रत्यक्ष आत्म्यावर कोणतेच छाप बसत नसतात. सर्व संस्कारांची रचना आत्म्यावर होत नसून, मनावर होत असते. आत्मा हा नित्य शुद्धच असतो, पण जेव्हा मन स्वच्छ आरशाप्रमाणे होते, तेव्हाच त्याच्यांत सत्य प्रतिबिंबित होते. चांगल्यावाईटाच्या समग्र संस्कारांचा लोप झाला, म्हणजे मनाला आत्मदर्शन होते. ही ज्ञप्ति (Illumination) आहे. पण आत्मा, हा मनाहून भिन्न व मनापलीकडचा परमात्मा असल्यामुळे, मनाला आत्मदर्शन होणें व आत्म्याला स्वानुभूति होणें, ह्या गोष्टी एकमेकांहून निराळ्या आहेत. **सत्यस्वरुप आत्म्याला जर स्वत:चे यथार्थ ज्ञान करुन घ्यावयाचें असेल, तर मनाला आत्मदर्शन झाल्यानंतरहि, ते मन आत्म्यांत लय पावलें पाहिजे. हीच स्वानुभूति होय. ह्या अवस्थेंत, चांगल्या व वाईट संस्कारांसह, मनच विलुप्त होऊन जातें. ही पापपुण्यातीत व मनापलीकडील अवस्था आहे. ह्या अवस्थेच्या दृष्टीने, अनंत प्रेम, शांति, आनंद व ज्ञान यांचा जणू सागरच, अशी एकच अविभाज्य सत्ता राहते. ह्या अवस्थेंत, चांगलेहि राहात नाही, व वाईटहि राहत नाही, तर या दोहोंचा समावेश करणारें, खंडरहित परमात्मजीवनच उरतें. व म्हणून या अवस्थेमध्ये, चांगल्यावाईटांमधील निरंतर संग्रामाचा अंत होतो.**

याप्रमाणे, ईश्वराचें अंतरहित प्रेमस्वरुप, प्रथम रुपमय सृष्टीमध्ये स्वत:स ससीम करते; व नंतर, सृष्टीच्या निरनिराळ्या अवस्थांमधून, स्वत:ची अनंतता पुन: प्राप्त करते.

दैवी प्रेमलीला.

सीमित प्रेमी असल्याच्या अनुभवाच्या सर्व अवस्थांचे संक्रमण होत जाऊन, अखेरीस ईश्वर स्वत:ला एकमात्र प्रियतम (sole beloved) असल्याचे अनुभवतो. **आत्म्याचा प्रवास, म्हणजे एक अद्‌भुतरम्य व दिव्य प्रेमलीला आहे. ज्या प्रेमीला सुरवातीस केवळ रिक्तता, विफलता, फोलपणा व जखडून टाकणाऱ्या बंधनशृंखला, याचीच जाणीव असते, त्यालाच क्रमाक्रमाने, प्रेमाची अधिकाधिक पूर्ण व मुक्त अभिव्यक्ति लाभते; व अखेरीस, तो प्रेमी दिव्य प्रियतमा (divine beloved) मध्ये, लय व अंतर्धान पावून, परमश्रेष्ठ व चिरंतन सत्य असलेल्या ईश्वराच्या अंतरहित प्रेमस्वरुपामधील प्रेमी व प्रियतमाच्या मूलभूत ऐक्याचा त्याला आत्मप्रत्यय येतो.**



**प्रेमाचे अत्यंत मर्यादित स्वरुप आहे. कामवासनेमध्ये, इतर व्यक्तींचा स्पष्ट संबंध अभिप्रेत असला, तरी ती मुळांतच केवळ निर्भेळ स्वार्थपरता आहे; कारण, ज्या ज्या विषयांवर ती आसक्त होते, ते सर्व विषय पृथक् जीवाभावाच्या दृष्टीनेच व पृथक् अहंजीवनाकरताच कमनीय बनतात.** पण असे असले, तरी कामवासना हे एक प्रेमाचेंच रुप आहे, कारण, तिच्यांत दुसऱ्या व्यक्तीबद्दल एक प्रकारची गुणग्राहकता (appreciation) असतें. पण ही गुणग्राहकता खऱ्या आत्मतत्त्वाबद्दलच्या घोर अज्ञानामुळे, पूर्णपणे दूषित व विकृत झाली असते.

प्रेमाची कामवासनेच्या रुपांत अभिव्यक्ति.

मानवी चेतना जेव्हा स्थूल जगताच्या द्वैतांत फसलेली असते, तेव्हा प्रेम कोणत्यातरी प्रकारच्या विषयवासने (lust) च्या रुपांतच व्यक्त होऊं शकते; दुसऱ्या रुपांत व्यक्त होऊ शकत नाही. माणसाला कढी आवडते, कारण तींत जिभेचे चोचले पुरविले जातात.

स्थूल जगतांतील प्रेमी

ह्यांत उच्चतर विचारांचा अभाव असल्यामुळे, हा विषयवासनेचाच एक प्रकार आहे. ती रसनेची स्वादसंवेदनेची तृष्णा आहे. त्याचप्रमाणे, मनाला शद्बस्पर्शरुपगंधादि इंद्रियसंवेदनांच्या रसास्वादनाची तृष्णा असते. व ह्या संवेदनेने होणाऱ्या उत्तेजना (excitement) च्या द्वारां मन कनिष्ठ प्रकारच्या अहंजीवनाचा परिपोष करते. **कोणत्याहि प्रकारची विषयवासना घेतली, तरी ती आंतील आत्मतत्त्व सोडून, स्थूलरुपाशीं संबद्ध होत असते. ती केवळ इंद्रियांच्या पदार्थावरील आसक्तीचें रुप आहे; व सर्व प्रकारच्या विषयवासनेमध्ये, हृदय अतृप्त व अनभिव्यक्त (unexpressed) रहात असल्यामुळे, त्यांत चिरस्थायी रिक्तता (emptiness) उत्पन्न होऊन, विफलता व दु:ख यांचा सतत अनुभव येतो.**

शंभर टक्के किंवा निर्भेळ विषयवासनेच्या स्वरुपांत, जेव्हा प्रेम अभिव्यक्त होतें, तेव्हा तें अत्यंत सीमित असतें, कारण ते निरन्तर तृष्णेच्या कचाट्यांत सांपडलेले असते. **अंत:करणावर, जेव्हा विषयवासनेची पकड बसते, तेव्हा आत्म्यावर एक प्रकारची भ्रमरुपी**

निर्भेळ विषयवासना ही अत्यंत ससीमतेची स्थिति आहे.

**झांपड पडते. अज्ञानबंधनामुळे अंत:करणाचे व्यापार घटतात, व दूषितहि होतात; त्याच्या श्रेष्ठतर क्षमतां (potentialities) ना, अभिव्यक्ति व परिपूर्णता (fulfilment) मिळत नाही. आणि आत्मजीवना (life of the spirt) ची जी ही अवरोधनरुप गळचेपी होते, तिच्यामुळे घोर बद्धावस्था अवश्य निर्माण होते.**

अज्ञानशृंखलेमध्येच क्रियाशील होणाऱ्या प्रेमाचे विषयवासना एक अत्यंत सीमित

विषयवासनेमध्ये अनंततेचे आत्मप्रतिष्ठापन अप्रत्यक्ष असते.

स्वरुप आहे. परंतु, विषयवासनेवर अपर्याप्ततेचा जो स्पष्ट शिक्का मुद्रित असतो, त्यावरुन ती कोणत्यातरी विशाल, अनंत व गंभीरतर तत्त्वाची अपूर्ण व व्यंगपूर्ण अभिव्यक्ति

आहे, हे स्पष्टपणे सूचित होते.

स्थूल क्षेत्रांतील अत्यंत हीन काममय जीवनांत देखील, ईश्वर स्वत:चा प्रेमी म्हणूनच अनुभव घेत असतो; पण त्या प्रेमीला, स्वत:च्या व प्रियतमाच्या खऱ्या स्वरुपाविषयी अज्ञान असते. त्या स्थितींत, प्रेमी प्रियतमापासून, ज्याचें स्वरुप अद्याप मुळीच ओळखले गेले नाही, अशा द्वैतरुपी अपारदर्शक पडद्यामुळे, विलग्न केला गेला असतो; **तरी, ही स्थिति, म्हणजे ज्या विकासक्रमाने, प्रेमी अज्ञानाचे आवरण तोडून, स्वत:च्या असीम व अनिरुद्ध प्रेमाची सत्यता अनुभवतो, त्या विकासक्रमाची सुरवातच असते.** परंतु, अनंत प्रेमांत प्रविष्ट होण्याकरता, प्रेमीला सूक्ष्म (subtle) व मनोमय (mental) जगतांतील, अशा आणखी दोन अवस्थांतून जावें लागतें.

प्रेमाच्या तीन अवस्था.

सूक्ष्म क्षेत्रांतील प्रेम कामरहित नसतें; पण ही कामवासना, स्थूल क्षेत्रांतील कामवासनेप्रमाणे, निर्भेळ किंवा अमिश्रित नसते. सूक्ष्म क्षेत्रांतील कामाची तीव्रता, ही स्थूल क्षेत्रांतील कामाची तीव्रता, ही स्थूल क्षेत्रांतील कामाच्या जवळ जवळ निम्मी असते. शिवाय स्थूल क्षेत्रांतल्याप्रमाणे, सूक्ष्म क्षेत्रांत, कामाला स्थूल अभिव्यक्ति (gross expression) मिळत नाही. स्थूल जगांतला प्रेमी जड पदार्थांशीं संबद्ध असतो; व म्हणून, त्याचा काम स्थूल रुपाने व्यक्त होतो. पण सूक्ष्म क्षेत्रांतील प्रेमीची जड पदार्थांवरील आसक्ति गळून गेली असल्यामुळे, त्याचा काम स्थूल रुपांत अनभिव्यक्त राहतो. त्याच्या कामवासनेला सूक्ष्म प्रादुर्भवन मिळते, परंतु स्थूल अभिव्यक्ति मिळत नाही. शिवाय, जड जगतांतील कामवासनेच्या जवळ जवळ अर्ध्या भागाचे सूक्ष्म क्षेत्रामध्ये उन्नयन किंवा उदात्तीकरण (sublimation) होत असल्यामुळे, सूक्ष्म क्षेत्रांतील प्रेमीला, स्वत:चे प्रेम अमिश्रित कामवासनेच्या स्वरुपांत अनुभवास न येतां, **ते प्रेम तो प्रियतमाशीं ऐक्य पावण्याच्या आकांक्षे (longing) च्या स्वरुपात अनुभवतो.**

सूक्ष्म क्षेत्रांतील प्रेम.

ह्या प्रमाणे, स्थूल क्षेत्रांत, प्रेम कामरुपाने व्यक्त होतें; व सूक्ष्म क्षेत्रांत ते आकांक्षे (longing) च्या रुपाने व्यक्त होते. काम ही इंद्रियसंवेदने (sensations) करता तृष्णा आहे; व म्हणून, त्याचा हेतु पूर्णपणे स्वार्थपर असतो. त्यांत, प्रियतमाच्या कल्याणाबद्दल, यत्किंचित्‌हि आस्था नसते. पण आकांक्षेमध्ये, स्वार्थाचे प्रमाण कमी असते; व आकांक्षादेखील, एकप्रकारे ग्रहणशील (possessive) असली, तरी तिच्यामध्ये प्रियतमाचें स्वत:चें महत्त्व व त्याचा गौरव, यांची साक्ष पटलेली असते. कामवासनेपेक्षा, आकांक्षा प्रेमाचें कमी सीमित स्वरुप आहे. आकांक्षेमध्ये, द्वैतरुपी पडदा अधिक पारदर्शक व कमी अवरोधक बनतो; कारण आकांक्षेमध्ये, प्रियतमाचे सान्निध्य संपादन करुन, प्रेमी व प्रियतम यांच्यामधील द्वैतावर, विजय मिळविण्याचा ज्ञानपूर्वक प्रयत्न होत असतो. **कामवासनेंत सीमित अहंतेलाच महत्त्व असतें; व प्रियतमाला आहंकारिक स्थूल गरजांच्या पूर्तीचे साधन म्हणून, गौण स्थान असतें.**

आकांक्षेच्या रुपांत प्रेम.



**पण आकांक्षेंत, अहंतेला व प्रियतमाला समान महत्त्व मिळून, प्रियतमाचें अस्तित्व ज्याप्रमाणे स्वत:करता आहे, त्याचप्रमाणे स्वत:चें अस्तित्वहि प्रियतमाकरिताच आहे, ही जाणीव प्रेमीला असते.**

मनोमय क्षेत्रांतील प्रेमीच्या प्रेमाची याहूनहि श्रेष्ठतर व मोकळी अभिव्यक्ति होत असते. त्याच्याहि बाबतींत काम पूर्णपणें नष्ट झालेला नसला, तरी त्याचे बव्हंशी उदात्तीभवन (sublimation) झालेले असतें. मूळच्या स्थूल क्षेत्रांतील कामवासनेंतून, जवळ जवळ एक-चतुर्थांश कामवासना उरलेली असते; पण ती सुप्तच राहून, कोणत्याहि स्वरुपांत व्यक्त होत नाही. **मनोमय क्षेत्रांत, कामाला सूक्ष्म अभिव्यक्तिहि मिळत नाही. मनोमय क्षेत्रांतील प्रेमी सूक्ष्म पदार्थांविषयीही अनासक्तच राहतो; व तो सूक्ष्म जगांतील प्रेमीच्या प्रियतम प्रियतम-प्राप्तीच्या ग्रहणशील लालसेपासून मुक्त होतो.**

मनोमय क्षेत्रांतील प्रेमी.

मनोमय क्षेत्रामध्ये, **प्रेम प्रियतमाच्या इच्छेचा पूर्ण स्वीकार करण्याच्या द्वारा व्यक्त होतें;** त्याच्यांत प्रियतमाच्या सान्निध्याची व तशीच इतर सर्व प्रकारची लालसा लुप्त झाली असते. आता, प्रियतमाच्या गौरवाला व इच्छेलाच प्रधानता दिली जाते; व स्वार्थपरतेचे पूर्ण प्रक्षालन होऊन, **शुद्ध स्वरुपांत, प्रेमाचें यथेष्ट विमोचन होते.** परंतु मनोमय क्षेत्रांत सुद्धा, द्वैताचा पातळ पडदा, प्रेमी व प्रियतम यांना विलग्न करीत असतो; व म्हणून, प्रेम अनंत बनत नाही. आता, प्रेम स्वार्थपरतेच्या पंजांत सांपडलेलें नसतें. परंतु ज्याप्रमाणे, खालील क्षेत्रांत, प्रेम जडसूक्ष्म देहांच्या माध्यमांतून अनुभविलें जातें, त्याचप्रमाणे मनोमय क्षेत्रामध्ये, **तें प्रेम सीमित मनाच्या द्वारा अनुभविले जातें.** व म्हणून, ते अजूनहि अंतरहित झालेच नसतें.

प्रेमाची शरणागतीच्या रुपांत अभिव्यक्ति.

व्यष्टिमन समाक्रान्त (transcend) झाले, म्हणजे प्रेमाला जाणीवयुक्त अनंतसत्ताविस्तार व अभिव्यक्ति प्राप्त होते. ज्या स्थितीमध्ये, द्वैतावर पूर्ण विजय मिळविला असतो, अशा परमात्मस्थितींतील ह्या प्रेमालाच, ईश्वरीय प्रेम अशी संज्ञा देतां येईल. ईश्वरीय प्रेमामध्ये, विषयवासनेचा लेशहि शिल्लक राहिला नसतो; त्या प्रेमामध्ये, विषयवासना सुप्तस्वरुपांतहि राहत नाही. मूलत: व अभिव्यक्तीमध्येहि, ईश्वरीय प्रेम सीमातीत असतें; कारण आतां, आत्मा स्वत:च्याच द्वारां त्या प्रेमाचा अनुभव घेतो. जडसूक्ष्म व मनोमय क्षेत्रामध्ये, प्रेमीला आपण स्वत: प्रियतमापासून अलग असल्याची जाणीव असते; परंतु, ह्या सर्व क्षेत्रांचे संक्रमण केल्यावर, प्रेमीला प्रियतमाशी असलेल्या स्वत:च्या ऐक्याची जाणीव प्राप्त होते. प्रेमी, हा प्रियतमाच्या सत्ताविस्तारांत लय पावून, आपण स्वत: त्या प्रियतमाशीं एकरुप आहोत, हें जाणतो. ईश्वरी प्रेमांत, सीमित अहंकाराचें किंवा वासनांचे दास्य नसतें. **या अंतरहित स्थितीमध्ये, प्रेमीला प्रियतमाहून निराळे असें स्वतंत्र अस्तित्वच उरत नसून, तो प्रियतमच बनतो.**

ईश्वरीय प्रेमाला अंतच नाही.

त्यांचे देह दिसूं शकतात; व ते दुसरे आत्मे त्यांना मूर्तरुप मानतात. पण त्यांचे देह केवळ निरीक्षकांच्या दृष्टीनेच अस्तित्वांत असतात. सूफी भाषेंत अशा ईश्वरप्राप्त पुरुषांना 'मज्झूब' म्हणतात. 'मज्झूब' आपल्या शरीरांचा उपयोग जाणीवपूर्वक करीत नाहीत, कारण त्यांची जाणीव सर्वस्वी ईश्वराकडेच वळलेली असते व ती देहाभिमुख किंवा विश्वाभिमुख नसते. त्यांच्या स्वतःच्या दृष्टीने, त्यांच्या शरीरांना किंवा रुपमय सृष्टीला मुळी अस्तित्वच नसतें; तेव्हा त्या रुपमय सृष्टींत, आपल्या शरीरांचा उपयोग करण्याचा मुळी प्रश्नच उत्पन्न होऊं शकत नाही. परंतु 'मज्झूब' जरी जाणीवपूर्वक आपल्या शरीरांचा उपयोग करीत नाहीत, तरी त्यांना प्राप्त असलेल्या असीम आनंद, ज्ञान व प्रेम, यांच्या स्वभावतःच होणाऱ्या नित्य प्रसरणक्रियेचे, त्यांचे देह हे विसर्जनबिंदू बनतात; व जे त्यांच्या देहांची पूजा करतात, त्यांना त्यांच्यांतून प्रवाहित होणाऱ्या ईश्वरत्वामुळे, महान् आध्यात्मिक लाभ होतो.

कांही ईश्वरप्राप्त पुरुष सृष्टीविषयी उदासीन असतात.

कांही ईश्वरप्राप्त पुरुषांना, ईश्वरानुभूतीबरोबरच इतर बद्ध स्थितीतील आत्म्यांचीहि जाणीव असते; पण ते सर्व परमात्म्याचेच अंश असून, त्यांना कधीतरी मोक्ष व ईश्वरानुभूति मिळणारच, हेंहि त्यांना माहीत असते. व ह्या ज्ञानांत पक्के आरुढ झाल्यामुळे, बद्ध स्थितींतील आत्म्यांच्या नशिबीं येणाऱ्या अल्पजीवी व परिवर्तनशील वांट्याकडे ते दुर्लक्ष करतात. त्यांनी स्वतः ईश्वर मिळविला, त्याचप्रमाणे इतर आत्मेहि, कधी काळी, ईश्वर मिळविणारच, हे ते जाणतात. बद्ध जीवांना ईश्वरानुभूति लवकर मिळवून देण्याची घाई त्यांना नसते; व सृष्टींतील कालप्रवाहांत ते फारसे सक्रिय लक्ष घालीत नाहीत.

ईश्वर पुरुष.

कांही ईश्वरप्राप्त पुरुषांना, ईश्वरानुभूतीबरोबरच सृष्टीची व स्वतःच्या देहांचीहि जाणीव असते. बद्ध स्थितींतील जीवांबद्दल ते सक्रिय सहानुभूति ठेवतात; व **इतर जीवांना, ईश्वराकडे जाण्याच्या कार्यांत, मदत व्हावी, म्हणून ते सृष्टीमध्ये स्वतःच्या देहांचा ज्ञानपूर्वक उपयोग करतात.** ईश्वरानुभूति असलेल्या अशा महात्म्यास 'सालिक', 'सद्गुरु,' किंवा ईश्वरपुरुष' म्हणतात. सालिक किंवा सद्गुरुला, स्वतः आपण विश्वाच्या केन्द्रस्थानी असल्याचें आढळून येतें; व उच्चनीय किंवा भलेबुरे सर्व आत्मे त्याच्यापासून सारख्याच अंतरावर असतात. सूफी परंपरेमध्ये, ह्या केन्द्राला 'कुतुब' म्हणतात. कुतुब, आपल्या कार्यकर्त्यांच्या द्वारें, अखिल विश्वाचें संचालन करतो.

अवतार.

जो सद्गुरु, उत्क्रान्तीमधून, सर्वांच्या आधी ईश्वरपुरुष बनून निघाला, व जो पुढे इतर जीवांना मदत करीत राहिला, त्याला '**अवतार**' म्हणतात. साधारण सद्गुरु व अवतार, यांच्यामध्ये आणखी एक फरक आहे. सद्गुरु जेव्हा विश्वकार्य करीत नसेल, तेव्हा त्यांचे मन अनंततेकडे प्रवृत्त होते; व सृष्टींत अवतीर्ण होणे, त्याला फार जड जातें. अशा वेळी, स्थूल वस्तू व क्रियांच्या क्षेत्रांत



# १६ : ईश्वरपुरुष

## भाग १ ला

## साधक व ईश्वरप्राप्त पुरुष

ईश्वरोन्मादाचा आनंद.

ईश्वरानुभूतीपूर्वीहि, उन्नत साधकांना ज्या अवस्थांचा अनुभव घ्यावा लागतो, त्या, कांही बाबतींत, ईश्वरानुभूती (God-realisation) सारख्या असतात. उदाहरणार्थ, **उन्मत्त स्थितीतील 'मस्त' व उच्च भूमिकेंत आरुढ झालेले संतगण, हे पूर्णपणें निःस्पृह असून, ईश्वरोन्मादाच्या आनंदांत मग्न असतात.** त्यांचे सर्व लक्ष्य ईश्वराकडेच असतें; म्हणून, आनंदरुप ईश्वरी अवस्थेप्रमाणेच, तेहि अद्वितीय आनंदाचे भागीदार बनतात. ईश्वराशिवाय त्यांना दुसरा प्रियतम नसतो; व ईश्वराव्यतिरिक्त त्यांना आणखी दुसरी कशाचीहि इच्छा नसते. त्यांच्या दृष्टिने, ईश्वर हा एकमात्र प्रियतम असतो, इतकेंच नव्हे, तर त्यांच्याकरिता, ईश्वर हीच एकमात्र सत्य व महत्त्वपूर्ण वस्तु असते. ईश्वर सोडून इतर सर्व वस्तुजाताबद्दल, ते अनासक्त राहतात; व जगांतील इतर माणसांप्रमाणे, ते सुखदुःखांच्या आघातांनी विकल होत नाहीत. आनंदाचा सागरच असलेल्या आपल्या ईश्वरी प्रियतमाशीं सर्व काल सम्मुख असल्यामुळे, तेहि आनंदमय असतात.

उन्नत साधकांचे सामर्थ्य.

उन्नत साधकांना दैवी अवस्थेतील कांही विशेष अनुभव तर मिळतातच; परंतु त्याबरोबरच, त्यांना महान गुप्त शक्ति किंवा ह्या नियंत्रित शक्तींच्या प्रकाराप्रमाणेच, त्या शक्ति मिळविलेल्या साधकांच्याहि भिन्न भिन्न श्रेणी आहेत. उदाहरणार्थ, प्रथम भूमिकेवर, साधकाला सूक्ष्म जगतांतील प्रकाश, रंग, सुवास व संगीत यांचा अनुभव येतो. जे याहून पुढे जातात, त्यांना दूरवरच्या गोष्टी दिसतात व ऐकूं येतात. कांही साधकांना, सर्व स्थूल सृष्टि मृगजलवत् भासते. कांही उन्नत साधक, मृत्यूनंतर, एकदम दुसरें नवीन शरीर धारण करतात. सद्गुरुच्या कांही कार्यकर्त्या चा स्थूल जगावर इतका ताबा असतो, की ते स्वेच्छेने देह बदलूं शकतात; त्यांना सूफी परंपरेमध्ये 'अब्दल' म्हणतात.

परंतु, साधकांच्या या सर्व सिद्धींचा संबंध भासमान (phenomenal) जगताशींच असून, त्यांचा व्यापार भ्रममय क्षेत्रांत होत असतो. जे असाधारण चमत्कार हे साधक करतात, त्यावरुन, ते ईश्वरावस्थेच्या अधिक जवळ असतातच, असें मात्र सिद्ध होत नाही.

साधकांच्या भिन्न अवस्था.

चेतनास्थितीच्या दृष्टीनेहि, साधकांचे ते ज्या मार्गांनी पुढे गेले असतील, व ज्या प्रमाणांत ईश्वरावस्थेच्या सन्निध गेले असतील, त्यावरुन निरनिराळे प्रकार पडतात. काहींना, आपल्या असाधारण शक्तींचा मद चढून, व त्या शक्तींचा उपयोग करण्याच्या मोहास वश होऊन, ते आपल्या ईश्वराकडील प्रगतिपथावर, बराच वेळ विश्रान्ति घेतात. मधील भूमिकांच्या चेतनावस्थेंतच ते अटकून जातात. कांही साधक चकित होतात, गोंधळून जातात किंवा आत्मसंभ्रमांत फसतात. कांही एखादी शारीरिक क्रिया पुन:पुन: करुन, किंवा एखादें विशिष्ट वाक्य अनेक वेळां उच्चारुन, तद्वारां साधक, ईश्वरोन्मादामुळे, स्थूल जीवनाविषयी इतके उदासीन होतात, की त्यांचे बाह्य व्यवहार वेड्यासारखे दिसतात; व कांही आपली व्यवहारांतील कर्तव्यें करीत, मोक्षमार्गाचें आक्रमण करतात.

उन्मत्त अवस्था.

आपल्या उत्तान अवस्थेमुळे, कांही उन्नत साधक पूज्य होतात. परंतु आध्यात्मिक सौंदर्य, किंवा अंतस्थ चेतनेची पूर्णता, किंवा सामर्थ्य-या बाबतींत, ईश्वरप्राप्त पुरुषाशी त्यांची तुलना कोणत्याहि दृष्टीने होऊं शकत नाही. सहाव्या भूमिकेपर्यंतच्या सर्व साधकांची जाणीव मर्यादित असते; व ते सर्व द्वैतमय व भ्रमात्मक क्षेत्रांतच असतात. साधक बहुधा आनंदात असतात; व तो आनंद ईश्वराचें सान्निध्य व ईश्वराशी होणारें त्यांचे हितगुज यांतून निर्माण होतो. कांही साधकांचा ईश्वरी प्रियतमाशी अंतस्थ सख्यसंबंध जुळतो; व आनंदातिरेकाने त्यांचा तोल नाहीसा होतो. **ईश्वरमस्तीच्या अदम्य अवस्थेंत,** ते लोकांना शिव्या देतात, किंवा त्यांच्यावर दगड फेकतात; व त्यांची बाह्य वर्तणूक अगदी भुतासारखी असते. ह्या स्थितीला **उन्मत्त अवस्था** म्हणतात. ईश्वरी प्रियतमाशीं आंतरिक सहवास प्राप्त झाल्यामुळे, कांही साधकांमध्ये हर्षोद्रेकाचा अतिरेक होऊन, ते व्यावहारिक मर्यादा व सांसारिक मूल्यें, यांची अवहेलना करतात. पूर्ण अनासक्तीमुळे अगदी भयरहित होऊन, त्यांचे बाह्य वर्तन इतकें उच्छृंखल होतें, की लोक त्याला मर्यादारहित स्वेच्छाचार किंवा तऱ्हेवाईकपणा समजण्याची चूक करुं शकतात.

पूर्ण साम्यावस्था सातव्या भूमिकेंत येते.

सातव्या भूमिकेवर जेव्हा आत्म्याला ईश्वरानुभूति होते, तेव्हाच त्याला आपल्या आनंदातिशयावर पूर्ण ताबा येतो. **अद्वैतांतील समस्थितींत तो नेहमीकरता स्थिर झाल्यामुळे, सदैव मिळणारा त्याचा असीम आनंद त्याला अस्थिर करुं शकत नाही.** त्याच्याकरिता, नूतनप्राप्त प्रेम व आनंद, यांचा अतिरेक राहत नाही; साधकाचे स्थितीतील निकटतर सानिध्य मिळाल्या बद्दलचा वर्धमान अल्हादाचा प्रचंड प्रवाह त्याला प्रसंगानुसार अस्थिर करीत



नाही कारण, आता त्याने ईश्वराशीं अविच्छेद्य एकता प्राप्त केली असते. आपल्या दैवी प्रियतमामध्ये विलीन झाल्यामुळे; त्याचें स्वत्व नष्ट झालें असतें; व ईश्वराशीं ऐक्य पावून, तो आनंदाचा मर्यादारहित महासागरच बनतो.

ईश्वरप्राप्त पुरुषाचा आनंद अन्याश्रित नसून, स्वयंभू असतो.

ईश्वरप्राप्त पुरुषाचा आनंद उपाधिरहित व आत्मनिर्भर असतो; त्यामुळे तो नित्य सम असतो; व त्यांत चढउतार राहत नाही. त्याला असंदिग्ध अंतिम ज्ञान व अचल समता प्राप्त होते. **संतांचा आनंद दैवी प्रियतमाशीं वर्धमान सामीप्य व सख्य मिळाल्यांमुळे उत्पन्न होतो; तरीहि त्यांच्याकरिता, त्यांचा प्रियतम बहिर्भूत द्वितीयच (externalised another) बनलेला असतो. परंतु, ईश्वरप्राप्त पुरुषाचा आनंद ईश्वरावस्थेंतील अविभेद्य अंग असतो; व त्यांत द्वैत उरत नाही. संतांचा आनंद परतंत्र असतो; तर ईश्वरपुरुषाचा आनंद स्वयंसिद्ध असतो. संतांचा आनंद ईश्वराच्या अनुग्रहाच्या वर्धमान प्राप्तीवर अवलंबून असतो; परंतु ईश्वरप्राप्त पुरुषाचा आनंद नुसता जसाच्या तसा असतो.**

सृष्टिशी असणाऱ्या संबंधाचे प्रकार.

ईश्वरानुभूतीनंतर, मनुष्याला अनंत शक्ति, ज्ञान व आनंद प्राप्त होतात; व आंतरिक अनुभवाच्या ह्या अंगीभूत लक्षणांच्या बाबतींत, सर्व ईश्वरप्राप्त पुरुष सारखेच असतात. परंतु, त्यांच्यांत जे गौण व वरवरचे भेद आहेत, त्यामुळे त्यांचे कांही प्रकार होतात. ईश्वरप्राप्त पुरुषांतील प्रकार वास्तविकपणें केवळ बाह्य भेदच असतात; व ते भेद त्यांच्या ईश्वराशीं असणाऱ्या संबंधामध्ये नसून, त्यांच्या सृष्टीशीं असणाऱ्या संबंधामध्ये असतात. सत्या (truth) च्या दृष्टीने, हे भेद इतके क्षुल्लक असतात की, त्यामुळे त्यांचें आध्यात्मिक पद (status) न्यूनाधिक होत नाही. सर्व ईश्वरप्राप्त पुरुष पूर्ण असतात. खरें पाहतां, त्यांच्यांतील भेद बाहेरच्या निरीक्षकांच्या करिताच असतात; त्यांचें एकमेकांशी तर ऐक्य असतेंच, पण शिवाय ते अखील जीवनाशी व अस्तित्वाशीं एकरुप असतात.

कांही ईश्वरप्राप्त पुरुष सर्व देहांचा त्याग करतात.

परंतु सृष्टीच्या दृष्टीने, ईश्वरप्राप्त पुरुषांतील प्रकारभेद सुनिश्चित असून, शिवाय ते विचारार्हहि आहेत. ईश्वरानुभूतीनंतर, कांही आत्मे आपल्या सर्व देहांचा त्याग करुन, आपल्या ईश्वरानुभूतीमध्ये निमग्न राहतात. त्यांच्याकरता, परमात्माच सत्य वस्तु असून, सर्व विश्व शून्यरुप असतें. सद्वस्तूच्या निर्गुण भागाशीं, ते इतके समरस झालेले असतात की रुपमय सृष्टीशीं त्यांचा कोणताहि प्रत्यक्ष संबंध राहत नाही.

'मज्झूब'.

कांही ईश्वरप्राप्त पुरुष आपली स्थूल, सूक्ष्म व कारण शरीरें कायम ठेवतात; परंतु ईश्वरानुभूतींत निमग्न राहिल्यामुळे, त्यांना आपल्या देहांच्या अस्तित्वाचें मुळी भानच नसतें. सृष्टीतील दुसऱ्या आत्म्यांना

ईश्वरानुभूतीकडे जात असतो, तेव्हा तो क्रमशः स्थूल, सूक्ष्म व कारण देहाबद्दल पूर्णपणें अचेतन होत जातो. परंतु ईश्वरानुभूतीनंतर, स्वत:च्या ईश्वरानुभुतीमध्ये किंचित्‌हि उणीव न पडूं देतां; कांही आत्मे पुन: खाली अवतरित होतात; व त्यांना सर्व सृष्टीची व स्वत:च्या स्थूल, सूक्ष्म व कारण शरीरांची जाणीव पुन: प्राप्त होते. त्यांनाच ईश्वरपुरुष म्हणतात. **ईश्वर हा स्वयमेव ईश्वराच्या दृष्टीने जाणीवपूर्वक (consciously) मनुष्य नसतो; व मनुष्य हा स्वयमेव मनुष्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक ईश्वर नसतो; नरंतु ईश्वरपुरुष हा जाणीवपूर्वक ईश्वर व मनुष्य दोन्हीही असतो.**

ईश्वरपुरुष सृष्टिप्रपंचांत फसून जात नाही.

सृष्टीची जाणीव पुन: आली, तरी ईश्वरपुरुष आपल्या आध्यात्मिक परमपदापासून किंचित्‌हि भ्रष्ट होत नाही. केवळ सृष्टीची जाणीव आध्यात्मिक दृष्ट्या घातुक नाही; तर संस्कारांमुळे सृष्टींत गुरफटून गेलेल्या जाणिवेवर, अज्ञानाचा पडदा पडल्यामुळे, आपणांत असलेल्या ईश्वरत्वाचा अनुभव घेतां येत नाही. त्याचप्रमाणे, केवळ शरीराची जाणीव आध्यात्मिक दृष्ट्या घातुक नाही, तर संस्कारांमुळे उत्पन्न होणारा देहात्मभाव घातुक असतो. जो अखिल सृष्टीचें आदिकारण व अंतिम सत्य असून, ज्यांत सकलसृष्टीचा परमहेतु पूर्ण होतो, असा अनंत परमात्मा संस्कारांमुळेच अनुभवांत येत नाही.

संस्कारांमुळे मनांत 'मी देह आहे', असा भ्रम उत्पन्न होतो; व ह्याच आत्म्यास दृश्य जगताला बांधणाऱ्या साखळ्या आहेत. संस्कारांमुळे उत्पन्न होणाऱ्या देहात्मभावामुळेच, इच्छाशक्ति विपरीत रितीने प्रगट होते व जाणिवेंत विसंगतपणा उत्पन्न होतो; केवळ शरीरविषयक जाणिवेने होत नाही. सद्‌गरु संस्कारांपासून मुक्त असल्यामुळे, स्वत: शरीरांहून भिन्न असल्याची त्यास सतत जाणीव असते; व ईश्वरी इच्छा शुद्ध स्वरुपांत व्यक्त करण्याकरिता, तो स्वत:च्या देहांचा केवळ साधन म्हणून सुव्यवस्थित उपयोग करतो. त्याचे देह, म्हणजे डोक्यास टक्कल पडलेल्या माणसाच्या कृत्रिम केसांच्या टोपा (wig) प्रमाणे होत. दिवसा कामावर जातांना, टक्कल असलेला मनुष्य केसांचा टोप डोक्यावर चढवितो व रात्रीं निजतांना काढून टाकतो. त्याचप्रमाणे, कार्य करीत असतांना, ईश्वरपुरुष आपल्या देहांचा उपयोग करतो; परंतु स्वत:चें खरें परमात्मरुप अस्तित्व, या सर्व देहांहून अगदी निराळें असल्याचें तो जाणत असल्याने, त्या देहांची त्याला आवश्यकता नसेल त्या वेळीं, तो त्या देहांच्यापासून वियुक्त असतो.

परमात्म्याच्या बदलत्या छायेमुळे ईश्वरानुभूतीला बाध येऊ शकत नाही.

ईश्वरपुरुषाला, स्वत: अनंत असून भासमान जगताच्या पलीकडे असल्याचे ज्ञान असतें; आणि सृष्टीची जाणीव कायम असूनहि, तो पूर्ण अनासक्त असल्यामुळे, सृष्टींत गुरफटून जात नाही. दृश्य जगत् ज्या अनंत आत्म्याचें मायामय रुप आहे, त्याला पूर्णपणे विसरुन, तें स्वत:सिद्ध समजण्यांतच अज्ञान आहे. सद्‌गुरुला सद्वस्तूचें, म्हणजे परमात्मा व सृष्टि, यांच्या सत्य स्वरुपाचें ज्ञान



उतरण्यास प्रवृत्त होण्याकरता, त्याला आपल्या मनावर सक्ति करावी लागते. अशा प्रसंगी, देहारुढ राहण्याकरता, सद्‌गुरु खाद्य पदार्थ मागतात, किंवा स्वत:चे केस ओढतात, किंवा स्वत:ला मारुन घेतात; त्यांना खाली ठेवण्यास, अशा प्रकारच्या कोणत्या तरी शारीरिक क्रियेची आवश्यकता असते. परंतु अवताराला तो सृष्टींतील एखादें कार्य करण्यांत गुंतलेला नसला, तरी स्वत:ची साधारण जाणीव कायम ठेवण्यांत कष्ट पडत नाहीत. खालच्या भूमिकेवर राहण्याकरिता, त्याला शारीरिक क्रियांची मदत घ्यावी लागत नाही.

जाणिवेच्या मूलभूत लक्षणांच्या दृष्टीने, व सृष्टींतील कार्याच्या स्वरुपाच्या दृष्टीने, अवतार हा इतर सद्‌गुरु व ईश्वरपुरुषांप्रमाणेच असतो. अवतार व सद्‌गुरु, ह्या दोघांनाहि मर्यादित व्यष्टिमन नसतें, कारण, अनंतात विलीन झाल्यावर, त्यांचे मन सर्वगामी होते. अवताराप्रमाणेच सालिक, सद्‌गुरु व ईश्वरपुरुषांची ईश्वरानुभूति, ते सृष्टींतील आपापले नानाविध कार्य करीत असतांना, क्षणभरहि लुप्त किंवा खंडित होत नाही; व **जेव्हा ते इतर जीवांना साहाय्य देऊं इच्छितात, तेव्हा ते आपल्या सर्वगत समाष्टिमनानेच कार्य करितात.**

# १७ : ईश्वरपुरुष

## भाग २ रा

## ईश्वरपुरुषाची अवस्था

सर्व क्षेत्रांतील विषयांमध्ये, ईश्वर हाच अभ्यासाचा सर्वश्रेष्ठ विषय आहे. परंतु, ईश्वराविषयी उदासीन राहण्यापेक्षा, त्याच्याबद्दल जिज्ञासा ठेवणें, हें केव्हाहि उत्तम असलें, तरी ईश्वरविषयक केवळ बौद्धिक ज्ञान मिळवून, साधक जीवनाच्या खऱ्या ध्येयाप्रत फारशी प्रगति करुं शकत नाही. केवळ संशयात्मा किंवा अज्ञेयवादी यांच्यापेक्षा, बुद्धीच्या द्वारा ईश्वराचा शोध करणारा मनुष्य कितीतरी अधिक श्रेष्ठ असतो. परंतु, ईश्वराच्या बौद्धिक आकलनापेक्षा, त्याचे हृदयाने आकलन करणें, (feel) हे खात्रीने अधिक चांगले असून ईश्वराचा अनुभव घेणें, हे त्याहूनहि उत्तम आहे. परंतु, ईश्वर हा अनुभवाचा विषय होतो, तेव्हाहि ईश्वरत्वाचें खरें स्वरुप अज्ञातच राहतें; काण अनुभवाचा विषय झालेला ईश्वर, साधकास बहिर्भूत बनून, त्याच्याहून निराळा राहतो. जेव्हा साधक ईश्वरामध्ये लय पावून, त्याच्याशी एकरुप होतो, तेव्हाच त्याला ईश्वराचें खरें स्वरुप समजतें. म्हणून, **ईश्वराबद्दल पूर्ण अज्ञान असण्यापेक्षा, त्याबद्दलचे बौद्धिक ज्ञान बरें; त्याच्या बौद्धिक ज्ञानापेक्षा, त्याचें हृदयाने आकलन करणें बरें; त्याचें हृदयाने आकलन करण्यापेक्षा, त्याचा अनुभव घेणें बरें; व त्याचा अनुभव घेण्यापेक्षा, त्याच्याशीं ऐक्य पावणें बरें.**

ईश्वरानुभूति ईश्वराविषयीच्या बौद्धिक ज्ञानाहून निराळी आहे.

बद्धावस्थेंतील मनामध्ये उसळणाऱ्या नानाप्रकारच्या शंकाकुशंका ईश्वरानुभूतीच्या अवस्थेंत उद्भवत नाहीत. बंधनांत असलेले जीव, आपण स्वत: कोठून आलों व कुठे जाणार, या बाबतींत नेहमी शंकाग्रस्तच राहतात. ह्याउलट, ईश्वरप्राप्त पुरुष सृष्टीच्या अंतर्यामीच्या केंद्रस्थानी असल्यामुळे, त्यांना सृष्टीचे आदि व अंत ज्ञात असतात. साधारण मनुष्य जसा स्वत:स कुत्रा न मानता,

अंतिम नि:संदिग्धता



मनुष्यच असल्याचें खात्रीपूर्वक जाणतो, त्याचप्रमाणे ईश्वरप्राप्त पुरुषास स्वत: ईश्वरच असल्याचें निश्चयात्मक ज्ञान असतें. त्याच्या मनांत याबद्दल शंका, अंधविश्वास, आत्मसंभ्रम किंवा गृहीत कल्पना नसते; तर त्याचें याबद्दलचें ज्ञान नि:संदिग्ध, निश्चयात्मक व स्थिर असतें. हें त्याचें ज्ञान, आत्मानुभूतीच्या आधारावर निरंतर अधिष्ठित असल्यामुळे, त्याला बाहेरुन पुष्टी देण्याची आवश्यकता उरत नाही; व त्याच्यावर विरोधी मतांचाहि परिणाम होत नाही. त्याच्या अंतिम नि:संदिग्धतेला, कांहीहि व कोणीहि अस्थिर करुं शकत नाही. ज्याप्रमाणे, साधारण मनुष्य स्वत:ला मनुष्याहून व्यतिरिक्त दुसरें कांही समजूं शकत नाही, त्याचप्रमाणे ईश्वरप्राप्त पुरुषहि, स्वत:स ईश्वराव्यतिरिक्त, दुसरें कांहीहि समजूं शकत नाही. परंतु, मनुष्य स्वत:स तो जें वास्तविकपणे नसतो, तें समजतो; व ईश्वर प्राप्त पुरुषाला स्वत:बद्दल यथार्थ ज्ञान असतें.

ईश्वरानुभूति हे अखिल सृष्टीचें ध्येय आहे. ऐहिक सुख कितीहि मोठे असलें, तरी ते ईश्वरानुभूतीच्या शाश्वत आनंदाची केवळ क्षणभंगुर छाया आहे; भूलोकचें ज्ञान कितीहि व्यापक असलें, तरी तें ईश्वरानुभूतीमध्ये प्रतीत होणाऱ्या केवल सत्याचें विकृत प्रतिबिंब मात्र आहे; व मानवी शक्ति कितीहि भव्य असली, तरी ती ईश्वरानुभूतींतील अनंत सामर्थ्यांचा अणुमात्र अंश आहे. **विश्वांत जें जें कांही श्रेष्ठ, सुंदर व आकर्षक आहे, व जें जें महान्, शुभ व स्फूर्तिप्रद आहे – तें सर्व ईश्वरानुभूतीमधील अक्षय व अवर्णनीय गौरवाचाच अत्यंत सूक्ष्म भाग आहे.**

ईश्वरानुभूतीचा गौरव

ईश्वरानुभूतीमधील अमर आनंद, केवल सत्य, अनंत सामर्थ्य, व अक्षय गौरव, हे फुकट मिळत नाहीत. व्यष्टीभूत आत्म्याला (individualised soul) म्हणजे जीवाला, सृष्टीच्या गर्भात प्रच्छन्न असलेला हा निधि मिळविण्यापूर्वी, उत्क्रान्ति व जन्मपरंपरेंतील द्वंद्वसंग्रामाच्या प्रसवयातनांचा अनुभव घ्यावा लागतो; व हा निधि प्राप्त करण्याकरता, जीवाला स्वत:च्या पृथक् आहंकारिक अस्तित्वा (separative ego) ची किंमत द्यावी लागते. ईश्वरत्वाच्या मर्यादारहित अवस्थेंत प्रवेश करावयाचा असेल, तर तत्पूर्वी मर्यादित व्यक्तिमत्व समूळ नष्ट झाले पाहिजे. जगांतील साधारण मनुष्यामध्ये, एका विशिष्ट नामरुपाशी संबद्ध झालेल्या मर्यादित व्यक्तित्वाच्या प्रभावामुळे, अंतस्थ परमात्म्यावर अज्ञानरुपी आवरण पडतें; व हें नाहीसें होण्याकरिता, जीवाला स्वत:च्या सीमित व पृथक् सत्तेचें नि:शेष विसर्जन करावे लागतें. जेव्हा तो स्वत: आपला यत्किंचितहि अवशेष न ठेवतां, पूर्णपणें नाहीसा होतो, तेव्हा जो बाकी राहतो तोच परमात्मा. **सीमित व्यष्टिजीवनाचें विसर्जन, म्हणजे पृथक् सत्तेच्या दृढमूल भ्रमाचे विसर्जन आहे. त्यांत एखाद्या सत्य वस्तूचा त्याग होत नसतो; तर त्यांत असत्याचा त्याग होऊन, सत्या (truth) ची प्राप्ति होते.**

ईश्वरानुभूतीचे मोल.

ईश्वरपुरुषाच्या दोन बाजू.

साधक जेव्हां आंतरिक भूमिकांचे उल्लंघन करुन,

ग्रहण करणाऱ्या माणसाचा जो संबंध जडतो, तो संबंध, त्याला मोक्ष व ईश्वरानुभूतीचें ध्येय प्राप्त होईपर्यंत, उपकारक होतो. आणि जो मनुष्य आपले सर्व जीवन व स्वकीयसर्वस्व ईश्वरपुरुषास अर्पण करुन, त्याच्या सेवेस स्वत:ला वाहून घेतो, त्याचाहि त्या ईश्वरपुरुषाशीं संबंध जडतो; व तो संबंध त्या ईश्वरपुरुषाची कृपा व मदत त्याच्यावर आमंत्रित करुन, त्याच्या आध्यात्मिक उन्नतीची गति वाढवितो. खरें पाहतां, **ईश्वरपुरुषास केला जाणारा विरोध देखील बहुधा अशा घटनेस कारणीभूत होतो, की ज्यामुळे त्या विरोधक मनुष्याची न कळत ईश्वराकडे प्रवृत्ति होते.** कारण, ईश्वरपुरुषाच्या कार्यास विरोध करीत असतांना, त्या मनुष्याला त्याचा सहवास मिळतो, किंवा त्याचा त्याच्याशी संबंध जडतो. याप्रमाणे, जो कोणी स्वेच्छेने किंवा अनिच्छेने, ईश्वरपुरुषाच्या कार्यक्षेत्रांत खेचला जातो, त्याच्या अध्यात्मजीवनास नवीन गति ही मिळतेच.

ईश्वरपुरुषाचा समागम सर्वांनाच कल्याणप्रद होतो.

ईश्वरपुरुषाचे जगांतील कार्य बहुतेक धर्मपुरोहितांना (priests) प्रिय असलेल्या कार्याहून अगदी भिन्न असते. बहुतेक सुसंघटित धर्माचे पुजारी, बाह्य विधि व समारंभ, यांना वाजवीपेक्षा अधिक महत्त्व देतात; व स्वत: ते स्वार्थ, संकुचित वृत्ति व अज्ञान, याविरहित नसल्यामुळे, ते दुर्बल व श्रद्धालू लोकांना, स्वर्गाचे आमिष व नरकाची भीति दाखवून लुबाडतात. ह्या उलट, ईश्वरपुरुष प्रेम, पावित्र्य, व्यापकता व ज्ञान, यांनी विभूषित असलेल्या अनंत जीवनांत, चिरकाल प्रविष्ट झाला असतो; व म्हणून, ज्यांना साहाय्य करावयाचे, त्यांच्या आंतरिक आत्मविकासास आवश्यक असणाऱ्या व वास्तविक महत्त्वाच्या, अशा गोष्टींतच ईश्वरपुरुष लक्ष घालतो. अज्ञानांत असलेले लोकसुद्धा, कित्येक वेळा, आत्मसंभ्रमा (self-delusion) ने किंवा बुद्धिपुरस्सर स्वार्थपर हेतूने, ईश्वरपुरुषाचीच भाषा बोलणे शक्य असतें; ईश्वरपुरुषाच्या जीवनांतील फक्त कांही बाह्य गोष्टींचेंच अनुकरण ते करुं शकतात. परंतु पूर्ण ज्ञान, असीम आनंद, व अमर्याद सामर्थ्य, ह्या बाबतींत, ते स्वत: आध्यात्मिक बंधनांमध्येच असल्यामुळे, ईश्वरपुरुषाचे अनुकरण करु शकत नाहीत; कारण हे सर्व सद्गुण ईश्वरपुरुषामध्ये परमात्म्याशी युक्त झाल्यामुळे येतात.

ईश्वरपुरुष व पुरोहित-वर्ग.

अज्ञानी लोकांत ईश्वरपुरुषाची मूलभूत लक्षणें नसतात; व आत्मसंभ्रम (self-delusion) होऊन, किंवा ढोंग म्हणून, ते ईश्वरपुरुषाचें सोंग करतात. पण त्यांच्या आत्मसंभ्रमाचा किंवा सोंगाचा भोपळा कधी तरी फुटतोच. मनुष्य जर जीवनचाकोरींत आत्मसंभ्रमामुळे फसला, तर तें त्याचें दुर्दैव समजावें, तो जें वास्तविक नाही, ते आपण आहों, अशी त्याची समजूत झालेली असते; व ज्ञान झालेलें नसतांना स्वत:स ज्ञान झालें आहे, असे त्याला वाटतें. परंतु, त्याच्यामुळे इतरांना कांही प्रमाणांत धोका असला, तरी तो स्वत:च्या विचारांत

आत्मसंभ्रम व ढोंग.



असतें. परंतु त्याच्या जाणिवेंत, यामुळे द्वैतभाव उत्पन्न होत नाही. कारण, सृष्टि ही केवळ परमात्म्याची बदलती छाया असून, परमात्मा हाच सृष्टीचें मध्यवर्ति व अनंत असें एकमेव, सत्य आहे, हें तो जाणतो. म्हणून, आत्मसाक्षात्काराला कोण्यात्याहि प्रकारचा कमीपणा येऊं न देतां, सद्गुरुला सृष्टीची जाणीव कायम ठेवतां येते; व प्रत्येक जीवास आत्मज्ञान अथवा ईश्वरसाक्षात्कार करण्याचा जो सृष्टीचा आदिहेतु आहे, तो साधण्याकरता, तो नामरुपात्मक सृष्टींत कार्य करीत राहतो.

ईश्वरपुरुष सर्वंगत समष्टिमनांतून कार्य करतो.

ईश्वरपुरुष जेव्हा ईश्वराच्या रुपातीत स्थितींतून, रुपमय सृष्टींत अवतीर्ण होतो, तेव्हा त्याला सर्वगत समष्टिमन प्राप्त होते; व त्याचे विचार, भावना व सर्व क्रिया या समष्टिमनांतून होतात. त्याच्याकरिता, मर्यादित व्यष्टिमनाचें जीवन, नेहमीकरिता समाप्त झालें असतें; द्वंद्वमूलक सुखदु:खेंहि त्याच्याकरता उरत नाहीत; व पृथक् आहंकारिक जीवनाची सारशून्यता किंवा व्यर्थ दंभ, यांचाहि त्याच्याकरिता नि:शेष अंत झाला असतो. अखिल जीवनाशीं त्याचें जाणीवपूर्वक ऐक्य असतें. **स्वत:च्या सर्वगत समष्टिमनाच्या द्वारा, ईश्वरपुरुष सर्व व्यष्टिमनांच्या सुखाचा व त्याचप्रमाणे दु:खाच अनुभव घेतो;** व बहुतेक व्यष्टिमनांमध्ये, सुखापेक्षा दु:खाचेंच विशेष आधिक्य असल्यामुळे, दुसऱ्यांच्या अवस्थेमुळे ईश्वरप्राप्त पुरुषास होणारें दु:ख, तज्जन्य सुखापेक्षा, अनंतपटीने जास्त असते. ईश्वरपुरुषास होण्याऱ्या यातना, याप्रमाणे अतिशय असल्या, तरी ईश्वरानुभूतीचा जो असीम आनंद, तो सहज व सतत आस्वादितो, त्याच्या बळावर, त्या सर्व यातना तो सहन करतो; व त्यांच्यामुळे तो प्रभावित किंवा अस्थिर होत नाही.

ईश्वरपुरुष दु:खाने विचलीत होत नाही

व्यष्टीभूत जीवात्मा ईश्वरानुभूतीच्या असीम आनंदाचा आस्वाद घेऊ शकत नाही; व अज्ञानवश होऊन, सीमित मनाशी तादात्म्य पावत असल्याने, तो संस्कारजन्य सुखदु:खांमुळे अत्यंत विचलित होतो. परंतु ईश्वरपुरुष, त्यास अवतरणसमयीं प्राप्त होणाऱ्या सर्वगत समष्टिमनाशींहि तादात्म्य पावत नाही. केवळ जगांतील आपल्या अवतारकार्याकरतांच, त्याने तें समष्टिमन धारण केलें असतें; व त्याच्याशीं तादात्म्य न पावतां, तो त्याचा केवळ उपयोग करीत असल्यामुळे, तद्द्वारां येणाऱ्या सुखदु:खांचा त्याच्यावर मुळीच परिणाम होत नाही. आपले कार्य संपल्यावर, तो आपल्या समष्टिमनाचा त्याग करतो; परंतु, जगांत समष्टिमनाच्या द्वारां कार्य करीत असतांना सुद्धा, तो स्वत:स समष्टिमनाहून भिन्न, असा अमर परमात्माच असल्याचे जाणतो.

ईश्वरपुरुष आपले अवतारकार्य संपल्यावर, आपले समष्टिमन टाकून देतो.

ईश्वरपुरुषाचें ईश्वराशी जें ऐक्य असतें, ते पूर्ण असतें; व आपल्या जागतिक कार्याकरता, तो द्वैतांत उतरतो, तेव्हा सुद्धा तो ईश्वरापासून

क्षणभरहि दुरावत नाही. त्याच्या मनुष्यत्वाच्या साधारण स्थितीत, त्याला इतरांप्रमाणेच खावे प्यावें लागतें व दुःखहि सहन करुन, त्यांच्या पातळीवर यावें लागतें; परंतु, हे सर्व करीत असतां, तो आपलें ईश्वरत्व कायम ठेवीत असल्यामुळे, त्याला शांति, आनंद व सामर्थ्य, यांचा निरंतर अनुभव येतो. उदाहरणार्थ, सुळावर चढल्यानंतर, ख्राइस्टला यातना झाल्याच; परंतु तो त्या यातनांनी चलायमान झाला नाही, कारण एक तर द्वैतसृष्टींतील प्रत्येक गोष्ट भ्रमात्मकच आहे, हे जागृत ईश्वरत्वामधील ज्ञान त्याला होतें, व शिवाय ईश्वरैक्याच्या आनंदाचा त्याला आधार होता.

आत्मसमर्पण.

ईश्वरपुरुषाला सर्वात्मभाव असतो, तो स्वतःस सर्व वस्तूंमध्ये पाहतो; व त्याच्या सर्वगत समष्टिमनांत, इतर सर्व मनांचा समावेश होतो. बंधनांत असलेल्या सर्व जीवात्म्यांशीं आपण एकरुप असल्याची सद्‌गुरुस जाणीव असते. परंतु परमात्म्याशीं असलेल्या स्वतःच्या ऐक्याच्या ज्ञानामुळे, तो जरी नित्य मुक्त असतो, तरी इतर बद्ध जीवात्म्यांशी असलेल्या एकत्वाच्या अनुभवामुळे, त्यांच्याकरिता तो बंधनांत येतो. व आत्मज्ञानाचा नित्य आनंद तो सतत अनुभवीत असला, तरी इतर जीवात्मे स्वतःचींच रुपें असल्याची जाणीव त्यास असल्यामुळे, त्यांच्या स्थितीबद्दल त्याला दुःख होत असतें. ख्राइस्टच्या आत्मत्यागाचें हेंच मर्म होय. सद्‌गुरुचा जीवनहेतु पूर्णपणें सफल झालेला असतो; तरी तो स्वतःचे देह तसेच कायम ठेऊन, अज्ञानांत असलेल्या इतर सर्व जीवात्म्यांच्या मुक्तीकरिता व त्यांना आत्मानुभव मिळविण्यास मदत करण्याकरिता, त्यांचा उपयोग करीत असतो.

द्वैतांत अद्वैतसिद्धि.

द्वैतमय सृष्टींत कार्य करीत असतांना देखील, ईश्वरपुरुष द्वैताच्या बंधनांत येत नाही. त्याच्या परमात्मस्थितींत, 'मी' व 'तूं' हे द्वैत सर्वगामी ईश्वरी प्रेमामध्ये लुप्त झालें असतें. ईश्वरपुरुषाची पूर्ण अवस्था सर्व प्रकारच्या द्वैतांच्या व द्वंद्वांच्या पलीकडे असते; त्या स्थितीत अनिर्बंध स्वातंत्र्य, अविकृत संपूर्णता, अमर माधुरी, शाश्वत आनंद, निर्मल दिव्यता व अनिरुद्ध निर्मायकता असते. ईश्वरपुरुषाची ईश्वराशीं अभेद्य एकता चिरकाल असते; द्वैतमय सृष्टींत वावरत असतांना सुद्धा, तो अद्वैतस्थितीत सुप्रतिष्ठित झाला असतो; व इतर सर्वांशीं आपलें ऐक्य असल्याचें तर तो जाणतोच, पण आपण स्वतःच एकमेवाद्वितीय असल्याचेंहि ज्ञान त्याला असतें. ज्या अवस्थेंत, ईश्वराशिवाय दुसरे कांहीहि सत्य दिसत नाही, त्या अवस्थेंतून सर्व वस्तुमात्रांमध्ये ईश्वरच पाहण्याच्या स्थितीमध्ये, तो जाणून उतरलेला असतो; त्यामुळे द्वैतसृष्टींतील त्याचें वर्तन त्याला बंधनकारक तर होतच नाही, परंतु उलट त्याच्या त्या वर्तनांत, एकमेव व सत्यस्वरुप परमात्म्याची प्राचीन गौरवश्री प्रतिबिंबित होते व तें इतरांना त्यांच्या बंधनांतून मुक्त करण्यास कारणीभूत होते.



# १७ (अ) : ईश्वरपुरुष

## भाग ३ रा

## ईश्वरपुरुषाचें कार्य

**ईश्वरानुभूति अखिल सृष्टीचें अंतरहित अंतिम उद्दिष्ट असून, ती ज्ञानयुक्त व बंधनरहित कर्माची कालातीत सिद्धि अथवा परिपाक आहे.** ईश्वरानुभूतीनंतर आत्म्याने जन्म घेतला, म्हणजे अहंप्रेरित मना ऐवजी, सर्वगत समष्टिमन सशरीर होत असतें; व जन्मपरंपरेंत अटकलेल्या अहंप्रेरित मनाप्रमाणे, त्याच्यावर कर्मबंधनाचा लेप नसतो. साधारण मनुष्य, आपल्या अदम्य तृष्णेने प्रेरित होऊन, देह धारण करतो; परंतु ईश्वरपुरुष, जगांतील भ्रमांत व बंधनांत फसलेल्या लोकांबद्दल असीम व सहज करुणेने संपन्न होऊन, अवतीर्ण होतो. बद्ध स्थितींतील जीवांचे देहधारी बनण्याहून, ईश्वरपुरुषाचें अवतरण, हें मूलतः भिन्न स्वरुपाचें असतें.

ईश्वरपुरुषाचे अवतरण कर्मबंधनाने नियत नसतें.

ज्यांना ईश्वराची अनुभूति नसते, ते आत्मे द्वैताच्याच साम्राज्यांत राहतात; व निरनिराळ्या क्षेत्रांतील त्यांच्या परस्परामधील देण्याघेण्याने, कर्मजन्य ऋण किंवा घेव यांच्या शृंखला निर्माण होतात; व या शृंखलांमधून निसटणे त्याला अशक्य होतें. परंतु, ईश्वरपुरुष अद्वैताच्या ज्ञानांत आरुढ असतो; व तो जें कांही करतो, त्याने तो स्वतः तर बंधनांत पडतच नाही, पण उलट तें इतर बद्धांच्या विमोचनास कारणीभूत होते. ईश्वरपुरुषाच्या सत्तें तून कोणीहि बहिर्भूत राहू शकत नाही; तो स्वतःस सर्वामध्ये पाहतो; व **त्यांचे सर्व कार्य अद्वैताच्या जाणिवेंतून उत्स्फूर्त होत असल्यामुळे, त्याने कितीहि अनिर्बंध देण्याघेण्याचा व्यवहार केला, तरी तो त्याला स्वतःला किंवा इतरांना बंधनकारक होत नाही.**

स्वतंत्रतेतिल बंधनरहित देणे घेणे

ईश्वरपुरुष आपल्या अनुग्रहनिधीचा वर्षाव करीत असतांना, त्या निधीचें निस्संकोच

**रविताप, पर्जन्य व वादळ यांपासून संरक्षण करतो. इतकेंच नव्हें, तर ह्या नवीन वटवृक्षांत, तसलाच आणखी दुसरा पूर्ण विकसित वटवृक्ष निर्माण करण्याची सुप्त शक्ति असते. ईश्वरपुरुष हा वटवृक्षाप्रमाणे असून, तो दुसऱ्यामधील सुप्त ईश्वरपुरुष जागृत करतो.**

प्रभु व सेवक.

ईश्वरपुरुषांची अविरत परंपरा म्हणजे मानवजातीला चिरकाल टिकणारें वरदानच आहे. कारण, ईश्वरपुरुष मानवजातीला तिच्या तिमिराच्छादित व प्रयासपूर्ण यात्रेंत पुढे पाऊल टाकण्यास साहाय देतात.

ईश्वरपुरुष हा एकाच वेळी विश्वाचा प्रभु व सेवक दोन्हीहि असतो, असें म्हणता येईल. आपल्या आध्यात्मिक अनुग्रहनिधीचा सर्वांवर मुक्तहस्ताने भरपूर वर्षाव करणारा, या दृष्टीने तो विश्वाचा स्वामी असतो; परंतु दुसऱ्यांचा भार स्वत:वर घेऊन, त्यांना अनेक आध्यात्मिक अडचणींमधून पार पडण्यास मदत करणारा, या दृष्टीने तो विश्वाचा सेवक असतो. ईश्वरपुरुष स्वामी असून सेवकहि असतो, तसाच तो परम प्रेमी व अद्वितीय प्रियतमहि असतो. त्याने प्रदान केलेलें किंवा ग्रहण केलेलें प्रेम आत्म्यास अज्ञानापासून मुक्त करतें. तो जेव्हा प्रेम करतो, तेव्हा तो अन्यरुपधारी स्वत:वरच प्रेम करतो; व तो जेव्हा प्रेमाचा स्वीकार करतो, तेव्हा त्याने ग्रहण केलेले तें प्रेम, त्यानेच सर्वांवर केलेल्या भेदरहित अनुग्रहाच्या वर्षावांतून निर्माण झालेलें असतें. पडीत किंवा पेरलेल्या सर्व प्रकारच्या जमीनींवर समतेने पडणाऱ्या पर्जन्याप्रमाणेच, ईश्वराची कृपाहि सर्वांनाच प्राप्त असते; पण ती कृपा चिकाटीने व परिश्रमपूर्वक पेरलेल्या भूमिकेतच फलद्रूप होते.



व कृतींत प्रामाणिक असल्यामुळे, त्याला दोष देतां येत नाही. ढोंगी माणसाला आपण स्वत: अज्ञानी असल्याचे माहित असतें, व तो स्वार्थाकरिता आपण जें वास्तविक नाही, त्याचे सोंग करतो. पण असें करीत असतांना, तो स्वत:भोवती दृढ कर्मबंध निर्माण करतो; आणि तो जरी दुर्बल व श्रद्धाळु लोकांना कांही कालपर्यंत हानिकारक झाला, तरी त्याची ती बुद्धिपुरस्सर फसवणूक चिरकाल टिकूं शकत नाही. स्वत:चे विधान सिद्ध न करुं शकल्यामुळे, त्याचें ढोंग लवकरच उघडकीस येतें.

ईश्वरपुरुष भक्ताची भूमिका घेऊं शकतो.

आपल्या सार्वलौकिक कार्याकरिता, परिस्थितीस अनुरुप जुळवाजुळव करण्यामध्ये, ईश्वरपुरुष अत्यंत व्यवस्थापनक्षमता दाखवितो. इतरास साहाय्य करितांना, तो कोणत्याहि एका प्रणालीशीं आसक्त होत नाही. तो परंपरागत विधिनिषेधांचे अनुसरण करीत बसत नाही; तर तो स्वत:च स्वत:करिता नियम बनतो. तो कोणत्याहि उपस्थित प्रसंगास तोंड देऊन, त्या परिस्थितींत आवश्यक असलेली भूमिका धारण करुं शकतो; पण तो त्या भूमिकेने सीमित होत नाही. एकदा एका भक्ताने स्वत:च्या गुरुला त्याच्या उपोषणाचा हेतु विचारला, तेव्हा त्याने त्याला सांगितले, की 'मला पूर्णता प्राप्त झाली असल्यामुळे, माझे उपोषण मुमुक्षूप्रमाणे पूर्णता मिळविण्याकरिता नाही. मी इतरांच्याकरिता उपोषण करतों''. साधक पूर्ण पुरुषाप्रमाणे वागूं शकत नाही; कारण, पूर्ण पुरुषाचें अनुकरण अनन्यसाध्य असतें. परंतु, **पूर्ण पुरुष इतरांच्या हिताकरिता साधकाप्रमाणे वागूं शकतो.** विश्वविद्यालयांतील सर्वात मोठी परीक्षा पास झालेला मनुष्य मुलांच्याकरिता, मूळाक्षरें सहज लिहूं शकतो; पण तो करुं शकतो, ते मुलें करुं शकत नाहीत. ईश्वरपुरुषाचे ईश्वराशी पूर्णैक्य झालेलें असले, तरी भक्तांची भूमिकाहि धारण करुं शकतो. ईश्वरानुभूतीनंतरहि तो भक्तासारखा वागतो; व त्यांत, त्याचा उद्देश त्यांना मार्ग दिसावा, हाच असतो. परंतु, कोणतीहि एखादी विशिष्ट भूमिका घेण्याकरिता तो बांधला गेला नसतो; व तो आपली मदत करण्याच्या पद्धतींत, साधकांच्या जरुरीप्रमाणे योग्य तो फेरफार करुं शकतो. तो जें कांही करतो, तें दुसऱ्यांच्या अंतिम कल्याणाकरिताच करतो; व तो स्वत: सर्वरुप झालेला असल्यामुळे, त्याला स्वत:ला कांहीहि प्राप्तव्य नसतें.

मायानिरास करण्याकरता ईश्वर पुरुष मायेचाच उपयोग करतो.

इतरांना आध्यात्मिक साहाय्य देण्याच्या कार्यात, ईश्वरपुरुष कोणत्याहि एखाद्या विशिष्ट पद्धतीस तर बांधला जात नाहीच; पण शिवाय, तो चांगुलपणाविषयीच्या परंपरागत मानदंडानेहि बांधला जात नाही. तो पापपुण्यातीत असतो; परंतु, त्याचे वर्तन जगाच्या दृष्टीने नियमबाह्य भासलें, तरी त्यांत इतरांचे अंतिम कल्याणच उद्दिष्ट असतें. तो निरनिराळ्या लोकांकरिता, निरनिराळ्या रीतींचा उपयोग करतो. त्याला स्वत:चा वैयक्तिक हेतु किंवा स्वार्थ नसून, दुसऱ्यांच्या

खऱ्या हिताकरिताच तो करुणासंपन्न असतो; म्हणून, तो आपल्या सर्व कार्यांमध्ये निर्लेप राहतो. शिष्यांना मायेंतून काढण्याकरता तो मायेचाच उपयोग करतो; व आपल्या आध्यात्मिक कार्याकरता, तो अनंत मार्गांचा व रीतींचा अवलंब करतो. प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत, त्याची पद्धत अलग असतेच; पण एकाच व्यक्तीच्या संबंधीहि तो आपली पद्धत सदासर्वकाल एकच ठेवीत नाही. त्याच्या वागण्याने कधीकधी इतरांच्या मनास धक्का बसतो. त्याचें वर्तन त्यांच्या अपेक्षेस धरुन नसतें; परंतु, त्यांत नेहमी कांहीतरी आध्यात्मिक हेतु असतो. **एखाद्या बऱ्याच लांब चाललेल्या सुखस्वप्नांत, मध्येंच कांही मनास धस्स करणारा दुःस्वप्नाचा भाग असला, तर तो मनुष्य जागा होतो;** व दुःस्वप्ना प्रमाणेंच, कांही काल अप्रिय वाटणारें, पण अंती हितकर, असे धक्के ईश्वरपुरुषहि स्वेच्छेने व मुद्दाम देतो.

बुडत्यास वाचविणे.

कधीकधी, कांही माणसांच्या बाबतींत, ईश्वरपुरुष निष्कारण कठोरसा वाटतो; परंतु बाहेरुन पहाणाऱ्यांना आंतील परिस्थितीची जाणीव नसल्यामुळे, त्याच्या बाह्यतः कठोर दिसणाऱ्या वर्तनाचें खरें समर्थन त्यांच्या ध्यानांत नीटपणे येत नाही. परंतु खरें पाहतां, त्या परिस्थितीमध्ये आध्यात्मिक दृष्टीने, ती कठोरता अत्यंत आवश्यक असते; व ज्यांच्या बाबतींत तो कठोर भासतो, त्यांच्याच खऱ्या हिताकरिता त्यांचे तें वर्तन असतें. एक ह्याकरता उत्तम दृष्टान्त आहे. कसलेल्या पोहणारांना, बुडत्यास वाचविण्याकरिता, बाह्यतः कठोर वर्तन करावें लागतें. एखादा मनुष्य जर पाण्यात बुडत असला, तर जवळ असलेल्या कोणत्याहि मनुष्याला तो आवळून धरतो; व परिणामांचा विचार न करता, तो त्या पोहणाऱ्यास असे वांकडेतिकडे पकडतो, की त्याला वाचविण्यास आलेला पोहणारा तर त्याला वांचवूं शकतच नाही, पण स्वतः त्याच्या मिठीमुळे बुडतो. म्हणून, ज्याला बुडत्याला वाचवावयाचें असेल, त्याने फार दक्ष राहिले पाहिजे; व बहुधा बुडत्यास वाचविणारा कुशल पोहणारा, प्रथम त्या बुडत्याच्या डोक्यांत टोला देऊन, त्याला बेशुद्ध करतो, म्हणजे तो बुडणारा मनुष्य त्याला गैर रीतीने पकडूं शकत नाही. ह्या त्याच्या बाह्यतः कठोर दिसणाऱ्या कृतीच्या द्वारां, बुडत्यास उत्पन्न होणारा धोका कमी करुन तो त्यास यशस्वी साहाय्य देऊं शकतो. त्याचप्रमाणे, ईश्वरपुरुषाचा बाहेरुन भासणारा कठोरपणा इतरांच्या अंतिम निःश्रेयसास कारणीभूत होतो.

भ्रममय जाणिवेच्या व्यवस्था कापून काढणे.

बद्ध जीवात्मा सृष्टीत अडकलेला असतो; व सृष्टि ही केवळ कल्पनाच आहे. परंतु कल्पनेला अंत नसल्यामुळे, तो अनंत कालपर्यंत खोट्या भ्रमजालांत भ्रमण करीत राहण्याचा संभव असतो. **भ्रमाच्या निरनिराळ्या अवस्था टाळण्याकरिता, सद्गुरु त्यास सत्यस्वरुपांचे ज्ञान देऊन मदत करुं शकतो.** सत्यस्वरुपाचें ज्ञान नसल्यामुळे, मन नानाप्रकारच्या कल्पना करीत असतें.

ईश्वरानुभूतीचे बीज.



उदाहरणार्थ, आत्मा स्वतःस भिकारी किंवा राजा, पुरुष किंवा स्त्री समजतो.

याप्रमाणे आत्मा द्वंद्वांचा अनुभव गोळा करीत जातो. जेथे जेथे द्वंद आहे, तेथे तेथे समतोलता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न, विरुद्ध भावाच्या साहाय्याने होत असतो. जर एखाद्यास खून करण्याचा अनुभव असला, तर त्याची पूर्ति स्वतः खुनाचा विषय होऊन करावी लागते; व त्यास राजपदाचा अनुभव असल्यास, त्याची पूर्ती भिकारी होऊन करावी लागते. **स्वतःचा भ्रम नाहीसा न करुं शकल्यामुळे, आत्मा द्वंद्वांच्या दोन टोकांमध्ये अनिश्चित कालपर्यंत भ्रमण करीत राहण्याचा संभव असतो. जे कल्पनातरंग एरव्ही अनंत कालपर्यंत चालले असते, त्यांना आळा घालून व सत्यस्वरुपाचें ज्ञान देऊन, सद्गुरु आत्म्यास सद्वस्तु मिळविण्याकरिता मदत करितो.** बद्ध जीवात्म्यांत सद्गुरु ईश्वरानुभूतीचें बीज पेरीत असला, तरी त्यास ईश्वरानुभूति येण्याकरिता, कांही काल जावा लागतो. सृष्टींतील प्रत्येक वस्तूचा विकास होण्यास वेळ लागतो.

सद्गुरुचे साहाय्य.

परंतु, सद्गुरुच्या द्वारा मिळणारी मदत, उन्नत साधकाच्या मदतीपेक्षा, अधिक परिणामकारक असते. जेव्हा साधक मदत करतो, तेव्हा तो फार तर तो स्वतः जोपर्यंत गेला असेल, तेथपर्यंतच दुसऱ्याला घेऊन जाऊं शकतो; परंतु हें त्याचें सीमित साहाय्य देखील, अगदी क्रमशःच फलद्रूप होतें, म्हणजे ह्या साहाय्याच्या द्वारा उन्नति करणाऱ्या पुरुषाला, पहिल्या भूमिकेंत कांही काल स्थित व्हावें लागते, मग दुसऱ्या भूमिकेंत कांही काल रहावे लागतें, व याप्रमाणे पुढेहि तो विश्रान्ति घेत घेत प्रगतिकरतो. परंतु जेव्हा ईश्वरपुरुष प्रसन्न होऊन मदत करतो, तेव्हा स्वतःच्या कृपाशक्तीने, तो साधकाला एका क्षणांत सातव्या भूमिकेवरसुद्धा घेऊन जाऊं शकतो; पण अर्थातच त्या एका क्षणांतसुद्धा, साधकाला मधल्या सर्व भूमिका उल्लंघन कराव्या लागतातच.

वटवृक्षाचा दृष्टान्त.

साधकाला सातव्या भूमिकेमध्ये नेण्यांत, सद्गुरु त्याला स्वतःच्या बरोबरीचें पद देतो; याप्रमाणे श्रेष्ठतम् पद प्राप्त होऊन, साधक स्वतःच ईश्वरपुरुषापासून त्याच्या शिष्यांमध्ये होणारें हें आत्मज्ञानाचें संक्रमण, **एका दिव्याने दुसरा दिवा लावण्यासारखे आहे.** मूळ दिव्याप्रमाणेच, हा त्यापासून लावलेला दुसरा दिवाहि इतरांना प्रकाश देऊं शकतो; दोन्ही दिवे सारखेच महत्त्वाचे व उपयोगी असतात; व ह्या बाबतींत त्या दोहोंत कांहीच फरक उरत नाही. ईश्वरपुरुषाची वटवृक्षाशीं तुलना करतां येईल. **वटवृक्ष विशाल व भव्य होऊन व पांथस्थास छाया व आश्रय देऊन, त्यांचें रवितापं, पर्जन्य व वादळ यांपासून संरक्षण करतो. त्याची वाढ पूर्ण झाल्यावर, त्यांतून अवतीर्ण होणाऱ्या पारंब्या पडीत जमीनींत दूरवर शिरतात; आणि त्यांतून कालांतराने उत्पन्न होणारा पूर्ण विकसित वटवृक्षहि, तितकाच भव्य व विशाल होऊन व पांथस्थास छाया व आश्रय देऊन, त्यांचें**

निराकरण करतो. असें करणें, म्हणजे रोग्याच्या शरीरांत विकृती उत्पन्न करणारे मूलकारणच शस्त्रक्रियेने काढून, त्याला एकदम आराम देण्याप्रमाणे आहे; कारण, साधक स्वत:करिता आणखी नवीन सीमाकारक शृंखला निर्माण करीत बसत नाही, हा एक त्यापासून लाभ होतो. कोणत्याहि परिस्थितींत, मिथ्या मूल्यें व खोटा शोध, यांमध्ये साधकाला फसूं देतां येत नाही. त्यामुळे वाट चुकून, खऱ्या अध्यात्मजीवनांत प्रविष्ट होण्याच्या ध्येयाची प्राप्ति होण्याकरता, अनावश्यक विलंब होतो. गूढ सत्यांमध्ये साधकाचा प्रवेश हळूहळू होत जाऊन, त्याला दीर्घ काळच लागतो; व हा प्रवेश लवकर घडवून आणण्याकरता, सद्गुरुहि मुळीच उत्सुक नसतो. कारण, **या नवीन दिशेने होणारा अनुभवक्षेत्राचा वाढलेला विस्तार सहन करण्याची शक्ति फारच थोड्या लोकांत असते.**

गूढ अनुभवांच्या तृष्णेचे निराकरण.

प्रारंभिक अवस्थांमध्ये, गूढ तत्त्वांचा अनुभव हा अगदीच तुटकपणें येतो; व स्वत: भ्रमग्रस्त होण्याची शक्यता टाळण्याकरता, साधक कधीकधी त्यांच्या प्रामाण्य (validity) विषयी व विश्वसनीयतेबद्दल साशंक बनून, सावध राहण्याचा प्रयत्न करतो. परंतु, **गूढ अनुभवांचा स्वत:च्या प्रामाण्याविषयक अधिकाराचा खात्रीचा पुरावा बहुधा त्यांच्यामध्येच साठवलेला असतो. हा पुरावा प्रथमदर्शनी स्पष्ट दिसला नाही, तरी गूढ अनुभवांत भरलेल्या असाधारण रहस्यपूर्णता, आनंद, शांति व मार्गदर्शकत्व, या गुणांमुळे त्यांच्याकडे लक्ष्य वेधलें जाऊन, त्यांची महत्ति खात्रीने पटतेच.** ह्या गुणविशेषांच्या आधारानेच साधक खरे गूढ अनुभव व केवळ भास अथवा भ्रम, यांच्यांतील भेद जाणण्यास समर्थ होतो.

गूढ अनुभवांचे प्रामाण्य.

भास म्हणजे खोटी दृश्यें असतात. वास्तविकपणे कोणतीहि वस्तु अस्तित्वांत नसतांना, ती प्रत्यक्षपणें ऐकल्यासारखी किंवा पाहिल्यासारखी वाटणें, याला भास (hallucinations) म्हणतात. वस्तूंची केवळ कल्पना करण्याहून भास अगदीच निराळे असले व साध्या इंद्रियज्ञाना (perceptions) शीं त्यांचे साम्य असलें, तरी त्यांच्या सत्यतेबद्दल मनांत शंका राहतेच. परंतु, भ्रमा (delusion) मध्ये अधिक फसवणूक होत असते, कारण त्यांत खरोखर अस्तित्वांत असलेली वस्तु दिसते, इतकेंच नव्हें, तर तिला सत्यता व खरें अस्तित्व आहे, असा संशयरहित व खात्रीचा विश्वास असतो. **गूढ अनुभव आणि भास व भ्रम, ह्यांच्यांतील फरक जाणण्याकरिता, एक साधारणत: न चुकणारी कसोटी आहे; व ती म्हणजे भास व भ्रम, यांच्यांत नसलेली आनंदयुक्त शांति, गूढ अनुभवांत प्रत्ययास येते.** भास व भ्रम हे जागृतींतील विकार आहेत.

भास व भ्रम, यांच्याहून गूढ अनुभव कसे भिन्न आहेत, हे पाहिले पाहिजे.



# १८ : अध्यात्मजीवनातील गूढविद्येचें स्थान

## भाग १ ला

## गूढ अनुभवांचे महत्त्व

जाणिवेची आध्यात्मिक दृष्टीने मुक्तता होत असतांना, मनुष्याच्या आत्म्यामध्ये सुप्त असलेल्या अनेक गूढ शक्ति अनावृत्त होतात. अशा रीतीने त्या शक्ति अनावृत्त झाल्या, म्हणजे जाणिवेचें तत्त्वग्राहकतेचें क्षेत्र अधिक विशाल होतें. कित्येक वेळा, जाणिवेंत येणाऱ्या या नवीन तत्त्वांमुळे, चेतनेच्या विमुक्त होण्याच्या प्रक्रियेला मदत किंवा अडथळा होतो. म्हणून असाधारण व महत्त्वपूर्ण स्वप्नें, दृश्यें, सूक्ष्म जगाचे अनुभव, पारलौकिक (astral) यात्रा, इत्यादि गूढ (occult) अनुभवांचे खरें महत्त्व साधकाने समजून घेतलें पाहिजे. इतकेंच नव्हे, तर अशा प्रकारची गूढ सत्यें आणि मनोभ्रम व आभास–यांच्या मधील फरकहित त्याने जाणून घेतला पाहिजे.

असाधारण मानसिक गूढ शक्तींमुळे, मदत होऊं शकते व अडथळाहि होऊं शकतो.

साधारणत: गूढ अनुभवांच्या महत्तीची अतिशयोक्ति होत असली, तरी कित्येक वेळा, लोक त्यांच्या प्रामाण्या (validity) बद्दल साशंक असतात; व इतर मनोविषयक वैचित्र्य व विकृतीच्या बाबतीत, जसा साधारण मनुष्यास तिरस्कार वाटतो, तसाच तिरस्कार त्यांना गूढ (occult) अनुभवांबद्दलहि वाटतो. **गूढ तत्त्वांच्या ज्ञानप्राप्तींत ज्यांनी ओनाम्यासहि सुरुवात केली नसते, त्यांच्यामध्येच गूढ तत्त्वां (occult realities) बद्दल केवळ तिरस्काराची भावना प्रामुख्याने आढळून येते.** विश्वाचा बराचसा विस्तीर्ण भाग फारच थोड्या लोकांना ज्ञात असून, स्वत:ला मात्र त्या थोड्या लोकांत स्थान नाही, हे कबूल करण्यांत अभिमानाला धक्का बसतो; व गूढ विद्येबद्दल कांही लोकांना वाटत असलेल्या अकारण तिरस्काराच्या मुळाशीं, बहुधा गूढविद्या काय व कशाकरता

गूढ अनुभवांबद्दलचा तिरस्कार हा अज्ञानजन्य आहे.

आहे, या विषयीचें घोर अज्ञानच असते. अर्थातच ही तिरस्काराची वृत्ति सावधपणा व चिकित्सकता, यांहून भिन्न आहे. ज्यांच्यामध्ये सावधपणा व चिकित्सकता आहे, त्यांच्यांत नम्रता व मनाचा खुलेपणाहि असतो; व जेव्हा त्यांच्या कक्षेंत गूढ सत्यें येतात, तेव्हा त्यांना ओळखून, त्यांना मान्यता देण्याकरता ते सदैव तत्पर असतात.

कांही स्वप्नांना आध्यात्मिक महत्त्व असतें.

साधारणत: सद्गुरु साधकाला साध्या मार्गानीच मदत करतो; व त्याच्या डोळ्यांवर आवरण (veil) टाकून, त्याला पुढे नेण्याचे तो पसंत करतो. पण जेव्हा विशेष आवश्यकता असेल, तेव्हा तो त्याला गूढ माध्यमाच्या द्वारांहि मदत करुं शकतो. साधकाच्या गाढतर जीवनास उत्तेजित करण्याकरता उपयोगांत आणल्या जाणाऱ्या सर्वसाधारण साधनांमध्येच **विशिष्ट प्रकारच्या स्वप्नांचाहि समावेश होतो. कित्येक वेळां, साधकांना सद्गुरु आपली प्रथम भेट त्यांच्या स्वप्नांत जाऊन देतात.** परंतु, अशा व साध्या स्वप्नांतील फरक समजावून घेतला पाहिजे. साध्या स्वप्नांत, सूक्ष्म शरीर पाहणें, चव व वासन घेणें, स्पर्श करणें व ऐकणें, वगैरे व्यापार करीत असतें; पण ह्या सर्व व्यापारांमध्ये, आत्मा सूक्ष्म शरीराचा जाणीवपूर्वक उपयोग करीत नसतो. साधारण स्वप्नांतील वरील अनुभव उपचेतन मनाने (subconsciously) ग्रहण केलेले असून, **मनोभासस्वरुप** (subjective) असतात. ह्या स्वप्नगत अनुभवांचा विषय स्थूल प्रकारच्या क्रिया असून, ते मनांत साचलेल्या उदयोन्मुख संस्कारांचे परिणाम असतात. मात्र कधीकधी, अगदी साधारण स्वप्नासारखेंच भासणारे स्वप्नहि सूक्ष्म शरीराच्या एखाद्या **वस्तुनिष्ठ** (objective) अनुभवाचे उपचेतन मनांत पडलेले प्रतिबिंब असतें; व तें केवळ कल्पनानिर्मित नसते.

विरळ प्रकारचे स्वप्न.

बहुतेक स्वप्नें सूक्ष्म शरीराचे उपचेतन (subsconscious) अनुभव असून, भासमात्र असतात. परंतु त्यांना खास आध्यात्मिक महत्त्व नसतें. ह्या स्वप्नांच्या द्वारां, कांही नवे संस्कार उत्पन्न होतात; व कांही जुन्या संस्कारांचा व्यय होतो. त्याचप्रमाणे, ज्या प्रश्नांपासून व्यक्ति पराङमुख झालेली असते, अशा प्रश्नांवर व मनांत दडून बसलेल्या संस्कारगंड (complexes) वर, ह्या स्वप्नांमुळे प्रकाश पडतो. परंतु, अशा स्वप्नांमध्ये, व्यक्तीच्या विगत अनुभवामध्ये नसलेला असा एकहि नवीन घटक असूं शकत नाही. गतानुभवांतील घटक निरनिराळ्या नवीन संबंधांत रचणें, या व्यतिरिक्त अशा स्वप्नांत दुसरें कोणतेंहि नावीन्य असूं शकत नाही. **विरल प्रकारच्या स्वप्नांत अशी माणसे व वस्तु येतात, की ज्यांचा अनुभव त्या मनुष्यांस या जन्मांत आलेला नसतो, पण पूर्वीच्या एखाद्या जन्मांत आलेला असतो. परंतु, या किंवा पूर्वीच्या जन्मांत, कधीहि अनुभवांत न आलेली, पण कधीतरी पुढे त्याच्या आयुष्यांत येणार असलेलीं माणसें व वस्तु ज्या स्वप्नांत दिसतात, ती स्वप्नें याहूनहि विरळ असतात.** याप्रमाणे, साधारण स्वप्ने गूढ रहस्य असलेल्या स्वप्नांहून मूलत: भिन्न असतात.



गूढ अनुभवांची सुरवात.

कित्येक वेळा, साधकाच्या मनांतील आंतरिक शक्ति प्रगट होत असतांना, त्याला रहस्यपूर्ण दृश्यें (visions), प्रकाश, रंग, नाद, गंध व स्पर्श, या स्वरुपांत सूक्ष्म जगताचा मधूनमधून अनुभव येतो. सुरवातीला हे अनुभव तुटकतुटक येतात; व साधक त्यांना भ्रमरुप समजण्याचा संभव असतो. **या अनुभवांना त्याने भ्रमस्वरुप मानलें, तरी त्यांचा स्वत:सिद्ध प्रभावच असा असतो, की तो त्यांच्या द्वारा येणाऱ्या मार्गनिदर्शनाचा प्रतिकार करुं शकत नाही.** परंतु, गूढ अनुभवांचे यथार्थ मूल्यमापन करण्याची वृत्ति साधल्यास, साधकाचा आध्यात्मिक प्रवास अधिक सुगम होतो. मात्र साधकाला गूढ अनुभवांविषयीची ही समस्थिति ठेवणेंच प्रारंभीच्या अवस्थेंत अतिशय कठीण जातें.

गूढ अनुभवांविषयी समत्वाचे धोरण फारच थोड्या लोकांना साधतें.

**नवशिका साधक आंतरिक जगांतील आजपावेतो अज्ञात असलेल्या नवीन विषयांच्या नूतन ज्ञानाचें महत्त्व, वाजवीपेक्षा अधिक मानतो; व त्याच्या नवीन अनुभवांची पुनरावृत्ति होण्याची त्याची तृष्णा दुर्दम्य होते; किंवा तो त्या अनुभवांना विकारस्वरुप समजून, अत्यंत गौण लेखतो.** ह्या दोन प्रकारांपैकी, गूढ अनुभवांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देण्याची वृत्ति अधिक लोकांत आढळते. कारण, गूढ अनुभव अगदीच नवीन व विरळ स्वरुपाचे असल्यामुळे त्यांना अतिशय महत्त्व दिले जाते.

गूढ अनुभवांविषयी तृष्णा.

वास्तविक पाहतां, या नवीन सापडलेल्या क्षेत्रावरच साधकाचा अहंकार आरुढ होऊं लागतो; व स्वत:स कांहीतरी विशेष व खास लाभ मिळाला असल्याची त्याला भावना राहते. ज्या मानाने त्याला या प्रकारचे अनुभव अधिकाधिक मिळतात, त्या मानाने त्याचें क्षेत्र आणखी अधिकाधिक विस्तृत होते. औषधाची सवय लागलेल्या मनुष्याला, या सवयीपूर्वी ज्या गोष्टी औषधाशिवाय करतां येत होत्या, त्या करण्याकरितासुद्धा, औषधांच्या उत्तेजनाची जरुर भासावयास लागते; त्याप्रमाणे, अध्यात्मपथांत प्रत्येक पाऊल टाकण्यापूर्वी, गूढ शक्तींच्या उत्तेजनावर अवलंबून राहण्याची साधकाला सवयच लागते. साधकाला या धोक्यापासून वाचविण्याकरिता, गूढ गोष्टींच्या विषयीची साधकाची तृष्णा वाढूं नये, म्हणून सद्गुरु अगदी दक्षतेने काळजी घेतो. **साधकाला हवेसे वाटतील, त्यावेळी त्याला गूढ अनुभव देण्यांत येत नसून, त्याच्या आध्यात्मिक प्रगतीकरिता जेव्हा ते अगदीच आवश्यक असतात, तेव्हाच देण्यांत येतात.**

साधक अनुभवांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देत आहे, किंवा ते सुव्यवस्थितपणे व सतत वाढतच जावे, अशी तृष्णा त्यांच्या मनांत वाढली आहे, असें सद्गुरुला आढळून आल्यास, तो स्वत:च्या विशिष्ट रीतीने, साधकाच्या मार्गातील हा अडथळा दूर करण्याकरता, त्याचा शोध आडवाटेस जाण्यास कारणीभूत झालेल्या गूढ अनुभवांना दुर्बल करतो किंवा त्यांचे

**त्यांच्यापासून प्रसृत होणाऱ्या प्रकाश व प्रेम, यांच्या सतत प्रवाहामुळे, साधकाच्या अंत:करणाला अनिवार्य व प्रभावपूर्ण प्रेरणा होते.** दर्शनाचा परिणाम साधकाच्या ग्रहणशीलतेवर व प्रत्युत्तरा (response) वर अवलंबून असतो; व दर्शनास होणारी साधकाची प्रतिक्रिया ही त्याच्या पूर्वसंबंधांनी व संस्कारांनी निश्चित होत असते. पुष्कळ वेळा, गुरूच्या केवळ दर्शनानेच साधकाची पूर्ण तृप्ति होते; व त्याच्यापासून आणखी काही मिळविण्याची त्याला इच्छाच राहात नाही. गुरुच्या दर्शनानेच समाधान व अत्यानंद लाभणे, यात एक विशेष आहे; कारण त्यात अध्यात्मजीवनास अत्यावश्यक असलेले, निरिच्छता व प्रेम, हे गुण साधकात उतरले असल्याचे दिसून येते. एकदा परम प्रियतमाचे दर्शन लाभल्यावर, साधकास एकच इच्छा उरते; व ती म्हणजे त्याचे दर्शन उत्तरोत्तर अधिक मिळण्याची इच्छा. आंतरिक आध्यात्मिक प्रेरणेमुळे, साधकाला सद्गुरुचे दर्शन व सहवास शक्य तितके अधिक हवेसे वाटतात. सद्गुरुच्या दर्शनाचा पावन परिणाम त्या सहवासाने अधिक पक्का व प्रभावपूर्ण होतो. शिवाय, सहवासामुळे, साधक जीवनांतील आंतरिक भूमिकांमध्ये सद्गुरुच्या अधिक सन्निध जातो.

सद्गुरुचे चरण.

दर्शनाप्रमाणेच सद्गुरुच्या चरणी विनत होण्याचेहि फार महत्त्व आहे. पाय हे स्थूल दृष्टीने शरीरामध्ये, सर्वात खाली असले, तरी अध्यात्मदृष्टीने, त्यांचे स्थान फार मोठे आहे. स्थूलदृष्टीने, पाय चांगल्या व वाईट, सुंदर व विद्रुप, स्वच्छ व घाणेरड्या, अशा सर्व वस्तूंतून जात असले, तरी ते त्या सर्वांच्या वरच राहतात. त्याचप्रमाणे, अध्यात्मदृष्टीने, सद्गुरुचे पाय सर्व विश्वाहून श्रेष्ठ असतात; कारण, हे सर्व विश्व त्यांना मातीमोल असते. **जेव्हा लोक सद्गुरुसन्निध येऊन, स्वत:च्या हाताने त्याच्या चरणांस स्पर्श करतात, तेव्हा ते आपल्या संस्कारांचे ओझे त्याच्यावर टाकतात.** ज्याप्रमाणे साधारण मनुष्य चालतांना जमीनीवरील धूळ आपल्या पायांवर घेतो, त्याचप्रमाणे, सद्गुरु अखिल विश्वातले संस्कार स्वत:वर ओढून घेतो. सद्गुरुचें दर्शन घेतल्यानंतर, साधकाने त्याचे पाय मधुयुक्त दुधाने धुवून, त्याच्यासमोर एक नारळ ठेवण्याची, एक फार प्राचीन रुढि आहे. सहदाने लाल संस्कार व दुधाने पांढरे संस्कार अभिप्रेत होत असून, नारळाने मन अभिप्रेत होते. तेव्हा, सद्गुरुवर संस्काराचे ओझे टाकून, त्याला आपले मन अर्पण करणे, हाच या काही भागात रूढ असलेल्या, सद्गुरुस अभिवादन करण्याच्या पद्धतींचा गर्भितार्थ आहे. अशा प्रकारे आपले आंतरिक धोरण निश्चित करणे, म्हणजे अध्यात्मपंथात प्रविष्ट होण्याकरिता, पहिले अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल टाकणे होय.

मानसिक संपर्क.

एक वेळेस सद्गुरुच्या दर्शनाचा आनंद साधकाला लाभला, म्हणजे ते दृश्य त्याच्या हृदयपटलावर कोरले जाते. व व्यक्तिश: तो सद्गुरुसमागम करु शकला नाही, तरी सद्गुरुची महत्ता समजाऊन घेण्याकरिता, त्याचे



भ्रम व भास, याहून गूढ अनुभव स्पष्टपणें अलग जाणला, तरी कधीकधी त्यांत दु:खद शंकास्थान राहून, त्यांची शक्ति व प्रभाव कमी होऊं शकतात. उदाहरणार्थ, गूढ अनुभव आलेला आहे, असा मनुष्य जेव्हा या बाबतींत कांहीच गम्य नसलेल्या, इतर लोकांबरोबर त्यांच्या विषयी चर्चा करतो, तेव्हा ते लोक सदिच्छेनेच प्रेरित होऊन, विरुद्ध विचार काढतात व त्या माणसाची खात्री डळमळीत करतात. याकरिताच, पूर्वीच्या काळी, सद्गुरु शिष्याला स्वत:चे गूढ अनुभव अगदी गुप्त ठेवण्याची आज्ञा देत असत. लोकांना वाटो व ते कांहीहि म्हणोत, परंतु, आपण मात्र स्वत:च्याच आंतरिक अनुभवाचें अनुसरण करावयाचें, हें जोंवर साधक शिकत नाही, तोंवर, इतर लोकांच्या अश्रद्धेने व व्याघाताने, त्याचा गूढ अनुभव-मग तो कितीहि गाढ असो-कमी प्रभावशाली होण्याचा संभव राहतोच.

ज्याला गूढ साहाय्य मिळतें, त्यानें आत्मविश्वास वाढविला पाहिजे.

गूढ साहाय्याचा शक्य तितका फायदा घेऊन, साधकाला शीघ्र प्रगति करावयाची असेल, तर त्याने स्वत:मध्ये व सद्गुरुमध्ये, गाढ व अविचल विश्वास ठेवला पाहिजे. इतरांच्याकडून त्याने मार्गदर्शनाची अपेक्षा करुं नये; कारण, त्याचे अनुभव व त्याच्या समोरील प्रश्न, यांचे यथार्थ आकलन करण्यास समर्थ असलेले लोक फारच कमी असतात. साधकाची विचारधारा व कृति, ज्या कारणांनी निश्चित होते, तीं कारणे त्याच्या मित्रांना व नातेवाइकांना माहीत नसतील; व म्हणून, त्यांना तो साधक अगम्य राहण्याची शक्यता असते. ह्या शक्यतेचा स्वीकार करण्याकरिता, साधकाने तयार असले पाहिजे.

गूढ अनुभवांच्या प्रभावावर शंकेचा परिणाम.

गूढ अनुभव येण्याच्या वेळी, त्याच्यामुळे आध्यात्मिक प्रयत्नांना नवीन गति मिळण्याचा हेतु साधला गेला असल्यास, नंतरच्या विश्लेषणात्मक सिंहावलोकनामध्ये, तो भ्रमच होता, असें साधकाला वाटलें, तरी बहुधा त्यांत फारसा तोटा नसतो. परंतु, **कांही गूढ अनुभव साधकाला, नेहमीकरिता व सतत, मार्गदर्शक व स्फूर्तिदायक व्हावे, या उद्देशानेच प्रदान केले असतात.** ह्या विशिष्ट अनुभवांच्या प्रामाणिकतेबद्दल व अर्थपूर्णतेबद्दल साधकाने पूर्णपणे शंकारहित होण्याची आवश्यकता असते. पण गूढ अनुभवांच्याकरिता, सतत समर्थनपर पुष्टि मिळविण्याचा शोध खात्रीने अनुचितच आहे. सद्गुरुला अगदी जरुर वाटेल, तेव्हाच तो अशी समर्थनपर पुष्टि देतो. शिवाय, हे तो त्याला त्या परिस्थितीमध्ये सर्वोत्कृष्ट वाटेल, अशा रीतीने व स्वेच्छेनेच करतो. सद्गुरुची क्रियाशीलता, साधकाच्या सीमित ज्ञानामुळे उत्पन्न होणाऱ्या अपेक्षांवर,कोणत्याहि प्रकारें अवलंबून नसते; तर ती त्याच्या बंधनरहित मर्जीमध्ये उत्स्फूर्त होते. परंतु, जेव्हा आध्यात्मिक दृष्टीने आवश्यक असेल, तेव्हा **साधकाच्या नेहमीच्या कक्षेंत येणाऱ्या साधारण अनुभवांतून, त्याच्या गूढ अनुभवाकरिता समर्थनपर प्रमाण देऊन, सद्गुरु त्या गूढ अनुभवाचा प्रभाव वाढवितो.**

अध्यात्मपथांतील अधिक प्रगत अवस्थांमध्ये, सूक्ष्म जगांतील शक्तींचा अनिर्बंध उपयोग करण्याची जबाबदारी स्वीकारण्याकरिता साधकाची आध्यात्मिक तयारी होते. तेव्हा

अंतर्जगांतील प्रवास.

तो झोपेंत किंवा जागेपणी, सूक्ष्म शरीराने अंतर्जगतांतील प्रवास (astral journeys) करुं शकतो. न कळत (unconsciously) केलेल्या अंतर्यात्रां (astral journeys) ना बुद्धि पुरस्सर व पुर्ण जाणिवेणे केलेल्या अंर्तयात्रापेक्षा बरेच कमी महत्व असते. बुध्दि पुरस्सर अंतर्यात्रांकरिता, सूक्ष्म शरीराचा जाणीवयुक्त (conscious use) उपयोग करावा लागतो. स्थूल देहरुपी बाह्य माध्यमापासून, सूक्ष्म देहाला जाणीवपूर्वक अलग करण्याला फार महत्त्व आहे; कारण, त्यामुळे आत्मा स्वत:ला स्थूल देहरुपी बाह्य माध्यमापासून, सूक्ष्म देहाला जाणीवपूर्वक अलग करण्याला फार महत्त्व आहे; कारण, त्यामुळे आत्मा स्वत:ला स्थूल देहाहून भिन्न असल्याचे जाणतो, इतकेंच नव्हे तर तो स्थूल देहाचें अधिक उत्तम नियंत्रण करुं शकतो. एखाद्या वस्त्राप्रमाणे, तो स्वत:चे स्थूल शरीर, वाटेल तेव्हा टाकून देऊ शकतो, किंवा धारण करुं शकतो; व सूक्ष्म शरीराच्या द्वारा सूक्ष्म जगताचा अनुभव घेतो, किंवा जरुर तेव्हा, अंतर्यात्रा करतो.

उन्नतीकरता व कार्या-
करिता विशालतर क्षेत्र.

स्थूल देहाच्या जाणीवयुक्त उपयोगाने मिळविलेल्या अनुभवाप्रमाणेच, सूक्ष्मदेहाच्या जाणीवयुक्त उपयोगाने मिळविलेलें शद्बस्पर्शरुपरसगंधांचे अनुभव देखील, अगदी स्पष्ट व निश्चित स्वरुपाचे असतात. स्वप्नसृष्टीप्रमाणे ते अनिश्चित किंवा मनोभासरुप नसून, जागृत स्थितीतील इतर अनुभवांप्रमाणे, ते वस्तुनिष्ठ (objective) व परिणामकारक असतात. तेव्हा अंतर्जगतांतील प्रवास करण्याच्या शक्तीमुळे, अनुभवाचें व कार्याचे क्षेत्र बरेंच वाढते; आणि त्यामुळे स्वत:च्या उन्नतीकरिता व अद्याप अध्यात्मपथांत प्रविष्ट न झालेल्या इतर लोकांना मदत करण्याकरिता नवीन प्रकारची संधि मिळते.

अंत:प्रज्ञेकरिता गूढ अनुभवामुळे
मतद होते; परंतु गूढ अनुभव
अंत:प्रज्ञेचे कार्य करुं शकत नाहीत.

गूढ (occult) अनुभवांचा कितीहि वर्षाव झाला, तरी साधकाने स्वत:च्या आंतरिक प्रयत्नाच्या द्वारां आत्मोन्नति साधण्याची आवश्यकता कमी होत नाही. प्रगत महात्म्यांनी किंवा सद्गुरुंनी दिलेल्या गूढ अनुभवांमुळे, आतांपर्यंत झांकली गेलेली अंत:प्रज्ञा अनावृत होते; पथांतील अडथळे दूर होतात; व **पथांतील प्रत्येक टप्प्यांत आवश्यक असलेल्या नवीन गरजांकरिता लागणारा महान आत्मविश्वास व उत्साह साधकाला प्राप्त होतो. परंतु साधकाची जी खरी प्रगति होते, ती केवळ गूढ अनुभवांचा अक्रिय ग्राहक बनण्याने होत नसून, हृदयसंवेद्य उच्चतम अंत:प्रज्ञेला आचरणांत उतरविण्यानेच होते.**

# १९ : अध्यात्मजीवनातील गूढ विद्येचे स्थान

## भाग २ रा

## अध्यात्मजीवनाचा गूढ आधार

मानवांचे पृथक् व तुटक अस्तित्व केवळ कल्पनारचित आहे, हे सत्ताविस्तारांतील आंतरिक क्षेत्राचे किंचितहि ज्ञान असणाऱ्यांना माहीतच आहे. लोकांची इच्छा असो वा नसो,

अंतस्थ भूमिकांवर, लोकांमध्ये
परस्परसंबंधी आदान-प्रदान
सतत चालूच असते.

व त्यांचा परस्परांशी स्थूल जगामध्ये संबंध नसतांनाहि, त्यांच्या केवळ अस्तित्वामुळेच त्यांचे परस्पर विषयक आदान-प्रदान किंवा आघात-प्रत्याघात (actions and interactions) सतत चालूच असतात. माणसाच्या प्रभाव-प्रसरणाला सीमाच नाहीत. सूक्ष्म क्षेत्रांतील वैद्युतिक प्रवाह देशसीमा किंवा इतर रुढ बंधनांनी सीमित होत नाहीत. चांगले व वाईट विचार, आल्हादयुक्त व उदिग्न वृत्ति, उदात्त व भव्य भाव व तसेच क्षुद्र व संकुचित भाव, स्वार्थरहित आकांक्षा व स्वार्थपर लालसा हे सर्व, शब्दांत किंवा कृतीत व्यक्त झाले नसतांनाहि, फैलावून इतरांना प्रभावित करतात. तेव्हा, **स्थूल जगाप्रमाणेच मन:सृष्टीहि एकसूत्रमय व्यवस्था** (unified system) **आहे.** अध्यात्म-जीवनाचे माध्यम, या दृष्टिने स्थूल जगालाहि स्वत:चेच असे निर्विवाद महत्त्व आहेच. परंतु, निरनिराळ्या माणसांचे परस्परांच्यामधील केवळ स्थूल जगातील घेणे देणेच लक्षात घेतल्याने, त्यांच्या मधील वास्तविकपणे अस्तित्वांत असणाऱ्या सर्व संबंधांचा पूर्ण आढावा घेतला जात नाही.

काही गोष्टी अशा आहेत, की आंतरिक भूमिकांमध्ये घडणाऱ्या घटना लक्षात घेतल्याशिवाय,

दर्शन व सहवास
यांचे महत्त्व.

त्यांचे पूर्ण रहस्यच समजून येत नाही; सत्पुरुष व सद्गुरु, यांचे दर्शन म्हणजे अशीच एक गोष्ट आहे. सत्पुरुष व सद्गुरु, यांच्या दर्शनाला प्राचीन ऋषींनी फार महत्त्व दिले आहे. कारण,

प्राप्तीत साधकाला आसक्ति वाटू शकते; इतकेच नव्हे, तर तो ऐहिक वासनांपासून विमुक्त झालेलाच असतो, असे नसल्यामुळे, तो त्यांचा उपयोग त्या वासनांच्या परिपूर्तीकरिताहि करण्याचा संभव असतो. तेव्हा, सिद्धींना अनुभूतीच्या मार्गातील अडथळा मानले आहे, ते योग्यच आहे. परंतु ईश्वरप्राप्तीनंतर, या सर्व गूढ शक्तींचे महत्त्व एकदम कमी होते. **विश्वरुप शून्यातच सिद्धीचे क्षेत्र आहे; व ईश्वरप्राप्त पुरुष हा परम सत्यामध्ये, अचलपणे व नेहमीकरिता, सुप्रतिष्ठित झाला असतो.** परंतु, स्वत: ईश्वरप्राप्त पुरुषाकरता, विश्व शून्यस्वरुप असलें, तरी विश्वबंधनांत फसलेल्या, इतर जीवांची जबाबदारी तो स्वेच्छेने आपल्या शिरावर घेऊ शकतो; आणि मग इतरांच्या आध्यात्मिक हिताकरिता, तो आपल्या गूढ शक्तींचा, मोकळेपणा व यथोचित उपयोग करुं शकतो.

ईश्वरी योजनेची अम्मलबजावणी.

ज्ञानी सद्गुरुंचे ज्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नियंत्रण नाही, असे कोणतेच क्षेत्र नाही. लढाया, क्रान्ति, साथीचे रोग, याप्रमाणे महत्त्वाच्या सामाजिक घटना, व त्याचप्रमाणे भूकंप, पूर इत्यादि नैसर्गिक घटना, – या सर्वावर सद्गुरुंचे नियंत्रण व दिग्दर्शकत्व असते. आणि ज्या उच्च भूमिकांवर सद्गुरु जाणीवयुक्त रीतीने अधिष्ठित असतात, त्या भूमिकांतील महान् शक्तींच्या विमोचनाने असें नियंत्रण शक्य होते. सहकारशील व सुव्यवस्थित आध्यात्मिक कार्य करण्याकरता देखील, सद्गुरु आपल्या गूढ शक्तींचा उपयोग करु शकतात. मानवतेची आध्यात्मिक उन्नति साधण्याकरिता, ते उच्च भूमिकांवर, कित्येक वेळा सभा व अधिवेशने भरवितात. **सर्वांमधील परमात्मा** (oversoul) **हा एकच असून, त्याचे कार्यहि एकाच वस्तूप्रमाणे होत असते.** ज्यांना ह्या एकतेची जाणीव झालेली असते. कारण, मानवी मनाची निम्नतर मर्यादिता गळून गेल्यामुळे, ते इतके स्वार्थरहित व सर्वहिततत्पर झालेले असतात, की **ईश्वरी योजनेची पृथ्वीवर अम्मलबजावणी व अग्रगति करण्याकरता, ते उपयुक्त माध्यम** (effective vehicles) **बनतात.**



मन पुन:पुन: सद्गुरुकडे वळते. गत अनुभवातील घटना आपल्या कल्पनाचक्षूसमोर आणण्याच्या प्रक्रियेहून, सद्गुरुशी मनोमय संपर्क करण्याची ही प्रक्रिया मूलत:च भिन्न आहे. साध्या कल्पनाविलासातील गत गोष्टींच्या स्मरणांत विशिष्ट उद्देश नसतो; परंतु मानसिक संपर्क (mental contact) करण्यात, विशिष्ट उद्देश असतो. उद्देशाच्या निर्देशक शक्तीमुळे, कल्पकता ही केवळ मनातल्या मनात चालणारा विचारांचा विलास न बनतां, ती सद्गुरुप्रत जाऊन त्याच्याशी संपर्क प्रस्थापित करते. सद्गुरुच्या खऱ्या स्थूल दर्शनाइतकाच सद्गुरुचा मानसिक संपर्कहि परिणामकारक व प्रभावी असतो. अशा संपर्काची पुन: पुन: आंतरिक पुनरावृत्ति करण्याने, सद्गुरु व साधक या दोहोंमध्ये प्रवाहपथाची रचना होते; व त्यांच्यात कितीहि दृश्यमान अंतर असलें, तर त्या प्रवाहपंथातून, साधकाला सद्गुरुपासून प्रसृत होणारी कृपा, प्रेम व प्रकाश, हे मिळतात. याप्रमाणे, **सद्गुरुच्या स्थूल सहवासात असणाऱ्यांनाच त्याची मदत मिळते, असें नाही; तर ती त्याचे स्मरण करणाऱ्यांनाहि मिळते.**

शिष्याच्या व्यक्तिगत गरजांकडे, सद्गुरुचें दक्षतापूर्वक लक्ष असते; व शिष्याच्या प्रगतीत अडथळा आणणाऱ्या व त्याला पथभ्रष्ट करणाऱ्या गोष्टींपासून सद्गुरु त्याचे रक्षण करतो. कित्येक वेळी, तो शिष्याला तात्पुरता एकान्तवास पतकरण्यास सांगतो; कारण, त्यामुळे, त्याच्या आध्यात्मिक उन्नतीस प्रतिकूल असणाऱ्या संपर्कापासून त्याचा बचाव होतो. पूर्वीचे योगी, गुरुच्या आज्ञेने स्वत:चे अन्न शिजवीत व भोजनसमयी कोणालाहि हजर राहू देत नसत. कारण, त्यांना वाईट माणसांच्या दृष्टीचे संस्कार टाळावयाचे होते. स्वच्छ कपडा धुळीने लवकर घाण होतो, त्याप्रमाणे, शिष्यावर दुसऱ्याच्या कामवासनेचे संस्कार चटकन बसून, तो त्यांनी प्रभावित होतो. पथांत नसलेल्या इतर लोकांच्या सहवासामुळे उत्पन्न होणारी गुंतागुंत टाळण्याची साधकाला प्रथम अवस्थेमध्ये अत्यंत आवश्यकता असते. परंतु, **एखाद्या विशिष्ट परिस्थितीत, अगदीच आवश्यक असेल, तेव्हा, सद्गुरु कांही लोकांचे संबंध व सहवास तोडण्याची खास आज्ञा देतो.** शिष्य नेहमी सद्गुरुच्या सन्निध असला, तर ह्या सर्व गोष्टी आपोआप साधून, खास एकांतवासाची त्याला फारशी जरुरच राहात नाही. शिष्याचा जगाशी बाहेरून संबंध राहिला, तरी त्याच्या सद्गुरुशी असलेल्या आंतरिक संबंधामुळे, तो जगापासून मनाने अलिप्तच राहतो.

काही गूढ परिस्थितीमध्ये विशेष सावधगिरीची आवश्यकता असूं शकते.

शिष्याचा माध्यम म्हणून उपयोग.

ज्याप्रमाणे, सद्गुरु जवळच्या शिष्याला अनिष्ट संबंध व संपर्क, यापासून दूर ठेवतो, त्याचप्रमाणे, शिष्याच्या हितास पोषक असेल, तेव्हा, तो नवीन संबंध घडवूनहि आणतो. त्याला सर्वांच्या संस्कारांची व कर्मसंबंधांची गुंतागुंत पूर्णपणे ठाऊक असते. म्हणून, त्याने जाणिवपूर्वक घडवून आणलेल्या संबंधामुळे, महत्त्वपूर्ण पारस्परिक देवघेव व क्रियाशीलता उन्नत होऊन, अगदी जवळच्या

मार्गाने, व थोड्या त्रासांत, त्या परिस्थितीतील सर्वांच्याच प्रगतीला मदत होते. **लोकांचे पूर्वीचे जन्म, त्यांचे संस्कार, व त्यांचे परस्परसंबंध, यांचे सद्गुरुला ज्ञान असते; व त्यांच्या मानसिक शक्तीचा अपव्यय टाळून, तिला उत्कृष्टपणे फलदायी करण्याकरता, तो आपल्या ज्ञानाचा उपयोग करतो.**

शिष्याचा माध्यम म्हणून उपयोग.

आंतरिक भूमिकेत सातत्य व एकता असल्यामुळे, आपल्या कार्याकरिता, सद्गुरु शिष्याचा माध्यम म्हणून उपयोग करु शकतो; व जेव्हा शिष्य, याप्रकारे सद्गुरुच्या विशालतर उद्दिष्टांचे साधन बनतो, तेव्हा त्याला त्याची जाणीव असेलच असे नाही. हे शक्य आहे; कारण, सद्गुरुविषयक शिष्यास असलेले ज्ञान व प्रेम, यांच्यामुळे सद्गुरु व शिष्य, या दोहोत संवादिता (rapport) व समस्वरता उत्पन्न होत असते. सद्गुरुच्या प्रत्यक्ष सहवासात असणाऱ्यांना त्याची मदत प्रत्यक्षपणे मिळते; व ज्यांचा त्याच्या शिष्याशी निकट संबंध येतो, त्यांना ती मदत अप्रत्यक्षपणे (म्हणजे शिष्याच्या द्वारा) मिळते.

सद्गुरु हा वितरण–केंद्र बनतो.

आध्यात्मिक कार्यातील भागीदारी एकांगी नसते. सद्गुरुचे आध्यात्मिक व जागतिक कार्य चालू असतां, जे शिष्य त्याचे चिंतन व ध्यान करतात, त्यांना सर्वांना त्या कार्यात, एक प्रकारे, भाग घेण्याचे श्रेय मिळते. अनंततेशी ऐक्य पावल्यामुळे, सद्गुरु हा कालातीत राहून व कालगत बंधनांच्या पलीकडे असतो. परंतु, मानवतेची आध्यात्मिक उन्नति साधण्याकरिता, तो कालबंधनांचा स्वीकार करीत असल्यामुळे, त्याच्या कार्यात शिष्यांच्या स्वेच्छाप्रेरित सहकारितेची मदत होऊ शकते. शिष्यांच्या स्वेच्छाप्रेरित सहकारितेची मदत होऊ शकते. **शिष्यापासून मिळणाऱ्या प्रेमास सद्गुरु आत्मसात् करतो; व त्यातून उत्पन्न होणाऱ्या आध्यात्मिक शक्तींचा उपयोग, तो आपल्या जागतिक कार्याकरता करतो.** एखादे गाणे स्वत: ग्रहण करुन, नंतर सर्व जगात फैलावणे (broadcast) हे वितरणकेंद्रा (relaying station) चे कार्य असते; व उपरिनिर्दिष्ट दृष्टीने पाहतां, सद्गुरु हाहि एक प्रकारचें वितरणकेंद्र असतो. सद्गुरुवर प्रेम करणे म्हणजे सर्वावर प्रेम करणे होय; व हे केवळ लाक्षणिक अर्थाने नव्हे, तर वस्तुत:च खरे आहे. सद्गुरुला, सूक्ष्मतर भूमिकांमध्ये, जे कांही मिळते, त्याचे तो उदात्तीकरण करतो; व मग तो तें इतरांना वाटून देतो. या प्रकारे, स्वत:शी असलेले शिष्याचे संबंध सद्गुरु अधिक दृढ करतो; एवढेच नव्हे, तर तो त्यांना आपल्या ईश्वरी कार्यामध्ये, साथीदार होण्याचा विशेष लाभ देतो.

अंतश्चक्षु

विश्वरुपी भुलभुलय्यामधून बाहेर पडून, शिष्याने ईश्वरप्राप्तीची इच्छा करावी, या हेतूने, सद्गुरु, अनेक उपायांनी त्याला स्वत:च्या स्वरुपात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करतो. साधकामध्ये ईश्वराची इच्छा प्रथमपासूनच असते. परंतु साधकाचा अंतश्चक्षु उघडून, सद्गुरु त्याच्या त्या प्राथमिक इच्छेला अधिक तीव्र व स्पष्ट करतो. **अंतश्चक्षु उघडला, म्हणजे ज्या ईश्वराविषयी तळमळीचा शोध सुरु असतो, तो ईश्वर प्रत्यक्षपणे दिसतो.**



ॐ बिंदु

केवळ तर्काच्या किंवा कल्पनेच्या द्वारा ईश्वराचा शोध करीत असतांना, आत्म्याला त्याच्याशी ऐक्य पावण्याची इच्छा असते. परंतु अंतर्मुख होऊन, आत्म्याची दृष्टि परमतत्त्वावर खिळली, म्हणजे ही इच्छा अधिक तीव्र होते. योग्य वेळ आली, म्हणजे सद्गुरु हा अंतश्चक्षु एका क्षणात उघडू शकतो.

ईश्वर हेच एकमेव सत्य असून, आपण त्याच्याशी वस्तुत: एकरुप आहोत, हेच अखेरीस साधकाने अनुभवावयाचे असते. ह्याचा अर्थ असा, की अनेकविध जगताच्या दृष्यामुळे त्याने प्रभावित होतां कामा नये. **खरे पाहिल्यास, अखिल विश्व आत्म्यामध्ये समाविष्ट झाले असून, त्याची उत्पत्ति आत्म्यांतील 'ॐ' ने निर्दिष्ट असलेल्या बिंदूपासून होते.** परंतु, कोणत्या ना कोणत्या तरी माध्यमांतून अनुभव गोळा करण्याची आत्म्याला सवय लागली असल्यामुळे, त्याला हे विश्व स्वत:हून भिन्न, दुर्लघ्य व प्रतिस्पर्धिस्वरुप भासते. प्रत्येक व्यक्तीमध्ये असलेल्या ह्या 'ॐ' बिंदूपासून, सर्व विश्व उद्भूत होत आहे, असे ईश्वरप्राप्त पुरुषांना सतत दिसू शकते.

इंद्रियप्रत्यक्ष ज्ञानाची प्रक्रिया उफराटी करणे.

इंद्रियसंवेद्य ज्ञानाची प्रक्रिया (process of perception) ही सृष्टीच्या प्रक्रियेबरोबर समांतर चालते. जाणीव नष्ट न होऊं देतां, इंद्रियज्ञानाची प्रक्रिया उफराटी केली, म्हणजे विश्वाच्या पृथक् अस्तित्वाची शून्यता प्रतीत होते. आत्मा प्रथम मनांतून, मग सूक्ष्म चक्षूंनी व नंतर स्थूल नेत्रांनी पाहतो. आणि **तो जे जें पाहू शकतो, त्या सर्वांहून तो स्वत: विशालतर आहे.** विस्तीर्ण महासागर व विशाल अंतराल, हे आत्म्याशी तुलना केल्यास, अणुसमान आहेत. खरें पाहतां, **आत्म्याला दृश्यमान होणारे सर्व काही सीमित आहे; पण स्वत: आत्मा मात्र सीमारहित आहे.** जेव्हा जेव्हा, पूर्ण चेतना कायम ठेऊन, आत्म्याला कांहीच भासमान होत नाही, तेव्हा तो स्वयंनिर्मित सृष्टि पार करुन, स्वत:चे सर्वात्मकत्व जाणण्याच्या बाबतीत महत्त्वाचे पाऊल टाकतो.

सिद्धि

जगापासून चेतना परावृत्त करण्याची व आत्मचेतन होण्याची प्रक्रिया चालू असतांना, चेतनेच्या सर्व देहरुपी माध्यमांवर अधिकाधिक संयम प्राप्त होतो. आतापर्यंत उपयोगात न आलेल्या **संयमकेंद्रा** (centres of control) ना जागृत व क्रियाशील करुन, अशा प्रकारचा संयम शक्य होतो; व या नवीन केंद्राचा व्यापार सुरु झाला, म्हणजे त्यापासून निरनिराळ्या गूढ शक्ति प्राप्त होतात. 'सिद्धी' म्हणून ज्या ओळखल्या जातात, त्या ह्याच गूढ शक्ति असून, साधकास आध्यात्मिक पूर्णता प्राप्त होण्यापूर्वीहि त्या त्याला प्राप्त होऊ शकतात. खरे पाहतां, गूढ शक्तींच्या प्राप्तीने अहंकाराची वृद्धि देखील होऊ शकते. आणि सिद्धीच्या

निरुत्साहित करतात. एखाद्या स्वार्थमूलक हेतूने प्रेरित होऊन, संतावर प्रेम करण्यापेक्षा, तो प्रेमास योग्य आहे, याच कारणाने, त्याच्यावर प्रेम करणे, आध्यात्मिक दृष्टीने अनंत पटीने श्रेष्ठ असते. **केवळ आध्यात्मिक अभिरुचीमुळेच लोकांनी संताकडे जावे; व त्यात दुसरा कोणताहि हेतु नसावा.** तेव्हांच त्यांना संतसमागमाचा अधिकाधिक फायदा मिळू शकतो.

गूढ शक्तींचा उपयोग मानवतेला पवित्र करण्याकरिता केला जातो.

आध्यात्मिक उद्दिष्टांकरिता साधनीभूत असल्यामुळेच गूढ विद्येची उपयुक्त कला समर्थनीय ठरते. व तिचा दुसऱ्या कोणत्याहि कारणाकरिता उपयोग झाल्यास तो दुरुपयोग समजावा. केवळ भौतिक इच्छांकरिता तर तिचा कधीहि उपयोग करुं नये. मानवी वासनांची तृप्ति करणे, हा कांही गूढ शक्तीचा खरा उपयोग नाही; तर मानवी अंत:करणाला पवित्र करणे, हाच गूढ शक्तीचा यथोचित उपयोग होय. **हीन वासनांचा त्याग करण्यास मदत करुन मानवतेला अधिक पवित्र करणाऱ्या श्रेष्ठ शक्तींमध्ये, गूढविद्येतील शक्तींना महत्त्वाचे स्थान आहे.**

गूढ शक्तीच्या उपयोगा-करता विशिष्ट क्षेत्र.

विकास झाल्यामुळे, ज्या लोकांमध्ये सुप्त मानसिक शक्ति उदयोन्मुख झाल्या असतील, किंवा ज्यांच्या ह्या मानसिक शक्ति आधीच विकसित झालेल्या आहेत, परंतु ज्यांची चेतना उच्चतर भूमिकांमध्ये आकृष्ट झाल्यामुळे, स्थूल जगात अर्धजागृत आहे, – अशा लोकांच्या बाबतीत गूढविद्येचा कलात्मक उपयोग विशेषत: यथोचित व आवश्यक असतो. ह्या लोकांना जी भाषा समजू शकते, त्या भाषेतच त्यांच्याशी बोलले पाहिजे. बऱ्याचशा उन्नत साधकांना अनेक सिद्धि प्राप्त होतात. परंतु, त्यांना साधारण मानवाइतकीच आध्यात्मिक साहाय्याची आवश्यकता असते. त्यांना बऱ्याचशा गुप्त शक्ति प्राप्त असल्यामुळे, पूर्ण सद्गुरु त्यांना, कितीहि अंतरावर, सहज व फलदायी मदत करुं शकतात. **जेव्हा उच्चतर भूमिकांवर, सद्गुरुंचे साहाय्य, जाणीवयुक्त रीतीने ग्रहण करिता येते, तेव्हा स्थूल माध्यमातून मिळणाऱ्या साहाय्यापेक्षां, ते अधिक प्रभावी होते.**

अवतरण किंवा खाली उतरणे.

अध्यात्मपथांतील अग्रगतीमध्ये असणाऱ्या इतर अडचणी सोडून दिल्या, तरी उन्नत साधकांमध्ये, जो एक विशेष असतो, तो हा की त्यांच्या मुक्कामां (station) तील आनंदात ते पूर्णपणे निमग्न झाल्यामुळे, स्थूल क्षेत्रांतील कार्य करण्याकरिता, खाली उतरणे, त्यांना अप्रिय वाटते. उन्नत साधकाचें हे उतरणे, ईश्वरप्राप्त पूर्णपुरुषांच्या सप्तम भूमिकेतील अनुभवांतून होणाऱ्या अवतरणाहून भिन्न असते. पूर्ण सद्गुरुचा परत प्रवास व त्याचे अनुभूतीनंतरचे निरनिराळ्या भूमिकामध्ये स्थित होणे, हे स्वार्थरहित असून, प्रारब्धाचा परिणाम असते. पूर्णपुरुष, आपआपल्या अधिकारभेदाप्रमाणे, या प्रारब्धाचा उपयोग मानवतेच्या आध्यात्मिक उन्नतीकरता करतात. उदाहरणार्थ महंमद

# २० : अध्यात्मजीवनातील गूढ विद्येचे स्थान

## भाग ३ रा

## गूढविद्या व आध्यात्मिकता

विश्व व मानवी व्यक्तिमत्ता, यांच्या विषयीच्या ज्ञानाचा गूढविद्या (occultism) हा एक भाग आहे; आणि या बाबतीत एतद्विषयक इतर शास्त्रांहून, गूढविद्या तत्त्वत: भिन्न नाही. इतर शास्त्रांमध्ये, सर्वसाधारण दृष्टीच्या व कर्तबगारीच्या क्षेत्रात असणाऱ्या बाजूंचा व शक्तींचा विचार केला जातो; व **गूढविद्येमध्ये, सर्वसाधारण दृष्टीच्या व कर्तबगारीच्या आटोक्याबाहेर असलेल्या गुप्त बाजूंचा व शक्तींचा विचार केला जातो;** – ह्यामुळेच इतर शास्त्रें व गूढविद्या, या दोहोंतील फरक उत्पन्न होतो. गूढविद्येची वाढ होण्याकरता, मनुष्याच्या आत्म्यामधील सुप्त शक्ति अनावृत्त झाल्या पाहिजेत.

गूढविद्येचे शास्त्र.

आधुनिक काळातील मनातील गुप्त शक्तींचे संशोधन करणारे संघ (psychical research societies) गूढ विद्येला इतर विद्यांप्रमाणेच मानतात. प्रथमदर्शनी, इतर तार्किक ज्ञानाहून गूढ विद्येला, तत्त्वत: कमी किंवा अधिक महत्त्वाची मानण्याकरिता, विशेष कारण आढळून येत नाही. संघटित होऊन व सहयोगपूर्वक, हे संघ गूढ विद्येचा अभ्यास करतात. अशा प्रकारच्या ज्ञानाने, आध्यात्मिक आकांक्षा व प्रयत्न, यांच्याकरिता योग्य पार्श्वभूमी निर्माण होऊन, साधारण माणसाचा दृष्टिकोण –त्याची परिस्थिति लक्षांत घेतां, सत्याच्या शक्य तितका निकट येतो. म्हणून, आत्म्याचें अमरत्व व जन्मपरंपरा, निरनिराळ्या देहांचे व भूमिकांचे अस्तित्व व उत्क्रांतीचे व कर्मविपाकाचे नियम, – ह्यासंबंधीचे कांही तात्त्विक ज्ञान, बहुजनसमाजाला मधूनमधून देणे, सद्गुरुनींहि उचित मानले आहे. परंतु, **अशा कांही मुलभूत तत्त्वाचें सर्व साधारण ज्ञान सोडून, गूढ तत्त्वांचे सविस्तर ज्ञान देण्याला सद्गुरुंनी फारच कमी महत्त्व दिले आहे; व गूढ शक्तींचे उपयोगक्षम व कलात्म ज्ञान**

गूढ विद्येच्या प्रसाराच्या सीमा.

**तर त्यांनी अत्यंत गुप्त ठेवले आहे.**

जाणणारे व न जाणणारे यामधील फरक गूढविद्येच्या क्षेत्रांत, इतर शास्त्रांपेक्षा, अधिक तीव्र व महत्त्वपूर्ण आहे. इतर शास्त्रांमध्ये, केव्हा केव्हा, प्रत्यक्ष ज्ञानाची जागा अप्रत्यक्ष ज्ञानाने, कांही अंशी भरुन येऊं शकते. परंतु, गूढविद्येमध्ये, अर्थाच्या व महत्त्वाच्या बाबतींत, अप्रत्यक्ष ज्ञान, हे प्रत्यक्ष ज्ञानाची मुळीच बरोबरी करुं शकत नाही. म्हणून, गूढविद्या हे अत्यंत महत्वाचे शास्त्र असले, तरी गूढ तत्त्वांबद्दलच्या केवळ तात्त्विक माहितीचा प्रसार करण्याला फारसे महत्त्व नाही. त्यांच्याकरता, ही गूढ तत्त्वें, न पाहिलेल्या देशांच्या वर्णनाप्रमाणे, किंवा कांदबरीप्रमाणेच राहणार.

जाणणारे व न जाणणारे.

शास्त्र या दृष्टीने, गूढविद्या जवळ जवळ इतर शास्त्रांसारखीच आहे, असें म्हणता येईल; परंतु, कला या दृष्टीनें, **गूढविद्या ही अनुपम आहे.** तरी कधीकधी, गूढ तत्त्वांच्या केवळ **बौद्धिक** माहितीच्या प्रसारामुळे देखील, अनर्थ होऊ शकतो. कारण, त्यामुळे पोकळ जिज्ञासा वाढते; किंवा स्वार्थपर हेतु साधण्याकरिता, या अज्ञात शक्तीवर नियंत्रण मिळविण्याची वासना जागृत होऊं शकते. गूढ शक्तीमध्ये, विशेष आध्यात्मिक, असे कांहीच नाही. शास्त्रीय शोधाप्रमाणे किंवा इतर भौतिक शक्तीप्रमाणे, त्यांचाहि सदुपयोग किंवा दुरुपयोग होऊ शकतो. उच्च भूमिकांमध्ये, त्यांच्यामुळे सहकारशील कार्याला अतिशय वाव मिळतो; परंतु ह्याकरता, विशेष प्रकारची जबाबदारी स्वीकारण्यास लागणारी आध्यात्मिक तयारी आवश्यक असते.

गूढ विद्येची कला.

नवख्या माणसाला, शोध करीत असतांना, कांही गूढशक्ति प्राप्त होणेहि शक्य असते. परंतु, साधकामध्ये, जर या नवीन शक्तीमुळे प्राप्त होणारी नवीन जबाबदारी उत्कृष्ट रीतीने पार पाडण्यास आवश्यक असलेली आध्यात्मिक तयारी नसेल, तर ही सिद्धि त्याच्या करता वरदान न ठरुन अभिशापच ठरेल. गूढ शक्तीचा किंचितहि दुरुपयोग झाला, तर त्यामुळे प्रतिक्रिया होऊन, आत्म्यास बंधन उत्पन्न होते. कधीकधी त्यामुळे, साधकाची प्रगति बंद होते, इतकेच नव्हे तर त्याची बरीचशी अधोगतीहि होते. **गूढ शक्ति प्राप्त झाल्यामुळे, साधकाला इतर लोकांशी तुलना करता, विशेष व दुर्जेय फायदा मिळालेला असतो; व त्या शक्तीचा त्याने अनुचित उपयोग केल्यास, तो स्वत:चा आध्यात्मिक नाश करुं शकतो, इतकेंच नव्हे, तर तो इतरांचेहि अपरिमित नुकसान करुं शकतो.**

गूढ शक्तीचा दुरुपयोग.

ज्ञानी सद्गुरुंच्या हातातील गूढ शक्तींमध्ये धोका नसतो, इतकेच नव्हे, तर मानवतेच्या सेवेकरिता, तिचा अत्यंत उपयोग होऊ शकतो. परंतु, तेहि गूढ शक्तीचा उपयोग क्वचितच व अल्प प्रमाणात करतात. गूढ विद्येच्या उपयुक्त कले (occultism as an art) ला स्वत:च्याच अशा नैसर्गिक सीमा आहेतच. मानवतेच्या ऐहिक गरजांकरिता, किंवा भौतिक



हेतूकरिता, गूढ शक्तीचा विस्तृत उपयोग करतां येत नाही. **लोकांच्या सामान्य व्यवहारामध्ये, गूढ शक्तींचा उपयोग करुन, अनिश्चित व अपरिमेय तत्त्व आणल्यास, साधारण मानवी व्यवहारांमध्ये, घोटाळा व अव्यवस्था माजेल, व कर्मनियम समानतेने व अबाधितपणे लागू पडण्याकरता, लोकांना स्वत:च्याच सीमित शक्तींवर व संभाव्यतां (possibilities) वर अवलंबून ठेवले पाहिजे.** ह्याच कारणामुळे, गूढ शक्तीचा उपयोग केवळ आध्यात्मिक हेतू साधण्याकरताच व्हावा, अशी तिची कडक मर्यादा आहे.

केवळ आध्यात्मिक उद्दिष्टांच्या परिपूर्तीकरिताच गूढविद्येच्या उपयुक्त कलेचा विनियोग झाला पाहिजे.

क्वचित प्रसंगी, संत लोक, भक्तांच्या कांही ऐहिक इच्छाहि पुरवितात. स्वत:ला ऐहिक गोष्टींचे मुळींच महत्त्व नसते; परंतु, भक्तांना भौतिक वासनांपासून पराङमुख करण्याकरिताच ते याचा अवलंब करतात. मुलें फार लहान असतात, तेव्हा पाटीवर काढलेल्या अक्षरांकडे लक्ष देण्यास, त्यांना प्रवृत्त करता येत नाही; व त्यांचे लक्ष अक्षरांकडे वेधण्याकरिता, मोठी माणसें कधीकधी, त्यांना गोड पदार्थांची बनविलेली अक्षरें बक्षीस देतात. आणि अक्षरात गोडी वाटते म्हणून नव्हे, तर गोड पदार्थातील अभिरुचीमुळे, मुलें तशा अक्षरांकडे लक्ष देतात. पण बहुधा, हा केवळ अक्षरांतच अभिरुचि घेण्याचा प्रारंभ ठरतो; व एकदा अक्षरांमध्ये, अभिरुचि उत्पन्न झाली, म्हणजे मिठाईचा उपयोग हळूच टाकून देण्याचे, कांहीहि नुकसान होत नाही. संसारासक्त लोक असेच लहान मुलांसारखे असतात. ज्याप्रमाणे मुलगा चांगला व्हावा, म्हणून बाप त्याला एखादे वेळी चॉकोलेट देतो, त्याचप्रमाणे, संसारसक्त भक्त ऐहिक वासना सोडून, आध्यात्मिकतेमध्ये रत व्हावे, याकरिता, संतहि त्यांच्या कांही हानिशून्य ऐहिक इच्छा पुरवितात.

आध्यात्मिक हिताकरिता भौतिक प्रलोभन.

संसारासक्त लोक भौतिक वासनांमध्ये, इतके गर्क झाले असतात, की त्या तृप्त करण्याशी कांहीतरी संबंध असल्याशिवाय, त्यांना कोणत्याच गोष्टीमध्ये रुचि वाटत नाही. परंतु कधीकधी भौतिक प्रश्न सुटण्यामध्ये साहाय्य मिळावे, म्हणून ते संतांकडे येऊन, त्यांची आदराने सेवा करतात; आणि, जेव्हा कोणी संतांकडे आदरयुक्त अंत:करणाने येतो, **तेव्हा तो दुसऱ्या कोणत्याहि उद्देशाने आला असला, तरी त्याला आध्यात्मिक साहाय्य करणे, हे त्या संतांचे कर्तव्यच होत असते.** संताला मानवी मनाचे विशालतर ज्ञान असते व म्हणून त्या मनुष्याला खऱ्या आध्यात्मिकतेकडे सहजपणे आकर्षण करुन घेण्याकरिता, तो त्या मनुष्याला भौतिक स्वरुपाचे साहाय्य देण्याचेहि ठरवील. परंतु आध्यात्मिक हेतूकरिता, अशा प्रकारचे भौतिक प्रलोभन देणे, हा साधारण फायदा नसून, त्याचा अपवाद आहे. व बहुधा स्वत:कडे एखाद्या भौतिक फायद्याकरता येण्याच्या बाबतीत, ते लोकांना

मनांत ऐहिक हेतु ठेवुन संतांकडे जाऊ नये.

# २१ : जन्मपरंपरा आणि कर्म

## भाग १ ला

## मृत्यूचे महत्त्व

संसारी मनुष्य स्थूल शरीराच्या क्रियानांच जीवनसर्वस्व मानतो; आणि म्हणूनच त्याच्या दृष्टीने, स्थूल शरीराच्या अस्तित्वाचा आदि आणि अंत हा व्यष्टिभूत आत्म्याचा (individualised soul) हि आदि आणि अंत असतो. त्याच्यासर्व अनुभवांत, स्थूल शरीराचें क्षणभंगुरत्व व्यक्त होत असते; आणि जी स्थूल शरीरे एकदा चिन्मय होती, तीच विकल आणि छिन्नविछिन्न झालेली तो अनेकदा पाहातो. यामुळे, जीवन हे शारीरिक अस्तित्वाइतकेच आहे, असा विश्वास धरण्यास, तो सहाजिकच प्रवृत्त होतो.

**आत्मा व शरीर यांचे तादात्म्य.**

भौतिक दृष्टीचा मनुष्य मृत्यूला जीवनाचा अंतच मानतो; आणि एकंदरीत त्याच्या दृष्टीने, मृत्यूस अतिशय महत्त्व असते. मृत्यूवर बराच कालपर्यंत विचार करणारे लोक क्वचित आढळतात. मात्र आपल्या नित्याच्या व्यवहारात पूर्णपणे राहून गेलेले असूनदेखील, आयुष्यांत मृत्यूचा प्रसंग पाहून, त्यांच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. बहुतेक लोकांच्या बाबतीत, अटळ आणि अपरिहार्य, अशी मृत्यूची घटना, या जीविताच्या देखाव्याची पार्श्वभूमि असते. आणि याची जाणीव त्यांच्या आनंदोत्सवांच्या, उपभोगांच्या, पराक्रमांच्या आणि विजयांच्या प्रसंगांमध्येहि न कळत प्रविष्ट होते.

**मृत्यु ही जीवनाची पार्श्वभूमि आहे.**

जीविताच्या या देखाव्याची मृत्यु हा पार्श्वभूमि बनतो; व शिवाय, जीवनातील विविधरंगी प्रसंगामध्ये त्याला स्वत:ला अतिशय व अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे. अत्यंत भयप्रद आणि शोचनीय अशा गोष्टींमध्ये मृत्यूची गणना होते. कित्येक वेळा मृत्यु ही एक अखेरची शिक्षा अगर तीव्र सूडाचा प्रकार होतो; किंवा मृत्यूला इतरांकडून आपणांवर होणारे अतिक्रमण



पैगंबर ईश्वरानुभूतीनंतर सातव्या भूमिकेत स्थित झाला; व तसेच बुद्ध व अजमीरचे मोइद्दिन खिस्ती पाचव्या भूमिकेत स्थित झाले.

जेव्हा उन्नत साधक अंतस्थ भूमिकांमध्ये अटकून जातात, तेव्हा त्यांची अध्यात्म पथावरील पुढची प्रगती द्रुततर करण्याकरता, त्यांना खाली उतरविण्यात येते. उदाहरणार्थ, जेव्हा साधक तिसऱ्या व चवथ्या भूमिकांमध्ये फसून जातो, तेव्हा सद्‌गुरु त्याला चवथ्या भूमिकेवर ढकलण्यापूर्वी, तिसऱ्या भूमिकेवर खाली आणतो. परंतु, कित्येक वेळा, उंच भूमिकेवरुन खाली उतरणे, संसाररुपी अरण्यांत भटकत असलेल्या, व अद्याप पथप्रविष्ट नसलेल्या लोकांच्या करिता देखील, आवश्यक असतेच. **केव्हा केव्हा, सद्‌गुरु प्रगत साधकाच्या द्वारां, एखादे आध्यात्मिक कार्य करुन घेण्याचे ठरवून, ते होईपर्यंत, स्वत:ची व्यक्तीशः प्रगति करण्याचे प्रयत्न थोपविण्याची आज्ञा देतो.** अखेरीस, हे अवतरण, म्हणजे पथांतील पुढचा टप्पा त्वरित व निर्विघ्नपणे पार करण्याकरिता, पूर्वतयारीच असते. परंतु, असे असूनहि, इतरांना मदत करण्याकरिता, स्वत:स मिळालेले फायदे सोडून देणे, साधकाला फार कठीण वाटते. पांचव्या भूमिकेवर अनंततेचे दर्शन व ज्ञप्ति मिळत (Illumination) असल्यामुळे, तेथुन उतरणे विशेषत: कठीण असते. सूफी पंथांत या स्थितीला 'हैरत' म्हणतात. या अवस्थेमध्ये, साधकाला स्वत:स ज्ञप्तीपासून अलग ठेवणे अशक्यप्राय होते. परंतु, **केव्हा केव्हा, ज्ञप्तीमध्ये लय पावण्याचा मोह आवरुन जगातील इतर लोकांकरिता खाली उतरणे जरुर असते.** उन्नत साधकाशी वागण्याची पद्धत सद्‌गुरुलाच माहीत असते; व तो साधकाला, अप्रिय वाटणाऱ्या क्रियाशीलतेचाहि अंगीकार करण्यास लावू शकतो.

**गंजेशक्करची गोष्ट.**

हे एका सुप्रसिद्ध वलीच्या गोष्टीवरुन स्पष्ट होईल. ह्या वलीची समाधी अजमीरला असून, तेथे मोठी यात्रा भरत असते. त्याचे डोळे नेहमी उघडेच राहून ते तो बंद करु शकत नसे; व काचेप्रमाणे झालेल्या त्याच्या डोळ्यामध्ये धुंदी होती. तो पांचव्या भूमीवर होता. अजमीरचा ख्वाजा त्याचा गुरु होता; व त्याला ज्ञप्तीपासून दूर ठेवून, त्याला खाली उतरविण्याची त्याला इच्छा होती. परंतु, गुरुची आज्ञा मानणे त्याला फार जड वाटू लागले. तेव्हा गुरुने किल्ली फिरवून, त्याला खालील मार्गाने, वळणावर आणले. ह्या वलीजवळ जाण्याची त्याने पाच चोरांना आंतरिक स्फूर्ति दिली. ते त्याच्याजवळ पाच पावलांच्या अंतरावर बसले व चोरून आणलेली लूट आपसांत वाटून घेऊ लागले. लवकरच त्यांच्यामध्ये भांडण सुरु झाले; व त्यातील दोघांनी तिघांना ठार मारले. भांडणांत यशस्वी झालेल्या ह्या दोघांनी ती लूट आपसात वाटून घेतली; व नंतर ते पळून गेले. परंतु पळून जात असतांना, ते त्या वलीच्या जागेच्या अगदी जवळून गेले; व ते त्या वलीच्या सन्निध जातांच, त्या वलीला साधारण जाणीव (normal consciousness) प्राप्त झाली. ह्या गुन्हेगारांच्या सान्निध्याच्या कठोर प्रत्याघाताने, तो

खाली उतरला; व त्याला सभोवतालच्या परिस्थितीमध्ये काय चाललें आहे, याची जाणीव झाली. सर्वात प्रथम त्याला कांही चिमण्या दिसल्या; व त्याला स्वत:मध्ये स्फुरत असलेल्या नवशक्तींचा त्यांच्यावर उपयोग करण्याची इच्छा झाली. तो म्हणाला, ''चिमण्यांनो ! मरुन जा !'' व त्याबरोबर चिमण्या मरुन पडल्या. मग तो म्हणाला, ''चिमण्यांनो उठा!'' व लगेच जिवंत होऊन चिमण्या उडाल्या. त्या दोन चोरांना हा चमत्कार पाहून आश्चर्य वाटलें; व क्रोधवश होऊन ज्या तीन चोरांना त्यांनी ठार मारले होते, त्यांना पुन्हा जिवंत करण्याची, त्यांनी त्या वलीला विनंती केली. तेव्हा त्या तीन मेलेल्या चोरांना उद्देशून, तो वली म्हणाला, ''चोरांनो उठा !'' परंतु चोर उठले नाहीत. आपली शक्ती एकदम नाहीशी झालेली पाहून, तो भयभीत झाला; व थिल्लरपणाने, आपल्या शक्तींचा उपयोग केल्याबद्दल त्याला पश्चात्ताप होऊन, तो रडतच आपल्या गुरुकडे गेला. तो जेव्हा गुरुजवळ गेला, तेव्हा त्याला ते तीन चोर त्याचे पाय चेपीत असलेले दिसले. नंतर वली पुन्हा स्वस्थानीं गेला व भूक तहान सर्व विसरला. तो अत्यंत क्षीण झाला, तरी त्याने दहा वर्षेपर्यंत आपली जागा सोडली नाही; व पांढऱ्या मुंग्यांनी त्याचे शरीर खाण्यास सुरवात केली. लोक त्याच्या शरीराजवळ येऊन, साखरेचे ढीग ठेवीत; व ही साखर मुंग्या खात असत. त्याच्या शरीराच्या सभोवती नेहमी साखरेच्या गंजी असत; म्हणून लोक त्याला गंजेशक्कर म्हणत. प्रगत साधकांनांहि अनुभूतीच्या मार्गात पुढे जाण्याकरता, सद्गुरुची मदत कशी घ्यावी लागते, ते ह्या गोष्टीवरुन स्पष्ट होते.

गूढ घटनांना स्वत:चेच असे स्वतंत्र महत्त्व असते.

कशा प्रकारच्या प्रसंगामध्ये, गूढ रीतीचा व गूढ पद्धतीचा उपयोग करण्यात येतो, ते ह्या गंजेशक्करच्या गोष्टीवरुन स्पष्ट होईल. परंतु हे नीट लक्षात ठेवले पाहिजे, की कोणत्याही श्रेणीतील गूढ घटनांना स्वत:चे असे मुळीच महत्त्व नसते. **गूढ किंवा प्रगट घटनांना, जे महत्त्व आहेसे वाटते, ते सापेक्ष असतें, किंवा भ्रमात्मक असते.** जेव्हा एखाद्या गोष्टीमुळे, बदलत्या वासना उत्तेजित होतात, किंवा त्यांच्या तृप्तीचें आश्वासन मिळतें, तेव्हा त्या गोष्टीला खोटेच असे भ्रमात्मक महत्त्व येते. या बदलत्या वासनांची व सीमित हेतूंची पार्श्वभूमि वगळली, तर त्या वस्तूवर आरोपित झालेली सर्व अर्थपूर्णता, एकदम नष्ट होते. जेव्हा एखादी गोष्ट सत्यानुभूति मिळविण्याकरता किंवा सत्याच्या अभिव्यक्तीकरता साधन बनते, तेव्हा तिला सापेक्ष महत्त्व प्राप्त होते. अशा गोष्टी ईश्वरी जीवनाला अत्यावश्यक असतात, म्हणून त्याची महत्ति असते; व त्यांचे महत्त्व सापेक्ष असले, तरी भ्रमात्मक नसते.

गूढविद्या ही आध्यात्मिकतेहून निराळी असल्याचे जाणले पाहिजे.

बरेचसे लोक कळत न कळत, गूढ घटनांना भलतेच महत्त्व देतात; व त्यांनाच आध्यात्मिकता समजतात. चमत्कार व भुताखेतांच्या लीला ह्या त्यांना मनोवेधक वाटतात;



व आत्मजीवनांत अभिरुची असल्याचे हे एक लक्षण मानण्यात येते. परंतु गूढविद्या (occultism), व रहस्यपूर्ण गूढ अनुभव (mysticism) परलोकविद्या (spiritualism) व आध्यात्मिकता (sprituality), यांच्यामध्ये अगदी स्पष्ट व सुनिश्चित फरक आहे. आणि या भेदाचा पूर्ण अर्थ समजला नाही, तर घोटाळाच होतो.

एकच महत्त्वाची गोष्ट.

सर्व चमत्कार भासमान व छायामय सृष्टीचेच भाग आहेत. घटना या दृष्टीने, तेहि परिवर्तशील आहेत; व जें जें बदलणारे आहे, त्याला शाश्वत महत्त्व नाही. परम तत्त्व असलेल्या अव्यय सत्ताविस्तारामध्ये प्रविष्ट होणे, म्हणजेच अनंत सत्याची अनुभूति होय; व गूढ जगताचें ज्ञान किंवा त्यातील शक्तींचा उपयोग करण्याचे सामर्थ्य, म्हणजे कांही सत्यानुभूति नव्हे. स्थूल जगांतील साध्या घटनांप्रमाणेच, गूढ घटना (occult phenomena) देखील, मिथ्या कल्पनेच्या सृष्टीतच आहेत. आणि, आध्यात्मिक दृष्टीने, फक्त एकच गोष्ट महत्त्वाची आहे; – व ती म्हणजे ईश्वरी जीवन प्राप्त करुन, इतरांनाहि तें प्राप्त करण्यास मदत करणे, व रोजच्या व्यवहारांमध्ये ते व्यक्त करणे. **अखिल वस्तुमात्राच्या अंतरंगात व रहस्यपूर्णतेत प्रवेश मिळवून, त्या आंतरिक सिद्धीचा सुगंध, इतरांच्या मार्गदर्शनाकरता, सत्य, प्रेम, पावित्र्य व सौंदर्य यांची रुपसृष्टीमध्ये अभिव्यक्ति करुन, फैलाविणे! या एकाच खेळाला अविकल व आंतरिक महत्त्व आहे. बाकीच्या सर्व घटना, गोष्टी व सिद्धि, यांना शाश्वत महत्त्व नाही.**

जगतामध्येच अभिव्यक्ति देतो; परंतु जेव्हा तो या स्थूल देह-कवचाचा त्याग करतो, तेव्हा त्याच्या जीवनाची अभिव्यक्ति सूक्ष्मदेहद्वारा सूक्ष्म जगतांत किंवा मनोदेहद्वारा मनोजगतांत चालूच राहते.

साधारणत:, स्थूल देहांतील जन्मामध्ये, ज्या संस्कारांना अभिव्यक्ति द्यावयाची असते, ते सर्व खर्च होऊन संपले, म्हणजेच त्या देहांतील जीवनहि संपते. परंतु काही अपवादात्मक बाबतीत, हे संस्कार कामी येऊन संपून जाण्यापूर्वीच, जीवात्म्याला या स्थूल देहाचा त्याग करावा लागतो. उदाहरणार्थ, जो मनुष्य आत्महत्या करतो, तो आपल्या जीवनाचा काल कृत्रिम रीत्या कमी करुन, सफल आणि व्यक्त होण्यास विमोचित झालेल्या संस्कारांच्या कार्यास प्रतिबंध करतो. **अकाल मृत्यूमुळे, सफलतेसाठी सुटलेल्या संस्कारांच्या अभिव्यक्तीस जेव्हा प्रतिबंध होतो, तेव्हा, त्या व्यक्तदेह आत्म्यास, स्थूलदेहाचा त्याग केल्यानंतर देखील, त्या संस्कारांची गतिकारक प्रेरक शक्ति (propelling force) अनुभवावी लागते.** ज्या संस्कारांना व्यक्त होऊन संपून जाण्यास प्रतिरोध होतो, त्यांचा आवेग मृत्यूनंतरच्या जीवनातदेखील चालूच राहतो. आणि म्हणून, गतात्म्यास स्थूल जगतांतील वस्तूंची अतिशय जरुर भासते; व त्या मिळण्याची त्याला अतिशय इच्छा होते.

भूताने पछाडणे.

अशा व्यक्तदेह आत्म्यास स्थूल जगताबद्दल अनावर आसक्ति वाटते; आणि स्थूल वस्तूंबद्दल त्याला इतका हव्यास वाटतो, की जे आत्मे अद्याप देहधारी असतील, त्यांच्या स्थूल देहांच्याद्वारा, तो आपल्या इच्छांची पूर्ति करुन घेण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे, एखाद्या आत्म्यास मद्यपानाची आत्यंतिक इच्छा असेल, तर तो आपली ही इच्छापूर्ति करुन घेण्यासाठी अनैसर्गिक उपायांचा अवलंब करतो. तो आपल्या संधीची वाट पहातो. जेव्हा त्याला स्थूल जगतातील एखादा मनुष्य मद्यपान करतांना आढळेल, तेव्हा त्याच्या स्थूल देहांत प्रवेश करुन, आणि त्याच्याशीं संबंध आणून, तो त्याच्या द्वारां, आपली इच्छा पूर्ण करुन घेतो. त्याचप्रमाणे, एखाद्याला अगदी विवेकशून्य क्रोधाच्या अभिव्यक्तीचा अनुभव घेण्याची इच्छा असेल, तर स्थूल जगतांत जो मनुष्य क्रोधावेशांत असेल, त्याच्या द्वारां तो आपली ती इच्छा पूर्ण करुन घेतो. असे आत्मे समान संस्कार असलेल्या स्थूल देहधारी आत्म्यांना भेटण्याची आणि त्यांच्या स्थूल देहांत प्रवेश करण्याची संधि सतत शोधीतच असतात. आणि दुसऱ्यांच्या द्वारा टिकणारा हा आपला स्थूल जगताचा संबंध ते शक्य तितक्या कालपर्यंत ठेवण्याचा प्रयत्न करतात. **मृत्यूनंतर, अशा तऱ्हेने स्थूल जगतांत गुंतून घुटमळत राहणे, हा आत्म्याच्या नैसर्गिक जीवनप्रवाहात अत्यंत मोठा अडथळा असतो.**

मृत्यु म्हणजे दोन जन्मांतील मध्यकालाचा प्रारंभ होय.

जे अशा बिकट परिस्थितीत सापडतात, ते तर विशेषच दुर्दैवी समजले पाहिजेत. कारण, स्थूल जगांत वावरणाऱ्या आत्म्यांच्या द्वारा, आपल्या क्षुद्र इच्छांची अनैसर्गिक



थांबविण्याचा व त्यांचा आपल्या जीवनामध्ये हस्तक्षेप टाळण्याचा खात्रीलायक उपाय समजून, कित्येक लोक दुष्टपणाने अगर क्रोधावेशांत, दुसऱ्यांना ठार मारण्याचा प्रयत्न करतात. कित्येक लोक आत्मत्यागाचे उत्तम प्रतीक म्हणून स्वत:च्या मृत्यूस निमंत्रण करितात; आणि कित्येक वेळा, स्वत:स न सुटणाऱ्या जीवनांतील क्रूर प्रश्नांना व संकटांना कंटाळून, मृत्यु त्यांचा शेवट करीलच, या खोट्या आशेने लोक त्याला कवटाळतात. अशा तऱ्हेने, **बहुतेक लोकांच्या मनांत मृत्युला अवास्तव व असीम महत्त्व प्राप्त झालेले असते.**

मृत्यु ही जीवनाची पार्श्वभूमि आहे.

काही विशिष्ट रुपां (Forms) वर मनुष्याची आसक्ति बसते; व म्हणूनच, मृत्यूला हे अवास्तव महत्त्व आले आहे. परंतु, जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन जर थोडा अधिक विशाल केला, तर सर्वसाधारण मनुष्यास देखील, मृत्यूचे येवढे महत्त्व वाटणार नाही. आणि मृत्यूची कटुता त्याला इतकी बोचणार नाही. **रुपें क्षणभंगुर असली तरी वस्तुत: रुपारुपांमधूनहि जीवनाला अबाधित अखंडता असते; कारण स्वत:च्या अभिव्यक्तीकरता व निवासमंदिर म्हणून, जीवन जुनी रुपें टाकून, नित्य नवीन रुपे धारण करीत असतें.** मृत्युपरंपरेला जन्मपरंपरेची समतोलता देणारी जोड मिळते. मृत्यूचा हात अविरत चाललेला असून देखील जीवन-विकास चालूच असतो; जुन्या पिढ्यांच्या जागी नवीन पिढ्या येतात; **स्वत:स सतत नवोत्साह आणि ताजेपणा आणीत, नवीन रुपांमध्ये जीवन व्यक्त होते;** प्राचीन जीवनाचे प्रवाह निरनिराळ्या रुपांमधून प्रगती करीत सारखे पुढे जातात; आणि ती रुपें मात्र, महासागरावरील लाटांप्रमाणे येतात आणि जातात.

साधारण जीवनाती निरंतरता.

तेव्हा, मृत्यु हा अप्रतिहार्य आणि कधीहि भरुन न येणारे नुकसान करणारा आहे, असे चुकीने मानल्यामुळे जी विषण्णता उत्पन्न होते, त्या विषण्णतेचा पुष्कळसा भार हलका करण्यापुरता बराचसा आधार सामान्य मनुष्याच्या मर्यादित अनुभवांत देखील असतोच. विशिष्ट रुपांबद्दल आसक्ति ठेवली नाही, आणि जीवनाचा केवळ वैयक्तिक दृष्टीने विचार केला नाही, तरच मृत्यूसंबंधी योग्य वृत्ति ठेवता येईल. परंतु विशिष्ट रुपांवरील आसक्तीमुळे, संसारी मनुष्यास नेमकी हीच गोष्ट कठीण वाटते. एक रुप त्याला दुसऱ्या रुपाइतके चांगले वाटत नाही. आणि ज्या स्वत:च्या विशिष्ट देहरुपाशी त्यांचे तादात्म्य झालेले असते, त्याचे तर त्याला सर्वात जास्त महत्त्व वाटते. सर्वसामान्य जीवनप्रवाहाचें रक्षण आणि त्याची प्रगती, याचे त्याला कांही विशेष महत्त्व वाटत नाही. **केवळ स्वत:च्या व ज्यांच्याशी तो संबद्ध झाला आहे, अशा इतर रुपांचे सातत्य आणि अखंडता मात्र त्यास हवी असते.** त्याचे हृदय त्याच्या बुद्धीच्या निर्णयाचा स्वीकार करु शकत नाही; आणि म्हणून, जीवनांत, एकंदरीत पाहता, गत रुपांची जागा नवीन रुपांनी घेतलेली त्याला

विशिष्ट रुपांवरील आसक्तिमुळेच मृत्यूचें दु:ख वाटते.

आढळली, तरी जी रुपें त्याला प्रिय असतात, ती नाहीशी झाली, म्हणजे तो निरतिशय दुःखाने व्याकुळ होतो.

मृत्युबद्दलच्या दुःखाने मूळ स्वार्थात.

सूक्ष्म निरीक्षण केल्यास, मृत्यूबद्दलच्या दुःखाचे मूळ स्वार्थातच आहे, असे आढळून येते. जेव्हा, एखाद्याची प्रिय व्यक्ति मृत होते, तेव्हा तो तोटा एकंदरीने अखिल जीवनाच्या दृष्टीने पाहतां, कोठेतरी भरुन निघाला असेलच, हे त्याला बौद्धिक दृष्ट्या समजते; परंतु त्याला वाटत असते, की 'मला काय त्याचे?' व्यक्तिविषयक दृष्टीने मृत्यूकडे पाहिले, म्हणजे मनुष्यास तो अनंत दुःखाचे कारण आहे, असे वाटते. परंतु, जीविताकडे सर्वसाधारण दृष्टीने पाहिले असतां, मृत्यु ही एक क्षुल्लक घटना आहे, हे कळून येते.

व्यक्तिनिरपेक्ष बुद्धीला पडलेले कूट प्रश्न.

व्यक्तिनिरपेक्ष (impersonal) विचार केल्यास, मृत्युमुळे झालेल्या वैयक्तिक दुःखापासून, मनाचे पुष्कळ रक्षण होते. परंतु सामान्य अनुभवाच्या मर्यादेत, मृत्यूला पाहिले असतां, जे गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवतात, आणि ज्यांच्यामुळे मनुष्याची तटस्थ बुद्धिदेखील कुंठित होऊन जाते, असे प्रश्न केवळ व्यक्तिनिरपेक्ष विचाराच्या द्वारा, सुटू शकत नाहीत. मृत्यु हा वैयक्तिक अस्तित्वाचा पूर्ण नाश आहे असे मानले, तर विश्वामध्ये, मृत्युमूळे कधीहि भरुन न येणारे नुकसान होते, असेच म्हणावे लागेल. ज्याची जागा दुसऱ्या कोणाच्यानेहि व कशानेहि भरुं शकत नाही, अशी कांहीतरी अलौकिक देणगी देण्याचे सामर्थ्य प्रत्येक व्यक्तीमध्ये असते. शिवाय **व्यक्तीला पूर्णता मिळण्यास बराच अवधि उरलेला असतांनासुद्धा, तिच्या ऐहिक जीवनाची दोरी कापली गेल्याचींहि उदाहरणे आहेतच.** त्याने ध्येयासाठी केलेली सारी धडपड, सर्व काही चांगले, थोर, उदात्त आणि सुंदर यासाठी त्याने केलेले सारे प्रयत्न, त्याचा उत्साह व शाश्वत आणि दैवी गोष्टी बद्दलची त्याची सारी महत्त्वाकांक्षा, – हीं सर्व मृत्युमुळे उत्पन्न झालेल्या अफाट शून्यांत विराम पावत असल्यासारख्या दिसतात.

अशुद्ध बुद्धि आणि सखोल अंतःप्रज्ञा, यामधील संघर्ष

मृत्यु हा व्यक्तीच्या अस्तित्वाचा अंत आहे, ही कल्पना तर्कशुद्ध अंतःप्रज्ञे (rationalised intuition) च्या अनिवार्य अपेक्षांच्या विरुध्द आहे. **वैयक्तिक अस्तित्वाचा मृत्यु हा अंत आहे, असे समजणारी अशुद्ध बुद्धि आणि अंतःप्रज्ञा (Intuition), यांच्यात याप्रमाणे बहुधा संघर्ष उत्पन्न होतो.** असा संघर्ष बहुधा शुद्ध विचारसरणीचा प्रारंभ ठरुन, तो 'मृत्यु हा व्यक्तीच्या अस्तित्वाचा अंतच आहे' ह्या गृहीत विश्वासाला आव्हान देतो. मनुष्याच्या आध्यात्मिक आकांक्षांना, मृत्यु हा जीवनाचा कायमचा अंत आहे, हे पूर्णपणे कधीच पटत नाही; आणि म्हणूनच, मृत्यूनंतरच्या अस्तित्वाविषयी इंद्रियातीत ज्ञान नसतांना देखील, जीवात्मा अमर आहे, हा विश्वास मनाला ग्राह्य होऊन, त्याला फारसा विरोध होत नाही.



स्वतःच्या वैयक्तिक अनुभवाने आत्म्याचे अमरत्व जाणणारे फारच थोडे असतात. **बहुजनसमाजाला मृत्यूनंतरच्या अस्तित्वाचे इंद्रियातीत ज्ञान** (supersensible knowledge) **होणे अशक्य असते.** आत्म्याचे अमरत्व हा त्यांच्या दृष्टीने केवळ एक प्रिय आणि स्वीकारार्ह, असा विश्वास असतो, एवढेच.

अमरत्वाचा प्राकृतिक पाया.

शास्त्रीय जिज्ञासेने, जे 'दुसऱ्या जगाशी' संबंध ठेवण्याची साधने उपलब्ध करुन घेतात त्यांना, किंवा काही विशिष्ट परिस्थितीमुळे, ज्यांच्या जीवनात, गतात्म्यांना कांही कार्य करावे लागते, किंवा यावे लागते त्यांना, किंवा ज्यांच्या आध्यात्मिक प्रगतीमुळे, जाणिवेच्या काही सुप्त शक्ति आपोआप विकसित झालेल्या आहेत, अशा लोकांना मात्र आत्म्याच्या अमरत्वाचे प्रत्यक्ष ज्ञान असते.

व्यष्टिभूत आत्मा म्हणजे जीवात्मा हा स्थूळ शरीराहून भिन्न असल्यामुळे, त्याचे अमरत्व शक्य होते. मृत्यूच्या वेळी स्थूल शरीराचा त्याग करुन, सूक्ष्म आणि मनोदेहाच्या साह्याने, जीवात्मा स्वतःच्या सर्व संस्कारांसहित आपले वास्तव्य

तीन विश्वे.

अंतर्जगात ठेवू शकतो. म्हणून, स्थूलशरीराच्या माध्यमातील जीवन, म्हणजे जीवात्म्याच्या खंडरहित जीवनाचा केवळ एक भागच असून, त्या अखंड जीवनाच्या दुसऱ्या भागांची अभिव्यक्ति, 'दुसऱ्या' जगात होत असते.

स्थूल शरीराच्या इंद्रियांना जेवढे दिसते, त्यापेक्षा निसर्ग कितीतरी अधिक मोठा आहे. निसर्गाचा अदृश्य भाग अधिक विरळ व सूक्ष्म पदार्थ आणि शक्ति, यांनी बनलेला आहे. निसर्गाच्या स्थूल व सूक्ष्म विभागांमध्ये, अगदी तोडून टाकणारा किंवा अनुल्लंघनीय, असा एखादा खंदक नाही. निसर्गाचे सूक्ष्म विभाग साधारण मनुष्याच्या दृष्टीच्या टप्प्यांत येत नाहीत; परंतु ते त्याला दिसत असलेल्या स्थूल विभागाशीं अविच्छन्न (continuous) किंवा जुळलेलेच असतात. ते अतिदूर नसतात; तरीहि साधारण माणसाच्या जाणिवेस मात्र ते अप्राप्य असतात. आणि याचे कारण असे आहे, की त्याची जाणीव, ज्या इंद्रियांना निसर्गाचे सूक्ष्म विभाग पहाण्याची सवय किंवा शक्ति नसते, अशा इंद्रियांच्या द्वारांच कार्य करीत असते. ज्याप्रमाणे, बहिऱ्या मनुष्याला ध्वनीची जाणीव नसते, त्याचप्रमाणे सर्वसाधारण मनुष्याला अंतर्गत जगतांची जाणीव नसते; आणि तो त्याच्याशी जाणीवपूर्वक व्यवहार ठेवू शकत नाही. म्हणून, व्यवहाराच्या दृष्टीने, त्याच्याकरता, ती दुसरी विश्वे (other worlds) च बनतात. निसर्गाच्या अदृश्य आणि सूक्ष्मतर भागांचे (मनुष्याच्या सूक्ष्म आणि कारण शरीरांना अनुसरुन) सूक्ष्म आणि कारण, असे दोन महत्त्वाचे विभाग होता. तेव्हा, सर्व निसर्गाचे सहाजिकच तीन विभाग पडतात. (i) स्थूल जगत् (ii) सूक्ष्म जगत् आणि (iii) कारण जगत्. जेव्हा जीवात्मा स्थूल शरीरात उतरतो, तेव्हा तो आपल्या जीवनास स्थूल

असतात. कामवासना, खादाडपणा, व मदिरासक्ति, ही या प्रकारच्या इच्छांची उदाहरणे होत. या इच्छा विशेषेकरुन पार्थिव आहेत; कारण त्यांच्यामध्ये, स्थूल विषय प्रत्यक्षपणे मिळवून व त्याला चिकटून, त्याच्यावर पकड ठेवण्याची प्रवृत्ति असते. तसेच, या इच्छांमध्ये, केवळ त्या विषयांच्या स्पर्शाने होणाऱ्या संवेदनाचेच प्राधान्य नसून, त्यांच्यामुळे शरीरात होणाऱ्या प्रतिक्रियेमधील संवेदनांचेहि प्राधान्य असते. या तामस व हीन इच्छा नरकावस्था उत्पन्न करतात.

सात्विक इच्छा आणि हीन इच्छा, यामधील फरक.

उच्च प्रकारच्या इच्छांच्या उलट, हीन इच्छा ह्या पदार्थाचा अर्थ किंवा त्यांचे सौंदर्यदृष्टता व नीतिदृष्ट्या कोणतेहि मूल्य न पाहतां, केवळ इंद्रियसंवेदना (sensations) वरच अवास्तव भर देतात. संगीतविषयक इच्छेसारख्या उच्च इच्छेमध्येहि, ध्वनीशीं इंद्रियाचा प्रत्यक्ष संबंध येण्याचा हव्यास असतोच. परंतु, ते केवळ ध्वनि म्हणून मनुष्यास महत्त्वाचे वाटत नसतात, तर सौंदर्य व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते, म्हणून त्यांचे महत्त्व वाटत असते. त्याचप्रमाणे, मनाला उपदेशपर व्याख्याने ऐकण्याची जी इच्छा असते, ती केवळ ध्वनिसंवेदने साठी नसते; तर, त्या ध्वनीतील बौद्धिक अर्थ व त्यांचे भावना उद्दीपित करण्याचे सामर्थ्य, यांच्यामुळेच ती इच्छा उत्पन्न झालेली असते.

निकृष्ट वासनांमधील शारीरिक संवेदनांचे स्थान.

अशा प्रकारे, उच्च वासनांमध्ये, संवेदनाधिष्ठित असलेल्या इतर वैचारिक अर्थपूर्णतेच्या मानाने, प्रत्यक्ष संवेदना, ह्या अगदी गौण असतात. परंतु, हीन वासनांमध्ये, स्थूल विषयांच्या संपर्काच्या संवेदना आणि त्यांच्य प्राप्तीमुळे शरीरात उत्पन्न होणाऱ्या प्रतिसंवेदनांचा बराच भाग असतो. **निकृष्ट वासनांच्या अनुभवांच्या बाबतीत, शारीरिक प्रतिसंवेदनां** (organic sensations) **चाच मोठा भाग असतो; आणि उच्च वासनांच्या अनुभवांपेक्षा, या निकृष्ट वासनांच्या अनुभवांमुळेच, जीवात्म्याला स्थूल शरीर म्हणून आपले स्वत:चे अस्तित्व अधिक तीव्रतेने आणि परिणामकारक रीतीने अनुभवता येते.**

स्थूल विषयाच्या अप्राप्तीमुळे निकृष्ट वासनांची अतृप्ति.

निकृष्ट वासनांची तृप्ति अगर अतृप्ति, यामुळे येणाऱ्या अनुभवांना असलेले सारे महत्त्व शारीरिक संवेदनां (bodily sensations) मध्येच संनिहित असते. म्हणून, उत्कृष्ट वासनांप्रमणे, केवळ विचार आणि कल्पना, यांच्या द्वाराच निकृष्ट वासनांच्या तृप्तीचा पूर्ण अनुभव घेतां येत नाही. वासनेच्या स्थूल विषयावर ताबा मिळवून, त्याला आत्मसात् करण्याचा आग्रह धरणे, हा निकृष्ट वासनांचा प्रमुख गुण आहे; स्थूल पदार्थांची कोणतीहि कल्पना केली, तरी तिच्यामुळे, त्या स्थूल विषयाप्रत पोचण्याचीच इच्छा मात्र उत्पन्न होते. **सूक्ष्म जगतांत, निष्कृष्ट वासनांचे स्थूल विषय मिळणें शक्य नसल्यामुळे,**



तृप्ति करण्यास प्रवृत्त झाल्यामुळे, ते स्वत:स आणि इतरांनाहि दु:ख भोगावयास लावतात. या दुर्दैवी आत्म्यांशी तुलना करुन पाहता, इतर आत्म्यांचे स्थूल देहावसानानंतरचे जीवन पुष्कळच विघ्नरहित असते.

साधारणत:, सफल होण्याकरता सुटलेले संस्कार झिजले, म्हणजे मृत्यु येतो. जेव्हा आत्मा स्थूल देहाचा त्याग करतो, तेव्हा स्थूल जगतांतील जीवनात उत्पन्न होऊन जमलेले संस्कार, अहंभाव आणि मन, हे जरी तसेच राहात असले, तरी त्यांना स्थूल जगताशी असलेला संबंध पूर्णपणे तुटतो. देहत्यागानंतरहि दुसऱ्यांच्या शरीरात संचार करणाऱ्या आत्म्यांच्या उलट, सर्वसाधारण आत्मे, स्थूल जगताशी संबंध तुटल्यामुळे, प्राप्त झालेल्या परिस्थितीशी आपापल्या सामर्थ्याप्रमाणे जुळेत घेण्याचा प्रयत्न करतात. लवकरच ते बदललेल्या परिस्थितीच्या मर्यादेत राहण्याचे स्वीकारतात, आणि **कर्तव्यशून्य मनोगत स्थिती (state of subjectivity) मध्ये निमग्न होतात.** या स्थितीमध्ये, त्यांच्या संस्कारांचे पुनरुज्जीवन (revival) होते, व तजन्य अनुभवांचे परिशीलन करण्याची क्रिया सुरु होते. तेव्हा, मृत्यूने स्थूल कार्यक्षेत्रापासुन तात्पुरती निवृत्ति व विश्रांती देणाऱ्या कालास सुरुवात होते. मृत्यु हा गेलेला व पुढे येणारा जन्म, या दोहोंमधील कालावधीचा प्रारंभ असतो.

# २२ : जन्मपरंपरा आणि कर्म

## भाग २ रा

## स्वर्ग आणि नरक

मृत्यूच्या वेळी, आत्मा स्थूल देहाचा त्याग करतो, म्हणून, मरणानंतर स्थूल जगताची जाणीव राहत नाही; कारण, ती स्थूल शरीरावरच प्रत्यक्षपणे अवलंबून असते. परंतु, अशा प्रकारें, स्थूल जगताची जाणीव जरी नष्ट झाली, तरी स्थूल जगतांतील अनुभवामुळे उत्पन्न झालेले संस्कार मनोदेहा (mental body) मध्ये कायम राहतात; आणि ते अर्धसूक्ष्म जगतात व्यक्त होण्याचा प्रयत्न करतात. मृत्यु आणि नवीन जन्म, यातील मध्यकालांत आत्म्याची जाणीव त्या संस्कारांकडे वळते; आणि त्यामुळे, ते संस्कार अधिक जागृत होतात व तद्विशिष्ट अनुभवांचे पुनरुज्जीवन होते. सर्वसाधारण मनुष्यास त्याच्या सूक्ष्म परिस्थितिरुप वातावरणाची जाणीव होत नाही. तो मनोगत स्थिती (subjectivity) मध्ये पूर्णपणे निमग्न राहतो; आणि या पुनरुज्जीवित संस्कारांच्या अनुभवांतच तो तन्मय होऊन जातो.

मरणोत्तर जीवनाची मनोगत अवस्था (subjectivity).

मृत्यूनंतरच्या जीवनांत, सुख आणि दुःख यांचे अनुभव, स्थूल जगतांतील अनुभवांपेक्षा अधिक तीव्र असतात. **या आनंदाच्या आणि दुःखाच्या मनोगत स्थितींनीच अनुक्रमे स्वर्ग आणि नरक असे म्हणतात. स्वर्ग आणि नरक या मनाच्या अवस्था आहेत; ती निराळी ठिकाणे अगर जागा आहेत, असे समजण्याचे कारण नाही. आणि मानसिक दृष्टीने पाहतां, व्यक्तिशः आत्म्याला त्यांचे बरेंच महत्त्व असले, तरी या अधिक मोठ्या दृश्य जगदाभासामधील, तो एक भासमात्र आहे.**

नरकाच्या स्थितीमध्ये, अगर स्वर्गाच्या अवस्थेमध्ये, वासना अधिकच तीव्र होतात; कारण, त्यांच्या अभिव्यक्तीसाठी, स्थूलाच्या माध्यमाची गरज राहत नाही; त्याचप्रमाणे,



या वासनांच्या तृप्तीचे किंवा अतृप्ततेचे अनुभवहि अधिक तीव्र होतात. पृथ्वीवरील जीवनांत, इच्छा, सुख आणि दुःख यांचा अनुभव, स्थूलाच्या माध्यमातूनच घ्यावा लागतो. या पार्थिव (earthly) जीवनांतहि आत्मा वरच्या उच्च प्रकारच्या शरीरांचा उपयोग करीत असतोच. परंतु, तेव्हा, त्याची जाणीव स्थूल देहाशी संबद्ध झालेली असते; व म्हणून, जाणिवेच्या व्यापारांना आणखी एका जास्तीच्या आवरणामधून संक्रमित व्हावे लागते. आणि त्यामुळे, जाड काचेंतून जाणारे प्रकाशकिरण ज्याप्रमाणे अंधुक होतात, त्याप्रमाणे जाणिवेच्या व्यापारांची शक्ति, तीव्रता आणि उठावदारपणा ही कमी होतात. **जड शरीरांतील निवासामध्ये, इच्छा आणि अनुभव, यांची तीव्रता कमी होते; परंतु या निवासस्थानाचा त्याग केल्यावर त्या सर्व इच्छांची तीव्रता सापेक्षतेने वाढते.**

स्वर्गावस्थेमध्ये, इच्छांची पूर्ति, स्थूल जगतांतील स्थितीप्रमाणे, इच्छेचा विषय मिळण्यावर अवलंबून नसते; तर इच्छेच्या विषयाचा केवळ विचार करण्यानेच त्या इच्छेची परिपूर्ति होते. उदाहरणार्थ, एखाद्या मनुष्यास अतिशय उत्तम गायना ऐकण्याची इच्छा झाली, तर अत्युत्तम गायनाचा केवळ विचार करण्याने, ते ऐकण्याचे सुख त्याला मिळेल; अत्युत्तम गायनाची केवळ कल्पना, या अवस्थेत, स्थूल जगतांतील भौतिक ध्वनीच्या लहरीचे कार्य करतात. अत्युत्तम गायनाच्या या कल्पनेपासून, त्याला जे सुख मिळते, ते या पार्थिव जीवनात प्रत्यक्ष भौतिक ध्वनि ऐकण्यामुळे होणाऱ्या सुखापेक्षा, पुष्कळ जास्त असते. **स्वर्गावस्थेमध्ये, इच्छा आणि त्यांची पूर्ति, यात कोणतेहि विघ्न नसते; विचार आणि भावना, यांच्या द्वारां होणारे इच्छापूर्तीचे सुख नेहमी जवळच असते.**

स्वर्गावस्थेमध्ये इच्छांची पूर्ति विचारांच्या द्वारा हाते.

वास्तविक पाहता, पार्थिव जीवनाच्या क्षेत्रांतदेखील, कांही लोक, स्थूल विषयावर प्रत्यक्षपणे अवलंबून न राहता, सुख मिळविण्याचे सामर्थ्य वाढवितात. उदाहरणार्थ, बीथओव्हन हा पूर्णपणे बहिरा असतांना देखील केवळ आपल्या कल्पनेच्या सहाय्याने आपल्या स्वतःच्या स्वर-गीतांची माधुरी व आनंद चाखू शकत होता. म्हणून, **लाक्षणिक अर्थाने, पृथ्वीवर देखील, तो स्वर्गावस्थेतच होता, असे म्हणता येईल.** त्याचप्रमाणे, आपल्या प्रियतमाचें जो प्रीतीने ध्यान करतो, त्याला आपल्या प्रियतमाचे प्रत्यक्ष सान्निध्य नसतांना देखील, केवळ त्याच्या विचारानेच सुख मिळते. परंतु, मृत्यूनंतरचा स्वर्गावस्थेतील असा कल्पनामय इच्छापूर्तीचा हा आनंद अनंतपटीने अधिक असतो; कारण, तेव्हा जाणीवे वरील सर्वात बाहेरचा आवरणरुप पडदा गळून गेल्यामुळे भारमुक्त झालेली असते.

पृथ्वीवरील स्वर्ग.

काही इच्छा, स्थूल विषय प्रत्यक्षपणे मिळवून, त्यांना स्थूल शरीराच्या द्वारां, आत्मसात् करण्यासंबंधी

हीन इच्छांनी नरकावस्था उत्पन्न होते.

# २३ : जन्मपरंपरा आणि कर्म

## भाग ३ रा

## गत जन्मांचे अस्तित्व आणि त्यांची स्मृति.

आत्म्याचें जीवन व त्याची जन्मपरंपरा, या विषयींच्या अतींद्रिय सत्यांचे ज्ञान, जे आपल्या निर्मल दृष्टीने प्रत्यक्षपणे मिळवूं शकतात, त्यांना जन्म म्हणजे जीवात्म्याचें

जन्म आणि मृत्यूच्या घटना.

स्थूल सृष्टींत होणारे केवळ अवतरण आहे, हे माहीत असते. जन्म व मृत्यु, ही अनेक जन्में घेणाऱ्या जीवात्म्याच्या जीवनाच्या अखंड सातत्यांतील विरामचिन्हें असून, ते दोन्हीहि अस्तित्वाच्या एका प्रकारामधून दुसऱ्या प्रकाराप्रत जाणाऱ्या जीवनप्रवाहाचीं प्रवेशद्वारे आहेत. जन्म आणि मृत्यु, हे दोन्हीहि आत्म्याच्या महत्तर जीवनांत, सारखेच आवश्यक आहेत; आणि मृत्य आणि जन्म, यामधील मध्यंतर, जन्म आणि मृत्यु यामधील मध्यंतराइतकेच आवश्यक आहे.

मृत्यु हा व्यक्तिजीवनाचा अंत आहे, असें मानणाऱ्यांप्रमाणेच, जन्म हा व्यक्ति-

अंत:प्रज्ञेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या गोष्टी.

जीवनाचा प्रारंभ आहे, असें समजणाऱ्यांच्या पुढे देखील, त्यांच्या खोट्या कल्पना व त्यांची विवेकशुद्ध अंत:प्रज्ञा (rationalised intuition) या दोहोंमधील संघर्ष उभा राहतो. वैयक्तिक दृष्टीने पाहिल्यास, चांगल्या व वाईट लोकांकरता, भौतिक सुख आणि वैभव, यांच्या वाटणीमध्ये जी विषमता असते, त्या विषमतेमुळे, अखिल विश्वांतील योजनेच्या अर्थपूर्णतेस व समर्थनीयत्वास बाधा असल्यासारखे वाटते. सद्गुणी लोक दु:खाच्या वेदनांत सापडलेले असून, दुर्जन वैभवविपुलतेत लोळत आहेत, असे दृश्य पाहिले, म्हणजे त्या दृश्यामुळे, जीवनामध्ये कांहीतरी शाश्वत आणि दैवी हेतु आहे, असा विश्वास ठेऊं इच्छिणाऱ्या माणसासमोर, अनुल्लंघनीय अडचणी उभ्या राहतात.



**त्या वासना अतृप्ततेच्या दु:खाचे तीव्र अनुभव आणतात. उत्कृष्ट वासनेसंबंधीच्या अनुभवांचे पुनरुज्जीवन किंवा पुनर्जागरण, ज्याप्रमाणे स्वर्गावस्थेतील सुखाचा अनुभव देते, त्याचप्रमाणे नीच वासनासंबंधीच्या अनुभवांचे पुनरुज्जीवन किंवा पुनर्जागरण नरकावस्थेतील दु:खाचे अनुभव देण्यास कारण होते.**

स्वर्गातील सुखे आणि नरकातील दु:खे

ज्याप्रमाणे या जगात निकृष्ट वासनांमुळे सुखापेक्षा दु:खाचेंच आधिक्य होते, त्याचप्रमाणे, मृत्यूनंतरच्या जीवनात देखील, नीच वासनासंबंधीचे पुनर्जागृत झालेले अनुभव, **सुखापेक्षा दु:खाचेच आधिक्य निर्माण करतात;** आणि अशा तऱ्हेने, नरकावस्था अस्तित्वात आणतात. आणि ज्याप्रमाणे, या जगतांत उत्कृष्ट वासनांमुळे दु:खापेक्षा सुखाचेच आधिक्य लाभते, त्याचप्रमाणे, मरणोत्तर जीवनातदेखील, उच्च वासनांसंबंधीच्या पुनरुज्जीवित अगर पुनर्जागृत झालेल्या अनुभवांमुळे, **दु:खापेक्षा सुखाचेच आधिक्य होऊन स्वर्गावस्था अस्तित्वांत येते.**

सूक्ष्म जगतांतील काल.

परंतु, स्वर्ग अथवा नरक, या दोन्हीहि बंधनाच्याच अवस्था असून, त्या सुखदु:खरुप व्दंव्दांनी मर्यादित आहेत; आणि या दोन्हीहि अवस्थांची कालमर्यादा संचित संस्कारांचे स्वरुप, परिणाम आणि तीव्रता, यांच्यावर अवलंबून असते. **जाणिवेच्या मनोगत अवस्थे** (subjectivity) **मुळे, स्थूल जगांतील कालगणनेचे सूक्ष्म जगतांतील कालगणनेशी कांहीहि सादृश्य नसते;** परंतु सूक्ष्म जगतांतील काल स्थूल जगतांतील कालाहून भिन्न असला, तरी तो स्थूल जगतांत संचित केलेल्या संस्कारांनीच निश्चित होत असतो. तथापि, महत्त्वाची गोष्ट ही आहे, की स्वर्ग व नरक, ह्या चिरकाल टिकणाऱ्या अवस्था नसून, जीवात्म्याच्या जीवनातील त्यांचे कार्य संपले, म्हणजे त्यांचाहि अंत होतो.

संस्काराचे पुनरुज्जीवन (vivification).

कामवासनेसारख्या निकृष्ट वासना आणि त्यापासून उत्पन्न होणारे क्रोधद्वेषादि विकार, हे नरकावस्थेत असणाऱ्या सर्व दु:खास आणि भ्रमांस कारण होतात. आणि ध्येयवादी महत्त्वाकांक्षा, सौंदर्यविषयक रसज्ञता आणि शास्त्रीय शोधबुद्धि, शेजाऱ्यांविषयी अगर इतरांविषयी सदिच्छा, आणि त्यापासून होणारे व्यक्तिविषयक प्रेम अगर बंधुता यामुळे स्वर्गाावस्थेतील ज्ञान आणि आनंद, यांनी संपन्न असलेले जीवन उत्पन्न होते. बहुतेक लोकांच्या बाबतीत, **या अवस्थांमध्ये, पार्थिव जीवनाच्या अनुभवांमध्ये त्यांनी मिळविलेल्या संस्कारांच्या पुनरुज्जीवना** (vivification) **च्या व्दारां, त्या पार्थिव अनुभवांचीच पुनरावृत्ति** (reliving) **होते.** परंतु, त्यांचा कालावधि आणि स्वभावगुणविशेष, हे मनुष्याच्या स्थूल देहातील अनुभवांच्या स्वरुपावर व कालावधीवर अवलंबून असतात.

स्वर्ग आणि नरक, या अवस्थांचा अंत

ज्याप्रमाणे ध्वनिलेखयंत्रा (gramophone) च्या

ध्वनिपेटिके (sound-box) ची सुई त्या यंत्राच्या तबकडी (record) ला पाडलेल्या प्रत्येक रेखेवरुन फिरली, म्हणजे ती तबकडी बाजूस ठेवण्यात येते, त्याचप्रमाणे, जाणिवेने पार्थिव जीवनांत उमटलेल्या सर्व संस्काररुपी ठशातून प्रवास केला म्हणजे स्वर्गावस्था व नरकावस्था, यांचाहि अंत होतो. शिवाय, ध्वनिलेखनयंत्राच्या तबकडींतून कोणत्या प्रकारचे गीत बाहेर पडेल, हे जसे ज्या गीताचें ध्वनिलेखन झाले असेल, त्या मूळ गीतावर अवलंबून असते, त्याचप्रमाणे जे तीव्रतर आणि विशालतर अनुभव आत्म्याला मृत्यूनंतर येतात, त्या अनुभवांचे गुणविशेषदेखील, त्या व्यक्तीच्या स्थूल देहांतील जीवनाच्या प्रकारावर अवलंबून राहतात. या दृष्टीने पाहतां, स्वर्ग आणि नरक, या मनुष्याच्या पार्थिव जीवनाच्याच छाया होत.

पार्थिव अनुभवांचे पुनराव-लोकन व परीक्षण.

पृथ्वीवरील भूतकालाचे केवळ मानसिक पुनरुज्जीवन करण्यापलीकडे जर या अवस्थांचा, व्यक्तिगत जीवात्म्याच्या जीवनात, काही विशेष उपयोग झाला नसता. ते पुनरुज्जीवन, म्हणजे जे घडले त्याची केवळ पुनरावृत्तीच झाली असती. या मरणोत्तर स्थितीमध्ये, जाणीव **पार्थिव जीवनाच्या पुनरुज्जीवित इतिहासा** (amimated record) **चे सावकाश आणि प्रभावपूर्ण सिंहावलोकन करुं शकते;** आणि पुनरुज्जीवन अनुभवांच्या वाढलेल्या तीव्रतेमुळे, जाणिवेला त्यांच्या गुणधर्मांचे अधिक सोईस्कर व उपयुक्त परीक्षण करतां येते. पृथ्वीवरील बहुतेक लोकांची जाणीव **प्रामुख्याने बाह्यपदार्थविषयक** (objective) **आणि अग्रदर्शी** (forward looking) **असते;** आणि न संपलेल्या संस्कारांच्या आवेगामुळे, जाणिवेचें लक्ष्य, विशेषत: वर्तमान अगर भविष्यकाल, यात शक्य होणाऱ्या संस्कारांच्या परिपूर्तीकडेच असते. परंतु, मरणोत्तर जीवनामध्ये, बहुतेकांची जाणीव, प्रामुख्याने मनोगत (subjective) आणि पुनरावलोकनशील (retrospective) किंवा अतीततदर्शी असते; आणि तेथे अग्रदर्शी संस्कारांचे दडपण आणि प्रेरणा नसल्यामुळे, जाणीव (मनामध्ये स्मृतिचित्रें उद्धृत करण्याच्या प्रक्रियेप्रमाणे) बहुश: गतकालाचेच पुनर्निरीक्षण आणि महत्त्वमापन करण्यात गुंतलेली असते.

चलचित्रपटा (cinema) चा सादृश्य

मरणोत्तर जीवनांत, पार्थिव जीवनांतील बदलत्या परिस्थितींना तात्काल प्रत्युत्तर देण्यामध्ये उत्पन्न होणारी अस्थिरता व क्षुब्धता जाऊन, त्याऐवजी, तत्काल क्रियांच्या आवश्यकतेपासून मुक्त असलेली अधिक शांत मनाची स्थिति प्राप्त होते; आणि ह्या स्थितीमध्ये, पार्थिव जीवनातील संग्रहित अनुभवसामग्री, ही पार्थिव जीवनामध्ये शक्य असलेल्या स्मरणशीलते (memory) हून अधिक स्पष्टपणे अवलोकनसुलभ बनते. **पार्थिव जीवनातील सर्व चित्रे मनाच्या चित्रपट-फिल्मवर चिन्हित झालेलीच असतात. आणि याच मरणोत्तर कालामध्ये, मनोगत बनलेल्या जाणिवेच्या** (subjectivised consciousness) **पडद्यावर अंकित होणाऱ्या, मूळच्या स्थूल जीवनांतील वाढविलेल्या** (magnified) **अनुभवचित्रांचा अभ्यास होऊं शकतो.**



पार्थिव अनुभवांचा परिपाक (assimilation)

अशा रीतीने, स्वर्गावस्था अगर नरकावस्था, ही पार्थिव जीवनांत संग्रहित केलेल्या अनुभवांचा परिपाक (assimilation) करण्याची साधने असून, या पचविलेल्या अनुभवांचे फायदे घेऊन, जीवात्मा स्थूल शरीरांतील दुसरा जन्म सुरु करुं शकतो. मागील आढावा घेऊन आणि विचार करुन, आत्म्याला जे धडे शिकतां येतात, ते तीव्रतर झालेल्या सुखदु:खामुळे, मनोदेहामध्ये बिंबून जातात; आणि दुसऱ्या जन्मामध्ये, ते धडे क्रियाशील जाणिवेच्या अंत:प्रज्ञेचे भाग बनतात. तथापि त्यापासून, पूर्वजन्मातील विशिष्ट घटनांचे स्मृतिरुप पुनरुज्जीवन (revival) होत नाही. मरणोत्तर जीवनामध्ये, मनाने पचविलेली सत्यें, ही नवीन जन्मात अभिजात प्रज्ञे (inborn wisdom) चा भाग होतात. **विकसित अंत:प्रज्ञा** (intuition), **ही दुसरेंतिसरे कांही नसून, पूर्वीच्या जन्मपरंपरेमध्ये मिळविलेल्या विविध अनुभवसमूहांच्या संकलित समालोचनाचें सारज्ञानच असते.**

स्वर्गावस्था आणि नरकावस्था, यांचा अंतप्रज्ञेच्या विमो-चनामधील भाग.

निरनिराळ्या आत्म्यांचे अभिजात ज्ञानाचें प्रमाण निरनिराळे असते; आणि ऐहिक जीवनांतील यत्नशीलता आणि साहस, यांसाठी त्यांचे तेच पहिले भांडवल असते. एका दृष्टीने पाहतां, हे उपजत ज्ञान किंवा अंत:प्रज्ञा, म्हणजे मनाच्या सर्वांगीण वाढीला उपयुक्त ठरणारा गतानुभवांचा केवळ परिणाम आहे, असे वाटण्याचा संभव आहे. परंतु अंत:प्रज्ञेकडे, नवीन कमाईच्या दृष्टीने न पाहतां, जीवात्म्यांत जे सुप्तावस्थेत होते, तेच अंत:प्रज्ञेच्या रुपांत अनावृत्त झाले आहे, असे समजणे अधिक खरे होईल. आणि या सखोल दृष्टिकोणाने पाहता, **पार्थिव जीवनांतील सर्व अनुभव, व त्याचप्रमाणे मरणोत्तर जीवनांतील समालोचनात्मक (reflective) आणि संकलनात्मक (consolidatory) प्रक्रिया-हीं दोन्हीहि, उत्पत्तिकालापासूनच आत्म्यामधे जे सुप्त अभिजात ज्ञान आहे, तेच हळूहळू पृष्ठभागावर आणण्यास, केवळ साधनमात्र आहेत.** पार्थिव जीवन आणि तेथील अनुभव, व त्याप्रमाणेच मरणोत्तर जीवनांतील स्वर्ग आणि नरक या अवस्था, ही सर्व अखिल वस्तुमात्रांच्या मूलस्थानाप्रत जाण्याकरता, जीवात्म्याने केलेल्या प्रवासांतील आवश्यक भाग आणि घटना आहेत.

निर्णयात्मकता व त्याकरता आवश्यक असलेलें कधीहि भ्रष्ट न होणारे विमल प्रेम, हे त्याला प्राप्त झालेले असतात. या नवीन ज्ञानामुळे, त्याला स्वत:च्या व त्याच्याशी संबंध असलेल्या इतरांच्या पूर्व जन्मांविषयी पुष्कळशी माहिती मिळते; **आणि कर्मसंबंधी ज्ञानयुक्त व्यवस्थापन करुन, अध्यात्मपथावर स्वत: प्रगत होण्याकरता, त्याला त्या माहितीचा उपयोग तर होतोच,** परंतु इतरांच्या गतजन्मांना अनुसरुन, त्यांचेहि मार्गदर्शन करण्यासाठी, त्याला त्या माहितीचा उपयोग होतो.

स्मृति-प्राप्तीचे फायदे.

पूर्वजन्मस्मृतींची नैसर्गिकपणे प्राप्ति झाली, म्हणजे अध्यात्ममार्गातील प्रगति अधिक त्वरित होते. सांसारिक बंधनांचा विकास व इतिहास, यांचे ज्ञान झाल्यामुळे, त्यांच्यापासून स्वत:ची सुटका करुन घेणे सुलभ होते. **ज्या विकासक्रमामध्ये आतापर्यंत सीमित करणाऱ्या भूतकालाचे ज्ञान नव्हतें, त्यामध्ये आता ते ज्ञान येते. भूतकालाने उत्पन्न केलेल्या संधी आणि अडथळे, जाणिवेच्या आटोक्यात येतात; आणि त्यांचा आता काळजीपूर्वक आणि बुद्धिपूर्वक उपयोग करता येतो.** प्रदत्त अनुभवावर विचारांचे कार्य होऊन, आतापर्यंत अस्पष्ट (inarticulate) असलेल्या अंत:प्रज्ञेला पूर्ति मिळाल्यामुळे, कृतीमध्ये चूक होण्याची शक्यता कमी होऊन, इच्छित गोष्टी घडवून आणण्याचे सामर्थ्य वाढते.

पूर्वजन्मांच्या ज्ञानामुळे जवळचा मार्ग सापडतो.

आध्यात्मिक पूर्णतेस प्राप्त झालेल्या प्रज्ञासंपन्न सद्गुरुंना, पूर्वी होऊन गेलेल्या जन्मांमध्ये, कांही खास असे स्वारस्य वाटत नसते. त्यांच्या दृष्टीने, भौतिक अस्तित्वांतील अनेक बिनमहत्त्वाच्या गोष्टीपैकीच, गतजन्म हेहि महत्त्वशून्यच असतात. जर त्यांनी एखाद्याच्या गतजन्मांच्या ज्ञानाचा उपयोग केलाच, तर तो केवळ त्याला शाश्वत सत्याच्या पथावर मदत करण्यासाठीच असतो. पूर्वजन्मांच्या ज्ञानामुळे, ते साधकास आवश्यक असणारेंच असे मार्गदर्शन देऊ शकतात. (१) पूर्वजन्मांतील घटना, (२) पूर्वजन्मीच्या पद्धतीने साधकाने सर्वश्रेष्ठ सत्याचा शोध केला असेल ती पद्धति, आणि (३) आपल्या गतजन्मांतील क्रियांनी त्याने स्वत:साठी निर्माण केलेल्या संधी व विघ्नें, अशा तीन गोष्टींनी अध्यात्मपंथातील स्वरुपविशेष निश्चित होत असता. साधकाला अज्ञात असलेल्या या सर्व गोष्टी सद्गुरुच्या निरभ्र दृष्टीस खुल्या असतात; आणि तो त्याच्या ज्ञानाचा उपयोग सत्याची उपासना करणाऱ्या साधकाच्या आध्यात्मिक विकासाला गति देण्याकरिता करतो. अनेक जन्मांच्या अनुसंधानाने व प्रयोगशीलतेने साधक ज्या ठिकाणी आलेला असतो, त्या स्थानापासून, सद्गुरु साधकाचे पुढील मार्गदर्शन करीत असतो. **भौतिक गोष्टीप्रमाणेच, आध्यात्मिक गोष्टीतहि विशाल तर व अधिक अचुक ज्ञान असेल, तर शक्ति व वेळ यांची बचत होते.**



अधिक सखोल आणि गंभीर असे स्पष्टीकरण मिळाले नाही, तर मानवी मनापुढे अशा दु:खद कूटांचा गोंधळ उभा राहतो; आणि त्यांच्यामुळे त्याच्या जीवनविषयक दृष्टिकोणात, कटुता उत्पन्न होते. शिवाय, त्यांच्यामुळे निर्माण होणारी कुत्सित वृत्ति (cynicism), ही मृत्यूमुळे होणाऱ्या वैयक्तिक दु:खापेक्षाहि अनेक प्रकारे अधिक वाईट असते. परंतु अनेक विरोधी दृश्ये दिसत असतांनासुद्धा, **मानवी मनामध्ये, जीवनाच्या स्वत:सिद्ध यथार्थतेबद्दल व महत्त्वपूर्णतेबद्दल, गंभीर आणि अढळ श्रद्धा ठेवण्याची अभिजात प्रवृत्ति असते.** आणि कृत्रिमपणे उत्पन्न केलेल्या अडचणींची अपवादात्मक उदाहरणे सोडून, आत्म्याच्या या आंतरिक प्रवृत्तीस अनुकूल असलेली स्पष्टीकरणेंच मानवी मनाला ग्राह्य होतात.

गंभीर व सखोल स्पष्टी-करणाच्या स्वीकाराची प्रवृत्ति.

आत्म्याच्या अमरतेच्या सत्याचे ज्ञान ज्यांना होते, अशा लोकांपेक्षाहि, पुनर्जन्माच्या सत्याचे प्रत्यक्ष ज्ञान असणारे लोक कमीच असतात. जीवात्म्याच्या मनोदेहांत गतजीवनांच्या स्मृती सुरक्षितपणे साठविलेल्या असतात; परंतु, त्यांच्यावर एक पडदा ओढला गेला असल्यामुळे, सामान्य लोकांच्या जाणिवेत, त्या स्मृती राहत नाहीत. जेव्हा आत्मा हा स्थूल देह बदलतो, तेव्हा त्याला नवीन मेंदू मिळतो; आणि सामान्यत:, जागृतीतील चेतना, या मेंदूच्या व्यापारांना धरुनच कार्य करीत असते. सामान्यत:, केवळ वर्तमान जीवनाच्या स्मृतीच पूर्वीच्या जन्मांतील जाणिवेत येऊ शकतात; कारण, दुसऱ्या मेंदूच्या माध्यमांतून घेतलेल्या अनुभवांच्या स्मृतींच्या मार्गात, नवीन मेंदू हा एक अडथळा बनतो.

मेंदू हा एक अडथळा बनतो.

कांही अपवादात्मक उदाहरणांत मात्र, मेंदूच्या या अडथळ्यास न जुमानतां, या जन्मात ज्यांना मुळीच कारण नाही, अशा काही स्मृती, या जन्मामध्ये, स्वप्नांच्या रुपाने उतरतात. चालू जन्मांत, जो मनुष्य कधीहि पाहिला नाही, अशी एखादी व्यक्ति मनुष्याला स्वप्नांत दिसू शकेल. असे पुष्कळदा घडते की, जी माणसे एखाद्याला स्वप्नांत दिसतात, ती त्याला त्याच्या पूर्वजन्मी भेटलेली असतात. परंतु तरी देखील, अशी स्वप्ने जेव्हा सामान्य प्रकारचीच असतात, तेव्हा त्यांना आपण गतजन्मांतील स्मृती, समजू शकत नाही. अशा स्वप्नाचा अर्थ इतकाच की, मनुष्याच्या स्वप्नात कार्य करणाऱ्या कल्पनेवर, त्याच्या गतजन्मांतील पदार्थांचा व वस्तूंचा प्रभाव झालेला असतो. **गतजन्मांची खरी स्मृति, ही वर्तमान जीवनांतील स्मृतीप्रमाणेच स्पष्ट, स्थिर आणि अचूक असते.** आणि ही स्मृति जेव्हा मनुष्यास येते, तेव्हा पूर्वीच्या कित्येक जन्मांतील स्वत:च्या व इतरांच्या अस्तित्वाबद्दल शंकाच उरत नाही. ज्याप्रमाणे हल्लीच्या जन्मांतील स्वत:च्या गत जीवनाबद्दल, तो शंका येऊ शकत नाही, त्याचप्रमाणे, गत जन्मांतील जीवनाबद्दलहि त्याला संशय उरत नाही.

गतजन्मांच्या स्मृती.

पूर्वीच्या जन्मांची स्मृति असलेले लोक फारच थोडे असतात. बहुसंख्य लोक, स्थूल जगताशी इतके पूर्णपणे बद्ध झालेले असतात, की त्यांना, अतींद्रिय तत्त्वांच्या अस्तित्वाबद्दल, शंका देखील येत नाही. पूर्व जन्मांच्या आठवणी येण्यामध्ये, मेंदू हा एक मोठाच सीमाकारक अडथळा असतो. जोंवर, स्थूल शरीर आणि मेंदूचे व्यापार यांच्याशी जाणीव संबद्ध झालेली असते, तोवरच हा अडथळा असतो. परंतु, **मेंदूने आलेल्या मर्यादितेतून, जेव्हा जाणीव विमुक्त होते, तेव्हा, मनोदेहांत असलेल्या गतजन्मांच्या स्मृती परत मिळवून, ती त्या स्मृतींचे पुनःसंस्थापन करुं शकते.** परंतु, यासाठी, कांही अंशात, ज्ञान व अनासक्ति, यांची आवश्यकता असते; आणि केवळ प्रगत अशा आध्यात्मिक लोकांतच हे गुण आढळतात. पूर्णतेप्रत जे अद्याप पोचलेले नाहीत, आणि ज्यांचा आंतरिक भूमिकांतील प्रवास सुरुच आहे, अशांना देखील, गतजन्मांची पूर्ण स्मृति स्पष्टपणाने आणि बिनचूक येऊ शकते.

पूर्वीच्या जन्मांतील आठवणी येणे.

कांही अपवादात्मक आणि विरळ उदाहरणे सोडून, मनुष्याची आध्यात्मिक दृष्टीने पुरेशी प्रगती झालेली असल्याखेरीज, त्याला पूर्वजन्मांच्या स्मृती येत नाहीत. जीवनाच्या या सोइस्कर नियमामुळे, जीवात्म्याची आध्यात्मिक प्रगति निर्विघ्नपणे होऊ शकते. प्रथम-दर्शनी, पूर्वजन्मांची विस्मृति, म्हणजे केवळ तोटाच आहे, असे वाटेल. परंतु वस्तुस्थिति उलट आहे. **बहुतेक बाबतीत, पूर्वजन्मांचे ज्ञान, हे आध्यात्मिक विकासाच्या अग्रगतीचें मार्गदर्शन करण्याकरता, मुळीच आवश्यक नसते. जीवनाला भूतकालाने निर्दिष्ट होऊं देण्यांत आध्यात्मिक प्रगति नसते. तर, अंत:प्रज्ञेस पटलेल्या सर्वश्रेष्ठ मूल्यांच्या प्रकाशामध्ये जीवनाचें मार्गदर्शन करणे, म्हणजेच आध्यात्मिक प्रगति होय.** कित्येक वेळा, चालू जन्मांतील स्मृति देखील, जीवनाच्या बदलत्या परिस्थितीशीं स्वत:चे आध्यात्मिक दृष्टीने व्यवस्थापन करण्यामध्ये विघ्न आणते. एका दृष्टीने, मुक्तीचा प्रश्न म्हणजे अतीता (past) पासून विमुक्त होण्याचा प्रश्न आहे, असे म्हणता येईल. जन्ममृत्यूच्या चक्रांत बद्ध असलेल्या जीवांच्या चालू जीवनाची रुपरेषा भूतकालानेच अपरिहार्यपणें नियत होत असते.

गतजन्मांची स्मृति लोप पावल्यामुळे, आध्यात्मिक प्रगतीवर परिणाम होत नाही.

ज्याची कांही आध्यात्मिक प्रगति झालेली नाही, अशा मनुष्यावर जर गतजन्मांच्या जाणीवयुक्त स्मृतींचे ओझे पडले, तर त्याचे जीवन अपरिमितपणे गुंतागुंतीचे होईल. त्याच्या पूर्वस्मृतींच्या प्रकाशात, त्याला लोक निरनिराळ्या विविध पार्श्वभूमीमध्ये दिसल्यामुळे, तो घाबरुन आणि गोंधळून जाईल. परंतु असल्या घोटाळ्यास त्याला सम्मुख व्हावें लागत नाही; कारण, गत जन्मांच्या आठवणी जागृत झालेल्या नसल्यामुळे, तो सुरक्षित असतो.

गुंतागुंत टाळणारी योजना.



वस्तूंना आणि व्यक्तींना तो मर्यादित व निश्चित पार्श्वभूमी (Context and setting) मध्येच पाहात असल्यामुळे, त्याला आपल्या क्रिया व संबंध, चालू जन्मांतील ज्ञानाच्याच साहाय्याने ठरविणे सोपे जाते. परंतु त्याच्या क्रिया आणि त्याचे संबंध, हे त्याच्या चालू जन्मातील ज्ञानानेच पूर्णपणे निश्चित होतात, असा कांही याचा अर्थ नाही. पूर्व जन्मामध्ये जें जें घडलें असेल, त्याचा नकळत परंतु निश्चित परिणाम होतोच. परंतु, जन्मांच्या घटनांचा प्रत्यक्ष परिणाम होत असला, तरी हेंहि तितकेंच खरें आहे की, **गत जन्मांच्या जाणीवपूर्वक स्मृतींच्या पुनरुद्भवापासून, त्याचें रक्षण केले जात असल्यामुळे, त्याच्या मनांत गोंधळ होत नाही. स्वत:च्या क्रिया व संबंध ठरविण्यासाठी, ज्या गोष्टींचा मनुष्याला विचार करावा लागतो, त्यांत गतजन्मांची जाणीवयुक्त स्मृतीहि असती, तर तो फार गोंधळून गेला असता.**

मनुष्य जेव्हा निरिच्छ बनला असेल, आणि त्याची 'मी-तूं' पणाची भावना पूर्णपणे विरली असेल, तरच त्याला गतजन्मांच्या स्मृतींच्या पुनरुद्भवास, उद्भ्रांत न होतां व तोल न जाऊ देतां तोंड देता येते. त्याला एकदा जे आप्त म्हणून वाटत होते, ते हल्लीच्या जन्मांत कदाचित दुसऱ्यांचे झालेले दिसतील. आणि प्राचीन संबंध व स्वत:च्या आसक्ती, किंवा कल्पित हक्क, हे जर तो चालू जन्मांत आणू पाहील, तर तो स्वत:साठी आणि इतरांसाठी अनिर्वचनीय गुंतागुंत, घोटाळा आणि दु:ख निर्माण करील. **पूर्व जन्मांच्या स्मृतींच्या क्षोभकारक प्रभावाचा सामना करण्याची आध्यात्मिक तयारी करावयाची असेल, तर साधकाला सर्व प्रकारची ग्रहणशीलता (possessiveness) मनांतून काढून टाकली पाहिजे.**

स्मृति येण्याकरिता सुरक्षिततेच्या अटी.

जेव्हा मनुष्याची आध्यात्मिक तयारी होते, तेव्हा तो पूर्ण निरिच्छ बनतो; आणि तो व्यक्तिनिरपेक्ष व तत्त्वपर (impersonal) प्रेमाने परिपूर्ण होतो. **तो आपले जुने मित्र आणि शत्रू, यांच्याकडे समभावाने पाहूं शकतो;** आपली मर्यादिता टाकून, तो इतक्या उच्च पातळीवर जातो, की तो पूर्वीच्या व हल्लीच्या जन्मांतील आप्त आणि परके, या सर्वांशी सारखाच वागतो. आपले दुसऱ्यावर आणि दुसऱ्यांचे आपल्यावर आग्रहशील हक्क आणि प्रतिहक्क असण्याची कल्पनाहि त्याला शिवत नाही; कारण, त्याला सर्व जीवनाच्या एकतेच्या व सांसारिक घटनांच्या भ्रामकतेच्या गंभीरता सत्याची साक्ष पटली असते.

आध्यात्मिक तयारी.

अशी आध्यात्मिक तयारी झालेली असेल, तरच मनुष्याच्या मनावर गतजन्मांच्या स्मृतींचा प्रभाव होऊं शकत नाही; आणि अशी स्थिति असेल, तेव्हाच त्या स्मृती त्याला मिळणें इष्ट असतें. कारण, तेव्हा पूर्वीच्या जन्मजन्मांतरांतील पुनरुद्भूत स्मृतींतून मिळविलेल्या नवीन ज्ञानाचा योग्य आणि विवेकशील उपयोग करण्यास लागणारी विवेकपूर्ण आणि अचुक

कल्याण साधण्याकरता, त्या कोणताहि त्याग फार मोठा मानीत नसत. आणि त्यांची आध्यात्मिक नम्रता आपल्या पतीस प्रत्यक्ष परमेश्वर समजण्यापर्यंत पोचली होती. परंतु हल्ली पूर्वगोलार्धात, सर्वसाधारण स्त्रीपेक्षा सर्वसाधारण पुरुषाची अध्यात्माकडे अधिक प्रवृत्ति असते; तर पश्चिम गोलार्धात, सर्वसाधारण पुरुषापेक्षा सर्वसाधारण स्त्रीची अध्यात्माकडे अधिक प्रवृत्ति असते. पौर्वात्य मनुष्यापेक्षा पाश्चात्य मनुष्य निराळा असतो. पाश्चात्य स्त्रीपेक्षा पौर्वात्य स्त्री वेगळी असते. आणि गंमत ही, की स्त्रीची पुरुषाशीं व पुरुषाची स्त्रीशी तुलना केल्यास, एकच आत्मा आध्यात्मिक आणि भौतिक बाबींमध्ये, जन्माच्या सृष्टिचक्रानुसार, लिंगभेदानुसार, आणि पार्थिव क्षेत्रानुसार, कमी अधिक अंशाने, श्रेष्ठता, कनिष्ठता किंवा समानता व्यक्त करतो.

# २४ : जन्मपरंपरा आणि कर्म

## भाग ४ था

## जन्माच्या परिस्थितिविशेषांना निश्चित करणाऱ्या घटना

जीवात्म्याचा प्रारंभ आणि उगम परमेश्वराच्या अनंत, निराकार, स्त्रीपुरुषभेदशून्य आणि अविभाज्य रुपामध्ये आहे; आणि त्याचे ते स्वरुप विकासाच्या आणि द्वैताच्या सर्व प्रकारांच्या पलीकडे आहे. **जीवात्म्याच्या प्रारंभाबरोबरच द्वैत आणि विकासाचाहि प्रारंभ होतो; मात्र स्त्रीपुरुषभेदावर अधिष्ठित असलेलें भेदजनक व आकर्षणात्मक विशिष्ट द्वैत, हे विकासक्रमाच्या बऱ्याच पुढच्या अवस्थेमध्ये दृष्टोत्पत्तीस येते.** कर्ता आणि विषय, किंवा जाणिवेचें केंद्र (मग ते कितीहि अस्पष्ट असो) आणि त्याची परिस्थिति, हे अस्तित्वांत आले, की त्याबरोबरच द्वैतहि आलेच. परंतु, कामुकता (sex) हे एक विशिष्ट शारीरिक आकर्षण आहे; आणि त्याकरता, बाह्य रुपांचा भेद, त्या भेदाशी विशिष्ट तऱ्हेने झालेली मानसिक गुंतागुंत आणि जीवन व शक्ति यांची विशिष्ट अभिव्यक्ति, – ही लागतात.

स्त्रीपुरुषभेद हे द्वैताचे विशिष्ट रुप आहे.

खनिज पदार्थामध्ये लिंगभेद नाही. वनस्पती आणि वृक्षयोनीमध्ये, लिंगभेद व तद्विशिष्ट शारीरिक व्यापार अस्तित्वांत येतात. परंतु वनस्पति आणि वृक्ष, यामधील जाणीव व अगदीच प्राथमिक अवस्थेत असल्यामुळे, आणि त्या जाणिवेच्या अभिव्यक्तीवर शारीरिक वैधर्म्याचा परिणाम होत नसल्यामुळे, वनस्पति आणि वृक्षयोनी, यामध्ये लैंगिक भाव (sex-consciousness) उत्पन्न होत नाही. त्यांच्यातील नर आणि मादी, यांचा संबंध (ते जमीनीत रुजलेले असल्यामुळे) प्रत्यक्ष नसून, केवळ वारा, मधमाशा इत्यादि सारख्या माध्यमांकरवीच, म्हणजे केवळ अप्रत्यक्ष असतो. म्हणून, देहांच्या विकासाच्या दृष्टीने, लिंगभेद

खनिज आणि वनस्पति यामधील लिंगभेद.

हा वनस्पति आणि वृक्षांच्या योनीतच सुरु होत असला, तरी त्या अवस्थेत, त्यांच्या स्वत:च्या जाणिवेच्या दृष्टीने, त्यांना काही लैंगिक भावना असते, असे म्हणतां येत नाही. **त्यांची द्वैताची जाणीव लैंगिक भावनेने रंगलेली असत नाही.**

पक्षी आणि प्राणी यांमधील लैंगिक भाव.

**लैंगिक द्वैता (sex-duality) च्या बाबतीत, वृक्ष आणि वनस्पति यांचे स्थान, लैंगिक भाव मुळीच नसलेले खनिज पदार्थ व लैंगिक भाव पूर्णपणे विकसित असलेले पक्षी आणि प्राणी, या दोहोंच्यामध्ये आहे.** मानवीरुपांत देह घेण्यापूर्वी, आत्मा प्राणिरुपांत पूर्ण जाणीव आणि शक्ति यांनी युक्त होतो; आणि नंतर प्राणीदेहाचा त्याग करुन तो मानवी देह धारण करतो. **मानवीदेह घेण्यापूर्वी, जीवात्माउपमानव योनींतून (sub-human) संक्रमण करीत आलेला असतो.**

लिंगभेदामुळे अंत:करण (Psyche) प्रभावित होते.

प्राणि योनीत, तद्विशिष्ट लैंगिक भावाची अभिव्यक्ति केवळ शरीरभेद आणि क्रिया, यामधूनच होत नसून, त्याचा सखोल परिणाम जाणिवेवरहि होतो. मानवांना, शरीर आणि जाणीव, या दोहोंचाहि वारसा अधिक विकसित अशा वानर योनीसारख्या प्राण्याकडून मिळत असल्यामुळे, तेहि लिंगभेदात्मक द्वंद्वांत सापडतात. **मानवामध्ये लैंगिक भावना इतकी पूर्णपणे वाढलेली असते, की ती केवळ एक शारीरिक बाब राहत नाही, तर तिच्यामुळे अंत:करण देखील प्रभावित होऊन,** ते लिंगभेदास अनुसरुन, देहद्वारा (स्त्रीदेह अगर पुरुषदेह असेल त्याप्रमाणे) अभिव्यक्त होते.

स्त्री-पुरुष जन्म.

एकदा मानवदेह धारण केल्यानंतर, नियमानुसार आत्म्याची बहुधा **उपमानव योनीत अधोगति होत नाही;** आणि खालील योनीत झालेली अपक्रान्ति (retrogression), ही अगदीच क्वचित् घडणाऱ्या खास अपवादात मोडते. आत्म्याचा सर्वसाधारण प्रवासक्रम, म्हणजे असा असतो, की एकदा मानवपदवीप्रत पोचल्यानंतर, तो आध्यात्मिक आवश्यकतेनुसार, काही वेळा स्त्रीजन्म, तर काही वेळा पुरुषजन्म घेतो. परंतु, तो पुन्हा पुन्हा मानवी देहच घेत राहतो.

स्त्रीरुपांचे व पुरुषरुपांचे विशिष्ट हक्क.

स्त्री-रुपात एक विशिष्ट अधिकार आहे. आणि तो म्हणजे सद्गुरु आणि अवतारी पुरुष, यांनाहि या स्त्रियांच्या गर्भातच जन्म घ्यावा लागतो. परंतु पुरुषदेहाचा विशिष्ट अधिकार, म्हणजे बहुतेक सद्गुरु पुरुषदेहच धारण करतात. स्त्रिया संत आणि सद्गुरु होऊ शकतात परंतु अवतार नेहमी पुरुषरुपांतच व्यक्त होत असतो.

कोणत्याही जन्मामध्ये मिळणारे फायदे आणि तोटे, हे जीवात्म्याने गतकालांत गोळा केलेल्या संस्कारांनीच निश्चित होतात. **आत्म्याच्या पुढील प्रगतीस काय आवश्यक आहे, हे त्याच्या संग्रहित संस्कारांवर अवलंबून असते; आणि म्हणून, आत्मा पौर्वात्य**



**देशांत जन्म घेतो, किंवा पुरुषरुपांत जन्म घेतो, की दुसऱ्या युगचक्रांत घेतो, हे त्याच्या संस्कारांवर अवलंबून असते.** एखाद्या विशिष्ट जन्मांत मिळणारे फायदे, तो जन्म केवळ स्त्रीदेहांत आहे किंवा पुरुषदेहांत आहे, यावरच अवलंबून नसून, तो एका सृष्टिचक्रांत आहे की दुसऱ्या सृष्टिचक्रांत आहे, त्याचप्रमाणे, त्याचे भौतिक जीवन पूर्वगोलार्धात व्यतीत होणार आहे की पश्चिम गोलार्धात व्यतीत होणार आहे - यांवरहि अवलंबून असतात.

संचित संस्कारामुळे विशिष्ट जन्मांतील फायदे आणि तोटे निश्चित होतात.

पूर्व आणि पश्चिम.

ठोकळ मानाने पाहतां, आज पौर्वात्य देशांनी भौतिक विषयापेक्षा आध्यात्मिक विषयांमध्ये अधिक प्रगति केली आहे; आणि म्हणून, पौर्वात्य मनाला ईश्वरविषयक आकांक्षा सहजस्फूर्त असते. आणि पश्चिमात्य देशांनी, आध्यात्मिक विषयांपेक्षा भौतिक विषयांत अधिक प्रगति केलेली असल्यामुळे, पाश्चिमात्य मनाची बौद्धिक आणि कलात्मक गोष्टीकडे अधिक प्रवृत्ति आहे. प्राच्य देशातील जन्मामध्ये, पाश्चात्य देशांतील जन्मापेक्षा, आध्यात्मिक जीवनाकडे अधिक अभिजात प्रवृत्ति असते; आणि पाश्चात्य देशातील जन्मामध्ये, पौर्वात्य देशातील जन्मापेक्षा, भौतिक जीवनाकडे अधिक अभिजात प्रवृत्ति असते. परंतु, **आत्म्याला विभक्त आणि द्वंद्वमय जीवनाच्या शृंखलांमधून मुक्त होण्यापूर्वी, जीवनाच्या भौतिक आणि आध्यात्मिक, या दोन्ही बाजूंचा अनुभव घ्यावा लागतो.** आणि म्हणून, आत्म्याला पौर्वात्य व त्याचप्रमाणे पाश्चात्य देशांतहि जन्म घ्यावा लागतो.

एखाद्या आत्म्याला जर लागोपाठचे बरेचसे जन्म प्राच्य देशांत घ्यावे लागले, आणि नंतर त्याने पाश्चात्य देशांत जन्म घेतला, तर तो स्वत:बरोबर पौर्वात्य जीवनातील संस्कार नेतो; आणि पाश्चिमात्य देशात राहत असला, तरी पौर्वात्य पद्धतीचे जीवन व्यतीत करतो. याउलट, आत्म्याला जर पाश्चात्य देशात लागोपाठ जन्म घ्यावे लागले, आणि नंतर त्याला पौर्वात्य देशात जन्म मिळाला, तर त्याच्या पाश्चात्य जीवनाचे संस्कार बरोबर ठेऊन, तो पाश्चात्य पद्धतीचे जीवन व्यतीत करतो. म्हणून, कधी युरोपीय आत्मा हिंदी देहामध्ये, तर कधी हिंदी आत्मा युरोपीय देहामध्ये असतो. परंतु, हे लक्षात ठेवले पाहिजे, की हा सारा भेद केवळ पूर्वीचे जन्म आणि संस्कार यांच्याशी सापेक्ष असतो; आणि आत्मा हा स्वत: असल्या सर्व भेदांच्या पलीकडेच असतो.

स्त्रीजन्म आणि पुरुषजन्म, यामुळे मिळणाऱ्या सोयी व फायदे अगदी परिवर्तनशील नसतात. सृष्टीच्या युगचक्राप्रमाणे, किंवा जन्म प्राच्य देशात किंवा पाश्चात्य देशात असेल त्याप्रमाणे, ते फायदेहि बदलतात. एखाद्या युगकालांत, स्त्रियांपेक्षा पुरुष अधिक क्रियाशील, उत्साही आणि पार्थिव प्रवृत्तीचे असतात; तर एखाद्या युगकालांत, याउलट परिस्थिति असते. पूर्वीच्या काळांत, पौर्वात्य भारतीय स्त्रिया वीर आणि बुद्धिवान होत्या. पतीचे सुख आणि

अनुभव येतो. जो साधक लिंगभेदाच्या पलीकडे गेला आहे, त्याला स्त्रीविषयक व त्याचप्रमाणे पुरुषविषयक, अशा दोन्ही प्रकारच्या अनुभवांचे ज्ञान होऊ शकते. **ज्ञानाच्या द्वारां, लिंगविमूढ कल्पनेच्या विकृत मर्यादितेपासून स्वत:स मुक्त करुन घेतल्यामुळे, तो साधक लिंग-भेद-भाव जनित सीमाबद्धतेने प्रभावित होत नाही.**

सचेतन आणि अचेतन मनांचा संधि (reconciliation).

ज्या पूर्णतेचा मन शोध करीत असतें, ती देहरुपांशी तादात्म्य पावून, अगर त्याबद्दल आसक्ति ठेवून मिळत नाही; तर मनाची हरपलेली एकता पुन्हा मिळवून, त्या पूर्णतेस स्वत:मध्ये शोधावें लागते. **सचेतन आणि अचेतन मनाचे समीकरण (reconcilation) लैंगिक आकर्षणामुळे किंवा ग्रहणशीलतेच्या इतर कोणत्याहि प्रकारामुळे शक्य होत नसुन, शरीर आणि त्याचा लिंगप्रकार** (sex) **यांच्यापासून स्वत:ची भिन्नता जाणल्यानेच शक्य होते.** आत्म्याच्या मन:क्षेत्रा (psyche) मध्ये संग्रहित केलेल्या अनुभवांची एकरुपता व सुसंबद्धता होण्याच्या मार्गातील एक मोठा अडथळा, स्वत:स देहाहून भिन्न जाणल्याने नाहीसा होतो. देहात्मभाव दृढ करणारा लिंगभेद आणि तद्विशिष्ट द्वंद्व, यांच्या पलीकडे जाऊनच, आंतरिक पूर्णतेचा शोध करावयास पाहिजे.

ईश्वरी प्रेम.

विरुध्द लिंगप्रकारा (opposite sex) च्या व्यक्तीबद्दलच्या आसक्तीपासून मुक्त होणे, म्हणजे आत्म्याने ज्या देहात जन्म घेतला असेल, त्या देहाच्या लिंगप्रकाराच्या आक्रमक आधिपत्यापासून विमुक्त होणे होय. आणि देहाच्या लैंगिक पारतंत्र्यांतून विमुक्त होणे, म्हणजे आत्म्यास देहाशी तादात्म्य पावण्यास भाग पाडणाऱ्या संस्कारांपैकी बऱ्याच संस्कारांचा नाश करणे होय. लैंगिक द्वैत पार करणे, म्हणजे सर्व द्वैत पार करणे नव्हे; पण त्यामुळे, सर्व द्वैतांच्या पूर्णपणें पलीकडे जाण्याचा मार्ग निश्चितपणे सुलभ होतो. उलटपक्षी हेंहि खरेच आहे कीं, **लैंगिक द्वैताची समस्या, ही एकंदरीत सर्व द्वैताच्या समस्येचा एक भाग आहे. जेव्हा दिव्य प्रेमामध्ये, 'मी' किंवा 'तूं', 'स्त्री' किंवा 'पुरुष,' हे भेद नाहीसे होऊन, सर्व प्रकारचे द्वैत लयास जातें, तेव्हाच लैंगिक द्वैताची समस्या देखील पूर्णपणे सोडविली जाते. विकासाचा जो उद्दिष्ट हेतु आहे, तोच स्त्रीपुरुषजन्मांचाहि आहे; आणि तो हेतु, म्हणजे मनुष्याला आपल्या अभंग आणि अविभाज्य अस्तित्वाप्रत पोचण्यास मदत करणे !**

# २५ : जन्मपरंपरा आणि कर्म

## भाग ५ वा

## स्त्री आणि पुरुषजन्मांची आवश्यकता

स्त्रीपुरुषांना लिंगभेदानुसार मिळणारे फायदे युगानुसार व स्थलानुसार परिवर्तनशील असले, तरी ही गोष्टहि खरीच आहे, की स्त्रीविशिष्ट व पुरुषविशिष्ट फायदे, हे दोन्हीहि,

स्त्रीदेहाचे व पुरुषदेहाचे विशिष्ट फायदे.

अनुभवाचा विकास कांही विशिष्ट दिशांनी होण्याकरता आवश्यक असतात. जें ज्ञान पुरुषजन्मा मध्ये सहजसाध्य असेल, तें पुरुषजन्मांत कष्टसाध्य असूं शकेल सामान्यत: **बुद्धि आणि इच्छाशक्ति, या गुणांमध्ये पुरुष श्रेष्ठ असतात.** अचूक निर्णय आणि निश्चल संकल्प करण्याची शक्ति त्यांच्यात बसूं शकते. याउलट, सामान्यत:, हृदयाच्या गुणविशेषांमध्ये स्त्रिया अधिक श्रेष्ठ असतात; आणि आत्यंतिक प्रेम करणें त्यांना शक्य असल्याने, आपल्या प्रिय व्यक्तीसाठी कोणताहि त्याग त्यांना जड वाटत नाही. स्त्रियांच्या या गुणामुळेच, भक्त जेव्हा भजनगीते गातात, तेव्हा स्त्रींचे नाव प्रथम घेतले जाते – उदा. राधाकृष्ण, सीतराम, हृदयाच्या गुणांत, बहुधा स्त्रिया पुरुषांहून श्रेष्ठच असतात. आणि इच्छाशक्ति आणि बुद्धिमत्ता, या गुणांत, बहुधा पुरुष स्त्रियांहून श्रेष्ठ असतात. यातील मौज ही, की एकच आत्मा जेव्हा स्त्रीचा अगर पुरुषाचा जन्म घेतो, तेव्हा तो हृदयाच्या गुणांमध्ये किंवा बुद्धिमत्ता आणि निश्चय, या गुणांमध्ये अधिक श्रेष्ठ होऊ शकतो. **कधी स्त्रियांच्या तर कधी पुरुषांच्या रुपांच्या द्वारा आलटून पालटून होणारा विशिष्ट आध्यात्मिक गुणांचा विकासक्रम, तो विकास सर्वांगीण दृष्टीने पूर्ण होईपर्यंत चालूच राहतो.**

ज्याअर्थी, आत्मज्ञानासाठी स्त्री आणि पुरुषजन्म, हे दोन्हीहि सारखेच आवश्यक आहेत, त्याअर्थी, एक दुसऱ्याहून अधिक महत्त्वाचा आहे, असे मानणें बरोबर नाही. त्या दोहोंपासून मिळणाऱ्या फायद्यांच्या प्रकारांमध्ये जरी फरक असला, तरी ते दोन्हीहि अत्यावश्यक आणि

स्त्रीजन्माची व पुरुषजन्माची आवश्यकता सारखीच आहे.

अपरिहार्यच आहेत. **आत्मा लिंगभेदात्मक द्वैताच्या व वस्तुत: सर्वच प्रकारच्या द्वैतांच्या पलीकडे** आहे. हे **ज्ञान मिळविण्यासाठी लागणारा संपन्न आणि विशाल अनुभव येण्याकरता, आत्म्याला स्त्रीचे आणि पुरुषाचे, असे दोन्ही प्रकारचे जन्म घेणे जरुर असते.**

सर्व संस्कारांतून मुक्त होण्यापूर्वी, आत्म्याला असंख्य स्त्रीजन्म आणि असंख्य पुरुषजन्म घ्यावे लगातात. आत्म्याने जर केवळ स्त्रीजन्मच घेतले असते, किंवा केवळ पुरुषजन्मच घेतले असते, तर अनुभव एकांगी आणि अपूर्ण राहता. ज्ञानानेच अनुभवांतील द्वंद्वांच्या पलीकडे जाता येते; आणि जोवर द्वंद्वपक्षातील एकाच पक्षामध्ये, अनुभवांचे ज्ञान सीमित असतें, तोवर ते एकांगीच असते. **अनुभव न घेतां उरलेला असा कोणताहि भाग जोंवर अनुभवाच्या विषयात असतो, तोवर अनुभवाचा विषय आणि अनुभव घेणारा, यांच्यामध्ये कधीहि एकता होऊं शकत नाही. स्त्रीपुरुषद्वंद्वा (sex-duality) ला तर हा नियम विशेषत: लागू आहे.**

स्त्रीजन्म आणि पुरुषजन्म हे परस्पर-पूरक आहेत.

**आत्म्याच्या मन:क्षेत्रात स्त्रीजन्मांचे आणि पुरुषजन्मांचे, दोहोंचेहि संस्कार संग्रहीत असतात. आत्मा शरीराशी तादात्म्य पावत असल्यामुळे, त्या देहाच्या लैंगिक प्रकारभेदा (sex) स ज्या मानसिक प्रवृत्ती अनुरुप असतात, त्या व्यक्त होण्यास योग्य असें देहरुपी माध्यम मिळालेले असते. आणि त्याच्या विरुध्द असलेल्या लैंगिक प्रकारभेदां (opposite sex) त सापडणाऱ्या प्रवृत्ती, मन:क्षेत्राच्या सुप्त (unconscious) भागात दबून राहातात; कारण, त्या प्रवृत्ती त्या देहप्रकाराला सुंसवादी नसल्यामुळे, त्यांना ते देहरुपी माध्यम, अभिव्यक्तीचें अनुकूल साधन न बनता, अडथळाच होत असतें.** जेव्हा आत्मा स्त्रीदेह धारण करतो, तेव्हा पुरुषदेह विशिष्ट प्रवृत्ती अंतर्मनामध्ये राहतात; आणि केवळ स्त्रीदेहविशिष्ट प्रवृत्तीच अभिव्यक्तीसाठी विमुक्त होतात; आणि जेव्हा आत्मा पुरुषदेह धारण करतो, तेव्हा स्त्रीदेहविशिष्ट प्रवृत्ती अंतर्मनामध्ये राहून, पुरुषदेहविशिष्ट प्रवृत्ती, अभिव्यक्तीसाठी विमुक्त होतात.

मन:क्षेत्रा (psyche) ची विभागणी.

शरीराशी तादात्म्य झाले, म्हणजे शरीराच्या लैंगिक प्रकारा (sex of the body) शींहि तादात्म्य होतेच. म्हणून, देहाच्या लैंगिक प्रकारा (sex) शी संवादी असलेल्या मन:क्षेत्राच्या भागास मात्र मोकळेपणाने अभिव्यक्त होण्यास सापडते; आणि मन:क्षेत्राचा दुसरा भाग अचेतन मना (unconscious) मध्ये सुप्त आणि दबलेला राहिल्यामुळे, चेतन मनात न्यूनतेची भावना, विरुद्ध लिंगप्रकारा (opposite sex) च्या व्यक्तीवरील आसक्तीच्या द्वारा भरुन काढण्याकडे प्रवृत्ति होते. **विरुद्ध लिंगप्रकाराच्या व्यक्तीशी आकर्षणाने संबद्ध होऊन स्वत:च्या देहरुपाशी संवादी नसणारा मन:क्षेत्राचा भाग, दुसऱ्याच्या द्वारां, एका प्रकारे, अभिव्यक्त होऊ पाहतो. या दृष्टीने पाहतां लैंगिक आकर्षण म्हणजे मनाचा स्वत:च्याच अचेतन भागाशी संयुक्त होण्याच्या प्रयत्नाचा परिणाम होय.**

लैंगिक आकर्षणा (sex - attraction) चा उगम.



शरीराच्या लिंगप्रकारां (sex) शीं तादात्म्य पावल्यामुळे, मानसिक आंशिकते (fragmentariness) ची परिपूर्ति करण्याचा सचेतन मन जो अज्ञानमूलक प्रयत्न करीत असते, त्याची अभिव्यक्ति म्हणजेच लैंगिक आकर्षण होय. **परंतु आंशिकतेच्या न्यूनतापूर्तीचा हा प्रयत्न विफल होणार, हे ठरलेलेंच असते. कारण तो प्रयत्नही देहाशी तादात्म्य पावण्यावर अधिष्ठित झालेला असतो. एवढेच नव्हे, तर विरुध्द लिंगप्रकाराच्या शरीराशी भिन्नभाव प्रतिष्ठापित करुन, त्याच्याशीं आसक्ति आणि ग्रहणशीलता, यांच्या द्वारा गुंतून गेल्यामुळे, देहात्मभाव अधिकच बलवत्तर होतो.**

स्वतःसच विफल करणारी न्यूनता-पूर्ति (compensation).

जेव्हा आत्मा कामवासनेचा त्याग करुन, अनासक्तीच्या द्वारा, लिंग-भेदमूलक द्वैताच्या पलीकडे जाऊ पाहतो, तेव्हा तो विरुद्ध लिंगप्रकाराच्या देहाशी संबद्ध असलेल्या आंतरिक अनुभवाचें ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणजे, एखादा पुरुष स्त्रीला आपल्या पुरुषी दृष्टीतून पाहून समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाही; तर, स्त्री स्वत:च्याच वैयक्तिक दृष्टीने, स्वत:बद्दल कोणत्या प्रकारचा आंतरिक अनुभव घेते, हे समजून घेण्याचा तो प्रयत्न करतो. म्हणून विरोधाभास झाला, तरी ही गोष्ट खरीच आहे, की विरुध्द लिंगप्रकारा (opposite sex) च्या देहावर आसक्ति ठेवल्यास, तव्दिशिष्ट आंतरिक अनुभवाचे ज्ञान करुन घेणे कठिण होऊन बसतें; आणि **विरुद्ध लिंगप्रकाराच्या देहावर अनासक्ति ठेवल्यास, तद्विशिष्ट आंतरिक अनुभवाचें ज्ञान करुन घेणें सुलभ होते; कारण अनासक्तीच्या द्वारा लिंगविमूढ** (sex-ridden) **विकृत व दृढ कल्पनांमुळे बनलेला अडथळा दूर होतो.**

अनासक्तीच्या द्वारा ज्ञान.

जेव्हां मनुष्य लैंगिक द्वैताच्या पलीकडे जाऊन, विरुध्द लिंगप्रकाराच्या देहांतील अनुभवाचें ज्ञान करुन घेण्याचा यत्न करतो, तेव्हा तो कित्येक वेळा, विरुध्द विशिष्ट मानसिक प्रवृत्तीहि प्रत्यक्षपणे व्यक्त करतो. उदाहरणार्थ, कांही पुरुष साधक, एका अवस्थेमध्ये, स्त्रियांचा पोषाख प्रत्यक्षपणे घालतात, व त्यांच्यासारखीच भाषा बोलतात; एवढेच नव्हे, तर त्यांच्या भावना, मानसिक प्रवृत्ति आणि सवयी देखील स्त्रियांच्यासारख्याच असतात. परंतु ही स्थिति चिरकाल टिकणारी नसते. समर्पक अनुभवांचे आंतरिक ज्ञान पूर्ण झाले, म्हणजे त्या व्यक्तींना आपण केवळ स्त्री आहोत, अगर केवळ पुरुष आहोत, असे न वाटतां, आपण स्त्रीपुरुभावातीत किंवा लिंगभेदातीत आहोत, असा

लिंग-विमूढ कल्पनां-पासून मुक्ति.

अग्रगति थोपवून, त्याला त्या आदर व्यक्त करणाऱ्या माणसाला स्वत:च्या भूमिकेपर्यंत घेवून जावें लागते. म्हणून, संतांविषयी आदर ठेवण्याचे कर्म हे त्यांच्या प्रगतीत हस्तक्षेप करणारे कर्म आहे. याप्रकारे, आदर हा स्वीकरणीय असला, तरी त्यामुळे, आदर व्यक्त करणाऱ्या व्यक्तीसाठी, संताला स्वत:ला अध्यात्मपथावर थांबावे लागते.

आत्म्यांचे प्रतियोगित्व किंवा प्रत्युत्तरक्षमता (responsiveness).

द्वेषापासून द्वेष, कामवासनेपासून कामवासना, आणि प्रीतिपासून प्रीति उत्पन्न होते, ह्या नियमाच्या द्वारा, आत्म्यांची शीघ्र आणि अचूक प्रत्युत्तरक्षमता (responsiveness) दिसून येते. हा नियम केवळ एकाच जन्मांत चालत नसून, अनेक जन्मांमध्ये चालूच राहतो. चालू जन्मांत दृश्य कारण नसलें, तरी पूर्वजन्मांतील शत्रूबद्दल भीति बाळगून, त्याचा द्वेष करण्याची मनुष्याची प्रवृत्ति असते. त्याचप्रमाणे, त्याच्यामध्ये, वर्तमान जन्मी प्रत्यक्ष दृश्य कारण कांही नसले, तरी पूर्वजन्मींच्या मित्रावर प्रेम करुन त्यास मदत करण्याचीहि प्रवृत्ति असते. बऱ्याचशा बाबतीत, माणसाला या अकारण प्रवृत्तींच्या कारणाचे ज्ञान असत नाही. परंतु, याचा अर्थ त्या प्रवृत्तींच्या मुळांशी, खरोखरच कारणे नसतात, असा नाही. वरुन वरुन पाहिल्यास, ज्या गोष्टींचे स्पष्टीकरण अशक्यसे वाटते, त्यांची खरी कारणे, गतजन्मांतील कर्मसंबंधांच्या प्रकाशांत विचार केल्यास, समजूं लागतात.

कर्मांचा नियम, हा क्रिया आणि प्रतिक्रिया, यांचा नियम आहे.

**या एकाच जगांत अनेक जीवात्मे स्वत:ला अभिव्यक्ति देण्याचा प्रयत्न करीत असतात; व कर्माचा नियम हा सतत बदलणाऱ्या त्यांच्या परस्परसंबंधींच्या जुळवाजुळवीच्या व व्यवस्थापनाच्या द्वारां, व्यक्त होत असून, तो परस्परसंबंधींच्या प्रत्युत्तरक्षमते (responsiveness) चा किंवा प्रतियोगित्वाचा परिणाम आहे.** ज्या स्वरलहरी (Rhythm) वर, दोन आत्म्यांचे संबंध सुरु होतात, ती विवेकशील कर्माच्या योगाने बदलून उच्च प्रकारची न केल्यास, न बदलता आहे तशीच कायम राहते.

कर्मविषयक स्वातंत्र्य.

सामान्यत:, कृतकर्मामध्ये स्वत:चीच अशी एक प्रकारची जडता (inertia) असते, कांही विशेष कारण असल्याखेरीज, त्याच्या गतिमत्तेमध्ये बदल होत नाही. **कर्म उत्पन्न होण्यापूर्वी, तें कसें असावें, याची निवड करण्याचे मनुष्याला एक प्रकारचे स्वातंत्र्य असते. परंतु, एकदां कर्म घडले, म्हणजे त्याकडे दुर्लक्ष करतां येत नाही; तर त्यापासून होणारे परिणाम भोगून, ते संपवावें लागतें; किंवा नवीन आणि योग्य कर्माच्या द्वारां, त्याचें निराकरण करावें लागतें.**

नशीब.

पृथ्वीवरील जीवनांतील यश आणि अपयश, सुख आणि दु:ख, त्याचप्रमाणे त्यातील

# २६ : जन्मपरंपरा आणि कर्म

## भाग ६ वा

## लागोपाठच्या जन्मजन्मांतरांमधून कर्माची क्रियाशीलता

जीवात्मा लागोपाठ जे जन्म घेतो, त्यात सातत्या (continuity) चे आणि एकते (identity) चे सूत्र असते; व ते प्रगत आत्म्यांच्या बाबतीत होणाऱ्या स्मृतींच्या पुनर्जागरणामध्ये व्यक्त होते. या जन्मजन्मांतरांतील एकसूत्रीपणा बरोबरच, त्यांच्यामध्ये कार्यकारणनिमयानुसार, कर्म व कर्मनियति अबाधितपणे चालू असते. लागोपाठ येणारे जन्म, त्यांच्या बारीकसारीक विशेषांसुद्धा अगदी सूक्ष्मतेने आणि अचूकतेने, एका विवेकसम्मत नियमाने निश्चित आणि बद्ध असतात. आणि म्हणूनच, जीवात्म्यास समंजसपणाच्या आणि ज्ञानयुक्त क्रियेने, आपला भविष्यकाल पाहिजे तसा बनविणे शक्य असते. गतजन्मांच्या क्रियांमुळे, वर्तमान जन्मांतील गोष्टी आणि परिस्थिति होतात; आणि वर्तमान जन्मांतील क्रिया पुढच्या जन्मांतील गोष्टी आणि परिस्थिति निश्चित करण्यामध्ये भाग घेतात. **कर्मनियम कसा चालू राहतो, हे समजलें म्हणजेच जीवात्म्याच्या लागोपाठच्या जन्मांचे खरें रहस्य पूर्णपणे दृग्गोचर होते.**

लागोपाठचे जन्म कर्मनियमांनी नियत असतात.

स्थूल जगतांत, मधूनमधून होणारे पुनर्जन्म, केवळ बाह्यदृष्ट्या अलग अलग किंवा एकमेकांपासून तुटलेले असल्यासारखे वाटतात. **अविनाशी व सतत टिकणाऱ्या मनोदेहाच्या द्वारां कर्मानेच जीवात्म्याच्या सर्व जन्मांमध्ये एकसूत्रीपणा व नियति उत्पन्न होतात.** स्थूल जगत् आणि पार्थिव शरीर, यांनाच अस्तित्व असून तेच केवळ सत्य आहेत, असे जोपर्यंत मानले जाते, तोपर्यंत कर्मनियम आणि त्याचा अंमल, याचे पूर्ण ज्ञान होणे शक्य होत नाही. सूक्ष्म व कारण देह आणि जगते, यांच्या अस्तित्वामुळेच कर्म-नियति शक्य

मनोदेहाच्या द्वारा कर्माचे सातत्य.

होते.

भौतिक चेतना जेथे असूं शकेल, अशी भूमिका (plane) म्हणजे स्थूल जग होय. ज्या भूमिकांवर इच्छांची जाणीव होते, त्या भूमिका सूक्ष्म जगामध्ये समाविष्ट होतात. ज्या भूमिकेवर मानसिक जाणीव (mental consciousness) असूं शकते, ती भूमिका म्हणजेच कारण जग होय. वासनेचा उगम हा कारणजगतांत असणाऱ्या मनांत असतो. या ठिकाणीं, वासना मनाशी बीजरुपांत संलग्न असते. ज्याप्रमाणे, बीजामध्ये वृक्ष सुप्त आणि गुप्त रुपांत वास करीत असतो, त्याप्रमाणे मनोदेहांत वासना सुप्त आणि गुप्त रुपांत बसत असते. मनाचे अधिष्ठानस्थान असणाऱ्या मनोदेहा (mental body) ला कित्येकवेळा **'कारणशरीर'** म्हणतात. कारण, ते **स्वत:मध्ये सर्व वासनांची कारणे अगर बीजे साठवून ठेवीत असते.** मनात सर्व संस्कार व प्रवृत्ती प्रसुप्तरुपांत साठविलेल्या असतात. सीमित 'मी' किंवा 'अहंभाव', हा या संग्रहित संस्कारांचा व प्रवृत्तीचाच बनलेला असतो. तथापि, निरनिराळ्या मानसिक प्रक्रियांच्या रुपांत होणारी संस्कारांची प्रत्यक्ष जाणिवेमधील अभिव्यक्ति मात्र सूक्ष्म देहाच्याच द्वारा होते.

मनोदेह आणि सूक्ष्मदेह.

अहं-मना (ego-mind) चे सृजन आणि सातत्य.

वास्तविक एकच आणि अविभक्त असलेला आत्मा, हा अहं-मना (ego-mind) चे अधिष्ठान असलेल्या मनोदेहा (mental body) ने निर्माण झालेल्या मर्यादेतेमुळे व्यष्टीभूत (individualised) झाल्यासारखा भासतो. पूर्वीचे संग्रहित अनुभव व भूतपूर्व कर्मे यांनी उत्पन्न झालेल्या संस्कारांनीच अहं-मनाची रचना होते. आणि पुनर्जन्म घेणाऱ्या जीवात्म्याच्या अस्तित्वाचा गाभा म्हणजे हे अहंचित्तच होय. सुप्त संस्कारांचे संग्रहालय असलेले अहं-मन मनोदेहविशिष्ट स्थिति अनुभवतें; जेव्हा अहंमन अभिव्यक्त आणि क्रियाशील संस्कारांचा अनुभव घेते, तेव्हा ती सूक्ष्मदेहविशिष्ट स्थिति असते; आणि निर्मितिक्षम क्रियेसाठी, जेव्हा अहंमन स्थूलजगतामध्ये उतरतें, तेव्हा ती भूतलावरील जन्माची स्थूल देहविशिष्ट स्थिति असते. याप्रकारे, **पृथग्भाव असलेल्या व्यक्ती (separate individual) च्या सर्व अवस्था, ह्या मनोदेहस्थित अहं-मनाच्याच निरनिराळ्या अवस्था आहेत.**

अहंमनांतील संस्कारांमुळेच जन्माची विशिष्ट परिस्थिति निश्चित होत असते.

**मनोदेहांतील अहंमन, स्वत:मध्ये संग्रहित असलेल्या संस्कारास अनुसरुन, खालचे देह धारण करतें.** एखाद्या व्यक्तीस तरुणपणी मृत्यू येईल की वृद्धपणी येईल, ती निरोगी होईल की रोगी, की तिला दोहोंचा अनुभव राहील, ती सुंदर असेल की कुरुप असेल, त्या व्यक्तीमध्ये, अंधपणासारखे शारीरिक व्यंग असेल की ती एकंदरीत आरोग्यसंपन्न राहील, त्या व्यक्तीची बुद्धि तीक्ष्ण



असेल की जड असेल, तिचें अन्त:करण शुद्ध असेल की अशुद्ध असेल, संकल्पशक्ति दृढ असेल की चंचल असेल, आणि ती व्यक्ति भौतिक वैभव मिळविण्यांतच आपले जीवन घालवील की आत्म्याच्या आंतरिक प्रकाशाचा शोध करील, हे सर्व मनोदेहस्थित संस्कारांनीच नियत होते.

द्वैतांतील खेळ.

स्वत: अहंमन देखील, कर्मांनी (कर्मामध्ये, केवळ स्थूल आणि भौतिक क्रियांचाच समावेश होत नसून, विचार आणि भावना यांचाहि होतो) मागे ठेवलेल्या संस्कारांनी रुपांतरित होते. आणि अहंमनांतील घटक व त्याच्या गरजा जशा असतील, त्यांना अनुसरुनच प्रत्येक जन्माची परिस्थिति जमून येते. अशा रीतीने, मनुष्याने एका जन्मांत जर कांही विशेष शक्तींचा किंवा प्रवृत्तींचा विकास केला असेल, तर त्या शक्ती व प्रवृत्ती त्याच्याबरोबर पुढील जन्मांतहि येतात; आणि एका जन्मांत ज्या गोष्टी अपूर्ण राहतात, त्या तदनंतरच्या जन्मांत पूर्ण होऊ शकतांत. संस्कारांच्या सातत्यामुळे, एकेका जन्मांत हळूहळू वाढत जाणारे कर्मजन्य परस्परांचे संबंध (karmic links) तद्नंतरच्या जन्मांत चालूंच राहतात; व त्यांच्यामुळे, **चांगल्यासाठी किंवा वाईटासाठी, ज्यांचा ज्यांचा परस्परांशी संबंध आलेला असतो, त्यांच्या पुन्हा पुन्हा भेटी होण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते.** अशा रीतीने, द्वैतांतील खेळ चालू राहून, त्याच्या द्वारा आत्म्याचा विरुद्ध द्वंद्वांचा अनुभव पूर्ण व परिपक्व झाला, म्हणजे तो अहंमनाचा त्याग करुन, स्वत:स परमात्मरुप असल्याचे जाणण्याकरता अंतर्मुख होतो.

देवाण आणि घेवाण, यामुळे उत्पन्न होणारे हक्क आणि प्रतिहक्क.

जर काही लोकांत देवाण-घेवाण झालेली असेल, तर त्यांच्यामधील कार्मिक आणि संस्कारांची बंधने हळूहळू वाढून, त्यांच्यामध्ये हक्क आणि प्रतिहक्क उत्पन्न होतात. आणि ह्या हक्कांची आणि प्रतिहक्कांची परिपूर्ति करण्याकरता, आणि त्याकरता नवीन व्यवहार पुढे चालविण्याकरता, त्यांना पुन्हा एकत्र यावे लागते. **स्वार्थपर हेतूने दिलेल्या गोष्टीमुळे जसे देणाऱ्याला बंधन उत्पन्न होते, तसेच बंधन देणाऱ्याहून आपण निराळे आहोत, या भावनेने घेतलेल्या गोष्टींमुळे घेणाऱ्यालाहि होते.** ज्यामुळे असे बंधन उत्पन्न होते, अशी देवाण-घेवाण, (वस्तू, पैसा अगर कांही भौतिक क्रिया, याप्रमाणे) पार्थिव स्वरुपाचीच असावयास पाहिजे असे नव्हे; ती देवाण-घेवाण भावनांची अगर दृष्टिकोणविषयक कल्पनांचीहि असूं शकेल.

अडथळा उत्पन्न करणारे कर्म.

एखादा मनुष्य, उच्च भूमिकेवरील संताबद्दल, नमस्कार करुन आदर व्यक्त करील, तर त्या संतावर त्याचा हक्क उत्पन्न होतो; आणि म्हणून, स्वत: तो संत अध्यात्ममार्ग आक्रमण करीत, अंतस्थ भूमिका उल्लंघून जाण्यात व्यग्र झालेला असला, तरी स्वत:ची

सद्‌गुरु द्वारां, कार्मिक जटिलतेंतून मुक्तता करुन घेतां येण्याची सोय नसती, तर कार्मिक देण्याघेण्याचा धागा अखंडपणे आणि सतत चालूच राहिला असता. सद्‌गुरु साधकास केवळ विमोचक क्रिया करण्याची सर्वोत्तम कलाच शिकवीत नाही; तर तो त्याला त्याच्या कार्मिक गुंतागुंतीपासून प्रत्यक्षपणे मुक्तहि करुं शकतो. **ज्याच्या जागतिक आणि विश्वव्यापी जीवनांत सर्व जीवांचा समावेश होतो. त्या परमेश्वराशीं सद्‌गुरुचें ऐक्य झालेलें असतें; आणि सर्व जीवनाशी एकरुप झाल्यामुळे, आपल्या प्रातिनिधिक अधिकारात, साधकाने अनेक जन्मांमध्ये असंख्य लोकांशी केलेल्या विविध व्यवहारांमुळे उत्पन्न होणारी त्यांच्या विषयीची सर्व देणीघेणी चुकतीं करण्याकरिता, तो स्वत: माध्यम बनून, मदत करुं शकतो. एखाद्याला जर कोणाशी संबद्ध व्हावयाचेंच असेल, व कोणाबद्दल आसक्ति ठेवावयाचीच असेल, तर त्याने ईश्वराशी अगर सद्‌गुरुशीं संबद्ध व्हावें, हे उत्तम. कारण, या संबंधामुळे, इतर कार्मिक बंधनांपासून मुक्त होणे सोपे जाते.**

सद्‌गुरु कार्मिक देण्याघेण्याचा हिशेब चुकता करण्याचे माध्यम होऊ शकतो.

जेव्हा गतजन्मांच्या सत्कर्मामुळे मनुष्यास सद्‌गुरुप्राप्तीचें सौभाग्य लाभतें, तेव्हा त्याने करण्यासारखी सर्वोत्तम गोष्ट हीच, की आपल्या सद्‌गुरुस शरण जाऊन, त्याने त्याची सेवा करावी. शरणागतीमुळे साधक आपल्या कर्मांचे ओझें साधकाला मुक्त करण्याचे मार्ग सद्‌गुरुस शोधावे लागतात. तसेंच सद्‌गुरुच्या सेवेमुळे साधकाला कार्मिक गुंतागुंतीतून मुक्त होण्याची संधि मिळते. गुरुशिष्यांचे संबंध, हे एका जन्मांतून दुसऱ्या जन्मांत, व असे अनेक जन्मपर्यंत चालू राहातात. एका शिष्यसंघाला जर सद्‌गुरुने कांही मार्गदर्शन व साहाय्य केले असेल, तर सद्‌गुरु जेव्हा आपल्या कार्यासाठी जन्म घेतो, तेव्हा तो बहुधा त्यांना पुढील पथप्रकाशन करण्यासाठी, आपल्या बरोबर घेऊन येतो. पूर्वजन्मांमध्ये ज्यांचा त्याच्याशी संबंध आलेला असेल, ते त्याच्याकडे न कळत, चुंबकाकडे आकर्षित झाल्याप्रमाणे, ओढले जातात; मात्र या आकर्षणाचें कारण त्यांना समजत नाही. सद्‌गुरुबद्दल वाटणाऱ्या या अकारण भक्तीला बहुधा बराच लांब इतिहास असतो; आणि पूर्वजन्मीं शिष्य जेथे थांबला असेल, त्या जागेपासूनच तो बहुधा पुढील जन्मीं प्रारंभ करीत असतो.

गुरुशिष्यांचे संबंध अनेक जन्मपर्यंत चालू राहतात.

शिष्य जेव्हा सद्‌गुरुची कृपा आणि लक्ष आपल्याकडे वेधून घेतो, तेव्हां ते कांही अकारण नसते. कधीकधी, शिष्यांनी कांही त्याग किंवा प्रयत्न न करतांहि, गुरु त्यांना अध्यात्मदृष्ट्या काही देतो असे वाटते; परंतु, अशा बाबतीत, शिष्यांनी या कृपेचा हक्क पूर्व जन्मीचे संबंध आणि प्रयत्न यांच्या योगाने मिळविलेला असतो. सद्‌गुरुबद्दल जे प्रेम आणि भक्ति शिष्याने

गुरुकृपा आमंत्रित करणे.



विघ्नें आणि लाभ, आणि जीवनांत उत्पन्न होणारे शत्रू आणि मित्र, ही सारी कर्मानेच निश्चित होत असतात. **कर्माच्या नियतीसच साधारणत: नशीब म्हणतात.** तथापि नशीब म्हणजे कांही अगदी परके आणि चांगले आणि वाईट यातील भेदाभेदाच्या ज्ञानावरच अवलंबून असते. व आत्म्याने बाल्याचीं कांही वर्षे घालविल्यानंतरच, ह्या जबाबदारीच्या जाणिवेचा उदय होतो.

कार्यकारणभावाच्या नियमाशीं तुलना.

मूल्यांच्या जगता (world of values) मधील कर्म-नियम, हा स्थूल जगतांतील कार्यकारणभावा (law of cause & effect) चे प्रतिरुप (counterpart) आहे. पार्थिव जगतात जर कार्यकारणाचा नियम नसेल, तर मोठा गोंधळ उडेल; आणि कोणत्या गोष्टीनंतर कोणत्या गोष्टीची अपेक्षा करावयाची, हे लोकांना समजणार नाही. त्याचप्रमाणे, कर्म-नियम नसेल, तर मनुष्याला प्रिय असलेल्या मूल्यांच्या जगतांतील सर्व परिणाम पूर्णपणे अनिश्चित होतील. स्थूल घटनांच्या विश्वांत **शक्तीच्या सुरक्षे** (conservation of energy) चा एक नियम आहे; आणि या नियमानुसार, कोणतीहि शक्ति कधीहि नष्ट होत नाही. तसाच मूल्यांच्या जगतांत, असा नियम आहे की, एकदा कर्म अस्तित्वात आले, **म्हणजे ते त्याचे नैसर्गिक परिणाम घडवून न आणतां, गुपचुप नाहीसे होत नाही; तर ते कर्म त्याचे नैसर्गिक फल येईपर्यंत, किंवा प्रतिकर्मा** (counter-karma) **ने त्याचे निराकरण होईपर्यंत अनवरतपणे कायम राहते.** चांगल्या क्रियांचे परिणाम चांगले होतात; आणि वाईट क्रियांचे परिणाम वाईट होतात.

विश्वांतील नैतिक व्यवस्था कर्मनियमामुळे टिकते.

**मूल्यांच्या जगतामध्ये कार्य व कारण यांच्यांत असणाऱ्या व्यवस्थित संबंधामुळेच, विश्वांतील नैतिक व्यवस्था (moral order) टिकली आहे.** कर्म-नियमांत जर, ढिलाई, अपवाद किंवा उलथापालथ, यांना जागा असती, आणि जर मूल्य-जगतांत कर्म-नियमांची कडक अंमलबजावणी झाली नसती, तर विश्वामध्ये नैतिक व्यवस्था टिकली नसती; आणि जर विश्वांत नैतिक व्यवस्थाच नसती, तर मूल्य-संपादनाच्या दृष्टीने मानवी जीवन धोक्याचें व संदेहग्रस्त होऊन गेले असते. ज्या जगात नैतिक व्यवस्था नाही, त्या जगात मानवी प्रयत्नांमध्ये संशय आणि अनिश्चितता यांची भीति सतत वाटत राहिली असती. **जर कर्म – नियमास धाब्यावर बसवितां आलें, आणि जर साध्य आणि साधनें, यांच्यामध्ये कांही निश्चित संबंध राहिला नाही, तर खऱ्या मूल्यांच्या प्राप्तीसाठी आस्थापूर्वक प्रयत्नच होऊ शकणार नाही.** कर्म-नियमाचा कडक अंमल असणे, ही एक महत्त्वपूर्ण क्रियेची अट आहे; कर्म-नियमाची उपेक्षा किंवा उल्लंघन करणे सुरक्षितपणें शक्य झालें, तर मानवाला महत्त्वपूर्ण क्रिया करणे अगदी अशक्य होईल.

कर्म आणि जबाबदारी (responsibility)

निसर्गाच्या इतर नियमांप्रमाणेच, कर्मनियम हाहि अनुल्लंघनीय आहे. तथापि, **कर्मनियमाच्या अंमलबजावणीची कठोरता म्हणजे एखाद्या बाह्य आणि अंध शक्तीचा अत्त्याचार आहे, असे आत्म्याला वाटत नाही. तर ती कठोरता जीवनाच्या योजनेच्या विवेकशीलते (rationality) ची आवश्यक अशी गोष्ट आहे, असे त्याला पटते. कर्मनियति ही खऱ्या जबाबदारीची अट आहे.** अनुभवरुपाने मनुष्याला जे जें प्राप्त होते. त्या सर्वांचा त्याच्या कर्माशीं निश्चित संबंध असतोच.

कर्म-नियम ही न्यायाची अभिव्यक्ति आहे.

जर मनुष्याने एखाद्याचे कांही वाईट केले, तर त्याला त्याबद्दल शिक्षा भोगावीच लागते. आणि म्हणून, आपल्यावरच उलटणाऱ्या वाईटाचें त्याने खुषीने स्वागत केले पाहिजे. आणि जर त्याने दुसऱ्याचें कांही चांगले केलें, तर त्याचे पारितोषकहि त्याला मिळालेंच पाहिजे; आणि म्हणून, त्याने त्या स्वत:कडे परतून येणाऱ्या चांगल्याचाहि उपभोग घेतलाच पाहिजे. **तो जें दुसऱ्या करता करतो, ते त्याने स्वत:करताहि केल्यासारखे होते. मात्र कित्येकदां हे खात्रीने असेच आहे, हे समजण्यास त्याला वेळ लागण्याचा संभव असतो. कर्म-नियम, म्हणजे द्वैताच्या साम्राज्यांत होणारी न्यायाची अभिव्यक्ति आहे, किंवा त्यांच्यांत पडणारे जीवनाच्या एकतेचे प्रतिबिंब आहे, असें म्हणतां येईल.**



# २७ : जन्मपरंपरा आणि कर्म

## भाग ७ वा

## जन्मांतरांचा अनुभव घेणाऱ्या जीवात्म्याची भवितव्यता

कर्मनियतिमुळे आत्म्यास घ्याव्या लागणाऱ्या जन्मांची जी एक परंपरा सुरु होते, तिची प्रवृत्ति सीमारहित होण्याकडे असते. असंख्य जन्मांमध्ये साधकाचा असंख्य लोकांशी संबंध येतो; आणि त्याने त्यांच्याशी घेण्यादेण्याचे अनेक प्रकारचे व्यवहार केलेले असतात. तो आपले कर्ज देऊन टाकण्याच्या आणि घेणे वसूल करण्याच्या जाळ्यात अटकून गेलेला असतो. **कर्मनियमाप्रमाणे त्याला घेणे अगर देणे टाळतां येत नाही; कारण, ते दोन्हीहि वासनाप्रेरित कर्मांचेच परिणाम असतात.** आपले कर्ज देण्यासाठी आणि घेणे वसूल करण्यासाठी, जीवात्मा एकसारखे जन्मच घेत राहतो; आणि हिशेब पुरा करण्याची त्याची इच्छा असली, तरी त्याला ते अनेक वेळा शक्य होत नाही.

कार्मिक देणे आणि घेणे.

एखाद्या मनुष्याचे ज्यांच्याशी कार्मिक संबंध असतात, ते सर्व त्याने पुनर्जन्म घेतलेला असतांना जडदेहधारी असतीलच असें नाही; किंवा स्वत:ची शक्ति आणि परिस्थिति मर्यादित असल्यामुळे, त्या वेळची कार्मिक गुंतागुंत सोडविणे, त्याला कदाचित शक्यहि नसेल. ज्यांच्याशी पूर्वसंबंध असतील, त्यांच्याबद्दलचे हिशेब पुरे करण्याच्या प्रयत्नामध्येच, त्यांच्याविषयी पुन्हा नवीन हक्क आणि प्रतिहक्क उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाहीत; आणि इतर नवीन लोकांच्या बरोबर देखील, निरनिराळ्या आकारप्रकारांची देणी-घेणी होऊन, त्यांच्यामध्ये तो गुंतून जातो. **मनुष्याचें देणें-घेणें सारखे वाढतच जाण्याचा परिणाम असा होतो की, त्याची घोटाळ्याची कार्मिक गुंतागुंत अधिकाधिक होत जाऊन, तिच्यांतून त्याची सुटका होत नाही.**

देणे घेणे चुकते करण्यातील अडचणी.

# २८ : मला प्राप्त करण्याचे बारा मार्ग

१. तळमळ :– सहाराच्या वाळवंटांत सूर्याच्या प्रखर उष्णतेने कित्येक दिवसपर्यंत पीडित असलेला मनुष्य पाण्याकरता तडफडतो. तशी तळमळ जर मला प्राप्त करण्याकरता तुमच्या अंत:करणांत असेल, तर तुम्ही मला प्राप्त कराल.

२. चित्तशांति :– गारठून बर्फरुप झालेल्या तलावाची शांति जर तुमच्यात असेल, तर तुम्ही मला प्राप्त कराल.

३. नम्रता : – कोणताहि आकार धारण करुं शकणाऱ्या मातीची नम्रता तुमच्यात असेल, तर तुम्ही मला प्राप्त कराल.

४. नैराश्ययुक्त विव्हळता :– आत्महत्त्या करुन घेण्यास उद्युक्त झालेल्या माणसांतील तीव्र नैराश्ययुक्त विव्हलतेने जर तुम्ही माझ्या दर्शनाची इच्छा कराल, व जर मला पाहिल्याशिवाय जिवंत राहणेहि; तुम्हांला अशक्यप्राय होईल, तर तुम्ही मला प्राप्त कराल.

५. श्रद्धा : – गुरुवाक्यावर विश्वास ठेऊन, दिवसासहि रात्र मानण्यास तयार असणाऱ्या कल्याण स्वामीची जशी स्वत:च्या गुरुमध्ये श्रद्धा होती, तशी पूर्ण श्रद्धा जर तुम्ही माझ्यामधे ठेवाल, तर तुम्ही मला प्राप्त कराल.

६. निष्ठा :– तुम्हांला न कळत, ज्या निष्ठेने तुमच्या बरोबर श्वास आमरण राहतो, व तुमच्याविरुद्ध न उलटतां, सुखांत व दु:खांत तुमचा साथीच राहतो, ती निष्ठा जर तुमच्यांत असेल, तर तुम्ही मला जाणाल.

७. प्रेमजनित संयम :– मजवरील तुमचे प्रेम जेव्हा तुमची इंद्रियविषयक तृष्णा पूर्णपणें नाहींसे करील, तेव्हा तुम्ही मला प्राप्त कराल.



अनुभवलेली असते, त्यामुळे गुरुशिष्यांमध्ये दृढ संबंध उत्पन्न होतो; आणि म्हणून, **शिष्यामधील आध्यात्मिक आकांक्षेच्या जागृतीला अनुसरुन, सद्‌गुरुकडून शिष्याकडे कृपा आणि साहाय्य प्रवाहित होत असते.** ज्याप्रमाणे स्वत:च्या बंधनकारक कर्माच्या योगाने, तो जीवनांतील सुखदु:ख किंवा बरें-वाईट यांचा अनुभव आपल्यावर ओढवून घेतो, त्याचप्रमाणे आपल्या विमोचक कर्माच्या योगाने, तो स्वत:वर गुरुकृपेला आमंत्रित करतो.

आध्यात्मिक उन्नतीसाठी सक्रिय उद्योगाची आवश्यकता.

सामान्यत: अध्यात्ममार्गात ज्याचा प्रवेश होतो, त्याची ध्येय प्राप्ती होईपर्यंत, मार्गावर हळूहळू प्रगति होतच असते, असा नियम आहे; परंतु, अध्यात्ममार्गावर ज्यांचा खात्रीपूर्वक प्रवेश झालेला नाही, अगर मार्गदर्शन करावयाला ज्यांना सद्‌गुरु नाही, त्यांना हा नियम लागू नाही. पुष्कळ लोक आपल्या अस्ताव्यस्त प्रयत्नांच्या योगाने, बंधनकारक संस्कारांच्या राशी रचून, आपल्या लक्ष्यापासून दूर जाण्याचा फार संभव असतो. म्हणून आध्यात्मिक उन्नति, ही साधकाच्या सक्रिय प्रयत्नाशिवाय, किंवा आपोआप होणारी आहे, असे म्हणता येत नाही.

अधोगतीचे संकट.

कधी ना कधी, लवकर किंवा उशीरा, पूर्वीच्या अनेक जन्मांत संग्रहित केलेला अनुभवजन्य विचार (the logic of experience) प्रत्येकास सर्वश्रेष्ठ ध्येयाचा शोध करण्यास व अध्यात्ममार्गात प्रविष्ट होण्यास भाग पाडतोच; आणि एकदा साधकाचा अध्यात्मपथांत प्रवेश झाला, म्हणजे त्याची बहुधा स्थिर प्रगति होत राहाते. त्याची जसजशी प्रगति होत जाते, तसतशा त्याच्या कांही सुप्त शक्ति जागृत होत जातात; आणि त्यामुळे त्याला सूक्ष्म आणि मनोजगताचा जाणीवपूर्वक आंतरिक अनुभव घेतां येतो. एवढेच नव्हे, तर तो उच्च भूमिकांवर प्राप्त होऊ शकणाऱ्या शक्तीचेंहि संचालन आणि शासन करुन शकतो. पहिल्या दोन भूमिका अनुभविण्यास वाईट आहेत; कोणत्या ना कोणत्या जन्मामध्ये या भूमिकांचा अनुभव घेतलेले लोक पुष्कळ असतात. परंतु, **पहिल्या कांही भूमिकांचे उल्लंघन झाले, म्हणजे पुढची प्रगति स्थिर आणि खात्रीपूर्वक होईलच,** असे नाही. अध्यात्ममार्गावर पुष्कळ खांचखळगे असतात; आणि अशावेळी, सद्‌गुरुचे मार्गदर्शन नसेल, तर साधकाची अधोगति होण्याचे भय असते.

योगभ्रष्ट .

पहिल्या कांही भूमिकांवरुन साधकाचे असे कांही अध:पतन होऊन शकते की, तो ईश्वराकडे पुढे जाण्याऐवजी, त्याची अवनतीच होऊ लागते. कांही अपवादात्मक बाबतीत, साधक उच्च भूमिकांवरील चुकीच्या कर्मामुळे, आपल्यावर अवनतीची आपत्ति ओढवून घेतो; आणि नंतर, त्याला पूर्वस्थली येण्याकरता, युगेंच्या युगें घालवावी लागतात. ज्या साधकाचे अशा तऱ्हेचे अध:पतन झाले असेल, तो **योग-भ्रष्ट** समजला जातो. कर्मनियम हा अनुल्लंघनीय असून, तो कोणतेहि

अपवाद, सवलती, किंवा पक्षपात जाणत नाही. योगीदेखील या नियमास अपवाद नाहीत. पूर्ण सद्‌गुरुच्या मार्गदर्शनाचा फायदा ज्यांना मिळत असेल, त्यांचाच अध्यात्मप्रवास स्थिर आणि सुरक्षित रीत्या होऊं शकतो; आणि असे असेल, तरच अध:पतनाची किंवा पुच्छगतीची शक्यता टळते. सद्‌गुरुच्या अभावी, ज्या चुकीच्या कर्मामध्ये, साधक गुंतून गेला असता, अशा चुकीच्या कर्मापासून सद्‌गुरु त्याचे रक्षण करतो.

ध्येयसिद्धि होण्यापूर्वी, अनेक जन्मपर्यंत साधकाचें अध्यात्मपथाचें आक्रमण चालूच असते. परमेश्वराच्या अंतिम ज्ञानासाठी, साधकाची अध्यात्मदृष्ट्या तयारी व्हावयाची असेल, तर शेकडो वर्षे व सतत, त्याग, सेवा आत्मशुद्धि यातना आणि सत्याचें दृढ अनुसंधान, ही सर्व करीत राहावे लागते. जन्मपरंपरेंतून जाणाऱ्या आत्म्याचें ध्येय असणारी ईश्वरानुभूति केवळ एकाच जन्मांत कधीहि प्राप्त होऊ शकत नाही. ईश्वरानुभूति, ही असंख्य जन्मांत सतत करीत राहिलेल्या प्रयत्नांचे फळ असते. अनेक जन्मांतील अज्ञानयुक्त कर्माने जीवात्म्यास बंध उत्पन्न होते; आणि ते बंधन नाहीसे करण्याकरता, जे विवेकयुक्त आणि मोचक कर्म आवश्यक असते, तेंहि चिकाटीने अनेक जन्मपर्यंत करीत राहावे लागते.

**पुनर्जन्माची पार्श्वशक्ति म्हणजे तृष्णा.**

जीवाला जन्ममरणाच्या चक्रांशी जखडून टाकणारी शक्ति म्हणजे अलग अस्तित्वा (separate existence) ची तृष्णा होय; आणि ती मुळेच द्वैताच्या विश्वांतील विषय आणि अनुभव यासंबंधीच्या इतर सर्व अनंत वासना उत्पन्न होतात. **या वासनांच्या तृप्तीसाठीच अहंचित्त पुन:पुन: जन्म घेत राहते.** जेव्हा सर्व प्रकारची तृष्णा नाहीशी होते, तेव्हा अहंचित्त निर्माण करणारे व नंतर त्याला पुष्ट करणारे संस्कारहि नाहीसे होतात. हे संस्कार नष्ट होताच, अहंचित्ताचाहि त्याग केला जातो; आणि याचा परिणाम असा होतो, की तेव्हा अंतिम सत्य, व अपरिवर्तनीय आणि शाश्वत, अशा परमात्म्याची अनुभूतीच मात्र तेथे उरते. **ईश्वरानुभूति हा अहंचित्ताच्या जन्मांचा अंत आहे, कारण त्याच्या अस्तित्वाचाच तो अंत आहे. जोपर्यंत, कोणत्या ना कोणत्या रुपांत अहंचित्त कायम असते, तोपर्यंत पुनर्जन्मासाठी अपरिहार्य आणि दुर्दम प्रेरणाहि असतेच. जेव्हा अहंमनाचा अंत होतो, तेव्हा पुन:पुन: जन्म घेणेहि थांबते; व आत्मानुभूतीमध्ये अंतिम परिपूर्णतेचा लाभ होतो.**

**पुनर्जन्माची इतिकर्तव्यता**

पुनर्जन्म घेणाऱ्या व्यक्तीच्या जीवनांमध्ये पुष्कळ घटना व अवस्था असतात. जीवनाचे चक्र त्या व्यक्तीला कधी उच्चस्थानी नेते, तर कधी त्या स्थानावरुन अधोगतीस नेते; व या प्रकारे ते अखंड फेरे करीतच असते. अशा रीतीने जीवनचक्र अनुभवांच्या समृद्धिपूर्णतेचा परिपोष करण्यास मदत करते. एका जन्मांत प्राप्त न झालेल्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी, दुसऱ्या जन्मांत प्रयत्न केला जातो; अपुऱ्या राहिलेल्या गोष्टी संपविल्या जातात; अपूर्ण प्रयत्नांत उत्पन्न झालेले



खांचखळगे भरुन काढले जातात; घडून गेलेल्या चुकांची भरपाई होऊन, त्या सुधारल्या जातात. व्यक्तीव्यक्तींमधील देण्याघेण्याचा हिशेब कार्मिक देवघेवींच्या द्वारा पुन: व्यवस्थापित होतो. अखेरीस, **अनुभवाच्या, परिपक्वतेमध्ये, अहंचित्त छिन्नमूल झाल्यामुळे, आत्मा दैवी जीवनाच्या एकमात्र अभंगतेमध्ये प्रविष्ट होतो. या दैवी जीवनांत देण्याचे बंधन नसतें; व घेण्याचेंहि बंधन नसते. कारण, आत्मा हा निराळेपणाच्या किंवा द्वैताच्या जाणीवेच्या पार गेलेला असतो.**

**नाटकाचे सादृश्य.**

जीवात्म्याच्या सतत चालू असलेल्या जीवनरुपी नाटकाचे पुष्कळ अंक असतात. आत्म्याच्या पृथ्वीवरील अस्तित्वाच्या दृष्टीने प्रत्येक अंकानंतर त्याच्या जीवनावर पडदा ओढला जातो, असे म्हणतां येईल. परंतु, प्रत्येक अंक स्वयंपरिपूर्ण आहे, असें मानलें, तर त्याचें खरे महत्त्व लक्षात येणार नाही. झालेले अंक आणि होणारे अंक यामधील दुवा, या संदर्भातच प्रत्येक अंकाचा विचार करावयास पाहिजे; व ज्या संपूर्ण नाटकाचा तो अंक एक भाग आहे, त्या नाटकांतील प्रतिपादित विषयाशी, त्या अंकाचा रहस्यपूर्ण अर्थ संबद्ध असतो. अंकाचा शेवट हा कांही त्या नाटकांतील विकासशील प्रतिपाद्य विषयाचा अंत नव्हे. **पृथ्वीच्या रंगभूमीवरुन नट जे अदृश्य होतात, ते परत तेथे येऊन नव्या दमाने व नव्या भूमिका रंगविण्यासाठीच.**

नट हे आपापल्या भूमिकांमध्ये इतके रंगून जातात, की त्या भूमिका (roles) नाच ते साऱ्या अस्तित्वाचा आदि आणि अंत समजतात; आणि असंख्य जन्में चालणाऱ्या अखंड जीवनाच्या बहुतांश भागामध्ये, त्यांना या परमगुह्य सत्याचे मुळीच ज्ञान नसते, की या नाटकाचा कर्ता, **आपल्या कल्पनारचित नाट्यकृतीमध्ये स्वत:च्या निर्मितिक्षम अनंतत्वाचा जाणीवपूर्वक आणि पूर्णत्वाने अनुभव घेण्याकरता, स्वत:च सर्व नटांची रुपें घेऊन, लपाछपीचा खेळ खेळत आहे. स्वत:चे अनंतत्व समजून घेण्यासाठी, अनंततेला सान्ततेच्या भ्रमांतून जावे लागतें, आणि सृष्टीच्या युगचक्रांतून अभिव्यक्त होत असणाऱ्या महान व रहस्यपूर्ण कथेचा कर्ता, स्वयमेव आपणच आहो, हे जाणण्याकरिता, त्या नाटककर्त्याला स्वत:च नानाविध नटांच्या विभिन्न अवस्थांचा अनुभव घ्यावा लागतो.**

साधारण जाणीवेमध्ये उतरत असतांना, ईश्वरपुरुषाला हे योगायोगसंस्कार मिळाले नसते, तर त्याला कोणतेहि निश्चित स्वरुपाचे कार्य करता आले नसते. **ईश्वरपुरुषाला स्वत:मधून दैवी इच्छेस विशिष्ट रुपाने अभिव्यक्त करण्यास, व स्वत:ची इतिकर्तव्यता (mission) सिद्धीस नेण्याकरिता योगायोगसंस्कारांची मदत होते.** सद्गुरु हा अस्तित्व, जाणीव, ज्ञान, आनंद, प्रेम व शक्ति, या सर्वांच्या बाबतीत अनंत असतो. व तसे तो स्वत:ला जाणतो; आणि परात्पर स्थितीमध्ये, तो नेहमी अंतरहितच राहतो. परंतु त्याने केलेल्या सृष्टीतील कार्याला सृष्टीचे नियम लागूच असतात; व त्यामुळे त्यांचे कार्य एका अर्थाने सीमित असते. प्रत्येकामध्ये प्रच्छन्न असलेली अनंतता व दिव्यता अनावृत्त करण्याचा जो सृष्टीचा हेतु आहे, तो सिद्ध करण्याचेच त्याचे कार्य असल्यामुळे, त्याचे महात्म्य असीम आहे. परंतु, केवळ परिणामांच्या दृष्टीनेच त्याची मोजमाप केली, तर, जगात शक्य असलेल्या इतर कार्याप्रमाणेच सद्गुरुचें कार्यहि इतके किंवा तितकेच व त्याहून अधिक नाही, असे सीमित असते.

सद्गुरुच्या कार्यालाहि सृष्टीचे नियम लागूच आहेत.

परंतु, ईश्वरपुरुषा (God-man) चे कार्य केवळ परिणामांच्या दृष्टीने मोजले, तरी संसारासक्त लोकांच्या कार्याची फलें ईश्वरपुरुषाच्या कार्याच्या फलांहून, विस्ताराच्या दृष्टीने, किती तरी कमी व तुच्छ असतात. बद्धजीवांतील थोरांतथोर आत्मादेखील ईश्वरपुरुषास शक्य असलेल्या परिणामांएवढे परिणाम, केवळ विशालतेच्या दृष्टीनेहि घडवून आणू शकत नाही. ईश्वरपुरुषाच्या कार्यांच्या मागे ईश्वराची अनंत शक्ति असते; व संसारासक्त मनुष्य, स्वत:च्या अहंमना (ego-mind) तून मिळणाऱ्या सीमित शक्तीनेच कार्य करीत असतो. परंतु केव्हा केव्हा, ईश्वरपुरुष देखील, एखादे नेमलेले मर्यादित कार्य आटोपून, आपले देहधारित्व संपुष्टांत आणतो. आणि ह्याचे कारण त्याची शक्ति सीमित असते, हे नसून, **त्याचे योगायोगसंस्कारांनी नियत झालेले कार्य नेमके तितकेच असतें, व त्याहून अधिक नसतें,** हे होय. योगायोगसंस्कारांनी नियत झालेले त्याचे कार्य संपविल्यावर, तो पुन्हा अनंततेच्या अव्यक्त स्वरुपांत विलीन होण्यास तयार होतो. तो ह्या मिथ्या व द्वैतपर जगतामध्ये, योगायोगसंस्कारांस अनुसरुन आवश्यक असलेल्या कालावधीपेक्षा, एक क्षणहि अधिक थांबत नाही.

सद्गुरुच्या कार्यक्षेत्राचा विस्तार योगायोगसंस्कारांनी नियत होतो.

पूर्ण सद्गुरुप्रमाणेच अवतारालाहि मंडल (circle) असते. जेव्हा अवतार देह धारण करतो, तेव्हा त्याच्यासमो कांही अत्यंत स्पष्टपणें निश्चित असलेले कार्य असते; व ते योजनेप्रमाणे चालू होते. ही योजना कालप्रवाहास अनुलक्षून व्यवस्थित केली असते. अवताराची जन्म घेण्याची क्रिया अद्वितीय असते. स्थूल देह धारण करुन द्वैतसृष्टीमध्ये उतरण्यापूर्वी, तो स्वत:ला व स्वत:च्या मंडलामधील व्यक्तींना, **विज्ञानी संस्कार,** म्हणून विशेष प्रकारचे संस्कार देतो. अवताराच्या मंडलात नेहमी

अवतार व त्यांचे मंडल.



८. नि:स्वार्थ सेवा :- सूर्य जसा सर्व सृष्टीला-शेतांतील गवत, हवेंतील पक्षी, रानांतील श्वापदें व त्याचप्रमाणे अखिल मानव जातीतील पापी व सत्पुरुष, श्रीमंत व गरीब या सर्वांना त्यांच्यापासून मिळणाऱ्या मोबदल्याचा विचार न करतां, प्रकाश देतो, तशी निरपेक्ष सेवावृत्ति अंगी बाणल्यावर, तुम्ही मला प्राप्त कराल.

९. त्याग :- जेव्हा तुम्ही माझ्याकरता आधिभौतिक, मानसिक व आध्यात्मिक - सर्व वस्तूंचा त्याग कराल, तेव्हा मी तुमचाच आहे.

१०. आज्ञाधारकपणा :- ज्याप्रमाणे डोळ्यांना प्रकाश, व नाकाला वास स्वाभाविक असतो, त्याप्रमाणे सहज, स्वाभाविक व पूर्ण जर तुमचा आज्ञाधारकपणा असेल, तर तुम्ही मला येऊन मिळाल.

११. शरणागति :- कित्येक दिवसपर्यंत निद्रारहित असलेला मनुष्य, नाहीसे होण्याची भीति न बाळगतां, एकदम निद्रेच्या आधीन होतो; त्या एकनिष्ठतेने जर तुम्ही मला शरण याल, तर मी तुमचाच आहे.

१२. प्रेम :- महापुरुष सेंट फ्रान्सिस याचे जीझस खाइस्टवर जसे प्रेम होतें, तसे जर तुमचें माझ्यावर असेल, तर तुम्ही मला प्राप्त तर करालच, परंतु मला संतोषहि द्याल.

# २९ : मंडल

अनेक जन्मांचा शोध, आत्मशुद्धि, सेवा, व स्वार्थत्याग असला, म्हणजे आत्म्याला ईश्वरप्राप्त सद्‌गुरुची भेट होते; व त्याचा त्याच्याशी संबंध येतो. आणि त्याला सद्‌गुरुंशीं अनेक जन्मांत निकट संबंध मिळून त्याची प्रेमपूर्वक सेवा घडली, म्हणजे तो त्याच्या मंडला (circle) मध्ये प्रवेश करतो. सद्‌गुरु जेव्हा अवतार धारण करतो, तेव्हा तो नेहमी त्याच्या मंडलामध्ये असणाऱ्या सर्वांनाहि आपल्याबरोबर घेऊन येतोच. सद्‌गुरुच्या मंडलामधील आत्म्यांना, त्यांच्या प्रयत्नामुळे, ईश्वरप्राप्तीचा अधिकार मिळालेला असतो; व अनुभूतीची वेळ येतांक्षणींच, सद्‌गुरुकृपेने त्यांना ईश्वरानुभूति मिळते.

सद्‌गुरुच्या मंडला–(circle) मध्ये प्रवेश.

द्वैतसृष्टीमधील सर्व क्रिया द्वैताच्या संस्कारांनीच प्रेरित होतात. द्वैताची जाणीव होण्याकरता, द्वैताच्या संस्कारांची क्रियाशीलता आवश्यक आहे. ह्या द्वैतसंस्कारांमुळे, प्रथम चेतनेचा विकास होऊन, ती सीमित होते; व नंतर त्यांच्याच मुळे, ती चेतना विमुक्त होऊन, आत्मज्ञान किंवा ईश्वरानुभूति मिळण्यास साहाय्य होते. **जोवर आत्मा द्वैताच्या अनुभवांतून जात नाही, तोवर त्याला स्वत:च्या एकतेची जाणीव होऊं शकत नाही. व ह्या द्वैताच्या अनुभवांकरता, द्वैताच्या संस्कारांची आवश्यकता असते.**

व्दैताच्या संस्काराचे कार्य.

आरंभापासून शेवटपर्यंत, जीवात्मा हा संस्कारांच्या आवेगास आधीन असतो; व संस्कारांमुळेच त्याची भवितव्यता निश्चित होते. ह्यांना प्रारब्धसंस्कार म्हणतात. **प्रारब्धसंस्कार, हे नेहमी अनुभवांतील परस्परविरुध्द द्वंद्वांशी संबद्ध असतात;** उदाहरणार्थ, लोभाचे संस्कार व तद्विरुद्ध संस्कार, कामाचे संस्कार

प्रारब्धसंस्कार.



व तद्विरुद्ध संस्कार, क्रोधाचे संस्कार व तद्विरुद्ध संस्कार, वाईट विचार, शब्द व कृति, यांचे संस्कार व तद्विरुद्ध संस्कार.

परमाणूच्या अवस्थेपासून तो ईश्वरानुभूतीच्या अवस्थेपर्यंत, जीवात्मा द्वैतसंस्कारांनी सीमित असतो; व त्याला जें कांही होते, ते सर्व या संस्कारांनीच नियत होते.

संस्काराचा लोप.

**ईश्वरानुभूतीनंतर आत्म्याचे सर्व संस्कार नष्ट होतात.** जर तो द्वैतसृष्टीच्या साधारण जाणिवेमध्यें परत न उतरता, ईश्वरत्वाच्या अनुभवांतच निमग्न राहिला, तर तो सर्व प्रकारच्या संस्कारांच्या पलीकडे राहतो. त्याच्यांत कोणतेहि संस्कार उत्पन्न होत नाहीत, व होऊ शकत नाहीत.

ईश्वरप्राप्त आत्मा द्वैतसृष्टीच्या जाणिवेत उतरलाच, तर त्याला विश्वव्यापी समष्टिमन (universal mind) मिळते; व या नवीन मिळालेल्या सार्वलौकिक मनाबरोबरच, त्याला अधर बसणारे व न बांधणारे, असे **योगायोगसंस्कार** प्राप्त होतात. परात्पर स्थितीमध्ये, सद्‌गुरु हा सर्व संस्कारांपासून मुक्त असतो; आणि योगायोगसंस्कार देखील त्याच्या विश्वमनांवर अधरपणे आरुढ झालेले असल्यामुळे, सृष्टीविषयी सचेतन राहून, तिच्यांत कार्य करीतच असतांना देखील, तो या योगायोगसंस्कारांनीहि बांधला जात नाही. **योगायोग संस्कार त्याच्या जागतिक कार्याच्या प्रवाहास कालव्याप्रमाणे असतात; ते त्याच्या जाणिवेला शृंखलाबद्ध करीत नाहीत.**

विश्वव्यापी समाष्टिमना (universal mind) मधील योगायोगसंस्कार

योगायोगसंस्कारांची क्रिया यंत्रतुल्य व स्वत:गतिशील (automatic) असते. ज्या कांही संसर्गांना किंवा संबंधांना ईश्वरप्राप्त पुरुष क्रियाशील उत्तर देतो, ते सर्व या योगायोगसंस्कारांवर अवलंबून असतात. **ह्या योगायोगसंस्कारांमुळे, सार्वलौकिक समष्टिमनावर आचरण पडत नाही; किंवा त्यांच्यामुळे अज्ञानमेघ जमत नाहीत. ते केवळ सुनिश्चित क्रियाशीलतेच्या विमोचनाकरता आवश्यक असलेल्या साच्याचेंच कार्य करतात.** ईश्वराची जागतिक इच्छा, या योगायोगसंस्कारांच्या द्वारां, विशिष्ट रुपांत अभिव्यक्त होते. देशकालांतर्गत सृष्टीतील कोणतीहि कृति एखाद्या सुनिश्चित विशिष्ट परिस्थितीशी किंवा घटनाराशींच्या वातावरणाशी संबद्ध असते. तसेच दुसऱ्या परिस्थिति सोडून, एका परिस्थितीसच क्रियाशील प्रत्युत्तर देण्यात येते, व तेंहि दुसरे सर्व प्रकार सोडून, एका विशिष्ट रीतीनेच देण्यात येते, याला कांहीतरी कारण असतेच. **बद्ध जीवाची क्रियाशीलता, ही त्याच्या बंधनकारक प्रारब्धसंस्कारांनी निश्चित व सीमित होते; व आध्यात्मिक स्वतंत्रतेस प्राप्त झालेल्या आत्म्याची क्रियाशीलता, ही त्याच्या न बांधणाऱ्या योगायोगसंस्कारांनी निश्चित व सीमित होते.**

योगायोग संस्कारांची क्रिया.

*ज्ञानाचे दोन प्रकार*

स्थूल मानाने बोलावयाचे, म्हणजे ज्ञानाचे दोन प्रकार आहेत:- (१) अस्तित्वात असलेल्या वस्तूंविषयी केवळ बुद्धिजन्य निर्णय (judgements of fact) व (२) वस्तूंच्या महत्त्वाबद्दल सारासार विवेचनात्मक मूल्यमापन करणारे निर्णय (judgments of valuation). केवळ बुद्धिजन्य निर्णयांचा अर्थपूर्ण मूल्यां (values) शी कांही संबंध असेल. तरच त्यांना महत्त्व येते; परंतु अर्थपूर्ण मूल्यांशी असणारा त्यांचा संबंध तुटला, तर त्यांना स्वत:चे असें फारच कमी महत्त्व असते. उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट वृक्षामध्ये नक्की किती पाने आहेत, या बाबतीत सहसा कोणीहि लक्ष घालीत नाही. सैद्धांतिक दृष्टीने, ही माहिती ज्ञानाच्या कोठींतच येते परंतु, अशा माहितीचा किंवा ज्ञानाचा सारभूत मूल्यांशी जिव्हाळ्याचा संबंध नसतो; व म्हणून त्या ज्ञानाला मुळीच महत्त्व दिले जात नाही. **जर (१) बुद्धिजन्य ज्ञानामुळे, सारभूत मूल्यें प्राप्त होणाऱ्या साधनावर ताबा मिळून, त्यांची प्राप्ति होणार असेल, किंवा (२) जर बुद्धिजन्य ज्ञान मूल्यमापनामध्येच शिरून, गृहीत मूल्यांचे स्वरुप बदलून टाकीत असेल, तरच त्याला महत्त्व असते.**

*मूल्यमापनाचे बाबतीत आढळून येणाऱ्या तीन चुका.*

ज्याप्रमाणे ज्ञानाचे दोन प्रकार आहेत, त्याप्रमाणे अज्ञानाचेहि दोन प्रकार होता. (१) ज्या गोष्टी वास्तविकपणें खऱ्या नाहीत, त्यांना खरें समजण्याची चूक करणें, हे एक प्रकारचें अज्ञान आहे, (२) मूल्यमापनाचे बाबतीत चूक करणे, हे दुसऱ्या प्रकारचे अज्ञान आहे. मूल्यमापनाच्या बाबतींत तीन प्रकारच्या चुका होऊं शकतात. (१) जे बिनमहत्त्वाचे आहे, त्याला महत्त्व देणे; (२) जे महत्त्वाचें आहे, त्याला बिनमहत्त्वाचे मानणें; व (३) ज्या गोष्टीला जे वास्तविक महत्त्व असतें, त्याहून निराळेच असें दूसरें महत्त्व त्या वस्तूवर लादणे. हे सर्व मिथ्यात्वाचे प्रकार मायेमुळेच निर्माण होतात.

*मूल्यमापनामधील चुकांचे घोर दुष्परिणाम.*

आध्यात्मिक दृष्ट्या, मायेमध्ये सर्वच मिथ्यात्वाचा किंवा श्रमांचा समावेश होत असला तरी, काही श्रमांना फार महत्त्व असतें; व काहींना नसते. एखाद्याला सिंहासनाची उंची आहे त्यापेक्षा जास्त वाटली, तर तो एक भ्रमच आहे; परंतु, त्या भ्रमाला फारसें महत्त्व नाही. उलटपक्षी, एखाद्याला सिंहासन मिळविणे, हेच जीवनाचे एकमेव ध्येय व सार वाटेल, तर तोहि भ्रमच आहे; पण ह्या भ्रमामुळे, त्याच्या अखिल जीवनसरितेचा प्रवाह बदलून, त्याची महत्ताहि पूर्णपणे प्रभावित होते. एकंदरीत पाहतां, वस्तुमात्रांच्या गुणधर्मांच्या बाबतींतील केवळ बुद्धिजन्य निर्णयामध्ये घडलेल्या चुकांपेक्षा, मूल्यमापनामध्ये घडलेल्या चुकांमुळे, जीवन अधिक ध्येयच्युत, दूषित किंवा संकुचित होते.

*मनांतील वासनांच्या प्रभावामुळे खोटी मूल्ये निर्माण होतात.*

मनांतील वासना व इच्छा यांच्या प्रभावामुळेंच मूल्यमापनाच्या बाबतींत चुका घडतात. खरी व सारभूत मूल्यें ही वस्तुगत, (intrinsic) अंतस्थ व स्वयंसिद्ध असतात; म्हणजे सारपूर्णता हा त्या वस्तूचा



एकशेवीस व्यक्ति असतात; व अवतार जेव्हा देह धारण करतो, तेव्हा, या सर्वानाहि जन्म घ्यावा लागतो. स्थूल देह धारण करण्यापूर्वी विज्ञानी संस्कारांना ग्रहण करणे, म्हणजे स्वत:वर व स्वत:च्या मंडलावर आवरण टाकण्यासारखे असते. जन्म घेतल्यावर, स्वत:ने नियोजित केलेली वेळ येईपर्यंत अवतार या विज्ञानी संस्कारांच्या आवरणाने आच्छादित राहतो. परंतु, नेमलेली वेळ आल्याबरोबर, त्याला स्वत:च्या मूळ ईश्वराचा अनुभव येऊन, तो विज्ञानी संस्कारांच्या द्वारां, कार्य करण्यास सुरवात करतो. परंतु, कार्याच्या प्रारंभापूर्वीच, **त्याच्या विज्ञानी संस्कारांचे समष्टिमनांतील योगायोगसंस्कारांमध्ये परिवर्तन होते.**

*विज्ञानी संस्काराचे स्वरुप.*

व्यावहारिक दृष्टीने पाहतां, विज्ञानी संस्कार, हे साधारण द्वैतमूलक संस्कारांप्रमाणेच असले, तरी त्या दोहोंमध्ये महत्त्वपूर्ण फरक आहे. साधारण संस्कार ज्या कृतींना व अनुभवांना आमंत्रित करतात, त्यांचीच प्रेरणा विज्ञानी संस्कारांनीहि होते. साधारण संस्कारांनी प्रेरित झालेल्या कृतीमुळे व अनुभवांमुळे, भ्रमात्मक द्वैताची पकड अधिक दृढ होत जाते; तर विज्ञानी संस्कारांनी प्रेरित झालेल्या कृतीमुळे व अनुभवांमुळे, ती पकड व्यवस्थितपणे सैल होत जाते. **विज्ञानी संस्कारांच्या अभिव्यक्तीची अर्थपूर्ण नियति ही सत्ताविस्ताराच्या एकतेचा अनुभव आमंत्रित करते; आणि म्हणून, विज्ञानी संस्कारांना, 'एकतेच्या प्रवेशद्वाराचा उंबरठा' म्हणतात.**

*ईश्वरानुभूतीची ठरलेली वेळ.*

मंडलांतील व्यक्ति, अवताराने ईश्वरानुभूतीकरिता ठरविलेली वेळ येईपर्यंत, विज्ञानी संस्कारांच्या आवरणांत आच्छादित राहतात. आणि त्यांना अवताराकडून अनुभूति मिळाली, म्हणजे त्यांनी बरोबर आणलेल्या विज्ञानी संस्कारांचे आवरण न बनतां, त्यांचे योगायोगसंस्कारांमध्ये रुपांतर होते. आणि हे योगायोगसंस्कार पृथ्वीवरील ईश्वरी योजनेच्या परिपूर्तीकरिता साधन बनतात.

*विज्ञानी संस्कार व योगायोग संस्कार या दोहोंमधील भेद.*

विज्ञानी संस्कार व योगायोसंस्कार, या दोहोंमध्ये एक महत्त्वाचा भेद आहे. विज्ञानी संस्कारांमुळे, अखेरीस एकत्त्वाची अनुभूति मिळत असली,तरी अनुभूति येईपर्यंत, त्यांच्या द्वारां, सीमित असण्याचाच अनुभव मिळतो. परंतु अनुभूतीनंतर प्राप्त होणाऱ्या योगायोगसंस्कारांमुळे, द्वैतातीत अनंततेच्या अनुभवामध्ये, किंचितहि विघ्न न येतां, द्वैतपर सृष्टीमधील प्रत्युत्तरात्मक क्रिया नियत होतात. **विज्ञानी संस्कारांच्या परिणती (working out) मुळे, स्वत:ला अनुभूति मिळते; तर योगायोगसंस्कारांच्या परिणतीमुळे, अद्यापपावेतो बंधनांतच असलेल्या, इतरांना अनुभूति मिळण्यास मदत होते.**

*परात्पर स्थिति.*

परात्पर अवस्थेमध्ये देशकालाला व अखिल भासमान विश्वाला मुळी अस्तित्वच नसते. भासमान द्वैतपर सृष्टीमध्येच, देशकालाला व कार्यकारणनियमाला अस्तित्व आहे. म्हणून, सद्गुरु जेव्हा

मानवतेच्या उद्धाराकरिता, द्वैताच्या क्षेत्रांत कार्य करतो, तेव्हा तो देखील देशकाल व कार्यकारणभाव यांच्या नियमांत येतो. आणि वस्तुत:, तो परात्पर स्थिती (beyond state) तील एकतेचा व अनंतेचा अनुभव नेहमीच घेत असला, तरी त्याच्या बाहेरील कार्याच्या दृष्टीने पाहिल्यास, तो, कधीकधी, सीमित असल्याचे भासतें. **तो स्वत: कालातीत असला, तरी तो जेव्हा द्वैतांत असलेल्या इतरांच्याकरिता क्रियाशील बनतो, तेव्हा कालाला महत्त्व असते.**

साधारणत:, श्रेष्ठतर देहांमधून, मानवतेबद्दलचे सद्‌गुरुचे जागतिक कार्य अविश्रान्त

मंडलाबद्दलचे विशेष कार्य.

चाललेलेच असतें. परंतु जेव्हा तो स्वत:च्या मंडलांतील व्यक्तीकरिता कार्य करतो, तेव्हा तो अतिशय काळजीपूर्वक व दक्षतेने वेळेची निवड करतो; कारण त्याच्या ह्या क्रियेने, त्यांच्या संस्कारांच्या यंत्रतुल्य परिणतीमध्ये निश्चयात्मक व विवक्षित स्वरुपाचा हस्तक्षेप (intervention) होत असतो. मंडलाकरिता, तो ठराविक वेळी कार्य करतो; म्हणून, गुरुच्या सूचना अमलांत आणतांना, जे त्याने सांगितलेली वेळ पाळतात, त्यांना त्याच्या खास क्रियाशीलतेचा फायदा मिळतो. सद्‌गुरुने स्वत:समोर जे विशिष्ट कार्य ठेवलेलें असते त्याच्या दृष्टीने, वेळ ही एक अतिशय महत्त्वाची बाब असते. मंडलांतील व्यक्तीकरता, सद्‌गुरु जे खास कार्य करतो, त्याचा संपर्क व प्रभाव केवळ त्या व्यक्तींवरच पडत नसून, त्या व्यक्तींशी संबद्ध असलेल्या इतर लोकांवरहि पडतो.

मानवतेसंबंधीच्या आपल्या आध्यात्मिक कर्तव्याचें व्यवस्थापन करण्यामध्ये, ज्या विशिष्ट गोष्टींचा सद्‌गुरु उपयोग करतो, त्या सर्वांमध्ये, त्याचे मंडल ही अत्यंत महत्त्वाची

मंडलाच्या परिघाने सद्‌गुरु सीमाबद्ध होत नाही.

बाब आहे. पूर्वीचे अत्यंत निकट सहवास व संबंध, यांच्यामुळे हे मंडल अस्तित्वांत आलेले असते. प्रत्येक सद्‌गुरुला अशा प्रकारचे निकट शिष्यांचे मंडल असतेंच; परंतु त्या मंडलामुळे, त्याच्या आंतरिक चेतनेला कोणत्याहि प्रकारची सीमा उत्पन्न होत नाही. **ईश्वरावस्थेमध्ये, सद्‌गुरु हा स्वत:स अखिल विश्वाच्या व त्याचप्रमाणे सर्व वस्तुजातीच्या केन्द्रामध्येच असल्याचे पाहतो; व त्यामुळे त्याला परिघांत बद्ध करणारे, असे कोणतेंहि वर्तुळ असत नाही.** द्वैतरहित अनंततेमध्ये आवडनिवड नसते.. भासमान सृष्टीमध्ये, जे एक कर्तव्य व कार्य सद्‌गुरुने हाती घेतले असतें, त्याच्याच दृष्टीने मंडलाला अस्तित्व असते. मात्र भासमान सृष्टीमधील ह्या आध्यात्मिक कार्याच्या दृष्टीने, मंडल हे हिमालयाइतकेच खरें असते.

# ३० : माया
## भाग १ ला
## (मिथ्या मूल्ये)

प्रत्येक माणसाला अंतिम सत्य जाणण्याची व अनुभवण्याची इच्छा असतेच; परंतु जोंवर अज्ञान हे अज्ञान म्हणून ओळखले जात नाही, तोवर सत्य हे सत्य म्हणून आणतां किंवा अनुभवतां येत नाही. याकरिताच अज्ञानाच्या बुडाशी असणारे मूलतत्त्व

मायेची विविध असत्यें समजून घेण्याची आवश्यकता.

जी माया, तिचे यथार्थ स्वरुप जाणणे अत्यंत आवश्यक व महत्त्वाचें बनते. मायेबद्दल लोक पुष्कळ वाचतात किंवा ऐकतात: परंतु फारच थोड्या लोकांना मायेचें यथार्थ स्वरुप समजत असतें. माया वास्तविक जशी आहे, तशी समजून घेणे आवश्यक आहे; तिचे केवळ वरपांगी ज्ञान करुन घेण्याने भागत नाही. **अज्ञानाचे मूलतत्त्व असणारी माया जाणली, की विश्वाचें अर्धे तत्त्व समजल्यासारखें आहे.** आत्म्याला स्वानुभवाची स्थिति प्राप्त होण्याकरता, त्याचे सर्व प्रकारचे अज्ञान नाहीसेझाले पाहिजे; म्हणून, **मिथ्या वस्तु व त्यांचे मिथ्यात्व जाणून घेण्याची व त्यांच्या मिथ्या वस्तु व त्यांचे मिथ्यात्व जाणून घेण्याची व त्यांच्या मिथ्यात्वाच्या ज्ञानाने मिथ्यात्वाचा निरास करण्याची फार आवश्यकता आहे.**

मिथ्यात्वा (falsehood) चें मूळ स्वरुप तत्त्वत: काय आहे? सत्याला सत्य म्हणून जाणणे किंवा खोट्याला खोटे म्हणून जाणणें, हा एक ज्ञानाचा प्रकार आहे; त्यात मिथ्यात्व

मिथ्यात्वाचे सार.

नाही. **खऱ्याला खोटे व खोट्याला खरें समजण्यात – म्हणजे कोणतीहि वस्तु जशी नसते, तशी ती मानण्यामध्येच मिथ्यात्व (falsehood) साठवलेलें आहे.** सारांश, कोणत्याहि गोष्टींचे यथार्थ स्वरुप समजण्यामध्ये चूक झाली, म्हणजे मिथ्यात्व किंवा खोटेपणा उत्पन्न होतो.

# ३१ : माया
## भाग २ रा
## मिथ्या विश्वास

मूल्यनिश्चितीसंबंधी भ्रमात्मक कल्पना किंवा खोटी मूल्ये (false values), ह्याच आत्म्याला अध्यात्मदृष्टीने बंधनांत टाकणाऱ्या शृंखला आहेत. परंतु, कांही मिथ्या विश्वास (false beliefs) रुपी भ्रम देखील आत्म्याच्या आध्यात्मिक बंधनांत महत्त्वाचा भाग घेतात. मिथ्या विश्वासांच्या द्वारां, मिथ्या मूल्यें प्रबळ होतात; परंतु, त्याबरोबरच आत्म्यावर आरूढ होणाऱ्या मिथ्या मूल्यांच्या भ्रमामुळे, मिथ्या विश्वासहि स्वत: अधिक पुष्ट होतात. मिथ्या मूल्याप्रमाणेच, मिथ्या विश्वास देखील मायानिर्मितच असतात. **मिथ्या विश्वास व मिथ्या मुल्यें, हे दोन्हीहि आत्म्याला अज्ञानांत पकडून ठेवणारे मायेचे प्रमुख पंजे आहेत.**

मिथ्या मूल्यें व मिथ्या विश्वास, हे मायेचे पंजे आहेत.

मानवी बुद्धि ज्ञानाचें आसन आहे; व माया त्या आसनावरच ताबा करुन अजेय बनते. बुद्धि ही मायेच्या आधीन झाल्यामुळे, मिथ्या विश्वास व अनेक भ्रम यांची रचना करते; व म्हणून, मायेस जिंकणे फार दुष्कर होंते. मिथ्या विश्वासाचेंच सतत पोषण व समर्थन करुन, माया सत्यानुभूतीला अवरोध करते. **जी बुद्धि अनिर्बंध व स्वतंत्रपणें विचार करते, ती सत्यप्राप्तीचा मार्ग तयार करते; व जी बुद्धि मायेच्या आधीन होऊन व्यापार करते, ती यथार्थ बोधामध्ये अडथळे जाणते.**

बुध्दी ही मायेच्या आधीन असते.

मायानिर्मित मिथ्या विश्वास इतके पक्के व दृढमूल असतात, की ते, स्वयंसिद्धच असल्यासारखे भासतात. ते प्रत्यक्ष सत्याचा वेष धारण करतात; व त्यांचा नि:शंकपणे स्वीकार केला

मिथ्या विश्वास स्वयंसिद्ध असल्यासारखे भासूं शकतात.



स्वत:सिद्ध स्वभाव असतो. **यथार्थ मूल्यें वस्तुगत असल्यामुळे, चिरस्थायी व अनुपाधिक** (absolute) **असतात; ती वेळोवेळी किंवा माणसापरत बदलत नाहीत.** परंतु, खोटी मूल्ये वासनानिर्मित असून, ती मानसिक अंत:सृष्टी (subjective background) वर अवलंबून असतात; व ती मूल्यें मनोगत घटकांवर आश्रित असल्यामुळे **सापेक्ष,** (relative) **नश्वर व वेळोवेळी प्रत्येक माणसापरत बदलणारी असतात.**

उदाहरणार्थ, सहारा वाळवंटांतील तृषित मनुष्याला कोणतीहि वस्तु पाण्याहून अधिक मोलाची वाटत नाही; व शिवाय ज्याच्याजवळ पाण्याचा विपुल संचय आहे, तो पाण्याला तेच महत्त्व देत नाही. त्याचप्रमाणे क्षुधित माणसाला अन्नाचें फार महत्त्व असतें; पण नुकतेच भोजन केलेला माणूस पुन्हा भूक लागे पर्यंत बहुधा अन्नाचा विचारहि करत नाही. हेच इतर तृष्णा व वासना, यांनाहि लागूं पडते. इतर तृष्णा व वासनांमुळेहि, त्या तृष्णांची व वासनांची पूर्ति करणाऱ्या विषयांवर कल्पित व सापेक्ष मूल्यांचा आरोप होतो.

उदाहरणे.

या तृष्णांच्या व वासनांच्या कमीअधिक तीव्रतेप्रमाणे व निकडी प्रमाणे, इंद्रियांचे विषयहि कमीअधिक महत्त्व पावतात. जर ह्या तृष्णा व वासना अधिक तीव्र व निकडीच्या झाल्या, तर तद्विशिष्ट इंद्रियांच्या विषयांचे महत्त्व वाढते; व जर ह्या तृष्णा व वासना क्षीण झाल्या, तर त्या इंद्रियविषयांचेंहि महत्त्व बरेचसें घटते. व जर ह्या तृष्णा व वासना मधून मधून व्यक्त होत असतील, तर त्या सुप्त असतांना, इंद्रियविषयांना संभाव्य मूल्य (possible value) असते; व त्या व्यक्त होत असतांना, त्या विषयांना प्रत्यक्ष भासमान मूल्य (actual value) असतें. परंतु, ही सर्व मूल्यें मिथ्या किंवा भ्रममूलच असतात, कारण ती प्रत्यक्ष वस्तूमध्ये नसतात. खऱ्या ज्ञानाच्या प्रकाशात जेव्हा सर्व वासनांचा व तृष्णांचा पूर्ण लोप होतो, तेव्हा ह्या वासना व तृष्णांमुळे जे विषयांना उसने महत्त्व आलेले असतें, ते सर्व एकदम नाहीसे होतें; व इंद्रियांचे सर्व विषय असार, महत्त्वशून्य व तुच्छ असल्याचें प्रत्ययास येते.

खोटी मूल्यें अन्याश्रित व सापेक्ष असतात.

**ज्याप्रमाणे चालू नसलेलें एखादे नाणे एका अर्थी अस्तित्वांत असलें, तरी खोटेच समजलें जातें, त्याप्रमाणे इंद्रियविषय सारशून्य व तुच्छ असल्याचे प्रत्ययास आल्यावर, त्यांना एक प्रकारचे भासमान अस्तित्व राहिलें तरी खोटेच गणले जातात.** एका अर्थाने, ते सर्व इंद्रियविषय तेथे असतातच; परंतु त्यांना पूर्वीचा अर्थ (meaning) राहत नाही. त्यांना पूर्वीचे महत्त्व नसते; ते रिक्त (empty) बनतात. वासनामुळे व तृष्णांमुळे दूषित झालेल्या कल्पनेसमोर, ते तृप्तीचे खोटे आश्वासन (false promise of fulfilment) मांडतात; पण शांत व स्थित दृष्टीने पाहिल्यास, त्यांना आत्म्याहून अलग असे किंचितहि महत्त्व राहत

इंद्रियांच्या पदार्थाची निस्सारता.

नाही.

आपली प्रिय व्यक्ति मरण पावल्यास, दु:ख, सुनेपणा व एकटेपणा अनुभवास येतात; पण पूर्वी नेहमीच्या पाहण्यात असलेल्या मनुष्याचे बाबती चुकल्यासारखे (missing) वाटावयास लावणाऱ्या हुरहुरीच्या बुडाशीं, आत्म्याहून व्यक्तिरिक्त घेतलेल्या त्याच्या रुपा (form) वरील आसक्तीच असते. परंतु आत्मा नष्ट न होता, त्याचा केवळ रुपमय आकारच नष्ट झालेला असतो. आत्मा मरण पावत नाही; व स्वत:च्या खऱ्या स्वरुपांत तर तो सर्वव्यापी असल्यामुळे, इतरत्र गेलेलाहि नसतो. परंतु, देहावरील आसक्तीमुळे, देहच महत्त्वाचा समजला जातो; व सर्व इच्छा, व विचार त्या देहाभोवतीच केंद्रित झालेल्या असतात. म्हणून, देह नष्ट झाल्यावर, त्यामुळे उत्पन्न होणारी उणीव (vacuum) विगत व्यक्तीसंबंधी भासणाऱ्या सुनेपणाच्या द्वारा व्यक्त होते. **जर केवळ देहावरच खोट्या महत्त्वपूर्णतेचा आरोप केला गेला नसता, तर गेलेल्या व्यक्तीबद्दल शोक झाला नसता.** एकटेपणाचा किंवा सुनेपणाचा (loneliness) भाव, प्रिय व्यक्तीची मागे उरुन चटका लावणारी स्मृति, ती व्यक्ति आज हयात असती, तर बरें झाले असतें, ही लालसा, विरहाचे अश्रु व वियोगदु:खाचे नि:श्वास – हे सर्व मिथ्या मूल्यनिरुपणा (false valuation) मुळे उत्पन्न होतात. ही सर्व मायेची करणी आहे. क्षुल्लक व तुच्छ वस्तूला नसतें महत्त्व देणें, हा एक मायेच्या कार्याचा प्रकार आहे. आध्यात्मिक दृष्ट्या, तो एक अज्ञानाचा प्रकार आहे.

बिनमहत्त्वाच्या गोष्टींना महत्त्व देणे.

ह्याउलट, मायेच्या करणीमुळे, वास्तविकपणें सारभूत असलेली वस्तू बिनमहत्त्वाची भासूं शकते. आध्यात्मिक दृष्ट्या, खरें महत्त्व फक्त परमात्म्यालाच आहे. पण केवळ ईश्वराकरिताच ईश्वर, अशी त्याबद्दलची अभिरुचि फारच थोड्या लोकांमध्ये आढळून येते. संसारासक्त लोक जर ईश्वराकडे वळलेच, तर त्याच्या बुडाशी त्यांचे ऐहिक व स्वार्थपर हेतु असतात. **कल्पित परमेश्वराच्या द्वारां, ते स्वत:च्या आशा, लालसा किंवा सूडाची इच्छा तृप्त करुन घेण्याचा प्रयत्न करतात. सत्यस्वरुप परमात्म्याची त्यांना ओढ नसते.** सत्य सोडून, बाकी सर्व गोष्टी त्यांना हव्या असतात; फक्त सत्याचीच त्यांना चाड नसते. हेंहि दृष्टीवरील आवरण मायानिर्मितच असते. **परमात्मा सोडून, इतर सर्व वस्तूंच्या द्वारां, लोक आनंदाचा पाठलाग करीत राहतात; परंतु, परमात्मा हाच एकमेव शाश्वत आनंदाचा कधीहि न आटणारा झरा आहे.**

सारभूत वस्तूला तुच्छ लेखणे.

**एखाद्या वस्तूला तिच्या यथार्थ महत्त्वाव्यतिरिक्त भलतेच व दुसरेंच महत्त्व देण्यास मनाला प्रवृत्त करणें, हीहि मायेचीच करणी आहे.** जेव्हा विधि, समारंभ व

वस्तूंना भलतेंच महत्त्व देणे.



धर्माचे बाह्य आचार, यांना स्वत:लाच साध्य समजण्यात येते, तेव्हा असें होत असते. जीवनाचे वाहक व अभिव्यक्तीचें माध्यम असल्यामुळे, त्यांना साधन म्हणून महत्त्व असतेंच; परंतु, स्वत: त्यांनाच जेव्हा स्वयंसिद्ध महत्त्व देण्यांत येते. तेव्हा त्यांच्यावर नसतें महत्त्व लादलें जातें. व जेव्हा ते स्वत:च सारमय समजले जातात, तेव्हा त्यांच्या द्वारा, जीवन अभिव्यक्त होण्या ऐवजी, बंधनांत मात्र पडतें. जेव्हा बिनमहत्त्वाच्या गोष्टीला महत्त्वाच्या गोष्टीहून अधिक प्राधान्य दिले जातें, तेव्हा मायाजन्य अज्ञानाचा तिसरा प्रकार उत्पन्न होतो. हीहि मायेचीच करणी आहे.

# ३२ : माया
## भाग ३ रा
## मायाजनित भ्रमांच्या पार जाणें

मायाग्रस्त मनुष्य अज्ञानमोहामुळे ज्या नाना मिथ्या भ्रमांमध्ये फसतो, ते भ्रम असंख्य आहेत. परंतु, **प्रारंभीपासूनच सर्व भ्रमांवर अपुरेपणा (insufficiency) व सारहीनता (bankruptcy) यांचा शिक्का असतो;** व कधी ना कधी त्यांचा खोटेपणा ओळखल्या जातो. येथे असा प्रश्न उद्‌भवतो, की 'कोणताहि भ्रम हा भ्रमच आहे, हे आपणास निश्चितपणे कसे समजूं शकते?' भ्रमांतून सुटण्याकरिता, त्या भ्रमाला भ्रम म्हणून जाणण्याशिवाय दुसरा मार्गच नाही. परंतु, जर भ्रमाच्या खोटेपणाचे ज्ञान कधी काळी व्हावयाचे असेल, तर तें ज्ञान त्या भ्रमांतच प्रारंभीपासून सुप्त स्थितीमध्ये असावयास पाहिजे.

मिथ्यात्व ओळखणे.

**भ्रमाचा स्वीकार हा नेहमीच तात्पुरता व अस्थिर असा पर्यंकारुढ समेट (bed-ridden compromise) असतो.** अज्ञान कितीहि गहन असले, तरी आत्मा भ्रमाला प्रश्नांकित आव्हान (challenge) देतच असतो; व प्रारंभिक अवस्थेमध्ये, हे आव्हान कितीहि कमजोर किंवा अस्पष्ट दिसले, तरी त्यांतच सर्व भ्रमांचा व अज्ञानाचा अंत करण्यास समर्थ होणाऱ्या सत्याच्या शोधाचा उगम असतो. **भ्रमाचा स्वीकार करण्यामध्ये, सतत वर्धनशील अस्थिरता, घोर संदेह व अस्पष्ट भीति असते.** उदाहरणार्थ, जेव्हा मनुष्य स्वत:ला किंवा इतरांना स्थूल देहच मानतो, तेव्हा तो हा विश्वास पूर्णपणे ग्रहण करुं शकत नाही. ह्या भ्रमाचा स्वीकार करण्यामध्ये, मृत्यूचे भय व इतर लोक स्वत:पासून दुरावण्याची भीति, ह्यांचा समावेश होतो. रुपमय सृष्टीवर ग्रहणशील अधिकार संपादन करण्यावरच भिस्त ठेऊन, जेव्हा मनुष्य सुखाचा प्रयत्न करीत असतो, तेव्हा त्याला त्याबरोबरच अंतर्यामी हेंहि ठाऊकच असतें,

भ्रमामध्ये शंका व भय असतात.



जातो. उदाहरणार्थ, मनुष्य समजतो, की तो म्हणजे त्याचा जड देहच आहे; व साधारणत: आपण देहाहून कांही निराळे असूं, हे त्याच्या स्वप्नीहि येत नाही. कोणतेंहि प्रमाण न मागतां, तो देहात्मभाव स्वभावत:च ग्रहण करतो; व हा विश्वास **विवेकसम्मत प्रमाणांनी निश्चित झालेला नसल्यामुळे,** मनुष्य त्याला अधिकच दृढपणें धरुन बसतो.

मनुष्याचे जीवन जडदेह व त्याच्या वासना, यांच्याभोंवती व्यवस्थित झालेलें असतें. 'मी जडदेह आहे' हा विश्वास टाकून देणें, म्हणजे जड देहाच्या सर्व वासना व त्यावर अवलंबून असणारी सर्व मूल्यें टाकून देणें. स्वत:ला जडदेहच मानणें, हे मनुष्याची जडाविषयीची आसक्ति व वासना, यांना पोषक असतें; परंतु, 'मी जडदेहाहून अन्य आहे' हा विश्वास त्याने स्वीकारलेल्या आसक्तींना व वासनांना विरोधकारक बनतो. म्हणून, 'मी जडदेह आहे', हा विश्वास 'नैसर्गिक' असून, ग्रहण करण्यास सोपा, पण टाकून देण्यास कठिण आहे. ह्या उलट, 'मी जडदेहाहून अन्य आहे', हा विश्वास खात्रीलायक प्रमाणांवाचून ग्राह्य होत नाही; तो ग्रहण करण्यास कठीण असून, त्याचा प्रतिकार करणें सोपे असते. परंतु असे असूनहि, जेव्हा मनावरील सर्व जडासक्ति व जडवासना, यांचा भार हलका होतो, तेव्हा स्वत: जडदेह असल्याचा त्याचा विश्वास खोटा ठरतो; व स्वत: जडदेहाहून अन्य असल्याचा त्याचा विश्वास सत्य असल्याचे दिसून येते.

जडदेहभाव.

स्वत: जड देह असल्याचा मिथ्या विश्वास टाकून देण्यात मनुष्याला यश मिळालें, तरी स्वत: सूक्ष्मदेह असल्याच्या मिथ्या विश्वासास तो बळी पडतो, त्याचे जीवन सूक्ष्मदेह व त्याच्या वासना, यांच्याभोवती व्यवस्थित होते. स्वत: सूक्ष्म देह असल्याचा मिथ्या विश्वास टाकून देणे, म्हणजे सूक्ष्म देहाच्या सर्व वासना व त्यावर आधारलेली सर्व मूल्यें टाकून देणे. म्हणून, आता मनुष्याला, 'मी सूक्ष्मदेह आहे' हा विश्वास नैसर्गिक बनून, 'मी सूक्ष्मदेहाहून अन्य आहे', ह्या विश्वासाला खात्रीलायक प्रमाणाची जरुरी भासते. परंतु, मनावरील सूक्ष्मदेहविषयक आसक्ति व वासना, यांचा भार हलका झाला, म्हणजे जडदेहभावाप्रमाणेच, 'मी सूक्ष्म देह आहे,' या मिथ्या विश्वासाचाहि तो परित्याग करतो.

सूक्ष्मदेहाशी तादात्म्य.

पण हा कांही मिथ्या विश्वासाचा अंत नव्हे. सूक्ष्मदेह असल्याचा मिथ्या विश्वास सुटला, तरी मनुष्य यापुढे देहभावापासून मुक्त होत नाही; तर आता तो 'मी मनोदेह किंवा अहंनिष्ठ मन आहे', या भ्रमांत फसतो. **मिथ्या विश्वासांत मनुष्य रममाण होतो; व म्हणूनच तो त्यांत फसतो. व्यष्टीभूत आत्मा स्वत:च्या दीर्घकालीन जीवनामध्ये, आरंभापासून स्वत:च्या पृथक् अस्तित्वाच्या भ्रमाला तीव्र आसक्तीने बिलगला असतो. त्याचे सर्व विचार, भावना व क्रिया – यांनी निराळ्या अस्तित्वाचे विधान सारखें गृहीत धरुन दृढ केले असतें. स्वत: अहंनिष्ठ मन असल्याचा मिथ्या विश्वास टाकणें, म्हणजे आतापर्यंत त्याला प्रतीत होत असलेल्या स्वत्वाचें सत्तासर्वस्व विसर्जन करणें होय.**

अहंनिष्ठ मनोदेहाशी तादात्म्य.

स्वत: जडदेह व सूक्ष्मदेह असल्याचा मिथ्या भ्रम टाकून देण्यास, माणसाला नानाप्रकारची आसक्ति व वासना, यांचा त्याग करावा लागतो; यात स्वत:जवळ दीर्घकाल बाळगलेल्या गोष्टींचा त्याग होतो. परंतु, स्वत: अहंनिष्ठ मन असल्याचा मिथ्या विश्वास टाकून देण्यांत, त्याला त्यांचे स्वत:स आजपर्यंत भासमान होत आलेलें अस्तित्वच मूलत: विसर्जन करावे लागतें. हा मिथ्यात्वाचा अंतिम अवशेष टाकून देणे अत्यंत कठिण असतें. **पूर्वीच्या नि:संशयपणें खरेंच भासणाऱ्या मिथ्या विश्वासांप्रमाणेच, हा भ्रमहि अनित्य असतो. त्याचाहि अंत होतोच; व जेव्हा आत्मा स्वत:च्या निराळ्या अस्तित्वाबद्दलची तृष्णा टाकून देतो, तेव्हाच त्याच्या ह्या भ्रमाचा निरास होतो.**

अंतिम मिथ्याबाबतचा त्याग.

जेव्हा आत्मा स्वत:ला जडसूक्ष्म देहांहून व मनाहून भिन्न असल्याचे जाणतो, तेव्हा तो स्वत:ला अनंत असल्याचे जाणतो. **पण आत्मा या नात्याने तो कांहीहि करत नाही; तो फक्त आहेच.** जेव्हा आत्म्याशी मनाचा योग होतो, तेव्हा तो विचार करीत असल्यासारखें दिसते; जेव्हा त्याचा मनासह सूक्ष्म देहाशी योग होतो, तेव्हा तो इच्छा करीत असल्यासारखे दिसते; व जेव्हा त्याचा या दोहोसह जडदेहाशी योग होतो, तेव्हा तो क्रियाशील असल्यासारखें दिसते. आत्मा कांही तरी करतो, हा विश्वास भ्रमात्मक आहे. आत्मा खुर्चीवर बसला आहे, हा भ्रम तो जडदेहाशी तादात्म्य पावल्यामुळे उत्पन्न होतो. त्याचप्रमाणे, मनुष्याला वाटते की तो विचार करते; पण वास्तविक मनच विचार करीत असतें. मन विचार करतें; व देह बसतो. परंतु आत्मा विचारहि करत नाही; व तो कोणती शारीरिक क्रियाहि करत नाही.

आत्मा हा विचार व क्रिया, यांच्या पलीकडे आहे.

ही गोष्ट अर्थात् खरी आहे, की केवळ मनच विचार करुं शकत नाही; व त्याचप्रमाणे केवळ शरीरच कार्य करुं शकत नाही. कारण केवळ मन व केवळ शरीर, ह्यांना निराळे अस्तित्वच नाही. आत्म्याचा भ्रम, हेंच त्यांचे स्वरुप आहे; व जेव्हा आत्मा त्यांच्याशी तादात्म्य पावतो, तेव्हाच विचार व क्रिया, यांचा उद्‌भव होतो. **आत्मा, मन व देह हे सर्व एकत्र घेतले,** म्हणजे सीमित **'मी'** किंवा क्रियांचा कर्ता बनतो. परंतु, स्वत:च्या यथार्थ स्वरुपांत, आत्मा विचारांबद्दल किंवा क्रियाबद्दल जबाबदार नाही. आत्मा, मन किंवा देह असल्याचा भ्रम, किंवा तो विचारांचा व क्रियांचा कर्ता असल्याचा भ्रम मायारुपी अज्ञानामुळे उत्पन्न होतो.

आत्मा क्रियांचा कर्ता आहे, हा विश्वास मिथ्या आहे.

त्याचप्रमाणे, आत्मा जीवनांतील सुखदु:खांचा किंवा इतर द्वंद्वांचा अनुभव घेतो, ही कल्पनाहि खोटी आहे. आत्मा जीवनांतील द्वंद्वांच्या पलीकडे आहे. परंतु तो स्वत:ला द्वंद्वांतीत असल्याचे जाणत नाही; व मनाशी व देहाशी युक्त पावून, द्वंद्वमय अनुभव स्वत:वर ओढवून घेतो. मनाशी व देहाशी तादात्म्य पावणारा आत्माच सुखदु:खांचे ग्रहण करतो; म्हणून आत्म्याच्या अनुभवास येणारी सर्व सुखदु:खे अज्ञानमूलक आहेत. **जेव्हा मनुष्य स्वत:ला सर्व जगांत अधिक दु:खी समजतो, तेव्हा तो त्याचा मायारुपी अज्ञानाने निर्माण केलेला भ्रम असतो.** तो स्वत: वस्तुत: दु:खी नसतो. पण मन व देहाशी सम्मिश्रित झाल्यामुळे, स्वत:ला दु:खी मानतो. आत्म्याला सोडून, केवळ मनच किंवा देहच द्वंद्वमय अनुभव घेऊ शकत नाहीत, हे तर खरेंच आहे. **आत्मा, मन व देहद्वय सर्व एकत्रित झाले, म्हणजे द्वंद्वमय अनुभवाचे अधिष्ठान उत्पन्न होतें. परंतु स्वत:च्या यथार्थ स्वरुपामध्ये, आत्मा अनुभवांतील द्वंद्वांच्या पलीकडे असतो.**



आत्मा हा द्वंद्वमय अनुभवाने बाधित आहे, हा विश्वास मिथ्या आहे.

याप्रकारे, मन व देहद्वय, हे क्रियांचा कर्ता व अनुभवद्वंद्वांचा भोक्ता बनतात; परंतु, ते स्वतंत्रपणें ही भूमिका घेण्यास असमर्थ असतात. **जेव्हा आत्मा मनांत व देहांत प्रविष्ट होतो, तेव्हाच (ensouls) त्यांच्याकडे कर्तृत्व व भोक्तृत्व येऊ शकतें. परंतु आत्म्याचा हा 'प्रवेश', म्हणजे मिथ्या तदात्मकता आहे. स्वस्वरुपांत, आत्मा हा सदैव निर्गुण, निर्विकार व अनंत आहे; व मायेच्या करणीमुळे किंवा अज्ञानामुळेच तो सगुण, सविकार व सान्त भासतो.**

मन व देह, यांमधील आत्म्याच्या 'प्रवेशा' चे स्वरुप.

**विषय व विषयी, यांचे द्वैतहि नसते.** आत्म्याची पार्श्वभूमी असलेले अहंचित्तच विचार करणारे बनूं शकतें. आत्मा स्वत: अनंतप्रज्ञास्वरुप असला, तरी त्याच्यामध्ये विचार किंवा बुद्धीचा व्यापार असत नाही. बुद्धि व तिचा सीमित विचार, हे दोन्हीहि मर्यादित अहंचित्तामध्येच संभवतात. **स्वयमेव अंतरहित प्रज्ञानच असलेल्या व पुरेपुर भरलेल्या पूर्णतासंपन्न आत्म्याला, बुद्धीची किंवा बुद्धीच्या व्यापाराची किंचितहि गरज नसते.**

*आत्मा हा अनंतप्रज्ञा-स्वरुप आहे.*

मायानिर्मित भ्रमांचा अखेरचा लवलेश झटकून टाकला, म्हणजे आत्मा स्वत:ला स्थूल, सूक्ष्म व कारण शरीरांहून निराळा असल्याचे तर जाणतोच, पण केवळ एकमेव सत्य असलेला परमात्मा तो स्वत:च असल्याचेंहि तो जाणतो. **मन व जडसूक्ष्म शरीरें स्वत:च्याच कल्पनेची सृष्टि असून, ती वास्तविकपणे कधींच अस्तित्वात नव्हती, व केवळ अज्ञानामुळेच तो स्वत:ला मन, सूक्ष्मदेह किंवा जडदेह मानीत गेला, किंबहुना तो स्वत:च मन, सूक्ष्मदेह व जडदेह बनून, नंतर या सर्व स्वयंनिर्मित भ्रमांशी तादात्म्य पावला, हे सर्व आत्म्याला प्रतीत होते.**

*केवळ परमात्मच सत्य आहे.*



की तो अस्थिर वालुकामय प्रदेशावर किल्ल्यांची रचना करीत असून, त्याचा तो मार्ग शाश्वत आनंदाप्रत पोहोचविणारा तर खात्रीने नाहीच, पण ज्या आधारास तो इतक्या विकलतेने चिकटला आहे, तो कधी दगा देईल, याचाहि नेमच नाही.

स्वत: असुरक्षित असल्याच्या जाणिवेने मनुष्य अस्वस्थ होत असतो. आपले कोठे तरी व कांही तरी चुकलें असून, आपण खोट्या आशेवर भिस्त ठेवीत आहोंत, हे तो जाणतो. भ्रम हा धोका देणारा व अविश्वसनीय असतो. मनुष्य भ्रमाचा स्वीकार चिरकालपर्यंत कदापि करुं शकत नाही. असे करणे, म्हणजे विषारी नागाला हार समजून गळ्यांत धारण करण्याप्रमाणे, किंवा थोड्याच कालाकरिता निद्रिस्त झालेल्या ज्वालामुखीच्या मुखाशीं स्वस्थपणें झोप घेण्याप्रमाणे आहे. **भ्रमावर अपूर्णता व असंतोष, तात्पुरतेपणा व नश्वरता, यांचा छाप स्पष्टपणे अंकित असतो. भ्रमामध्ये स्वत:हून निराळें, असें दुसरें कांहीतरी अभिप्रेत असतेंच; व प्राथमिक बाह्यदर्शनी, भ्रमामध्ये जी सत्ता भासमान होते, तिच्याहून कितीतरी अधिक विशाल व महान् सत्ता भ्रमाच्या मागे लपविल्या गेली आहे, असे मनुष्यास प्रतीत होत असते. भ्रमाचा भोपळा हा फुटतोच; व अखेरीस मनुष्य सत्य जाणण्यास प्रवृत्त होतो.**

*भ्रमाचा भोपळा.*

भ्रमात्मक विश्वास दोन प्रकारचे असतात ;- (१) **अव्यवस्थित व शिथिल विचारामुळे** उत्पन्न होणारे मिथ्या विश्वास व (२) **दूषित विचारामुळे** उत्पन्न होणारे मिथ्या विश्वास, दूषित विचारामुळे उत्पन्न होणाऱ्या मिथ्या विश्वासापेक्षा, अव्यवस्थित व शिथिल विचारामुळे उत्पन्न होणारे मिथ्या विश्वास कमी हानिकारक असतात. बुद्धि चालविण्यात चूक झाली, म्हणजे केवळ बुद्धिनिष्ठ (purely intellectual) असत्यें उत्पन्न होतात; परंतु, मनुष्यास अंध बनविणाऱ्या व अविवेकशील वासनांच्या व्यापारामुळे बुद्धि भ्रष्ट व विकृत झाल्यास, अध्यात्मदृष्ट्या घातक असणारे भ्रम निर्माण होतात.

*दोन प्रकारचे मिथ्या विश्वास.*

ह्या दोन प्रकारच्या भ्रमांतील फरक शरीरव्यापारविषयक दृष्टान्ताने स्पष्ट होईल. शरीराच्या महत्त्वाच्या अवयवांच्या बाबतीतल्या कांही व्याधी **व्यापारविषयक** (functional) असतात; व कांही व्याधी **अंगरचनाविषयक** (structural) असतात. शरीराचा महत्त्वाचा अवयव अव्यवस्थितपणे कार्य करीत असला, म्हणजे व्यापारविषयक व्याधी उत्पन्न होतात; अशा सर्व बाबतींत, अवयवाच्या अंगरचनेमध्ये कोणताहि फारसा बिघाड झालेला नसतो. परंतु तो अवयव केवळ मंद किंवा अनियमित बनला असतो; व त्याला निर्दोष कार्य करण्याकरता किंचित् उत्तेजन किंवा थोडीशी दुरुस्ती, यांचीच फक्त आवश्यकता असते. अंगरचनाविषयक व्याधींत, महत्त्वाच्या अवयवाच्या घटनेमध्ये किंवा रचनेमध्ये विकृति झाल्यामुळे रोग होतो. अशा सर्व बाबतींत, अवयवाचा दोष

*अंगरचनाविषयक व अंग-व्यापारविषयक व्याधी*

बराच अधिक गंभीर असतो. एक तर त्या अवयवास इजा झाली असते; किंवा एखादा विशिष्ट बाह्य घटक त्या अवयवांत आल्यामुळे, तो बेकाम झाला असतो. प्लीहा मंदावली, तर तो रोग व्यापारविषयक असतो; पण प्लीहेमध्ये खडा (stone) झाल्यास, तो रोग अंगरचनात्मक असतो; दोनहि प्रकारांच्या रोगावर इलाज असतात, परंतु, अंगरचनात्मक व्याधींपेक्षा, अंगव्यापारविषयक व्याधि कितीतरी अधिक सुलभतेने दुरुस्त होऊ शकतात.

बुद्धीचा उपयोग अव्यवस्थितपणे केला गेल्यामुळे उत्पन्न होणारे भ्रम, हे अंगव्यापारविषयक व्याधींप्रमाणे असतात; आणि बुद्धि भ्रष्ट व विकृत झाल्यामुळे उत्पन्न होणारे भ्रम अंगरचनाविषयक व्याधींप्रमाणे असतात. **ज्याप्रमाणे, अंगव्यापारविषयक रोग अंगरचनाविषयक रोगांपेक्षा अधिक सुलभतेने दुरुस्त करता येतात, त्याचप्रमाणे बुद्धीच्या व्यापारांतील अनियमतेमुळे निर्माण होणारे भ्रम, बुद्धिभ्रंशामुळे निर्माण होणाऱ्या भ्रमांहून अधिक सुलभतेने दुरुस्त होऊ शकतात.** प्लीहेचे व्यापारविषयक रोग दुरुस्त होण्याकरता, तिला अधिक जोम व आरोग्यच प्रदान करण्याची आवश्यकता आहे. परंतु प्लीहेमध्ये खडा होऊन रचनाविषयक विकार झाल्यास, कित्येक वेळी शस्त्रक्रियेची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे, बुद्धीच्या व्यापारांमध्ये कांही चूक झाल्यामुळे जे भ्रम उत्पन्न होतात, त्यांचा निरास केवळ बुद्धीच्या अधिक दक्ष उपयोगाने होऊ शकतो. परंतु, बुद्धिभ्रंशाने उत्पन्न होणाऱ्या भ्रमांकरता, बुद्धि शुद्ध करण्याची आवश्यकता असते. **बुद्धीला शुद्ध करावयाची असेल, तर बुद्धिभ्रंश करणाऱ्या सर्व वासनांचा व आसक्तींचा कष्टप्रद उच्छेद करावा लागतो.**

बुद्धीच्या शुद्धीकरणाचे महत्त्व.

मूल्यनिरुपणाचे प्रारंभींच मूलभूत चुका केल्यामुळे बुद्धिभ्रंशाचे भ्रम निर्माण होता. हे भ्रम कांही स्वीकृत मूल्यांचा पाठलाग करण्याच्या मनोव्यापाराचे पार्श्वपरिणाम (product) असतात. स्वीकृत मूल्यांना विवेकसिद्ध दर्शविण्याकरता (rationalisation) व त्यांचे समर्थन करण्याकरता, हे भ्रम उत्पन्न होत असून, मानवी मनावर असणाऱ्या त्यांच्या वर्चस्वाच्या बुडाशी, स्वीकृत मूल्यांना त्या भ्रमांपासून मिळणारी पुष्टीच असते. ह्या भ्रमामुळे मानवी मूल्य निश्चिती व मूल्यसाधन, ह्यावर परिणाम झाला नसता, तर त्यांचे महत्त्व एकदम कमी झालें असते; व त्यांचा मनावरील ताबाहि मंदावला असता. जेव्हा शोध चुकीचा असतो, तेव्हा मिथ्या विश्वासांचे अस्तित्व व त्यांचा जोम, यांचा परिपोष दृढमूल वासनामुळे होत असतो. मिथ्या विश्वासांतील चूक केवळ बौद्धिक स्वरुपाची असेल, तर ती लवकर दुरुस्त होऊं शकते. परंतु, **खोट्या शोधामुळे पुष्ट होणारे भ्रम म्हणजे मायेचे दुर्गच होत.** त्यांत केवळ बौद्धिक चुकीहून दुसरें कांही तरी जास्त असतें; व केवळ बुद्धिनिष्ठ विवेचनाचा प्रत्याघात झाल्याने त्यांना मोठासा धक्काहि बसत नाही.

मायेचे दुर्ग.

बुद्धिभ्रंश करणाऱ्या वासनांना व आसक्तींना छाटून टाकणें, हे मुख्यत: बुद्धिवादाचे कार्य नाही. त्याकरता सम्यक् यत्न व सम्यक् आचार, यांची आवश्यकता आहे. आरामखुर्चीमधील केवळ विचारधारेने नव्हे, तर उत्तम कर्मांच्या द्वारांच, आध्यात्मिक सत्यें दृष्टिपथांत येतील.



प्रामाणिक कृति, ही आध्यात्मिक सत्यें दृष्टिपथांत येण्याकरिता, विचार प्रबल व तीव्र पाहिजे, इतकेंच नव्हे तर तो विमल व शुद्ध (clear) पाहिजे; व **शुद्ध विचार हा पवित्र व प्रशान्त मनांतच उद्‌भवतो.**

अंत:शुद्धीने दृष्टि स्वच्छ होते.

मायानिर्मित भ्रमाचा अखेरचा लवलेश झटकला जात नाही, तोवर सत्यस्वरुप परमात्मा ज्ञात होत नाही. **परमात्मा हाच एकमेव सत्य आहे,** हे ज्ञान माया तरुन गेल्याशिवाय होत नाही. फक्त परमात्मा सत्य आहे. त्याच्या व्यतिरिक्त इतर सर्व कांही सीमित व नश्वर आहे; व द्वैतसृष्टींत जें जें अस्तित्वांत आहेसे वाटतें, ते सर्व मिथ्या आहे. परमात्मा ही एक अनंत सद्वस्तु आहे; व ह्या सद्वस्तूंतील सर्व भेद वास्तविकपणे अस्तित्वांत नसून खोटे व कल्पित आहेत.

खोट्या भ्रमांचे अतिक्रमण केल्यावर, सत्यस्वरुप परमात्म्याचे ज्ञान होते.

परमात्म्याचे निरनिराळे भाग पडतात, असें जें वाटतें, तें मायेमुळे. नानात्वाची जी विविध सृष्टि आहे, तिच्यामुळे परमात्म्याचे अलग अलग तुकडे पडत नाहीत. अहंनिष्ठ मनें (Ego-minds) निरनिराळे आहेत; आकार निरनिराळे आहेत. परंतु, आत्मा हा एकच आहे. **एकाच आत्म्याला निरनिराळ्या अहंचित्तांबरोबर व निरनिराळ्या देहाबरोबर पाहिलें, म्हणजे निरनिराळे व्यष्टीभूत जीव** (individualised souls) **दिसतात.** पण त्यामुळे प्रत्यक्ष आत्म्यामध्ये नानात्व शिरत नाही. आत्मा हा नेहमीचाच अविभाज्य आहे, व राहील. नानाप्रकारचे विचार व कर्मे करणाऱ्या व द्वैतपर असंख्य अनुभव घेणाऱ्या विविध व्यष्टिमनांच्या (ego-mind) मागे, एकमेव खंडरहित आत्म्याची पार्श्वभूमि असते. परंतु, तो एक व अभंग आत्मा सर्व विचार, क्रिया व द्वैतपर अनुभव, यांच्या पलीकडे आहे; व तो त्यांच्या पलीकडे नेहमीच राहतो.

परमात्मा हा अखंड आहे.

निरनिराळ्या प्रकारांची मतें व नानाविध विचार, यांच्यामुळे खंडरहित व एकरस आत्म्यामध्ये विविधता किंवा नानात्व निर्माण होत नाही. आत्म्यामध्ये कोणतींहि मतें किंवा विचार नसतात, हेच याचे साधे कारण आहे. विचारांची सर्व क्रिया व त्यांचे निर्णय सीमित अहंचित्ता मध्येच असतात. **आत्मा विचार करीत नाही; तर आत्म्याच्या पार्श्वभूमीवर अहंचित्त विचार करतें.** चिंतन व चिंतनाच्या द्वारा होणारे ज्ञान, ही दोन्हीहि सीमित अहंचित्तांच्या अपूर्ण व सदोष ज्ञानाच्या स्थितीतच आढळतात. स्वत: आत्म्यामध्ये, चिंतन किंवा चिंतनाच्या द्वारां होणारें ज्ञान नसते.

विचारांमधील विविधतेमुळे आत्म्यांत भेद पडत नाहीत.

**आत्मा स्वयमेव असीम विचार व अनंत ज्ञान आहे. परंतु, ह्या विचारांत किंवा ज्ञानामध्ये, विचार करणारा, विचार व विचाराचा निर्णय, असा भेद नसतो; व त्यात**

सान्ताच्या दृष्टीने पाहिलें, तर मायेला अस्तित्व आहे. **अनेक भ्रमांची व सीमित वस्तूंची रचना करणारी माया ही भ्रमदृष्टीकरिताच सत्य आहे. अखेरच्या व एकमेव सत्याच्या**

मायेचे अस्तित्व भ्रमदृष्टीनेच आहे.

**अनुभूतीच्या दृष्टीने, केवळ असीम व अनंत परमात्माच सत्य आहे. तेथे सीमित वस्तूंच्या परमात्म्याहून निराळ्या भासणाऱ्या अस्तित्वाचा भ्रम नाहीसा होतो; व त्याबरोबरच, त्या भ्रमाला निर्माण करणारी मायाहि अस्तात जाते.**

माया पार करुन चेतना आत्माभिमुख झाली, म्हणजे आत्मज्ञान होते. त्या आत्मज्ञानांत असें प्रत्ययास येतें, कीं निरनिराळी अहंनिष्ठ मने (ego-mind) शरीरे, व

आत्मानुभूतीमधील ज्ञान.

त्याचप्रमाणे अखिल विश्व व माया, यापैकी कशालाहि कधीच अस्तित्व नव्हतें. जी कांही पूर्ववर्ती सत्ता मायेला होती, ती आत्म्याच्या अविभाज्य सत्तेमध्येच प्रविष्ट असलेली दिसते. आत्मा स्वत:ला स्वयंसिद्ध व द्वैतातीत व त्याचप्रमाणे ज्ञान, आनंद, शक्ति व अस्तित्व, या सर्व बाबतींत निरंतर सीमातीत असल्याचे जाणतो; व तो हेंहि जाणतो, की तो आता आहे, असाच पूर्वीहि होता. परंतु, ही आत्मज्ञानाची सर्वश्रेष्ठ अवस्था बुद्धीच्या कक्षेबाहेर असून, अंतिम अनुभूतींचे शिखर ज्यांनी गाठले नाही, त्यांना त्याची कल्पनाहि करता येत नाही.

# ३३ : माया

## भाग ४ था

## परमात्मा व माया

परमात्मा द्वैतांतील सीमित करणाऱ्या द्वंद्वांच्या पलीकडे असल्यामुळे, अंतरहित आहे. तो चांगले व वाईट, सान व थोर, बरोबर व चुकीचे, सद्गुण व दुर्गुण, सुख

परमात्मा द्वंद्वातांत आहे.

व दु:ख, ह्या मर्यादित अवस्थांच्या पलीकडे आहे; व म्हणून तो असीम आहे. जर तो वाईट नसून चांगला असता, किंवा चांगला नसून वाईट असता, **लहान नसून मोठा असता, किंवा मोठा नसून लहान असता, चुकीचा नसून बरोबर असता, किंवा बरोबर नसून चूक असता, दुर्गुणी नसून सद्गुणी असता, किंवा सद्गुणी नसून दुर्गुणी असता, दु:खी नसून सुखी असता, किंवा सुखी नसून दु:खी असता – तर तो सीमित झाला असता, व अंतरहित झाला नसता. द्वंद्वातीत असल्यामुळेच परमात्मा अंतरहित आहे.**

जें अनंत आहे, ते द्वैतातीतच पाहिजे; ते द्वैताचा एक भाग कधीहि होऊं शकत नाही. म्हणून, जे वस्तुत: अनंत आहे, त्याला सांताबरोबरचा दुसरा भाग मानता येत

सीमित वस्तूंचे जग मायानिर्मित आहे.

नाही. **अनंताला सांताचे सहवर्ती मानले, तर ते द्वंद्वांतील एक पक्ष बनतें; व मग ते अनंत राहात नाही. अंतरहित परमात्मा द्वैताच्या सीमेंत उतरूं शकत नाही. म्हणून, द्वैतपर दृश्यमान जगताचीहि खरी सत्ता परमात्माच आहे; व सीमित जग भ्रम आहे. परमात्माच सत्य असून, तो अद्वितीय व अंतरहित आहे.** सीमित जगाचे अस्तित्व केवळ भास आहे. ते मिथ्या आहे; खरें नाही.

बौद्धिक स्पष्टीकरणाकरता, मायेला अनंत मानलें पाहिजे. **माया मर्यादितेचा भ्रम निर्माण करते; ती स्वत: मर्यादित नाही.** मायानिर्मित सर्व भ्रम सीमित आहेत; तसेच मायेमुळे

*मायानिर्मित वस्तू सीमित आहेत.*

भासमान होणारे सर्व जगहि सीमित आहे. तारे असंख्य आहेत; त्यांची संख्या अगणित आहे; तरी ताऱ्यांचा सर्व समुदाय सीमित आहे. अवकाश (space) व काल अनंत असल्यासारखे भासत असले, तरी वास्तविक सांतच आहेत. सीमित व सांत असलेली प्रत्येक वस्तु भ्रममय जगाचा भाग आहे; परंतु, एका दृष्टीने पाहतां, ज्या तत्त्वामुळे हा सीमित वस्तूंचा भ्रम उत्पन्न होतो, ते तत्त्वच भ्रम समजतां येत नाही.

*मायेला स्थानमर्यादा नाही.*

मायेला सीमित समजतां येत नाही. कोणतीहि वस्तु स्थानाने किंवा काला (time) ने सीमित होत असते. मायेचें अस्तित्व स्थानामध्ये नाही; व ती स्थानाने मर्यादित नाही. **सर्व अंतरालच मायानिर्मित असल्यामुळे, मायेला अंतरालविषयक सीमा असूं शकत नाही.** अंतराल (space) व त्यांतील सर्व वस्तू भ्रममय असून, मायाश्रित आहेत. माया ही अंतरालाच्या आश्रयाने राहात नाही. तेव्हां अंतरालांतील सीमा मायेला मर्यादा घालून सीमित करुं शकत नाही.

*माया कालाने सीमित नाही.*

त्याचप्रमाणे, कालमर्यादेमुळे ही माया सीमित होऊं शकत नाही. तुर्यावस्थेंत माया नाहीशी होत असली, तरी तिला त्यामुळे सीमित मानण्याचें कारण नाही. मायेला **कालप्रवाहामध्ये** आदि किंवा अंत नाही; कारण, स्वत: कालच मायानिर्मित आहे. जे लोक मायेला कोणत्या तरी वेळी उत्पन्न होऊन नंतर कालांतराने नाहीशी होणारी घटना मानतात, ते मायेला कालामध्ये बसवितात; कालाला मायेमध्ये बसवीत नाहीत. **काल मायेंत आहे;** माया कालांत नाही. कालप्रवाह व कालांतर्गत सर्व घटना मायानिर्मित आहेत. काल मायेमुळे उत्पन्न होतो; माया नाहीशी झाली, म्हणजे कालहि नाहीसा होतो. परमात्मा हा कालातीत सत्य असून, ईश्वरानुभूति व मायानिरास, ह्या समयरहित घटना आहेत. तेव्हा माया कोणत्याहि प्रकारे कालबद्ध नाही.

*माया अंतरहित आहे.*

त्याचप्रमाणे माया दुसऱ्या कोणत्याहि कारणाने सीमित होऊं शकत नाही. सीमित असेल, तर ती स्वत:च भ्रम होईल; व स्वत:च भ्रम झाल्यामुळे, दुसरे भ्रम निर्माण करण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये राहणार नाही. साधारणपणे ईश्वराला सत्य व अनंत मानण्यांत येते, तसेच मायेलाहि, बौद्धिक स्पष्टीकरणाकरता, सत्य व अनंत मानले पाहिजे.

*मायेला अंतिम सत्ता नाही.*

सर्व संभाव्य बौद्धिक स्पष्टीकरणांमध्ये, ईश्वराप्रमाणेच मायेलाहि सत्य व अनंत मानणारे स्पष्टीकरण, मानवी बुद्धीला अधिक ग्राह्य आहे. **परंतु मायेला अंतिम सत्ता नाही. जेथे द्वैत आहे, तेथे दोन्हीहि वस्तु सीमित आहेत; कारण, एका वस्तूने दुसरी वस्तु मर्यादित होते. दोन वस्तु सत्य व अनंत असूं शकत नाहीत.** दोन वस्तु विशाल असूं शकतात; पण दोन वस्तूंना अनंत



सत्ता असूं शकत नाही. ईश्वर व माया, हे द्वैत कायम ठेवून, दोहोंना स्वतंत्र अस्तित्व मानलें, तर ईश्वराची अनंत सत्ता द्वैताचा द्वितीय भाग होईल, म्हणून, **मायेला सत्यत्व देणारे बौद्धिक स्पष्टीकरण सर्वात अधिक बुद्धिग्राह्य असलें, तरी त्याच्यावर अंतिम ज्ञानाचा शिक्का देतां येत नाही.**

*माया समजण्याच्या मार्गातील बौद्धिक अडचणी.*

मायेला भ्रम मानण्यामध्ये अडचणी आहेत, त्याचप्रमाणे तिला सत्य मानण्यांतहि अडचणी आहेत. या प्रकारें, **माया समजून घेण्याचे सीमित बुद्धीचे सर्व प्रयत्न कुंठित व असफल** होतात. एका बाजूने पाहतां, मायेला सीमित मानलें, तर ती स्वत:च भ्रम बनते; व तिच्या द्वारां सीमित वस्तूंच्या जगभ्रमाचें स्पष्टीकरण होऊं शकत नाही. म्हणून, मायेला सत्य व अनंत मानावें लागतें. पण दुसऱ्या बाजूने पाहतां, मायेला अंतिम सत्यता दिली, तरी ती ईश्वररुपी अनंत सत्तेची प्रतिद्वंद्वी सत्ता झाल्यामुळे, वस्तुत: सीमित व म्हणून भ्रमरुप बनते. तेव्हा, **सीमितवस्तुमय जगभ्रमाच्या बौद्धिक स्पष्टीकरणाकरता, मायेला सत्य मानावें लागलें, तरी तिला अंतिम सत्ता असूं शकत नाही.**

*माया ईश्वराची छाया आहे.*

सीमित बुद्धीने माया समजून घेण्याच्या कोणत्याहि रीतीने प्रयत्न केला, तरी तिला मायेचें यथार्थ ज्ञान होत नाही. माया ईश्वराइतकीच अगम्य आहे; व मर्यादित बुद्धि तिच्या खऱ्या स्वरुपाचें आकलन करु शकत नाही. ईश्वराप्रमाणेच मायाहि अगम्य व अतर्क्य आहे; म्हणून, 'माया ईश्वराची छाया आहे' असें म्हणतात. मनुष्य आहे, तेथे त्याची छाया असतेच; त्याचप्रमाणे, ईश्वर आहे, तेथे ही अनिर्वचनीय माया असतेच.

*मायेच्या कोड्याचा उलगडा अनुभूतीनंतरच होतो.*

द्वैतक्षेत्रात कार्य करणाऱ्या सीमित बुद्धीला, ईश्वर व माया, दोन्हीही अतर्क्य असले, तरी अंतिम अनुभूती मध्ये, त्यांच्या यथार्थ स्वरुपाचे पूर्ण ज्ञान होऊं शकते. **अनुभूति होईपर्यंत, मायेच्या कोड्याचा पूर्ण उलगडा कधीच होऊं शकत नाही; व ईश्वरानुभूतीनंतर असे आढळून येतें, की माया ही अस्तित्वांतच नाही.**

*माया दोन अवस्थांत नाही.*

माया दोन अवस्थांमध्ये नाही. मूळच्या सद्वस्तूच्या अचेतन अवस्थेंत माया नसते; व परमात्म्याच्या आत्मचेतन व विज्ञान (superconsciousness) स्थितीतहि माया नसते. स्थूल, सूक्ष्म व मनोविशिष्ट जगताच्या चेतनावस्थेंत – म्हणजे ईश्वराला भासमान द्वैतपर सृष्टीची जाणीव असते, तेव्हाच मायेला अस्तित्व असते. **जेथे आत्म्याला स्वानुभव नसतो व जेथे त्याची चेतना द्वैतपर मिथ्या भ्रमांनी आक्रांत होऊन कल्पनानिर्मित द्वितीया** (imagined other) **चीच जाणीव ठेवते, तेथेच मायेला अस्तित्व आहे.**

| | | |
|---|---|---|
| ९ | परमात्माच सत्य वस्तु आहे | ९६ |
| १० | प्रेमाची प्रेरक शक्ती | ९९ |
| ११ | अखिल जीवनाची एकता | १०० |
| १२ | सात उदात्त तत्वें | १०२ |
| १३ | मानवतेस अध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्यास मदत करा | १०३ |
| १४ | नवीन कालचक्र | १०६ |
| १५ | न्यूयॉर्कला संदेश | १०९ |
| १६ | कॅलिफोर्नियास संदेश | १११ |
| १७ | हॉलीवुडला संदेश | ११३ |
| १८ | भारतभूमीस संदेश | ११५ |
| १९ | कोठून व कुठे ? | ११६ |
| २० | चालू महायुध्दाचे आध्यात्मिक रहस्य | ११८ |
| २१ | नवमानव | १२३ |
| २२ | आध्यात्मिक कार्यकर्त्यांचे कर्तव्य | १२९ |
| २३ | आध्यात्मिक आकांक्षेची ज्वाला | १३५ |
| २४ | मानवाचा आध्यात्मिक वारसा | १३७ |
| २५ | प्रच्छन्न संपत्ति | १३९ |
| | परिशिष्ट नं.१ – फळीवरील कांही प्रवचनें | १४१ |
| | परिशिष्ट नं.२ – प्रश्नोत्तरें | १५१ |


# अवतार मेहेर बाबा

# यांचे

# अध्यात्मपर लेख व संदेश

## (भाग २)



## अनुक्रमणिका


| क्रमांक | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | ज्ञानप्राप्तीचे मनोरम मार्ग | १ |
| २ | पूर्णता | ६ |
| ३ | आत्मजीवन | ११ |
| ४ | निःस्वार्थ सेवा | १७ |
| ५ | सृष्टीचा प्रारंभ व अंत | २२ |
| ६ | साधकाची लक्षणें (भाग १ ला) | ३० |
| | आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारांत प्रवेश | |
| ७ | साधकाची लक्षणें (भाग २ रा) | ३५ |
| | काही दिव्य गुणविशेष | |
| ८ | साधकाची लक्षणें (भाग ३ रा) : सेवातत्परता | ३९ |
| ९ | साधकाची लक्षणें (भाग ४ था) : श्रध्दा | ४४ |
| १० | अवतार | ४९ |
| ११ | सत्याची अनंतता | ५४ |
| १२ | स्वार्थाचे मूळ व पर्यवसान | ६० |
| १३ | ईस्वर व व्यक्ती | ६६ |
| | विभाग २ रा | |
| १ | उत्क्रांति, जन्मपरंपरा व मोक्षमार्ग | ७४ |
| २ | हिंदुस्थानांत रचनात्मक नेतृत्वाची आवश्यकता | ८३ |
| ३ | नवयुगानिर्मितीच्या पूर्ववेदना | ८६ |
| ४ | प्रार्थनेचे रहस्य | ८९ |
| ५ | नाममाहात्म्य | ९१ |
| ६ | ईश्वर आणि धर्म | ९२ |
| ७ | ईश्वर आणि प्रेम | ९४ |
| ८ | ईश्वरासाठीच जगा व ईश्वरासाठीच मरा | ९५ |

विधानें शोधतें. परंतु ही मनाची मागणी स्वयंस्फूर्त प्रेमांत अडथळे आणते. स्वयंस्फूर्त प्रेम खऱ्या आध्यात्मिकतेवर अवलंबून असतें; व त्याबरोबरच ते आध्यात्मिकतेचा विकासहि करतें. केवळ मन किंवा बुद्धि, यांच्या द्वारां तुम्हाला प्रेम करतांच येणार नाही. बुद्धीच्या द्वारां, तुम्हाला प्रीतीचें शास्त्र (theory) मिळेल; खरी प्रीति नव्हे. कांही प्रकारच्या योग्यांना जें मनाच्या द्वारां ज्ञान मिळतें, ते केवळ बौद्धिक आणि शुष्क असतें. प्रीतिजीवनांतील स्वभावसिद्ध आध्यात्मिक आनंद ह्या ज्ञानांत राहणार नाही. **प्रेम आणि आनंद, या दोनच गोष्टी जीवनांत महत्त्वाच्या आहेत. बुद्धिगम्य व शुष्क वस्तुज्ञानामध्ये, प्रेम आणि आनंद हीं दोन्हीहि नसतात.** खऱ्या मूल्यांचे बौद्धिक ज्ञान होण्यांत खरी आध्यात्मिकता नाही; तर ती त्या मूल्यांच्या अनुभूतीं (realisation) त आहे, हे आंतरिक अनुभूतिजन्य ज्ञान, म्हणजेच यथार्थ आध्यात्मिक ज्ञान होय; आणि ते मनापेक्षा हृदयावरच अधिक अवलंबून आहे. केवळ बौद्धिक ज्ञान आणि वस्तूबद्दलची माहिती (information) हीं सारख्याच योग्यतेची आहेत. असें ज्ञान वरवरचे व उथळ असल्याने जीवनाच्या पृष्ठभागावरच राहातें. त्यामुळे अंतिम सत्य मिळत नसून, केवळ त्याचा छायाभास होतो. जीवनसागराची सखोल गंभीरता केवळ हृदयाच्या मापा (plumber) ने मापली जाईल.

चेतना मनातीत (supramental) झाल्यावरच तृष्णेपासून मुक्ति मिळूं शकते.

बहुतेक मनुष्यांच्या मनावर असंख्य तृष्णा कुरघोडी करतात. अशा प्रकारचें जीवन हें आध्यात्मिक दृष्टीने सर्वात कनिष्ठ दर्जाचे मानवी जीवन होय. उच्चतम प्रकारचें मानवी जीवन हें वासनांपासून मुक्त असतें; आणि तृप्ति आणि संतोष, हे त्यांतील स्वभावविशेष असतात. प्रत्येकजण सुख शोधीत असतो; परंतु फारच थोड्यांना ते लाभतें, कारण वासनांपासून पूर्ण मुक्तता बाह्यता: ही अत्युच्च वासनारहित स्थिति निष्क्रियेतेची व प्राप्त करुन घेण्यास सुलभ वाटेल. परंतु एखाद्याने जर जाणीवपूर्वक व निद्राधीन न होतां, कोणतीहि इच्छा न आणतां अगदी स्वस्थ बसण्याचा प्रयत्न केला, तर त्याला समजून येईल की, असें निरिच्छपणाने स्तब्ध बसणें अतिशय कठीण आहे; आणि प्रचंड आध्यात्मिक क्रियाशीलतेनेच अशी स्तब्धता ठेवणें शक्य आहे. वास्तविक पाहतां, जीवन मनोभारापासून विमुक्त झाल्याखेरीज पूर्ण वितृष्ण स्थिति दुष्प्राप्य आहे. वासनाराहित्याचा आनंद उपभोगण्याकरिता, मनुष्याला मनातीत व्हावें लागतें.

मन आणि हृदय, यांमध्ये सुसंवादिता स्थापित करण्याचे उपाय.

तथापि, तृष्णाभाराक्रान्त जीवन आणि वितृष्ण जीवन, या दोन टोकांमध्ये, मन आणि हृदय यांमध्ये सुसंवादिता (harmonry) ठेवणारी व्यवहारपद्धति बसविणें शक्य आहे. अशी संवादिता जेथे असेल, तेथे जीवनाचें ध्येय मन ठरवीत नाही. तर हृदय जें ध्येय ठरवील, तें मिळविण्याकरिता मन केवळ मदत करतें. हृदयप्रणीत निर्णय व्यवहारांत कार्यरुप करण्याकरता

# १ : ज्ञानप्राप्तीचे मनोरम मार्ग

आध्यात्मिक ज्ञानाचे जे निरनिराळे मार्ग आहेत, त्यांचे ज्ञान उत्तम प्रकारें होण्याकरता, भौतिक वस्तू आणि आत्मा, यांतील प्राथमिक भेद प्रथम समजून घेणें आवश्यक आहे. भौतिकांचे अगर स्थूलाचें ज्ञान करुन घेण्यासाठी आपणांस स्थूल साधनें आहेत; आणि आत्म्याचें ज्ञान करुन घेण्याकरिता, आध्यात्मिक साधनें आहेत. निरनिराळ्या इंद्रियसंवेदनां (sensations) वर मन अगर बुद्धि, यांच्या द्वारां ज्या क्रिया होतात, त्यायोगाने जड सृष्टीचें ज्ञान होतें. परंतु, आत्म्याचें ज्ञान मात्र केवळ आत्म्याच्याच द्वारां होऊं शकतें. हें उच्चतम प्रकारचे ज्ञान (ज्यामध्ये दुसऱ्या कोणत्याही साधनाचा उपयोग न करतां, आत्मा स्वत:च्या स्वरुप ज्ञानाचा आनंद अनुभवतो) फार क्वचित् अनुभवण्यास मिळतें; आणि ते मिळविण्यास फार कठीणहि आहे. परंतु ज्ञानाप्रत जाण्याचा दुय्यम दर्जाचा मार्ग, म्हणजे मनाच्या द्वारा आत्म्यास जाणण्याचा प्रयत्न न करतां, त्याला हृदयाच्या द्वारा जाणण्याचा प्रयत्न करणें, हा होय.

मनाच्यां द्वारा आत्म्याचे ज्ञान होऊं शकत नाही.

भौतिक वस्तूवर विचार आणि क्रिया करण्याची मनाला संवय असते; आणि त्यांचे बौद्धिक ज्ञान मिळविण्याची प्रेरणा वासना आणि तृष्णा, यापासून मिळविलेली असते. आणि म्हणून, मन जेव्हा आध्यात्मिक प्रश्नांकडे वळतें, तेव्हा त्या प्रश्नासंबंधीं ते त्याला परिचित असलेल्या विचारपद्धतीनेच चालतें; आणि तसें करतांना, भौतिक वस्तूंच्या बौद्धिक ज्ञानाकरिता जी विचारपद्धति, व जे कल्पनांचे सांचे (conceptions) मनाने वापरले असतील, त्यांचाच उपयोग तें आत्म्याच्या ज्ञानाकरिताहि करतें. आत्मज्ञानाकरिता वापरलेली ही पद्धति विफल होणार, हे तर ठरलेलेंच असतें; कारण, **भौतिक वस्तूंच्या ज्ञानाकरिता विकसित झालेल्या सर्व कल्पना आत्मज्ञानाकरिता अपुऱ्या**

भौतिकासंबंधांचे मनाचे तर्क विचारांचे साचे आणि दृष्टिकोण आत्म्याच्या ज्ञानाकरिता अपुरे आहेत.

**पडतात.** त्या पद्धतींनी आत्मज्ञान करुन घेऊं पाहणें, म्हणजे डोळ्यांनी ऐकण्याचा अगर कानांनी पाहण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. हृदयाच्या सहकार्याशिवाय मन आत्म्याचें ज्ञान करुन घेऊं पाहील, तर त्याकरिता भौतिक वस्तुविषयक कल्पनांचाच मन उपयोग करतें; आणि यामुळे आत्मा हा मनाचा विषय नसतांना देखील, तो तसा आहे, असें वाटतें.

इंद्रियसंवेदनांत उद्भवून अनुमान आणि निष्कर्ष यांच्या योगाने निर्णयाकडे जाणाऱ्या मनाच्या पद्धतीशीं तुलना करतां, हृदयाची रीत हा एक साधा आणि प्रत्यक्ष प्रमाणाचा

मन आणि हृदय यांचा संघर्ष.

मार्ग आहे. जीवनांतील असंख्य अनुभवांतून जातांजातां, मनुष्याचें लक्ष जेव्हा आध्यात्मिक ज्ञान करुन घेण्यावर केंद्रित होतें, तेव्हा विविध मूल्यें (values) प्रगतिशील आणि स्वयंस्फूर्त रीतीने त्याच्या अनुभूतींत उतरतात; व हीं सर्व मूल्यें हृदयालाच अंत:प्रज्ञेने प्रतीत होतात. बहुतेक लोकांच्या जीवनांत, मन आणि हृदय ही परस्परांच्या विरुध्द जातात; आणि या दोहोंतला संघर्ष गुंतागुंत उत्पन्न करतो. हृदयाला जीवनाची एकता प्रतीत होते; आणि तें प्रीति, त्याग आणि सेवा यांच्याद्वारां साफल्य शोधतें. हृदयाची प्रवृत्ति कोणतीहि गोष्ट घेण्यापेक्षा देण्याकडे अधिक असते. आंतरिक जीवनांतील विविध अंत:प्रज्ञा (intuitions) मधून अभिव्यक्त होणाऱ्या गूढ मानसिक ओढीपासूनच हृदयाला स्वत:ची संचालक प्रेरणा प्राप्त होते; आणि भौतिक वस्तूंचे समर्थन करतांना ज्या बौद्धिक प्रमाणांची मनाला आवश्यकता वाटते, त्यांची गरज हृदयाला वाटत नाही. मन वस्तुनिष्ठ (objective) दृष्टीनेच जगाचा विचार करतें; व म्हणून तें नानात्व आणि पृथक्त्व यांनी अगदी ओतप्रोत भरुन, माणसामाणसांत भेद उत्पन्न करतें; आणि त्यांना ते स्वार्थी आणि अधिकारलोलुप बनवून, त्यांच्या अहंकेंद्र प्रवृत्ती (ego-centric tendenceis) चें पोषण करतें. परंतु हृदयाला आंतरिक अनुभवांत प्रीतीची दीप्ति दिसते आणि त्यामुळे आत्म्याच्या एकतेचें त्याला ईषत् दर्शन होतें. म्हणून, हृदय हे ज्या प्रवृती मनुष्याला ज्या नि:स्वार्थ, उदात्त आणि उदार बनवितात, अशा दानशील प्रवृत्तींतून अभिव्यक्त होण्याचा प्रयत्न करतें. याप्रकारें, 'आंतरिक आवाज' (inner voice) आणि जीवनाच्या भासमान व भ्रमात्मक अशा वरवरच्या बाजूंवर अधिष्ठित असलेल्या बुद्धीची निवेदनें, यांच्यामध्ये अवश्यत: संघर्ष होतोच.

प्रेमाच्या विमोचना पूर्वी, प्रथम पूर्ण करावीं लागणारीं आश्वासनें मागून किंवा

मन आश्वासन-लोलुप असुन निश्चयात्मकेच्या शोधात असते.

अटी घालून, मन हृदयाच्या क्षेत्रावर आक्रमण करतें. परंतु, प्रेम स्वयंस्फूर्ति नसेल, तर ते प्रेमच नव्हें. **प्रेम करण्यापूर्वी, तुम्हाला प्रेमविषयासंबंधी खात्री करुन घ्यावीशी वाटत असेल, तर तो केवळ स्वार्थाचा बाजार आहे.** उदाहरणार्थ, पुष्कळ लोकांना माझ्या वर प्रेम करण्याकरता, माझ्या ईश्वरत्वाबद्दल



खात्री करुन घ्यावींशी वाटते. म्हणजे, माझ्या आध्यात्मिक गौरवाचें प्रमाण म्हणून मी कांहीतरी चमत्कार करुन दाखवावे, अशी त्यांची इच्छा असते. परंतु, अशा प्रकारच्या प्रमाणांनी उच्चतम प्रकारच्या प्रेमाच्या ओघाला मदत न होतां, उलट अडथळेच होतात. उच्चतम प्रेमामध्ये प्रीतिविषया कडून कांही मिळेल, अशी यत्किंचितहि अपेक्षा नसते.

जेव्हा मन अशा शंकानिवृत्ती (coviction) चा आणि पुष्टिविधानां (corroborations)

बौध्दिक विश्वास सहज प्रेमाला अवरुद्ध करतो.

चा, आध्यात्मिक ज्ञानाला मदत म्हणून, इंद्रियग्राह्य प्रमाणें आणि चमत्कार, यांच्या द्वारां शोध करतें, तेव्हा तें हृदयाच्या अधिकारक्षेत्रावर आक्रमण करतें. या वस्तुजगतामध्ये, जेव्हा कांही, निश्चित आणि प्रत्यक्ष परिणाम घडवून आणावयाचे असतात, अगर कांही निश्चित पदार्थप्राप्ति हवी असते, तेव्हा पुष्टिविधानें (corroborations) आणि संशयविच्छेद किंवा निश्चयात्मकता (conviction) यांचें महत्त्व असतें. एखाद्या मनुष्याची चमत्कार आणि इतर कांही इंद्रियग्राह्य प्रमाणें, यायोगें ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं बौद्धिकदृष्ट्या अगदीं खात्री झालेली आहे, अशी जरी आपण कल्पना केली, तरी अशा निश्चयात्मकतेमुळे, त्याच्या हृदयाचें द्वार खुलेलच, असें म्हणतां येणार नाही. अशा या रुक्ष (cold) रहस्योद्घाटना (revelation) मुळे, ईश्वरावर जी निष्ठा तो ठेवील, तिच्या मुळाशीं भीति किंवा कर्तव्याची भावनाच राहील **परंतु, ज्याला कोणतेंहि बंधन नाही, असें विमुक्त प्रेम कोणत्याहि बुद्धिगम्य वस्तूवर आधारलेल्या प्रमाणांतून उद्भूत होणें शक्य नाही.** आणि जेथे प्रेम नाही, तेथे जीवनाचा आनंदहि नाही आणि सत्तासौंदर्य (beauty of being) हि नाही. वास्तविक पाहातां ईश्वराच्या प्रीतिसागरस्वरुपाचें आकलन मनाला होणें शक्य नाही. ईश्वराच्या स्वरुपाचें आकलन प्रीतीनेच होतें; चमत्कारांचा बौद्धिक शोध करुन ईश्वर सापडत नाही. याच कारणासाठी, जे मला अगदी जवळचे आणि अत्यंत प्रिय वाटतात, त्यांच्यासाठी मी चमत्कार करीत नाही. चमत्कार करुन माझ्या ईश्वरत्वाची खात्री पटविण्यापेक्षा, मला अनुयायी नसले तरी परवडतील. माझ्यावर प्रेम करतांना, लोकांना आजवर त्यांना अज्ञात असलेले आध्यात्मिक अनुभव येतील, हें खरें. आणि हे अनुभव त्यांच्या हृदयाच्या अधिकाधिक विकासाला मदत करतील, हेंहि खरें. परंतु, बौद्धिक प्रमाण मिळविण्याची मनाची तृष्णा शमविण्यासाठी चमत्कार केले जात नाहीत; आणि चमत्कारच ध्येय आहेत, असे समजण्याची भूल कधीहि होऊं देऊ नये.

आत्म्याचें दर्शन हृदयाच्या द्वारांच होऊं शकते.

जेव्हा एखाद्या कार्याचें वास्तविक महत्त्व लक्षांत न घेतां, मनुष्य त्याच्या परिणामाकडे नजर ठेवतो, तेव्हा तो आध्यात्मिक समस्या केवळ मनाच्या द्वारा सोडविण्याचा प्रयत्न करीत असतो; आणि असें करतांना तो हृदयाच्या यथोचित क्रियाशीलतेमध्ये ढवळाढवळ करतो. मनाला सर्व प्रकारच्या वस्तु हव्या असतात. आणि त्यासाठीच तें इंद्रियग्राह्य प्रमाणें आणि पोषक

मद्यपी, पापी, धूर्त, ठग अगर खुनी इत्यादि रुपांतहि तो आपली कुशलता दाखवूं शकला असता; परंतु त्यामुळे जगाला धक्का बसला असता. जरी तो सर्व बाबतींत निपुण होता, तरी तें नैपुण्य प्रकट करणें, त्याच्या आध्यात्मिक जीवनकार्याकरिता आवश्यक नव्हतें. दुसऱ्या आत्म्यांची आध्यात्मिक उन्नति करण्याकरिता, ज्या जीवनपद्धतीचा अवलंब करणें आवश्यक असेल, अशा कोणत्याहि प्रकारच्या जीवनपद्धतींत, आध्यात्मिक पूर्णता प्राप्त झालेले आत्मे आपले प्रावीण्य प्रकट करुं शकतात. परंतु, केवळ त्या बाबतींतील आपलें नैपुण्य दाखवावयाचें, म्हणून ते तसें करीत नाहीत. आध्यात्मिक जरुरी असेल, तरच ते आपल्या कर्मकौशल्याचा उपयोग करतात; केवळ दुसऱ्यांचे कुतूहल पुरविण्याकरिता करीत नाहीत. आपला या गुणोत्कर्षाचा व कार्यक्षमतेचा उपयोग करतांना ते अनासक्त राहतात. ज्याप्रमाणें हातमोजे घातलेला मनुष्य, हात खराब होऊ न देता, मातीला स्पर्श करुं शकतो, त्याचप्रमाणे आध्यात्मिक दृष्ट्या पूर्ण झालेला मनुष्य भौतिक जगतांतील कार्य त्यांत बद्ध न होतां करुं शकतो.

पूर्णता सर्वांगीण असायला पाहिजे.

पूर्णता म्हणजे व्यक्तित्वाचा पूर्ण विकास आहे. म्हणून पूर्णता सर्वांगीण असावयास हवी. केवळ एकाच विषयांत असलेलें प्रावीण्य म्हणजे खरी पूर्णता नव्हे. ती केवळ एका शक्तीचा किंवा क्षमतेचा एकांगी विकास आहे. **अशा अपुऱ्या निपुणतेच्या द्वारां, मनुष्याला सततचंचल अवस्थांतरांशी आणि जीवनाच्या विविध परिवर्तनांशी व्यवस्थापन (adjustement) किंवा जुळणी करुन घेतां येत नाही.** जीवनांत सतत होणाऱ्या परिवर्तनामध्ये, तो मनाचा गतिमान समतोलपणा (moving equilibrium) ठेवूं शकत नाही. ज्या शक्तींचा उत्कर्ष त्याच्या ठिकाणी झाला असेल, त्यांच्या अभिव्यक्तीला अवसर मिळेल, अशी निसर्गतःच त्याला परिस्थिति प्राप्त झाली, तर तो तात्पुरता सुखी असतो, आणि विश्वाबरोबर समस्वर असल्याचा आनंद त्याला मिळतो. परंतु ज्या ठिकाणी त्याची क्रियाक्षमता (capacity) अनुपयुक्त आहे, असें प्रतिकूल वातावरण जर त्याला मिळालें, तर विफलतेची भावना उत्पन्न होऊन, त्याच्या मनाचा तोल जातो. म्हणून सर्वांगीण पूर्णता म्हणजेच खरी पूर्णता होय.

पूर्णावस्था द्वंद्वामधून व्यक्त होते व ती द्वंद्वातीतहि आहे.

याचा अर्थ असा की, पूर्णता द्वंद्वाच्या पलीकडे असली, तरी सर्व द्वंद्वांचा तिच्यांत समावेश होतो. जर तुम्ही द्वंद्वसापेक्ष ठरीव प्रमाणा (standard) ने पूर्णतेचें खरें यथार्थ आकलन करुं पाहाल, तर तुम्ही त्या पूर्णतेला सीमित कराल; व पूर्णतेचे खरें ज्ञान करुन घेण्यास तुम्ही असमर्थ ठराल. पूर्णतेंत द्वंद्वां (opposites) चा अंतर्भाव होतो; आणि ती द्वंद्वातीतहि आहे. म्हणूनच पूर्णपुरुष कोणत्याहि कायद्याने अगर मर्यादित ध्येयाने बांधलेला नसतो. तो स्वतः बऱ्यावाईटांच्या पलीकडे असतो. परंतु, चांगल्या लोकांना त्याचा नियम (law) चांगले फल देतो; आणि जे वाईट असतात,



स्वीकारितांना, मन आपल्या कोणत्याहि अटी पुढे करीत नाही. दुसऱ्या शद्बांत सांगायचें, म्हणजे विश्वस्वरुपासंबंधीच्या बौद्धिक समस्यांच्या बाबतींतील स्वतःच्या रुळलेल्या **न्यायाधीशाच्या भूमिकेचा मन त्याग करतें** आणि हृदयप्रणीत आशा बिनतक्रार पाळतें.

जीवनाचे ध्येय ठरविण्याकरिता हृदयाला पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे.

**मन हा विद्येचा कोश** (treasure-house) **आहे; परंतु हृदय आध्यात्मिक ज्ञानाचा कोश आहे.** विज्ञानशास्त्रें (science) आणि धर्म (religion) या दोहोंमध्ये जो संघर्ष उत्पन्न होतो, तो ज्ञानाच्या या दोन्ही बाजूंच्या सापेक्ष महत्त्वाची गुणग्रहणशीलता नसल्याने होतो. केवळ मनाच्या साहाय्याने खऱ्या मूल्यांचे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करणें फोल आहे. ग्राह्य काय, हें तुम्हाला मन सांगू शकत नाही; बुद्धिव्यतिरिक्त इतर साधनांच्या द्वारां इष्ट ठरविलेलीं ध्येयें अगर वस्तु कशा साध्य कराव्यात, हेंच केवळ मन सांगूं शकेल. बहुतेक लोकांच्या बाबतींत, वासनांना ज्या गोष्टी इष्ट वाटतात, त्यांचाच मन स्वीकार करतें; परंतु असें करणें म्हणजे आत्म्याचें जीवन त्यागणें होय. म्हणून, **मनाने हृदयाशीं सहकारानेच वागावयास हवें. सहज अंतःप्रज्ञेपुढे, बौद्धिक माहितीच्या स्वरुपाचें ज्ञान गौणच समजलें पाहिजे. आणि मनाला कोणत्याहि तऱ्हेची लुडबुड करुं न देतां जीवनाचें ध्येय ठरविण्याकरिता, हृदयाला पूर्ण स्वातंत्र्य दिलें पाहिजे.** व्यावहारिक जीवनांत मनाला स्थान आहे; परंतु, हृदयाचें निर्णय स्पष्ट झाल्यानंतरच त्याचें कार्य सुरु होतें.

हृदय आणि मन यांची संवादिता त्यांच्या परस्पर सहकारानेच होते.

आध्यात्मिक ज्ञान, हे हृदय आणि मन यांच्या संवादितेंतून उत्पन्न होतें. या समस्वरतेसाठी, त्यांच्या कार्याचा संकर करुन टाकला पाहिजे, असें नाही. सुसंवादिता म्हणजे संकरक्रिया नव्हे, तर सहकारक्रिया. त्यांच्या क्रिया एकाच स्वरुपाच्या नसतात; व त्या बरोबरीच्या श्रेणीच्या (co-ordinate) हि नसतात. मन आणि हृदय ही समतोल पाहिजेत. परंतु ही समतोलता मनाविरुद्ध हृदय रोखून किंवा हृदयाविरुद्ध मन रोखून लाभणार नाही. **मन व हृदय या दोहोंच्या मध्ये यंत्रसम ताण पडून त्यांचा समतोलपणा होत नाही; तर तो त्यांच्या विवेकयुक्त व सम्यक् व्यवस्थापनेने होतो.** इकडेतिकडे न झुकतां, मन व हृदय ही आपापलीं कार्ये सुव्यवस्थित करुं लागलीं, म्हणजे ती समतोल झालीं असें म्हणावयायास हरकत नाहीं. असा समतोलपणा त्यांच्यांत आला, म्हणजेच त्यांच्यांत संवादिता (harmony) येते. आध्यात्मिक ज्ञानाने प्रकाशित, गंभीर व खंडरहित अशा एकत्वाच्या जीवनाकरिता, मन आणि हृदय यांच्या संवादितेची आत्यंतिक आवश्यकता आहे.

# २ : पूर्णता

पूणतेचें स्पष्ट ज्ञान करुन घेण्याकरिता, तिचे दोन भाग करावे लागतात :- **(१) द्वैतातीत जाणिवेच्या परात्पर स्थितीचा आंतरिक अनुभव देणारी आध्यात्मिक पूर्णावस्था,** आणि (२) या द्वंद्वयुक्त जगामध्ये जी व्यक्त केली जाते आणि दृष्टोत्पत्तीस येते, ती भौतिक पूर्णता. प्रत्येक संबद्ध सत्ता (relative existence) बहुगुणरुपात्मक व्यक्त जगताचा एक भाग आहे; आणि त्यामध्ये अंशभेद असणें अपरिहार्य आहे. आपण जेव्हा या प्रकटीभूत विश्वांतील पूर्णतेकडे पाहातों, तेव्हा द्वैतमय जगतांतील इतर वस्तूप्रमाणेच त्या पूर्णतेंतहि न्यूनाधिक्य असतेंच, असें दिसून येतें. चांगलें आणि वाईट, दुर्बलता आणि सबलता, पुण्य आणि पाप, ही सारी द्वैतामधील द्वंद्वे आहेत. परंतु या सर्व अवस्था भिन्नभिन्न अंशाने एकाच सत्ते (reality) च्या अभिव्यक्ति आहेत.

पूर्णतेचे दोन प्रकार.

याप्रमाणे, वाईट किंवा अशुभ, म्हणजे केवळ वाईट अगर अशुभ नसून, ते चांगल्याची किंवा शुभाची निम्नतम स्थिति आहे. दुर्बलता म्हणजे सामर्थ्याचा अभाव नाही, तर सबलतेचा निम्नतम अंश आहे; आणि पाप केवळ पाप नाही, तर सद्‌गुणांचा आणि पुण्याचा निम्नतम अंश आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे, म्हणजे वाईटहि चांगल्याची अत्यल्पावस्था आहे; दुर्बलता ही सबलतेची अत्यल्पावस्था आहे; आणि पाप अगर दुराचार, ही पुण्य अगर सदाचाराची अत्यल्पावस्था आहे. द्वंद्वांच्या या अवस्थांत, निम्नतम व उच्चतम अवस्था आणि या दोहोंमधील अंश (degrees) हे असतात; आणि पूर्णताहि याला अपवाद नाही. मानवतेचें सर्व क्षेत्र पूर्णता आणि अपूर्णता, या दोन अंत्य टोकांत (extremes) अंतर्गत असतें; आणि **पूर्णता आणि अपूर्णता या दोहोंतहि वैषम्य, अन्योन्य संबंध आणि तुलना यांना जागा असते.** म्हणून, द्वैताच्या राज्यातील पूर्णता म्हणजे सापेक्ष पूर्णता असते; आणि अपूर्णतेच्या तुलनात्मक दृष्टीने पाहिलें, तरच आपणांस सापेक्ष पूर्णता

द्वैदाच्या राज्यांत आपणांस सापेक्ष पूर्णताच सापडते.



ही पूर्णतेसारखी भासेल.

द्वैतविषयक पूर्णता म्हणजे कोणत्याहि एखाद्या गुणाची किंवा योग्यतेची उत्तमता (excellence) होय. आणि या प्रकारात, एका बाबतींतील पूर्णतेंत दुसऱ्या बाबतींतील पूर्णता समाविष्ट होऊं शकत नाही. उदाहरणार्थ, विज्ञान शास्त्रांत प्रवीण असेलला मनुष्य गायन शास्त्रांत प्रवीण असेलच, असें नाही. त्याचप्रमाणे, गायनशास्त्रांत पारंगत असलेला मनुष्य विज्ञानशास्त्रांत पारंगत असेलच असें नाही. एका दृष्टीने पाहतां, गुन्हे करण्यांत देखील प्रावीण्य दाखवितां येतें. खुनी माणसाचा तपास लागेल, अशी यत्किंचितहि खूण न ठेवतां खून केला, तर तिला गुन्हे करण्यांतील पूर्णता म्हणतां येईल. म्हणून गुन्हे करण्यांत अगर पाप करण्यांत देखील एक प्रकारची प्रावीण्यरुप पूर्णता असू शकते. परंतु, या प्रकारची गुणाची अगर शक्तीची उत्तमता अगर पूर्णता द्वैतमय क्षेत्राच्या पलीकडील **आध्यात्मिक** पूर्णतेहून भिन्न समजली पाहिजे. द्वैताच्या सृष्टींतील कोणत्याहि प्रकारचें प्रावीण्य अगर उत्तमता बुद्धीच्या कक्षेमध्ये अंतर्गत आहे; कारण, नित्याच्या सीमित अनुभवांत आलेल्या एखाद्या चांगल्या गोष्टीला कल्पनेंत उच्चतर वाढविल्याने अशा पूर्णतेचें आकलन करतां येते. परंतु, आत्मज्ञ लोकांची जी पूर्णता असते, ती द्वैतातीत असल्यामुळे, बुद्धीच्या कक्षेपलीकडे असते. या पूर्ण स्थितीला द्वैताच्या दुनियेंत कोणतीहि उपमा नाही. जेव्हा मनुष्य अध्यात्मदृष्ट्या पूर्ण बनतो, तेव्हा ईश्वराशिवाय या जगांत कांहीहि नाही, आणि जें जें द्वैतमय जगतांत दिसून येतें, आणि जें जें बुद्धिग्राह्य आहे, तें सारें भ्रममय आहे, हें तो जाणतो. **आध्यात्मिक पूर्णतेस पोहोचलेल्या मनुष्याच्या दृष्टीने, केवळ ईश्वर हाच सत्य असतो.** पदार्थविज्ञान (science), कला, संगीत, दुर्बलता, सामर्थ्य, बरें आणि वाईट – हीं सारीं त्याला स्वप्नाप्रमाणे होत. अविभाज्य अस्तित्वाची अनुभूति म्हणजेच मनुष्याची पूर्णावस्था होय.

आध्यात्मिक पूर्णता उत्तमतेहून भिन्न समजली पाहिजे.

आध्यात्मिक पूर्णता असलेला मनुष्य नेहमी आपले ज्ञान आणि शक्ति दुसऱ्या आत्म्यांच्या आध्यात्मिक उन्नतीकरिताच उपयोगांत आणतो. त्याचें दुसऱ्याविषयीचे ज्ञान त्यांच्या बाह्य रुपावर, अगर त्यांच्या म्हणण्यावर अवलंबून नसते. विचार प्रथम उद्‌भवतो; आणि त्याची शब्दमय अभिव्यक्ति नंतर होते. परंतु, इतरांचे मनोव्यापार त्याला प्रत्यक्षपणे (directly) दिसत असल्यामुळे, त्याला विचारांच्या अभिव्यक्तीसाठी थांबावें लागत नाही. शब्दांची आवश्यकता त्याला नसतेच. त्याची इच्छा असल्यास, कोणत्याहि गोष्टीच्या अभिव्यक्तीपूर्वी देखील, तो ती जाणूं शकतो. परंतु आध्यात्मिक दृष्ट्या त्याची जरुरी असेल, तरच तो असें करतो. त्याचप्रमाणे एखाद्या गोष्टींत विशेष प्रावीण्य मिळविणें आवश्यक असेल, तर तो तें सहज मिळवूं शकतो. कृष्ण आध्यात्मिक दृष्ट्या पूर्ण होता. आणि तो इतर सर्व बाबतींतहि पूर्ण होता. जर त्याला आवश्यक वाटलें असतें, तर

येत असतील, तर त्या विघ्नच आहेत.

मनाच्या नाना तृष्णांमुळे, भौतिक वस्तूंना स्वत:चेंच असे महत्त्व मिळतें. म्हणून, मद्यप्याला मदिरा हेच सर्वस्व वाटते; लोभी मनुष्याला वित्तसंचयापलीकड जगांत दुसरें कांही महत्त्वाचें आहे, असें वाटतच नाही; व विषयी मनुष्यास इंद्रियसुखांचा पाठलाग हेंच जीवनाचें अंतिम लक्ष्य आहे, असें वाटतें. नाना तृष्णांच्या द्वारां भौतिक जगाला वृथा उठाव मिळून, त्यांच्यामुळे आत्म्याची अभिव्यक्ति कशी विकृत होते, हे या उदाहरणांवरुन दिसून येईल. **आत्म्याचा गौरव स्थापन होण्याकरिता, भौतिकतेचा त्याग करावयास नको, तर आत्म्याच्या जरुरीकरिता तिचा उपयोग करुन घ्यावयास पाहिजे.** सर्व वासनांपासून मुक्त होऊन आत्म्याला खऱ्या पदाची जाणीव झाली असेल, तेव्हाच हे शक्य होतें. हें साध्य होईल, तेव्हा मनुष्य ऐहिक वस्तूंचा उपयोग करील, परंतु त्यांत बद्ध होणार नाही. जेव्हा आवश्यकता असेल, तेव्हा तो या ऐहिक गोष्टींचा आत्म्याच्या जीवनाचे साधन म्हणून उपयोग करील. परंतु, तो त्या गोष्टींमुळे मोहित होत नाही, त्यांचे त्याला आकर्षण वाटत नाही, अगर त्यांच्यासाठी तो अस्वस्थहि होत नाही. कारण, जीवनासाठी त्यांचे स्वत:चें असें खरें महत्त्व कांहीच नाही, हे तो जाणतो. मनांत कोणतीहि तृष्णा न ठेवतां, तो ऐहिक जगतांत व समाजांत वावरतो; आणि त्यांपासून अलिप्त असल्यामुळे, तो भौतिक संसाराला त्याच्या आध्यात्मिक जीवनाचें क्षेत्र बनवितो.

एकदां भौतिक आणि आध्यात्मिक बाजूंची खरी जुळणी झाली, म्हणजे ईश्वरत्वाच्या अभिव्यक्तिकरता उपयोगिता येणार नाही, असा कोणताहि जीवनाचा भाग राहत नाही. दैनंदिन जीवन आणि त्याची गुंतागुंत, यांपासून दूर जाण्याची किंवा त्याला विमुख होण्याची यापुढे आवश्यकता राहात नाही. संसाराचा, व भौतिक जगताचा संबंधविच्छेद करुन आणि पर्वतगुहांमध्ये जाऊन, जें आत्मस्वातंत्र्य मिळविलें जातें, तें खरें नसून, निषेधक व नकारात्मक स्वातंत्र्य आहे. जेव्हा असा बाह्यत्याग तात्पुरता असतो आणि भौतिक अनुभवांचे मनन व अनासक्तीचें वर्धन करण्याकरता म्हणून केलेला असतो, तेव्हा तो लाभदायक असतो. असला तात्पुरता त्याग जीवनाच्या शर्यतींत थोडा वेळ श्वास घेण्यासाठी घेतलेल्या विश्रान्तीप्रमाणे असतो. परंतु, जेव्हा वेळ श्वास घेण्यासाठी घेतलेल्या विश्रान्तीप्रमाणे असतो. परंतु, जेव्हा भौतिक वस्तूंच्या भीतीने आणि आत्मविश्वासाच्या अभावामुळे हा त्याग केला जातो, तेव्हा खरें स्वातंत्र्य मिळण्यास त्याची कांही मदत होत नाही. **खरें स्वातंत्र्य नेहमी प्रतिष्ठापनात्मक (positive) असतें; आणि तें भौतिकतेवरील आत्म्याच्या अबाधित शासनाधिकारांतूनच व्यक्त झालें पाहिजे. हेंच खरें आत्मजीवन (life of the spirit) होय.**

आत्मा जव्हां ऐहिक जगताचा शास्ता बनतो, तेव्हाच त्याचे विधायक स्वातंत्र्य अभिव्यक्त होते.

आत्मजीवन म्हणजे अनंततेची अभिव्यक्ति होय; आणि म्हणून त्याला कृत्रिम मर्यादा नसतात. केवळ एखाद्या नादा (fad) च्या मागें सर्व उत्साह खर्च करणें, म्हणजे कांही खरी



त्यांना 'जशास तसें', म्हणजे वाईट फल देतो. अर्जुनानें दुष्ट कौरवांचा शारीरिक आणि मानसिक सर्वनाश केला, असें बाह्य दृष्ट्या दिसलें व वरवर भासलें, तरी तो सर्वनाश कौरवांच्या आध्यात्मिक मुक्तीकरिताच होता, हे कृष्णाने आपला भक्त अर्जुन याला सिद्ध करुन दाखविलें. परिस्थितीमध्ये जी आध्यात्मिक आवश्यकता (spiritual demand) असेल, तिला अनुसरुन पूर्णावस्थाहि संहारक अगर उद्धारक रुपांत अभिव्यक्त होते. पूर्ण पुरुषांचे हृदय लोण्याहून मऊ आणि पोलादाहूनहि कठोर असतें. पूर्णतेची अभिव्यक्ति द्वंद्वांच्या एकाच विरुद्धपक्षा (opposite) मध्ये सीमित राहू शकत नाही. म्हणजे, द्वंद्वाच्या दुसऱ्या विरुद्धपक्षांतून देखील पूर्णता प्रकट होण्याची शक्यता नसते, असें नाही. **वस्तुस्थितीच्या अंतर्गत नियमा (logic) नुसार, पूर्णावस्थाहि द्वंद्वांतील कोणत्याहि पक्षामधून प्रकट होऊं शकते.** म्हणूनच पूर्णावस्था द्वंद्वातीत असून, सर्व संभाव्य परिस्थितींना यथाविधि सामना (response) देण्याला समर्थ असते. पूर्णावस्थेमध्ये, सत्याचा केंद्रबिंदु न सुटतां, परिस्थितीमध्ये जरुर असलेलें अनुवर्तन (adaptibility) शक्य होते. आणि सर्वांगीण पूर्णता प्राप्त न झालेला मनुष्य ज्या परिस्थितीत किंकर्तव्यमूढ बनेल, अशाहि निरनिराळ्या कठीण परिस्थितीत, पूर्ण पुरुष अचल शांति ठेऊन, समस्वरतेचा व सुंवादिते (harmoney) चा अनुभव घेतो.

पूर्णता मनुष्याची परमोन्नत अवस्था आहे.

मानवी क्रिया द्वंद्वांनी परिभित असतात; आणि पूर्णता त्यांच्या पलीकडे आहे. परंतु, म्हणून पूर्णतेमध्ये कांही मानुषी भाव (human touch) नसतो, अशी कल्पना करुं नये. सामान्य मनुष्य वास्तविकपणें दु:खी असतो; पण तो स्वत:ला आणि इतरांना सुखी करण्याकरिता हंसतो. परंतु, ज्याचें अंत:करण आनंदातिशयाने ओतप्रोत भरलेलें असतें, अशा पूर्ण पुरुषाला देखील विनोदबुद्धि (sense of humour) असते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें, म्हणजे पूर्णता ही अमानुष बनण्यांत नसून, अतिमानव बनण्यांत आहे. **मनुष्यामध्ये जो प्रच्छन्न विवेक असतो, त्याचा प्रकर्ष म्हणजेच पूर्णता होय.**

मनुष्याचे ईश्वर बनणें अगर ईश्वराचें मनुष्य बनणे म्हणजेच पूर्णावस्था आहे.

ईश्वराचें ईश्वरी स्थितींतच राहाणें म्हणजे पूर्णता नव्हे; व मनुष्याचें मानवी स्थितींत राहाणें हीहि पूर्णता नव्हे. मनुष्य जेव्हा ईश्वर बनतो, किंवा ईश्वर मनुष्य बनतो, तेव्हाच पूर्णस्थिति सिद्ध होते. मर्यादित मनुष्याला आपल्या ससीमतेची जाणीव असते; व म्हणून, तो अपूर्ण आहे, हे उघडच आहे. परंतु स्वत: अनंताशीं एकरुप असल्याचा बोध जेव्हा त्याला होतो, तेव्हा तो पूर्ण होतो. जेव्हा आपण सीमित (finite) असल्याचा भ्रम दूर करुन, अंतर्गत दिव्यतेच्या प्राप्तीने त्यास ईश्वरत्व (godhood) प्राप्त होते, तेव्हाची ही घटना आहे. अनंत म्हणजे जें सान्ताचे विरोधी आहे, सान्तापासून दूर आहे आणि अवश्यत: सान्ताशिवाय दुसरेंच आहे, असें मानलें, तर सान्तांत आणि सान्तामधून स्वत:चें

प्रतिष्ठापन करण्यास असमर्थ ठरलेलें ते अनंत वस्तुत: सीमितच होते. दुसऱ्या शद्बांत सांगायचे, म्हणजे अशा अनंतास पूर्ण म्हणतां येणार नाही. सान्ताने मर्यादित न होता, सान्तांत आणि सान्तामधूनच अनन्ताने आपल्या असीम जीवनाचा अनुभव घेतला पाहिजे. ईश्वर मनुष्याच्या सीमित देहरुपामध्ये ईश्वराचें ज्ञानपूर्वक अवतरण म्हणजेच अवतार होय; आणि हें त्याच्या पूर्णतेचेंच गमक आहे. **आपली सीमा उल्लंघून स्वत:च्या अनन्तत्वाची सान्त जाणीव करुन घेतें, किंवा अनन्त आपल्या कल्पित पृथक् स्थितीचा किंवा दूरत्वाचा त्याग करुन मनुष्य बनतें, तेव्हा त्यांना पूर्णतेची उपलब्धि होते.** दोन्हीहि स्थितीत सान्त आणि अनन्त, हे परस्परांपासून बहिष्कृत होऊं शकत नाहीत. सान्त आणि अनन्त, यांचा ज्ञानपूर्वक व सुखद संयोग म्हणजेच पूर्णता. पूर्ण स्थितीमध्ये, सान्ताने सीमित न होतांहि, अनन्त सान्तामधून अभिव्यक्त होतें; आणि सान्तहि स्वत: अनन्ताचीच अभिव्यक्ति असल्याचें पूर्ण ज्ञान प्राप्त करुन, स्वत:च्य ससीमतेच्या भावाचें अतिक्रमण करतें.

# ३ : आत्मजीवन

**खऱ्या कर्मयोगांत** किंवा श्रेष्ठतम क्रियाशील जीवनामध्ये, भौतिक आणि आध्यात्मिक बाजूंचें बरोबर व्यवस्थापन (adjustment) झालेलें असतें. या प्रकारच्या जीवनांत, चेतना ऐहिक आणि भौतिक वस्तूंच्यामुळे बद्ध होत नाही. परंतु रोजच्या अस्तित्वाला टाळून दूर पळण्याच्या चेतनेच्या प्रयत्नास प्रतिबंध करण्यांत येतो. मनाला भोगविलासांत बुडूं दिलें जात नाही, तीक्ष्ण वासनांची शिकार त्याला बनूं दिलें जात नाही, किंवा आध्यात्मिक आनंदांत त्याला डुंबत राहू दिलें जात नाही, किंवा आध्यात्मिक विवेकाच्या दृष्टिकोणानें जीवनाच्या समस्या सोडवून, त्यांच्याशीं मन सामना करतें.

कर्मयोगी जीवनाच्या समस्यांशी सामना करतो.

भौतिकता आणि आध्यात्मिकता, ह्या जीवनाच्या दोन बाजूंचे व्यवस्थापन त्यांना सारखेंच महत्त्व देऊन होऊं शकत नाही. म्हणजे, भौतिकांतून कांही आणि आध्यात्मिकतेंतून कांही घेऊन आणि दोहोंमधला कांटा समतोल करुन त्यांचे सम्यक् व्यवस्थापन होत नाही. **प्रकृति (matter) पेक्षा आत्म्याची अभंग श्रेष्ठता नेहमीच राहणार.** परंतु ही श्रेष्ठता भौतिक वस्तूंचा त्याग करुन व त्या टाळून व्यक्त होत नाही; तर आत्म्याच्या अभिव्यक्तीसाठी, त्यांचा योग्य साधन म्हणून उपयोग करुन, व्यक्त होते. तेव्हा, विवेकसम्मत व्यवस्थापनेमध्ये, भौतिक वस्तूंनी आत्म्याच्या अभिव्यक्तीचें साहाय्यक उपादान हीच भूमिका घेतली पाहिजे. त्यांनी कोणत्याहि तऱ्हेने स्वत:च्या हक्कांबद्दल निरंकुश बनावयास नको, गायकाच्या गायनाला पूर्ण व्यक्तता देत असेल, तोपर्यंतच वाद्याची किंमत आहे. परंतु, जर गायकाच्या गीताला वाद्य साहाय्यक होत नसेल, तर तें त्याच्या दृष्टीने केवळ विघ्नच आहे. त्याचप्रमाणे, भौतिक वस्तूंमुळे विधायक जीवनप्रवाहाला स्वतंत्र आणि योग्य अभिव्यक्ति मिळत असेल, तरच त्यांना महत्त्व आहे. परंतु अशा अभिव्यक्तीच्या आड त्या

भौतिकाचा उपयोग आत्म्याच्या अभिव्यक्तीला अनुकूल साधन म्हणून केला गेला पाहिजे.

derstanding) यांत फरक आहे. संसारी दृष्टीचें तारतम्य, म्हणजे डोळे बंद करुन भौतिक जगतांतील आचारविधींचा स्वीकार करणें होय. परंतु आध्यात्मिक ज्ञान हें जगरुढींचा असा डोळे मिटून स्वीकार करुं शकत नाही. **भौतिक जगताचे आचारविधि अगर रुढी, म्हणजे बहुधा संसारासक्त लोकांच्या कार्याचा सामुदायिक परिणाम असतात.** संसारासक्त लोक एखादी गोष्ट बरोबर आहे म्हणून ठरवितात; आणि त्याच प्रवृत्तीचा इतर लोकांना ती बरोबर आहे, असें वाटायला लावतात. तेव्हां, अशा अंधानुकरणानें केलेली कृति शहाणपणाची असतेच असें नाही. गुणदोषविवेचनशून्य अनुकरण, हे आत्म्याचे जीवन होऊ शकत नाही; तर आत्मजीवनाचें अधिष्ठान मूल्यांच्या खऱ्या ज्ञानांत असलें पाहिजे.



आध्यात्मिकता नव्हे. आध्यात्मिकतेचा कोणत्याहि मता (ism) शी संबंध नाही. भौतिक जगताशीं आध्यात्मिकतेचा कांही संबंध नाही, असें समजून व त्याच्याशीं विलग्न होऊन, जेव्हा आध्यात्मिकतेचा शोध करण्यांत येतो, तेव्हा तो शोध व्यर्थ होय. जीवनाच्या एखाद्या विशिष्ट भागावर जोर द्यावयाची अगर त्याला महत्त्व देण्याची सर्व पंथ आणि संप्रदाय यांची प्रवृत्ति असते. परंतु **खऱ्या आध्यात्मिकतेचा दृष्टिकोण सर्वसमावेशक (totalitarian) असतो.** जीवनाच्या कोणत्यातरी अंगाबद्दल विशिष्ट आणि संकुचित आस्था बाळगणें, हे कांही आध्यात्मिकतेचे खरें सार नव्हे. परंतु जीवनाच्या विभिन्न परिस्थितींतहि विवेकपूर्ण आणि ज्ञानसंमत वर्तन, हीच खरी आध्यात्मिकता आहे. तिचा विस्तार अखिल जीवनावर असून, जीवन तिच्यांत अंतर्गत आहे. सर्व भौतिक वस्तु दैवी लीलेला पोषक बनूं शकतात; आणि जेव्हा त्या अशा गौण अगर अंकित बनतात, तेव्हा त्या आत्म्याच्या प्रकाशनास सहायक होतात.

आध्यात्मिकतेचा विस्तार सर्व जीवनांवर असतो.

आत्म्याच्या जीवनांत ज्या मानाने भौतिक वस्तु भाग घेऊं शकतील, त्यावर त्यांचे मोल अवलंबून राहील. त्या स्वत: चांगल्याहि नाहीत किंवा वाईटहि नाहीत. त्यांच्या द्वारा आत्म्याची भौतिकांत अभिव्यक्ति होत असेल, त्याप्रमाणे त्या बऱ्या अगर वाईट ठरतात. उदाहरणार्थ, आत्मजीवना (life of the spirit) मधील स्थूल देहाचें स्थान घ्या. आत्मा आणि स्थूल शरीर यांत विशेष स्थापित करणें, ही भूल आहे. या दोहोंत असें वैमनस्य कल्पिल्याने शरीर अनिवार्यतेने निंद्य ठरलें जातें. परंतु, जेव्हां शरीर स्वत:च्याच हक्कांचा परिपोष करतें, तेव्हाच तें आध्यात्मिक सफलतेंत विघ्न ठरतें. शरीराला आध्यात्मिक उद्दिष्टाकरिता दुय्यम साधन समजणें, म्हणजेच त्याचे खरे कार्य ओळखणें होय. युद्ध करावयाचें असेल, तर योद्ध्याला घोड्याची आवश्यकता लागेलच. परंतु, जर घोडा योद्ध्याच्या इच्छेप्रमाणे पूर्णपणे चालणार नाही, तर मात्र त्याला तो एक अडथळाच होईल. त्याचप्रमाणे, **आपल्यांत साठवलेल्या सर्व संभाव्यतां (possibilities) ची प्राप्ति जर आत्म्याला करुन घ्यावयाची असेल, तर आत्म्याला भौतिकाचें अवगुंठन घ्यावें लागतें.** मात्र कधी, आत्म्याच्या आधीन राहाण्याचें नाकारुन, शरीर त्याच्या मार्गातील विघ्न बनूं शकतें. जेव्हा शरीर आत्म्याला वश राहाण्यास तयार असतें, तेव्हा तें या भूतलावर स्वर्ग आणण्याचेंहि साधन बनून, ईश्वरत्वाच्या अभिव्यक्तीचें वाहन बनूं शकतें. आणि जेव्हा अशा रीतीने तें आध्यात्मिक सिद्धीत साहाय्यक बनतें, तेव्हा शरीराला पृथ्वीवरील ईश्वराचें मंदिर म्हणणें यथार्थ ठरेल.

शरीर हे आध्यात्मिक जीवनात विघ्न आहे, असे नाही.

ज्या अर्थी, आत्म्याच्या जीवनाकरिता स्थूल शरीर आणि भौतिक वस्तु उपयुक्त होऊं शकतात, त्या अर्थी, खरी आध्यात्मिकता या गोष्टींबद्दल विरोध अगर वैषम्य बाळगूं शकत नाही. वास्तविक पाहातां, आध्यात्मिकता त्यांच्यात आणि त्यांच्यामधूनच स्वप्रकाशन करण्याचा प्रयत्न करते. यासाठीच पूर्ण मनुष्य सुंदर वस्तु, कलाकृति, विज्ञानशोध आणि राजकारणी

*विज्ञान, कला आणि राजकारण, ही आध्यात्मिक सिद्धीला सहायक होऊं शकतात.*

लोकांचे यश, याकडे तुच्छतेने पाहत नाही. जेव्हा सुंदर वस्तु केवळ अहंकार, मत्सर आणि ग्रहणशील लालसा वाढविण्याची साधनें बनतात, जेव्हा कलाकृतींचा उपयोग अहंभावना व मनुष्याच्या इतर दुर्बल प्रवृत्ति वाढविण्याकडे होतो, आणि विज्ञानाचे शोध परस्पर संहाराचीं साधनें बनतात, तेव्हा सौंदर्य, कला आणि विज्ञान हीं तुच्छ आणि उपहासास्पदच मानली पाहिजेत. आध्यात्मिक दृष्टि नसेल, तर राजनीतिविषयक उत्साह निरंतर सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय गोंधळच माजवील. परंतु या सर्व गोष्टींचे सुयोजकतेने अध्यात्मीकरण होऊं शकतें. सुंदर वस्तु सुचिता, सुख आणि स्फूर्ति, यांचे मूलस्थान बनूं शकतात. कलाकृति लोकांची चेतना उन्नत आणि उदात्त करुं शकतात. विज्ञानांतील शोध मानवतेचीं दुःखें आणि अडचणी, यांपासून मुक्तता मिळवून देऊं शकतात; आणि राजकारणांतील क्रिया अखिल मानवजातींत खरी विश्वबंधुता स्थापन करुं शकते. तेव्हा, **ऐहिक अगर भौतिक क्षेत्रास विमुख होणें, म्हणजे आत्म्याचें जीवन नसून, दैवी कार्यांत त्यांचा उपयोग करुन घेणें, हे आहे; आणि त्यामुळे, आध्यात्मिक पूर्णता प्रत्येकाच्या टप्प्यांत येऊन, सर्वांस प्रीति, शांति, सुख आणि सौंदर्य, यांचा लाभ होऊं शकतो.**

*अनासक्ति म्हणजे उदासीनता नव्हे.*

तथापि, जो हें आत्म्याचें जीवन जगेल, त्याने भौतिक जगतांत राहूनहि व त्यांच्याविषयी उदासीनता किंवा बेफिकिरी न बाळगतां, त्याबद्दल अनासक्त राहिलें पाहिजें. अनासक्ति म्हणजे गुणग्रहणशीलतेचा अभाव, अशी गैरसमजूतहि करुन घेऊं नये. वस्तूंची ससारता आणि असारता, यांचा यथोचित मूल्यनिर्णय अनासक्तीमध्ये साधूं शकतो, इतकेंच नव्हे, तर तो केवळ अनासक्तीमध्येच साध्य होतो. वासना भ्रम उत्पन्न करते, आणि योग्य दृष्टिकोण साधूं देत नाही. ती मनाला घेरुन टाकून आसक्ति वाढविते, आणि बाह्य वस्तूंवरील अवलंबन कायम करते. परंतु, अनासक्ति ही योग्य दृष्टिकोण मिळवून देऊन, चेतनेला बाह्य वस्तूंवर व भौतिक जगतावर अवलंबून न ठेवतां, त्यांचें खरें मोल समजून घेण्यास मदत करते. वस्तूंचे खरें महत्त्व ओळखणें, म्हणजे त्या एकाच जीवनाच्या अभिव्यक्तीचे भाग आहेत, हे समजणें; आणि त्यांच्या दृश्यमान आवरणामधून त्यांचे सत्यस्वरुप पाहाणें, म्हणजे वस्तूंची कल्पित पृथकता आणि स्वतंत्रपणा, यांच्या भ्रमाच्या भूतापासून स्वतःस मुक्त करुन घेणें होय. याप्रमाणे, **आसक्तिरहित सर्वसमावेशकता आणि बंधरहित गुणग्रहणशीलता, हेंच आत्म्याचें जीवन (life of the spirit) आहे.** आध्यात्मिक जीवन विधायक स्वतंत्रते (positive freedom) चें जीवन आहे. आत्म्याचें वस्तुजगतांत प्रविष्ट होणे व तसेंच आपला अधिकार कायम ठेवून वस्तुजगद्द्वारां प्रकट होणे, हीच आध्यात्मिक स्वतंत्रता होय.



*आध्यात्मिकतेमध्ये सर्व गोष्टींचा समावेश होतो.*

जोपर्यंत या पार्थिव सत्तेंतील वस्तु आणि घटना सर्वग्राही (comprehensive) आध्यात्मिकतेच्या विशाल भरतीच्या उत्तुंग वीचिप्रवाहांत सापडल्या नाहीत, तोंवरच त्या परक्या (foreign) भासतात. परंतु, एकदा त्यांना जीवनाच्या योजनेंतील स्वतःचें स्थान मिळालें, की प्रत्येक वस्तु सृष्टीच्या तालस्वरमय संगीतांत तन्मयतेने भाग घेत असल्याचें, आढळून येतें. असें झालें, म्हणजे आध्यात्मिकतेच्या अभिव्यक्तीला दुसरें कोणतें तरी निराळें क्षेत्र आवश्यक भासत नाही. त्याचप्रमाणे, लोकांच्या शारीरिक, बौद्धिक आणि भावनाविषयक साधारण गरजांची आस्था ठेवल्याने आध्यात्मिकतेची अधोगतीहि होत नाही. **आत्म्याचें जीवन एकतामय व स्वयंपूर्ण जीवन आहे. विशिष्ट आणि संबंधरहित क्षेत्रांत सीमित राहणें त्याला सम्मत नाही.**

*ईश्वरी प्रेम हे परिस्थितीमध्ये प्रचंड व रचनात्मक फरक घडवून आणते.*

आत्म्याचें जीवन हें आध्यात्मिक ज्ञान आणि दैवी प्रेम, यांची अविरत अभिव्यक्ति आहे. ईश्वराची ही दोनहि अंगे सर्वव्यापकतें (universality) त अनिरुद्ध आणि समावेशकते (inclusive) मध्ये अनिवार्य आहेत. तेव्हा, दिव्य प्रेम व्यक्त होण्याकरिता, एखाद्या विशिष्ट प्रसंगाचीच अपेक्षा नसते. ते आपल्या अभिव्यक्तीसाठी कांही खास क्षणांची वाट पाहत नाही, किंवा विशेष रुपाने उदात्त अशा गंभीर परिस्थितीच्या शोधांत राहत नाही. एखाद्या अविवेकी माणसाला महत्त्वहीन आणि उपेक्षणीय वाटून त्याच्याकडून कदाचित दुर्लक्षिल्या जातील, अशा घटनांत व परिस्थितींमध्येहि, दैवी प्रेमाला स्वतःच्या अभिव्यक्तींचे क्षेत्र सापडतें. साधारण मनुष्याचें प्रेम योग्य परिस्थिति असेल, तरच व्यक्त केलें जातें; तें प्रेम कांही खास परिस्थितीला प्रत्युत्तर म्हणून केले जातें आणि त्या परिस्थितीशीं सापेक्ष असतें. परंतु, **अंतरातून प्रस्फुटित होणाऱ्या ईश्वरी प्रेमाला बाह्य परिस्थितीची उत्तेजना लागत नाही.** म्हणुन, ज्यांनी केवळ मानवी प्रीतीच चाखली आहे, त्यांना अग्राह्य वाटणाऱ्या परिस्थितींत देखील, दैवी, प्रेम निःसृत होऊं शकते. सद्‌गुरुच्या निकटवर्तीयांपैकी जर कोणांत आनंद, सौंदर्य, चांगुलपणा इत्यादींचा अभाव दिसला, तर आपल्या दिव्य प्रीतीचा त्यांच्यावर वर्षाव करण्याकरता आणि आध्यात्मिक अगर भौतिक दारिद्र्यांतून त्यांना मुक्त करण्याकरता, सद्‌गुरुला ही सुसंधीच सापडते. म्हणून, भौतिक जगतांतील परिस्थितीला त्याचें दैनंदिन प्रत्युतर म्हणजेच त्याच्या रचनात्मक आणि विधायक व गतिशील ईश्वरत्वा (dynamic and creative divinity) ची अभिव्यक्ती होय. ती सर्व जगतावर आपला प्रसार करते; आणि ज्यांना ती स्पर्श करते त्या सर्वांना ती आध्यात्मिक बनविते.

आध्यात्मिक ज्ञान आत्म्याच्या जीवनाचा दुसरा पूरक भाग आहे; आणि संसारी दृष्टीचें तारतम्य (wordly wisdom) आणि आध्यात्मिक समजूतदारपणा (spiritual un

सेवेचें मोल ती किती कल्याणप्रद होते, यावर अवलंबून असतें. दुसऱ्याच्या शारीरिक गरजा भागविणें ही सेवा आहे; दुसऱ्यांची बुद्धि विकसित करणें ही सेवा आहे; लोकांची हृदयाची भूक भागविणें ही सेवा आहे; व समाजाची सौंदर्यपिपासा तृप्त करणें ही सेवा आहे. परंतु, हे सारे सेवेचे प्रकार सारख्याच निःस्वार्थीपणाने केले असले, तरी एकाच मोलाचे होत नाहीत. सेवेच्या द्वारां कोणत्या प्रकारचें हित उद्दिष्ट राहील, हें मनुष्याच्या दृष्टिकोणावर अवलंबून राहील; आणि **ज्याला अंतिम आणि परम कल्याणाविषयीं निर्मल दृष्टी प्राप्त झाली आहे, तोच महत्त्वाची आणि अमोल सेवा करुं शकेल.** ज्यांना तें अंतिम सत्य सापडलें नाही, त्यांना या प्रकारची उच्चतम सेवा करणें अशक्य आहे. त्यांच्या सेवेला आध्यात्मिक ज्ञानाच्या परासीमेस पोहोचलेल्या लोकांच्या सेवेइतकें मोल येणें शक्य नाही. एका अर्थाने, खऱ्या सेवेला सत्यानुभूतीनंतरच प्रारंभ होतो.

सत्यानुभूतीनंतरच खऱ्या सेवेस प्रारंभ होतो.

परंतु साधकांच्या आणि इतर सज्जनांच्या अंतःकरणांतील सेवावृत्तीचा निर्मितिक्षम विनिर्देश करुन त्या वृत्तीला सद्‌गुरुच्या कार्यानुकूल बनविली, तर तिचा आध्यात्मिक उद्दिष्टांकरिता उपयोग होऊं शकतो. सद्‌गुरु आपल्या अनन्त चेतनेच्या निश्चयात्मक स्थितींत अखिल विश्वाची सेवा करतो; आणि जे सद्‌गुरुची सेवा करतात, तेहि या जागतिक कार्यात त्यास मदत करतात. त्यांच्या सेवेला सद्‌गुरुंचें ज्ञान आणि अन्तःप्रज्ञा यांची जोड असते. सद्‌गुरुंच्या कार्यात स्वखुषीने भाग घेण्याने सेवेचें मोल वाढतें, एवढेंच नव्हे तर आध्यात्मिक विकसनाची संधीहि वाढते. **श्रेष्ठत्वाच्या दृष्टीने पाहातां, सद्‌गुरुच्या आज्ञेने जी सेवा केली जाते, तिचें मोल फक्त प्रत्यक्ष सद्‌गुरुने केलेल्या सेवेलाच दुय्यम ठरतें.**

सद्‌गुरुंच्या सेवेमुळे प्रबुद्धावस्था सुलभ होते.

बहुतेक लोकांची सेवेची कल्पना जगताच्या कर्मक्षेत्रांतील कोणत्या तरी निश्चित स्वरुपाच्या इष्ट फलप्राप्तीच्या कल्पनेशीं अविभाज्य रीतीने गुंतलेली असते. म्हणून, केवळ मानवी दुःखांचें निवारण करणे, निरक्षरता दूर करणें, किंवा वैयक्तिक अगर सामाजिक जीवनास खुरटविणाऱ्या अडचणी आणि गैरसोयी दूर करणें म्हणजेंच सेवा होय, असें त्यांना वाटतें. साधक, राजकारणी लोक, समाजसुधारक आणि इतर सज्जन, यांच्या सेवेचा हाच प्रकार असतो. या सेवेला आध्यात्मिक महत्त्व बरेंच असलें, तरी अशी सेवा स्वभावतःच अंतरहित असते. या क्षेत्रांत, एखाद्या मनुष्याने कितीहि मिळविलें, तरी आणखी मिळवायचें, असें कितीतरी रहातेंच. म्हणून सेवावृत्ति जोंवर फलप्राप्तीच्या कल्पनेशी संबद्ध आहे, तोंवर त्या सेवावृत्तीमध्ये अपूर्णत्वाची जाणीवहि राहाणारच, **कधीहि न संपणाऱ्या परिणामांच्या मागे लागून, अनंततेची अनुभूति कधीच प्राप्त होणार नाही.** सेवेच्या द्वारां कांही निश्चित फळ मिळविण्याची इच्छा करणारांच्या अंतःकरणांवर त्याचें एक नित्याचें ओझें होऊन बसतें.

सेवा फलासक्तीपासनू अलिप्त असली पाहिजे.

# ४ : निःस्वार्थ सेवा

कर्मयोगी हा स्वार्थजनित अस्ताव्यस्त क्रियाशीलता टाळतो; व त्याचप्रमाणे, नितान्त निरिच्छाजनित दृश्यमान क्रियाशून्यताहि टाळतो. तो जिच्यांत स्वार्थपर हेतूंची थोडीहि भेसळ नाही, अशा निःस्वार्थ सेवेचें जीवन घालवितो; आणि जीवनाच्या सर्व कलमांमध्ये (phases) तो ईश्वरत्वाची अभिव्यक्ति करतो.

कर्मयोगी हा अस्ताव्यस्त क्रिया व त्याचप्रमाणे क्रियाशून्यता दूर ठेवतो.

सेवा जरी निःस्वार्थी असली, तरी ती आध्यात्मिक ज्ञानानेंच निर्दिष्ट झाली पाहिजे. **अज्ञानमूलक अबुद्ध सेवेपासून बहुधा घोटाळा, गुंतागुंत व जटिलता** (complication) **उत्पन्न होते.** सामाजिक संस्थांमध्ये, पुष्कळसे चांगले लोक सार्वजनिक कार्यात अविरत गुंतलेले असतात. परंतु त्या कार्याचा शेवट पुढे काय होतो? त्या कार्याने एक प्रश्न सुटला, तरी त्यामुळेच अदृष्टपूर्व आणि ज्यांवर आपली सत्ता चालत नाही, असे दहा समस्यारुप उपपरिणाम उद्‌भवतात. सामान्य जगांतील माणसें वाईटाचा प्रतिकार त्याला विरोध करुन करतात; परंतु हें करतांना दुसऱ्या एखाद्या वाईटाचे ते जन्मदाते बनतात, हे त्यांना समजत नाही. समजा, एका माणसाच्या अंगावर खूपशा मुंग्या चढल्या आहेत, आणि त्यांतली एक त्याला चावली, तर साहजिकच तिला मारुन तिचें शासन त्याला करावेसें वाटेल. परंतु असें करतांना, जर तो त्या मुंगीला आपल्या हाताने मारु लागला, तर ज्या त्याला चावल्या नाहीत, अतएव निरपराधी आहेत, अशाहि कित्येक मुंग्यांना तो मारील. म्हणून, एका मुंगीविरुद्ध न्याय मिळवितांना, दुसऱ्या कित्येक मुंग्यांविरुध्द अन्याय करण्याच्या क्रियेंत तो ओढला जातो, निःस्वार्थ सेवेच्या कलेमध्ये प्रवीण न बनतां, जो-मनाच्या उदारतेने कां होईना-सामाजिक कार्याच्या आवर्तींत सापडतो, त्याची उपरनिर्दिष्ट उदाहरणांतील मनुष्याप्रमाणेच स्थिति होते. तो कितीहि निःस्वार्थी असला,

अबुद्ध सेवेमुळे घोटाळा आणि जटिलता उत्पन्न होते.

तरी त्याच्या क्रियेपासून सुसंविदता किंवा सुसंगत व्यवस्था (harmony) उत्पन्न होण्याऐवजी घोटाळा, अस्ताव्यस्तता आणि गुंतागुंतच उत्पन्न होते. कारण, गुंतागुंत न करतां, खरी परिणामकारक सेवा कशी करावी, हें तो शिकलेला नसतो. **कोणतीहि क्रिया विश्वाला केवळ वरदानच ठरण्याकरता, तिचा उद्भव जीवनाच्या अत्युत्कृष्ट ज्ञानांतूनच झाला पाहिजे.** जे माझ्या सान्निध्यांत येतात, त्यांनी जीवनाचें खरें ज्ञान करुन घेतलें पाहिजे. गुंतागुंत उत्पन्न करणार नाही, अशा प्रकारची सेवा करण्याची सवय त्यांनी स्वत:स लावली पाहिजे.

जेव्हा नि:स्वार्थ सेवा केली जाते, तेव्हा ती कोणत्याहि परिणामाच्या अगर बक्षिसाच्या आशेने अगर बुद्धीने केलेली नसली, तरी त्या सेवेचें फल कर्मयोग्याला मिळतेंच. त्याने अबुद्धपणे (unintelligently) जरी एखादें नि:स्वार्थ सेवाकृत्य केलें, तर त्यापासून देखील, त्याला थोडाफार आध्यात्मिक फायदा होतोच. परंतु, त्याच्या अबुद्ध क्रियेपासून इतरांना होणारें निष्कारण दु:ख त्याला टाळतां येत नाही. तथापि जेव्हा त्याच्या स्वार्थरहित सेवेला ज्ञानाची बैठक असते, तेव्हा त्याला स्वत:ला तर त्यापासून आध्यात्मिक फायदा होतोच, परंतु त्या क्रियेशीं ज्या ज्या लोकांचा संबंध आला असेल, त्या सर्वाचें तो भौतिक आणि आध्यात्मिक कल्याणहि करतो. म्हणून, स्वार्थरहित सेवाहि, तत्संबंधी सर्व लोकांना निर्भेळ वरदान होण्याकरिता, ज्ञानावरच अधिष्ठित असली पाहिजे.

नि:स्वार्थ सेवा ज्ञानावरच अधिष्ठित असली पाहिजे.

कित्येक वेळा, सामान्य लोकांना जी सेवा म्हणून वाटते, ती विशेष परिस्थितींत, सद्गुरुच्या दृष्टीने हानिप्रद ठरण्याचा संभव असतो. सद्गुरुला परिस्थितींचें अचूक ज्ञान असतें; आणि त्याला तिच्या आध्यात्मिक गरजांचेहि गंभीर आकलन झालेलें असतें.

वरपांगी व दिखाऊ सेवा कधी कधी वस्तुत: हानिकारकच असूं शकते.

सामान्यत:, भुकेल्यांना अन्न देणें ही अपरिहार्य आणि आवश्यक सेवा होत असली, तरी कांही विशिष्ट परिस्थितींत त्याच्या कल्याणाच्या दृष्टीनेच, भुकेलेल्याला अन्न न देणें हेंच योग्य ठरेल. दान म्हणून अन्नासाठी भीक मागण्याची प्रवृत्ति अनावश्यक आणि अस्पृहणीय संस्कार उत्पन्न करते; आणि अशा प्रवृत्तीने जो मनुष्य तुमच्याकडे येतो, त्याला भीक देऊन त्याचें ते संस्कारांचें ओझें वाढवावयाला तुम्ही मदत करता. म्हणून, जरी वरवरच्या दृष्टीला तुम्ही त्याचें चांगले करीत आहां, असें वाटलें, तरी वास्तविक पाहतां, तुम्ही त्याला अधिकच बंधनांत टाकीत असतां, आणि जेव्हा तुम्ही समजूतदारपणाने अगर ज्ञानाने नव्हें, तर केवळ संवयीने, आपली दानशीलता दाखवितां, तेव्हा त्या दान मागणाऱ्याला आपल्या उपकाराच्या ओझ्याखाली चिरडून टाकण्याची तुमची इच्छा नसली, तरी तुमच्या क्रियेचा वास्तविक परिणाम तसाच होईल.



वरील अन्नदानाच्या उदाहरणास जें लागूं आहे, तेंच इतर अनेक स्थावर आणि जंगम वस्तूंच्या दानासंबंधी म्हणतां येईल. **संकुचित दृष्टीने पाहतां, एखादी गोष्ट दुसऱ्याची सेवाच वाटली, तरी उच्चतर दृष्टीने तीच गोष्ट त्याच्याकरिता खात्रीपूर्वक हानिकारक ठरुं शकेल.** ज्याप्रमाणे निरोगी मनुष्याला जें अन्न पौष्टिक असेल, तेंच रोगी माणसाच्या दृष्टीने विषान्न ठरण्याची संभव आहे. तद्वत् लोकांना जें सामान्यत: चांगलें असतें, तें एखाद्या विशिष्ट मनुष्याच्या बाबतींत वाईट ठरण्याचा संभव असतो. म्हणून सुबुद्ध (intelligent) दानासाठी, परिस्थितीच्या आध्यात्मिक गरजांचे चांगले ज्ञान हवें.

सारांश, लोकांनी सेवा करण्याच्या बाबतींत अधिक सावधान आणि विवेकपूर्ण व्हावें, परंतु त्यांनी नि:स्वार्थी सेवा करण्यांत निरुत्साही होऊं नये. परिस्थितीच्या आध्यात्मिक गरजा सद्गुरुलाच अचूक आकलन करतां येतात, हे खरें. परंतु, ज्यांना हे आकलनसामर्थ्य स्वत:मध्ये असल्याची खात्री नाही, त्यांनी जर आपल्याकडून न कळत कुसेवा (disservice) घडेल या भीतीने, आपली नि:स्वार्थ सेवा करण्याची स्वयंस्फूर्त प्रेरणा दडपून टाकली, तर ती परिस्थिति कीव करण्याजोगी होईल. हे आधीच दाखविल्या गेलें आहे की, **नि:स्वार्थी सेवा जरी अबुद्धपणे (unintelligently) घडली, तरी तिचादेखील आध्यात्मिक लाभ होतोच.**

आध्यात्मिक दृष्टीने पाहतां, परिस्थितीच्या आध्यात्मिक गरजांचे योग्य आकलन करण्यामध्ये चूक होण्यापेक्षा, सेवेमध्ये चुकीचे हेतू (false motives) येण्याचाच धोका अधिक असतो. **जर तुम्ही दुसऱ्यावर उपकार करण्याकरिता सेवा केली असेल, आणि ती केल्याबद्दल तुम्हाला अभिमान वाटत असेल, तर तुम्ही केवल तुमची सेवा ग्रहण करणाराचेंच आध्यात्मिक नुकसान करता, असें नसून स्वत:चीहि हानी करुन घेता. सेवा करतांना, तिच्यामध्ये रममाण होऊन तुम्हाला त्यांत अभिमान वाटत असेल, तर तुमच्या कार्याबद्दल तुम्हाला आसक्ति उत्पन्न होऊन, तुम्ही स्वत:ला बंधनांतच टाकीत आहांत.** एखादा मनुष्य ज्याप्रमाणे स्वत:स लोखंडाच्या साखळीने बांधून घेऊं शकतो व सुवर्णशृंखलेनेहि बांधून घेऊं शकतो, त्याचप्रमाणे तो आपल्या दुष्कृत्यांवरील आसक्तीने व सत्कृत्याबद्दलच्याहि आसक्तीने स्वत:स बांधून टाकूं शकतो. म्हणून, कर्मबंधापासून मुक्त राहण्याचा उपाय म्हणजे सेवेमध्ये अनासक्त राहाणें, हाच आहे. सेवा करतांना 'मी कोणावर तरी उपकार करीत आहे,' हा विचार प्रथम मनांत येतो. परंतु 'सेवेची ही संधि मिळाल्याने माझ्यावरच उपकार होत आहे', या प्रतिविचारानें प्रथमचा विचार नाहीसा करतां येतो. या प्रतिविचाराने अनासक्तीची प्रवृत्ति वाढविणें सोपें होऊन, सत्क्रियांच्यामुळे उत्पन्न होणाऱ्या बंधनापासून मुक्तता होते. तेव्हा, व्यापक ज्ञानाने प्रकाशित झालेली सेवा नि:स्वार्थी असते, एवढेंच नव्हे तर ती सेवापात्राच्या आध्यात्मिक गरजांनुसार असते; व ती सेवा पूर्णपणें अनासक्त राहून केली जाते. अशा सेवेनेच साधक आपल्या ध्येयाकडे द्रुतगतीने अग्रसर होतो.

सेवा पूर्ण अनासक्तीने केली पाहिजे.

पण त्याचा दुसऱ्या अंकाशीं योग झाला, म्हणजे त्यांतून महत्त्वपूर्ण अनेकत्ववाचक संख्या उत्पन्न होते. त्याचप्रमाणे, जेव्हा 'असत्' (nothing) चा 'सत्' शी योग होतो, तेव्हा हें नानाविध व विकासशील विश्व उत्पन्न होतें.

सर्व उत्क्रांति कल्पनेच्या साम्राज्यांतच होत असते. जेव्हा सद्वस्तूंत कल्पित चंचलता उत्पन्न होते, तेव्हा जाणिवेची अलग अलग केंद्रें असणारें हें अनेकविध जग निर्माण होतें;

'मी' व त्याची परिस्थिति, ह्यामधील कल्पित भेदामुळे विकासशील द्वैताचा उदय होतो.

व त्यामुळे 'अहम्' व 'अनहम्', किंवा 'मी' व परिस्थिति, हा जीवनाचा मूलभूत भेद उत्पन्न होतो. परंतु, हा मर्यादित 'मी' अविभाज्य संपूर्णतेचा केवळ कल्पित अंश असून स्वत: अपूर्ण व मिथ्या असल्यामुळे, जाणीव त्याच्याशी नेहमीकरिता एकत्व पावूं शकत नाही व अस्वस्थ होते; व 'अनहम्' किंवा अनात्म वस्तूंशी (not-self) तादात्म्यतेचें नातें जोडण्याकरिता, जाणिवेंत निरंतर व्याकुलता सुरुं होते. परिस्थितीच्या ज्या भागाशीं आत्मीयता निर्मार करण्यास जाणिवेला यश मिळतें, तो भाग 'माझे' या संबंधाने 'मी' शी संबद्ध होतो; व 'अनहम्' च्या ज्या भागाशीं आत्मीयता उत्पन्न करण्याचा जाणिवेचा प्रयत्न विफल होतो, तो भाग 'मी' त मर्यादित करुन त्याला विरोध करणारी अपरिहार्य परिस्थिति बनतो.

अशा रीतीने, बंधनांत टाकणाऱ्या द्वैताचा अंत न करतां, जाणीव त्या द्वैताचें फक्त **रुपांतर** करते. जोंपर्यंत जाणिवेवर दूषित कल्पनेचा प्रभाव असतो, तोंपर्यंत तिला द्वैतातीत होण्यांत

द्वंद्वांदोलन.

यश मिळत नाही; व 'अनहम्' किंवा परिस्थितीस आत्मसात् करण्याचे जे जे नानाविध प्रयत्न जाणीव करते, त्यांतून मूलद्वैताच्या जागीं त्याचीच नवीन असंख्य रुपें निर्माण होतात. परिस्थितीच्या कांही भागांचा स्वीकार किंवा तिरस्कार करणें क्रमश: इच्छा व घृणा या रुपांनी व्यक्त होतो; व या रीतीनें, सुख व दु:ख, चांगलें व वाईट, या द्वंद्वांची उत्पत्ति होते. परंतु, इच्छा किंवा घृणा यांनी द्वैताचा अंत न होतां, जाणीव द्वंद्वांच्या दोन परस्पर विरुद्ध टोकांमध्ये निरंतर व पर्यायाने झोके खात राहते. व्यक्ति जीवनाच्या सर्व इतिहासामध्यें, हे द्वंद्वांमधील जाणिवेचें आंदोलन सतत चालूंच असतें.

व्यक्तिजीवनाचा विकास अनेक जन्मांत गोळा झालेल्या संस्कारांनी निश्चित होत असतो; व हा सर्व कल्पनासृष्टींतील खेळ असला, तरी त्यांतील संस्कारजन्य नियति (determinism) यंत्रसम व अपवादरहित असते. क्षणकाल टिकणाऱ्या कृती व अनुभवहि मनोदेहावर ठसे उमटवितात. ह्या ठश्यांमुळे मनोदेहांत एकच व तोच राहत असल्याने, व्यक्तीचें संचित संस्कारहि अनेक जन्मांत टिकून राहतात. हे संचित संस्कार जेव्हा मनोदेहांत केवळ सुप्त स्थितींत न राहतां, व्यक्त होऊं लागतात, तेव्हा ते वासनांच्या रुपाने मानसिक अनुभवांत येतात. संस्कारांच्या दोन अवस्था आहेत. एक निष्क्रिय व सुप्त अवस्था, व दुसरी सक्रिय अभिव्यक्तीची अवस्था. मर्यादित 'मी' चे सर्व अनुभव व क्रिया गोळा झालेल्या व उदयास येत असलेल्या (active)



**उलटपक्षी, अंतिम सत्याच्या ज्ञानानंतर होणारी सेवा ही 'मी'(self) च्या खऱ्या स्वरुपाच्या अध्यात्मज्ञानाची स्वयंस्फूर्त अभिव्यक्ति आहे.** त्या सेवेमुळेहि जगतांत अत्यंत महत्त्वाचे परिणाम घडून येतात. परंतु त्या सेवेमध्ये परिणामांच्या आशेची गुंतागुंत नसते.

ईश्वरानुभूती नंतरची सेवा आणि ईश्वरानुभूतीच्या पूर्वीची सेवा यांत फार अंतर आहे.

ज्याप्रमाणे सूर्य प्रकाशतो, तो आपला स्वभाव म्हणून प्रकाशतो, त्याला त्यांतून कांही मिळवायचें असतें, हाणून तो प्रकाशतो असें नव्हे, त्याचप्रमाणे, ईश्वरप्राप्त मनुष्य आत्मसमर्पणाचें जीवन घालवितो, ते फलाशेने नव्हे, तर अंतिम सत्यांत गर्भित असलेल्या दिव्य जीवनाचा तो मूळ स्वभावच आहे. त्याचें जीवन म्हणजे कांही तरी मिळविण्याच्या आशेने केलेली बाह्य धडपड नव्हे. **फलप्राप्तीने समृद्ध आणि संपन्न होण्याची धडपड तो करीत नाही; कारण अनन्ततेच्या अनुभूतीने त्याच्यांत परिपूर्णता आधीच अधिष्ठित झालेली असते.** त्याच्या सत्ताविस्तारा (being) ची अजस्र भरती त्याच्याच इतर जीवरुपांना हितकर होते; आणि तो इतरांची भौतिक आणि आध्यात्मिक स्वरुपाची खरी उन्नति करतो. परंतु त्याचा स्वत:चा आनंद त्याच्या अंतरंगातील ईश्वरत्वावर अधिष्ठित असतो; व म्हणून, वस्तुत: त्याची रुपें असलेल्या इतर लोकांच्या अपूर्णत्वामुळे अगर दु:खामुळे त्याचा तो आनंद कमी होत नाही, अंतिम सत्यानुभूतीपूर्वीची सेवा आणि त्या नंतरची सेवा, यांत आकाशपाताळाचें अंतर आहे. सद्गुरुचें जीवन हें सेवेचें जीवन आहे; त्याचीच दुसरी स्वरुपें असलेल्या इतर जीवांकरिता, सद्गुरुचें चरित्र हें नित्य – वरदान आहे. परंतु सत्यानुभूति झालेल्या मनुष्याच्या जीवनाची स्वभाव बनलेली अशा प्रकारची सेवा सत्यानुभूति नसलेल्या लोकांच्या जीवनांतील सेवेपेक्षा अवश्यमेव निराळी आणि श्रेष्ठतम असते.

# ५ : सृष्टीचा प्रारंभ व अंत

जोपर्यंत मानवी मनास अंतिम सद्वस्तूचा प्रत्यक्ष व यथार्थ प्रत्यक्ष व यथार्थ अनुभव येत नाही, तोंपर्यंत सृष्टीचा आदि व अंत स्पष्ट करण्याचा त्याचा प्रत्येक प्रयत्न विफल होतो.

कोठून? व कोठे?

त्याच्याकरिता, भूतकाल गूढ रहस्याने वेष्टित राहून, भविष्यकाल हा मोहरबंद पुस्तकासारखा पूर्णपणें अगम्य असतो. मायामोहास विवश झालेलें मानवी मन विश्वाच्या पुरातन व भावी स्थितीबद्दल फार तर तर्क किंवा काल्पनिक अंदाज बांधू शकतें. परंतु त्यास या सर्व बाबतींतील अज्ञानहि समाधानकारक वाटत नाही; व त्यांचे यथार्थ व अंतिम ज्ञान मिळविण्यासहि तें असमर्थ ठरतें. 'कोठून? व कोठे?' हे दोन चिरस्थायी व तीक्ष्ण प्रश्न मानवी मनांत दिव्य (divine) व्यग्रता निर्माण करतात.

सृष्टीचे आदिकारण शोधीत असतां, मानवी मनास असीम पुच्छगति (infinite regress) अग्राह्य होते; व त्याचप्रमाणे त्याला ध्येयशून्य व अंतरहित परिवर्तनहि अग्राह्य असतें. उत्क्रान्तीला

आदि व अंत.

मूलकारण नसेल, तर ती अज्ञेय होते; व उत्क्रांतीला समाप्ति नसेल, तर ती पूर्णपणें दिशारहित व अर्थशून्य होते. 'कोठून? व कोठे?' या प्रश्नांतच सृष्टीचा आदि व अंत गृहीत धरलेला आहे. **उत्क्रांतीचा प्रारंभ हा कालाचाहि प्रारंभ आहे; व उत्क्रांतीचा शेवट हा कालाचाहि शेवट आहे.** उत्क्रान्तीला आदि व अंत आहे; कारण कालाला आदि अंत आहे.

या बदलणाऱ्या जगाच्या आदि व अंतामध्ये बरीचशी युगचक्रें (cycles) आहेत; व त्या सर्व युगचक्रांतून सृष्टीच्या उत्क्रांतीचें सातत्य (continuity) कायम राहतें. उत्क्रांतीच्या खऱ्या

महाप्रलय

समाप्तीला महाप्रलय म्हणतात; व त्यावेळीं, जगाला प्रारंभीची नसणेपणाची शून्यस्थिति प्राप्त होते. महाप्रलयाची मनुष्याच्या गाढ निद्रेशी तुलना करतां येईल. अनुभवास येणारें नानाविध विश्व जसें गाढ निद्रेमध्ये पूर्णपणे अंतर्धान पावतें, त्याचप्रमाणे मायानिर्मित सृष्टीतील अखिल वस्तुजात महाप्रलयाच्या वेळी नाहीसें



होऊन, शून्यस्वरुप बनतें–जणु काय तें विश्व कधीच उत्पन्न झालें नव्हतें !

परंतु वास्तविक पाहातां, उत्क्रांतीच्या अवस्थेंत सुद्धा, हें अखिल विश्व केवळ कल्पनेचा आभासच आहे. वस्तुत:, सद्वस्तु ही एकच अविभाज्य व अनंत असून तिला आदि किंवा अंत

सत्य कालातीत व केवळ आहे.

नाही. ह्या कालातीत सत्याच्या दृष्टीने, सर्व कालप्रवाह हा केवळ कल्पना किंवा मनोभास असून, पूर्वी होऊन गेलेल्या लक्षावधि वर्षांना व पुढे येणाऱ्या लक्षावधि वर्षांना एका क्षणाचेंहि वास्तविक महत्त्व नाही – जणु काय या सर्वांना कधी अस्तित्वच नव्हतें !

तेव्हा, नानाविध व विकासशील विश्व हा सद्वस्तूंतून निर्माण होणारा खरा परिणाम नाही. तो जर सद्वस्तूचा खरा परिणाम मानला, तर सद्वस्तू एक तर सापेक्ष वस्तु होईल, किंवा मिश्र वस्तु होईल. परंतु, सद्वस्तु या दोहोंपैकी एकहि नाही. अंतिम सत्य एकमेव व केवल आहे.

एकमेव सद्वस्तूमध्ये सर्व अस्तित्वाचा समावेश होतो. ती सद्वस्तूच सर्व कांही आहे, पण तिला शून्य (nothing) रुपी छाया आहे. सर्वसमावेशक (all-inclusive) अस्तित्वाच्या बाहेर दुसरी कोणतीहि खरी वस्तु राहूं शकत नाही. परंतु, जेव्हा तुम्ही अस्तित्वाच्या कल्पनेचें विश्लेषण

सद्वस्तु व शून्य

करतां, तेव्हा त्यांतून, अर्थबोधाकरिता, नसणेपणाची किंवा शून्याची कल्पना उत्पन्न होते. 'असत्' किंवा शून्याच्या कल्पनेमुळे तुम्हाला 'सत्' ची कल्पना स्पष्टपणे विशद करण्यास मदत होते. याप्रमाणे, **'सत्' चा किंवा अस्तित्वाचा 'असत्' किंवा शून्य हा परिपूरक भाग आहे.** परंतु शून्याला स्वत:चेंच निराळें व स्वतंत्र अस्तित्व मानतां येत नाही. स्वयमेव (in itself) तें कांहीच नाही; व तें स्वयमेव कशाचेंहि कारण होऊं शकत नाही. हें नानाविध व परिवर्तनशील विश्व केवळ शून्यांतून उत्पन्न होणें शक्य नाही; व तसेंच ते एकमेव सत्यांतूनहि उत्पन्न होणें शक्य नाही, हेंहि स्पष्ट आहे. तेव्हा या नानाविध व विकासशील विश्वाच्या उत्पत्तीचें कारण या दोहोंच्या संयोगांत आहे.

सद्वस्तु व शून्य, यांच्या संयोगांतून या नानाविध व विकासशील विश्वाचा उदय होतो. जेव्हा 'असत्' किंवा शून्य एकमेव सद्वस्तूच्या पार्श्वभूमीवर पाहिलें जातें, तेव्हा विश्वाची उत्पत्ति होते. परंतु, विश्व कांही अंशी सद्वस्तूंतून उत्पन्न होतें, किंवा त्यात थोडा सत्यांश आहे, असा

सद्वस्तु व विश्व.

याचा अर्थ नाही. विश्वाचें अस्तित्व असल्याचा केवळ भास मात्र होतो; व या भासमान अस्तित्वाच्या मुळाशीं शून्याच्या पाठीमागे असणारी एकमेव सद्वस्तु आहे. **एकमेव सद्वस्तूंत जेव्हा शून्याची भर पडते, तेव्हा हे नानाविध व विकासशील विश्व उत्पन्न होतें.**

परंतु त्यामुळे, एकमेव, अनंत व केवल सत्यामध्ये कोणताहि बदल होत नाही. तें केवल सत्य न्यूनाधिक होऊं शकत नाही. तें होतें तेंच स्वयंपूर्ण व स्वयंभू असें कायम राहून, 'असत्' मधून उत्पन्न होणाऱ्या सृष्टीशीं त्याचा कांहीहि संबंध राहत नाही; व तें सदैव निर्लेप राहतें, 'असत्' चें गणितशास्त्रांतील शून्याशीं साम्य आहे. त्याला स्वत:ची कांहीहि किंमत नाही.

आवरणामधून नेले, तर त्या शिष्याला उल्लंघित भूमिकांची जाणीव राहत नाही; व सहाव्या भूमिकेपर्यंत इच्छा राहतात. पण जर त्याने शिष्याला उघड्या डोळ्यांनी नेले, तर त्याला उल्लंघित भूमिकांची जाणीव राहते; व पांचव्या भूमिकेनंतर इच्छा राहत नाही. सद्गुरु जर एखाद्या विशिष्ट कार्याकरिता आला असेल, तर तो बहुधा शिष्यांना आवरणांतूनच नेतो; कारण, उघडे डोळे असणाऱ्या शिष्यापेक्षां डोळ्यांवर आवरण असलेला शिष्य बहुधा अधिक कार्यक्षम असण्याचा संभव असतो.

भूमिकांचे उल्लंघन होत असतांना संस्कार उकलले जातात. **संस्कारांचे उकलणें व ते खर्च होऊन जाणें, या दोहोंमधील फरक काळजीपूर्वक ध्यानांत ठेवला पाहिजे.** संस्कारांचा व्यय होत असतांना ते गतिमान होऊन कृतींत किंवा अनुभवांत उतरतात. ह्यामुळे संस्कारापासून विमोचन न होतां, नवीन संस्कारांच्या निरंतर संचयाने खर्च झालेल्या संस्कारांची जागा भरुन निघून संस्कार समुच्चय अधिकच वाढतो, कारण खर्च होण्याच्या प्रक्रियेंतूनही दुसरे नवीन संस्कार उत्पन्न होतात. परंतु संस्कार उकलले जातांना, अनंतत्वप्राप्तीच्या उत्कंठारुपी प्रखर ज्वालेमुळे, पूर्वसंस्कार कच्चे होत जाऊन नष्ट होतात.

अनंततेच्या उत्कंठेमुळे तीव्र आध्यात्मिक वेदनांचा अनुभव येतो, अध्यात्मभूमिकांचे

आध्यात्मिक वेदना.

उल्लंघन करीत असतांना होणाऱ्या वेदनांची व साधारण दुःखाच्या तीव्रतेची तुलनाच होऊ शकत नाही. **साधारण दुःख हा संस्कारांचा परिणाम असून, आध्यात्मिक वेदना हा संस्कार उकलण्याचा परिणाम आहे.** शारीरिक दुःखाची पराकाष्ठा झाली म्हणजे मनुष्य बेशुद्ध होतो व त्या दुःखापासून सुटतो; पण आध्यात्मिक वेदनांपासून अशी स्वाभाविक सोडवणूक होऊं शकत नाही. तरीही आध्यात्मिक वेदना शुष्क व कंटाळवाण्या

अनंतत्वप्राप्तीची उत्कंठा

भासत नाहीत, कारण त्यांत एक प्रकारच्या आनंदाचे मिश्रण असते.

अनंतत्वप्राप्तीची उत्कंठा तीव्र होत जाऊन परासीमा गांठते व नंतर ती हळू हळू शांत होऊं लागते. परंतु ती शांत होत असतांना जाणीव अनंतत्वप्राप्तीची लालसा टाकून देत नाही; तर ती त्या ध्येयाला चिकटूनच राहते. ही शांत पण सुप्त उत्कंठेची स्थिति अनंतप्राप्तीची

शांतीलाभ

प्रवेशिका आहे. ह्या स्थितीत आलेली उत्कंठा इतर सर्व वासनांना छिन्नमूल करण्यास साधनीभूत झालेली असते; व ती स्वतःहि अनंताच्या अगाध शांतीमध्ये तृप्त होऊन विलीन होण्यास उद्युक्त झालेली असते.

अनंतप्राप्तीची उत्कंठा तृप्त होण्यापूर्वी, जाणिवेला सहाव्या भूमिकेंतून सातव्या भूमिकेमध्ये प्रवेश करावा लागतो; म्हणजे तिला द्वैतांतून अद्वैतांत पदार्पण करावें लागतें. कल्पनासाम्राज्यांत भटकत राहण्याचें टाकून, जाणिवेला कल्पनेची परिसमाप्ति करावी लागते. सद्गुरुला एकमेव सद्वस्तूच सत्य असून 'असत्' किंवा शून्य तिची केवळ छाया असल्याचें ज्ञान असतें; व त्याच्याकरिता, कालप्रवाह हा अनंततेमध्ये समाविष्ट



संस्कारांनी निश्चित होता. सिनेमांतील पडद्यावर एक लहानशी क्रिया दर्शविण्याकरिता जशी कित्येक फूट फिल्म फिरावी लागते, त्याचप्रमाणे मर्यादित 'मी' ची साधी एक क्रिया निश्चित करण्याकरिता, अनेक संस्कार खर्च होतात. याप्रमाणे, अनुभवांत व्यक्त व तृप्त झाल्यामुळे, ह्या संस्कारांचा व्यय होतो. कच्चे संस्कार मनोदेहांतच खर्च होऊन जातात; त्याहून अधिक बलवान संस्कार सूक्ष्मदेहांत वासनारुपाने किंवा काल्पनिक अनुभवाच्या (imaginative experience) द्वारां खर्च होतात; व प्रबलतम संस्कार स्थूल देहाच्या शारीरिक क्रियेच्या द्वारा खर्च होऊन जातात.

संस्कारांचा असा सतत व्यय चालूंच असला, तरी संस्कारांचा लोप होत नाही; कारण, **नवीन संस्कार केवळ नवीन क्रियांनीच उत्पन्न होतात, असें नसून, ते खर्च होऊन जाण्याच्या प्रक्रियेंतहि अवश्यमेव उत्पन्न होतात.** याप्रमाणे, संस्कारांचा ढीग सारखा वाढतच जातो; व व्यक्ति तें ओझें फेकून देण्यास असमर्थ होते.

विशिष्ट क्रिया व संस्कार यांनी ठेवलेल्या संस्काररुपी ठशांमुळे, मन तशाच प्रकारच्या

परस्परविरोधी द्वंद्वांच्या द्वारां संतुलन.

क्रियांकरिता व अनुभवांकरिता ग्रहणशील (susceptible) होते. पण एका विशिष्ट मर्यादेनंतर स्वाभाविक प्रतिक्रिया होऊन, या ग्रहणशीलतेचा निरोध व विरोध होतो; व प्रवृत्तीची दिशा अगदी उलटून, विरुद्ध संस्कारांना कार्यक्षम होण्यास वाव मिळतो.

कित्येक वेळां, हे द्वंद्वांचे परस्परविरोधी भाग एकाच कल्पनाशृखलेंमध्ये गोवल्या जातात. उदाहरणार्थ, एखाद्या मनुष्याला त्याच्या जीवनाच्या पूर्वार्धांत, ऐहिक वैभवाचा– कनक, कामिनी व कीर्ति इत्यादि सर्व प्रिय वस्तूंनी संपन्न असलेला सुप्रसिद्ध लेखक असल्याचा अनुभव येतो; व त्याच जन्माच्या उत्तरार्धांत, ह्या सर्व प्रिय वस्तू त्याला सोडून गेल्या असल्याचा अनुभव येतो. कधी कधी असें दिसतें कीं, एकाच जन्माच्या कल्पनाशृंखलेंत, दोन्हीहि परस्पर विरुद्ध द्वंद्वांचा समावेश झालेला नाही. उदाहरणार्थ, एखाद्या माणसाला आपण स्वतः जन्मभर युद्धांत नेहमी विजयी होणारा असा प्रबळ भूपति असल्याचा अनुभव येईल. परंतु असें झाल्यास, त्या राजाला आणखी एक दुसरा जन्म घेऊन पराभव सोसावा लागतो; व कल्पनाशृंखलेची पूर्ति करुन ह्या जन्मांतील अनुभवाचें संतुलन (balancing) करणें भाग पडते. **संस्कारांची मानसिक नियति (psychlogical compulsion) ही आत्म्यास अधिक आवश्यक असणाऱ्या अर्थपूर्णतेस (teleological need) पोषक असते.**

कल्पना करा, की एका मनुष्याने या जन्मांत एखाद्या माणसाला ठार मारलें आहे; व ह्यामुळे त्याच्या मनोदेहांत ठार मारण्याचा संस्काररुपी ठसा उमटला. चेतना जर या

उदाहरण.

संस्काराच्या प्रारंभिक प्रवृत्तीनेच पूर्णपणे नियंत्रित झाली, तर तो मनुष्य अनंत कालपर्यंत लोकांची हत्याच करीत जाईल; व प्रत्येक वेळी तसेंच कर्म करण्याची त्याची वृत्ति प्रबल होत जाईल. व जर अनुभवाच्या अर्थपूर्ण

नियमाने (logic of exprience) ह्या प्रवृत्तीला आवश्यक असलेला अवरोध झाला नसता, तर या पुनरावृत्तिरुपी नियतींतून सुटणें अशक्यच झालें असतें. पण लवकरच विरोधद्वंद्वांतील एका टोकाच्या पक्षा (opposite) ची अपूर्णता मनुष्याच्या ध्यानांत येते; व तो आपला नष्ट झालेला समतोल पुन्हा प्रस्थापित करण्याकरिता, न कळत विरुद्ध पक्षाचा आश्रय घेतो. याप्रमाणे, ज्याने नर हत्या करण्याचा अनुभव घेतला, त्याच्यांत स्वत:स ठार मारुन घेण्याची आवश्यकता व मानसिक ग्रहणशीलता उत्पन्न होते. दुसऱ्याला मारीत असतांना जी संपूर्ण परिस्थिति (total situation) असते, त्या परिस्थितीचा मारणें हा एक भाग असून, त्याला परिस्थितीच्या एका अंगाचेंच- म्हणजे मारण्याचेंच - रहस्य अवगत झालेलें असतें व त्या संपूर्ण परिस्थितीचें जें मारल्या जाण्याचें दुसरें पूरक अंग असतें, त्याचें मर्म त्याला अज्ञातच राहतें. कारण, दुसऱ्याचे मारल्या जाणें एका अर्थाने त्याच्या अनुभवांत नसते; व त्याचें मर्म त्याला अपरिचितच असतें. म्हणून, त्याच्या अनुभवाची पूर्ति करण्याची आवश्यकता उत्पन्न होऊन, ज्या द्वंद्वपक्षाचा त्याला स्वत:स अनुभव आला असेल, त्याच्या विरुद्ध पक्षाचा स्वानुभव तो स्वत:वर ओढवून घेतो, म्हणजे चेतनेमध्ये, ही नवीन उणीव भरुन काढण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते. आपल्या स्वत:च्या अनुभवांत संपूर्ण परिस्थितीचा समावेश करण्याकरिता, उपरनिर्दिष्ट खुनी माणसामध्ये, स्वत: ठार मारल्या जाण्याच्या अनुभवाची ग्रहणशीलता उत्पन्न होते.

या ठिकाणीं हा प्रश्न उपस्थित होतो की 'दुसऱ्या जन्मांत त्याला ठार मारण्याकरिता कोणता माणूस येईल'? तो माणूस पूर्व जन्मीं ठार झालेला मनुष्यच असूं शकेल; किंवा त्या मनुष्याप्रमाणेच समान संस्कार असलेला दुसराहि मनुष्य असूं शकेल. निरनिराळ्या व्यक्तींत क्रियाप्रतिक्रिया होऊन, परस्परांत सांस्कारिक संबंध व बंधनें उत्पन्न होतात; व जेव्हा माणूस दुसरा जन्म घेतो, तेव्हा तो सांस्कारिक पूर्वसंबंध असलेल्या लोकांत किंवा त्याच्यासारखेच संस्कार असलेल्या दुसऱ्या लोकांत जन्म घेतो. परंतु, विकासशील द्वैताची अवरोधरहित क्रीडा होईल, अशीच व्यवस्था जीवनांत आढळून येते.

**जीवनाची अग्रगति परस्पर विरोधी द्वंद्वामधून द्वंद्वांतीत स्थितीत प्रवेश करते.**

विणकराच्या घोट्याप्रमाणे दोन विरुद्ध टोकांमध्ये भ्रमण करुन, मानवी मन जीवनरुपी कापडातील ताण्याबाण्यांची रचना करीत असते. रेखागणितांतील रुपकाचा उपयोग करावयाचा म्हटल्यास, **जीवनाचा विकास सरळ रेषेंत न होतां, नागमोडी वळणाने होत असतो.** नदींतील जलप्रवाहास दोन तटांचा जो उपयोग आहे, तोच उपयोग जीवनसरितेस दोन परस्परविरुद्ध पक्षांचा-म्हणजे द्वंद्वांचा - आहे. नदीला तट नसतील, तर तिच्यांतील जलराशी मार्गातच बाजूंना इतस्तत: विखरल्या जातील; व नदी आपल्या उद्दिष्ट ठिकाणी पोहचूं शकणार नाही. त्याचप्रमाणे, जीवनौघ (life-force) हि द्वंद्वपक्षांत सीमाबद्ध झाला नसता, तर तोहि अनंत रीतींनी उधळला गेला



असता.

**महाप्रलय व मुक्ति.**

परंतु, जीवनसरितेचे हे दोन तट एकमेकांना समांतर नसून, मुक्तिरुपी बिंदूमध्ये अखेरीस एकमेकीस मिळणाऱ्या रेषांप्रमाणे आहेत. ज्या मानाने मनुष्य ध्येयाच्या जवळ जातो, त्या मानाने त्याच्या मनाचे आंदोलन कमी होत जातें; व ध्येय प्राप्ती झाल्यावर, तें पूर्णपणें स्थिर होतें. ज्या बाहुलीचा गुरुत्वाकर्षणमध्ये (centre of gravity) तिच्या बुडाशीं असतो, अशा भावलीचें इकडून तिकडे डोलत राहणें हळूहळू कमी होत जाऊन, अखेरीस बसण्याच्या स्थितींत स्थिर होतें. मनाच्या आंदोलनाचीहि तशीच असते. भावलीला धक्का दिल्यास, ती एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे कांही कालपर्यंत डोलत राहते. परंतु, ह्या डोलण्यांतील अंतर हळुहळू सारखें कमी होत जातें; व अखेरीस भावली अगदी स्थिर होते. सृष्टिविकासाच्या द्वंद्वपक्षांतील आंदोलन पूर्णपणे थांबणे म्हणजे महाप्रलय होय. परंतु, विकासशील व्यक्तीच्या अध्यात्मजीवनांतील द्वंद्वांतर्गत आंदोलन थांबणे म्हणजे मुक्ति होय.

**चैतन्याच्या भूमिका**

द्वैतांतून अद्वैतांत पाऊल टाकणें म्हणजे केवळ अंशभेदाचा फरक नाही. त्या दोहोंत गुणत: फरक असल्यासमुळे त्यांच्यांतील भेद अनंत आहे. द्वैतावस्था ईश्वरत्वाच्या अभावाची अवस्था असून, अद्वैतस्थिति ईश्वरावस्था आहे. हा असीम भेद म्हणजेच सहावी व सातवी भूमिका यांमधील अगाध दरी आहे. खालील सहा भूमिकांतहि एकमेकामध्ये एकप्रकारची दरी किंवा अंतर आहे. परंतु, हे अंतर जरी फार असलें, तरी तें अनंत नाही; **कारण या सहाहि भूमिकांमध्ये द्वैतबद्ध अनुभवाचें द्वंद्वांदोलन आहे.** पहिल्या व दुसऱ्या भूमिकेमधील, दुसऱ्या व तिसऱ्या भूमिकेमधील व याप्रमाणें सहाव्या भूमिकेपर्यंत जो भेद आहे, तो फार मोठा असला तरी सीमारहित नाही. यावरुन हें स्पष्ट होतें, कीं द्वैतबद्ध सहाहि भूमिकांमधून कोणतीहि एक भूमिका इतर भूमिकांपेक्षा सातव्या भूमिकेच्या अधिक जवळ नाही. म्हणजे, सहा भूमिकांतील कोणतीहि भूमिका व सातवी भूमिका, यांमधील अंतर सहाव्या व सातव्या भूमिकेमधील अंतराप्रमाणेंच अनंत आहे. सहा भूमिकांमधील प्रगति ही कल्पनेमधील प्रगति आहे. परंतु सातव्या भूमिकेंत कल्पना विराम पावते; व त्या भूमिकेवरच व्यक्तीची सत्यप्रकाशित जागृति राहते.

**भूमिकांमधील प्रगति**

तरीहि, सहा भूमिकांतून प्रगति करणें हे अपरिहार्य आहे. सत्याची अनुभूति होण्याकरिता, कल्पनेची पूर्ण परिसमाप्ति झाली पाहिजे. जेव्हा शिष्याला सद्गुरु लाभतो, तेव्हा त्याला सर्व सहाहि भूमिकाचें उल्लंघन करावे लागते. सद्गुरु शिष्याला **एक तर उघड्या डोळ्यांनी भूमिकांमधून घेऊन जातो; किंवा त्याच्या डोळ्यांवर आवरण टाकून घेऊन जातो.** जर त्याने शिष्याला

**न करतां, स्वत:मधील सारासार विवेक वाढवावा.**

सत्यसत्यविवेक

'शरीयत' किंवा कर्मठतेमधून 'तरीकत' किंवा मोक्षमार्गात चढण्याचें रहस्यसर्वस्व केवळ बाह्य नियमानिष्ठतेच्या त्यागांत साठविलेलें नाही. केवळ रुढिबंध तोडून व्यक्तिवैचित्र्य वाढविणे, किंवा साधारण पद्धति सोडून, असाधारण पद्धतीचा अवलंब करणें, हें ह्या परिवर्तनाचें स्वरुप नाही; तर ह्या परिवर्तनाचें रहस्य स्थायी परंपरेचे अंधानुसरण टाकून, सारासारविवेकनिष्ठ जीवनाचा स्वीकार करण्यांत साठविलेले आहे. **कर्मठपणांतून मोक्षमार्गांत परिवर्तन झालें, म्हणजे तर्कशून्य अज्ञान जाउन, तेथे समीक्षणात्मक विचार जागृत होतो.** केवळ बाह्यनियमबद्धतेच्या अवस्थेंत, मनुष्याचें आध्यात्मिक अज्ञान इतकें गहन असतें, की आपण अज्ञानी, हेंहि त्याला ठाऊक नसतें. परंतु जेव्हा मनुष्य जागृत होत जाऊन, पथप्रविष्ट होतो, तेव्हा त्याला खऱ्या प्रकाशाची आवश्यकता भासते; व सुरवातीला **सदसत्, नित्यानित्य, सत्यासत्य व सारासार, यामध्ये बौद्धिक विवेचनात्मक निवड** करण्याच्या द्वारांच त्याचा प्रकाशाप्रत पोहोंचण्याचा प्रयत्न अभिव्यक्त होतो.

शुष्क अंधविश्वासाचे दिवाळे

त्याचबरोबर, साधकास केवळ सत्यासत्यामधील बौद्धिक निवड अपुरी पडते. **बुद्धियुक्त विवेक हीच पुढील सर्व तयारीची नि:संशय आधारशीला असली, तरी समजलेलीं नवीन मूल्यें आचरणांत उतरविल्या जातील तेव्हाच त्याचा पूर्ण लाभ होतो.** म्हणजे, सिद्धांताला महत्त्व नसून आचरणाला महत्त्व आहे. ज्या कल्पना, विश्वास, मतमतांतरें व सिद्धांत मनुष्य 'धारण' करीत असतो, ते सर्व त्याच्या व्यक्तित्वाच्या अगदी बाहेरच्या स्तराला अधरपणे चिकटून राहतात. कित्येकवेळा मनुष्याचें मत एक असतें; व कृति त्याच्या अगदी उलट असते. **जो मनुष्य कोरड्या सिद्धान्तवादितेवर पुष्ट होतो, त्याने अध्यात्मजीवनात अद्याप सुरवातहि केलेली नसते, तरीही त्याच्या मनावर असा भ्रम आरुढ होतो, की तो स्वत: आध्यात्मिकतेंत उन्नत झाला आहे; व त्यामुळे कोरड्या सिद्धान्तवादितेचें दिवाळेपण अधिक शोचनीय ठरतें.**

अंधविश्वास व कट्टर पंथावलंबन यांची उत्तम बाजू

कधीकधी कडवेपणाने धारण केलेलें चुकीचें मत देखील अशा प्रकारचा अनुभव आमंत्रित करते, की त्यामुळे पुढील अध्यात्म जीवनाचें द्वार उघडतें. 'शरीयत' किंवा कर्मकांडाच्या अवस्थेत देखील, कित्येक वेळां कर्मठतेमुळे अनेक स्वार्थरहित व उदात्त कार्याची स्फूर्ति होते. कारण, त्या अवस्थेंत, विश्वास किंवा मतमतांतरें अंधपणे ग्रहण केल्या जात असलीं, तरी त्याबद्दलचा कटाक्ष व उत्साह, हे त्यांनी त्यावेळी स्वीकारलेल्या विचारधारेला चोदना देतात. तुलनात्मक दृष्टीने पाहतां, कोरड्या सिद्धांतवादितेपेक्षा पंथगत कट्टर अंधविश्वासांचे गुणवैशिष्ट्य हें आहे, की त्यांचा स्वीकार बुद्धीप्रमाणेच



साधारण मनुष्य

झाला असतो. अंतिम सत्याच्या कालातीत स्थितीचा अनुभव घेऊन, तो स्वत: कालाच्या पलीकडे जातो; व स्वत:च्या अस्तित्वविस्तारांत तो कालप्रवाहाच्या प्रारंभाला व अंताला दोहोनाहि समाविष्ट करतो. त्याच्यामध्ये नानात्वपूर्ण जगतांतील क्रियाप्रतिक्रियारुप कालांतर्गत घटनांमुळे किंचित्‌हि चंचलता उत्पन्न होत नाही.

सद्‌गुरु

साधारण मनुष्याला सृष्टीचा आदि किंवा अंत ठाऊक नसतो. म्हणून त्याच्या ज्ञानाच्या व नियंत्रणाच्या बाहेरील घटनांच्या गतीमुळे तो व्याकुळ होतो. त्या घटनांचे यथार्थ व वास्तविक मूल्य न कळल्यामुळे, त्याच्यावर त्यांचा प्रभाव पडतो. तो कालप्रवाहांत फसतो. प्रत्येक गोष्टीकडे तो संस्कारांच्या तृप्तीच्या किंवा अतृप्तीच्या दृष्टीनेच पाहतो. म्हणून तो विश्वांतील घटनामुळे अतिशय प्रक्षुब्ध होतो.

ह्या उलट, सद्‌गुरु हा द्वैत व द्वैतमूलक संस्कार या दोहोंपासून मुक्त असतो; व म्हणून तो बंधरहित असतो. संसारांतील वादळ व आघात यांमुळे तो व्यथित होत नाही. विश्वांतील विधायक व संहारक प्रक्रियांच्या कोलाहलास तो वाजवीपेक्षा अधिक महत्व देत नाही. सत्याच्या **तीर्थभूमीत सद्‌गुरुने प्रवेश केला असतो; व सृष्टींतील क्षणिक मूल्यांमध्ये फार तर अंशत:च प्रतिबिंबित होणाऱ्या अनंत रहस्यपूर्णतेचे ही तीर्थभूमि माहेरघरच असते.** त्याच्या स्वरुपांत अखिल अस्तित्व समाविष्ट असून, अभिव्यक्त सृष्टीतील सर्व घटना त्याच्याकरिता केवळ क्रीडेसमान असतात.

# ६ : साधकाचीं लक्षणें

## भाग १ ला

## आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारांत प्रवेश

ईश्वरानुभूतीच सर्व मनुष्यांची अंतिम भवितव्यता असली, तरी त्या महिमामय भवितव्यतेच्या सिद्धीकरिता फारच थोड्या जणांची तयारी झालेली असते. संसारांत गुरफटलेल्या लोकांचे मन संस्कारांच्या घनराशींनी तमाच्छादित झालें असतें; व हे संस्कार अतिदुर्बल झाल्याशिवाय साधकास पथप्रवेशसुद्धा मिळूं शकत नाही. संस्कारराशींना विसरुन क्षीण करण्याची सामान्य रीत म्हणजे धर्माच्या बाह्य विधिनियमांचे व निर्दिष्ट व्रतवैकल्यादि आचारांचें निष्ठेने पालन करणें.

धर्मविहित नियमानुसार बाह्य अनुवर्तनाचे महत्त्व व त्याच्या सीमा

परंपरागत किंवा धर्मशास्त्रविहित कडक विधिनिषेधांचे बाह्य अनुसरण म्हणजे कर्मकांड किंवा 'शरीयत' असून, त्यांत रोजच्या प्रार्थना, तीर्थयात्रा, शास्त्रविहित कर्तव्यें व तत्कालीन सामान्य नैतिक चेतने (Moral Consciousness) ने स्वीकारलेल्या नीतिसंहितेंतील नियमांचे पालन – या सर्वांचा समावेश होतो. **नियमबद्ध बाह्य आचार, तद्विशिष्ट रीतीने आध्यात्मिक संयमाला उपयोगी असतो; परंतु त्यांत तोटे नाहीत असें नाही. असा कडक आचार मनुष्याला रुक्ष, कर्मठ व यंत्रसम करतो; व सूक्ष्म रीतीने त्याचा अहंकारहि वाढवितो.** तरीहि, बऱ्याचशा लोकांची नियमांच्या बाह्य अनुवर्तनावरच आसक्ति जडली असते, कारण स्वतःच्या मनोदेवतेला गप्प करण्याचा तो सर्वात सुलभ उपाय असतो.

बाह्य कर्मनिष्ठतेचें शिक्षण घेण्यांत आत्मा बहुधा अनेक जन्म काढतो; परंतु ह्या बाह्य कर्मनिष्ठतेचा कंटाळा येऊन आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारा (Realities) विषयी रुचिसंपन्न होण्याची वेळ कधी तरी पण निश्चयाने येतेच. संसारी मनुष्य जेव्हा

आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारांत पाऊल



ह्या श्रेष्ठत्तर शोधास प्रारंभ करतो, तेव्हा तो साधक बनला असें समजावें. ज्याप्रमाणे कीडा स्वतःच्या देहाचें रुपांतर (Metamorphosis) करुन नवीन जीवनांत प्रविष्ट होतो, त्याच प्रमाणे 'शरीयत' किंवा बाह्य नियमनिष्ठता (कर्मकांड) पार करुन, 'तरीकत' किंवा मुक्तिपथा (मोक्षमार्ग) मध्ये प्रवेश करतो. **या उच्चतर अवस्थेमध्ये पोहोचल्यावर, विशिष्ट नियमांच्या बाह्य अनुसरणाने आत्म्याला तृप्ति होत नाही; तर ज्या गुणविशेषांनी आंतरिक जीवनास आध्यात्मिक सौंदर्य येतें, ते गुणविशेष मिळविण्यास साधक प्रवृत्त होतो.**

आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारा (The realities of inner life) च्या दृष्टीने पाहतां, बाह्य नियमनिष्ठतेला रुढिसंमत व औपचारिक महत्त्व भासलें, तरी ती सारशून्य असते; व असें कडक बाह्यानुवर्तन टाकून देणारें जीवन कित्येक वेळा आध्यात्मिकतेने संपन्न असूं शकतें. परंपरागत रुढीचें औपचारिक बाह्यानुसरण करीत असतांना, मनुष्याचें जीवन, बहुधा नेहमीच, सत्य व शाश्वत मूल्यांपासून घसरुन, मिथ्या व भ्रामक मूल्यांवर आधारलें जाण्याचा संभव असतो. रुढिसंमत गोष्टी आध्यात्मिक दृष्ट्या नेहमीच निर्दोष असतात असें नाही. उलटपक्षी, बऱ्याचशा रुढि बहुधा सर्वसाधारण व अज्ञानी लोकांच्या विचारांमुळे अस्तित्वांत येत असल्यामुळे, त्यांच्यांतील अंतर्गत मूल्यें भ्रमात्मकच असतात. भ्रमात्मक मूल्येंच साधारणतः रुढिसंमत बनतात, कारण त्यांची वाढ सर्वसाधारण मनोवृत्तीच्या साच्यांत झालेली असते. परंतु परंपरागत रुढींमध्ये भ्रमात्मक मूल्यांशिवाय दुसरे कांहीच अभिव्यक्त होत नाही, असा याचा अर्थ नाही.

रुढींची ससीमता

कित्येक लोक केवळ लोकविलक्षणता अनुभविण्याकरताच लोकाचाराविरुद्ध वर्तन करतात. स्वतःचे व्यापार व व्यवहार विचित्र ठेवल्यामुळे, त्यांना इतरांहून स्वतः निराळे असल्याचा अनुभव येतो; व ह्या भेदभावनेंत ते रममाण होतात. परम्पराविरुद्ध आचार हा बहुधा, तो रुढ पद्धतीच्या उलट असतो, इतक्याच कारणानेहि आकर्षक बनतो. **सर्वसाधारण अनुवर्तनांतील भ्रामक मूल्यें अतिपरिचयामुळे रुचिशून्य बनतात; व नंतर सत्य व शाश्वत मूल्यांचा शोध न करतां, मन असाधारण वर्तनांत, मूल्यभ्रमाची रचना करुन, रुचि घेण्यास प्रवृत्त होतें.** रुढिसंमत आचार टाकून, यंत्राप्रमाणे व अविचारपूर्वक, लोकविरुद्ध पण पूर्वीइतक्याच सारशून्य आचाराचा आश्रय केला, म्हणजे बाह्य नियमनिष्ठतेची अवस्था पार केली असें होत नाही; कारण तशा प्रकारचा बदल प्रतिक्रियात्मक असल्यामुळे, तो बंधनरहित व सत्यनिष्ठ जीवनाला पोषक होत नाही. **साधक स्वतःला रुढिमुक्त करण्यास अविचाराच्या प्रतिक्रियेमुळे प्रवृत्त होत नाही; तर त्याच्या मुळाशी समीक्षणात्मक पूर्ण विवेक असतो. बाह्य नियमनिष्ठेची स्थिति पार करुन, ज्यांना आंतरिक जीवनांतील सत्य व सारभूत अवस्थेंत प्रवेश करावयाचा असेल, त्यांनी, रुढीची संमति किंवा असंमति यांचा विचार**

रुढिमुक्तता शोधक विचारांवर आश्रित असली पाहिजे.

मनांत सर्वस्वाचा त्याग करण्याची ऊर्मी उत्पन्न झाली. पुणें सोडून तो जवळच्या जंगलांत गेला; व तेथे एका झाडाखाली बसून व हातातं माळ घेऊन, तो देवाच्या नावाचा जप करु लागला. प्रतिक्षणी उत्साह कमी होत असतांनाहि व बराच त्रास सहन करुन, त्याने आपला जप चालू ठेवला. सूर्यास्तानंतर त्याला सर्व बाजूंनी भयभीत झालेल्या प्राण्यांच्या आरोळ्या ऐकूं आल्या; व रात्रीच्या वाढत्या अंधारात ह्या आरोळ्याहि वाढत गेल्या, तरी सुद्धा त्याने आपला निश्चय व चिकाटी सोडली नाही. जेव्हा त्याला अंधारांतून एक मोठे अस्वल स्वत:कडे येतांना दिसलें, तेव्हा त्याने जीवितरक्षणाकरता य:पलायन सुरु केलें; व सात मैलपर्यंत वेगाने धांवत जाऊन, तो पुण्यांतील एका दुकानाजवळ पोहोचला व तेथेच बेशुद्ध झाला. शुद्धीवर आल्यानंतर, त्याने भोंवताली जमलेल्या लोकांना आपली साहसकथा सांगून त्यांचे मनोरंजन केलें; परंतु त्या क्षणापासून त्याची त्यागवृत्ति अस्तास गेली.

आध्यात्मिक प्रयत्नामध्ये, शारीरिक प्रयत्न व धैर्य तर पाहिजेच. पण त्याबरोबरच न डगणारी सहिष्णुता व अचल नैतिक धैर्यहि आवश्यक आहे. जग मायेंत फसलें असून, निस्सार

जग जसें असेल, त्याच स्वरुपांत त्याचा स्वीकार करणें

वस्तूंवर आसक्त आहे. म्हणून जगाची रीत ही साधकाने स्वत:करता निश्चित केलेल्या आदर्शाच्या विरुद्ध असते. जगांतून पळून जाऊन त्याचें काम भागत नाही. ज्या गुणविशेषाच्या द्वारां, तो जगाचा सामना करुन, त्याचा स्वीकार करुं शकेल, त्याचा स्वत:मध्ये विकास करण्याकरता, त्याला जगांत पुन: परत यावें लागेलच. कित्येक वेळा त्याला जगरीति आवडली नाही, तरी जगसेवेच्या द्वारांच त्याला आपला मार्ग काटावा लागतो. **आपणाला जाणण्यास असमर्थ असलेल्या व आपल्या बाबतींत अनुदार असलेल्या जगावर प्रेम करुन, त्याची सेवा करावयाची असेल, तर साधकाने कधीहि संपुष्टांत न येणारी सहिष्णुता संपादन करावी.**

मुमुक्षु ज्या मानाने साधनापंथात प्रगत होतो, त्या मानाने त्याला गुरुचा सहवास अधिक लाभतो; व त्याचें खऱ्या प्रेमाविषयीचें अनुभवजन्य ज्ञान उत्तरोत्तर वाढत जातें व ह्यामुळे,

सहिष्णुता

सांसारिक व्यवहारांतील प्रीतिशून्यता, कठोर तिरस्कार, हृदयभेदी औदासीन्य व धुमसत राहणारा द्वेष पाहून, त्याचे अंत:करण व्याथित होते. हे सर्व आघात म्हणजे त्याच्या सहनशीलतेची परीक्षाच घेतात. जेव्हा जग कित्येक प्रसंगी उदासीन किंवा विरुद्ध बनतें, तेव्हा संसारी मनुष्यहि दु:खित होतो. परंतु मानवी स्वभावापासून तो जास्त चांगुलपणाची अपेक्षा करत नाही; ह्या सर्व गोष्टींना कांही इलाज नाही, असेच तो समजत असतो; व यामुळे त्याच्या हृदयांत जो हळुवारपणाचा अभाव होतो, त्याने त्याच्या दु:खाची तीव्रता कमी होते. उलटपक्षी, **साधकाने गंभीरतर प्रेमाचा आस्वाद घेतला असतो; व त्याला प्रत्येक आत्म्यांतील प्रच्छन्न संभाव्यतेची जाणीव असते. त्याचप्रमाणे, स्वत:स ज्ञात व साध्य असलेल्या प्रेमाचें स्वारस्य जर जगाने अस्पष्टपणे का होईना पण ओळखलें**



हृदयानेही केलेला असतो; केवळ सैध्दान्तिक 'मतांपेक्षा', असले अंधविश्वास व्यक्तित्वाच्या अधिक भागावर पसरुन त्यावर ताबा करतात.

परंतु पंथगत अंधविश्वासांचे कांही फायदे असले, तरी त्यांचे तोटेहि तितकेच आहेत;

पंथगत कट्टर अंधविश्वासांच्या दुष्परिणामांचे कारण.

कारण त्यांच्यामधील विवेचनात्मक विचारशीलता भ्रष्ट किंवा नष्ट झाल्यामुळे, व्यक्तिजीवनाची पथप्रदर्शक दृष्टीच तमाच्छादित होते. पंथविशिष्ट विश्वासांच्या कडव्या अंधानुसरणाने व्यक्तीचे व समाजाचे कांही हित झालें असलें, तरी त्याने त्यांची बहुधा अपरिमित हानीच झाली आहे. पंथ व विश्वास यांच्यामधील अंधनिष्ठेत, बुद्धि व हृदय या दोहोंना चालना मिळत असली, तरी त्यांत सारासारविचाराचा अस्त झालेला असल्यामुळे, बुद्धि व हृदय या दोहोंचाहि व्यापार बाधित होतो. म्हणून, अंधमतप्रधान पंथानुसरणाने केवळ अमिश्रित कल्याणच होतें असें नाही.

समीक्षणात्मक विचार न करतां, आंधळेपणाने ग्रहण केलेली कडवी मतें टाकून, मनुष्य जेव्हा विचारानी ग्राह्य वाटणाऱ्या सिद्धान्ताचा स्वीकार करतो, तेव्हा त्याच्या मनास

तत्त्वांना आचरणांत उतरविण्याची आवश्यकता

स्वत:च्या मतांचे विवेचनात्मक परीक्षण करण्याची संवय लागते; व ही त्याची कांही प्रमाणांत उन्नतीच आहे. परंतु नवगृहीत मतांमध्ये अंधविश्वासांतील उत्कटता व उत्साह नसतो, असेंहि कित्येक वेळा दिसून येतें; व या नवगृहीत मनांत प्रेरक शक्ति नसेल, तर ते जीवनाच्या पृष्ठभागावरच तरंगत राहतात, किंवा व्यक्तित्वावर ओव्हरकोटाप्रमाणे अधर राहतात. मन भावांधतेपासून विमुक्त करण्यांत आलें असलें, तरी मनाचे हे विचारस्वातंत्र्य हृदयाचें सहकार्य गमावून मिळविलेले असते. **गमावलेलें हृदयाचें सहकार्य पुन: मिळण्याकरता, विवेचनात्मक विचारांतून निर्माण झालेलें नवीन आदर्श भावनाक्षेत्रांत फिरुन प्रविष्ट झाले पाहिजेत;** व तेथे त्यांनी आपली प्रभावशाली सत्ता पुन: प्रस्थापित केली पाहिजे. दुसऱ्या शद्वांत सांगायचे, म्हणजे विचाराच्या परीक्षणांत ग्राह्य ठरलेल्या कल्पना जर क्रियाशील जीवनांत पुन: उतरतील, तरच त्यांचा पुरेपूर लाभ झाला असें समजावें. व्यावहारिक जीवनांमध्ये उतरत असतांना, ह्या कल्पनांमध्ये इष्ट तें परिवर्तन होऊन, त्या अधिक निर्दोष व स्पष्ट होतात; व ह्यांहूनहि अधिक महत्त्वाचा लाभ, म्हणजे त्या कल्पना आता अलंकाराप्रमाणे केवळ भूषणरुप न राहतां, प्रत्यक्ष जीवनाच्या ताण्याबाण्यामध्ये गोंवल्या जातात.

विवेचनात्मक व निर्णायक विचारांमुळे बुद्धि व अंत:करण ह्यांच्यात समता उत्पन्न होते.

**'शरीयत' अथवा कर्मकांडांतील बाह्यनियमनिष्ठा सोडून, 'तरीकत' किंवा मोक्षमार्गातील आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारांत प्रवेशकरण्याच्या दोन पायऱ्या आहेत. (१) गुणदोषविवेचन रहित**

**अंधानुकरणांतील मानसिक जडतेचा त्याग करुन, मनाला परीक्षणात्मक विचारांनी आंदोलित करणें व (२) परीक्षणात्मक विवेकांत ग्राह्य झालेलीं तत्त्वें व्यावहारिक जीवनांत उतरविणे. आध्यात्मिक सफलतेकरता, विचार हा परीक्षणात्मक तर पाहिजेच, पण रचनात्मकहि असला पाहिजे.** समीणणात्मक व निर्मितीक्षम विचारांमुळे साधकांत सद्गुणविशेषांचा परिपोष होतो; व अशा रीतीने पूर्वतयारी पूर्ण झाल्यावर, साधकाची बुद्धि व हृदय यांच्यांत समता येऊन, मुक्त व दिव्य जीवन परिस्फुटित होतें.

# ७ : साधकाचीं लक्षणें

## भाग २ रा

## कांही दिव्य गुणविशेष

मनुष्याचें आंतरिक जीवन सुसंवादित व जागृत होण्याकरता, त्याच्यामध्ये कांही दिव्य गुणविशेषांचा विकास होऊन, ते त्याच्या दैनिक कर्तव्यांमध्ये अभिव्यक्त झाले पाहिजेत. कोणताहि एखादा विशिष्ठ गुण, अलग करुन पाहिल्यास फार महत्त्वाचा दिसला नाही, तरी इतर महत्त्वपूर्ण गुणविशेषांशी असलेला त्याचा संबंध विचारांत न घेतां त्याचें मूल्यमापन करणें बरोबर नाही. अध्यात्मजीवनामध्ये, हे सर्व गुणविशेष परस्पराश्रित व एकमेकांना सहायक असतात; व त्यांचा परस्परसंबंध इतका दृढ व सारगर्मित असतो, की त्यापैकी एकाहि गुणाची अवहेलना केली तर बाकीच्या अनेक मौलिक गुणांची माती होते. तेव्हा, प्रत्येक सद्गुणाच्या यथार्थ उपयोगितेचा विचार केल्यास, त्याची पूर्ण जीवनास अनिवार्य आवश्यकता असल्याचें दिसून येते.

अध्यात्मजीवनास आवश्यक असलेले गुणविशेष परस्परावर आश्रित असतात.

प्रत्येक मनुष्य **हक्काने सत्याचा उत्तराधिकारी आहेच; परंतु सत्संपन्नता प्राप्त करण्याकरता, त्याची आध्यात्मिक तयारी असली पाहिजे; व ही तयारी होण्याकरता, अनेक जन्मांचा धीरतापूर्वक व चिकाटीचा अभ्यास पाहिजे.** तेव्हा साधकाला आवश्यक असलेल्या अनेक गोष्टींमध्ये, कधीहि न मावळणारा उत्साह व कधीहि हार न घेणारी धीरता या दोहोंचा योग पाहिजे. सत्यानुभूति प्राप्त करण्याकरता, मनुष्याने एकदा दृढ निश्चय केला, म्हणजे त्याच्या मार्गात अनेक अडचणी उत्पन्न झाल्याचें त्याला आढळून येतें; व फारच थोडे लोक चिकाटीने व धीरतेने आपला प्रयत्न अखेरपर्यंत चालू ठेवतात. विघ्नांनी अभिभूत होऊन प्रयत्न सोडून देणें सोपें आहे. पुण्यातील एका गृहस्थाच्या गोष्टीमुळे हा मुद्दा स्पष्ट होईल. एक धार्मिक पुस्तक वाचून, या गृहस्थाच्या

धीरतां व चिकाटी

असलेल्या सहजतेंत असावा. त्याचप्रमाणे, सेवेंत सीमित 'मी' च्या हक्कावर जोर असूं नये, तर सहकार्य भाव पाहिजे.

सर्व कर्मापासून व कर्मफलांपासून साधक अलिप्त झाला, म्हणजे तो लहान गोष्टी व मोठ्या गोष्टी या हानिकारक द्वंद्वांपासून मुक्त होतो. **संसारी लोक स्वत:स साध्य किंवा प्राप्त झालेल्या गोष्टींच्या द्वारां स्वत:ची पृथक् सत्ता अनुभवतात.** म्हणून स्वत:ची कमाई, ते दृश्य परिमाणां (Tangible Quantities) च्या मापदंडाने मोजतात; व ते लहान गोष्टी सोडून मोठ्या गोष्टींच्या मागे लागतात. परंतु **आध्यात्मिकतेच्या दृष्टीने, लहान समजल्या जाणाऱ्या गोष्टी कित्येक वेळां मोठ्या समजल्या जाणाऱ्या गोष्टींइतक्याच महत्त्वाच्या असतात.** लहान गोष्टी सोडून, मोठ्या गोष्टींच्या मागे लागण्यांत साधकाला कांहीच प्राप्तव्य नसतें; म्हणून तो मोठ्या गोष्टीइतकीच लहान गोष्टीमध्यें रुचि घेतो.

लहानमोठ्या गोष्टीच्या द्वंद्वापासून मुक्ति

अध्यात्मजीवनांत महान् घटनांइतकीच लहान घटनांमध्येहि सारपूर्णता असते. परंतु जगांतील परंपरागत विचारधारेंत ह्या सत्याची जाणीव नसते. **कोणत्या गोष्टींना महत्त्व द्यायचें हें परंपरागत दृष्टीनेच ठरविल्यामुळे, रुढ कल्पनांचे अनुसरण करीत असतांना, मनुष्याच्या सेवेचे संभाव्य क्षेत्र कृत्रिमपणे मर्यादित होतें.** व जीवनास अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या कित्येक गोष्टींची उपेक्षा होऊन जीवन अध्यात्मिकतेच्या दृष्टीने दैन्यता पावतें.

रुढ कल्पनांच्या प्रभावामुळे सेवेचें क्षेत्र सीमित होते.

याप्रकारे, ज्या समाजामध्ये भौतिक विचारधारेचें प्रभुत्व आहे, त्या समाजांत अन्नवस्त्रादि जड सामुग्री इतरांना प्रदान करणें, हीच सेवा समजली जाते. ज्या समाजामध्ये बौद्धिक संस्कृतीच्या महत्त्वाची पारख आहे, त्या समाजांत विविध रुपांत विद्येचा फैलाव करणें, हीच सेवा समजली जाते. ज्या समाजांत सौंदर्याची अभिरुचि अधिक विकसित असते, त्या समाजांत कलाकृतीचें उत्पादन व विभाजन यांची संघटना करणे, हीच सेवा समजली जाते. ज्या समाजांत हृदयास संवेद्य असलेल्या अस्फुट मूल्यांची पारख आहे, त्या समाजांत भावना सुसंस्कृत करुन त्या अभिव्यक्त करण्याचीं साधनें निर्माण करणें, हीच सेवा समजली जाते; व ज्या समाजामध्ये आत्मजीवनाची परम महत्ता ओळखली जाते; व ज्या समाजामध्ये आत्मजीवनाची परम महत्ता ओळखली जाते, त्या समाजांत आध्यात्मिक प्रबोध प्रदान करणें हीच सेवा समजली जाते. ह्या सर्व सेवाप्रकारांमध्ये आध्यात्मिक प्रबोध देणें ही सेवा सर्वश्रेष्ठ आहे, कारण **अध्यात्मज्ञानाच्या दृष्टिकोणांत सर्व मानवी प्रश्नांचा समावेश होत असून, अध्यात्मसंपन्न प्रबोधांमध्येच त्या सर्व प्रश्नांचे पूर्ण निरसन होतें.**

सेवेचीं क्षेत्रें स्वीकृत मूल्यांनी निश्चित होत असतात.

परंतु आध्यात्मिक प्रबोध नसेल, तर सेवा करण्याची इच्छा मर्यादित विचारधारांनी आरुढ होते. **सेवेचे दोन प्रकार आहेत. वस्तुत: सारभूत असलेल्या गोष्टी इतरांच्या**



**असतें, तर जीवन हल्लीहून कितीतरी सौंदर्यपूर्ण झालें असतें, याची जाणीव त्याला सतत विव्हल करते.**

जगरीतीला आव्हान न देतां, साधकाने तिच्यासमोर मान तुकविली असती, तर सहिष्णुतेचा प्रश्न त्याला बिकट झाला नसता. **परंतु, सर्व जगाने विरोध केला तरी स्वत:स दृग्गोचर झालेल्या उच्चतर जीवनाच्या आदर्शास निष्ठेने चिकटून राहणें, हें त्याचें सर्वश्रेष्ठ कर्तव्य होऊन बसतें.** स्वानुभूत श्रेष्ठतर सत्याबद्दल निष्ठावंत होण्याकरता, कधीहि न डगमगणाऱ्या नैतिक धैर्याची व अजून सत्याभिमुख न झालेल्या लोकांची निंदा, उपहास व द्वेष, यांना सामना देण्यास तत्पर असण्याची आवश्यकता असते; व ह्या बिकट संग्रामांत त्याला सद्गुरुंची व अन्य सहसाधकांची नेहमी मदत होतच असली, तरी सत्याकरिता सदासर्वकाळ दुसऱ्याच्या साहाय्याची अपेक्षा न करतां, एकट्याने झुंजत राहण्याची शक्ति त्याने वाढविली पाहिजे. स्वत:मध्ये व सद्गुरुमध्ये दृढ विश्वास असल्यानेच असें परमश्रेष्ठ नीतिधैर्य अंगी बाणतें. **जगावर प्रेम करुन, सद्गुरुंच्या रीतीने त्याची सेवा करणें, हे दुर्बल हृदयाचें काम नाही.**

नैतिक धैर्य व आत्मविश्वास

नीतिधैर्य व आत्मविश्वास यांना निश्चित वृत्तीची जोड पाहिजे. चिंतेमुळे मानसिक शक्तीचा जो अपव्यय होतो, तितका दुसऱ्या फारच थोड्या गोष्टींनी होतो; व पूर्णपणें चिंतारहित बनणें, हें फारच कठीण कार्य आहे. जेव्हा मनाविरुद्ध गोष्टी घडतात, तेव्हा चिंतेचा अनुभव येतो. पण झालेल्या गोष्टीबद्दल, ते तसें झालें नसतें, तर बरें झालें असतें, असा विचार करणें वृथा आहे. **विगत गोष्टी झाल्या तशाच राहणार; कितीहि चिंता केली, तरी त्या निराळ्या होणार नाहीत.** परंतु सीमित अहंवृत्तिशील मन स्वत:च्या भूतकालाशीं तादात्म्य पावतें; त्याच्याशीं संबद्ध होते; व भग्न आशांच्या यातना जागृत ठेवतें. या प्रकारें अस्वास्थ्य मनाला उदिग्न करीत राहतें; व अहंनिष्ठ मनावर भूतकाळ कुरघोडी करतो. त्याचप्रमाणे भविष्यकाल अवांछनीय असण्याचा संभव असला, म्हणजे त्याच्याहि बद्दल चिंता वाटते असें झालें, म्हणजे चिंता ही अपेक्षित आगामी परिस्थितीस सामना देणाऱ्या पूर्वप्रयत्नास आवश्यक सहचर व म्हणून समर्थनीय वाटते; पण कोणतीहि परिस्थिति केवळ चिंता करुन सुधरुं शकत नाही. परंतु बऱ्याचशा अपेक्षित गोष्टी घडूनच येत नाहीत; व घडून आल्याच तर त्या बहुधा अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक स्वीकरणीय ठरतात. **चिंता ही वासनेच्या उत्तेजनाने ज्वराक्रान्त झालेल्या कल्पनेचा परिणाम आहे;** व चिंतेंत अनुभवास येणारी सर्व दु:खें स्वयंनिर्मित असतात. चिंतेने कधीच कोणाचे कल्याण झालें नाही. चिंतेमुळे मानसिक शक्तींचा ऱ्हास तर होतोच, पण जीवनांतील परिपूर्णता व आनंदहि घटून जातात.

निश्चित वृत्ति

प्रसन्नता, उत्साह व समता

साधकास जे गुणविशेष अत्यंत आवश्यक आहेत,

त्यांमध्ये प्रसन्नता, उत्साह व समता ह्यांच्याइतके महत्त्वाचे फार कमी आहेत; व चिंताविमुक्त झाल्याशिवाय हे गुण विकसित होऊं शकत नाहीत. **मन जेव्हा उदास, विषण्ण किंवा उद्विग्न असतें, तेव्हा त्याचें व्यापार अव्यवस्थित व बंधनकारक होतात;** व त्यामुळे, सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये, प्रसन्नता, उत्साह व समता राखण्याची आत्यंतिक आवश्यकता उत्पन्न होते. जीवन चिंतारहित झाल्याशिवाय ह्यांतील एकहि गुण साध्य होत नाही. परंतु गतकालाबद्दल किंवा भविष्यकालाबद्दल आसक्ति असेल, तर त्यांतून चिंता ही अवश्यमेव निर्माण होणारच. जोंवर मन पूर्णपणें निरासक्त बनत नाही, तोंवर चिंता कोणत्यातरी रुपांत राहतेच.

संयम व विरक्ति एकनिष्ठतेला आवश्यक आहेत.

मार्गातील अडथळ्यांचे उल्लंघन करुन जाण्याकरिता साधकास एकनिष्ठते (One-pointed-ness) ची जरुरी आहे. सांसारिक व्यवहारामध्ये मानसिक शक्तींचा व्यय झाल्यास त्यांची उन्नति फारच हळू होते. परंतु एकनिष्ठता असणें, म्हणजे भासमान संसारांतील सर्व प्रलोभनांपासून विरक्ति असणें. त्याकरिता, मन सर्व मोहांपासून परावृत्त व्हावयास पाहिजे; व पूर्ण इंद्रियजय साधला पाहिजे. **खऱ्या प्रबोधनाच्या शोधांत एकाग्र होण्याकरिता संयम व वैराग्य साधलेला असावयास पाहिजे.**

गुरुच्या पथप्रदर्शनाचा लाभ झाला नसल्यास, साधनापथांतील उन्नति निश्चित किंवा सुस्थिर होऊंच शकत नाही. गुरुची मदत असणें ही उन्नतीची सर्वश्रेष्ठ अट आहे. साधकास

गुरुच्या मदतीचा लाभ घेणे

तात्कालिक दृष्टीने अत्यावश्यक असणारें पथप्रदर्शन व मदतच सद्‌गुरुच्या द्वारां मिळतात. साधकाने स्वत:च्या उन्नतीकरिता प्रयत्नाची पराकाष्ठा करावी, इतकीच गुरुची अपेक्षा असते. चेतनेच्या आमूल परिवर्तनाची तो अपेक्षा करीत नाही. जेथे भूमिकेची पूर्वतयारी सिद्ध असते, तेथेच तो चेतनापरिवर्तनाची अपेक्षा करतो. भौतिक व्यवहाराप्रमाणेच आध्यात्मिक उन्नतीमध्येहि, काल हे एक महत्त्वाचें तत्त्व आहे. साधकाला अध्यात्मिकतेमध्ये पुढे ढकलल्यावर, गुरु स्वत: दिलेलें साहाय्य साधकाला पूर्णपणें आत्मसात् होईपर्यंत वाट पाहतो. **आध्यात्मिकतेची मात्रा प्रमाणाबाहेर दिली गेली, व विशेषत: ती अप्रासंगिक असेल, तर तिच्यामुळे अवश्यमेव अनिष्ट प्रतिक्रिया होतेच. म्हणून, स्वत:च्या मध्यस्थीने साधकाचें अतिशय हित साधण्याची जेव्हा खात्री असेल, अशाच क्षणाची गुरु अत्यंत काळजीपूर्वक निवड करतो; व एकदा मध्ये पडून मदत केल्यावर, तो साधकाला त्याच्या सहाय्याची खरी आवश्यकता निर्माण होईपर्यंत, असीम धीरतेने वाट पाहात राहतो.**

# ८ : साधकाचीं लक्षणें

## भाग ३ रा

## सेवातत्परता

मानवीजातीची सेवा करण्यास साधकाने नेहमी तत्पर राहिलें पाहिजे. स्वत:च्या

वैयक्तिक प्रवृत्ति व कार्यक्षमता यांना अनुसरुन सेवातत्परता

कार्यक्षमतेस धरुन नसलेल्या कार्यात त्याने लक्ष घालण्याची आवश्यकता नाही. त्याने स्वत:च्या वैयक्तिक प्रवृत्तीस व कार्यक्षमतेला योग्य असलेल्या कार्याची निवड करायची असते. परंतु जी सेवा त्याच्या कर्तबगारीच्या कक्षेंत असतें, ती सेवा करण्यास तो अत्यंत बिकट परिस्थितींतहि तयार असतो.

त्याला अनेक दिव्यांतून जावें लागेल, पण शक्य तेव्हा सेवाकरायचीच हा त्याचा दृढ संकल्प असतो; व तो स्वत:च्या निश्चयापासून ढळत नाही. परंतु केवळ स्वत:च्याच द्वारां सर्वात अधिक परिणाम घडून यावेत. या दृष्टीने तो सेवासक्त नसतो. सेवेची जरुरी असेल, तेव्हा त्या सेवेकरता त्याला कितीहि मोठा त्याग करावा लागला, तरी तो

सीमित 'मी' चे अनधिकृत अस्तित्व

सेवातत्परच राहतो. परंतु मला एकट्यालाच या सर्व सेवेचें श्रेय मिळावें, अशा भ्रामक कल्पनेंत तो फसून जात नाही. ती सेवा करण्याचे भाग्य दुसऱ्या कोणाला लाभले तर तो मत्सरग्रस्त होत नाही. जर तो स्वत:करताच सेवेची संधि शोधूं लागला, तर तो एक प्रकारचा त्याचा स्वार्थच होईल. ज्या सेवेंत यत्किंचित्हि स्वार्थपर भाव नाही, त्याच सेवेला अध्यात्मजीवनामध्ये महत्त्व आहे. स्वत:स कांही तरी मिळविल्याशिवाय गत्यंतर नाही, अशी आंतरिक गरज त्याला प्रतीत व्हावयास नको; व त्याचप्रमाणे, मी एकटाच दुसऱ्यांना कांहीतरी देण्यास समर्थ असावें, असेंहि त्याला वाटायला नको. **सेवेमध्ये स्वार्थपरता कोणत्याहि रुपांत राहूं नये.** जर सेवा आवश्यक असेल तरच, व जेव्हा ती आवश्यक असेल, तेव्हाच करावी; व तिचा उगम स्वतंत्र वातावरणांतच शक्य

# ९ : साधकाचीं लक्षणें

## भाग ४ था

## श्रद्धा

साधकास आवश्यक असणाऱ्या गुणविशेषांमध्ये श्रद्धा ही सर्वात अधिक महत्त्वाची आहे. श्रद्धेचे तीन प्रकार आहेत. (१) आत्मश्रद्धा किंवा स्वत:वरील श्रद्धा (आत्मविश्वास) (२) गुरुवरील श्रद्धा व (३) जीवनावरील श्रद्धा (faith in life) जीवनाकरता श्रद्धेची इतकी जरुरी आहे, की तिच्याशिवाय जीवन अशक्यच होईल. श्रद्धेमुळेच सहकारशील व सामाजिक जीवन शक्य होते. परस्परावरील श्रद्धेमुळेच प्रेमाचें विमुक्त आदान-प्रदान व सहकार्ययुक्त श्रमविभाग शक्य होतात. परस्परांबद्दल अकारण भीति बाळगल्यास जीवन भारमय व संकुचित होतें.

श्रध्देचे प्रकार व त्यांचे महत्त्व

बालकांची मोठ्या माणसांवर स्वाभाविक श्रध्दा असते; मोठ्या माणसापासून संरक्षणाची किंवा साहाय्याची अपेक्षा करण्याकरता त्यांना ओळखीची शिफारसपत्रें लागत नाहीत. इतरांनी स्वार्थ साधण्याकरता धोक्याने फसविण्याचा निष्ठुर धक्का न दिला, तर दुसऱ्यावरच विश्वास टाकण्याची ही प्रवृत्ति पुढेहि कायम राहते. तेव्हा श्रद्धा ही मनुष्यास स्वभावसहज असली, तरी तिची वाढ व विकास प्रामाणिक व श्रद्धा ठेवण्यास योग्य असणाऱ्या मनुष्यांच्या समाजांतच होऊं शकते. द्रोहमय वातावरणात श्रद्धा लोप पावते. श्रद्धा निर्माण करुन दृढ करणाऱ्या प्रतिरुपी (Counterpart) गुणविशेषांचे साहचर्य असेल, तर परस्परामधील श्रद्धा पूर्णपणे स्थिर होते. **दुसऱ्याने आपल्यावर टाकलेल्या विश्वासास पात्र होणें व दुसऱ्यावर विश्वास टाणें, हे सद्‌गुरु परस्परांना पूरक आहेत व्यक्तिपर व सामुदायिक जीवनाचा अनिर्बंध व उत्कृष्ट प्रवाह चालू राहण्यास दोनीहि सद्‌गुणांची आवश्यकता आहे.**

पारस्परिक श्रद्धा व तिला आवश्यक असलेले सहचारी प्रतिरुप.



**जीवनांत आणणें ही एक प्रकारची सेवा; व इतरांच्या जीवनांतील सारभूत गोष्टींच्या प्राप्तीमधील अडथळे दूर करणें, ही दुसऱ्या प्रकारची सेवा. कोणत्या गोष्टी सारभूत आहेत, या संबंधीच्या कल्पना जर सीमित असतील, तर त्यांस अनुसरुन, संभाव्य सेवाक्षेत्रहि मर्यादित होतेंच.**

दोन प्रकारची सेवा.

एखाद्या सार्वजनिक संस्थेला खूप मोठी देणगी देण्यासारखी महत्कृत्यें करणें, म्हणजेच कांही सेवासर्वस्व नाही. खचणाऱ्या हृदयास शद्बद्वारां धैर्य देणें, किंवा विषण्णतेमध्ये स्मितद्वारां आशा व प्रसन्नता निर्माण करणें, या सामान्य क्रिया देखील दु:सह आत्मबलिदान किंवा वीरतायुक्त स्वार्थत्याग, यांच्या द्वारां होणाऱ्या सेवेइतक्याच महत्त्वाच्या सेवा आहेत. एका दृष्टिक्षेपाने अंत:करणांतील कटुता धुवून त्यांत नवप्रीति स्पंदमान करतां आली, तर तीहि सेवाच आहे. तेथे सेवाभाव नसतो, म्हणून ती सेवा नाही असे नव्हे. अलगअलग करुन पाहिल्यास ह्या सर्व गोष्टी क्षुल्लक वाटण्याचा संभव आहे. परंतु जीवित अशा अनेक साध्या गोष्टीचेंच बनलेलें असतें; व **अशा साध्या गोष्टींची उपेक्षा केल्यास जीवन हें सौंदर्यहीन तर बनलेच, पण त्यांतील अध्यात्मिकताहि लयास जाईल.**

साध्या गोष्टीतील आशयसंपन्नता

ज्याप्रमाणे संसारासक्त लोक कोणत्याहि लाभाची महत्ता त्याच्या मोठ्या परिमाणावरुन ठरवितात, त्याचप्रमाणे अडथळे, अडचणी व विपत्ति यांचेहि सानथोरपण ठरवितांना ते तीच चूक करतात. उदाहरणार्थ कोणतीहि आपत्ति विचाराई व्हावयाची असेल, तर बऱ्याचशा लोकांच्या दृष्टीने, तिला भव्य दृश्यस्वरुप प्राप्त झालें पाहिजे. **संसारभिमुख लोकांचा हा विशेषच आहे, की ते आंतरिक जीवनांतील गाजावाजा न करणाऱ्या घटनांपेक्षा बाह्यजगतांत दृश्य आकार धारण करणाऱ्या घटनांनाच अधिक महत्त्व देतात.** उदाहरणार्थ, केवळ अध्यात्मदृष्टीने पाहतां, कडव्या द्वेषाने दीर्घकालपर्यंत परिपूर्ण भरलेलें जीवन हे विध्वंसक युद्धाहून वस्तुत: कमी वाईट नाही; तरी बहुधा विध्वंसक युद्ध हे द्वेषयुक्त जीवनापेक्षा मोठी आपत्ति मानण्यांत येते. युद्धामध्ये क्रूरतेची अनेक दृश्य उदाहरणे असल्यामुळे त्याला महत्त्व देण्यांत येतें; परंतु द्वेष बाह्यकृतीमध्ये मूर्तरुप झाला नाही, तरी तो कमी वाईट नाही. त्याचप्रमाणे, अदम्य तृष्णेने व्यथित असलेल्या हृदयांतील यातनांपेक्षा, रोगराईच्या सांथी, जखमा व मृत्युशय्येवरील वेदना यांच्याकडे संसारी माणसांचे लक्ष अधिक आकृष्ट होते.

संसारी मनुष्याच्या मूल्य मापनांतील चूक.

जो साधक श्रेय व प्रसिद्धी ह्या दोहोंबद्दल उदासीन बनून सेवातत्पर असतो, त्याच्याकरता, **जगाच्या दृष्टीने लहानमोठ्या वाटणाऱ्या व पूर्ण जीवनास कुंठित किंवा वर्धमान करणाऱ्या सर्वच गोष्टी ह्या लक्ष्य पोहोचविण्यास योग्य असतात.** ज्याप्रमाणे सार्वत्रिक जीवनप्रवाहामध्ये साम्राज्यांच्या उत्कर्षापकर्षांना महत्त्वाचें स्थान आहे, त्याचप्रमाणे उदासीनता

संपूर्ण जीवन हेच सेवाक्षेत्र आहे.

किंवा माधुर्य यांनी भरलेल्या भंगुर क्षणांनाहि महत्त्वाचेंच स्थान आहे. एका प्रकारच्या घटनांचे महत्त्व दुसऱ्या प्रकारच्या घटनांच्या मापदंडाने करुं नये; व एकाच प्रकारच्या घटनांच्या महत्त्वास मान्यता देऊन, दुसऱ्या प्रकारच्या घटनांना तुच्छ लेखू नये. **साधक जीवनास अविभाज्य संपूर्णते (Integral whole) च्या दृष्टीन पाहतो; जीवनांतील कोणत्याहि एकाच अंगामध्ये तो दुसऱ्या अंगांची उपेक्षा करुन गढून जात नाही.**

परंतु नि:स्वार्थ सेवा करीत असतांनाहि साधक आपल्या मनावर सतत सावधानतेने पहारा करीत असतो. साधक हा नम्र, प्रामाणिक व निष्कपट असला पाहिजे. तो जी सेवा करतो, ती केवळ दाखविण्याकरता नसते; तर तिचा उगम खऱ्या प्रेमांत असतो. **साधक जर खऱ्या प्रेमाने प्रेरित झाला, तर त्या प्रेमामुळे, तो मत्सररहित होऊन, इतर सहसेवकांबरोबर पूर्ण सहकारिता करुं शकतो.** सहसेवकांमध्ये पूर्ण सहयोगभाव व सुसंवादिता नसेल, तर त्यांची सेवा आध्यात्मिक आदर्शाच्या दृष्टीने अपुरी पडते. शिवाय साधकाची बाह्यसेवा प्रेमरहित असेल, तर जगांतील कित्येक संस्थांमधील वेतन घेऊन काम करणाऱ्या लोकांप्रमाणेच, तोहि ती सेवा केवळ कर्तव्यबुद्धीने करीत असतो. जगांतील संस्थांमध्ये लोक वेतनाकरता काम करतात; फार तर रुक्ष कर्तव्यभावनेमुळे ते कार्यदक्ष बनतात. त्यांच्या कार्यामध्ये केवळ प्रेमांत सहजपणे उद्भूत झालेल्या कार्यातील आंतरिक सौंदर्यपूर्णता असूं शकत नाही.

**सेवा प्रेमांत उत्पन्न झाली असेल, तर त्यामुळे इतर सेवकांशी सहकारिता साधते**

सद्गुरुचा सहवास असेल, तर साधकाला सेवाधर्माचे शिक्षण सुलभतेने आत्मसात् करतां येते. गुरु केवळ शद्बानेच नव्हे तर स्वत:च्या उदाहरणाचा प्रत्यक्ष आदर्श ठेवून, शिकवीत असतो; व साधक जेव्हा गुरुला मानवतेची सेवा करतांना पाहतो, तेव्हा गुरुप्रेमामुळे, गुरुचा तो श्रेष्ठ भाव तो चटकन ग्रहण करतो. सर्व साधकांचे गुरुवर समानत: प्रेम असल्यामुळे, त्यांच्यामध्ये सहकारिताहि सहज निर्माण होते. गुरुची आज्ञा पालन करायची म्हणून ते सेवातत्पर असतात. ते स्वत:चे कार्य करीत नाहीत, तर गुरुचें कार्य करतात; व स्वत:च्या मनाने नव्हे, तर गुरुच्या प्रेरणेनेच, त्यांनी ते कार्य स्वीकारलेले असतें. त्यामुळे स्वत:च्या वैयक्तिक हक्कांच्या किंवा अधिकाराच्या किंवा राखीव सवलतींच्या कल्पनांपासून ते विमुक्त राहतात; व गुरुकार्य करण्यावरच त्याचा कटाक्ष असतो; शक्तिनुसार गुरुकार्याचा भार दक्षतेने स्वीकारण्यास जसे ते तत्पर असतात, त्याचप्रमाणे, गुरुची आज्ञा झाल्यास, व दुसरा सहसाधक तेंच काम अधिक उत्कृष्टपणें करुं शकत असला, तर त्या कार्याचें त्या दुसऱ्या साधकाकडे हस्तांतर करण्यासहि ते तयार असतात.

**गुरुच्या सहवासाचा महिमा**

यापमाणे सहयोग करीत असतांना सर्व साधक एका अर्थाने, गुरुप्रमाणेच एकमेकांचीही सेवाच करीत असतात, कारण ते सर्व गुरुकार्याला आत्मीयतेमुळे स्वत:चेंच कार्य समजत



असतात. परंतु, परस्परांच्या या सेवेंत एकमेकांवर हुकमत गाजविण्याचा प्रयत्न नसतो, कारण आपला सहसाधक स्वत:चें कार्य करीत नसून, त्याने अंगिकारलेले गुरुचें कार्यच तो करीत आहे, याची त्याला पुरेपूर जाणीव असते. त्याचप्रमाणे साधक ह्या दृष्टीने सर्व समान आहेत, हेंहि तो जाणत असल्यामुळे त्याला अत्यंत विनम्र भावाने सेवा करणें सुलभ होतें. सेवेमुळे त्याचा अभिमान वाढण्यापेक्षा, त्याने सेवा केली नसती तर जास्त चांगलें झालें असतें. **उच्चनीच भेद न ठेवतां, अवडंबर न करतां व हुकमत न गाजवतां सेवाक्षम बनणें हे अत्यंत कष्टसाध्य आहे. अध्यात्मक्षेत्रांत उपयोगितेइतकेंच नम्रतेचेंहि महत्त्व आहे.**

**अवडंबरशून्य सेवा.**

स्वत: कार्यासक्त असतो म्हणून नव्हे, तर शिष्यगणांसमोर सेवाव्रताचें मूर्तिमंत उदाहरण असावें म्हणूनच, सद्गुरु सेवाशील बनत असतो. इतरांची सेवा करीत असतांना तो त्यांच्यामध्ये स्वत:सच पाहातो व स्वत:चीच सेवा करीत असल्याचें अनुभवतो. **क्षयरहित व आनंदमय ऐक्याभावामुळे, सद्गुरु स्वत:स सर्वांचा स्वामी व सर्वांचा सेवक, दोन्हीहि एकदमच असल्याचें जाणतो, व ज्या सेवेमध्ये सेवा करणाऱ्यास किंवा सेवा ग्रहण करणाऱ्यास दोघांनाहि बंधन होत नाही, अशा सेवेचा तो आदर्श बनतो.** गुरुचें उदाहरण डोळ्यासमोर ठेवल्यास साधक लवकरच सेवेचा आदर्श स्वत:मध्ये उतरवितो. परंतु, साधकाची सेवाशीलता ही जेव्हा ओझें न वाटतां आनंद देणारी, बंधन न करतां स्वतंत्रता देणारी, हक्क प्रतिहक्क निर्माण न करतां मुक्त आदानप्रदानाच्या सहजतेमध्ये स्फूर्त होणारी, स्वार्थपर वासनेच्या भारापासून विमुक्त असलेली व नित्य नवीन होणाऱ्या परिपूर्णतेच्या व तृप्ततेच्या भावाचा परिपोष करणारी असेल, तेव्हाच त्याला सेवाशीलतेची कला सिद्ध होते व त्याची आध्यात्मिक तयारी पूर्ण होते.

**सेवेचा आदर्श**

असतें. त्यामुळे स्वत:मध्ये किंवा इतरांमध्ये शिष्य विश्वास ठेवतो की नाही, या गोष्टींची सद्‌गुरुला मुळीच पर्वा नसते. जिवंत श्रद्धेच्या द्वारां, साहाय्य घेण्यास शिष्य समर्थ आहे, असें जेव्हा गुरुला आढळून येतें, तेव्हाच तो (केवळ मताहून भिन्न असणारी) अशी श्रद्धा स्वत:च्या कल्याणप्रद प्रभावाने शिष्याच्या मनांत उत्पन्न करतो.

##### शिष्याची परीक्षा.

ज्याप्रमाणे मार्गदर्शनाच्या सामर्थ्याच्या बाबतींत शिष्य गुरुची परीक्षा करीत असतो, त्याचप्रमाणे सद्‌गुरुहि आपल्या बाजूने, ध्येयनिष्ठेच्या बाबतींत शिष्याची परीक्षा करीत असतो. शिष्याच्या मनांत स्वत:बद्दल श्रद्धा आहे की शंका आहे या, गोष्टीचें सद्‌गुरुला यत्किंचित्‌हि महत्त्व नसतें; तर तो केवळ शिष्याच्या आध्यात्मिक शोध व प्रयत्न प्रामाणिक व अंत:करणापूर्वक आहे की नाही, याची परीक्षा घेत असतो. जेव्हा स्वत:च्या ईश्वरत्वाची प्रमाणखूण (proof) **पूर्णपणे शरण आलेल्या शिष्याच्या आध्यात्मिक हिताच्या दृष्टीने, आवश्यक व अपरिहार्य असते, तेव्हाच सद्‌गुरु त्याला अशी खात्रीची प्रमाणखूण देतो; तत्पूर्वी नाही.**



परस्परांमधील तर्कवितर्करहित व अचल श्रद्धा ही आदर्शमय जगांतील वस्तु आहे. वास्तविक व्यवहारामध्ये अशी श्रद्धा कांही वेचक व खास ठिकाणीच आढळून येते. श्रद्धा

##### आत्मविश्वासाचें महत्त्व

ही कितीहि इष्ट असली, तरी असीम श्रद्धेस पात्र असलेले लोक जगांत असल्याशिवाय, ती पूर्णस्वरुपांत राहूं शकत नाही; व असें होण्याकरता समाजांत विश्वसनीयता, स्थैर्य व परोपकारशील प्रवृत्ति, यांचा पूर्ण विकास झाला पाहिजे. परंतु जोंवर मनुष्याची स्वत:मध्ये अविचल श्रद्धा राहात नाही, तोवर पारस्परिक श्रद्धेस पोषक असलेले हे गुणविशेष अविकसितच राहतात. माणसाला आत्मविश्वास नसेल, तर तो दुसऱ्यांचा विश्वास संपादन करुन, जतन करण्यास आवश्यक असलेल्या सद्‌गुणांचा विकास करुं शकत नाही. कोणत्याहि बिकट दिव्यांतून जात असतांना, तुम्ही स्वत:स ग्राह्य झालेल्या ध्येयापासून कधीहि च्युत होणार नाही, ह्या अढळ आत्मविश्वासावरच अविचल शीलाची इमारत उभारतां येते.

परंतु अचल आत्मविश्वास हा दुसऱ्यावरील पूर्ण श्रद्धेइतकाच विरळ आहे. निर्मितिक्षम व प्रभावी आत्मसंयमास आवश्यक असणारी निरतिशय आत्मश्रद्धा फारच थोड्या लोकांत

##### आत्मश्रद्धेचा अढळ पाया

विकसित असते. चांगल्या वाइटाचें ज्ञान असूनहि बरेच लोक सन्मार्गापासून वारंवार च्युत होतात; व असल्या दुर्दम दुर्बलतेचा, विफलतेचा व विकारवशतेचा सतत अनुभव घेत राहिल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास खंडित होऊन ढासळतो. **याप्रकारें जी आत्मश्रद्धा सतत पोखरली जाऊन नष्ट होण्याच्या बेतांत येते, तिला पुन: सुरक्षितपणे प्रस्थापित करावयाचें असल्यास, मनुष्याच्या समोर पूर्ण पुरुषाचें जिवंत उदाहरण असावयास पाहिजे व त्याच्या मध्ये श्रद्धा पाहिजे.**

**अनेकप्रकारचीं विघ्नें, संकटें, दुर्बलता, नालायकी व विफलता, यांचा वर्षाव होत असतांनाहि, गुरुनिष्ठेमुळे आत्मविश्वास व जीवनावरील श्रद्धा यांचा परिपोष होतो; व हेंच गुरुवरील श्रद्धेचे वैशिष्ट्यपूर्ण महत्त्व आहे.** स्वत:मध्ये व बऱ्याचशा इतरांमध्ये जीवन दूषित,

##### गुरुवरील श्रद्धा

मर्यादित व विकृत स्थितीमध्ये असल्याचें मनुष्य पाहतो; पण गुरुमध्ये प्रतीत होणारें जीवन अविकृत, शुद्ध व अंतरहित असल्याचें तो जाणतो. **आपला स्वत:चाच आदर्श सद्‌गुरुमध्ये मूर्तरुप झाला असल्याचें तो पाहतो. स्वत:मधील गूढतम आत्मदेव ज्या ध्येयाकरता तळमळत असतो, तें सर्व सद्‌गुरुमध्ये प्राप्त झालेलें असतें. सध्या स्वत:मध्ये सुप्त व असिद्ध अवस्थेंत असणारी, परंतु भविष्यकाळांत त्यास खास साध्य होणारी अशी श्रेष्ठतम अवस्था तो सद्‌गुरुमध्ये पाहतो; व यामुळे गुरुवरील श्रद्धा ही साधकाला स्वत:मधील प्रच्छन्न ईश्वरत्व जागृत व सिद्ध करण्याकरता सर्वश्रेष्ठ प्रेरक शक्ति बनते.**

खरी श्रद्धा ही आत्म्यास येणाऱ्या गूढतर अनुभवावर व विशुद्ध अंत:प्रज्ञेच्या निर्दोष निर्णयावर अधिष्ठित असते. अशी श्रद्धा विवेचनात्मक विचाराला विरोधक नसते; तर उलट

*श्रद्धा व विवेचनात्मक विचार*

ती त्याचें अचूक मार्गदर्शन करते. **विवेचनात्मक विचाराला (Critical reason) जेव्हा विशुद्ध अंत:प्रज्ञेवर (Pure Intuition) आश्रित असलेल्या गंभीर व जिवंत श्रद्धेची जोड मिळते, तेव्हा तो विचार रुक्ष, निष्फळ किंवा अर्थहीन न राहतां, फलदायी निर्मितिक्षम व सारपूर्ण बनतो.** उलटपक्षी, बऱ्याच प्रकारचे भोळे अंधविश्वास हे निर्भय, स्वतंत्र व विवेचनात्मक विचाराशिवाय मग्न होऊं शकत नाहीत. परंतु त्याचबरोबर हेंहि खरें आहे, की जो विश्वास विशुद्ध अंत:प्रज्ञेवर आधारलेला नसतो, अशाच विश्वासावर विवेचनात्मक विचाराचें याप्रकारचे शुद्धीकरणाचें कार्य होतें. खरी श्रद्धा विशुध्द अंत:प्रज्ञेवर आश्रित असल्यामुळे, तिचा आदेश तर्कशील बुद्धीच्या निर्णयांच्या पलीकडचा असतो. अंत:प्रज्ञाप्रेरित श्रद्धा ही सीमित बुद्धीपासून उत्पन्न होत नाही; तर ती अधिक मौलिक असल्यामुळे केवळ बुद्धीची कसरत ही तिची मुस्कटदाबी करुं शकत नाही. परंतु श्रद्धा ही कोणत्याहि अवस्थेमध्ये आंधळी असावी किंवा तिचें विवेचनात्मक बुद्धीने परीक्षण करुं नये, असा याचा अर्थ नाही. **खरी श्रद्धा हा डोळसपणाचा एक प्रकार आहे, व तिला विवेचनात्मक बुद्धीच्या स्वतंत्र व्यापाराला भिण्याची आवश्यकता नाही.**

*भोळा भाविकपणा व शंका*

विवेचनात्मक बुद्धिच्या द्वारां गुरुची पारख करण्याचा अधिकार शिष्यांना प्रारंभीपासूनच असतो. परंतु, **पारख करुन गुरुच्या पूर्णतेची खात्री पटल्यावरहि जर शिष्याची श्रद्धा चंचल झाली, तर ह्यांचे मूळ कारण म्हणजे त्या शिष्याच्या मनांत ध्येयविषयक प्रामाणिक निष्ठा व खरी आस्था नसतें, हेंच होय.** ज्याप्रमाणे, आध्यात्मिक ज्ञानाची दवंडी पिटणाऱ्या लोकांवर अंधश्रद्धा ठेवणाऱ्या माणसांची अनेक उदाहरणें आहेत, त्याचप्रमाणे स्वत:ला खात्रीलायक अनुभव मिळालेला असूनहि ज्यांची श्रद्धा अकारण डळमळत राहते, असेहि लोक आहेत. व ज्याप्रमाणे भोळ्या भाविकतेचा उगम अंतर्मनांत दडून बसलेल्या अनेक सुप्त वासनांमध्ये असतो, त्याचप्रमाणे विवेकशील श्रद्धेच्या आविर्भावास विरोधक असलेल्या अंतर्मनांतील सुप्त वासनाच कित्येक वेळा डोळस श्रद्धेमध्ये असमर्थनीय चंचलता उत्पन्न करतात. **पहिल्या बाबतींत वासनेमुळे अंधविश्वास निर्माण होतो; तर दुसऱ्या बाबतींत वासनेमुळेच असमर्थनीय शंका उद्भवते.**

*सुप्तवासनांच्या व्यापारामुळेच श्रद्धा चलित होते*

तृष्णा ही विवेचनात्मक विचाराच्या क्रियेला विकृत करते. **विशुद्ध अंत:प्रज्ञेवर आश्रित असलेली अचल श्रद्धा ही विविध वासनांच्या भारापासून विमुक्त असलेल्या मनालाच प्राप्त होऊं शकते.** म्हणून, खऱ्या श्रद्धेचा विकास क्रमाक्रमानेच होत असतो. ज्या मानाने शिष्याची जाणीव वासना रहित होत जाते, त्या मानाने त्याची श्रद्धा वाढत जाते.



*बुद्धिनिष्ठ विश्वास व मतमतांतरें*

केवळ बुद्धिगम्य विश्वास किंवा मतमतांतरें याहून श्रद्धा कशी अगदी निराळी आहे, हे सावधानपूर्वक लक्षांत आणलें पाहिजे. एखाद्या माणसाचा दुसऱ्याविषयीं उत्तम ग्रह असला म्हणजे त्याची त्याच्यावर एक प्रकारची श्रद्धा आहे, असें समजलें जातें. परंतु जिवंत गुरुनिष्ठेमध्ये जी आध्यात्मिक क्षमता असते, ती अशा ग्रहामध्ये नसते. माणसाचे बुद्धिगम्य विश्वास व मतें हे त्याच्या मन:प्रदेशावरील अगदी बाहेरचे थर असतात. गंभीरतर मानसिक शक्तींशी त्यांचा आवश्यक संबंध नसतो. ते मनाच्या एका भागांत राहतात; परंतु **अशीं मतें जीवनविषयक दृष्टिकोण निश्चित करणाऱ्या व्यक्तिमत्तेच्या आंतरिक गाभ्यामध्ये कोणताहि बदल घडवून आणत नाहीत.** लोक कपडे घालतात, त्याचप्रमाणे ते 'मतें' हि धारण करतात. परंतु आणीबाणीच्या प्रसंगी, तात्कालिक उद्देश साधण्याकरता, ते त्यांची मतें कपड्याप्रमाणेच बदलतात. **इतर उद्दिष्टांच्या प्रसुत व अचेतन (unconscious) व्यापारांमुळेच अशा प्रकारचीं मतें बनलेलीं असतात. मतामुळे उद्दिष्टांची जाणीवपूर्वक निश्चिती झालेली नसते.**

*सजीव श्रद्धा ही विधायक व प्रेरणात्मक असते*

उलटपक्षी, जिवंत श्रद्धेचा मनांतील सर्व गंभीरतर शक्तींशीं व उद्दिष्टांशीं जिव्हाळ्याचा व महत्त्वपूर्ण संबंध असतो. अशी श्रध्दा वरवर 'धारण' केलेली नसते. ती चेतनेच्या केवळ बाह्य अंगावर बुद्धिनिष्ठ मतांप्रमाणे लटकलेली नसते. उलटपक्षी, सजीव श्रद्धा ही सर्व अंत:करणाची पुनर्घटना करणारी प्रभावी शक्ति बनते; व तिची प्रेरणा निर्मितिक्षम असते. **असा एकहि विचार उरत नाही, की ज्यांत अशी श्रद्धा नवजीवन ओतीत नाही; अशी एकहि भावना उरत नाही, की जी तिच्यामुळे प्रकाशित होत नाही; व असा एकहि हेतु उरत नाही, की जो तिच्यामुळे बदलून जात नाही.** गुरुवरील या प्रकारची सजीव श्रद्धा शिष्याच्या स्फूर्तीचें व अचल आत्मविश्वासाचें परमोच्च उगमस्थान बनतें; व गुरुवरची ही श्रद्धा केवळ त्याच्याबद्दलचा चांगला ग्रह किंवा मत या स्वरुपांत व्यक्त न होतां, सर्वस्वी गुरुवरच अवलंबून राहण्याऱ्या क्रियाशीलतेच्या द्वारां व्यक्त होते. **सजीव श्रद्धा म्हणजे कांही शिष्याने गुरुस दिलेलें शिफारस पत्र नाही. तर, ती श्रद्धा गुरुवरच्या पूर्ण विश्वासाची क्रियाशील (active) प्रवृत्ति असते. अशा श्रद्धेमध्ये, संदेहरहित्व व पूर्ण विश्वासाने गुरुकडून साहाय्य मिळण्याची अपेक्षा तर असतेच, पण त्याबरोबरच तिच्यामध्ये शिष्याची आत्मसमर्पणाची व शरणागतीची वृत्तीहि असते.**

*सजीव श्रद्धा अनुभवावर अधिष्ठित असते.*

अशा प्रकारची परिणामकारक व जिवंत श्रद्धा, ही अधिकारीं शिष्याला गुरुने दिलेल्या एखाद्या गूढ व गंभीर अनुभवावर अधिष्ठित असते. लोक जीं मतें **अंधतेने ग्रहण करतात, किंवा अपूर्ण व वरपांगी विचाराने बनवतात,** त्या मतांपेक्षा गुरुनिष्ठा मूलत:च भिन्न असते. बहुधा केवळ बुद्धिग्रहित मतांना फारच थोडें आध्यात्मिक महत्त्व

अगर विश्रांति मिळत नाही तो चैतन्याच्या कृत्रिम उद्दीपनामध्ये (Excitement) स्वत:स विसरण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे समाजाची सर्व बाजूने अधोगति होते, राष्ट्रीय व जातीय द्वेष उत्पन्न होऊन ते वाढतात, युद्धें उद्भवतात; मानव निराश होतो, आणि नाशाची लाट थांबविण्यासाठी शक्यता दिसेनाशी होते.

अशा काळीं अवतार येतो. अवतार हा मनुष्यरुपांत परमात्म्याचा पूर्ण आविष्कार असल्यामुळे तो मानवाचा निकष बनतो; व त्याच्याकडे पाहून मनुष्य आपण स्वत: काय आहों व काय होऊं शकूं याची कल्पना करूं शकतो.

अवताराचें सर्व गोष्टींत लक्ष असतें. परंतु तो मात्र सर्व वस्तुमात्रापासून अलिप्त असतो. थोडक्या दु:खाने त्याला करुणा येईल; परंतु अतिशय मोठ्या दु:खानेहि त्याची चलबिचल होणार

बंधमुक्त व द्वंद्वातीत

नाही. तो सुख व दु:ख, वासना व तृप्ति, शांति व कलह, जन्म व मृत्यु या द्वंद्वांच्या पलीकडे असतो. लोक ज्यांनी बांधले गेले आहेत, परंतु ज्यांच्यापासून तो स्वत: मुक्त आहे व ज्यांच्यापासून लोकांना मुक्त करण्याकरिता तो आला आहे अशी हीं द्वंद्वें म्हणजे त्याच्या दृष्टीने केवळ भ्रम होत. प्रत्येक क्षणाचा उपयोग तो दुसऱ्यांना मोक्षमार्गांत नेण्याकडे करीत असतो. मृत्यूनंतर देखील मनुष्याचें अस्तित्व नष्ट होत नाही, हें त्याला माहीत असतें म्हणून मृत्यूची त्याला काळजी वाटत नाही.

जे त्याच्याजवळ राहतात त्यांच्या अंत:करणांत तो प्रेम जागृत करतो व या प्रेमामुळे उत्पन्न होणाऱ्या सेवा करण्याच्या इच्छाज्योतिमध्ये सर्व स्वार्थी इच्छा नष्ट होतात. जे त्याला आपलें

देवपण-निर्मिती शक्ति

आयुष्य वाहून देतात, ते जाणिवेंत हळूहळू त्याच्याशीं एकरुप होऊन जातात. हळूहळू त्यांची मानवता त्यांच्या देवपणांत विरुन जाते आणि ते मुक्त होतात.

जे त्याच्या अगदी निकटचे असतात ते त्याच्या अंतरंगांतील (Circle) म्हणून समजले जातात. प्रत्येक सद्गुरुस बारा शिष्यांचे एक अंतर्वर्तुळ असतें आणि ते शिष्य कार्य व अधिकार

प्रत्येक सद्गुरुस बारा शिष्य

या बाबतींत सद्गुरुहून भिन्न असतात. तरी आत्मबोधाच्या बाबतींत ते सद्गुरुच्या बरोबरीचे केले जातात. अवतारकालामध्ये अवताराचे १२० शिष्यांचे वर्तुळ असतें. यापैकी सर्वांना आत्मबोधाचा अनुभव येतो आणि ते दुसऱ्यांच्या मुक्तीसाठी कार्य करीत राहतात.

अवतार त्याच्या पिढींतील लोकांना त्यांच्या खऱ्या आत्मरुपाची जागृति करुन देतो. ज्यांची तयारी झाली असेल त्यांना मुक्ति देतो, आणि एकंदरींत तत्कालीन आत्मपर जीवनांत नवीन जोम

स्वर्गीय जीवनाचा प्रयोग

जाणतो. त्याच्या दिव्य मानवी उदाहरणाची, दिव्य जीवनाच्या उदात्ततेची वासनारहित प्रेमाची, केवळ दुसऱ्यांच्यासाठींच उपयोगिलेल्या सामर्थ्याची, महत्त्वाकांक्षेने त्रस्त न झालेल्या शांतीची आणि भ्रमाने अंधुक न झालेल्या ज्ञानाची स्फूर्तिप्रद शक्ति पुढील पिढीसाठी राहते. पृथ्वीवर स्वर्गीय

# १० : अवतार

प्रत्येक सजीव प्राणी कळत अथवा न कळत एकाच गोष्टीचा शोध करीत असतो. खालच्या दर्जाच्या सजीव प्राण्यांत आणि अप्रगल्भ मनुष्यांत हा शोध अजाणपणे (unconscious) होतो; प्रगल्भ मनुष्य हाच शोध जाणून करीत असतो. ह्या शोधाच्या विषयाची

अवतार.

आनंद, शांति, स्वातंत्र्य, सत्य, प्रेम, पूर्णता, आत्मानुभव ईश्वरप्राप्ति व सायुज्यता (union with God) अशीं पुष्कळ नावें आहेत. वस्तुत: हा शोध ह्या सर्वासाठींच असतो, परंतु तो विशिष्ट मार्गाने चालला असतो. सुखाचे क्षण सत्याचे ओझरतें दर्शन व परमात्म्यैक्याचे धावते क्षणित अनुभव प्रत्येकालाच मिळतात. पण हे अनुभव चिरकाल टिकवावे अशी त्यांची इच्छा असते. सतत बदलत राहणाऱ्या परिस्थितीतहि अनंत सत्य प्रस्थापित करण्याची त्यांची इच्छा असते.

ही मानवी इच्छा स्वाभाविक आहे; व ह्या इच्छेचा मुख्य आधार म्हणजे त्याची स्वत:च्या परमात्म्याशी असलेल्या मूलभूत ऐक्याची स्मृति हा होय. ही स्मृति व्यक्तीच्या कमीअधिक उत्क्रांतीच्या मानाने मंद अथवा तीव्र असते.

प्रत्येक प्राणी स्वत:च्या खऱ्या स्वरुपाच्या विषयीच्या अज्ञानाने बद्ध असलेला असा परमेश्वराचा अंशत: आविष्कारच असतो. वास्तविक सर्व उत्क्रान्ति ही अज्ञान स्थितीतील देवपणापासून ज्ञानयुक्त देवपणापर्यंतची मजल असून त्या उत्क्रान्तींत मूलत:

उत्क्रान्ति म्हणजे काय?

शाश्वत व अनंत असलेला परमेश्वर अनेक रुपें धारण करतो, अनेक अनुभव अनुभवितो आणि स्वत:च घालून घेतलेल्या अनेक बंधनांच्या पलीकडे जातो. विधात्याच्या दृष्टीने उत्क्रान्ति हा खेळ आहे. ह्या खेळांत केवल तत्त्वास आपले निरुपाधिक पूर्णज्ञान शक्ति आणि दैवी आनंद यांच्या असमीतेची कसोटी सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्यें घेतां येते. परंतु, जोंपर्यंत ईश्वर पूर्ण मानवामध्यें परस्परविरुद्ध गोष्टींचा समतोलपणा व समभाव स्थिरत करीत नाही, तोंपर्यंत उत्क्रांतीचा काळ हा जीवाकरता शांति आणि कलह,

सुख आणि दुःख, प्रेम आणि तिरस्कार हे क्रमाने अनुभवण्याचा काल आहे. कारण जीवाचें ज्ञान, शक्ति व सुखक्षमता मर्यादित असतात. पूर्णावस्थेंत जीव आणि परमात्मा यांचे परस्परांचें ऐक्य ओळखलें जातें; व त्याच स्थितींत सातत्याचा व कालाच्या प्रवाहांतील अनंततेचा अनुभव येतो. परमेश्वर स्वतःला परमेश्वर म्हणून व तत्त्वतः अपरिवर्तनशील म्हणून ओळखतो, व आविर्भावांतील अनंततेचा व आत्मप्रतीतीच्या शाश्वत आनंदाचा स्वतःच स्वतःच्या नव्या जाणिवेंत सतत अनुभव घेतो.

जीवनामध्येच ही आत्मप्रतीति होऊं शकते व तशीच ती व्हावयास पाहिजे; कारण जीवनांतच मर्यादितपणाचा, त्या पलीकडे जाण्याचा आणि या बंधनापासून झालेल्या मुक्ततेचा आनंद अनुभवितां येतो.

**मुक्तीचे तीन प्रकार**

या बंधनातीत मुक्ततेचे तीन प्रकार आहेत. बहुतेक आत्मज्ञान झालेले आत्मे ताबडतोब आणि नेहमीकरिता शरीरत्याग करितात आणि परमात्म्याच्या अनाविर्भूत स्वरुपामध्ये निमग्न राहतात. त्यांना फक्त एकरुपतेची जाणीव असतें. नियमित जगताचें अस्तित्वहि ते मानीत नाहीत. जननमरणाचें चक्र पूर्ण होऊन त्यापासून ते मुक्त होतात. या स्थितीसच मुक्ति अगर मोक्ष असें म्हणतात.

**विदेह मुक्ति कोणती?**

कांही आत्मबोध झालेले आत्मे कांही काल आपली शरीरें ठेवतात आणि त्यांची जाणीवहि परमात्म्याच्या अनाविर्भूत स्वरुपामध्ये निमग्न असते; व म्हणून आपल्या शरीराची अगर जगताची त्यांना जाणीव नसते. ते स्वानंद, सामर्थ्य आणि आत्मज्ञान यांचा अखंड अनुभव घेत असतात. परंतु या सर्वाचा ते ह्या बाह्य जगतांत दुसऱ्यांना मुक्ति मिळवून देण्यासाठी उपयोग करुं शकत नाहीत. तथापि, त्यांचे या जगतांतील केवळ अस्तित्व म्हणजेच स्वानंद, अनंत शक्ति आणि ज्ञान यांच्या प्रसरणाचा मध्यबिंदू बनते. आणि जे त्यांच्याजवळ जातात, ते त्यांची सेवा करतात व त्यांची पूजा करतात त्यांना ह्यांच्या सहवासाने आध्यात्मिक दृष्ट्या फायदा होतो. या विशिष्ट प्रकारच्या लोकांना 'मज्जुब' म्हणतात आणि त्यांच्या या स्थितीला 'विदेह मुक्ति' म्हणतात.

कांही थोडे आत्मबोध झालेले लोक शरीरत्याग करीत नाहीत, आणि त्यांना परमात्म्याच्या अनाविर्भूत व आविर्भूत रुपांमध्ये आपण स्वतःच परमात्मा असल्याची जाणीव असते.

स्वतःला अपरिवर्तनशील म्हणून व त्याचप्रमाणे आत्मतत्त्वाचा नानाविध व अनंत आविष्कार म्हणून ओळखतात. त्यांना स्वतःला या जगतापासून निराळें असल्याचा, तसेंच या जगताचे ते निर्माणकर्ते व विनाशकर्ते असल्याचा व त्याचप्रमाणे जगताच्या बंधनांचा व त्यांच्या पलीकडे ते असल्याचाहि अनुभव येतो. स्वानंद, सामर्थ्य, असीम ज्ञान आणि पूर्ण शांति यांचा ते सतत अनुभव घेतात. या जगतांतील खेळांच्या आनंदाचाहि त्यांना पूर्ण अनुभव असतो. प्रत्येकांत वास्तव्य करणारें आत्मतत्त्व ते आपण स्वतःच असल्याची त्यांना जाणीव असते; आणि ह्यामुळे ते प्रत्येकास मुक्त 'मज्जुब' अगर सद्गुरु यांच्या अवस्थेंत परमात्मरुप



होण्यास आध्यात्मिक मदत करतात.

**अवतार हा सर्वश्रेष्ठ सद्गुरु**

जगामध्ये नेहमी छप्पन सद्गुरु अगर पूर्ण व्यक्ति असतात. जाणीवेमध्ये ते एकच असतात; पण, त्यांचें कार्य मात्र निरनिराळें असतें. बहुधा ते समाजापासून अलिप्त राहून अज्ञात स्थितींतच राहतात व आपलें कार्य करीत असतात. परंतु, त्यापैकी पांच नेहमी समाजांत राहूनच कार्य करतात आणि एका अर्थाने ते सर्वांचे आदर्श बनून समाजांत प्रामुख्य आणि महत्त्व मिळवितात. अवतारकार्यामध्ये अवतार हा सर्वश्रेष्ठ सद्गुरु असल्यामुळे तो या आध्यात्मिक राजमंडळाच्या मुख्याची जागा घेतो.

**परमेश्वरी 'अवतारा' चा खरा अर्थ**

अवतारकाल हे जगताच्या वसंत कालाप्रमाणें होत. ते जगतामध्ये नवीन शक्ति, जागृतीची नवीन जाणीव आणि आयुष्याचा नवीन अनुभव आणतात. हेंहि कांही थोड्यासाठी नव्हे, तर सर्वांसाठी आणि त्यामुळें ज्या जागृति आणि उत्साह या गुणांचा उपयोग व त्यापासून होणारा आनंद कांही उत्क्रान्त आत्म्यानांच मिळत होता, त्या जागृतीचा व उत्साहाचा अनुभव आता सर्व मानव जातीत मिळूं शकतो. अशा रीतीने एकंदरींत जीवन जाणिवेच्या वरच्या पायरीवर नेलें जातें व उत्साहाच्या नव्या दमाने ते चालविलें जातें. विकारांकडून विचारांकडे होणारी क्रांति ही एक पायरी असून विचारांकडून अंतःस्फूर्ति होणारी क्रान्ति ही दुसरी पायरी होय. दैवी व्यक्तिमत्वाच्या माध्यमांतून ही निर्मितिक्षम नवीन अंतःस्फूर्ति एका विशिष्ट अर्थाने मूर्तरुप होते. हाच परमेश्वरी अवतार होय.

अवतार हा उत्क्रान्तिद्वारां सद्गुरु होणारापहिलाच आत्मा होय; आणि ज्याने आपला आविष्कार पूर्वी केला व पुढेहि करील असा एकच अवतार आहे. या अवतारामधूनच परमेश्वराने आपल्या जाणीव नसलेल्या देवपणापासून जाणीव असलेल्या देवपणापर्यंतचा प्रवास पूर्ण केला. जाणीवयुक्त परमात्मा होण्याकरिता त्याला प्रथम नेणिवेंत मनुष्य व्हावें लागलें होतें. मानवांच्या मुक्ततेसाठीं परमेश्वराने जाणीवपूर्वक धारण केलेला नरदेह म्हणजेच अवतार होय.

**विनाश थांबविण्यासाठी अवतार**

अवतार हा निरनिराळ्या रुपांत निरनिराळ्या नांवांनी निरनिराळ्या कालीं आणि जगताच्या निरनिराळ्या भागांत दृश्यमान होत असतो. मानव जातीचा पारमार्थिक दृष्टीने नवीन जन्म होत असतांना तो मूर्तरुप धारण करीत असतो. अवताराच्या आविष्कारापूर्वीचा काल हा एक प्रकारचा आध्यात्मिक जन्माकाल असल्यामुळे या काळांत मानवांस जन्मापूर्वीचे निरतिशय दुःख भोगावें लागते. या कालांत मनुष्य वासनेचा नेहमीपेक्षा अधिक गुलाम बनलेला, लोभाकडे अधिक आकृष्ट झालेला, व त्याचप्रमाणे भीतिग्रस्त व अधिक क्रोधाविष्ट झालेला दिसतो. 'बळी तो कान पिळी' अशी स्थिति होऊन श्रीमंत गरिबावर जुलूम करतात; जे सत्ताधीश असतात अशा थोरांच्या फायद्यासाठी बहुजनसमाज लुटला जातो; आणि ज्या मनुष्यास शांति

वर्तमान कालाला भावी घटनेचें साधन मानून महत्त्वशून्य करणें बरोबर नाही; कारण, असें केले म्हणजे सर्व अर्थपूर्णतेचा संग्रह कल्पित भविष्यांत मानण्यांत येतो, व अस्तित्वांत असलेल्या प्रत्येक वस्तूच्या खऱ्या महत्त्वाचें यथार्थदर्शन किंवा सिद्धि होऊं शकत नाही. **अनन्ततेमध्ये भरतीओहटीला जागा नाही; तिच्यांतील दोन पिकांमध्ये (Harvests) महत्त्वशून्य अवकाश नसतो; तर तिच्या समृद्धिपूर्ण अस्तित्वांतील एकही क्षण अर्थवंचित किंवा महत्त्वशून्य राहूं शकत नाही.** जेव्हा जीवन निष्क्रिय किंवा रितें व सुनें भासतें, तेव्हा सत्याची अनन्तता घटत नसते, तर व्यक्ति स्वत: त्या अनन्ततेमध्ये प्रवेश करुन तिची पूर्ण प्राप्ति करुन घेण्यास असमर्थ बनली असते.

समृद्धिपूर्ण अस्तित्व

ज्याप्रमाणे सर्व सारपूर्णतेचा संग्रह एखाद्या अपेक्षित भविष्यकाला (future) मध्येच समजणें अनुचित आहे, त्याचप्रमाणे तिचा सर्वसंग्रह केवळ खूप अवडम्बर असणाऱ्या घटनांमध्येच मानणें हेंही बरोबर नाही. आध्यात्मिक महत्ता (Spiritual significance) ही जीवनातील केवळ थोर व महान् घटनांमध्येच साठविलेली आहे, असे नाही. आध्यात्मिक गौरवास प्राप्त होण्याकरता, कोणतीहि गोष्ट असाधारण किंवा विशेष रुपाने आकर्षक असलीच पाहिजे, असें नाही. असाधारणत्व व आकर्षकत्वविशेष हे साधारण व नेहमींच्या वस्तूंशी सापेक्षतेने संबद्ध आहेत; त्यांच्यांत केवळ अध्यात्मसौंदर्य खात्रीने असेलच असें नाही. तेव्हा, मनुष्याला आध्यात्मिक महत्ता प्राप्त होण्याकरता, त्याने एखाद्या कार्याला खूप मोठी पैशाची देणगी देण्याची आवश्यकता नाही; गरीब मनुष्य असें करुं शकला नाही, तरी तो जर त्याला शक्य असलेली देणगी देईल, तर त्याची आध्यात्मिकता कोणत्याहि दृष्टीने कनिष्ठ प्रकारची ठरणार नाही. **देणगीच्या आंकड्याने देणगीला आध्यात्मिकता येत नसून, कोणत्या भावनेने ती देणगी दिली आहे, यावरुन तिची आध्यात्मिकता निश्चित होत असते.** खरें पाहतां, मोठ्या देणगीच्या मागे कधी कधी अभिमान किंवा स्वार्थपर उद्देश असूं शकतो; व असें असल्यास तिची आध्यात्मिक किंमत नष्ट होते. तसेंच एखादी लहानशी देणगी देखील पूर्णपणे निस्वार्थ प्रेमांत व नम्रभावांत दिली गेली, तर तिचें आध्यात्मिक महत्त्व कितीतरी अधिक असतें.

थोर व महान घटना

आध्यात्मिकता ही संख्यापरिमाणावर अवलंबून नसून, तो एक जीवनाचा गुणविशेष आहे. आध्यात्मिक अनन्ततेमध्ये जीवनाच्या सर्व अंगांचा समावेश होतो; तिच्यांत लहानमोठ्या सर्व क्रिया येतात. **आध्यात्मिक अनन्तता ही सर्वात अधिक मोठ्या वस्तूहून महान आहे; व तशीच ती सर्वात लहान वस्तूहून लहानहि आहे; बाह्यत: घटना लहान किंवा मोठ्या असल्या, तरी त्या दोहोंतून ती समानतेने अभिव्यक्त होऊं शकते.** या प्रकारें, एखादा दृष्टिक्षेप किंवा एखादें सुस्मित हे सत्यप्रत्यया (Truth-Consciousness) मध्ये उद्भवलें असेल, तर त्याचें

आध्यात्मिक अनन्ततेमध्ये सर्वात मोठ्या व सर्वात लहान दोनीही गोष्टींचा अंतर्भाव होतो.



जीवनाचा आणि सर्व मानवतेसाठी दिव्य चरित्राचा प्रयोग त्याने करुन दाखविलेला असतो. ज्यांच्या अंगी जरुर तें धैर्य व प्रामाणिकपणा असतो, ते त्यांस स्वेच्छेने अनुसरुं शकतात.

ज्यांच्या अंगी पारमार्थिक जागृति आहे, त्यांना हल्लींचा काल हा अवतारकालापूर्वी येत असलेल्या कालासारखा आहे हें माहीत आहे. जे स्त्रीपुरुष पूर्णपणें जागृत नाहीत त्यांना देखील हे आतां समजूं लागलें आहे; अंधकारांतून ते प्रकाशाकडे येण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपल्या दु:खांतून ते सुखाकडे जाण्याची इच्छा करीत आहेत. स्वत: जीवनकलहामध्ये आपण बुडून गेलों आहोंत असें त्यांना आढळून येत आहे; व त्या जीवनकलहांतून आपल्याला शांति व मुक्ति मिळावी अशी ते प्रार्थना करीत आहेत.

अंधकारांतून प्रकाशाकडे

पण, कांही काल त्यांना धीर धरलाच पाहिजे. विनाशाची लाट आणखी उंच वाढून ती अधिक दूरवर पसरली पाहिजे. परंतु, जेव्हा मनुष्य अगदी अंत:करणापासून संपत्तीपेक्षा कांही अधिक टिकाऊ व ऐहिक सामर्थ्यापेक्षा अधिक शाश्वत अशा वस्तूची इच्छा करील, तेव्हाच ही विनाशाची लाट ओसरेल. तेव्हाच शांति येईल; आनंद आणि प्रकाशहि तेव्हाच येईल.

शांतिसाम्राज्य केव्हा पसरेल?

माझें मौन सोडणें – माझी सार्वजनिक रीत्या प्रगट होण्याची खूण आतां फार लांब नाही. मनुष्य ग्रहणकरुं शकेल इतका परमोच्च अमोल ठेवा मी आणीत आहे. या अमोल ठेव्यांत इतर सर्व संपत्ती समाविष्ट आहेत. हा ठेवा अक्षय टिकणारा आहे व दुसऱ्यास देत जाण्याने हा वाढत जातो. ह्या अपार संपत्तीचें ग्रहण करण्यास तयार व्हा.

# ११ : सत्याची अनंतता

बऱ्याचशा लोकांची अशी समजूत असते की कोणत्याहि गोष्टीला आध्यात्मिक महत्त्व येण्याकरिता, ती जागतिक दृष्टीने फार मोठी असावयास पाहिजे. त्यांना असें वाटतें की एखादी कृति आध्यात्मिक स्वरुपाची गणली जाण्याकरता, त्या कृतीचे परिणाम फार दूरवर व जीवनाच्या विस्तीर्ण क्षेत्रावर ठळकपणे व्हावयास पाहिजेत. ते नेहमी कोणत्याहि कृतीचे महत्त्व तिच्या परिणामांच्या बाह्य परिमाणावरुन निश्चित करीत असतात. **साधारणत: मनुष्य स्थूल जगाच्या विषयांमध्ये इतका गर्क झालेला असतो, की न जाणतां, त्याच्या आध्यात्मिक मूल्य निश्चितीमध्ये स्थूल जगांतील आकार व परिमाणमात्रांचा मापदंड शिरतो; व त्याचे मूल्यनिरुपण सदोष व चुकीचें करतो.**

आध्यात्मिक मूल्यनिरुपणां-तील चुकीचें कारण

ह्या सर्व गोंधळाचें मूळ कारण असें आहे, की आध्यात्मिक मूल्यमापन करतांनाही साधारण माणसाच्या मनावर गणित शास्त्रांतील कल्पनांचे दडपण असतें. परंतु आध्यात्मिक महत्ता ही गणितशास्त्रांतील विशालतेहून अगदीच निराळी आहे. गणितशास्त्रांतील अनंतता ही सारख्याच परिमाणाचे व महत्त्वाचे असंख्य घटक एकत्रित करुन रचली गेली असल्याची कल्पना असते. परंतु अशी गणनात्मक अनंतता कल्पनेमध्येहि असाध्य आहे; कारण कोणत्याहि संख्येची कल्पना करताक्षणींच त्याहूनहि अधिक मोठ्या संख्येची कल्पना आपल्याला करता येते. तसेंच **कोणत्याहि एका घटकाला स्वतंत्र अस्तित्व किंवा महत्त्व दिल्यास तो मिथ्या ठरतो. भ्रान्त कल्पनेच्या विलासामुळेंच गणनात्मक (Mathematical) अनन्तता उत्पन्न होते.**

गणित शास्त्रांतील अनंतता

आध्यात्मिक अनन्तता ही कल्पनेमधे अनेक मिथ्या घटक एकत्रित करुन रचली जात नाही. ती सत्य वस्तु असून, कल्पना शांत झाल्यावरच तिचें दर्शन होतें. दुसरी एखादी वस्तू मिळविल्याने आध्यात्मिक अनन्तता वाढत नाही; व तिच्यांतून कोणतीही वस्तु काढून घेतल्याने



ती घटत नाही. खरें पाहतां, तिच्यामध्यें कोणतीही वस्तू मिळवितां येत नाही; व तिच्यातून कोणतीही वस्तू काढून घेता येत नाही; कारण तिच्यामध्यें सर्वच वस्तूंचा अंतर्भाव होत असल्यामुळे, तिच्या व्यतिरिक्त दुसऱ्या लहान किंवा मोठ्या कोणत्याहि वस्तूला जागाच राहात नाही. **आध्यात्मिक अनंतता गणनातीत, खंडरहित व संपूर्ण आहे.**

आध्यात्मिक अनन्तता

विश्वांतील कोणत्याहि घडामोडीचा आध्यात्मिक अनंततेवर परिणाम होत नाही. जगांतील सर्व घटना आभासरुप (phenomenal) असून सत्याच्या दृष्टीने शून्यवत् आहेत. उदाहरणार्थ, धरणीकंप ही जीवित व वित्त यांची अपरिमित हानी करणारी म्हणून जगाच्या दृष्टीने अतिशय घातक व भयावह आपत्ति ठरली, तरी जगाच्या बुडाशी असणाऱ्या अनंत सत्यावर त्या आपत्तीचा मुळीच परिणाम होत नाही. किंबहुना अखिल विश्वाचा प्रलय झाला तरीहि आध्यात्मिक अनंतता सीमित होत नाही. म्हणून, जगाच्या दृष्टीने मोठ्या गणल्या गेलेल्या वस्तूंच्या मापदंडाने आध्यात्मिक अनंतता मोजण्याचा प्रयत्न करणें फोल आहे.

अनंत सत्य हा केव्हा तरी भविष्य काळांत साध्य करण्याचा दूरवर्ती विषय असून, सर्व जीवन त्याच्या प्राप्तीकरता केवळ साधनमात्र आहे, ही भ्रान्त धारणा झटकून टाकणें, मुमुक्षूंना अत्यंत कठीण असते. परंतु सत्य हें केवळ भविष्यवर्ती असून भूतकालांत किंवा वर्तमाकालांत त्याचा अभाव झाला, तर तें अनंत राहणार नाही; व असें झाल्यास ती एक कालांत उत्पन्न होणारी घटना बनून सान्त होईल. **जीवनास भावी काळांतील सुदूरवर्ती घटनेच्या सिद्धीचें केवळ एक साधनमात्र मानलें, तर तें जीवन व त्या जीवनांतील सर्वस्व यांचे स्वत:सिद्ध (intrinsic) मूल्य एकदम नष्ट होतें.** हा दृष्टिकोणच अगदी चुकीचा आहे.

आध्यात्मिक अनन्तता हे भविष्यवर्ती साध्य नाही.

कोणत्या तरी आगामी दिवशी जीवनाला आध्यात्मिक संपन्नता प्राप्त व्हावी, हा कांही जीवनाचा अर्थ नाही; उलटपक्षी मन भ्रमभारापासून मुक्त केलें, तर प्रत्येक क्षणामध्ये जीवन आध्यात्मिक संपन्नतेने पुरेपूर भरलेलेंच आहे, हे प्रत्ययास येतें. **जेव्हा मन प्रसन्न व प्रशांत असतें, तेव्हाच आध्यात्मिक अनन्ततेचें खरें स्वरुप समजून येतें. आध्यात्मिक अनन्तता ही केवळ आगामी घटना नसून, ती पूर्वीपासूनच अस्तित्वांत असलेली निरंतर स्वयंसंपूर्णता (eternal self fulfilment) आहे; शिवाय ती हल्लीही आहेच व पुढेही तशीच राहणार आहे. जेव्हा प्रत्येक क्षण कालातीत महत्तेने संपन्न होतो, तेव्हा मृत भूतकालाबद्दल रेंगाळणारी आसक्ति राहात नाही, किंवा आगामी भविष्याबद्दल आशापूर्ण अपेक्षाहि राहात नाही, परंतु शाश्वत सद्य:क्षणा (eternal now) मध्येच अभंग जीवन राहतें.** अशा प्रकारच्या रहाणीनेच आध्यात्मिक अनन्तता जीवनामध्ये प्रतीत होऊं शकते.

अनंततेचा सद्य:क्षण

# १२ : स्वार्थाचें मूळ व पर्यवसान

कृति आणि अनुभव, यांमध्ये आपल्या वासनांची तृप्ति मिळवून घेण्याच्या प्रवृत्तिमध्येच स्वार्थाचा उगम होतो. स्वस्वरुपाच्या अज्ञानांतच स्वार्थाचा उद्भव आहे. जाणिवेच्या उत्क्रांतीच्या दीर्घ कालांत निर्माण झालेल्या निरनिराळ्या प्रकारच्या ठशांनी

स्वार्थीपणाचें पृथकरण

(Impressions) मानवी जाणिवेचें आकाश व्याप्त झालेलें असतें. हेच ठसे वासनांच्या रुपांत व्यक्त होतात, आणि जाणिवेचें कार्यक्षेत्र त्यांच्या योगाने मर्यादित होऊन बसतें. हे ठसे म्हणजेच संस्कार होत. ते जाणिवेच्या क्षेत्रांभोवती एक कुंपण उत्पन्न करतात. **संस्कारांचे** वर्तुळ म्हणजेच जाणिवेच्या क्षेत्रांची मर्यादा होय. या वासनांपैकी कांहीमध्ये कृति सुप्तावस्थेंत असते. परंतु कांही वासना मात्र कृतींच्या रुपाने व्यक्त होतात. कृतींच्या रुपाने व्यक्त होण्याचें वासनांचे सामर्थ्य हे त्यांच्याशी संबद्ध असलेल्या **संस्कारांच्या** प्रमाणावर आणि प्राबल्यावर अवलंबून असतें. भूमितीच्या रुपकाच्या भाषेंत बोलावयाचें म्हटलें, म्हणजे जेव्हा वासना कृतींत व्यक्त होते, तेव्हा ती तिच्याशी संबद्ध असलेल्या संस्कारांनी बनलेल्या वर्तुळाच्या त्रिज्येएवढें अंतर काटते. जेव्हा एखादी वासना पुरेशी बलवती होते, तेव्हा ती परिपूर्ण होण्यासाठी कृतीमध्ये व्यक्त होते.

वासनांच्या क्षेत्राएवढेंच स्वार्थाचें क्षेत्र आहे. अनंत वासनांच्या अडथळ्यांपुढे आत्म्याला स्वत:च्या खऱ्या स्वरुपाचें अनिर्बंध व पूर्ण प्रादुर्भवन करणें कठीण होऊन

अपेक्षेचा परिणाम असंतोष.

बसतें; आणि आयुष्य स्वार्थकेंद्रित व संकुचित होते. व्यक्तीच्या 'मी' पणाचे सारेंच जीवन हें सतत बदलणाऱ्या व नाश पावणाऱ्या गोष्टींच्या द्वारें वासनांची तृप्ति करुन घेण्याच्या प्रयत्नांच्या पकडीत असतें. **परंतु क्षणभंगुर गोष्टींच्या द्वारें खरी तृप्ति होणें कधीहि शक्य नाही.** पळत्या गोष्टीपासून मिळविलेलें समाधान टिकाऊ नसतें; त्यांत मनुष्याच्या वासना अतृप्तच राहतात. याप्रमाणे सार्वत्रिक असमाधान व अनेक प्रकारच्या चिंता उत्पन्न होतात.



एखाद्या कार्याकरता आत्माहुति देण्याइतकेंच महत्त्व असतें. **जेव्हा सर्व जीवन अनंततेच्या छायेंत व्यतीत होतें, तेव्हा त्यांत आध्यात्मिक महत्तेचे अंशभेद (gradations) किंवा श्रेणीभेद राहात नाहीत.** जीवनामध्ये केवळ मोठ्याच गोष्टी आल्या व लहान गोष्टी आल्या नाहीत, तर तें जीवन असीम तर होणारच नाही, पण अतिशय रितें होईल. जेव्हा जीवनाकडे समग्रतेने (totality) पाहिलें जाते, व जेव्हा त्याचा स्वीकार समग्रतेने करण्यात येतो, तेव्हाच प्रत्येक वस्तूमध्ये अंतर्हित असलेलें अनंत सत्य स्पष्टपणे अभिव्यक्त होऊं शकतें.

अहंकेंद्रित वासना व अभिमानप्रेरित इच्छा या दोहोंमुळे बंधन निर्माण होतें. **संग्रह करुन ताबा मिळविण्याचा लोभ हा कोणत्याहि स्वरुपांत असला, तरी जीवनास सीमाबद्ध करतो.**

अद्वैतांतील मुक्तावस्था व आनंद

उदाहरणार्थ, जेव्हा एखादा मनुष्य दुसऱ्या व्यक्तीच्या प्रेमाकडे लुब्ध दृष्टीने पाहतो, व जेव्हा त्या व्यक्तीचें प्रेम त्याला न मिळतां दुसऱ्या कोणाला मिळतें, तेव्हा त्याच्या आत्मजीवनाची गळचेपी होऊन, तें अत्यंत संकुचित होतें; व त्याला मर्यादितेची तीव्र जाणीव होते. याप्रमाणे जीव गुदमरुन टाकणाऱ्या मत्सराच्या यातना सुरु होतात. परंतु ह्याच परिस्थितीकडे लोभरहित अंत:करणाने पाहिलें, तर दुसऱ्याला मिळणाऱ्या प्रेमाचे नैसर्गिक सौंदर्य प्रत्ययास येईल. **निर्लोभतेमध्ये मिळणाऱ्या स्वच्छ दृष्टीचा लाभ होऊन, त्याला अद्वयावस्थेंतील विमुक्त स्थिति तर मिळेलच, पण तो त्या अवस्थेंतील आनंदाचा रसास्वादहि घेतो.** तो एकाच रुपाशीं संबद्ध होऊन, त्याच्या वतीने आग्रह न धरतां, जीवनांतील सर्व रुपांशी तादात्म्य पावत असल्यामुळे, दुसऱ्या कोणाला तें प्रेम प्राप्त झालें, तरी तें त्याला स्वत:लाच मिळाल्यासारखें भासतें.

अद्वैतांत बंधनापासून मुक्ति आहे व सर्व वस्तुजाताचें यथार्थ दर्शन व रसास्वादन आहे. **ज्या आध्यात्मिक अनंततेमध्ये शाश्वत व क्षयरहित आनंदाचा निश्चित लाभ होतो, त्या अनंततेची अनुभूति केवळ अद्वैतस्थितींतच होऊं शकते.** मत्सराप्रमाणेच क्रोध व रागद्वेष, हेही स्वयंनिर्मित

अद्वैताच्या द्वारां आध्यात्मिक अनंततेची सिद्धि

बंधनें आहेत. **सर्व प्रकारची ससीमता व मर्यादिता स्वयंनिर्मित व कल्पित असते; अहंचित्त व अहंप्रेरित कल्पना यांचा त्याग केल्यास, आहे त्याच्याच अनंत गौरवाची सम्यक् प्रतीति होते.**

अद्वैतदृष्टीने सत्याची अनंतता प्रतीत झाली, म्हणजे सामाजिक प्रश्न उत्कृष्ट रीतीने

सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत आध्यात्मिक अनंततेचा अर्थ

सोडविण्याकरिताही तिचा उपयोग होतो. द्वैताला अनिवार्य सत्य मानल्यास सामाजिक प्रश्न कधीहि उत्तम रीतीने सुटूं शकत नाही. समाज व व्यक्ति यांमधील संस्थापना (Adjustment) किंवा विविध सामाजिक संस्थांमधील सुसंगति ही केवळ संख्येच्या कुशल योजनेने साध्य होऊं शकत नाही.

अल्पसंख्य (Minority) लोकांच्या हिताकडे पाहून सामाजिक हक्क निश्चित झाले, तर बहुसंख्य (Majority) लोकांच्या हितसंबंधांना अभिव्यक्ति न मिळून, बहुसंख्य लोक अल्पसंख्य लोकांचे विरोधक प्रतिस्पर्धी बनल्याशिवाय राहात नाहीत. उलटपक्षीं, लोकसत्तावादी

अल्पसंख्य व बहुसंख्य

राष्ट्रांमध्यें बहुसंख्य लोकांच्या हिताकडे दृष्टी ठेऊन **सामाजिक हक्क** निश्चित होतात; व अल्पसंख्य लोकांचे हित बाजूला राहतें. परंतु हा दृष्टिकोण देखील नानात्वप्रधान द्वैतमय क्षेत्रांतीलच आहे. त्यांत अल्पसंख्य लोकांचे प्रश्न तसेच कायम राहतात. ह्या दृष्टिकोणांत अल्पसंख्य लोकांचे हितसंबंध अभिव्यक्त होत नसल्यामुळें, हे अल्पसंख्य लोक बहुसंख्य लोकांचे विरोधक प्रतिस्पर्धी बनल्याशिवाय राहत नाहींत.

जोंपर्यंत सामाजिक प्रश्नांमध्ये नानात्व व संख्या यांचे प्राधान्य असतें, तोंवर ते कायमचे व समाधानकारक रीतीने सुटू शकत नाहीत. कोणतीहि सोडवणूक कायमची

अविभाज्य समष्टि

होण्याकरता, ती **सर्वांचे मूलभूत ऐक्य व समष्टीची अविभाज्यता (Indivisible Totality) ह्या सत्याने प्रकाशित व्हावयास पाहिजे. सर्वांतर्यामी असलेल्या एकमेव तत्त्वास नानात्वाचे संवर्धन (Multiplication of the many) करुन स्पर्श करतां येत नाही. संख्या कितीहि मोठी असली, तरी ती मर्यादितच असते. आध्यात्मिक अनंतता ही एक संख्या नसून, एकमेवाद्वितीय असें सत्य आहे.**

जेथे अनेक आहेत, तेथे त्यांच्यामध्ये तुलना होणारच; तेथे अल्पसंख्या व बहुसंख्या राहणार; तेथे राखीव हक्कव अधिकार यांच्या बाबतींत तरतमभाव उत्पन्न होऊन, विविध

नानात्वाचें जग

श्रेणीभेदामुळे मूल्यमापन दूषित होतें. आध्यात्मदृष्टीने पाहतां, हे सर्व भ्रान्त जाणिवेचेच प्रकार आहेत; कारण प्रत्येकांत स्पन्दमान होणारें सत्य एकच आहे. परंतु सत्यप्रत्ययांत अनुभवास येणारी एकता ही समानते (Equality) च्या तत्त्वाहून भिन्न आहे.

कोणतीहि एक व्यक्ति महत्त्व, हक्क व अधिकार या बाबतींत दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीच्या बरोबरीची आहे, हा समानते चा अर्थ आहे. उलटपक्षी, सत्याच्या आध्यात्मिक अनन्ततेमध्ये एका व्यक्तीलाच समष्टि (Totality) मानण्याच्या विरोधाभासालाहि जागा राहते; व म्हणून एकाच व्यक्तीला दोन किंवा अधिक व्यक्तीइतकेंच नव्हे, तर सर्वांच्या बरोबरीचें

प्रत्येकामधील व सर्वांमधील एकमेव तत्त्व

महत्त्व देतां येते. **आध्यात्मिक अनन्ततेमध्ये मुळी तुलनेलाच वाव राहत नाही; तेथे लहानथोर नाहीत; तेथे हक्क व अधिकार यांच्या बाबतींत तरतमभावाचे श्रेणीभेद नाहीत. व तेथे व्यक्तिव्यक्तींत व सर्वांमध्ये वसणाऱ्या एकमेव सत्याचें अप्रतिहत दर्शन झाल्यामुळे, मूल्यनिश्चिती निर्भ्रान्त होते. प्रत्येकजण आध्यात्मिक अनन्ततेमध्ये अंतर्भूत आहे, इतकेंच नव्हे, तर ती अनन्तताच तो आहे; व**



**म्हणून प्रत्येकाला पहिल्या प्रतीचें महत्त्व असून, कोणालाच दुय्यम स्थान राहात नाही.**

सत्याच्या आध्यात्मिक अनंततेचें ज्ञान झाल्यास, सामाजिक जीवनांतील व्यक्तिवाद व समूहवाद या दोहोंचेंहि उच्चाटण होतें; त्यांत अविभाज्य समष्टी (Indivisible Totality) चा म्हणजे खंडरहित समग्रतेचा नवीन दृष्टिकोण उत्पन्न होतो. **प्रत्येक वस्तुमात्रांतील**

नवीन संस्कृति

**स्वत:सिद्ध महत्तेची ओळख पटल्यामुळे, ह्या नवीन दृष्टिकोणामध्ये, सर्व सापेक्ष व तुलनात्मक मूल्यें गळून पडतात.** आध्यात्मिक अनंततेच्या यथार्थ ज्ञानावर रचलेल्या संस्कृतीमध्ये, बहुसंख्य व अल्पसंख्य लोकांचे प्रश्न, स्पर्धायुक्त चढाओढी व भेदप्रवण अहंभावास आश्रय देणाऱ्या नानाविध तुलना व मापें, यांना वाव उतरणार नाही. या संस्कृतीमध्ये भेद व गुंतागुंत उत्पन्न करणारे भ्रम नाहीसे होतील; व त्यामुळे जीवनांत नितांत सरलता व संपूर्णता येईल.

दुसरीं **मायेचीं द्वंद्वें,** यांच्या पलीकडे असलेल्या **समष्टिरुप आत्मीयतेमध्यें त्यागाची** देखील कल्पना विराम पावते. स्वार्थरहित परमोच्च स्थिति म्हणजेच सर्वांशी तादात्म्य पावण्याचा प्रारंभ होय. मुक्तीच्या स्थितीमध्ये, सर्वसाधारण स्वरुपाचा स्वार्थहि नसतो, अगर नि:स्वार्थहि नसतो; तर या दोहोंची परिणति होऊन, ते दोन्हीही सर्वात्मभावनेमध्ये विरुन जातात. सारें चैतन्य मूलत: एकच आहे, ही प्रतीति आली, म्हणजे शांति आणि आनंद यांचा लाभ होतो. एकत्वाच्या अनुभवामुळे अध्यात्मपर जीवनाचा प्रवाह बंद होत नाही, अगर व्यवहारांतील गोष्टींचें सापेक्ष महत्त्व नष्ट होत नाही. आत्मीयतेची भावना ही अखिल वस्तुमात्राशीं संवादिता उत्पन्न करते; पण त्यामुळे तुलनात्मक विवेक नष्ट होत नाही. तसेंच या सर्वात्मभावनेंत अचल शांति मिळते; परंतु सभोवतालच्या परिस्थितीविषयी बेफिकिरी उत्पन्न होत नाही. आणि ही एकत्वाची जाणीव कल्पनांच्या संचयावर आधारलेली नसून ज्यामध्ये सर्वांचा समावेश होतो, अशा अन्तिम सत्याशीं वस्तुत: झालेल्या ऐक्यावर अधिष्ठित असते.

अंतिम सत्याशी ऐक्य

सर्व वासनांचा निरास करुन आणि अन्तिम सत्याशीं एकरुप होण्याची केवळ एकच इच्छा ठेऊन, तुमचें अन्त:करण खुलें करा. सभोवतालच्या बदललेल्या परिस्थितीमध्ये तें अन्तिम सत्य शोधावयाचें नसतें, तर तें स्वत:मध्येच शोधावयाचें असतें. जेव्हा जेव्हा अंतरात्मा तुमच्या मानवी अन्त:करणांत प्रवेश करण्याची इच्छा करतो, तेव्हा तेव्हा ते वासनांनी परिपूर्ण भरलेलें व सर्व द्वारें बंद असलेलें आढळून येते. तुमच्या अंत:करणाचीं द्वारें बंद ठेवूं नका. सर्व भूतमात्रांत शाश्वत आनंदाचें उगमस्थान आहे, तरीही अज्ञानाने उत्पन्न झालेल्या वासनामुळे, सर्व लोक दु:खीच असतात. उपाधियुक्त अहंभाव जेव्हा सर्व वासनांसहित मावळतो, तेव्हाच चिरंतन आनंदाचें ध्येय पूर्णपणें प्रकाशमान होते.

आध्यात्म ही जीवनविषयक निश्चयात्मक प्रवृत्ति होय.

वासनांचा त्याग म्हणजे देहदंड किंवा जीवनविषयक निषेधप्रधान वृत्ति नव्हे. अशा प्रकारच्या केवळ निषेधात्मक वृत्तीमुळे मानव अमानुष बनेल. देवपणा मानवतेस सोडून नाही. अध्यात्माने मानवतेचा उत्कर्ष झाला पाहिजे. मनुष्यांमध्ये जें चांगलें, विशाल आणि सुंदर असेल, तें प्रकट करण्याची प्रवृत्ति म्हणजेच अध्यात्म होय. परिस्थितीमध्ये जें सुंदर आणि मधुर असेल, त्या सर्वांचा अध्यात्मामुळे परिपोष होतो. अध्यात्मपर जीवन म्हणजे बेजबाबदारपणा नाही; व त्याकरिता व्यवहारांतील कर्तव्यांचा त्याग करण्याची आवश्यकता नाही. व्यक्तीचे समाजांतील विशिष्ट स्थान व त्याची परिस्थिति, यामुळे उत्पन्न होणारी जबाबदारी पार पाडतांना अगर व्यवहारांतील कर्तव्य करीत असतांना, अन्तरात्मा वासानासंभारापासून केवळ विमुक्त राहिला म्हणजे पुरें. द्वंद्वांच्या गुंतागुंतीपासून अलिप्त असण्यांतच पूर्णता आहे. ही गुंतागुंत सुटल्याशिवाय, अबाधित व उद्भवकर अस्तित्वास प्रारंभ होऊं शकत



खंडित (Frustrated) अहंभाव मुख्यत्वाने काम, क्रोध आणि लोभ, यांमधून व्यक्तरुप होतो. कामवासना बऱ्याच बाबतींत लोभासारखीच असते. परंतु तिच्या तृप्तीच्या पद्धतीमध्ये फरक आहे, कारण तिचा या स्थूल जगताशीं संबंध आहे. स्थूल शरीराच्या माध्यमांतून कामवासना व्यक्तरुप होते; आणि तिचा स्थूल देहाशी संबंध असतो. स्थूल जगताशी बांधणाऱ्या शृखंलेचा हा एक प्रकार आहे. लोभ ही एक हृदयाची अस्वस्थ स्थिति आहे. सत्ता आणि संपत्ति यांची हाव हें त्याचें रुप होय. वासनांच्या तृप्तीसाठीच संपत्ति आणि सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. वासनांची तृप्ति करण्याच्या प्रयत्नांत मनुष्याचे केवळ कांही अंशानेच समाधान होतें. आणि हे अर्धवट समाधान लोभाची आग विझवून टाकण्याऐवजी तिला वारा घालून अधिक प्रज्वलित करितें. अशा रीतीने लोभाच्या क्रीडाक्षेत्रास अमर्याद वाव मिळतो. तो मनुष्यास सदैव असंतुष्ट करुन सोडतो. लोभाच्या मुख्य रुपांचा संबंध मनुष्याच्या विकारांशी असतो. सूक्ष्म जगताशी बांधणाऱ्या शृंखलेचा हा एक प्रकार आहे. क्रोध हा चिडलेल्या मनाची ज्वाला होय. इच्छा खुडल्या गेल्यामुळे अगर अपुऱ्या राहिल्यामुळे त्याचा उद्‌भव होतो. तो उपाधियुक्त अहंभावाचे पोषण करतो; व सत्ता आणि चढाई यांकरिता त्याचा उपयोग होतो. वासनांच्या पूर्तीमध्ये येणारे अडथळे दूर करणें, हे क्रोधाचें लक्ष्य असते. क्रोधाची लहर ही अहंभाव व गर्व यांस पुष्ट करते. क्रोध हा उपाधियुक्त अहंभावाचा सर्वांत मोठा सहकारी होय. मन हें क्रोधाचें स्थान आहे; आणि मनाच्या चेष्टांमधूनच तो बहुधा व्यक्त होतो. मानसिक गुंतागुंतीचें क्रोध हे एक रुप आहे. काम, क्रोध आणि लोभ, यांची अनुक्रमें शरीर, मन व हृदय ही व्यक्त होण्याचीं साधनें होत.

काम, क्रोध व लोभ

मनुष्याला काम, क्रोध व लोभ यांमुळे निराशेचा अनुभव येतो; तरी देखील तो खंडित अहंभाव काम, क्रोध आणि लोभ यांच्या द्वारांच अधिक समाधान मिळविण्याच्या मागें लागतो. अशा तऱ्हेन जाणीव ही चिरकाल निराशेच्या दुष्ट वर्तुळामध्ये सापडते. काम, क्रोध अगर लोभ, हे व्यक्त होण्यामध्ये अडथळा आल्यास निराशा उत्पन्न होते. याप्रमाणें, निराशा ही स्थूल, सूक्ष्म व मानसिक गुंतागुंतीची सर्वसामान्य प्रतिक्रिया असते. काम, क्रोध व लोभ, हे स्वार्थाचें क्षेत्र व्यापून असतात. त्यांच्या अपूर्तीमुळे उद्भवलेली खिन्नता म्हणजेच निराशा होय. या तिन्ही अंगीभूत दुर्गुणांचे मूल जो स्वार्थ तोच शेवटी निराशा आणि काळजी यांचे कारण असतो. स्वार्थ हा आत्मघातकी आहे. तो वासनांच्या द्वारें तृप्ति करुन घेण्याचा प्रयत्न करतो; परंतु शेवटी चिरस्थायी असमाधानच त्याच्या वाट्यास येते.

दुष्ट वर्तुळ

वासना अमर्याद असल्याने स्वार्थ हा खास असमाधान आणि निराशा यांप्रत नेतो. म्हणून सुखाचा प्रश्न हा वासना सोडण्याचा प्रश्न होय. केवळ यांत्रिक दडपणामुळे वासनांवर ताबा मिळवितां येत नाही. केवळ ज्ञानानेच

सुखाचा मार्ग.

त्या नष्ट होऊ शकतात. विचारांच्या साम्राज्यांत तुम्ही खोल जाऊन पाहाल, आणि थोडा वेळच जर गंभीरपणाने विचार कराल, तर तुम्हाला वासनांचा फोलपणा समजून येईल. आतापर्यंत जे सुख उपभोगिलें व दुःख उपभोगिलें त्याचाहि विचार करा. आजपर्यंत आयुष्यांत ज्याचा उपभोग घेतला तें आज कांहीच नाही; व जें दुःख उपभोगिलें तेंहि आज समोर नाही. सारा कांही भ्रम होता. आनंदमय असणें हें तुमच्यावर आहे; तरीहि तुम्ही केवळ वस्तूंच्या हव्यासाने स्वतःवर दुःख ओढवून घेता. लोभ हाच सतत अस्वस्थतेचें मूळ आहे. तुम्हाला हवी ती वस्तू मिळाली नाही, म्हणजे तुम्ही निराश होता व जर ती तुम्हास मिळाली, तर तुम्हांला ती अधिकाधिक हवी असते; आणि म्हणून तुम्ही दुःखी होता. 'मला कांहीहि नको' असें म्हणा, आणि सुखी व्हा. वासनांच्या फोलपणाची अविरत जाणीव तुम्हाला ज्ञानप्रद होईल. आणि हें तत्त्वज्ञान तुम्हाला गरजांपासून मुक्त करुन, चिरंतन सुखाचा मार्ग दाखवील.

वासनात्याग.

वासना व गरजा यांमधील फरक काळजीपूर्वक समजून घेतला पाहिजे. अभिमान व क्रोध, आणि लोभ, ही सर्व वासनांची रुपें आहेत. तुम्हाला वाटेल, 'जे मला हवेसें वाटतें, तें सर्व मला आवश्यक आहे' परंतु ती चूक आहे. एखाद्या वाळवंटांत प्रवास करतांना जर तुम्हाला तहान लागली असेल, तर तुम्हाला चांगल्या पाण्याची आवश्यकता आहे, परंतु लेमोनेडची नाही. जोंपर्यंत मनुष्यास देह आहे, तोंपर्यंत मनुष्यास कांही आवश्यक गोष्टी असणारच; आणि त्या मागविणें हेंहि जरुर असतें. परंतु वासना ह्या विकृत कल्पनेपासून उत्पन्न होतात. जर कांही सुख मिळवावयाचें असेल, तर वासना टाकून दिल्या पाहिजेत. स्वार्थ हा वासनामय असल्याने **वासनांचा त्याग म्हणजे मरणच होय.** स्थूल देहापासून अलग होणें यास सर्वसाधारण अर्थानें मरण म्हणतात. परंतु खऱ्या अर्थानें, मरण म्हणजे नीच इंद्रियवासनांचा त्याग होय. स्वर्गनरकांची उदासवाणीं चित्रें रंगवून धर्मगुरु लोकांस खोट्या मरणासाठी तयार करीत असतात. परंतु जीवनप्रवाहामध्ये अखंड सातत्य असल्याने, तें मरण हा केवळ भ्रम असतो. खरें मरण म्हणजे वासनात्याग हें होय; आणि तें पायऱ्या पायऱ्यांनी हळूहळू येतें.

प्रेम व सेवा

प्रीतीच्या उदयामुळे स्वार्थाचें मरण सोपें होतें. प्रीतीनेच मनुष्य खऱ्या अर्थानें मरत असतो. तुम्हीं जर परस्परांवर प्रेम करुं शकणार नाही, तर जो तुम्हाला दुःख देत असेल, त्यावर तुम्हीं प्रेम कसें करुं शकाल? स्वार्थांची बेडी अज्ञानामुळेच उत्पन्न होत असते. आपल्या कृतीचें व अभिरुचींचें क्षेत्र वाढविल्याने आपणांस अधिक उच्च प्रकारचें समाधान मिळेल, असें जेव्हा मनुष्याच्या लक्षांत येतें, तेव्हा तो सेवातत्पर जीवनाकडे वळतो. या स्थितीमध्ये त्याला पुष्कळ सद्वासना असतात. इतरांचे दुःखनिवारण करुन, व मदत करुन, त्यांना सुख द्यावे, असें त्याला वाटतें. आणि अशा



सद्वासनांमध्ये जरी अप्रत्यक्षपणें स्वार्थांशी संबंध असतो, तरी चांगल्या कृत्यावर संकुचित स्वार्थाची पकड नसते. सद्वासनादेखील एका अर्थानें उच्च प्रकारच्या आणि विस्तृत स्वार्थाचींच रुपें असतात; कारण वाईट वासनांप्रमाणे, त्याहि द्वंद्वांच्या राज्यांतच वावरत असतात. परंतु सद्वासनांची पूर्ति करीत असतांना, स्वार्थ हा परिणामीं ज्यांत त्या सद्वासना देखील नष्ट होऊन जातील, अशा विशाल कल्पनेचा अंगीकार करीत असतो. स्वतःचीच चमक दाखविण्याऐवजी अगर स्वतःकडेच लोकांना आकर्षून घेण्याऐवजी अगर संग्रहशील (Possessive) बनण्याऐवजी, मनुष्य दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्यास शिकतो.

स्वार्थाची उत्पत्ति

अहंभावाच्या घटकांमध्ये ज्या वासना शिरतात, त्या चांगल्या किंवा वाईट असतात. साधारणपणे, वाईट वासनांना स्वार्थाचा प्रकार समजतात. परंतु स्वार्थ आणि त्याग यांना विभागणारी अशी एखादी सीमारेखा नाही. दोन्हीहि द्वंद्वाच्या राज्यांतच वावरतात. शुभाशुभद्वंद्वातीत दृष्टीने पाहातां, स्वार्थ आणि त्याग यांतील फरक मूलतः क्षेत्रविस्तारांत आहे. व्यक्तीच्या अहंभावयुक्त जीवनाची स्वार्थ आणि त्याग ही एकमेकांशी संबंध असलेलीं दोन अंगे आहेत. संकुचित व्यक्तित्वाभोवती जेव्हा सर्व वासना गोळा होतात, तेव्हा स्वार्थ उत्पन्न होतो. जेव्हा या अव्यवस्थित अवस्थेंतील वासनासमूहाची वाताहात होऊन जाते, तेव्हा त्यागाचा उगम होतो; आणि वासना विरल होऊन त्या अधिक क्षेत्र व्यापतात. स्वार्थ म्हणजे मर्यादित क्षेत्राभोवती इच्छा संकुचित करणें होय; व त्याग म्हणजे इच्छेने विस्तृत क्षेत्रास व्यापणें होय. विरोधाभासाच्या द्वारें सांगावयाचें, म्हणजे त्यागाचे स्वार्थ हे संकुचित स्वरुप होय; आणि त्याग म्हणजे स्वार्थास कृतीच्या अधिक व्यापक क्षेत्रांत आणणें होय.

स्वार्थाचें निःस्वार्थांत रुपांतर

**द्वंद्वांच्या क्षेत्रापलीकडे जाण्यापूर्वी, स्वार्थाचें निःस्वार्थांत रुपांतर झालें पाहिजे.** सतत आणि चिकाटीने केलेली सत्कृत्यें हीं स्वार्थाला झिजवून टाकतात. चांगल्या कृत्यांतून व्यक्त झालेला आणि त्यात विस्तृत झालेला स्वार्थ हा अंतीं स्वार्थाच्याच नाशास कारण होतो. **पुण्य म्हणजे पुष्ट होत असलेल्या आणि नष्ट होत असलेल्या स्वार्थामधील सांधा आहे.** प्रथमतः स्वार्थ हा वाईट प्रवृत्तींचा जनक होत असला, तरी अखेर तो सत्कृत्यांच्या द्वारां, स्वतःचाच पराजय करुन घेणारा वीर ठरतो. जेव्हा असत् प्रवृत्तींची जागा सत् प्रवृत्ति घेतात, तेव्हा स्वार्थाचें त्यागांत रुपांतर होते; म्हणजे जगाविषयींच्या कळकळींत स्वार्थ स्वतःस विसरुन जातो. हे चांगलें आणि त्यागयुक्त जीवन जरी परस्पर विरोधी द्वंद्वांनी बद्ध असलें, तरी पुण्य हे द्वंद्वापासून मुक्त होण्यास आवश्यक आहे. पुण्य हें स्वतःचें अज्ञान नष्ट करण्याचें साधन आहे.

समष्टिरुप आत्मीयता

पुण्यशील जीवनांतून आत्मा परमेश्वराकडे जातो. पापपुण्य, दुर्गुणसद्गुण आणि

**नदींतील भोवऱ्याप्रमाणे होय.** आत्मा हा वासनांत गुरफटला जातो; आणि त्याच्यामुळे निर्माण झालेल्या वर्तुळाच्या बाहेर तो पडूं शकत नाही. तो आपल्याच कल्पनेने ह्या मर्यादा निर्माण करतो; व त्यांतच स्वत: मोहवश होतो. नंतर तो स्वत:ला मर्यादित व इतरांहून निराळा पाहतो. तो व्यक्तिगत अस्तित्वांतच गटंगळ्या खातो; व जितकीं मनें व शरीरें दृष्टीस पडतात, तितक्या त्याला निरनिराळ्या अनेक व्यक्ति भासतात.

निराळेपणा हा कल्पनेचा आभास होय.

एखाद्या बिलोरी काचेंतून सूर्याची किरणें जाऊं दिली असतां ती विस्कळित होतात; व कांचेमुळे त्यांना अनेकत्व प्राप्त होतें. जर या प्रत्येक किरणाला जाणीव असती, तर त्यांनी स्वत:ला दुसऱ्याहून पृथक मानलें असतें; व त्यांना आपण एकाच सूर्यकिरणांतून उत्पन्न झालेले आहोंत, याविषयी विसर पडलेला दिसून आला असता. त्याच प्रमाणे एकच सर्वश्रेष्ठ आत्मा हा मायेच्या जाळ्यांत अडकून स्वत:ला अनेक समजूं लागतो. पण खरें पाहतां, असें मुळीच नसतें. **व्यक्तींचे पृथकत्व हे खरें पाहिलें असतां अस्तित्वांतच नसतें. पण कल्पनेमुळे व्यक्तीला पृथक् अस्तित्वाचा भास होतो.** सर्वान्तर्यामीं एकच असणारा आत्मा स्वत:लाच पृथक् मानूं लागतो; आणि या पृथक् भावनेमुळे, 'मी' व 'माझे' आणि 'तूं' व 'तुझे' असा भेदभाव उत्पन्न होतो. खरे पाहिलें असतां, आत्म्याचे कोणतेच भाग पडूं शकत नाहीत. तो सर्वात सारखाच असला, तरी स्वत:ला पृथक् पृथक् व विभागला गेलेला असा निव्वळ कल्पनेमुळे मानतो. ही खोटी कल्पना आहे. कल्पना अत्यंत विशाल असली, तरी ती सत्यापासून दूरच असते. कल्पना ही सत्याव्यतिरिक्त इतर कांहीहि असूं शकेल. आत्म्याला निराळेपणांत जो कांही अनुभव येतो, तो सर्व काल्पनिक होय. आत्म्याच्या या पृथकतेच्या कल्पनेंतूनच अनेक व निरनिराळ्या भासणाऱ्या व्यक्ती उदयास येतात. यालाच अज्ञान किंवा माया म्हणतात.

दृश्य जगत्.

मर्यादित व पृथक् अस्तित्वाबरोबरच स्थूल जगताच्या काल्पनिक अस्तित्वात सुरुवात होते. ज्याप्रमाणे मर्यादित व पृथक् अस्तित्वाला केवल कल्पनासाम्राज्यांतच अस्तित्व असतें, त्याचप्रमाणे या स्थूल जगताला देखील खरें वास्तव्य नसून, कल्पनेमुळेच तें अस्तित्वांत आहे, असा भास मात्र होतो. जेव्हा आत्मा मायेच्या द्वैतांत उतरतो, तेव्हा त्याला मर्यादितपणा व विविधता प्राप्त होते. हा आत्म्याने स्वत: निर्माण केलेला मर्यादितपणा, म्हणजे जाणिवेच्या यज्ञवेदींत केलेला त्यागच होय. जरी तो पूर्वीप्रमाणेच अनंत व एक असतो, तरी कालाने मर्यादित, अनेक प्रकार असलेल्या आणि उत्क्रांति होत असणाऱ्या या जगतांत आल्यामुळे, त्याला अपरिमित संकुचितपणा प्राप्त होतो. तरी देखील आत्म्याचें अध:पतन खरोखर होत नसून, मर्यादित व पृथक् अस्तित्व उत्पन्न होणाऱ्या जाणिवेंतच बदल होत असतो.



नाही. परंतु गुंतागुंतीच्या भीतीने जीवनापासून दूर पळण्याने ही मुक्तता प्राप्त होत नसते. असलें पळणें म्हणजे जीवनाचा निषेध होय. निसर्गातून व्यक्त होणाऱ्या द्वंद्वापासून दूर राहण्यांत पूर्णता नाही. या गुंतागुंतीपासून दूर पळण्याच्या प्रयत्नांत, जीवनाबद्दलची भीति दिसून येते. द्वंद्वाचा प्रभाव होऊं न देता, जीवनास व्यवस्थितपणे व पूर्णपणें तोंड देणें, यांतच परमार्थ आहे. परमार्थ म्हणजे मनाची निभ्रान्त स्थिति असून, त्याच्या प्रभावांत सर्व प्रकारचा मोह निर्बल होतो. जीवनाच्या निरनिराळ्या स्वरुपांशी संबंध न टाळतां, सिद्ध पुरुष हा आत्यन्तिक कर्तव्यतत्परता राखूनहि पूर्णपणे अलिप्त राहूं शकतो.

# १३ : ईश्वर व व्यक्ती

ईश्वर अनंत आहे. तो चांगलें व वाईट, खरें व खोटे, सुख व दुःखः, जन्म व मृत्यु – या सर्व द्वंद्वांहून श्रेष्ठ आहे. अद्वैत सत्य हेंच ईश्वराचें स्वरुप होय. ईश्वराला निराळें असें अस्तित्व नाही. ज्याप्रमाणे चांगलें हे वाईटाचें विरोधी असतें, त्याप्रमाणे ईश्वर देखील, ईश्वर

ईश्वर हेच एक सत्य होय.

नसलेल्या वस्तूचा विरोधी आहे, अशी शंका घेतल्यास, ईश्वराचें अनंतत्व हे मर्यादितेच्या विरुध्द आहे, अशी शंका घेतल्यास, ईश्वराचें अनंतत्व हें मर्यादितेच्या विरुध्द आहे, असा गैरसमज होतो. जेव्हा आपण अनंतत्व व मर्यादिता या दोघांविषयी बोलतों, तेव्हा आपण त्यांना दोन निरनिराळे असें दाखवितों; आणि अनंतत्व हें मर्यादिताविरोधी बनतें. परंतु अनंतत्व हें द्वंद्वातीत आहे. जेव्हा आपण अनंतत्व हें मर्यादितपणाच्या विरुध्द आहे, अशा दृष्टीने पाहतों, तेव्हा, खरें पाहिलें असतां, ते अनंत राहत नाही, तर मर्यादितपणाचा एक विरुद्ध भाग म्हणून तें समजलें जातें; व म्हणून तें मर्यादित बनतें. आणि **ज्याअर्थी अनंतत्व हें मर्यादितपणाची दुसरी बाजू होत नाही, त्याअर्थी मर्यादितपणाचें भासणें खोटें ठरतें,** कारण खरें अस्तित्व अनंत सत्यालाच आहे. ईश्वर केव्हाहि द्वैतांत बांधला जाऊं शकत नाही. **वास्तविक पाहतां, सत्य हें एकच आहे;** व तें सर्वान्तर्यामी आहे. मर्यादितपणाचें अस्तित्व केवळ काल्पनिक आहे.

तुम्हीं अनंत आहां. तुम्ही खरोखरच सर्वांतरात्मा आहां. परंतु **तुम्हा शरीरालाच 'मी' म्हणून समजता व म्हणून स्वत:ला मर्यादित मानता. शरीर हेंच माझें खरें स्वरुप होय, असा जर तुम्ही विचार कराल, तर तुम्ही आपलें खरें स्वरुप ओळखलें नाही,** असेंच म्हणावें लागेल.

मर्यादितपणाचें दिखाऊ अस्तित्व

तुम्ही स्वस्वरुपाचा शोध करुन आत्मस्वरुपाचा खरा अनुभव घ्याल, तर तुम्हाला खात्रीने कळून येईल, कीं वस्तुत: तुम्ही अनंतच आहांत, व सर्व भासमान जगाच्या पलीकडे आहां. परंतु तुम्ही 'मी देह आहे', अशी चुकीची समजूत करुन घेता. हीच चुकीची समजूत म्हणजे



अज्ञान होय. अज्ञान हें मनाच्या द्वारें कार्यक्षम होतें. साधारण मनुष्य स्वत:ला स्वत:चें शरीर समजतो; आध्यात्मिक उन्नति झालेला मनुष्य स्वत:ला सूक्ष्म शरीर समजतो; साधु लोक स्वत:ला कारण शरीर समजतात. परंतु यापैकी कोणालाहि आत्म्याचें खरें खरें स्वरुप कळलेलें नसतें. आत्मा हा अनंत आहे; व तो मन व शरीराहून भिन्न आहे. परंतु अज्ञानामुळे आत्मा हा मनाच्या आधीन होतो; व स्वत:ला कधीं शरीर तर केव्हा मन असें मानतो. जो मायेतून मुक्त झाला नाही, तो मनुष्य जगांत निरनिराळ्या असंख्य व्यक्ति आहेत, असें समजूं लागतो. जितकीं मनें व शरीरें दिसतात, तितक्या निरनिराळ्या व्यक्ति आहेत, असें त्याला वाटूं लागते. वस्तुत: आत्मा हा एक असून, तो सर्वान्तर्यामी आहे. परंतु प्रत्येक व्यक्ति स्वत:ला इतरांपासून निराळी समजते. सर्व निरनिराळ्या भासणाऱ्या व्यक्तींच्या मनामागे व शरीरामागे एकच शक्ति (आत्मा) वास करते, व त्यांमधूनच त्यांना अनेकत्वाचा अनुभव येतो. सर्वान्तर्यामीं एकच असणारा आत्मा अनेकसा भासूं लागतो, ह्याचें कारण मनाची भ्रामक कल्पना अथवा चुकीची विचारसरणी हें होय.

संचित संस्कारांमुळे चुकीच्या विचारांस चालना मिळते; व संस्कारजन्य वासनांमुळे जाणीव आपलें खरें कार्य करुं शकत नाही. मागील अनेक जन्मांतील निरनिराळ्या अनुभवांच्या

अशुद्ध विचारसरणीचें कारण.

संस्कारांचाचा पगडा जाणिवेवर बसतो; व ह्याच संस्कारांमुळे आत्म्याविषयींचें ज्ञान झाकलें जातें. **विचारांत संस्कारांच्या आवरणाचा भंग करण्याची शक्ति नसेल, तर स्वत:च्या चुकीच्या विचारामुळे, जाणिवेंत भ्रम उत्पन्न होतो; व हा भ्रम** जाणिवेची कमी उत्क्रांती झालेल्या प्राण्यांतच दिसून येतों, असें नसून, जाणिवेचा पूर्ण विकास झालेल्या मानवांतहि दिसून येतो.

दगडाच्या योनींतून क्रमाने उत्क्रांति पावणारी जाणीव, हळूहळू वाढत जाऊन, मानवयोनींत पूर्ण विकास पावते. उत्क्रांतीचा इतिहास म्हणजे जाणिवेच्या संथपणे झालेल्या उन्नतीचा इतिहास आहे. उत्क्रांतीचें फळ म्हणजे पूर्ण जाणीव होय; व ती मनुष्यांत आढळते. परंतु ही पूर्ण

पूर्ण जाणिवेचें क्षेत्र.

जाणीव देखील धुळीने आच्छादिलेल्या आरशाप्रमाणे असते. **पूर्वसंस्कारांच्या प्रतिबंधामुळे, ही मानवी पूर्ण जाणीव आत्म्याच्या खऱ्या स्वरुपाचें ज्ञान प्रकट करुं शकत नाही;** म्हणूनच ती आपलें यथार्थ कार्य करण्याच्या कामीं असमर्थ असतें.

मनुष्यांतील अनेक संस्कारांमुळे जाणिवेला एका ठराविक मर्यादेंतच वावरावें लागतें,

जाणिवेंत अहंभावाचा जन्म.

व तिचें कार्य निरनिराळ्या वासनांनी अधिक निश्चित केलें जातें. परंतु वासना आपली पूर्ति करण्यास प्रवृत्त होत असल्यामुळे, पूर्ण जाणीव देखील व्यक्तिनिष्ठ व स्वार्थी बनते. **जाणिवेची पृथकता ही एका प्रकारें निरनिराळ्या वासनांमुळे उत्पन्न झालेल्या**

## विभाग २ रा

# श्री मेहेरबाबांचे दिव्य संदेश



"केवळ शब्दमय शिकवणूक नव्हे, तर आत्मजागृति देण्याकरता मी आलों आहे."

– श्रीमेहेरबाबा



मर्यादित व्यक्तित्वाचा इतिहास म्हणजे मन, प्राण व शरीर यांच्यामुळे उत्पन्न होणारा तिहेरी घोटाळ्याचा इतिहास होय. या तिन्ही प्रकारांत द्वैतभाव असतो; आणि आत्मा मूलत: अद्वय असतांना देखील स्वत:ला या घोटाळ्यांत गुरफटून घेतो. द्वैतभाव हा विरोध उत्पन्न करतो. चांगलें व वाईट, सद्गुण व दुर्गुण हीं असल्या विरोधाचींच उदाहरणें होत. द्वैतांत सांपडलेला अज्ञानी आत्मा हा चांगल्या व वाईट या दोहोंच्याही जाळ्यांत अडकून जातो. चांगलें व वाईट या द्वंद्वाला अज्ञानामुळे अस्तित्व प्राप्त झालेलें आहे; पण एकदा आत्मा यांत गुरफटला गेला, की त्याचेवर त्यांचा अंमल सुरु होतो. शरीर, मन व प्राण या तिघांची उत्क्रांति होत असतांना उत्पन्न होणाऱ्या घोटाळ्यामध्ये आत्मा वासनेच्या आधीन होतो. त्याला या स्थूल, सूक्ष्म व कारण जगांतील चांगले व वाईट दोन्हीहि हवें असतें. आणि चांगलें व वाईट यांच्या विषमतेमुळे, वासनादेखील या विरोधाच्या ओढाताणीमुळे मर्यादित बनतात. यामुळे आयुष्यांत एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत नेणारे व कधी न संपणारे हेलकावे उत्पन्न होतात; व जीवनाला अनंतत्व कधीहि प्राप्त होत नाही. **अमर्यादितपणा हा अखंड व कधी न बदलणाऱ्या तत्त्वप्रत्ययांतच अनुभवास येतो.** अनंत अशा परमेश्वराचा शोध हा द्वैताहून श्रेष्ठ असणाऱ्या भूमिकेंत करावयाचा असतो; आणि जेव्हा जाणीव संस्कारांनी निर्माण केलेल्या द्वैतांतून बंधमुक्त होते, तेव्हाच हें शक्य होते.

तिहेरी घोटाळा व द्वैत.

आपण आता पाहिलेंच आहे कीं, जाणिवेचे क्षेत्र संस्कारांनी मर्यादित झालेलें असते. ही मर्यादिता मानवी अंत:प्रज्ञेचे दोन भाग पाडते. एक भाग जाणिवेच्या टप्प्यांत असतो; व दुसरा भाग जाणिवेच्या टप्प्याबाहेर असतो. ही नेणीव सृष्टीमागील आदिशक्तीशीं एकरुप असून, तिलाच लोक ईश्वर म्हणतात. नेणिवेंत असलेलें तत्त्व जाणिवेंत आणून, त्याला अंतिम सत्य म्हणून ओळखावयास पाहिजे. जाणिवेचा विस्तार म्हटला, म्हणजे जें पूर्वी खरोखर माहीत नसतें, त्याची जाणीव करणें हाच होय. सत्यप्रकाशित जाणिवेला कार्य करण्यांत कोणतेच अडथळे उद्भवत नाहीत. अशा प्रकारच्या उच्च स्थितींतील पूर्ण जाणिवेमध्ये आणि साधारण मनुष्याच्या जाणिवेमध्ये एकोणपन्नास महत्त्वाच्या पायऱ्या आहेत.

जाणीव व नेणीव यातील फरक.

पूर्णतेस पावलेल्या सत्पुरुषांची (सद्गुरुंची) पूर्णप्रकाशित जाणीव आणि साधारण मानवांची आवरणयुक्त जाणीव ह्यांच्यामधील **महदंतर हे अहंभाव उत्पन्न करणाऱ्या संस्कारांमुळे उत्पन्न होतें. हे संस्कार पवित्र शील, भक्ति व नि:स्वार्थी सेवा यांमुळे नाहीसे होतात. परंतु ह्या बाबतीत उत्तम प्रगति सद्गुरुच्या मदतीने होते. आध्यात्मिक उन्नति ही जाणिवेचा अधिक विकास करण्यांत नसून** (कारण मानव योनींत जाणिवेचा पूर्ण विकास झालेला असतो), **तिला संस्कारांच्या**

आध्यात्मिक उन्नति.

**बंधनांतून मुक्त करण्यांतच असते.** जरी तत्त्वत: जाणीव ही निरनिराळ्या स्थितींत एकच असते, तरी जोंपर्यंत तिला आपल्या अनंतत्वाचें नि:संशय ज्ञान प्राप्त होत नाही व सर्व चराचराचें मूळ आपणच आहों हा प्रत्यक्ष अनुभव येत नाही, तोंपर्यंत ती पूर्ण जाणीव सत्यप्रकाशित समजली जाऊं शकत नाही.

गाढ निद्रा

झोपी जातांना, प्रत्येक वेळेस तुमचे अनंत आत्म्याशीं ऐक्य होते; परंतु ह्या तादात्म्याचें तुम्हांस तेव्हा भान नसतें. ह्या तादात्म्यस्थितींत असतांना जाणिवेवर अज्ञानाचें आवरण असतें. ह्या स्थितींत, जाणीव व नेणीव ह्यांतील अंतर नाहीसे होते. परंतु अनंतत्वाशीं झालेल्या ह्या ऐक्याचे झोपेंत भान नसल्यामुळे, तुम्हांस त्यापासून बुद्धिपुर:सर कांही फायदा करुन घेतां येत नाही. ह्याच कारणामुळे, पुन्हा झोपेंतून जागे झाल्यावर, तुम्हांला पूर्वीच्याच सामान्य व्यक्तित्वाचें स्मरण होतें; व नंतरहि तुम्ही व्यक्तिगत जीवनच चालू करता. जर तुमचें आत्म्याशीं झालेलें ऐक्य तुम्हाला ओळखतां आलें असतें, तर निजून उठतांच तुम्हाला फार फरक झालेला आढळून आला असता; कारण त्यानंतरचें तुमचें जीवन अतिशय प्रभावशाली व पूर्ण झालें असतें.

सत्याशीं जाणीवपूर्वक झालेलें ऐक्य

**सद्‌गुरु हे सत्याशी (ईश्वराशीं) जाणीवपूर्वक एक झालेले असतात.** ते आपणच स्वयं परमात्मा असल्याचा अनुभव घेतात. त्यांच्या बाबतींत, जाणीव व नेणीव यांतील अंतर जाणीव स्वत: नेणिवेवर आक्रमण करुन नाहीसे करते. ह्याचे उलट, निद्रित मनुष्याची नेणीव त्याच्या जाणिवेवर आक्रमण करते. **जाणिवेची वाढ किंवा क्षय हे फक्त मर्यादित बाबतींतच होत असतात. पूर्ण सद्‌गुरुचे बाबतींत, जाणिवेने नेणिवेवर कायमचा व अखंड विजय मिळविलेला असतो.** त्यांची सत्‌चिदानंत स्थिति कधीही क्षय पावत नाही. यावरुन आपणास कळेल, की सामान्य दृष्टीने सद्‌गुरु कधीही झोपी जात नाहीत. जेव्हा ते शरीराला विश्रांति देतात, तेव्हा त्यांना आपल्या जाणिवेंत अंतर किंवा खंड पडल्याचा कधीच अनुभव येत नाही.

पूर्णप्रज्ञ स्थिति.

पूर्णप्रज्ञ स्थितींत, जाणीव ही प्रकाशमान न होऊं देणाऱ्या सर्व अडचणींना दूर करुन, स्वत: पूर्णपणे फलद्रूप झालेली असते. नेणिवेचा जाणिवेशीं होणारा लढा अगोदरच संपून गेलेला असतो; आणि मनुष्य आत्मज्ञानरुपी सूर्याच्या प्रकाशांत पूर्णपणें प्रकाशमान होतो. तो पूर्ण आत्मैक्य अनुभवितो; किंवा स्वत:च प्रकाशरुप बनतो. जोंपर्यंत मनुष्य द्वैतांत गुरफटलेला असतो व त्यांतील अनुभवालाच अंतिम सत्य मानतो, तोंपर्यंत तो अज्ञानामुळे निर्माण झालेल्या मर्यादेंतच वावरत राहतो. **एकमेव अनंतत्व हेंच खरें सत्य होय.** अनंतांत सर्वांचा समावेश होतो; त्याला दुसरा कोणताहि प्रतिस्पर्धी उरत नाही. ज्याला या अनंत आत्म्याचा अनुभव होतो, त्याची जाणीव उच्च व अंतिम स्थितीप्रत पोहोचलेली असते. ह्या स्थितींत, उत्क्रांतीमुळे



प्राप्त झालेली पूर्ण जाणीव कायमच असते. परंतु तिच्यावरील संस्कारांचे व वासनांचें आवरण नाहीसें झालेलें असतें; व अज्ञानामुळे आलेल्या मर्यादित व्यक्तित्वाचें अनंत व अमर्याद अशा ईश्वरत्वांत रुपांतर होते. **अनंत आत्म्याची अमर्याद जाणीव जरी प्रत्येकाला व्यक्तिगत प्राप्त होते, तरी ती कोणत्याहि प्रकारचा भ्रम उत्पन्न करीत नाही. असा मनुष्य स्वार्थीमुळे निर्माण झालेल्या वासनांतून मुक्त होतो; व आध्यात्मिक उन्नतीला चालना देण्यास एक ईश्वरी व अनंत शक्तीचें केंद्र बनतो. अज्ञानाच्या नाशामुळे व्यक्तित्व मर्यादारहित बनतें.** अशी व्यक्ति, मायेच्या पृथक् भावनेमध्ये कधीच न फसणारी व अविनाशी असल्यामुळे, सतत मुक्त स्थितीचा आनंद अनुभवीत असते. या मुक्त स्थितींत, सर्व जग शून्यवत् स्वप्नमय भासतें; आणि अखंड आनंद व पावित्र्याच्या लाभ होतो. साधारण मनुष्याला दु:खित व बेचैन करणारी माया अशा पुरुषापासून दूरच राहते. एका अर्थी, तो मृत असतो, कारण निरनिराळेपणाचा अनुभव आणणारा त्याच्यांतील व्यक्तिगत अहंभाव कायमचा नाहीसा होतो. परंतु दुसऱ्या अर्थी, तो नेहमी करताच सत्‌चिदानंदस्थितीचा अनुभव घेऊन अमर बनतो. **अशा पुरुषांत, अनंत शक्ति व ज्ञान वासन करते; आणि सर्व जगांतील मानवांची आध्यात्मिक उन्नति करण्याकरता, हें विश्व त्याचें आध्यात्मिक क्षेत्र बनतें.**

पाहूं. **सभोवती बुडबुडा किंवा आकार निर्माण झाल्यामुळे, जलबिंदूमध्ये किंचित् जाणीव उत्पन्न होऊन, व्यक्तित्वाचा म्हणजे निराळेपणाचा भास उत्पन्न होतो.** जलबिंदूत म्हणजे जीवात्म्यांत उत्पन्न झालेल्या ह्या जाणिवेला आत्म्याचें किंवा महासागराचें ज्ञान नसतें; तर ह्या जाणिवेला शून्यस्वरुप असलेल्या बुडबुड्यांचे म्हणजे देहरुप आकारांचेंच ज्ञान असतें. प्रारंभीचा पहिला अपूर्ण बुडबुडा म्हणजे दगड होय. कालांतराने हा बुडबुडा फुटून त्याच्या जागीं दुसरा उत्पन्न होतो, तेव्हा खालील दोन गोष्टी घडतात. (१) जाणिवेचा अधिक विकास होतो; व (२) पूर्वीच्या बुडबुड्यांत जे संस्कार उत्पन्न झालेले असतात, त्या सर्वांना एक प्रकारची गाठ बसून, ते पक्के होतात. नवीन बुडबुडा उत्पन्न झाल्यावर जाणीव वाढते; परंतु जलबिंदूच्या म्हणजे जीवात्म्याच्या या वाढत्या जाणिवेंत, नवीन बुडबुड्याचें किंवा आकाराचेच ज्ञान असतें; स्वत:चे म्हणजे आत्म्याचें ज्ञान नसतें. नंतर हा नवीन बुडबुडा फुटून, तेथे आणखी दुसरा नवीन बुडबुडा किंवा आकार उत्पन्न होतो; व असें होत असतांना, जमलेल्या सर्व संस्कारांना आणखी एक गाठ बसून, जाणीव अधिक वाढते. याप्रमाणें, मनुष्यदेह येइपर्यंत उत्क्रांतीमध्ये दगड, धातु, वनस्पति, कीटक, मासे, पक्षी व जनावरें अशा सात पायऱ्या आहेत. प्रत्येक वेळी बुडबुडा किंवा आकार बदलत असतांना, जाणीव जास्त वाढून पूर्वीच्या संस्कारांना गाठ बसते; व अखेरीस मनुष्यदेहरुपी बुडबुडा किंवा आकार मिळाला, म्हणजे त्यांत जाणीव पूर्ण विकास पावते. परंतु, **उत्क्रांतीमध्ये संस्कारांची वेष्टनें निर्माण होत असतांना, संस्कारांना ज्या गाठी बसतात, त्याच्यामुळे बिंदुरुप जीवात्म्याची जाणीव बुडबुड्यावर म्हणजे आकारावरच जखडून राहते; व ह्याच कारणामुळे, मनुष्यदेहातसुद्धा, जाणिवेची पूर्ण वाढ झालेली असूनही, आत्म्याला स्वत:चे ज्ञान होऊं शकत नाही.**

मनुष्यदेह मिळाल्यावर, जीवात्म्याचा दुसऱ्या स्थितींत प्रवेश होतो. ही दुसरी स्थिति म्हणजे जन्मपरंपरा. मनुष्यदेह मिळाल्यावर संस्कारांचे अधिकाधिक गुंडाळे होण्याची क्रिया बंद होते. ह्या स्थितींत, जीवात्म्याला एकानंतर एक असे चौऱ्यांशी लक्ष देह घ्यावे लागतात. हे मनुष्यदेह कधी पुरुषांचे तर कधी स्त्रियांचे असतात; व त्याचप्रमाणे जीवात्मा अनेक मनुष्यदेह घेऊन, कधी भिकारीपणाचा तर कधी राज्यपदाचा याप्रमाणे निरनिराळ्या सुखदु:खरुप द्वंद्वांचा चांगल्या व वाईट संस्कारानुरुप अनुभव घेतो. मनुष्यदेहांतील या जन्मपरंपरेमध्ये, पूर्वीचे कांही संस्कार खर्च होऊन जातात; परंतु ह्या क्रियेंत संस्कारांचे गुंडाळे उकलले जात नाहीत. कारण, **पूर्वीचे संस्कार खर्च होऊन त्यांचा अनुभव घेत असतांना, दुसरे नवीन संस्कार उत्पन्न होत असतात.** ज्यावेळी मनुष्य मोक्षमार्गांत प्रवेश करतो, तेव्हाच त्याच्या संस्कारांचे गुंडाळे उकलले जाण्यास सुरुवात होते. **ह्या क्रियेंत दुसरे नवीन संस्कार उत्पन्न होत नाहीत;** व अखेरीस आत्म्यावरील संस्कारांची सर्व वेष्टनें उकललीं जातात.

मनुष्यदेह मिळेपर्यंत, संस्कारांची वेष्टनें अधिकाधिक पक्कीं होत जातात. मनुष्यदेहांतील जन्मपरंपरेमध्ये, हीं वेष्टनें कायम राहून ती जाणिवेला मर्यादित ठेवतात; परंतु प्रत्येक





# १

# उत्क्रांति, जन्मपरंपरा व मोक्षमार्ग

## प्रास्ताविक

उत्क्रांति, जन्मपरंपरा व मोक्षमार्ग ह्यांमधून प्रवास केल्यावर आत्म्याला स्वानुभव येऊं शकतो. **पूर्ण जाणीवशक्ति मिळविण्यासाठी, तो उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये आपल्या भोवती वाढत्या प्रमाणांत संस्कार गोळा करीत जातो.** व अखेरीस मानवदेह मिळाला, म्हणजे त्याला पूर्ण जाणीव व सर्व प्रकारचे स्थूल संस्कार प्राप्त होतात.

यानंतर मानवदेहांतच आत्म्याची जन्मपरंपरा चालू होते. या अनेक जन्मांमध्ये, उत्क्रांतींत मिळालेली पूर्ण जाणीव कायम ठेऊनच तो नानाविध चांगल्या व वाईट संस्कारांचा आळीपाळीने अनुभव घेतो. मोक्षमार्गांत प्रवेश केल्यावर देखील आत्म्याची पूर्ण जाणीव कायमच राहते. परंतु आत्म्यावरील संस्कार उत्तरोत्तर फिके पडत जातात; व अखेरीस ते सर्व नष्ट होऊन, केवळ पूर्ण जाणीवच कायम राहते.

संस्कार फिके होत असतांना स्थूल संस्कार सूक्ष्म बनतात; नंतर हे सूक्ष्म मनोरुप (mental) होतात; व अखेरीस सर्व संस्कार पूर्णपणें नाहीसे होतात.

मानवदेह प्राप्त होईपर्यंत, आत्म्यावरील संस्कारांचे गुंडाळे उत्क्रांतीच्या क्रमांत अधिकाधिक वाढतात व दृढ होतात; व मानवदेह प्राप्त झाल्यावरसुद्धा, जन्मपरंपरेचा अनुभव घेत असतांना, हे संस्कारांचे गुंडाळे कोणत्याहि प्रकारें कच्चे होत नाहीत. परंतु, **मोक्षमार्गामध्ये प्रगति करीत असतांना, संस्कारांचे गुंडाळे हळूहळू उकलले जातात, व अखेरीस आत्मसाक्षात्काराच्या स्थितींत, आत्म्यावरील सर्व संस्कार पूर्णपणें नष्ट होतात.**

सर्वान्तर्यामीं असणारा परमात्माच सत्य वस्तु होय. परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणत्याहि वस्तूला खरें अस्तित्व नाही. निरनिराळे भासणारे सर्व जीवात्मे ह्या परमात्म्यामध्येच असून ह्याच्याहून मुळीच निराळे नाहीत. उत्क्रांति, जन्मपरंपरा व मोक्षमार्ग ह्यांची आवश्यकता



आत्म्याला स्वत:च्या स्वरुपाची यथार्थ जाणीव होण्यासाठीच आहे. उत्क्रांती चालू असतां, संस्कारांचे गुंडाळे निर्माण होतात. या **संस्कारांमुळे जाणिवेला जरी बंधन होत असले, तरी त्यांच्यावाचून जाणिवेचा उत्तरोत्तर विकास होऊं शकत नाही.** मोक्षमार्गात संस्कारांचे गुंडाळे पूर्णपणें उकलले जातात, तेव्हा जाणिवेचें सर्व प्रकारचे बंधन नष्ट होऊन, उत्क्रांतीनंतर तयार झालेली पूर्ण जाणीवच अखेर कायम राहते.

उत्क्रान्तिक्रमांत संस्कारांचे गुंडाळे उत्पन्न होत असतांना, आत्मा सात पायऱ्या (भूमिका) खाली उतरतो; आणि मोक्षमार्गात संस्करांचे गुंडाळे उकलले जात असतांना, आत्मा सात पायऱ्या वर चढतो. परंतु उतरणें व चढणें हे दोन्हीही केवळ भास होत. **सर्वव्यापी आत्म्याची अखंड अनंतता सर्व स्थितींत कायमच असते; त्यांत चढणें, उतरणें किंवा इतर दुसरी कोणतीहि हालचाल होत नाही.**

निरनिराळ्या राष्ट्रांचे, धर्मांचे व जातींचे जे स्त्रीपुरुष आहेत, त्या सर्वांचा आत्मा एकच आहे; व त्यांना परस्परांना मदत किंवा विरोध करण्याचा, त्याचप्रमाणे शांततेचा किंवा युद्धाचा, चांगला किंवा वाईट जो अनुभव येतो, तो देखील शून्यस्वरुप असलेल्या देहांच्या किंवा मनांच्या द्वारें मिळत असल्यामुळे, भ्रमाचाच भाग आहे.

द्वैतांतील रुपमय सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वी, ज्ञान, शक्ति व आनंदाचा अखंड व अमर्याद महासागरच असलेला परमात्मा यांशिवाय दुसरी कोणतीहि वस्तु अस्तित्वांत नव्हती. परंतु ह्या महासागरास स्वत:चा जाणीवयुक्त अनुभव नव्हता. कल्पना करा की, हा महासागर अत्यंत शांत व स्थिर आहे, व स्वत:च्या शक्तीची, ज्ञानाची व आनंदाची जाणीवही त्याला नाही; एवढेंच नव्हे, तर आपण स्वत: महासागर आहोंत, हे देखील त्याला माहीत नाही; व **ह्या महासागरांत जे असंख्य जलबिंदु आहेत त्यांना देखील आपण जलबिंदु असल्याची, महासागरांत असल्याची किंवा महासागराचाच भाग असल्याची जाणीव नाही. परमात्म्याची प्रारंभीची स्थिति अशी होती.**

स्वत:चे स्वरुप कळण्याची जिज्ञासा जागृत झाल्यामुळे ह्या महासागरांत खळबळ उत्पन्न होते. ही जिज्ञासा ह्या महासागरांत पहिल्यापासूनच सुप्त स्थितीमध्ये होती. जेव्हा ही जिज्ञासा व्यक्त होऊं लागते, तेव्हा महासागरांतील प्रत्येक बिंदूला व्यक्तित्व प्राप्त होतें. ह्या जिज्ञासेमुळे महासागरांतील शांत जलामध्ये जेव्हा खळबळ उत्पन्न होते, तेव्हा त्यामधील जलबिंदूंच्या सभोवतीं अनेक बुडबुडे किंवा आकार उत्पन्न होतात; व ह्या बुडबुड्यांमुळेच जलबिंदूंना म्हणजे जीवात्म्याला व्यक्तित्व प्राप्त होते. **बुडबुड्यांमुळे अखंड महासागरांत खरोखरचे निरनिराळे भाग होत नाहीत. त्यांच्यामुळे जलबिंदु हे महासागरापासून वास्तविकपणें निराळे होऊं शकत नाहीत. बुडबुड्यांमुळे जलबिंदूंना निराळेपणाचा किंवा व्यक्तित्त्वाचा केवळ आभास मात्र होतो.**

आता आपण एका जलबिंदूचें किंवा जीवात्म्याचें जीवन आरंभापासून शेवटपर्यंत

(१) सद्‌गुरुपद मिळालेल्या आत्म्याच्या विज्ञानभूमीशीं म्हणजे परमात्म्याच्या सर्वातीत भागांशी संबंध असतो. ही विज्ञानभूमि सर्व सद्‌गुरुंचें विश्रांतिस्थान असते. (२) तसेंच त्याचा परमात्मस्थितीशीं संबंध असतो व त्याचप्रमाणे (३) त्याचा तिन्ही जगतांशी व सर्व जीवात्म्यांशीं (मग ते कारणमानाचे, सूक्ष्ममानाचे किंवा जन्मपरंपरेंतील स्थूल भानाचे साधारण जीवात्मे असोत, किंवा मनुष्यदेहापूर्वीचे उत्क्रान्तिस्थितीमधील जीवात्मे असोत)





मनुष्यदेह बदलतांना, संस्कारांच्या गाठींना एक धक्का बसतो. अशा प्रकारें मोक्षमार्गांत प्रवेश करण्यापूर्वी, संस्कारांच्या गाठींना चौऱ्यांशी लक्ष धक्के बसल्यामुळे, त्या गाठी ढिल्या होतात.

त्यानंतर मोक्षमार्गातील वर चढण्याच्या तिसऱ्या प्रक्रियेला सुरुवात होते. ह्या प्रक्रियेमध्ये, महासागरांतील जलबिंदूवरील म्हणजे आत्म्यावरील संस्कारांची वेष्टनें हळूहळू उकललीं जाण्यास सुरुवात होते. असे होत असतांना, संस्कार उत्तरोत्तर अधिक फिके होत जातात; व आत्म्याची जाणीव हळूहळू स्वत:कडे वळते. आत्मा सूक्ष्म व कारण जगतांतील भूमिका उल्लंघन करीत जातो; व त्याचे सर्व संस्कार नाहीसे झाल्यावर, त्याला आपण **स्वत:च परमात्मरुप महासागर आहों, असा जाणीवपूर्वक अनुभव येतो.**

**परमात्मरुपी अनंत महासागरांत तुम्ही एक जीवरुपी जलबिंदु आहां.** तुमचा आत्मा साधारण स्थितीमध्ये आहे. तुम्ही आपल्या जाणिवेने बुडबुड्याचा किंवा आकाराचा अनुभव घेतां. ह्या बुडबुड्याच्या स्थूल (देहरुपी) आवरणामधून, **पृथ्वीरुपी** जो एक मोठा स्थूल बुडबुडा आहे त्याचा तुम्ही अनुभव घेतां. वास्तविक पाहतां तुम्ही पूर्वीपासूनच परमात्म्याशी एकरुप आहांत; परंतु तुम्हांला परमात्म्याचा अनुभव येत नाही. तुमची जेव्हा आध्यात्मिक प्रगति होते, तेव्हा तिसऱ्या भूमिकेपर्यंत, तुम्ही आपल्या जाणिवेने **सूक्ष्मजगत्‌रुपी** जो एक मोठा सूक्ष्म बुडबुडा आहे, त्याचा अनुभव घेतां; व हा अनुभव तुम्हांला सूक्ष्मदेहरुपी सूक्ष्म बुडबुड्यामधून येतो. परंतु परमात्म्याकडे तुमची जाणीव वळलेली नसते, म्हणून तुम्हाला स्वत: परमात्म्यांतच असूनहि परमात्म्याचा अनुभव येत नाही. तुमची जेव्हा तिसऱ्या भूमिकेपासून सहाव्या भूमिकेपर्यंत प्रगति होते, तेव्हा तुम्ही आपल्या जाणिवेने, कारण जगद्रूपी जो एक मोठा मनोमय **बुडबुडा** आहे, त्याचा अनुभव घेतां; व हा अनुभव तुम्हाला कारणशरीररुपी बुडबुड्याच्या द्वारें येतो. ह्या स्थितींत देखील, तुम्हाला परमात्म्याचा अनुभव येत नाही. परंतु, **ईश्वरी स्थितीमध्ये, तुम्ही आपल्या जाणिवेने परमात्म्याचाच अनुभव घेतां; व ह्या स्थितींत, सर्व आकार केवळ बुडबुडेच आहेत, असा अनुभव येतो.**

आता अशी कल्पना करा, की तुम्ही परमात्मरुपी महासागरांतील बिंदुरुप आत्मा असून, ह्या **आत्म्याला स्थूल शरीराशिवाय आणखी पांच आवरणें आहेत.** सध्या तुमचा बिंदुरुप आत्मा स्थूल शरीराकडे व त्याच्याद्वारें स्थूल जगताकडे पाहतो. तसेंच तुम्ही जेव्हा आंतील दुसऱ्या आवरणाकडे व दुसऱ्या आवरणाच्या द्वारें पाहाल, तेव्हा तुमचें स्थूल शरीररुपी पहिलें आवरण हे केवळ आवरणच आहे, असा अनुभव येईल. **याप्रमाणे क्रमश: आंतील सर्व आवरणांच्या मागे जाणीवरुपी दृष्टि पोचविली, म्हणजे ही सर्व आवरणें स्वत:चींच केवळ छायारुप आच्छादनें आहेत, असा अनुभव येतो; व अखेरीस, तुम्ही परमात्म्याकडे जाणीव वळवून त्याच्याशीं एकरुप झालां, म्हणजे प्रारंभापासून, स्वत: तुम्हीच केवळ सत्य होतां, आणि आतापर्यंत तुमच्या अनुभवास आलें, ते तुमच्याच स्वत:च्या छायेवाचून दुसरें कांहीहि नव्हतें. हे निश्चित ज्ञान तुम्हांला मिळतें.**

# रेखाकृतींचे स्पष्टीकरण

## आकृति नं. १

रेखाकृति नं. १ (पान १३६) मधील मोठें अर्धवर्तुळ सर्वव्यापक परमात्मा (Oversoul) दर्शवितें. परमात्म्यामध्ये जगांतील सर्व वस्तूंचा समावेश होतो. उत्क्रांन्ति (Evolution), जन्मपरंपरा (Reincarnation) व मोक्षमार्ग (Process of Realisation) असे जीवात्म्याच्या जीवनामधील तीन मुख्य विभाग दर्शविले आहेत. छोटे वर्तुळ म्हणजे जीवात्मा. नरदेह प्राप्त होण्यापूर्वी जीवात्मा ज्या दशांमधून जातो त्या अशा: – दगड, धातु, वनस्पति, कृमि मत्स्य, पक्षी व प्राणी. ह्या प्रत्येक दशेचे सात विभाग होतात. सातवा टप्पा पूर्ण झाला की दशा बदलते; व दशांतराच्या स्थानीं रेखाचित्रांत जी गाठ दिसते, तिचा अर्थ असा आहे, की दशा बदलतांना, पूर्वी मिळविलेले सर्व संस्कार एकत्रित होऊन घन होतात. जीवात्म्याभोवती जें वर्तुळ आहे, तें उत्क्रान्तींत उत्पन्न झालेले संस्कार दाखवितें; व जीवात्म्याखाली जें भरीव लोलक आहे तें संस्कारांबरोबरच वाढत असलेली जाणीव दाखवितें. 'अ' जीवात्मा, उत्क्रान्ति, जन्मपरंपरा व मोक्षमार्गाचा अनुभव घेतल्यावर 'ज्ञ' जीवात्मा होतो. फक्त परमात्मस्थितींतच जाणिवेवर संस्कारांचे आवरण रहात नाही.

उजव्या बाजूला जीं तीन मोठी वर्तुळें आहेत, तीं क्रमशः खालील तीन भूमि दाखवितात:– (१) अन्नभूमि (gross world) (२) प्राणभूमि (subtle world) व (३) मनोभूमि (mental world) नरदेह मिळविण्यापूर्वी स्थूल जगताची जाणीव पूर्णपणें विकसित झालेली नसते, म्हणून दगड, धातु, वनस्पति, कृमि, मत्स्य, पक्षी व प्राणि – यांचे देह असलेल्या जीवात्म्यांची जाणीव ही रेषारुपाने स्थूल जगताच्या वर्तुळाला अंशत:च स्पर्श करतांना दाखविली आहे. या रेषा, अनुक्रमें दगड, धातु, वनस्पति कृमि, मत्स्य, पक्षी व प्राणी, या देहां (forms) च्या द्वारें, मनुष्यपूर्व स्थितींतील जीवात्म्यांचा व स्थूल



जगताचा जाणीवरुप संबंध दाखवितात. नरदेहांतील जाणीव पूर्ण विकसित असल्यामुळे, त्यांतून जाणाऱ्या रेषा स्थूल जगताच्या संपूर्ण वर्तुळांतून जातांना दाखविल्या आहेत.

मनुष्यदेहांती जन्मपरंपरेंतून जात असतांना, जीवात्म्याला स्त्रीदेह व पुरुषदेह या दोहोंचा अनुभव घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे, जीवात्मा कोणत्याहि देशांत, पंथांत किंवा धर्मात जन्म घेतो. मनुष्यदेह मिळण्यापर्यंतची घटना वर चढण्यासारखीं दिसत असली, तरी आत्मज्ञानाच्या दृष्टीने, जीवात्मा ह्या घटनेंत वास्तविक अधिकाधिक खाली उतरत असतो; व मोक्षमार्गात तो खाली उतरत असल्यासारखें दिसत असलें, तरी तो या घटनेंत आत्मज्ञानाच्या दृष्टीने वास्तविक अधिकाधिक वर चढत असतो. रेखाकृतिमध्ये पहिली (वास्तविक उतरण्याची) घटना दाखविण्यासाठी, दगडापासून स्थूलजगतापर्यंत वर गाठी बनवीत जाणारी रेषा काढली आहे; व दुसरी (वास्तविक चढण्याची) घटना दाखविण्यासाठी, स्थूल जगतापासून परमात्मस्थितीपर्यंत **खाली गाठी सोडवीत येणारी दुसरी रेषा काढली आहे.** गाठी बनण्याची क्रिया संपल्यावर, मनुष्यदेहांतील जन्मपरंपरा सुरु होते; व गाठी सुटण्यास प्रारंभ होईपर्यंत, ती अव्याहत चालू राहते.

मोक्षमार्गातील पहिल्या भूमिकेपासून तिसऱ्या भूमिकेपर्यंतचे उन्नत जीवात्मे हे स्वत:च्या सूक्ष्म शरीरांशी तादात्म्य पावून, सूक्ष्म जगताचाच अनुभव घेतात. स्थूल जगताची जाणीव असणाऱ्या साधारण जीवात्म्यांचें त्यांना भान असतें; व ते त्यांच्यावर सूक्ष्म जगतांत कार्यही करतात. परंतु हें सर्व ते स्वत:च्या सूक्ष्म शरीरांमधून सूक्ष्म जगतांत करतात; व त्यांचा स्थूल शरीरांच्या द्वारां स्थूल जगताशीं कांहीही संबंध नसतो. त्याचप्रमाणे, चवथ्या भूमिकेपासून सहाव्या भूमिकेपर्यंतच्या उन्नत जीवात्म्यांना स्थूल व सूक्ष्म जगताची जाणीव असणाऱ्या जीवात्म्यांचें भान असतें. परंतु त्यांच्यावरील आपलें कार्य ते कारणशरीरांतून कारणजगतांत करतात; व स्थूल देहांतून स्थूल जगताशीं, किंवा सूक्ष्म देहांतून सूक्ष्म जगताशीं त्यांचा कांहीही संबंध नसतो. म्हणून, रेखाचित्रामध्ये सूक्ष्ममानाच्या जीवात्म्यांचा संबंध केवल सूक्ष्म जगताच्या वर्तुळाशींच व कारणभावाच्या जीवात्म्यांचा संबंध केवल कारणजगताच्या वर्तुळाशींच रेषारुपाने दाखविला आहे.

परमात्मस्थितीमध्ये, जाणिवेची सर्व संस्कारांपासून मुक्तता होऊन, ती ईश्वराकडे वळते; व ह्या 'मज्झुबांच्या' (विदेही सिद्धांच्या) अवस्थेंत, आत्म्याचा स्थूल, सूक्ष्म अथवा कारण यांपैकी कोणत्याही जगताशी संबंध रहात नाही. परंतु परमात्मस्थितींतील कांही फारच थोडे आत्मे खाली उतरुन सृष्टीची जाणीव पुन्हा मिळवितात; व हेच पूर्ण सद्गुरु होत. सद्गुरुचा आत्मा हा ह्या रेखाचित्रांत एकांत एक बसविलेल्या सात वर्तुळांनी स्वतंत्रपणे दाखविला आहे. (ह्या वर्तुळांचा अर्थ रेखाचित्र नं. २ मध्ये स्पष्ट केला आहे.) संबंध दाखविणाऱ्या रेषांच्या, द्वारें रेखाचित्रांत खालील मुद्दे स्पष्ट केले आहेत, ते लक्षांत घ्यावेत.

हाताळल्या गेल्या, तर त्यांच्या द्वारा, केवळ हिंदी जीवनाला सुसंवादी बनवून पुनरुज्जीवित करणारीच नव्हे, तर सर्व जगताला एक नवीन गति देणारी व सुसंपन्न जागतिक संस्कृति निर्माण होऊ शकेल.

ज्या प्रक्रियेने आपण या नवीन विश्वसंस्कृतीप्रत पोहोचूं, ती केवळ यांत्रिक असूं शकणार नाही. केवळ आजच्या भिन्नभिन्न संस्कृतींतून अलग काढलेले व निवडलेले त्यांचे कांही भाग एकत्रित केल्याने आपणांस कोणत्याहि सामर्थ्यशाली विश्वसंस्कृतीची प्राप्ती कदापि होणार नाही. त्या रीतीने फार तर एक ठिगळे जोडून केलेली गोधडी तयार होईल.

नवीन विश्व-संस्कृतीचा उद्‌गम पूर्ण व एकजिनसी दृष्टीनेच होईल.

**संकलित विचारांची खिचडी ही ध्येयाच्या प्रत्यक्ष नवदर्शनाचें स्थान कधींही घेऊं शकणार नाही.** परिश्रमपूर्वक निवड करुन व परंपरागत व सुरक्षित मूल्यांचा नुसता ढीग रचून, नवीन विश्व-संस्कृतीचा उद्‌गम होणार नाही. तर प्रचलित रुढींवर कोणत्याहि दृष्टीने अवलंबून न राहणाऱ्या, अशा पूर्ण व एकजिनसी (integral) सत्यदर्शनांतूनच, नवीन संस्कृतीचा उदय होईल.

पूर्ण व एकजिनसी दर्शनापासून जी नवीन विश्व-संस्कृति उद्‌भवेल, तिच्यामुळे आपोआपच **संस्कृतींचा समन्वय** (cultural synthesis) **साधेल.** ज्या दृष्टीमुळे नवीन विश्व-संस्कृतींची स्फूर्ति होईल, ती सर्वगामी (comprehensive) असेल. आणि ती विविध परंपरांमध्ये साठलेल्या मूल्यांचा निषेध करणार नाही, किंवा त्यांच्याविषयी केवळ संरक्षणात्मक सहिष्णुताहि ठेवणार नाही; तर उलट निरनिराळे धर्म आणि संस्कृति यांच्या सक्रिय सार-ग्रहणतेच्या द्वारांच, ती विश्वसंस्कृती अभिव्यक्त होईल. **सत्याचें विशाल दर्शन हे एखादे मत, अंधविश्वास किंवा संप्रदाय, यांच्या योगाने मर्यादित होऊं शकत नाही. परंतु या मर्यादांचे उल्लंघन करावयाचें असल्यास, ते प्रचलित मत, अंधविश्वास व संप्रदाय, यांचें मूल्य अंधतेने व पूर्णपणे नाकारुन साधणार नाही; तर त्या सर्वांच्यामध्ये सत्याचे जे अंश किंवा पैलू अनस्यूत असतील, ते शोधून, त्यांच्या महत्त्वावर भर देऊन, आणि त्यांचे प्रकाशन व संवर्धन करुनच या मर्यादा ओलांडून जाणें शक्य होईल.**

ज्यांतून अंतिम सत्याचा आविष्कार होईल, अशा समन्वयकारी व उत्कृष्ट संस्कृतीचा उद्‌गम आणि विकास करणें, हें हिंदुस्थानच्या समोरील एक महत्त्वाचें कार्य आहे. दुसरें एक महत्त्वाचें कार्य करण्यास लागणारी विशेष योग्यता हिंदुस्थानच्या ठायींच आहे; आणि तें दुसरें कार्य म्हणजे इतर राष्ट्रांत परस्परांविषयीं सद्‌भाव आणि एकता उत्पन्न करणें, हे होय.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील हिंदुस्थानची भावी भूमिका

दुसऱ्या राष्ट्रांची भवितव्यता ठरविण्याच्या बाबतींत, जें कार्य हिंदुस्थानला करावयाचें आहे, त्याविषयींचें स्पष्ट ज्ञान असणाऱ्या विधायक नेतृत्वाची आज जरुर आहे. परराष्ट्रीय धोरणांत, हिंदुस्थानने वर्णयुद्धांत अगर वर्णद्वेषांत सहभागी



संबंध असतो.

## आकृति नं. २

रेखाचित्र नं. २ (पान १४८) मध्ये उत्क्रान्तिविषयक व मोक्षमार्गविषयक अधिक विस्तृत व सूक्ष्म माहिती दिली आहे. सर्व वर्तुळांचे आंतील सर्वात लहान छोटें वर्तुळ म्हणजे जीवात्मा. मनुष्यदेह मिळेपर्यंत जीवात्म्याभोवतींची वर्तुळें संख्येने वाढतांना दाखविलीं आहेत; व पुढे ही सर्व वर्तुळें कायम राहतात. जीवात्म्याच्या वर्तुळाला लागूनच जें दुसरें वर्तुळ आहे, तें त्याची जाणीव (consciousness) दाखवितें. ही जाणीव मनुष्यदेहापर्यंत वाढत जाते; परंतु पुढे ती तशीच कायम राहते. उत्क्रान्तीमध्ये वनस्पतींना फारच थोड्या प्रमाणांत नैसर्गिक अंत:प्रेरणा (instinct) असते; पण त्यांना सूक्ष्म शरीर नसतें. सूक्ष्म शरीर हें अविकसित स्थितींत प्रथम कृमींमध्ये व सरपटणाऱ्या प्राण्यांत आढळून येतें. ह्या सूक्ष्म शरीराच्या विकासाबरोबरच अंत:प्रेरणाहि वाढते. बुद्धि ही अत्यल्प प्रमाणांत प्रथमत: प्राण्यामध्ये निर्माण होते; परंतु कारणदेह हा उत्क्रान्तीच्या शेवटीं मनुष्यदेहांतच उत्पन्न होतो.

मनुष्यस्थितींतील वर्तुळांमध्ये सर्वात आंतील वर्तुळ म्हणजे जीवात्मा, दुसरें वर्तुळ म्हणजे पूर्ण जाणीव दाखवितात. व त्यावरील इतर सहा वर्तुळे, अनुक्रमें खालील गोष्टी दाखवितात: (१) व्यष्टिभावाचें स्थान, (२) अनाविष्कृत सुप्त वासना अथवा संस्कार, (३) बुद्धि, (४) कारण देहांतील अनुभवांत येणाऱ्या वासना, (५) ज्यांत वासना अंशत: व्यक्त होतात तें सूक्ष्म शरीर, व (६) ज्यांत सर्व वासना पूर्णपणें व्यक्त होतात, तें स्थूल शरीर.

जाणिवेंचे वर्तुळ सोडून, जीवात्म्याच्या वर्तुळाभोवतींचीं इतर सर्व वर्तुळें जाणिवेवरील आवरणांचे थर दाखवितात. ह्या थरांपैकी सर्वात बाहेरचें वर्तुळ म्हणजे स्थूल शरीर, व त्याच्या जवळचें आंतील वर्तुळ म्हणजे सूक्ष्म शरीर होत; व बाकीचीं आवरणरुपीं चार वर्तुळें ही कारणदेहाचें (म्हणजेच मनोदेहाचें) चार व्यापार दाखवितात. कारणदेहांतील या चार व्यापारांपैकी इच्छा व विचार ह्या दोहोंचा समावेश बहुधा मनामध्ये करतात; व बीजरुप वासना अथवा अनुदित संस्कार व व्यष्टिभाव, या दोन व्यापारांचा समावेश अहंभावामध्ये करतात. ह्याप्रमाणे, मानवी स्थितींत, जीवात्म्याला तीनच शरीरें असलीं, तरी (स्थूल देहरुपी आवरण धरुन) सहा आवरणें असतात.

जन्मपरंपरेचा अनुभव घेऊन मनुष्यदेहधारी आत्मा जेव्हा मोक्षमार्गात प्रवेश करतो, तेव्हा बुद्धी (Intellect) च्या जागीं अंतस्फूर्ति (Inspiration) उत्पन्न होते; व ही अंतस्फूर्ति पहिल्या भूमिकेपासून तिसऱ्या भूमिकेपर्यंत कार्य करते. पुढे चवथ्या भूमिकेपासून सहाव्या भूमिकेपर्यंत, ह्या अंत:स्फूर्तीच्या जागी ज्ञति (Illumination) चा उदय होतो.

आत्मज्ञ मानवाच्या आत्म्याभोवतलचीं वलयें किंवा वर्तुळें ईश्वरप्राप्त जीवात्म्याचें

माध्यम (Vehicle) दाखवितात. ह्या रेखाकृतीचे बाबतींत खालील गोष्टी काळजीपूर्वक लक्षात घ्याव्या :-

(१) सर्वात वरील तीन वर्तुळें अनुक्रमें स्थूल, सूक्ष्म व कारण शरीरेह होत. ही तीनहि शरीरें साधारण मनुष्यलाहि असतात.

(२) ईश्वरप्राप्त पुरुषाचे बाबतींत एक नवीन सर्वव्यापक समष्टिशरीर (Universal body) असतें. हेंच महाकारण शरीर असून, हे समष्टिमना (Universal mind) चें आश्रयस्थान असतें. ज्याप्रमाणे एखाद्या पेल्यामध्ये पाणी राहावें, त्याप्रमाणें या समष्टिशरीरां (Universal body) त समष्टीमन (Universal Mind) राहातें. म्हणून, समष्टिशरीर व समाष्टिमन हें जरी दोन निरनिराळ्या वर्तुळांनी दाखविले असले, तरी ते दोन्ही परस्पराहून अलग राहू शकत नाहीत. सद्गुरुचें समष्टिमन हे आपल्या सर्वव्यापक समष्टिशरीराच्या द्वारां, सृष्टींतील सर्व जीवात्म्यांच्या कारणदेहांशी संलग्न असतें; व तें या कारणदेहांच्या द्वारां स्थूल, सूक्ष्म किंवा कारणजगतांत वाटेल तो बदल घडवून आणूं शकतें. त्याचप्रमाणे हेंहि लक्षांत असूं द्यावें, की सद्गुरुला इतरांप्रमाणे जरी कारणदेह (मनोदेह) असला, तरी **त्याचें सर्व कार्य सतत समष्टिमनांतूनच होत असतें.**

(३) सद्गुरुमध्ये मानवी स्थितींतील मर्यादित अहंभाव नसतो. त्याचें परिवर्तन मर्यादारहित परमात्मभावामध्ये कल्पना जाऊन, त्या ठिकाणीं, अविभाज्य व सर्वव्यापक अशा अनंत अस्तित्वाची प्रतीति येते.

(४) सद्गुरुपदास पोचलेल्या आत्म्याचें ज्ञान अनंत असतें. मानवी स्थितींत, संस्कारांचे आवरण असल्यामुळे, जाणिवेचा पूर्ण विकास झालेला असूनहि, मनुष्याला आत्म्याची अनंतता अनुभवास येत नाही. परंतु **ईश्वरप्राप्त मनुष्यामध्ये पूर्ण विकसित जाणिवेवर अशा प्रकारच्या संस्कारांचे आवरण राहत नसल्यामुळे, त्याच्या जाणिवेंत आत्म्याचें अनंतत्व व्यक्त होतें.**

**मेहेराबाद, अहमदनगर**
**१७ मे, १९४३.**

# २

# हिंदुस्थानांत रचनात्मक नेतृत्वाची आवश्यकता *

मानवतेचा आध्यात्मिक इतिहास बनविण्यांत, हिंदुस्थानाने अत्यंत पुरातन कालापासून सर्वात महत्त्वाचा भाग घेतलेला आहे. हिंदुस्थान, हें अनेक अवतार, सद्गुरु, द्रष्टे आणि ऋषि, यांचे माहेरघर आहे; आणि त्या सर्वांनी मानवतेच्या आध्यात्मिक विकासामध्ये अतुलनीय भाग घेतला आहे. भौतिक प्रश्न सोडविण्यातहि, हिंदुस्थानने उल्लेखनीय भाग घेतला आहे; कारण तेथे पहिल्या प्रतीचे अनेक शास्त्रज्ञ, कवि, तत्त्वज्ञ, सम्राट, पुढारी आणि मुत्सद्दी निर्माण झालेले आहेत. **पूर्वीच्या कालीं, हिंदुस्थानने जीवनाच्या आध्यात्मिक व भौतिक बाबतींतहि प्राविण्य व महत्त्वाचें स्थान मिळविलें होतें; आणि नवीन भावि जगांतहि हिंदुस्थानचें स्थान अव्दितीयच राहाणार आहे.**

हिंदुस्थानचा गौरवपूर्ण पूर्वकाल.

*** इ. स. १९४२**

हिंदुस्थानपुढे आज ज्या समस्या उपस्थित आहेत, त्या कांही दृष्टीनी, इतर कोणत्याही देशास सोडवाव्या लागणाऱ्या समस्यांपेक्षा, अधिक गुंतागुंतीच्या आहेत. भिन्न भिन्न जाति, मतें, पंथ आणि धर्म असलेले लोक हिंदुस्थानांत येऊन राहिलेले आहेत; आणि या सर्वांमध्ये घटनात्मक एकरुपता (uniformity of composition) नसल्यामुळे, ऐक्यभाव प्रस्थापित करण्यामध्ये व सहकारशील कार्य करण्यामध्ये, हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांत, कांही अडचणी उत्पन्न झाल्या असल्या, तरी हा घटनात्मक एकरुपतेचा असा हा एक केवळ कायमचा अडथळाच आहे, असें मानण्याचें कारण नाही. **हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांत, जे निरनिराळ्या संस्कृतीचे प्रवाह आलेले आहेत, त्यांमुळे त्याच्या राष्ट्रीय व्यक्तिमत्ते (national) एवढेच नव्हे, तर अशा समन्वयाची आवश्यकताहि उत्पन्न झाली आहे.** ह्याच भारतीय जीवनांतील, परस्पर विरोधी व संघर्षशील गोष्टी रचनात्मक नेतृत्वाच्याद्वारा

हिंदुस्थानांतील राष्ट्रीय प्रश्नांची गुंतागुंत

व तो अहंबुद्धिनिष्ठ जीवनाची मर्यादिता तोडून मुक्त होतो. व्यक्तिगत जीवात्म्याने आपल्या सर्वव्यापक परमात्म्याशीं असलेल्या ऐक्याचा अनुभव संपूर्ण जाणिवेने घेतला पाहिजे. ह्या पुराण सत्याने प्रकाशित होऊन, मानवांच्या जीवनास नवीन दिशा लागेल; व आपल्या दैनिक व्यवहारांमधील त्यांच्या शेजाऱ्याबद्दलच्या दृष्टिकोणामध्ये पुनर्घटना घडून येईल. खरें ऐक्य व सहकार्य निर्माण करण्याकरितां, एकत्वाचें आध्यात्मिक महत्त्व पटलें पाहिजे; कारण, असल्या ज्ञानांतून बंधुता सहजच उत्पन्न होते. **आध्यात्मिक ज्ञानाने प्रकाशित झालेलें नवीन जीवन, म्हणजे सत्याचाच पुरस्कार होय.** असलें नवजीवन कल्पनेच्या साम्राज्यांतलें नसून, पूर्णपणे व्यवहार्य आहे. रक्तलांछित युद्धाच्या वणव्यांत आज मानव लोटले गेले असल्यामुळे, त्यांना तीव्र यातनांच्या द्वारां, जडवादावर अधिष्ठित असलेल्या जीवनाची क्षणभंगुरता व फोलपणा अनुभवास येत आहे. खऱ्या सुखाची तळमळ असलेले लोक ज्यावेळीं सुखाच्या खऱ्या उगमस्थानाचा शोध करतील, तो क्षण जवळ आला आहे.

त्याचप्रमाणे, मूर्तरुप सत्यच अशा देवमाणासा (God-man) चा सहवास मिळविण्याचा मानव उत्सुकतेने प्रयत्न करतील; कारण, देवमाणसाच्या द्वारां, त्यांना स्फूर्ति व आध्यात्मिक ज्ञान मिळेल. ते ईश्वरीय अधिकारवाणीचें मार्गदर्शन ग्रहण करतील. दैवी प्रेमाच्या आविष्काराने आत्मजागृति होईल. हल्लीच्या दु:खमय कठीण प्रसंगामध्ये, ते स्वत:च्या शिवात्म्यास सन्मुख होऊन, परमात्म्याच्या इच्छेचा स्वीकार करण्यास तत्पर होत आहेत. दैवी प्रेमाने मानवाच्या अंत:करणांत ईश्वर आणण्याचा व त्यांना शाश्वत व खऱ्या आनंदाची प्राप्ति करुन देण्याचा मोठा चमत्कार घडून येईल; व त्यामुळे मानवजातीची निकडीची गरज भागेल. दैवी प्रेम मानवांना परस्परांचे बाबतींत नि:स्वार्थ व परोपकारी बनविल, व त्यामुळे सर्व प्रश्न पूर्णपणे सुटतील. **पृथ्वीवरील नवीन बंधुता वास्तवसृष्टींत उतरेल; व सर्व राष्ट्रांत प्रेम व सत्य यामुळे उत्पन्न होणारा एकोपा राहील.**

**माझे अस्तित्व प्रेमाकरिताच व सत्याकरिताच आहे;** व दु:खित मानवास माझें सांगणें आहे तें असें :-

**''निराश होऊं नका ! तुम्हांला ईश्वरी कार्याकरिता आत्मसमर्पण करण्याची व प्रेम व सत्य यांनी विभूषित असलेल्या ईश्वरी कृपेचा स्वीकार करण्याची शक्ति देण्याकरिता मी आलों आहे. सर्व विजयांत श्रेष्ठ असलेला जो आत्मविजय तो मिळविण्याच्या बाबतींत साहाय्य करण्याकरिताच माझें येणें आहे.''**



होतां कामा नये. काळा, पिवळा आणि पांढरा हे सारे बाह्य त्वचेचे फरक आहेत; प्रत्यक्ष आत्म्यांमध्ये कांही हे भेद नाहीत. पूर्वीच्या इतिहासांत, हिंदुस्थान हा पूर्व आणि पश्चिम, यांना जोडणारा दुवा बनला होता; आणि हिंदुस्थानमुळेच पूर्व आणि पश्चिम परस्परांच्या अधिक निकट आलेल्या आहेत.

हिंदुस्थानांतील विधायक नेतृत्वापुढे असलेलें तिसरें महत्त्वाचें कार्य म्हणजे हा देश अत्यंत कठीण परिस्थितींत असतांनाहि, राजकीय समतोलता ठेवणें हें होय. राजकीय पारतंत्र्यांतून मुक्त झाल्याखेरीज, आणि परकीय आक्रमण आणि गुलामगिरी यांची भीति नष्ट झाल्याखेरीज, हिंदुस्थान जगताला आपलें संपूर्ण देणे (Contribution) देऊं शकणार नाही. **जर त्याला आपलें कार्य इतर राष्ट्राच्या बरोबरीने व बंधुत्वाच्या नात्याने करावयाचें असेल, तर त्याला स्वत:चें राष्ट्रीय जीवन व त्याचप्रमाणे परराष्ट्रीय धोरण निश्चित करण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे.** परंतु, या प्राथमिक गरजेवर भर देतांना, हिंदुस्थानने आपली राजकीय समतोलता ढळूं देतां उपयोगी नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि आत्म-निर्णय यांसाठी प्रयत्न करणें जरी न्याय्य ठरत असले, तरी तसें करतांना स्वत:ला प्रतिक्रियात्मक पृथकतेला (Reactionary Isolationism) बळी पडूं देणें, हें कधीहि योग्य होणार नाही. त्याचप्रमाणे परकीय आक्रमणाला तोंड देतांना, भारतवर्षानें द्वेष, दुष्टपणा अगर सूड, या भावनांपासून अलिप्त राहिले पाहिजे.

सर्व प्रकारच्या संकुचितपणाने प्रेम मर्यादित होतें. हिंदुस्थानमध्ये व त्याचप्रमाणे जगाच्या इतर भागांतहि, मानवता ही उथळ आणि अंतीं असत्य ठरणाऱ्या जाति, पंथ, राष्ट्रीयता, धर्म, संस्कृति इत्यादि भेदांमुळे, छोट्या छोट्या समूहांमध्ये विभागली जात आहे; आणि या सीमित समूहां (Groups) ना भेदजनक अविश्वास व भीति यांचीच चिरकालची संवय असल्याने, त्यांच्यामध्ये परस्परांत संदेह, शत्रुता अगर औदासिन्यच वसत असतें. हा सर्व प्रकार अज्ञान, पूर्वग्रह आणि स्वार्थ यांमुळे होतो. जो कृत्रिम निराळेपणाचे बंध फोडून बाहेर येऊं शकेल, व जो जीवनाच्या अविच्छेद्य ऐक्याच्या जाणिवेमुळे प्रभावपूर्ण होईल, अशा परस्पर प्रीतिभावाचें पोषण केलें, तरच अज्ञान, पूर्वग्रह आणि स्वार्थ, यांमुळे घडणाऱ्या उपरिनिर्दिष्ट अनिष्ट प्रकारास आळा बसू शकेल. पार्थिव जगतावरील महान् दैवी योजनेमधील समान भागीदार या या नात्यानेच नव्हे, तर समानत: एकाच जीवनाची निरनिराळी रुपें असल्यामुळेहि, सर्व मानवांचे परस्पर ऐक्य आधींच सांधले गेलेलें आहे, हें गंभीर सत्य (हिंदुस्थानांत मुबलब कार्यक्षेत्र असणाऱ्या) रचनात्मक नेतृत्वामध्ये ध्यानांत ठेवावे लागेल; व त्याच्यावर विशेष भरहि द्यावा लागेल. या गंभीर सत्यास विसंवादी असणारें कोणतेंहि धोरण लाभदायक किंवा फलदायी होणार नाही. जे द्रष्टे आहेत, त्यांच्याच हातांमध्ये मानवतेंचे भवितव्य आहे.

गंभीर सत्य

# ३
# नवयुगनिर्मितीच्या पूर्ववेदना X

जागतिक रणकंदनाचें ऽ वादळ चढत्या प्रमाणांत उग्र होऊन, आता परासीमेस पोहोचलें आहे. ह्या वादळाच्या तीव्रतेचा कळसा झाला असल्यामुळे, तो सार्वत्रिक ऱ्हासास कारणीभूत होईल. भौतिक सुखाच्या शोधांत, सर्व प्रकारचा अंसतोष भलत्याच प्रमाणांत वाढला आहे. निरनिराळ्या लोकांच्या हितसंबंधांतील फरक वाढत जाऊन, त्यांतून संहारक कलह निर्माण झाला आहे. व्यक्तिपर व सामाजिक विषयक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या बाबतींतला मानवाचा प्रयत्न विफल झाला आहे; व ही विफलता स्पष्टपणे दृग्गोचर होत आहे. आपल्या प्रश्नांची विधायक व निर्मितिक्षम रीतीने सोडवणूक करण्यांत, मानवजातीची असमर्थता दिसून येत आहे; व मानवाचें मूलस्वरुप व त्याच्या जीवनाचें ध्येय याविषयींचे करुणास्पद अज्ञान हेंच या असमर्थतेच्या मुळाशी आहे.

प्रकाश व अंधार यांच्या शक्तीमध्ये आज जगांत लढा होऊन राहिला आहे. एका बाजूला बेगुमान लोभ, अनियंत्रित द्वेष व सामर्थ्यची हाव, यांच्या द्वारां स्वार्थी लोक स्वत:करिता सुख मिळविण्याच्या प्रयत्नांत आहेत. जीवनाचें खरें ध्येय ते जाणत नाहीत; व त्यामुळे ते संस्कृतीच्या सर्वात खालील पायरीपर्यंत घसरले आहेत. त्यांनी आपल्या शिवात्म्यास निर्जीव भूतकालांतून आलेल्या व प्रतिक्षणीं विदीर्ण होत असलेल्या विधींच्या ढिगांत पुरुन टाकलें आहे. भौतिक सुख व मर्यादित कल्पना, यांच्या पगड्यामुळे त्यांना आपल्या ईश्वरीय ध्येयाचें **विस्मरण झालें आहे**. ते वाट चुकले आहेत; व त्यांच्या अंत:करणांत द्वेष व दुष्टपणा यांचे थैमान चालू आहे. दुसऱ्या बाजूने कांही लोक नुकसान व दु:ख सहन करुन, त्यागयुक्त व धैर्यशाली कृतीच्या द्वारां, आपल्या शिवात्म्यास अनावृत करीत आहेत, हल्लीचें युद्ध मानवास धैर्य, सहनशीलता व त्याग, यांचे धडे शिकवीत



आहे. (X नोव्हेंबर १९३९ ऽ महायुध्द नं.२ (१९३९ ते १९४५) चालु असतांना हा संदेश दिला आहे.)

मानवजातीतील स्वार्थाचा रोग नाहीसा होण्याकरिता अत्यंत जालीम व सर्वांना लागू पडणाऱ्या उपायाची आवश्यकता आहे. ह्या स्वार्थरुपी वृक्षाचीं मुळें इतकीं खोल गेलीं आहेत, कीं तो मुळासकट उपटावयाचा असेल, तर त्यावर सर्व बाजूंनी प्रहार करावे लागतील. एकदा स्वार्थ नष्ट झाला, म्हणजे खरी शांति व सुख यांचा स्वाभाविक उदय होईल. आत्मदानपर प्रेमांत उत्पन्न होणारी शांति व सुख चिरकाल टिकणारी असतात. आपल्या अंत:करणांत महत्त्वाचें पूर्ण परिवर्तन घडवून आणण्यास लागणारे धैय व कळकळ यांची जोड मिळाली, तर अत्यंत पापी मनुष्य देखील मोठा सत्पुरुष बनूं शकतो.

सध्याची संहारक अंदाधुंदी सर्व जगभर पसरेल; परंतु त्यानंतर बराच कालपर्यंत युद्ध होणार नाही. पुढे येणाऱ्या सुखाच्या विशाल कालखंडांकरिता आजच्या येऊनजाणाऱ्या हालअपेष्टा सहन करणें उचित आहे. हल्लीच्या अंदाधुंदीमधून काय निघेल? तिचा शेवट कसा होईल? ह्या अंदाधुंदीचा शेवट एकाच रीतीने होऊं शकतो. मानवजातीस या सर्व प्रकारांची किळस येईल. वासना, कलह व द्वेष यांची मानवास घृणा येईल. लोभ व द्वेष इतक्या कोटीस पोहोंचतील, की मानवास त्यांचा कंटाळा येईल. आजच्या समस्यापूर्ण परिस्थितींतून सुटण्याचा मार्ग नि:स्वार्थपणा हाच होय. **सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीचा एकच मार्ग खुला आहे; व तो म्हणजे द्वेष टाकून प्रेम करणें, वासना टाकून दान करणें व आक्रमण टाकून सेवा करणें.**

तीव्र दु:खांतून विशाल ज्ञति निर्माण होईल. तीव्र दु:खाचा अनुभव हा जेव्हा संत्रस्त मानवास जागृत करुन, खऱ्या ज्ञानाच्या उपासनेस प्रेरणा देतो, तेव्हाच त्या अनुभवांतील हेतु पूर्ण होऊन, त्यांतील सार फलद्रूप होते. **अभूतपूर्व यातनांमधून, अभूतपूर्व आध्यात्मिक सार निघेल; सत्याच्या अधिष्ठानावर जीवनाची रचना करण्याकरिता, या यातनांची मदत होते.** सार्वत्रिक दु:ख मानवजातीस आपल्या आध्यात्मिक इतिहासांतील परिवर्तनबिंदूकडे धांव घेण्यास प्रेरणा देईल; व तो काळ अगदीं जवळ आला आहे. हल्लीच्या यातनांमुळे मानवांच्या परस्परसंबंधाविषयींचे खरे ज्ञान जागृत होण्याचा काळ जवळ आला आहे. मानवजातीवर कोसळलेल्या संकटाच्या खऱ्या कारणांची प्रांजळपणे व निर्भयपणे मीमांसा करण्याची व सद्वस्तूच्या नवीन अनुभवाचा शोध करण्याची हीच वेळ आहे. आत्माशाश्वत व सत्य आहे, हें जाणणें म्हणजे कधीहि फिक्या न पडणाऱ्या आनंदाचें वारसदार होणें होय. स्वत:च्या शिवात्म्याशीं ऐक्य पावून, हे ज्ञान मिळविण्यास आता मुळीच विलंब व्हावयास नको.

शिवात्म्याशीं ऐक्य पावल्यावर, मनुष्याला सर्वत्रांमध्ये अनंत आत्माच दिसतो;

## ६
# ईश्वर आणि धर्म *

धर्माचीं जीं संघटित स्वरुपें आज दिसतात, त्यांत त्या त्या धर्माच्या आद्य प्रवर्तकांची खरी व स्फूर्तिदायी दृष्टि व्यक्त होत नाही. अंधविश्वास, ठराविक मतें, आचारविचार हें आध्यात्मिक जीवनाचें सार असूं शकत नाही. वरील गोष्टी वरपांगी व फोल तर असतातच; पण पुष्कळ वेळा, त्यामुळे नुकसान व दिशाभूल होते. त्यांनी धर्ममार्तंडांच्या दंभाचा परिपोष होतो; व ते भोळ्या जनतेला फसविण्यास मात्र कारणीभूत होतात. **बाह्य विधि व समारंभ यांत गुरफटलेला धर्म म्हणजे आत्म्यास अडकविणारा सांपळाच होय.** धर्मांतर केल्यानेही या संकटांतून सुटका होत नाही; कारण त्यांत मनुष्य एक सांपळा सोडून, दुसऱ्या सांपळ्याचा आश्रय घेतो. धर्मानें जर माणसाचा आत्मा मुक्त होऊन त्यास ईश्वर प्रतीती होत नसेल, तर त्या धर्मांचें कांहीहि प्रयोजन नाही. असें झालें, म्हणजे **धर्म जाऊन, तेथे ईश्वर आलेला बरा.**

**याकरिताच मला एखादा नवा धर्म निर्माण करावयाचा नाही. जगांत आधीच असंख्य धर्ममतें आहेत. मानवाला आणखी एक नवा पिंजरा बहाल करण्याकरिता मी आलों नसून, मला जगाला अनंत सत्याची ओळख करुन द्यावयाची आहे. जगाला शब्दांची गरज नाही; प्रत्ययाची गरज आहे. ईश्वरी जीवनांतील पूर्णता व स्वातंत्र्य त्यांस हवें आहे; यंत्रसम व भपकेबाज विधींचा उथळपणा नको. त्याला प्रेमाची गरज आहे; पाशवी शक्तीचा देखावा नको. माझ्या पुढे जें कार्य आहे, तें निर्भायक आहे. आपण सर्व एक आहोंत.** आत्मदृष्टीने पाहतां, मी तुमच्यापैकी कोणापेक्षाहि श्रेष्ठ नाही. मी तुम्हाला ईश्वरत्व बाहेरुन देणार, असें नव्हे. आपण सर्वांत ते ईश्वरत्व एकाच प्रमाणांत अधिष्ठित आहे.

---

* गोरक्षण कम्पाउंड, नागपुर. ११ नोव्हेंबर १९४४.

## ४
# प्रार्थनेचें रहस्य

निरनिराळ्या विश्वधर्मामध्ये निरनिराळ्या प्रार्थना प्रचारांत आढळून येतात; व प्रत्येक धर्मातील बहुसंख्य लोक त्या धर्मात प्रचलित असलेल्या विशिष्ट प्रार्थनांनाच विशेष महत्त्व देतात. बहुधा प्रार्थना करण्याची भाषा, पद्धत, वेळ व ज्या शब्दांत प्रार्थना करावयाची ते शब्द देखील ठरलेलेच असतात; व ह्या पद्धतिविशेषांत एखादा लहानसहान देखील फरक झाल्यास प्रार्थनेचे आध्यात्मिक महत्त्वकमी होतें, अशीच बहुसंख्य लोकांची समजूत असते. सारांश, साधारणतः बहुजन समाजाच्या प्रार्थनेमध्ये अंतरंगापेक्षा बहिरंगावर व भावार्थापेक्षा बाह्यविधीवर जास्त जोर असतो. परंतु ह्या प्रवृत्तीमुळे, अनेकवेळा, प्रार्थना म्हणजे यांत्रिक पोपटपंचीच बनत जाते; व प्रार्थनातत्त्वाचा गूढार्थ बाजूलाच राहतो.

**वास्तविक पाहतां, प्रार्थनातत्त्वाचें खरें रहस्य तद्द्वारां होणाऱ्या विचार व भावना यांच्या समन्वयांत आहे.** शुद्ध विचार व उदात्त भावना ह्या परस्पराशीं समरस व एकरुप होण्याकरिता, प्रार्थनेइतकें सुलभ व प्रभावशाली दुसरें साधनच नाही. केवळ अध्यात्मचिंतनाने बुद्धि प्रखर होईल; केवळ कर्मकांडांतील विधियुक्त पूजेमुळे शरीराला व मनाला शिस्तीचें वळण लागेल व थोडाबहुत हृदयाचाहि विकास होईल; परंतु, **अंतःकरणांत स्वयंस्फूर्तीने उत्पन्न होणाऱ्या प्रार्थनेमुळे, बुद्धि व भावना ह्या दोन्हीहि शुद्ध व प्रकर्षावस्थेंत जाऊन, एकमेकांत सहज विलीन होतात.**

**जोपर्यंत मनुष्याच्या अंतरंगांत अशा प्रकारची सुसंवादिता निर्माण होत नाही, तोंपर्यंत त्याला आत्मज्ञान अथवा सत्यप्रतीति कधीहि होणें शक्य नाही.** व म्हणूनच निरनिराळ्या विश्वधर्मांत जें प्रार्थनेला महत्त्व दिलें आहे, तें योग्य आहे. प्रार्थनेमुळे मनांत शांति व ज्ञान यांचा उदय होतो; परंतु हें ध्येय साध्य होण्याकरिता प्रार्थनाविषयक खालील गोष्टी ध्यानांत

ठेवल्या पाहिजेत:-

(१) मनुष्याने ईश्वराची, ईश्वरी अवताराची, किंवा ईश्वरस्वरुप सद्‌गुरुची प्रार्थना अंत:करणपूर्वक करावी.

(२) प्रार्थना करण्यामध्ये ऐहिक किंवा पारलौकिक स्वार्थ साधण्याचा हेतु नसावा.

(३) आपल्याला परमात्म्याचें खरें स्वरुप समजावें व आपण त्याच्याशीं एकरुप व्हावें, हेंच प्रार्थनेचं उद्दिष्ट असावें.

(४) मनावर दडपण आणून कशीतरी केलेली प्रार्थना कंटाळवाणी व अर्थहीन असते. उलटपक्षी, स्वयंस्फूर्त व प्रेमपरिप्लुत प्रार्थना नितांत सुंदर व शांतिप्रद असते.

(५) केवळ बुद्धिनिष्ठ प्रार्थना रुक्ष व पंगु असते. प्रार्थनेंत उत्कट प्रेमाचा ओलावा असणें आवश्यक आहे. **बुद्धि व भावना ह्या दोहींना प्रार्थनेमध्ये पूर्ण अभिव्यक्ति मिळाली पाहिजे; व ह्या दोन घटकांमध्ये समतोलपणा पाहिजे.** सारांश, प्रार्थना एकांगी नको.

# ५
# नाममाहात्म्य संदेश *

सर्व जग हल्लीं दु:ख व गोंधळ यांचा अनुभव घेत आहे. या दु:खातून व अंदाधुंदींतून आध्यात्मिक सुव्यवस्था निर्माण करण्याकरितां, अखिल विश्वाच्या मुळाशीं असणाऱ्या दैवी शक्तीची प्रार्थना करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. परमेश्वराची अंत:करणपूर्वक प्रार्थना केल्यास व त्याचें नांव कोणत्यातरी धर्मपद्धतीने घेतल्यास, मानवाचें अंत:करण शुद्ध होऊन, ईश्वरी व निर्मितिक्षम प्रकाशपर शक्तीचा आविष्कार होतो. परमात्माच एकमेव सत्य वस्तु आहे; आणि जे कोणी त्याला भक्तिपूर्वक शरण जाऊन, त्याचें प्रेमाने स्मरण करतात, ते स्वत:च्याच शिवात्म्याशीं व अखिल विश्वांतील चैतन्याशी एक रुप होतात. ज्या दैवी प्रेमाने मानवाचे सर्व प्रश्न सुटूं शकतात, तें जागृत करण्याचें सामर्थ्य केवळ आत्मज्ञानी लोकांमध्येच असतें.

---

* जानेवारी १९४३.

# ८

# ईश्वरासाठीच जगा व ईश्वरासाठीच मरा *

हे महायुद्ध ही एक आपत्ति असली, तरी ती आवश्यक आहे. मानवामध्ये उदात्त तत्त्वांची जागृति करण्याच्या ईश्वरी योजनेचा हा एक भाग आहे. मानव या युद्धाने शिकविलेले धडे घेण्यास चुकेल, तर त्याने सोसलेलें सर्व दुःख व्यर्थच ठरेल. रस्त्यांतला एक साधा मनुष्य देखील एखाद्या निःस्वार्थ ध्येयासाठी स्वार्थत्यागाची कमाल गाठू शकतो. हे महायुद्धांत प्रत्यही सिद्ध झालेलें आहे. त्याचप्रमाणे जगांतील सर्व भौतिक वस्तू संपत्ति, मालमत्ता, सत्ता, कीर्ति कुटुंब, इतकेंच काय, पण माणसाचें पृथ्वीवरील जीवनसुद्धा क्षणभंगुर आहे, व यापैकी कशाचेंच महत्त्व शाश्वत नाही, हे देखील या युद्धांतच प्रत्ययास येतें. या युद्धांतील घटना हे धडे देऊन मानवास सत्यस्वरुप परमात्म्याच्या कार्याकरितां प्रवृत्त करतील, आणि त्याला खऱ्या शाश्वत तत्त्वांनी प्रेरित होणाऱ्या नव्या जीवनांत नेऊन सोडतील. स्वतःच्या देशासाठी किंवा राजकीय ध्येयासाठी लोक निःसीम स्वार्थत्याग व अश्रुतपूर्व अशी दुःखें भोगीत आहेत. तेव्हा ईश्वरासाठी किंवा सत्यासाठी देखील ते तेवढाच त्याग किंवा दुःखे खास साहू शकतील. **सत्यनिष्ठ जीवनासाठीच मनुष्याचा जन्म आहे, हें सर्व धर्मांनी उद्घोषित केलें आहे. म्हणून धर्माच्या नांवाखाली कलह माजविणें हा शुद्ध मूर्खपणा आहे.**

सर्वांच्यामध्ये स्फुरणारे चैतन्य एकच आहे. तसेंच ईश्वराहून अलग दुसरी कोणतीहि वस्तू नाही व ईश्वराशिवाय दुसऱ्या कशालाही महत्त्व नाही. मानवाला पुनदर्शन होण्याचा काळ जवळ आला आहे. **ईश्वरासाठींच जगावें व ईश्वरासाठींच मरावें, इतका तो महान्** ~~**आहे.** बाकी सर्व म्हणजे आभासमय ध्येयासाठीं केलेली निरर्थक व वायफळ धडपड.~~

* अहमदनगर, २७ डिसेंबर १९४२
हा संदेश महायुद्ध नं. २ (१९३९-४५) चालू असतां दिला.



आपण सर्व एक आहोंत, या मूलभूत सत्याचा अनुभव मात्र मला तुम्हाला द्यावयाचा आहे.

आजच्या आमच्या यातनांमधून भावी ज्ञानपूर्ण मानवता निर्माण होणार आहे. मनुष्य अहंकारयुक्त व मोहमय जीवनाचा त्याग करण्यास प्रवृत्त होईल; व मग त्याला स्वस्वरुपाची ओळख पटून, तो स्वतः ईश्वरच असल्याबद्दल त्याची खात्री होईल. असें झालें म्हणजे त्याच्या हृदयांतून अलोट अशा ईश्वरी प्रेमाचा प्रवाह सुरु होईल. **दैवी प्रेम अमर, भयरहिंत व शुद्ध असतें. अखिल जीवन एक आहे, या दिव्य जाणिवेंतून त्याचा उगम होतो.** ज्यांना खऱ्या व सारभूत मूल्याबद्दल आस्था आहे, त्यांनी ही माझी हांक ऐकावी. सत्य व प्रेम यांचे नवें युग निर्माण करण्याच्या कार्यात, त्यांना बराच भाग घ्यावा लागेल. माझा सर्वांना आशीर्वाद आहे.

# ७
# ईश्वर आणि प्रेम *

एखाद्या कठिण पर्वतशिखरावर चढतांना कांटे, खांचा, खळगे इत्यादि ओलांडून जावें लागतें, त्याचप्रमाणें अध्यात्ममार्गहि कठीण आहे. पण कितीही कठीण वाटला, तरी एकदा पत्करलेल्या अध्यात्ममार्गावर, टाकलेलें पाऊल परत घेतां येत नाही. प्रत्येकाने **जागृत ईश्वरत्वा** (Conscious divinity) चें आध्यात्मशिखर गांठलेंच पाहिजे. टाळाटाळ अगर पळवाट किंवा आराम यांनी फक्त आत्मप्रत्ययाचा दिवस दुरावेल. या मार्गावर कितीहि आस्था ठेवली, तरी ती थोडीच आहे. मिथ्या जगाच्या जंजाळांत गुंतणे, म्हणजे टाळतां येण्यासारख्या अनेक आपत्ति निष्कारण ओढवून घेणे होय. आत्मज्ञानरुपी ध्येयावर लक्ष्य ठेवल्यास त्या सहज टळतात.

हें आध्यात्मिक शिखर, गांठण्याकरिता, प्रेम अत्यंत आवश्यक आहे. ईश्वरप्राप्तीस या व्यतीरिक्त जे गुण आवश्यक आहेत, ते सर्व प्रेममार्गाचा प्रामाणिकपणे अवलंब केल्यास आपोआप प्राप्त होतील. कारण, **प्रेमामुळे समोरचा मार्ग प्रकाशित होत जातो.** प्रेमाचा दिवा नसेल, तर तुम्ही अंधारांत वाट चुकाल. प्रेमशून्य ह्रदय हे अंधार व यातना यांत सांपडते. पण ईश्वरी प्रेमामुळे जो बेचैन असेल, तो मात्र नि:संशय अवीट गोडीच्या ईश्वर

* नॅशनल कॉलेज हॉल, नागपुर. १२, नोव्हेंबर १९४४.



प्राप्तीच्या अचूक मार्गावर आहे.

मानवी प्रेम सदोष असेल, पण तेवढ्याने तें त्याज्य ठरत नाही. तें प्रेम क्रमाने साधकांतील अंतर्गत दोष काढून, त्याला सत्याच्या मार्गावर नेऊन सोडतें; व शेवटी त्यास ईश्वरस्वरुपांत विलीन करतें. विशुद्ध प्रेमामध्ये जे स्वत:च्या अलगपणाच्या व्यक्तित्वाचा होम करण्यास तयार नाहीत, अशांना स्वानुवभांतील आत्मप्राप्तीरुपी अत्युच्च सुखाचें द्वार कायमचेंच बंद असतें. ईश्वराचा शोध करीत असणाऱ्या सर्वांना माझा आशीर्वाद आहे. हेच लोक पुढे येणाऱ्या सत्यनिष्ट व प्रेमपूर्ण युगाचे आधारस्तंभ राहतील.

# ११

# अखिल जीवनाची एकता *

## अविचारी धडपडीचें दुःखमय पर्यवसान

आज माणूस माणसाचा शत्रू बनला आहे. अविचारी, व अर्थहीन व अपरिहार्य घटनाचक्रांत तो असहाय्यपणे सांपडला आहे. आत्मविचाराच्या अभावामुळे कालप्रवाहांत या हेतुशून्य घटनाचक्रांचा उदय झालेला आहे.

### बंधुतेच अस्तित्व

अविभाज्य जीवनसमुद्रांतील एकत्वामध्ये निव्वळ अज्ञानामुळे, जात, देश, धर्म, पंथ इत्यादि भेद निर्माण झालेले आहेत. या कृत्रिम भेदामुळे हृदय विषारी बनतें; व आपसांतील परस्परसंबंध दूषित होता. वस्तुत: **आपण सर्व एकाच जीवनाचे अंश आहोंत, म्हणून बंधुता ही प्रयत्नपूर्वक निर्माण करावयाची एखादी आगंतुक गोष्ट नसून, स्वयंसिद्ध वस्तुस्थिति आहे.** सत्याचा अंगिकार करावयाचें ठरवितांक्षणींच या बंधुतेला मान्यता देऊन तदनुसार वागणें, हे प्रत्येकाचें कर्तव्य ठरते. ईश्वरस्वरुपाशी एकरुप असलेल्या महापुरुषांच्या चरणीं लीन होऊन, हे सत्य हळूहळू आत्मसात् करुन घ्यावयास हवें. हळूहळू मानवाने आपल्या पूर्वग्रहांचा त्याग करुन, वरपांगी दिसणाऱ्या मिथ्या भेदांच्या जाळ्यांतून सुटका करुन घेतली पाहिजे. हळूहळू मानवाने अद्वैतपूर्ण व अभेदपर अशा ईश्वरस्वरुपाकडे धांव घेतलीच पाहिजे.

### विभागूं न शकणारी विविधता

एकरुप ईश्वराचा हृदयांत उदय झाला, म्हणजे द्वैताचा खेळ संपला असें नव्हें. तुम्हाला जगांतील कार्य जगाच्या द्वैतांतच करावयाचें असतें; पण द्वैतांत गुंतून न जातां

---

* कान्व्होकेशन हॉल, नागपूर युनिव्हर्सिटी. १४, नोव्हेंबर १९४४

# ९

# परमात्माच सत्य वस्तु आहे *

जाणिवेंतील संस्कारजन्य अज्ञानामुळे, आत्मा आणि शरीर हीं एकच आहेत, असा भ्रम निर्माण होतो. अशा प्रकारें शरीराच्या अभिमानांत गुरफटलेल्या आत्म्याचें ज्ञान हें अर्थातच इंद्रियाद्वारां अनुभवास येणाऱ्या संवेदना व त्यांवरुन निघणारे निष्कर्ष एवढ्या त्रिज्येंतच आकुंचित राहतें. पण सत्य ओळखायचें असेल, तर हें ज्ञान अपुरें पडतें, इतकेंच नव्हें तर बहुधा दिशाभूलहि करतें. शरीर म्हणजेच आत्मा अशी भावना असलेल्यांना इंद्रियजन्य अनुभव सत्य वाटला तरी इंद्रियांना भासणारें व द्वद्वांनी भरलेलें हें जग सर्वस्वी मिथ्याच आहे. वास्तविक पाहतां, **प्रेम, कल्याण आणि सहृदयता यांचा जणु सागरच असणारा आणि अमर व अविभाज्य असा ईश्वर हाच काय तो सत्यस्वरुप आहे.**

या ईश्वराचें स्वरुप ओळखण्याची व ईश्वराशीं एकरुप होण्याची पहिली अट म्हणजे अहंपणा व ''मी'' यांचा पूर्ण नाश होऊन, शरीराचा अभिमान पूर्णपणे नाहीसा झाला पाहिजे. द्वैतभाव हा भ्रममूल आहे. लोभ, मत्सर व वासना यांनी परिपूर्ण अशा शरीर-सुख-प्रधान जीवनांतील संस्कारांमुळे हा द्वैतभाव बळावतो. पण सेवेचें व्रत पत्करुन, आत्मसाक्षात्कारी सद्गुरुच्या सहाय्याने या अडचणींतून पार पडता येऊन, आत्मप्रत्यय मिळविणें शक्य असतें. तसें झाल्यास, ईश्वराशी आपलें कसें तादात्म्य आहे, याचा प्रत्यय येतो. **ईश्वरप्राप्ति हें जीवनाचें खरें ध्येय आहे. या एकाच उद्देशाने विश्व निर्माण झालें आहे.**

---

* रामकृष्ण आश्रम, नागपूर १२, नोव्हेंबर १९४४

ईश्वरप्राप्ति हें विशिष्ट व्यक्तींचें त्यांच्या त्यांच्या पुरतेंच एक स्वार्थपर कार्य आहे, असा एक गैरसमज रुढ आहे. परंतु, ईश्वर स्वरुपांत स्वार्थीपणा अगर इतर कोणत्याहि प्रकारच्या मर्यादेचें बंधन राहू शकत नाही. द्वैतभावपूर्ण अशा आकुंचित जीवनाचा शेवट म्हणजेच ईश्वरस्वरुपाची प्राप्ती. यामुळे प्रत्येक व्यक्ति विश्वात्म्याशीं तादात्म्य पावते; व सत्य वस्तूची ओळख पटून प्रेम, शांतता व सुसंवादिता यांनी व्यक्तिजीवन परिपूर्ण होतें. ईश्वरप्राप्त सद्गुरु हा संबंध मानवजातीला उपकारक होतो.

# १०

## प्रेमाची प्रेरक शक्ति *

सुखलोलुपता अगर परिणामी ग्लानि आणणारा भावनाक्षोभ म्हणजे खरें प्रेम नव्हे. संवेदनांची आसक्ति असलेल्यांना व स्वार्थी सुखाचा हव्यास असलेल्यांना खऱ्या प्रेमाचा आस्वाद मिळणें शक्य नाही. कारण, त्यांचे अंत:करण रुक्ष व दुर्बल बनलेलें असतें. पण ज्यांची हृदयें साधी व पवित्र आहेत, त्यांना सद्गुरुप्रसादाने शुद्ध प्रेमाचा अनुभव येतो. **शुद्ध प्रेम सामर्थ्यवान् व प्रेरक असते.** माणसांतील दुजा भावाचा पडदा या प्रेमामुळे नष्ट होतो. शुद्ध प्रेमामुळे माणूस स्वार्थत्यागास व सर्वांना कल्याणकारक असणारीं कार्ये करण्यास उत्सुक बनतो. प्रेम हें जातपात, देशविदेश, गणगोत, धर्मभेद, लिंगभेद इत्यादी कांहीहि ओळखत नाही. प्रेम हें संस्कारजन्य गुलामगिरींतून मुक्तता करतें, व आत्मप्रत्ययाच्या स्वतंत्र वातावरणांत नेऊन सोडते. या प्रेमामुळे मनुष्य अनंत व चिरंतन जीवनाच्या स्फूर्तिमय शक्तीत विलीन होतो.

व्यक्ति व तिचें आत्मस्वरुप यांत मुख्यत्वें **भेदप्रवण अहंभावाचाच पडदा असतो. हा अहंभाव पूर्णपणे समर्पण करुनच हृदयाची बंद कपाटें उघडणें शक्य होतें; व अशा अहंभावशून्य हृदयांतच ईश्वराचा प्रवेश होऊं शकतो.** आत्मज्ञानी व सत्यस्वरुप विभूतिद्वारांच ईश्वरस्वरुपाचा प्रत्यय येऊं शकतो. असा पुरुष हृदयांत शुद्ध प्रेम उत्पन्न करतो. हृदयावर चढलेली बुरशी त्याच्या कृपेने जळून भस्म होते. अशा पूर्ण पुरुषास जे धैर्यशाली व भाग्यशाली लोक शरण जातात, त्याच्यावर त्याची कृपा होते. जे लायक असतात, तेच सद्गुरुच्या प्रसादाचे अधिकारी होतात. हा प्रसाद मिळाला, म्हणजे हृदयांत खऱ्या प्रेमाचा उदय होऊन, साधक ईश्वरस्वरुपांत विलीन होतो; व ईश्वराशीं ऐक्य पावल्यावर, तो त्या दिशेने प्रयत्न करणाऱ्या इतर अनेक साधकांचा मार्गदर्शक बनतो. दुसरी कोणतीहि शक्ति शुद्ध प्रेमाहून अधिक मोठी नाही.

---

* धंतोली, नागपूर १३, नोव्हेंबर १९४४

कारण तें दुसऱ्या कोणत्याहि व्यक्ति, समाज अगर देश यांना हव्या असणाऱ्या तसल्याच प्रकारच्या स्वातंत्र्याशीं अविरोधी असलें पाहिजे.

राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक स्वातंत्र्य द्वंद्वांतच आणि द्वंद्वामुळेच अभिव्यक्त होतें. तें द्वंद्वावरच जगतें; आणि द्वंद्वावरच पुष्ट होतें. म्हणूनच तें सापेक्ष आणि मर्यादित असावे लागते. तें अनंत असूं शकत नाही. त्याचें प्रमाण कमी जास्त होऊं शकतें; आणि जरी सतत प्रयत्नाने मिळविलें, तरी ती चिरकाल टिकणारी ठेव होऊं शकत नाही. कारण त्यासाठी ज्या बाह्य गोष्टी मिळविलेल्या असतात, अगर जी बाह्य स्थिति परिपक्व केलेली असते, त्या गोष्टी व ती परिस्थिति कायमची टिकेलच अशी खात्री नसते.

केवळ आध्यात्मिक स्वातंत्र्यच पूर्ण आणि अनंत असतें; आणि सतत प्रयत्नांनी तें साध्य झालें तर तें चिरकाल टिकतें, कारण जरी द्वंद्वांमध्येच आध्यात्मिक स्वातंत्र्य व्यक्त होत असलें, तरी त्याचें अधिष्ठान जीवनाच्या एकतेच्या अनुभवांत असून, त्यावरच तें पोसलें जातें.

**आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळण्याची मुख्य अट म्हणजे सर्व प्रकारच्या गरजांपासून मुक्ति ही होय.** वासना हीच मनुष्याला त्या वासनेत पोषक असलेल्या परिस्थितींत बांधून ठेवते. जर कोणतीहि वासना नसेल, तर कसलीहि मर्यादा राहणार नाही; आणि कशावर अवलंबूनहि राहावयाला नको. वासनेमुळेच आत्मा बंधनांत पडतो. ही वासनेचीं बंधनें जेव्हा तो तोडून टाकतो, तेव्हा तो शरीर, मन आणि अहंकार यांच्या बंधनापासूनहि स्वत:ला मुक्त करतो; आणि हेंच जीवनाच्या एकतेची प्रतीति आणून देणारें आणि सर्व प्रकारचे संशय आणि चिंता नाहीसे करणारें असें आध्यात्मिक स्वातंत्र्य होय.

**आध्यात्मिक स्वातंत्र्यांतच चिरंतन सुख आणि निर्मल आत्मज्ञान असूं शकतें.** सत्यप्रीतीची अबाधित अनुभव केवळ आध्यात्मिक स्वातंत्र्यांतच उगम पावूं शकतो. आध्यात्मिक स्वातंत्र्यांतच मर्यादितपणा आणि दु:ख यांचा कायमचा अंत होऊं शकतो. आणि आध्यात्मिक स्वातंत्र्यांतच मनुष्य सर्वांकरिता जगूं शकतो; व कार्य करीत असतांनाहि तो अलिप्त राहूं शकतो. दुसऱ्या प्रकारचें कोणतेंहि स्वातंत्र्य हें वाळूवर बांधलेल्या घराप्रमाणें असतें; आणि दुसऱ्या प्रकारचें कोणत्याहि प्रकारच्या ध्येयसिद्धीला नष्ट होण्याची भीति असते. म्हणून आध्यात्मिक स्वातंत्र्यासारखी दुसरी देणगी नाही; आणि दुसऱ्यांना ती मिळविण्यास मदत करण्यासारखें श्रेष्ठतम कर्तव्य नाही. ज्यांना या आध्यात्मिक स्वातंत्र्याचें आत्यंतिक महत्त्व पटलें असेल, त्यांनी तें स्वत:साठी मिळविण्याचा प्रयत्न करावयचा येवढेच नव्हे, तर दुसऱ्यांना तें मिळविण्यासहि मदत करणें, हें त्याचें ईश्वरप्रणीत कर्तव्य आहे.

ज्यांना दुसऱ्याची नि:स्वार्थ सेवा करावीशी वाटते, ते त्यांना कपडे, औषधें, अन्न व राहावयास आश्रय देतात; व ते कर्तव्यबुद्धीने प्रेरित होऊन प्रबलांकडून झालेल्या जुलुमापासून



एकत्वाची स्थापना करणें, म्हणजे जगांतील विविधता समूळ नाहीशी करणें नव्हे. साकार जगांत वैचित्र्यपूर्ण अधिष्ठित असलेल्या निर्मितिक्षम सुसंवादितेमध्यें असल्या विविधतेमुळें बदसूर निर्माण होत नाही. उलट सत्यपूर्ण जीवनाच्या अमर्याद एकरुपतेंत ती भिन्नता बिलीन होईल. आत्मसाक्षात्कारांतून सहिष्णुता, जीवनातील गोडी आणि विशुद्ध प्रेम यांचा उदय होऊन औदासीन्य, वैविध्याचा अनिच्छापूर्वक अंगिकार व आसक्ति यांचा लोप होईल. **वैविध्यपूर्ण जगांतच एकत्वाचा आस्वाद घेतां आला पाहिजे.**

## मानवाचे अंगीभूत ईश्वरत्व

दैवी प्रेमाचें महत्त्व स्वयंसिद्ध आहे. **प्रेमाचा इन्कार करणें म्हणजे स्वत:च्याच शुद्ध व सत्य स्वरुपाचा इन्कार करणें आहे.** प्रेमशून्यतेमुळे फक्त आत्मवंचना व आत्मनाश हीच संभवतात. कधी तरी, अंतर्मुख दृष्टी करुन, आत्म्याला जखडणाऱ्या शृंखलांचा त्याग केला पाहिजे. **भिन्नभावाची बेडी ही कधी तरी मोडून फेकलीच पाहिजे.** अशानेच मानवास परमात्मस्थितींतील अनंत जीवनाचा लाभ होईल. मग यांत उशीर कशाला? काल्पनिक भिन्नत्वाचें पटल या क्षणींच कां दूर कराना ! **विशुद्ध प्रेमाला जीवन अर्पण करा; आणि निर्भय बना. अखिल जीवन अविभाज्य व एकरुप आहे. भिन्नत्व काल्पनिक आहे. मी सादर केलेल्या या अमर सत्याचा स्वीकार करा !**

# १२

## सात उदात्त तत्त्वें

(१) **खरें अस्तित्व** परमात्म्यालाच आहे. सर्वभूतान्तरात्मा जो एकच एक परमेश्वर त्याच्यावाचून कोणतीहि वस्तु सत्य नाही.

(२) **खरें प्रेम,** म्हणजे अनंत आत्मतत्त्वावर असणारें प्रेम. या प्रेमामुळे परमात्मरुपी सद्वस्तु पाहण्याची व तिचें ज्ञान करुन घेऊन तिच्याशी एकरुप होण्याची तीव्र आकांक्षा जागृत होते.

(३) **खरा आत्मयज्ञ,** म्हणजे या प्रेमाकरिता देह, मत, अधिकार, स्वार्थ व प्राणहि अर्पण करण्यास तयार असणें.

(४) **खरा त्याग,** म्हणजे व्यवहारांतील अनेकविध कर्तव्य करीत असतांना, सर्व स्वार्थपर विचारांना व वासनांना टाकून देणे.

(५) **खरें ज्ञान,** म्हणजे सज्जन लोकांचा व वाईट समजल्या जाणाऱ्या लोकांचा, तसेंच सत्पुरुषांचा व पापी समजल्या जाणाऱ्या लोकांमधील अन्तर्यामी परमात्माच आहे, हे जाणणें. हें ज्ञान प्राप्त झाल्यावर, मनुष्य मोबदल्याची अपेक्षा न ठेवतां, सर्वांना परिस्थितीनुरुप मदत करण्यास तत्पर असतो. त्याच्यावर भांडणांत भाग घेण्याचा प्रसंग अनिच्छेने आलाच, तर तो आपलें कर्तव्य करीत असतांना निर्वैर व द्वेषरहित राहतो. इतरांच्या विषयी बंधुभाव व भगिनीभाव ठेऊन, त्यांना तो आनंद देतो; व तो कोणाचेहि- ज्यांनी त्यांचे नुकसान केलें असेल त्यांचे देखील-देहाने, वाणीने किंवा मनानेहि वाईट करीत नाही.

(६) **खरा संयम,** म्हणजे नीच वासनांपासून निवृत्त होऊन जितेंद्रिय होणें असल्या संयमाशिवाय शील पूर्णपणे निर्लेप राहू शकत नाही.

(७) **खरी शरणागति,** म्हणजे प्रतिकूल परिस्थितीमुळे मनाची साम्यावस्था ढळूं न देणे व सर्व प्रकारच्या संकटांत ईश्वरी इच्छेचा शान्तपणे स्वीकार करणें.

# १३

## मानवतेस आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्यास मदत करा.

जगांत सगळीकडे प्रत्येक मनुष्याचा आत्मा स्वातंत्र्यासाठीं तळमळत आहे. स्वातंत्र्यप्रेम आणि स्वातंत्र्यासाठी शोध हे मानवतेचे गुणविशेष आहेत. सर्व देशांत, सर्व प्रकारच्या परिस्थितींत, सर्व जातींत आणि सर्व काली ''स्वातंत्र्य'' हाच मानवतेचा मानबिंदु झालेला आहे. परंतु निर्मेळ आणि खऱ्या स्वातंत्र्याचा अर्थ ज्यांना कळलेला आहे असे फारच थोडे लोक आहेत. बऱ्याचशा लोकांना स्वातंत्र्यास वास्तविक आवश्यक असणाऱ्या गोष्टीबद्दल फारच कमी माहिती असते; व त्यामुळे त्यांची धडपड केवळ सापेक्ष स्वातंत्र्य प्राप्त करुन देणाऱ्या जीवनाकरिताच असते. सारांश, निरनिराळे लोक निरनिराळ्या प्रकारच्या सापेक्ष स्वातंत्र्यासाठी झटत असतात.

आयुष्याच्या सर्व क्षेत्रांत मनुष्याला स्वातंत्र्य हवें असतें; आणि म्हणून मनुष्य ज्या प्रकारचें आयुष्य घालवूं इच्छितो त्या प्रकारच्या आयुष्यास लागणाऱ्या सर्व गोष्टी त्याला हव्या असतात. अशा प्रकारें आपल्या देशाशीं जे तादात्म्य पावतात त्यांना 'राजकीय स्वातंत्र्य' हवें असतें; त्यांना आर्थिक स्वातंत्र्य हवें असतें; ज्यांना धार्मिक बाबींनी स्फूर्ति मिळते त्यांना धार्मिक स्वातंत्र्य हवें असतें. सामाजिक अगर सांस्कृतिक ध्येयाविषयी ज्यांना आत्यंतिक तळमळ असतें ते त्यांना ज्या प्रकारची ध्येयं आवडत असतात, आणि त्यांना ज्या ध्येयाचा प्रसार करावासा वाटतो, त्या ध्येयाची वाचेने व कृतीने उपासना करण्याचें स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करतात. परंतु या साऱ्या स्वातंत्र्यांना ज्यामुळें खरें महत्त्व येतें, असे मूळ स्वातंत्र्य म्हणजे आध्यात्मिक स्वातंत्र्य आहे, याची जाणीव फारच थोड्या लोकांना आहे. बाह्यत: मनुष्याला जरी संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें, तरी जोंपर्यंत त्याला आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळत नाही, तोंपर्यंत त्याचा आत्मा दु:खात्मक बंधनांतच तळमळत राहील. **कोणतीहि व्यक्ति, समाज अगर देश ज्या व्यावहारिक स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करतात, तें स्वातंत्र्य स्वभावत:च मर्यादित असतें.**

उन्नतीची पराकाष्ठ व्यक्त करणारी पौर्वात्य संस्कृति, ह्या परस्परांस कमी न लेखतां, एकमेकांत मिळून जातील. आध्यात्मिक व आधिभौतिक प्रगति बरोबरच झाली पाहिजे. **बुद्धि व अंत:करण यांच्यांत समता ठेवली पाहिजे.** विवेकाकरता बुद्धि पाहिजे; व भावनांकरता अंत:करण पाहिजे. त्यांच्या सम्यक्मीलनामुळे कला, शास्त्र व निसर्ग, या सर्वांचा अंतर्भाव असणाऱ्या पराप्रज्ञेची प्राप्ति होते.

''ज्या अनंत तत्त्वापासून सर्व वस्तू उत्पन्न होतात, त्या तत्त्वाशीं मी ऐक्य पावलों आहे. हीच ख्राइस्टअवस्था. मला लोकांनी जगाचा उद्धार करणारा ईश्वरप्रेषित महात्मा म्हटलें, तरी त्याचा माझ्यावर कांही परिणाम होत नाही. कारण ज्या ख्राइस्टअवस्थेचा मी सतत अनुभव घेतों, व ज्या अवस्थेप्रत मी इतरांना नेईन, ती अवस्था शद्बातीत आहे....

''ख्राइस्टपदास पोचलेला कोणीही पुरुष चमत्कार करुं शकतो. परंतु चमत्कार करणें हे अध्यात्मिक उन्नतीचें लक्षण असतेंच असें नाही. लोकांनी माझ्याकडे शारीरिक व्यथेकरता किंवा ऐहिक वस्तूंच्या प्राप्तीकरतां येऊं नये. देश, काल व परिस्थिति यांना अनुरुप असे चमत्कार माझ्या हातून घडले, तरी कोणाचीही पोकळ जिज्ञासा पूर्ण करण्याकरता मी चमत्कार करणार नाही. आध्यात्मिक सुधारणा करणें, म्हणजेच अतिश्रेष्ठ रोगनिवारण आहे; व तें मी घडवून आणीन. **परमपद प्रत्येकांत छादित स्थितींत आहे; परंतु ते स्पष्टप्रत्ययांत आणलें पाहिजे.**''



दुर्बलांचे रक्षण करण्यास तत्पर असतात. एवढेच नव्हे तर दुसऱ्यासाठीहि आपल प्राण खर्ची घालण्यास ते तयार असतात. अशा सर्व प्रकारची सेवा चांगली आहे. परंतु **मानवतेसाठी आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्यास लागणारी मदत या सर्वांहूनहि अधिक महत्त्वाची असून अत्यंत श्रेष्ठ होय.**

आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्यास मदत करण्याचा मार्ग इतर कोणत्याहि मदत करण्याच्या मार्गापेक्षा अगदीच निराळा आहे. भुकेल्या माणसाला तुम्ही अन्न द्याल, आणि त्याला मग तें नुसतें खावें लागेल; तहानेल्याला तुम्ही पाणी द्यालय; आणि त्याला मग तें नुसतें प्यावें लागेल; वस्त्रहीन मनुष्यास तुझी कपडे द्याल; आणि त्याला ते नुसते घालावे लागतील; आश्रयहीन मनुष्यास तुम्हीं घरें पुरवाल; आणि त्यांस त्यांत नुसतें राहावे लागेल. परंतु आध्यात्मिक बंधनाच्या यातनांचे दुःख तात्काळ शमन करणारी दुसऱ्यांना देण्यासारखी अशी कोणतीहि तयार वस्तु नसते. **आध्यात्मिक स्वातंत्र्य हें स्वत:साठी स्वत:लाच आपल्या नीच मनोवृत्तींशीं झगडून आणि सतत जागता पहारा करुन मिळवावें लागतें.** सत्यप्रसाराचें कार्य स्वीकारलेल्या प्रत्येक शिपायाने इतरांना आत्मविजय मिळविण्याच्या प्रयत्नांस उद्युक्त करावयाचें असतें; इतकेंच नव्हें, तर त्या बाबतींत प्रत्येक पाऊल टाकतांना त्यांना मदत करावयाची असते. त्यांचे ओझें हलकें करण्याचा दुसरा मार्ग नाही.

प्रियतम वाचकांनो ! तुम्ही माझ्या या कार्याचे सहभागी व्हाल असा माझा पूर्ण विश्वास आहे. तुमच्यापैकी पुष्कळांनी आजपर्यंत पुष्कळ वर्षेपर्यंत माझ्यावरील प्रेम व श्रद्धा यामुळे माझ्या आज्ञांचें पालन केलें आहे. आणि माझ्या आध्यात्मिक कार्यासाठी नानाप्रकारच्या संकटांत तुम्ही मला चिकटून राहिलां आहां. आता मानवतेला ईश्वरप्रतीति होण्यास मदत करण्याच्या माझ्या कार्यासाठीं सर्वस्व अर्पण करण्याची वेळ आलेली आहे. **केवळ परमेश्वरच सत्य आहे हें अक्षय चिरंतन सत्य स्पष्टपणें समजून घेऊन त्याविषयी नि:शंक झालें पाहिजे; व तें नीट पटवून घेऊन वाचेने व आचरणाने सिद्ध केलें पाहिजे;** सत्याचें पूर्ण ज्ञान होण्यांतच मनुष्याला आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळणार आहे. सर्वांच्यामध्ये एकच परमतत्त्व भरलें आहे. या प्रतींतीमुळे परस्परांबद्दल अनिर्बंध प्रेम निर्माण होतें. व तें अनिर्भेद्य जागतिक बंधुतेस पोषक होते. चिरंतन शांति निर्माण करील, असें सत्य समजण्यासाठी आणि मनुष्याला आध्यात्मिक बंधनांतून मुक्त करण्यासाठी कितीहि मोठा त्याग करावा लागला, तरी तो थोडाच आहे.

''मानवतेला आध्यात्मिक स्वातंत्र्य देण्याच्या या ईश्वरप्रणीत कार्यात मला मदत करीत असतांना, जरुर पडल्यास तुम्ही प्राण देण्यासहि तत्पर असलें पाहिजे. परमेश्वरशोधाच्या कार्यात दुसऱ्यांना मदत करण्याच्या तुमच्या कर्तव्यांत तुम्हांला सर्व प्रकारच्या दुःखांचे व त्यागाचे स्वागत करावें लागेल. **आपल्या वैयक्तिक परिस्थितीला उत्तम झेपेल, अशा कार्याची रुपरेषा ठरविण्यासाठी, जर कोणाला विशिष्ट सूचनांची गरज असेल, तर माझ्याकडून त्या देण्यांत येतील.**''

# १४
# नवीन कालचक्र *

''मी एखादा पंथ, संस्था, संघ किंवा नवीन धर्म स्थापन करण्याकरिता आलों नाही. मी जो धर्म शिकवीन, त्यामुळे अनंतरुपांत अनस्यूत असलेल्या एका तत्त्वाचें ज्ञान होईल. लोकांना मी अंत:करणरुपी पुस्तक वाचण्याचें शिकवीन; कारण त्यांतच जीवनांतील रहस्याची किल्ली आहे. **विधींच्या बाह्य आविर्भावापेक्षा, त्यांच्या मागे असणारा भावच आपल्या विवेकशक्तीने आचरणांत आणला पाहिजे. बुद्धि व भावना, यांचा मी सुंदर मिलाफ घडवून आणीन. संस्था व संघ स्थापून सत्य कधीच जवळ येत नाही. तत्त्वप्रत्यय करुन घेणें हे व्यक्तीचेंच कार्य आहे.**

''प्रत्येक प्राणिमात्रास स्वत:मध्येच असलेल्या प्रेम, आनंद, ज्ञान व श्रेय, यांच्या सागराकडे जातां येतें. पुढे धर्माचें जें स्वरुप होतें, त्या स्वरुपांत कोणताहि आध्यात्मिक प्रणेता नवीन धर्म देत नाही. मूळ धर्मसंस्थापकाचें केवळ अस्तित्वच कल्याणप्रद व अध्यात्मप्रवृत्तीस पोषक असतें. तो आपल्या सान्निध्याने दुसऱ्यास आत्माभिमुख करतो. थोर महात्म्याशीं झालेला आपला सहवास चिरस्मरणीय व्हावा, व त्याने स्वत:च्या प्रभावाने उत्पन्न केलेलें वातावरण कायम राहावें, या उद्देशाने लोक सामुदायिक धर्म अस्तित्वांत आणतात. आंतील भाव नष्ट झाला, म्हणजें धर्माचें व संघांचें माहात्म्य हळू हळू क्षीण होतें. नंतर प्रचलित कल्पनांविषयी मन साशंक व चिकित्साप्रवण होतें, व अध्यात्मजीवनास पोषक असून, अधिक अर्थपूर्ण व व्यवहार्य असणारें दुसरें नवीन तत्त्व शोधण्याची इच्छा उत्पन्न होतें. हल्लीं जगांत सार्वजनिक असमाधान आहे. आणि जगांतील गोंधळ व दु:ख नष्ट करणारा उपाय आपणास सापडावा, अशी लोकांची इच्छा आहे. ती मी तृप्त करीन; व त्यांना खऱ्या आनंदाचा व शांतीचा

* ब्रेमेन बोटीवरुन: १९, मे १९३२



मार्ग दाखवीन. पण याकरता, त्यांची दृष्टि अधिक विशाल व गंभीर झाली पाहिजे.

''साधारणत:, सद्‌गुरु हे मुमुक्षूंना त्यांच्या अधिकाराप्रमाणे योग्य तें साहाय्य व्यक्तिश: देतात. परंतु, पूर्वीचे कालचक्र संपून हल्ली नवीन कालचक्रास प्रारंभ होत असल्यामुळे, हा अवतारकाल आहे; व म्हणून, मानवजातीस माझी मदत व्यक्तिश: व सार्वत्रिकहि होईल. जुन्या व नवीन कालचक्रांचा संधि आला, म्हणजे अध्यात्मविचारांचे पुनरुज्जीवन करुन रुढ जीवनपद्धतींत नवचैतन्य निर्माण करणारा पुरुष जन्मास येतो. कांही थोड्या व्यक्तींना तो अत्युच्च प्रबुद्धावस्था देतो व सर्व जगाच्या अध्यात्मिक प्रगतीस चालना देतो.

''पाश्चिमात्य जग हें जीवनाकडे केवळ बुद्धीच्या व तर्काच्या दृष्टीने पाहतें; व बुद्धीस अगम्य असणाऱ्या तत्त्वाविषयी तें साशंक आहे. बौद्धिक माहिती म्हणजे सर्वात निकृष्ट दर्जाचें ज्ञान असलें, तरी वाचन, श्रवण व तर्क इत्यादिकांमुळे ती माहिती वाढते; व त्यामुळे खऱ्या ज्ञानाचा आभास उत्पन्न होतो.

''**परंतु सर्वांत श्रेष्ठ ज्ञान म्हणजे सर्व वस्तूंचे यथार्थ दर्शन घडविणारा व चिरकाल टिकणारा प्रबोधच होय.** ह्या सर्वार्थप्रकाशक प्रबुद्ध स्थितींत, मनुष्य सर्व वस्तूंशीं व व्यक्तींशीं समरस होऊन, जीवनांतील सर्व कलांमध्ये ईश्वरत्वाचा अनुभव घेतो; व इतरास आनंदमय करण्याचें त्याच्यांत सामर्थ्य येते. जगांतील कर्तव्य व व्यवहार तो लक्षपूर्वक करीत असला, तरी तो जगाविषयीं मनाने नि:संगच राहतो. हाच खरा संन्यास. या शेवटल्या व अतिश्रेष्ठ प्रबुद्धावस्थेंत, आत्मा हा शक्ति, ज्ञान व आनंद यांनी भरलेल्या अमर्याद महासागरांत लय पावतो. ज्याला ही मुक्ति मिळते, तो हजारों मनुष्यांस आपल्याप्रमाणेंच पूर्ण करुं शकतो.

''आध्यात्मिक स्वरुपाची पुनर्घटना लवकरच घडवून आणण्याचा माझा संकेत आहे. अशा प्रकारचा दैवी शक्तीचा आविष्कार कालचक्रांच्या संधिकालांत होत असतो; व ख्राईस्टच्या अवस्थेंत राहणारा पूर्ण पुरुषच या प्रकारें सार्वत्रक स्फूर्ति देऊं शकतो. माझ्या कार्यामध्ये, सर्व वस्तूंचा व जीवनकलांचा अंतर्भाव होईल. पूर्णावस्थेंत, त्याज्य व ग्राह्य असा भेद राहत नाही. माझ्यापासून मिळणाऱ्या आध्यात्मिक गतीमुळे, जगांतील राजकीय, आर्थिक व वैषयिक प्रश्न (त्यांचा मुख्य सिद्धांताशीं प्रत्यक्ष संबंध नसूनहि) आपोआप सुटूं लागतील; व सध्या अगम्य वाटत असलेल्या बाबतींत नवीनच सार व अर्थ आढळून येईल.

''ही अध्यात्मिक घडामोड होत असतांना, जो विविध देशांस फायदा होईल, तो त्या देशांत असणाऱ्या शक्तीवर अवलंबून राहील. ज्या मानाने सामर्थ्य अधिक असेल, त्या मानाने कार्यहि अधिक विस्तृत स्वरुपाचें होईल. सद्‌गुरु हा फक्त शक्तिप्रवाहास योग्य दिशा देतो. **व्यवहारपरायण पाश्चिमात्य संस्कृति व ध्येयनिष्ठ पौर्वात्य संस्कृति, यांचा सुंदर मिलाफ घडवून आणणें, हेंच माझें अशक्यप्राय वाटणारें कार्य आहे.** बौद्धिक व भौतिक प्रगतीच्या उच्च शिखरावर आरूढ झालेली पाश्चिमात्य संस्कृति व पूर्ण सद्‌गुरुच्या रुपाने अध्यात्मिक

''खनिज पदार्थ, वनस्पती व प्राणी – यांमधून उत्क्रान्ति तत्त्वाप्रमाणें क्रमश: आरोहण करणारें चैतन्य, हें मनुष्यदेहांत अधिक विस्तार पावून, पूर्ण जाणिवेच्या रुपाने विकसित होतें. ही पूर्ण जाणीव निर्माण करण्याकरतांच, अनंत, आनंदमय, सद्रुप व केवळ अशा परमेश्वरामधून, ह्या सृष्टीचा आविर्भाव झाला. परंतु मानवी स्थितींत, जाणिवेच्या पूर्ण विकासाबरोबरच, पूर्वीच्या परिस्थितीमुळे अहंभाव किंवा मीपणा उत्पन्न होतो; व ही अडचण नाहीशी करण्याकरतांच, महात्मे व सद्‌गुरु हे भूतलावर अवतार घेतात.

**तृप्त व अतृप्त वासनाच या अहंभावाच्या घटक आहेत. अहंभावामुळें, मनुष्यास स्वत: मर्यादित, दुर्बल व दु:खित असल्याचा भ्रम होतो. मानवी स्थितींतील पूर्ण जाणीव कायम ठेऊन अहंभाव टाकणें, व त्यांचे हळूहळू ब्रम्हात्मभावांत रुपांतर करणें, हीच यापुढील आत्मोन्नति आहे. मनुष्यास ही ब्राह्मी स्थिती प्राप्त झाली, म्हणजे तो स्वत:स सर्वांमध्ये पाहतो; व सर्व वस्तुजात सत्तामय स्वात्म्याची मूर्तरुपें असल्याचें जाणतो. अहंभाव घालवून ब्राम्ही अवस्था प्राप्त करण्याचा सर्वांत उत्तम व सोपा मार्ग, म्हणजे प्रेम वाढवून, कोणत्याही परिस्थितींत मानवजातीची निष्काम सेवा करणें, हाच होय.** धार्मिक व नैतिक व्यवहार हे ह्या मार्गास पोषक आहेत. ज्या मानाने आपण स्वार्थ विसरुन इतरांच्याकरता जीवित खर्च करुं, त्या मानाने आपल्या मलिन वासना क्षीण होतात; व त्यामुळे, अहंभाव घटत जाऊन त्याचें स्वरुप बदलतें. मीपणा अखेरपर्यंत कायम राहतो. ख्राइस्ट-अवस्था प्राप्त होण्यापूर्वीच्या मोक्षमार्गांतील सहा भूमिका ओलांडल्यानंतरच तो पूर्णपणे मावळतो; व त्याचें दैवी आत्मभावामध्यें रुपांतर होतें. 'मी व माझा पिता अभिन्न आहोंत' असें जेव्हा जीझस म्हणाला, तेव्हा तो ह्याच ब्राह्मी अवस्थेंत होता. ह्या स्थितींत, मनुष्य अनंत पदाचा व सत्य वस्तूचा एकाच वेळी अनुभव घेतो.

''साधारणत:, उपरोक्त क्रम हा सद्‌गुरु न भेटल्यामुळे स्वत:च प्रयत्न करणाऱ्या साधकास लागू आहे. परंतु **पूर्ण सदगुरुचे सहाय्य असेल, तर सर्वच काम फार सोपे होते. पुर्ण पुरुषास सर्वभावाने शरण जाऊन, त्याची आज्ञा तत्परतेने पाळली, तर हजारो वर्षे नीतिनियमांचे पालन करण्यापेक्षा अधिक फायदा होतो.** समष्टिमनाशीं ऐक्य पावल्यामुळे, पूर्ण सद्‌गुरु हा प्रत्येक मनुष्याच्या अंत:करणांत असतोच; व त्यामुळे, साधकांत सुप्त असलेलें श्रेष्ठ ज्ञान जागृत करण्याकरिता, ज्या विशिष्ट स्वरुपाची मदत आवश्यक असते, तीच मदत तो त्याला देऊं शकतो. पूर्ण सद्‌गुरुच्या अलौकिक कर्तृत्वाचें कारण हेंच आहे. पूर्णतेस सह्रदयता व विनोदी स्वभाव यांची जोड असेल, तर भौतिक भूमीमध्ये जास्त प्रभावशाली परिणाम होतो.

''मी सतत ख्राइस्ट-अवस्थेंत असतो... सर्व जगास आध्यात्मिक गति देऊन, शिवाय जे कोणी माझ्याकडे येतील, त्यांना मी स्वयंज्योति सत्पदाचा मार्ग दाखवीन. हेंच माझें अवतारकार्य आहे.''

# १५
# न्यूयॉर्कला संदेश *

''कांही वृत्तपत्रकारांना माझ्या कार्याचें यथार्थ स्वरुप समजलें नाही, किंवा ते केवळ खळबळ उत्पन्न करण्याच्या इच्छेस बळी पडले, तर त्यांत फारसें आश्चर्य नाही.

**''मला कोणताहि धर्म, संस्था, पंथ, किंवा संघ स्थापन करावयाचा नाही.** अशा प्रकारचे संघ हल्ली पुष्कळ आहेत. आपलें ध्येय नित्य आचरणांत आणण्याकरता लोकांना मी मदत करीन. तत्त्व व आचरण, ध्येय व त्याची अभिव्यक्ति, या दोहोंत जें आधुनिक कालांत महदंतर आहे, त्यामुळेंच सार्वत्रिक असमाधान उत्पन्न होतें. हल्ली जीवनाच्या आध्यात्मिक व आधिभौतिक बाजूंचें एकीकरण करण्याऐवजीं, त्या एकमेकांपासून विभक्त करण्यांत आल्या आहेत. परंतु जीवन त्याची रुपमय अभिव्यक्ति, चैतन्य व भौतिक सृष्टि या दोहोंत मूलत: विरोध नाही. त्यांच्यांत विरोध असल्याचा भास अज्ञानामुळे उत्पन्न होतो. तेव्हा योग्य विचार करणें, व बुद्धि व भावना यांच्यांत समता उत्पन्न करुन, प्रबोध मिळविणें, हाच एक त्यावर उपाय आहे. अशा प्रकारचा प्रबोध तुम्हाला माझ्याकडून मिळेल.

''ज्यांनी गूढ संशोधनाची पराकाष्ठा केली आहे, अशा सर्वांना परमात्मा ही एकच सद्वस्तु असून, तोच सर्व झाला आहे, असा प्रत्यक्ष अनुभव आला आहे. म्हणजे, तुम्हाला जरी ठाऊक नसलें, तरी पर वस्तु ही तुमच्यांपैकी प्रत्येकामध्ये छादित स्थितींत आहे. परंतु त्या पर वस्तूचा अनुभव घ्यावयाचा असल्यास, ती जाणिवेंत आली पाहिजे. सद्वस्तूविषयीं केवळ बुद्धिनिष्ठ निश्चय होऊन भागत नाही. प्रबोध होऊन अखेर त्या सद्वस्तूशीं ऐक्य पावण्यानेच खरें ज्ञान होतें. हीच ख्राइस्ट-अवस्था असून, तिचा मी सतत अनुभव घेतो.

---

* न्यूयॉर्क. २२ मे, १९३२

''पौर्वात्य संस्कृतींत 'संस्कार' या नांवाने निर्देशिलेल्या मन:प्रवृत्ती व वासना ह्या प्रबोध होण्यास प्रतिबंध करतात. इतर लोकांशी संघर्ष करीत असलेल्या विभक्त अहंचा भ्रम हा ह्या प्रवृत्ती व वासनांमुळेच होतो. चैतन्य जेव्हा भूतसृष्टींत अवतीर्ण होऊन उत्क्रांत पावतें, तेव्हा अशा प्रकारचा विभक्त अहं निर्माण होण्याची आवश्यकता असते; व तसा तो निर्माण झाला नसता, तर स्थूल शरीरांत परमात्म्याचा अनुभव येऊंच शकला नसता.

**''उत्क्रांतीपूर्वी, आपण सर्व वस्तूंचे उगमस्थान असणाऱ्या तत्त्वाशीं एकरुप होतों. परंतु, सागरांतून कधीच बाहेर न निघालेला मासा हा ज्याप्रमाणे समुद्राचा विशिष्ट अनुभव स्पष्टपणे घेत नाही, त्याप्रमाणे आपणाला तेव्हां त्या तत्त्वाची स्पष्ट जाणीव नव्हती. उत्क्रांतीनंतर, आधी त्या तत्त्वापासून आपण विभक्त होतो; व नंतर जन्ममरणपरंपरेंतून त्याच्याशीं ऐक्य पावण्याची जाणीवयुक्त आकांक्षा आपल्या मनांत उत्पन्न होते. मूल तत्त्वाशीं ऐक्य होणें हे स्थूल देहांतच शक्य आहे. कारण, जडभूतांतच चैतन्यास साम्यावस्था येऊं शकते.**

''अमेरिकेंत नाना वर्णांचे लोक एकत्र झालेले असल्यामुळे, लवकरच सुरु होणाऱ्या अध्यात्मिक घडामोडींचा पाया येथे उत्तम रीतीने बांधता येईल. अमेरिकेंत प्रचंड शक्ति आहे. हल्ली जरी ती योग्य मार्गात व्यक्त होत नसली, तरी मी तिला आध्यात्मिक व निर्मितिक्षम मार्गांना वळवीन...

''माझे कार्य व्यवहार्यच आहे. ध्येय आचरणांत न आणतां ते केवळ डोळ्यासमोर ठेवणे, किंवा आध्यात्मिक बाबीपेक्षा आधिभौतिक बाबींस अधिक महत्त्व देणे, यांत खरी व्यवहारदक्षता दिसून येत नाही. परंतु **आपणास उत्कृष्ट व्यवहार पाहिजे असेल, तर ध्येय नित्य आचरणांत उतरलें पाहिजे;** जीवनामध्ये चैतन्यास सुन्दर मूर्त स्वरुप दिलें पाहिजे; व विश्वबंधुत्व कल्पनासाम्राज्यांतून उतरुन वस्तुसृष्टींत आलें पाहिजे.

''माझ्या कार्यामुळे अतुल उत्साह उत्पन्न होईल; व कांही प्रमाणांत त्याला विरोधहि होईल. पण हें अपरिहार्य आहे. अशा विरोधामुळे, माझ्या अध्यात्मिक कार्यास पुष्टीच मिळेल. धनुष्याची दोरी आपल्याकडे आपण जितकी अधिक ताणून ओढतों, त्या मानानेच बाण अधिक वेगानें आपल्या इष्ट स्थळीं पोचतो.''

# १६
# कॅलिफोर्निआस संदेश *

''परमेश्वरप्राप्ति आणि सर्वात श्रेष्ठ अवस्था, याविषयी इतकें वाङमय झालें आहे, की ती मिळविण्याच्या शक्यतेविषयी व मार्गाविषयीं लोक गोंधळून जातात. तत्त्वज्ञानाची आवड असलेले लोक ह्या वाङमयाचा अभ्यास करुन फक्त बुद्धिपहेलवान बनतात. ती श्रेष्ठ अवस्था प्रत्येकामध्ये सुप्त स्थितींत आहेच. 'ईश्वराचा पुत्र' प्रत्येक मनुष्यांत आहे, परंतु तो प्रकट झाला पाहिजे, व ही श्रेष्ठ अवस्था प्रचलित मानसिक व भौतिक परिस्थितींत मिळेल, अशा प्रकारचा व्यावहारिक मार्ग आपणास पाहिजे.

''चर्चमधील पुजारी वर्गाने सुरु केलेले निरनिराळे विधि व समारंभ हे ईश्वरप्राप्तीचा मार्ग रुक्ष करतात; व साधारणत: धार्मिक बाबींत जगांत जी हल्ली अनास्था दिसते, तिच्या मुळाशीं हेंच कारण आहे. हिंदुस्थानांत एका बाजूस अध्यात्मिक विकास पूर्णतेस गेला असला, तरी निरनिराळ्या पंथांनी लादलेल्या विधींमुळे जातीभेदाचें जंजाळ उत्पन्न झाले आहे. शिवाय, **ह्या विधींमुळे बाह्य थाट कायम राहिला, तरी आंतील भाव नष्ट होतो; व अहंकार कच्चा होण्याऐवजी अधिक पक्का होतो;** व ज्या मानाने अहंता अधिक घन होईल, त्या मानाने आत्मप्रतिष्ठा पण वाढते. विभक्तपणाचें हें अहंज्ञान कायम ठेवण्याची भेदवासना ही मनुष्याच्या मनांत 'मीच बरोबर आहे,' 'मीच कृपाछत्राखाली आहें,' 'मलाच जगण्याचा हक्क आहे' इत्यादि विचार उत्पन्न करते; व त्यामुळे मनुष्य संहारतत्पर होतो. 'कोणी तुझ्या एका गालावर मारलें, तर तूं आपला दुसरा गाल पुढे कर' ही जीझसची आज्ञा फेटाळून, ख्रिश्चन जगांतील सर्व देश शस्त्रसमुद्धीकरताच अहमहमिका करतात. यावरुन अहंज्ञान म्हणजे काय तें स्पष्ट होईल.

* हॉलिवुड (कॅलिफोर्निआ) २९ मे १९३२

# १९
# कोठून व कुठे? *

''पृथ्वीवरील प्राणिमात्रांपैकी प्रत्येकाला जन्म हा लागूं आहेच. परंतु इतर प्राणिमात्रांच्या जन्ममरणांपेक्षा, किंवा अनैच्छिक व क्षुल्लक जीवितापेक्षा, मानवजन्माचा विशेष म्हणजे हा, की तो आपल्या उत्क्रान्तिरुप प्रगतिपथाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असतो. क्वचित् ही पायरी अखेरचीहि असते. नरदेह मिळाल्यावर, तो परतंत्र नसतो; व आपलें भवितव्य स्वेच्छेने निर्माण करुं शकतो. तेव्हा, उत्क्रान्तीच्या खालील स्थितीच्या वेदनांतून वर चढलेल्या मानवाने त्या वेदनांचे पारितोषिक, जें आध्यात्मिक पुनर्जीवन, तें ह्याच जन्मांत साध्य करण्याची कोशिस करावी; व मरणोत्तर जीवनाबद्दलच्या आशेंत समाधान मानून घेऊं नये.

''आत्माभिमुख होऊन, 'मी कोठून आलों व कुठे चाललों?' ह्या प्रश्नाने स्वत:चे परीक्षण करणाऱ्या मानवाच्या बाबतींत, आध्यात्मिक पुनर्जीवनास प्रारंभ झाला, असें समजावें. **एकदा मन समाहित झालें, म्हणजे न कळत व आपोआपच, भौतिक परिस्थितीहि अशी जुळून येते, की तो मनुष्य अखिल जगताविषयी निर्वैर व अविरोधी होतो; त्याच्यामधील पुराणमताभिमान, असहिष्णुता, अहंकार व स्वार्थ समूळ गळून पडतात; व त्याला प्रत्येक बाबतींत नवीन आशय व सार दृग्गोचर होतें.** मग पापी व पुण्यशील पुरुष, हे दोघेहि निरनिराळ्या आकारांच्या व काल व कार्यकारणभाव यांनी नियमित असलेल्या अशा विश्वरुपी सागरांतील शक्तीमुळे नैसर्गिक रीत्या उत्पन्न होणाऱ्या लाटाच भासतात. सत्पुरुषास आपल्या स्थानविशेषाचा गर्व असण्याचें कारण नाही; व पापी पुरुषासहि चिरकाल लांछन असण्याचें कारण नाही. कोणीहि स्वत:स क:पदार्थ समजून हताश होऊं नये.

---

* श्रीमेहेरबाबांच्या त्रेचाळीसाव्या जन्मदिवशी, त्यांनी ता. १८ फेब्रुवारी १९३७ ला जन्मलेल्या भक्तगणास दिलेला संदेश.

# १७
# हॉलीवुडला संदेश *

''अमेरिकेंत आल्यापासून लोक मला विचारतात की, 'बेकारी, व्यवसनाधीनता, समाजस्वास्थ्यास विघातक गुन्हे करण्याची प्रवृत्ति, इत्यादि सामाजिक स्वरुपाचे बिकट प्रश्न सोडविण्याविषयीं मला काय सांगावयाचें आहे?'

''व्यक्तिगत व सामाजिक सर्व अनर्थाचें मूळ स्वार्थवृत्तींतच आहे. मुत्सद्दी लोक हे लुचपत घेऊन, आपणास निवडून देणाऱ्या लोकांच्या हिताविषयी स्वार्थामुळेच उदासीन होतात; स्वार्थाकरताच, दरवडेखोर लोक कायदे झुगारुन स्वहित साधतात; व स्वार्थाकरताच, गरीब जनतेची छळणूक होते. तेव्हा, स्वार्थवृत्ति गेली, तरच हे सर्व अनर्थ नष्ट होतील. परंतु स्वार्थवृत्ति टाकून देण्याचें काम सोपें नाही. नि:स्वार्थ होण्याची मनुष्यास तळमळ लागली असली, तरीहि स्वेच्छेने तत्त्वप्रत्यय देण्यास समर्थ असलेल्या सद्गुरुची मदत असल्याशिवाय, तें कधीच पूर्णपणें साध्य होत नाही. **आत्मविषयक भ्रामक कल्पनांमुळेच स्वार्थवृत्ति उत्पन्न होते; व सत्यस्वरुपाचें ज्ञान होऊन ह्या भ्रमाचा बोध झाला, म्हणजे स्वार्थवृत्ति नष्ट होते.**

''सर्व भूतांत अंतर्भूत असलेल्या एकमेव परमात्म्याचे ज्ञान मी तुम्हांस करुन देईन. त्यामुळे, विभक्त अहंची भ्रान्तिमूलक कल्पना जाऊन, स्वार्थवृत्ति नष्ट होईल. व चढाओढीच्या ऐवजी सहकार्य उत्पन्न होईल; भीतीच्या ठिकाणी श्रद्धा निर्माण होईल; लोभाची वृत्ति जाऊन, तेथेच औदार्य दिसूं लागेल; व परपीडन नामशेष होईल.

''मी सात वर्षांपासून मौन धारण करुन केवळ वर्णफलकाच्या द्वारा विचार व्यक्त कां करितों, व माझ्या बोलण्याचा मानवी अवस्थेच्या परिवर्तनाशी कोणता संबंध राहील, असेंही मला विचारण्यात आलें आहे.

---

* हॉलिवुड निकरवाकर हॉटेल मधील स्वागतप्रसंगी. ३१, मे १९३२

''मानव सध्या विचारांच्या अभिव्यक्तीकरिता तीन देहांचा उपयोग करतात; व त्यांना तीन अवस्थांचा अनुभव येतो. हे तीन देह खालीलप्रमाणें आहेत.

''कारण शरीर हें पूर्वसंस्कारामुळे उद्भवणाऱ्या विचारांचे उगमस्थान आहे. विचार हे बीजरुपाने कारणशरीरांत सुप्तस्थितींत राहतात, पण ते व्यक्त होत असले, तर प्रथम त्याचें इच्छेंत रुपांतर होऊन, ते दुसऱ्या म्हणजे वासनात्मक सूक्ष्म शरीरांत उतरतात. या शरीरास मनोमय पंचज्ञानेंद्रियें आहेत. विचार हे या शरीरांतच स्वप्नाच्या किंवा अतृप्त वासनेच्या रुपाने राहतात; अथवा त्यांची क्रियारुप अभिव्यक्ति तिसऱ्या म्हणजे स्थूल शरीराच्या द्वारा होते. ह्या शरीरास स्थूल पंचज्ञानेंद्रियें आहेत. ह्या तीन देहांस अनुसरुन, (१) स्वप्नरहित गाढ निद्रेची नेणीव (२) स्वप्नांतील किंवा अस्पष्ट व अव्याकृत वासनांची अर्धजागृति व (३) क्रियाक्षम पूर्ण जागृती – अशा तीन अवस्था आहेत.

सूक्ष्म व स्थूल शरीरांतून विचारांचे संक्रमण झाल्याने मनुष्याची इच्छाशक्ति मूर्तरुप धारण करते. **विचार परिणामकारक रीतीने व्यक्त होण्याकरता, हे सर्व देह निर्मल असून, त्यांचा परस्परांत संवादि व्यापार असावयास पाहिजे; बुद्धि व भावना सम होऊन एकमेकांत मिळाल्या पाहिजेत; व भौतिक आविर्भावाचें मूळ आध्यात्मिक प्रतीतींतच असलें पाहिजे.**

''ईश्वरस्वरुप पुरुषामध्ये विचार किंवा वासना नसतात. त्याच्या द्वारां, आत्मरुपांतून ईश्वरी संकेत पूर्णपणें व्यक्त होतो. तो नेहमी तुर्यस्थच असतो; व त्याच्यामधून अनंत प्रेम, ज्ञान, आनंद, शांति व शक्ति प्रसृत होतात. आलोकन किंवा स्पर्श याहूनहि अधिक परिणामकारक असा सत्याचा आविष्कार त्याच्या वाणींतून होतो. यामुळेच बहुधा अवतार हे कित्येक वर्षे मौन धारण करतात; व जेव्हा त्यांना सर्व जगाला अंतिम सत्य प्रगट करावयाचें असतें, तेव्हाच ते मौन सोडून भाषण करतात. मी जेव्हा भाषण करीन, तेव्हा ईश्वरी संकेताच्या अभिव्यक्तिमुळे, सर्व जगांतील चैतन्याचें आध्यात्मिक परिवर्तन होईल.''

# १८
# भारतभूमीस संदेश *

''हिंदुस्थान हा अध्यात्मप्रधान देश आहे. प्राचीन कालापासून महात्मे व अध्यात्मगुरु ह्या देशांत अवतीर्ण होत असल्यामुळे, त्यास सर्व जगांत भाग्यशाली व श्रेष्ठ स्थान आहे. म्हणून, बंधनांत राहून आधिभौतिक दुःख भोगावें लागलें, तरीहि हिंदुस्थानांतील आध्यात्मिक वातावरण कायम ठेवलेंच पाहिजे. जोपर्यंत हें वातावरण कायम आहे, तोंपर्यंत हिंदुस्थानाल कितीही दुःख भोगावें लागलें, तरी हरकत नाही. सध्याच्या दुःखाचा अखेर परिणाम स्वातंत्र्य व आनंद यांतच होईल. **बंधनाचा व दुःखाचा अनुभव घेतल्यावरच स्वातंत्र्याची व आनंदाची खरी किंमत कळून येते.**

''परंतू या दुःखाचा लवकर अंत करावयाचा असेल, तर मित्रावर व शत्रुवर प्रेम, सदिच्छा व तितीक्षा, ह्यांची आवश्यकता आहे. **तसेंच दुसऱ्याचे दोष काढण्याऐवजी, हिंदुस्थानने स्वत:मधील दोष नाहीसे करावेत.** धर्मभेदांमुळे उत्पन्न होणारे द्वेषयुक्त दंगे ताबडतोब बंद झाले पाहिजेत. मग हिंदुस्थानला स्वातंत्र्य व आनंद, यांचा लाभ होईल, यांत मुळीच शंका नाही.

''पंथभेद, धर्मभेद, अंधविश्वास, धार्मिक विधी व व्याख्यानें किंवा शारीरिक सुखाच्या व अधिभौतिक हिताच्या मागे लागणे, यामुळे खऱ्या आनंदाची प्राप्ति कधीच होत नसून, त्याकरता निस्वार्थ प्रेम व विश्वबंधुत्व पाहिजे, याची जाणीव लवकरच सर्व जगांत उत्पन्न होईल.''

---

* २१, नव्हेंम्बर १९३२ ला 'कान्टेविर्दे' बोटीने यूरोपांत जाण्यापूर्वी दिलेला संदेश.

साधारणत:, मुमुक्षूंना केवळ ऐहिक हिताबद्दल अनास्थच असते व बऱ्याचशा युद्धांत केवळ ऐहिक हेतूच असतात; म्हणून युद्ध व युद्धप्रयत्न, यांत ते मुळीच लक्ष न घालण्याचा संभव असतो. परंतु, अध्यात्माची ऐहिकतेपासून पूर्ण फारकत करणें, ही भूल होय. ऐहिक गोष्टींनाहि आध्यात्मिक बाजू किंवा महत्त्व असतें. आंतरिक जीवनाच्या अतींद्रिय सत्यांत मग्न असणाऱ्या मुमुक्षूंनी देखील, लढाईबद्दल (व विशेषत: ते स्वत: त्या लढाईंत गुंतले गेले असल्यास -) उदासीन राहून चालणार नाही. **मुमुक्षूंचा दृष्टिकोण हा सीमारहित परमात्म्याच्या अस्तित्वावर व अनंतत्वावर आधारलेला असतो; तेव्हा, आत्मदृष्टींतून निर्माण होणाऱ्या कर्तव्याकरता, सर्वस्वाचा त्याग करण्याची तत्परता ठेवणें, हें त्यांना मुळीच कठिण वाटावयास नको.**

मुमुक्षूंचे कर्तव्य.

मायेचा दुहेरी व्यापार.

खरें पाहिलें असतां, सर्व प्रकारचे कलह व युद्धें, म्हणजे ईश्वरी लीलेचा भाग आहेत; ते सर्व व्यक्तसृष्टीमध्ये आविष्कृत होणाऱ्या ईश्वरी इच्छेचाच परिणाम आहेत. भ्रमपूर्ण द्वैतसृष्टीला निर्माण करुन तिची धारणा करणाऱ्या मायेच्या द्वारां, हें सर्व घडतें. या ईश्वरी लीलेमध्ये, मायेचा खेळ दुहेरी स्वरुपाचा असतो. (१) माया ही आत्म्याला **भ्रमांत फसविण्यास** साधनीभूत होते; व त्याचप्रमाणे, अध्यात्मविषयक अज्ञान व बंधन, यांच्यापासून आत्म्याला **विमुक्त करण्यास देखील**, मायाच कारणीभूत होते. मायेविषयी बेपर्वा राहून चालणार नाही; परंतु, तिचा उपयोग करतांना, वैराग्य व ज्ञान या दोहोंची आवश्यकता आहे. मायेमुळेच लढाया होतात. मायेच्या सृष्टीविषयीं आसक्ति किंवा अनासक्ति असेल, त्याप्रमाणे लढाई ही अध्यात्मदृष्टीने अहितकारक किंवा हितकारक होईल.

सर्व जीवांची अभेद्य एकता

अंतिम व एकमेव सत्याच्या अध्यात्मदृष्टीने पाहतां, सर्व जीव हे मूलत: व वास्तवदृष्टीने एकच आहेत. एकमेकांत लढाई करीत असणाऱ्या लोकांमध्ये, लढाईमुळे वास्तवदृष्टीने खरा असा भेद निर्माण होत नाही. युद्धमान राष्ट्रांतील लोक हे, त्यांची शरीरें व मनें निराळी असल्यामुळे, स्वत:च निराळे असल्यासारखे वाटतात; परंतु आत्मदृष्टीने पाहतां, हे सर्व फरक गौण आहेत, इतकेंच नव्हे, तर मिथ्या आहेत. कितीहि लढाया झाल्या, तरी सर्व जीवांची एकता अभेद्यच राहते. पारमार्थिक सत्तेच्या दृष्टीने, कोणताहि जीवात्मा दुसऱ्या जीवात्म्याशी वास्तविकपणें लढाई करीत नसतो. **निरनिराळ्या तत्त्वप्रणालीं (Ideologies) मध्ये संघर्ष होतो; व ध्येयप्रणालींचा हा संघर्ष मनांत उतरतो, इतकेंच नव्हे, तर शरीरांवरहि प्रभाव करतो. परंतु अविभक्त व अविभाज्य आत्मा हा स्वत:, संपूर्ण व अभेद्य एकतेमुळे, एकरसच राहतो.**

आध्यात्मिक उन्नति झालेल्या लोकांनी काय करावें.

आध्यात्मिक उन्नति झालेल्या लोकांना सर्व जीवांच्या एकतेच्या सत्याची जाणीव असते; व ईश्वरी



''कोठून?'' व 'कुठे?' या प्रश्नांचे उत्तर मिळविण्याचा प्रयत्न करणें; हाच एक सर्व व्याधिविनाशक उपाय मी जगास दाखवितों. सर्वांचें उगमस्थान व ध्येय एकच असून, पृथ्वीवरील जीवन एक आवश्यक खंड आहे, ह्या ज्ञानामुळे मानवजातींत बंधुभाव उत्पन्न होईल; व त्यामुळे युद्धास व आर्थिक आक्रमणास कारणीभूत होणारा जो संकुचित धर्मवेडेपणा किंवा कडवा देशाभिमान, यांच्या मुळावरच आघात होईल.

''जीवनाचें अंतिम ध्येय प्राप्त होण्याकरता, माझा तुम्हां सर्वांना आशीर्वाद आहे.''

# २०

# चालू महायुद्धाचें आध्यात्मिक रहस्य *

## (जागतिक युद्ध नं. २, इ.स. १९३९–१९४५ ला उद्देशून)

चालू महायुद्धांत दोन प्रकारच्या शक्ती कार्य करीत आहेत :- (१) ज्यांच्यामुळे प्रेम, न्याय, अखिल मानवतेचें हित व सुसंवादिता (Harmony) उत्पन्न होतील, अशा शक्ती, व (२) ज्या शक्ती वंशविषयक किंवा राष्ट्रविषयक सीमित प्रेमा (Loyalty) शी संबद्ध झाल्यामुळे, स्वार्थपर होऊन इतरांवर जुलुम करण्यास प्रवृत्त होतात, अशा शक्ती. या लढाईमुळे, कोट्यवधी लोकांचे अपरिमित नुकसान होऊन, त्यांचा नाश होत आहे. परंतु हे सर्व व्यर्थ जाणार नाही. ह्या घोटाळ्यांतून स्वातंत्र्य, ज्ञान व आनंद – यांनी समृद्ध असलेलें नवीन जग निर्माण होईल.

हल्लींच्या महायुद्धांतून नवीन जग निर्माण होईल.

सर्वांत समर्थनीय लढाई घेतली, तरी ती केवळ साधनमात्र असूं शकते; लढाई हें स्वत:सिद्ध असें साध्य कदापि असूं शकत नाही. तेव्हा, युद्धांतील नेत्यांनी आपली अंत:करणें शोधावींत; व ज्या साध्याकरता ते लढून राहिले आहेत, ते साध्य ईश्वरी योजनेस धरुन ठरवावे. **अखिल मानवतेमध्ये अध्यात्मनिष्ठ बंधुता (Spiritual Brotherhood) निर्माण करावी व या बंधुतेमध्ये कोणत्याहि प्रकारचा वर्गभेद, वर्णभेद, राष्ट्रभेद, वंशभेद, धर्मभेद किंवा पंथभेद न राहता, ती सर्व मानवांच्या एकतेच्या अभेद्य जाणिवेवर आधारलेली असावी, अशी ईश्वरी योजना** (Divine Plan) **आहे.** युद्धाच्या खटाटोपांतून काय निष्पन्न होतें, यामुळे तो समर्थनीय किंवा असमर्थनीय ठरणार नसून, त्या खटाटोपाच्या मुळाशीं प्रेरणा देणारी जीं साध्यें आहेत, त्यांच्यामुळे हा सर्व खटाटोप समर्थनीय किंवा

लढाई ही अपरिहार्य आपत्ति आहे.

* इ. स. १९४१.



असमर्थनीय ठरेल. जगाला या युद्धास तोंड द्यावे लागेल. कधीहि भरपाई न होऊं शकणारें असें नुकसान न निरतिशय दु:ख, यांचा स्वीकार करावा लागला, तरी जगाला ह्या अग्निदिव्यांतून जावें लागणारच आहे. हें युद्ध ही एक अपरिहार्य आपत्ति आहे.

लढाईकडे केवळ तिचें स्वत:चें स्वरुप समजून घेण्याच्या दृष्टीने पाहिल्यास, ती केवळ अनिष्टच आहे, असें म्हणतां येत नाही. कारण, अचानक धोक्याची परिस्थिति निर्माण करुन, लढाई ही सीमित स्वार्थपरतेहून निराळ्या अशा क्रियाशीलतेची आवश्यकता उत्पन्न करते, इतकेंच नव्हे, तर अशा क्रियाशीलतेस प्रेरणा देऊन तिचें विमोचन करते. या नवीन क्रियाशीलतेमध्ये, आपल्या इतर बांधवांच्या सुरक्षितपणाकरता व उत्कर्षाकरता, त्याग व दु:ख यांचा स्वीकार करण्याची स्वार्थरहित वृत्ति असते. अशी नि:स्वार्थ क्रियाशीलता धोक्याच्या परिस्थितीच्या आघातामुळे उत्स्फूर्त झाली असली, तरी कधीच अभिव्यक्त न होण्यापेक्षा, नि:स्वार्थ क्रियाशीलतेची ही अशी अभिव्यक्ति अधिक इष्ट आहे. **केवळ स्वत:ची सुरक्षितता मिळविण्यामध्ये, किंवा बेमुर्वतपणें स्वत:चेंच स्वतंत्र अस्तित्व व हित स्थायी करण्याच्या अश्लाध्य धडपडीमध्ये, पूर्णपणे व्यग्र होण्यापेक्षा, (सामुदायिक धोक्याच्या परिस्थितींतील दडपणामुळे का होईना) जर लोक स्वत्व व स्वार्थ विसरले, तर ते इष्टच आहे.** युद्धप्रयत्नामुळे, आध्यात्मिक महत्त्व असणारे अनेक सद्गुण उत्पन्न होऊन विकसित होतात. तेव्हा, केवळ युद्धप्रयत्नाचाच विचार केला, तरी त्यांत आध्यात्मिक सार मुळीच नाही, असें म्हणतां येत नाही. ज्यावेळीं असा युद्धप्रयत्न कांही श्रेष्ठ मूल्यांकरता व सार्वत्रिक कल्याणाकरता होतो, तेव्हा तो आध्यात्मिक दृष्टीने केवळ समर्थनीय ठरतो इतकेंच नव्हे, तर अपरिहार्य असतो.

युद्धांत वाढणारे कांही आध्यात्मिक गुण.

लोकांनी लढाईंतील आपत्तींना धैर्याने व शांतपणे तोंड द्यावें. **कर्तव्याची हांक जेव्हा जोराची व सुस्पष्ट असेल, तेव्हा दु:ख स्वीकारुन केलेला कोणताहि त्याग वाजवीपेक्षा मोठा नाही.** लोकांवर प्रत्यक्ष व आक्रमक हल्ला झाला, तर त्याचा प्रतिकार करणें, हें त्याचें कर्तव्यच होऊन बसते; व त्याकरता दुसरा इलाज नसल्यास, लढाईतहि प्रत्यक्षपणें भाग घ्यावा लागतो. परंतु, असा प्रतिकार करीत असतांना, स्वत:च्या अंत:करणामध्ये, केवळ स्वत:च्या कर्तव्याची जागृतीच आहे व त्यांत आध्यात्मिक अज्ञानांत फसलेल्या आक्रमकाबद्दल विद्वेष किंवा कटुभाव, यांचा लवलेशहि नाही, याची त्यांनी स्वत:ची पूर्ण खात्री करुन घ्यावी. तसेंच वैमानिक हल्ल्यामुळे, समुद्रावर किंवा जमिनीवर, जीं शारीरिक व मानसिक दु:खें उद्भवतात, त्यांच्याबद्दल त्यांनी बेपर्वा असूं नयें. तर उलट, **त्यांनी युद्धांत जखमी किंवा निराश्रित झालेल्या लोकांची, यथाशक्ति व यथामति, सर्व प्रकारें सेवा करावी.**

स्वत:वर प्रत्यक्षपणें हल्ला झाल्यास त्यामधील कर्तव्य.

युद्धस्वरुपांत जी अंदाधुंदी उत्पन्न होते, तिचें मूळ कारण म्हणजे बरेचसे लोक अहंमन्य व स्वार्थी असतात, हेंच होय. त्यांचा अहंभाव व स्वार्थ ते, व्यक्तिश: व सामुदायिक रीतीने, व्यक्त करतात. जवळजवळ सर्व लोकांचे जीवन या भ्रामक कल्पनांवर अधिष्ठित असतें. **सर्वांमध्ये व्यापलेलें चैतन्य एकच आहे, याची जाणीव ठेवणें, म्हणजेच भ्रमरहित होऊन केवळ सत्याचें ग्रहण करणें होय.** या जाणिवेमध्ये, भेदभाव नष्ट होऊन, बंधनकारक स्वत्वाची विस्मृति होते.

हें ज्ञान मनुष्यास प्राप्त झाल्यावर, युद्धाचा प्रश्न आपोआप सुटेल. **युद्ध हें अनावश्यक व असंमजसपणाचें आहे, हें आपणांस स्पष्टपणाने समजलें पाहिजे; म्हणजे युद्ध थांबविणें, हा प्रश्न निकडीचा न राहतां, ज्या वृत्तीमुळे अशी अमानुष व दु:खप्रद परिस्थिति उत्पन्न होऊं शकते, ती वृत्तीच नाहीशी करण्याकडें सर्वांचें लक्ष वेधेल.** अखिल प्राणिमात्रांचे ऐक्य प्रतीतीस आलें, म्हणजे सहकार्ययुक्त व सुसंगत जीवन अपरिहार्य व सहजसिद्ध होतें. म्हणून, ज्यांना मानवजातीची पुनर्घटना करावयाची आहे, त्यांनी आत्म-जागृतीचें महत्त्वाचें कार्यच हाती घ्यावयास पाहिजे.

युद्धें ही केवळ भौतिक क्षेत्रांतील जुळवाजुळव करण्याकरता उत्पन्न होत नाहीत. 'माझे' म्हणून समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांतील मर्यादित इच्छा व आकांक्षा, यांच्याविषयी अविचारपूर्वक ममत्व धारण केलें, म्हणजे युद्धें निर्माण होतात. **भौतिक जुळणी (Material adjustment) ही तिच्याहून अधिक व्यापक असणाऱ्या आध्यात्मिक जुळणी (Spiritual adjustment) चा केवळ एक भाग आहे. जीवनाच्या केवळ भौतिक क्षेत्रांतून स्वार्थ नाहीसा केल्याने आध्यात्मिक जुळणी घडून येणार नाही; बौद्धिक, भावनाविषयक व सांस्कृतिक क्षेत्रांतून देखील, जेव्हा स्वार्थ मूलत: नष्ट होईल, तेव्हाच आध्यात्मिक जुळणी पूर्णपणें साधेल.**

मानवाच्या बाबतींत, केवळ पोटोबालाच प्राधान्य देणें, म्हणजे मानवाला पशुतुल्य समजणें होय. परंतु, केवळ भौतिक जुळणी घडवून आणावयाची असली, तरी त्यांत यश येण्याकरता, आत्मविकास हा झालाच पाहिजे. जोंपर्यंत, स्वार्थ नष्ट होऊन त्या जागीं त्यागनिष्ठ प्रेमाचा उदय होत नाही, तोंपर्यंत आर्थिक क्षेत्रांत देखील, सुव्यवस्थितपणा व सहकार्य उत्पन्न होणार नाही. ही जाणीव जेव्हा सार्वत्रिक होईल, तेव्हाच मानवजातीचे आर्थिक प्रश्न सुटतील. परंतु, ही जाणीव नसल्यास, भौतिक साहित्यसामुग्री व साधनें यांत कितीहि प्रगति झालेली असली, तरी परस्परांशी कलह व तज्जन्य भौतिक क्षेत्रांतील उणीव, ही टाळतां येणें अशक्य आहे.

आजच्या यातनामय लढ्यांतून व दु:सह दु:खांतून जो नवमानव निर्माण होईल, तो भौतिक शास्त्रें किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यवहारोपयोगी साधनांना कमी लेखणार नाही. भौतिक शास्त्रांना अध्यात्मविरोधी मानणें, ही चूक आहे. **आध्यात्मिक जीवनास**



लीलेंतील त्यांचा भाग हा त्यांच्या आध्यात्मिक ज्ञानाने निश्चित होत असतो. ईश्वरी इच्छेस अनुसरुनच ते आपलें कर्तव्य करतात. **अनंत सत्याशीं एकरुप असल्यामुळे, स्वत:चें कार्य करतांना, ते स्वार्थपर विचारांपासून विमुक्त असतात; व प्रतिक्रियात्मक द्वेष, दुष्टपणा किंवा सूड, या भावना त्यांच्यांत मुळीच नसतात.**

समतोलपणाची आवश्यकता

इहलोकींच्या गोष्टी व वस्तू, यांच्या संहाराचा व नाशाचा आत्म्यावर किंचित्‌हि परिणाम होत नाही. तसेंच मरण हें पुढील जीवनाचें द्वारच आहे. ज्यांना ईश्वरी इच्छेमध्ये भाग घ्यायचा आहे, त्यांनी वियोग व वस्तूंचा नाश, यामुळे चलित होऊं नये; व ईश्वरी इच्छेचा आनंदाने स्वीकार करण्याची वृत्ति, त्यांनी इतरांमध्ये निर्माण करावी. लढाईतील दु:खाचे रहस्य न समजल्यामुळे, कित्येकांच्या अंत:करणांत कटुता येईल. जीवनांतील अचल श्रद्धा व अवीट गोडी पुन: प्रस्थापित करण्याकरता, त्यांना सहाय्याची आवश्यकता आहे. **दु:खितांची अनावश्यक विषण्णता व उद्विग्नता नाहीशी करण्याची जबाबदारी, ज्यांनी आंतरिक जीवनांतील कालातीत मूल्यें आत्मसात केलीं आहेत, अशा लोकांवरच राहील.**

प्रेमाच्या द्वारां मानवाच्या दु:खाचें निवारण करणे.

कसोटीच्या वेळी, प्रत्येकाने सीमित स्वत्वाचा विचार न करतां, इतरांचा विचार करावयास पाहिजे – म्हणजे अहंजीवन जाऊन, तेथे सर्वांच्यामध्ये समत्वाने असणारें परमात्म्याचें जीवन अधिकाररुपाने प्रस्थापित झालें पाहिजे. भ्रमरुप विश्वांतील एक भाग, म्हणून मानवी दु:खाची उपेक्षा करणें, हें चूक आहे. **मानवी दु:खाची उपेक्षा करुन नव्हे, तर त्याचें प्रेमाने निराकरण करुनच, अनंत जीवनाचें द्वार खुलें होतें. भ्रमरुप विश्वाच्या अंतर्यामीं असलेलें सत्य सापडण्याकरता, हृदयशून्य उपेक्षा जाऊन तिच्या ठायीं नि:स्वार्थी व क्रियाशील सेवावृत्ति आली पाहिजे.**

लढाईचें महत्त्व हे तात्पुरतेच असते.

ज्यांना बुद्धि व प्रेम यांची बाजू घ्यावयाची आहे, त्यांनी युद्ध व युद्धप्रयत्न, हे दोन्हीहि वस्तुत: शांतीचें व परस्परविषयक समजुतदारपणा (Understanding) चें ध्येय साध्य करण्याकरिता केवळ साधनेंच आहेत, हे लक्षांत ठेवावें; हें त्यांचे कर्तव्य अखेरीस सांगितल्या गेलं असलें, तरी तें गौण स्वरुपाचें नाही. लढाईच्या साध्य होणारें ध्येय सोडून दिलें, तर लढाईचें समर्थन करतां येणार नाही. लढाईंत कांही आध्यात्मिक गुणांचा विकास होतो, हेंच एक कारण घेतलें, तर तितक्याने लढाईचें समर्थन होत नाही. शांतीच्या काळांत देखील ह्या गुणांचा विकास होऊं शकतो. **धोक्याच्या परिस्थितीचें दडपण नसतांना देखील, स्वयंस्फूर्त प्रेम व सेवावृत्ति यांच्या द्वाराच, नि:स्वार्थ व लोकहितपर क्रियाशीलता निर्माण व्हावी, अशी वेळ आज आली आहे.**

सत्य व प्रेम यांचे नवीन युग येण्याकरिता लागणारी पूर्वतयारी

कितीहि कठिण वाटत असलें, तरी मानवतेला ह्या भयंकर युद्धांतून, आपला आध्यात्मिक बाणा पूर्णपणें कायम राखूनच बाहेर पडाव लागेल. द्वेष व सूड या भावनांच्या विषाने अंत:करण कलुषित न होऊं देतां, व आत्म्यास दु:खाने होरपळून न जाऊं देतां, मिळालेले व तसेच दिलेले प्रहार मनांतून काढून टाकल, म्हणजे ईश्वरी इच्छेस बिनशर्त शरणागति होईल. युद्धोत्तर मानवतेची प्रेरक शक्ति ईश्वरी इच्छेंत राहील. **हें युद्ध अनेक अनिष्ट आपत्तींनी युक्त असलें, तरी ईश्वरी योजना पृथ्वीवर आणण्याकरता व सत्य व प्रेम, शांती व जागतिक बंधुता, अध्यात्मज्ञान व अनिर्बंध निर्मायकता यांनी विभूषित होणाऱ्या नवयुगाच्या निर्मितीकरता मानवतेस दिग्दर्शन देण्याच्या माझ्या कार्यांत, ह्या युद्धाची एक प्रकारें मदतच होईल.**

# २१

# नवमानव *

पूर्वीप्रमाणेच आजही मानवजातीच्या इतिहासांत फार आणीबाणीचा व कठिण प्रसंग आल्यामुळे, अखिल मानवजात सध्या आध्यात्मिक पुनरुज्जीवनाच्या दुस्सह वेदना अनुभवीत आहे. संहारक शक्तींचे मोठे प्रवाह सध्या सुरु आहेत; व प्रथमदर्शनी, त्यांचाच विजय होतो आहे, असें भासत असलें, तरी विधायक व निर्मितिक्षम शक्तीमुळे, मानवाचें भवितव्य उज्ज्वलच होईल. विधायक व निर्मितिक्षम शक्तीचें कार्य हें मुख्यत: नि:शब्द राहिलें, तरी त्यामुळे अनेक बदल घडून येऊन, मानवजातीची आध्यात्मिक प्रगति अप्रतिहत चालू राहील, यांत शंका नाही. **क्षुधित व संत्रस्त जगतास्र 'एकमेवाद्वितीयं' व अनंत सत्याचा पुन्हा बोध देण्याचा जो ईश्वरी संकेत आहे, त्याला पोषक अशीच ही सर्व योजना आहे.**

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांतून स्पष्ट अथवा सूक्ष्म स्वरुपांत चालू असलेला कलह व मत्सरयुक्त चढाओढ ही कोणत्या रीतीने नष्ट करतां येईल, याचा विचार होण्याची आज आवश्यकता आहे; व हाच मानवजातीसमोरचा अत्यंत निकडीचा प्रश्न आहे. लष्करी युद्धामुळे, जगांत संहार होऊन अंदाधुंदी माजते, हें निर्विवाद आहे. परंतु, **मानवाचा मध्यवर्ति प्रश्न युद्धविषयक नसून, ज्या गंभीर कारणांचे युद्ध हें द्योतक आहे, त्या मूलभूत कारणांबद्दलचाच आहे.** केवळ युद्धविरोधी प्रचारामुळे, युद्ध किंवा त्यामुळे उत्पन्न होणारें दु:ख पूर्णपणें टाळतां येणार नाही. मानवी इतिहासांतून युद्ध नाहीसें करावयाचें असेल, तर युद्धाची मूलभूत कारणें नष्ट केलीं पाहिजेत. लष्करी युद्ध ज्यावेळी चालू नसते, तेव्हा देखील, **लोकांचे व्यक्तिश: किंवा सामुदायिक रीतीने, एकमेकांशी आर्थिक अथवा इतर कोणत्यातरी सूक्ष्म प्रकारचें युद्ध चालूच असतें.** आणि ज्या वेळेला ह्या मूलभूत कारणांचा अतिरेक होतो, तेव्हाच लष्करी स्वरुपाचें अमानुष युद्ध उत्पन्न होतें.

राष्ट्र, जाति, पंथ अगर धर्म यासंबंधी आसक्ति इत्यादि विकारांचे विष कालविलें गेलें असतें. मानवजातीचा जर उद्धार होणार असेल, तर मानवाच्या अंत:करणरुपी दालनाचा दरवाजा उघडून, त्यांत नवीन प्रेमाचा उदय झाला पाहिजे; व ते प्रेम व्यक्तिपर अथवा सामुदायिक तृष्णेने कलुषित व्हावयास नको.

विशाल व अनंत प्रेमाचा ज्यावेळी नि:संकोच आविष्कार होईल, तेव्हाच त्यांतून नवमानव उत्पन्न होईल. असल्या प्रेमाचा आविष्कार होण्याकरता, सद्गुरुंच्या कर्तृत्वांत, आत्मजागृति निर्माण झाली पाहिजे. केवळ निश्चयांतून प्रेम उत्पन्न होणार नाही; निश्चयांत फार तर कर्तव्यपालन होईल. निश्चयात्मक प्रेमामुळे, आपल्या दृष्टीने योग्य ठरलेलें कर्तव्य हे केवळ बाह्यत: आचरणांत आणतां येईल. परंतु असली क्रिया आध्यात्मिक दृष्टीने फोल आहे. कारण त्या क्रियेच्या अंतरंगात, सहजस्फूर्त प्रेमाचें सौंदर्य नाही. प्रेम हें सहजस्फूर्त असावयास पाहिजे; त्यांत आंतील किंवा बाहेरील शक्तीची जबरदस्ती काम देत नाही. जबरदस्तीमुळे प्रेम कधीहि उत्पन्न होणार नाही; परंतु प्रेमांतच प्रेम उत्पन्न होऊं शकतें. **प्रेम हें स्वभावत: प्रसरणशील आहे. प्रेमपूर्ण हृदयांतून तें निष्प्रेम हृदयांत प्रवेश करतें.** जे लोक प्रेमाचे ग्राहक बनतात, त्यांच्या हृदयांत देखील, त्या प्रेमास प्रत्युत्तर म्हणून प्रेमच निर्माण होते. खरें प्रेम अजिंक्य व दुर्दम असतें. असल्या प्रेमाची शक्ति सदोदित वृद्धिंगत होते; व त्याच्या सारख्या वाढत असलेल्या क्षेत्रांत सापडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर, त्याचा टिकाऊ परिणाम होतो. **हृदयांतून हृदयांत जेव्हा विशुद्ध प्रेमाचे अनिर्बंध संक्रमण होईल, तेव्हाच मानवास नवजीवन मिळेल.**

**अखिल प्राणीमात्रांचा अंतर्भाव असलेल्या व्यापक ईश्वरी जीवनाहून अधिक श्रेष्ठ असे दुसरें कांहीहि नाही, हें जेव्हा मानवास पूर्णपणें पटेल, तेव्हाच प्रेमाचे द्वारा सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत, शांति, सुव्यवस्था व आनंद यांचे साम्राज्य पसरेल. शिवाय तें प्रेम स्वत:सिद्ध विशुद्धतेने व सौंदर्याने शोभित होईल.** दैवी प्रेमावर द्वैतमूलक आघातांचा परिणाम होत नाही; व त्यांतून ईश्वरीयत्वच व्यक्त होत असतें. दैवी प्रेमामुळेच नवमानव ईश्वरी योजनेस अनुकूल होईल. दैवी प्रेमामुळे, व्यक्तिपर जीवनांत अक्षय माधुर्य व अखंड आनंद उत्पन्न होईल; इतकेंच नव्हे, तर नवमानवाच्या नवीन युगास प्रारंभ होईल. दैवी प्रेम हे नवमानवाचे जीवनांत सहकारिता व सुसंवादिता उत्पन्न करील. दैवी प्रेमामुळेच, निर्जीव बाह्यविधींच्या मगरमिठींतून जीवन विमुक्त होईल व निर्मितिक्षम व ज्ञानप्रकाशित होईल. दैवी प्रेमानेच, नवमानव भ्रमरहित होऊन सत्यज्ञानांत स्थित होईल; व सृष्टीच्या अनंत जीवनांत प्रविष्ट होऊन, तो शाश्वत शांति व अखंड आनंद यांचा अनुभव घेईल.



**पोषक किंवा घातक असणें, हें त्या भौतिक शास्त्रांचा जो उपयोग करुन घेण्यांत येतो, त्यावर अवलंबून आहे.** ज्याप्रमाणे, कलेच्या योग्य आविष्कारांतून अध्यात्मजीवन व्यक्त होऊं शकतें, त्याचप्रमाणे, भौतिक शास्त्रांचा योग्य उपयोगहि अध्यात्मजीवनाच्या अभिव्यक्तीस व परिपूर्णतेस कारणीभूत होतो. देहविषयक ज्ञान व भौतिक सृष्टींतील जीवन, यांची आत्मानुभवास मदत होऊ शकते. परंतु याकरता, सारभूत शाश्वत तत्त्वांच्या अधिक विशाल अध्यात्मज्ञानांत, त्या दोहोंचाहि समावेश झाला पाहिजे. अशा प्रकारचें अध्यात्मज्ञान नसेल, तर भौतिक ज्ञानाचा व साधनांचा उपयोग हा संहारप्रवर्तक व आत्म्यास बंधनकारक होतो. भौतिकशास्त्रें व धर्मभावना, ह्यांची वाढ एकमेकांच्या बरोबर झाली, तरच मानवजातीची सर्वांगीण प्रगति होईल.

आध्यात्मिक स्वरुपाचा गंभीर अनुभव हा नवमानवाच्या भावी संस्कृतीचा आत्मा राहील; त्या संस्कृतींत, केवळ बुद्धिग्राह्य व रुक्ष कल्पनांना प्राधान्य राहणार नाही. जे सत्य बुद्धिगम्य नाही, तें आध्यात्मिक अनुभवांत येऊं शकतें; केवळ तर्कानें त्याचें आकलन करतां येत नाही. बुद्धीच्या द्वारां, आध्यात्मिक सत्य हे कांही प्रमाणांत इतरांच्याकरता व्यक्त करता येईल; परंतु, त्या सत्याचा अनुभवच घ्यावयाचा किंवा द्यावयाचा असेल, तर बुद्धि केवळ पंगु ठरते. दोन माणसांना डोकेदुखीचा अनुभव असेल, तर ते दोघे सहकार्य करुन त्या अनुभवाचें निरीक्षण करतील; व त्याचा अर्थ बुद्धीच्या द्वारां, डोकेदु:खी काय असतें, हे त्याला कधीहि समजणार नाही. डोकेदु:खीचें यथार्थ स्वरुप समजण्याकरता, माणसाचें स्वत:चेंच डोकें दुखले पाहिजे. हे कार्य एखाद्या वेळेस त्याच्या डोक्यावर टोला देऊन साधतां येईल; परंतु वर्णनाने होणार नाही. त्याचप्रमाणे, आध्यात्मिक अनुभवाची जागा केवळ बुद्धीच्या स्पष्टीकरणाने भरुन येणार नाही. बुद्धीच्या द्वारा, फार तर तो अनुभव मिळण्यास लागणारी पूर्वतयारी करतां येईल.

आध्यात्मिक अनुभव हा केवळ बुद्धीला अगोचर असल्यामुळे त्याला गूढ मानलें आहे. परंतु गूढ सत्य हे बुद्धिविरोधी, दुर्गम, दुष्प्राप्य, अव्यवहार्य किंवा अनुभवाशीं असंबद्ध नाही. **गूढ आध्यात्मिक अनुभवात सत्याचें यथार्थ आकलन होतें; तो एक स्पष्ट प्रत्यक्षज्ञानाचा प्रकार आहे. त्यांत प्रतीतीस येणारें सत्य इतकें व्यवहार्य आहे, की तें प्रतिक्षणी नित्याच्या व्यवहारांत व्यक्त होऊं शकते; व त्याचा अनुभवाशी इतका निकट संबंध आहे, की एका अर्थाने सत्याला अनुभवाचेंच अंतिम ज्ञान म्हणतां येईल.** आध्यात्मिक अनुभवास गूढ मानलें आहे; परंतु तो अनैसर्गिक किंवा मानवी जाणिवेला अप्राप्य नाही. अनंत तत्त्वाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन, जोंपर्यंत मानवी बुद्धि स्वत:च्या स्वाभाविक उपाधी टाकून देत नाही, तोंपर्यंत आध्यात्मिक अनुभव बुद्धीला अप्राप्य आहे; व त्याला गूढ म्हणण्याचा भावार्थ याहून दुसरा कांहीहि नाही. ''सर्व कांही सोडून माझ्याकडे या'' असें जेव्हा ख्राइस्ट म्हणाला, तेव्हा तो हा गूढ अनुभव मिळविण्याचा मार्ग दाखवित होता. माणसाने आपल्या सर्व प्रकारच्या मर्यादितेचा त्याग करुन, ईश्वराच्या अनंत जीवनांत स्थित झालें पाहिजे, असा ख्राइस्टच्या म्हणण्याचा गर्भितार्थ आहे. आध्यात्मिक अनुभव मिळविण्याकरता; उच्च भूमिकांतून

आत्मप्रत्यय मिळविण्याची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे जगांतील कर्तव्यें व दैनिक व्यवहारहि दक्षतेने करण्याचीहि आवश्यकता आहे. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी जर अनुभवाचा संबंध तुटला, तर तो आध्यात्मिक स्वरुपाचा तर राहतच नाही, परंतु त्याला विकृत प्रतिक्रियेचें स्वरुप येते.

वास्तव जीवनाच्या कठीण व कठोर गरजांना जो प्रतिक्रियात्मक अनुभव टाळतो, तो नवमानवास उत्साह देऊं शकणार नाही. नित्यप्रवाही जीवनाशीं ज्यांना समरस होतां येत नाही, त्यांच्यामध्ये, वास्तवसृष्टीपासून दूर पळून जाण्याची व कल्पनानिर्मित भ्रमात्मक परिस्थितींत सुरक्षितता मिळविण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते. **वास्तवजीवनाशीं पूर्णपणें समरस व्हावयाचें असेल, तर त्यांत स्वत्व व निराळेपणांची कल्पना टाकून द्यावी लागते.** ही कल्पना टाकून देणें जड झाल्यामुळे, व स्वत्व व निराळेपणा शक्यतोंवर टिकविण्याकरता म्हणून, वरीलप्रमाणें विकृत प्रतिक्रिया उत्पन्न होते. पण त्यांत जीवनविषयक प्रश्न वास्तविक सुटत नाहीत; व स्वयंपूर्णतेचा व सुरक्षिततेचा खोटा आभास मात्र उत्पन्न होतो. असल्या विकृत प्रतिक्रियेंत, जीवनविषयक प्रश्नांची अंतिम सोडवणूक तर होतच नाही, परंतु अशा सोडवणुकीचा जो खरा मार्ग आहे, त्यापासूनहि मनुष्य अधिक दुरावतो. **जीवनरुपी समुद्रांत ज्या नित्य नवीन व दुर्धर लाटा उत्पन्न होतात, त्यांच्यामुळे मानव हा कल्पनानिर्मित व भ्रमात्मक सुरक्षिततेमधून वारंवार बाहेर खेचला जाईल; व जोंपर्यंत तो पळवाट शोधून आपलें स्वत्व व निराळेपणा सुरक्षित व कायम ठेवण्याचा प्रयत्न करील, तोंपर्यंत तो स्वत:वर नानाप्रकारची नवी दु:खें ओढवून घेईल.**

स्वत:चा निराळेपणा टिकविण्यासाठी, मनुष्य पळवाट शोधीत असतो. त्याचप्रमाणें, स्वत:चा निराळेपणा टिकविण्यासाठी, तो नानाप्रकारचे बाह्य विधि व समारंभ किंवा चालीरीती व रुढि, यांच्याशी तादात्म्य पावतो. बाह्य विधि व समारंभ किंवा चालीरीती व रुढि, यांच्यामुळे बहुधा जीवनास मर्यादिता उत्पन्न होते. नि:संकोच जीवनाच्या अभिव्यक्तीस जर त्यांचा लवचिक माध्यम म्हणून उपयोग केला, तर पृथ्वीवर ईश्वरी जीवनाची सिद्धि करण्यांत, त्यांचा अडथळा न होतां, उलट मदत होईल. परंतु, बहुधा विधि व समारंभ किंवा चालीरीती व रुढि, यांच्याभोवती, कालांतराने भावनिरपेक्ष असें स्वत:चेंच फालतू महत्त्व व स्तोम उत्पन्न होत असतें; व असें झालें, म्हणजे बाह्यविधीवरील आसक्ति ही जीवनाच्या संकोचास व मर्यादितेस कारणीभूत होते. **नवमानवाच्या जीवनांत, बाह्य विधींवरील आसक्ती उडेल व आत्म्याचे दृष्टीने, त्यांना साधन म्हणून दुय्यम दर्जाचें गौण स्थान मिळेल. व त्यामुळे जीवनाची मर्यादिता नष्ट होऊन, निर्मितिक्षम आत्मजीवनाचा नि:संकोच विकास होईल.** भ्रमात्मक, नि:सार व संकुचित जीवन जाईल, तेथे सत्याश्रित सारभूत व अनंत जीवनाचा उदय होईल; व ज्या मर्यादितेमुळे स्वत:चा निराळेपणा टिकून राहतो, ती ज्ञानामुळे नष्ट होईल.

याप्रमाणे, पळवाट शोधून, भ्रममूलक कल्पनांच्या द्वारां, किंवा बाह्यविधींशीं तादात्म्य



पावून, मनुष्य स्वत:चा निराळेपणा टिकविण्याचा प्रयत्न करतो. स्वत:चा निराळेपणा टिकविण्याच्या आणखी एका मार्गाचा तो अवलंब करतो. तो म्हणजे वर्गभेद, मतभेद, जातिभेद, पंथभेद, राष्ट्रभेद किंवा लिंगभेद इत्यादीमुळे उत्पन्न होणाऱ्या एखाद्या संकुचित वर्गाशीं तादात्म्य पावणें. ह्यांत मनुष्याचा निराळेपणा नाहीसा झाल्यासारखा दिसला, तरी वास्तविक पाहतां, तो असल्या भेदनिर्मित वर्गाशी तादात्म्य पावून, स्वत:चा निराळेपणा व्यक्त करीत असतो. दुसऱ्या वर्गाहून आपण भिन्न आहोंत, या कल्पनेंत तो आनंद मानीत असतो.

**दोन द्वंद्वांपैकी एकाशीं तादात्म्य पावून, दुसऱ्यापासून स्वत:ला भिन्न मानल्यामुळे, मनुष्याचा निराळेपणा उत्पन्न होतो व फोफावतो.** एखाद्या पंथाशीं तादात्म्य पावून, किंवा त्याच्या दृष्टीने जें वाईट ठरलें असेल, त्याहून भिन्न असा जो चांगुलपणा त्याच्याशीं तादात्म्य पावून, मनुष्य स्वत:च्या निराळेपणाचें रक्षण करीत असतो. परंतु, एखाद्या मर्यादित पंथाशी किंवा मर्यादित ध्येयाशीं तादात्म्य पावण्यांत, मनुष्याचा निराळेपणा नष्ट झाल्याचा केवळ भास मात्र होत असतो. **तो निराळेपणा वास्तविक नष्ट होत नाही. विश्वव्यापी जीवनाच्या सागरांत मर्यादित स्वत्व विराम पावण्याकरता, सर्व प्रकारचा निराळेपणा समूळ नष्ट व्हावयास पाहिजे.**

परंतु बरेचसे लोक निराळेपणाची दृढ भावना व तजन्य आक्रमक वृत्ति यांच्या मगरमिठींत सापडलेले असतात; व मानवाच्या या शृंखलांच्या दृश्याने जे खचून जातात त्यांच्या दृष्टीने मानवाचें भवितव्य केवळ निराशाजनकच ठरतें. परंतु मानवाच्या या विपद्ग्रस्त स्थितीचें जर आपल्याला योग्य मापन करावयाचें असेल, तर मानवाच्या वास्तविक परिस्थितीचा अधिक खोल विचार व्हावयास पाहिजे. कांही लोक जगातिक परिस्थितीच्या केवळ पृष्ठभागाचेंच समालोचन करतात; त्यांना ज्या सुप्त शक्तींत पुढे येणाऱ्या नवमानवाचें भवितव्य साठवलें आहे, त्या दिसू शकत नाहीत. परंतु या सर्व सुप्त शक्तींचा व्यापार सुरु होऊन, त्यांचें कार्य दृग्गोचर होण्याकरिता, आध्यात्मिक ज्ञानाच्या ठिणगीची आवश्यकता आहे. काम, क्रोध व लोभ यांच्या व्यापाराने जगांत अतोनात अंदाधुंदी व दु:ख उत्पन्न होईल. परंतु मानवी स्वभावाचा एकच आशापर विशेष आहे; व तो म्हणजे, या संहारक शक्तींच्या व्यापारांत देखील एक प्रकारचें प्रेम खास असतेंच.

युद्धांत देखील सहकार्यपर क्रिया आवश्यक असतेच; परंतु तेव्हां एखाद्या संकुचित वर्गाशीं किंवा ध्येयाशीं तादात्म्य पावल्यामुळे, या सहकार्याचें क्षेत्र कृत्रिम रीतीने मर्यादित होतें. युद्ध करण्याच्या मागे देखील, एक प्रकारचें प्रेमच असतें; परंतु या प्रेमात ज्ञानाची जोड नसते. प्रेमास पूर्णता येण्याकरता, त्यांतील सर्व प्रकारची मर्यादिता नष्ट होऊन, तें अनंत झालें पाहिजे. मानवी जीवनाच्या प्रत्येक स्थितींत प्रेम हें असतेंच. परंतु ते प्रेम सुप्त किंवा मर्यादित असतें; व त्या प्रेमांत स्वार्थपर महत्त्वाकांक्षा, वंशाभिमान, क्षुद्र प्रकारचा अभिनिवेश, मत्सर, किंवा

नाही. **भेदप्रवण विचार व भावनांमुळे या भेदांचा परिपोष होतो; व प्रेम व ज्ञान याशिवाय भेदप्रवण भावना व विचार नष्ट करण्याचा दुसरा मार्ग नाही. सत्यनिष्ठ जीवनाकरता तुम्ही लोकांचे मन वळविलें पाहिजे. तुम्ही त्यांच्यावर जबरदस्तीने आध्यात्मिकता लादू शकत नाही.** केवळ तुमच्या अन्त:करणांमध्ये अकृत्रिम मैत्री व निष्कलंक सदिच्छा असून भासणार नाही. तुम्हाला तुमच्या कार्यात यश येणार असेल, तर तुम्ही त्यांना त्यांचे हक्काचें उच्चतम ध्येय गांठण्यास व स्वत:ची बंधनांतून व दु:खांतून मुक्तता करुन घेण्यास मदत करीत आहांत, अशी श्रद्धा व खात्री तुम्हाला त्यांच्यामध्ये निर्माण करता आली पाहिजे. तुम्ही त्यांना आध्यात्मिक स्वातंत्र्य किंवा बोध मिळविण्याच्या बाबतींत दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची मदत देऊं शकत नाही.

आध्यात्मिक स्वरुपाची मदत देत असतांना, तुम्ही खालील चार मुद्दे लक्षांत ठेवले पाहिजेत –

**(१) खालील भूमिकेवर उतरण्याची दार्शनिक (Apparent) क्रिया :–** कित्येकदा

आध्यात्मिक कार्यकर्त्यांना सूचना

ज्यांना तुम्ही मदत करुं इच्छिता, त्यांच्या भूमिके- इतक्या खालील भूमिकेवर उतरल्याचा देखावा तुम्हाला करावा लागेल. इतरांना जाणिवेच्या उच्च भूमिकवर नेण्याचा जरी तुमचा उद्देश असला, तरी त्यांना समजणारी भाषा तुम्हीं वापरल्याशिवाय तुमच्या मदतीचा फायदा ते घेऊं शकणार नाहीत. तुमच्या विचारांच्या व भावनांच्या द्वारां तुम्हाला जें द्यावयाचें आहे, ते त्यांना समजणार नाही. तेव्हा तुमच्या विचारांचा व भावनांचा त्यांच्यावर परिणाम करावयाचा असेल, तर त्यांची मांडणी, त्यांच्या अनुभवाशीं व सामर्थ्यांशीं जुळती असली पाहिजे. परंतु त्याबरोबरच तुम्ही हेंहि लक्षात ठेवलें पाहिजे की, असें करीत असतां, तुम्ही आपल्या स्वत:च्या ज्ञानाच्या उच्च भूमिकेवरुन खरोखर घसरुं नये. ज्याप्रमाणांत त्यांचे ज्ञान वाढेल, त्यामानानें तुम्ही आपली रीत हळूहळू बदलावयास हवी; व यासाठी तुमचे खालील भूमिकेवर दार्शनिक उतरणें थोड्या कालासाठीच असावयास हवें.

**(२) आध्यात्मिक ज्ञानानें सर्वांगीण उन्नति होते :–** तुम्ही जीवनाचे निरनिराळे विभाग करुन मग प्रत्येक विभागाचा निराळा व स्वतंत्र विचार करणें बरोबर नाही. **कित्येक वेळां, विभागश: विचार करण्यामुळे, अखंड प्रज्ञेमध्ये अडथळा उत्पन्न होतो.** याप्रमाणें राजकारण, शिक्षण, नीति, भौतिक प्रगति, शास्त्रें, कला, धर्म, गूढवाढ, संस्कृति वगैरे जीवनाचे निरनिराळे भाग करुन, त्यांपैकी एकाच भागाचा तुम्ही स्वतंत्र विचार केल्यास, तुम्हाला जीवनांतील अनेकविध प्रश्न पूर्णपणें व समाधानकारक रीतीनें सोडवितां येणार नाहीत. परंतु, जर तुम्हीं इतरांच्या मनांत आध्यात्मिक स्फूर्ती व ज्ञान उत्पन्न करुं शकलां, तर जीवनांतील या सर्व विभागांत, आपोआपच उन्नति होणार, हें निश्चित. तेव्हां आध्यात्मिक कार्यकर्ते या दृष्टीने, तुम्ही

# २२

# आध्यात्मिक कार्यकर्त्यांचें कर्तव्य *

माझ्या आज्ञेंस अनुसरुन, माझा संदेश ऐकण्याकरता तुम्हीं जमला आहांत, याबद्दल मला फार आनंद झाला आहे. ज्याला अध्यात्ममार्गात शिष्यत्व मिळवावयाचें असेल,

मानवास ज्ञानदिप दाखवा

त्याने मानवास परमेश्वरप्राप्तीच्या अधिकाधिक जवळ नेण्याच्या ईश्वरी कार्याकरता, सेवातत्पर असावयास पाहिजे. मला विशेष आनंद याचा झाला आहे, की तुम्ही मजविषयी श्रध्दा व प्रीति ठेवून, माझ्या जगाच्या आध्यात्मिक उद्धार करण्याच्या कार्यात भागीदार होण्यास अंत:करणपूर्वक तयार झाला आहांत. मी दर्शविलेल्या सत्याचें स्वत: आकलन करुन, अज्ञानाने आवेष्टित असलेल्या मानवतेस तुम्ही उत्साहपूर्वक व धैर्याने ज्ञानदीप दाखवाल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

आध्यात्मिक कार्याची रुपरेषा

मानवतेच्या खऱ्या व अन्तिम कल्याणाच्या दृष्टीने, आध्यात्मिक कार्य हे अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे, ज्यांचें मानवतेवर प्रेम आहे, त्या सर्वांचे तें न टाळतां येणारें असे कर्तव्यच होऊन बसतें. तेव्हा, आध्यात्मिक कार्याची रुपरेषा ही अगदी स्पष्ट असण्याची फार आवश्यकता आहे. सर्व जग द्वैताच्या मिथ्या कल्पनेंत पक्कें फसलें आहे. भेदभ्रमांत सापडल्यामुळे, जगाला भेदनिर्मित गुंतागुंत सुटत नाही. **कल्पित भेदांच्या यातनेंतून जगाला**

* ता. १४ फेब्रुवारी १९४३ रोजी, श्रीमेहेरबाबांचा हा संदेश नियुक्त शिष्यांनी हिंदुस्थानांत अनेक ठिकाणी वाचला.

**मुक्त करणें, व त्याला अखिल जीवनाच्या एकतेच्या सत्याची प्रतीति करुन देणें, हेंच आध्यात्मिक कार्यकर्त्यांचें कार्य होय.**

नानात्वा (Manynees) चा उगम

आत्मा हा अज्ञानवश होऊन, स्वत:च्या शरीराशी व अहंभावयुक्त मनाशीं तादात्म्य पावतो; व यांतच नानात्वाच्या भ्रमाचा उगम आहे. जड व सूक्ष्म शरीरें व अहंभावास अधिष्ठानभूत असलेलीं कारण शरीरें, ही द्वैतमय जगताच्या निरनिराळ्या स्थितींचा अनुभव घेण्याचीं साधनें होत. परंतु ह्या शरीरांच्या द्वारां, सर्वदेहातीत असलेल्या आत्म्याच्या यथार्थ स्वरुपाचें ज्ञान होऊं शकत नाही. अहंप्रेरित मनाशी व शरीरांशी तादात्म्य पावल्यामुळे, आत्म्याला नानात्वाचा भ्रम होतो. **सर्व शरीरांमध्ये व व्यष्टिमनांच्या (Ego-minds) मध्ये वसणारा आत्मा एकच असून, त्याचें वास्तव रुप अखंड आहे. परंतु तो या माध्यमरुप देहांमध्ये व अहंप्रेरित मनांमध्ये गुंतलेला असल्यामुळे, स्वत:स मर्यादित मानून, स्वत:स सृष्टींतील अनेकांमधील एक समजतो; व स्वत: एकच एक व अद्वितीय सत्य असल्याचा अनुभव त्याला येत नाही.**

जाणिवेच्या अवस्था

अनंत कालापासून, प्रत्येक जीवाचें समष्टिरुप परमात्म्याशी अभेद्य ऐक्य आहे; व या परमात्म्यालाच खरें अस्तित्व आहे. परंतु मीच देह किंवा व्यष्टिमन आहे, या मिथ्या कल्पनेमुळे, कोणत्याहि प्रकारच्या भेदास ज्यांत थारा नाही, अशा सद्वस्तूंत विविधरुप अनेकत्वाचा भ्रम उत्पन्न होतो. देह आणि व्यष्टिमनें जाणिवेची केवळ वाहक (Mediums) आहेत. **या विविध साधनांतून किंवा वाहकांतून, जगांतील जो अन्तस्थ भूमिकांचा अनुभव आत्म्याला मिळत जातो, त्याला अनुसरुन, त्याच्या जाणिवेच्या स्थितीहि बदलत जातात.**

परमेश्वर प्राप्ति किंवा आत्मसाक्षात्कार.

अखिल प्राणिमात्रांचे ऐक्य व अस्तित्व ज्यांत समाविष्ट आहे, असा परमात्मा आपण स्वत:च आहोत, हे ज्ञान बहुतेक लोकांना नसतें. त्यांच्यामध्ये, आत्मज्ञान सुप्त स्थितींत राहते व तें जाणिवेंत स्पष्ट होत नाही. परंतु द्वैतरुपी पडदा ज्यांनी बाजूला सारला आहे, **त्यांचा आत्मानुभव हा साधनांवर किंवा वाहकांवर अवलंबून नसतो; व त्या अनुभवामध्ये, सर्व जीवांमध्ये सत्तामात्रेंकरुन वसणारा एकमेव परमात्माच आपण स्वत: असल्याचें ज्ञान आत्म्याला होते.** सर्वांच्या एकतेच्या सत्याने प्रकाशित झालेलें असें जीवन मर्यादारहित व दु:खरहित होतें. अशा जीवनांत, अनंताचें अनंतत्व प्रकट होतें. ह्या आध्यात्मिक पूर्णतेच्या मुक्त अवस्थामध्ये, सत्यनिष्ठ ईश्वरी जीवनाचा अनुभव व आविष्कार व्हावा, म्हणून अहंप्रेरित जीवनाचा अन्तिम व नि:शेष त्याग केला जातो; व जीवनाचें खरें महत्त्व केवळ व सत्तारुप ईश्वराशिवाय दुसऱ्या कशांतहि नाही, याची निश्चित प्रतीती येते.

कालाचें महत्त्व.



आत्मासाक्षात्कार म्हणजे अनंततेंतील जीवन होय. तो कालातीत अनुभव आहे. परंतु कोणतेंही आध्यात्मिक कार्य हें नानारुप सृष्टीमध्ये गुंतलेल्या जीवांच्याबद्दलच असतें; व म्हणून त्या कार्याला कालाची मर्यादा लागूं आहे. **आध्यात्मिक कार्यकर्ते सृष्टींतील कालाविषयीं उदासीन राहू शकणार नाहीत.** वेळेचें भान न ठेवणें, म्हणजे आध्यात्मिक कार्याबद्दलच अनास्था ठेवणं होईल. तेव्हा ज्यांना कार्य करावयाचें आहे, त्यांनी कालप्रवाहाचें विवेकयुक्त भान ठेवण्याची आत्यंतिक आवश्यकता आहे. व विशेषत; **अगदी जवळ असलेल्या भविष्य कालांतील क्षणाचें पूर्ण महत्त्व जाणणें फार जरुर आहे. कारण त्यावेळी, आत्मज्ञानांत प्रतीत होणाऱ्या सत्याचा सार्वत्रिक आविष्कार होईल.**

धोक्याची सूचना.

दु:खित मानवतेस सत्य दाखविण्याच्या या सार्वत्रिक कार्यात, मला मदत करणें, हें प्रत्येक आध्यात्मिक कार्यकर्त्यांचे कर्तव्य आहे. हें सत्यग्रहण करण्यास व त्यांत सुप्रतिष्ठित होण्यास जी लोकांची पूर्वतयारी लागेल, ती तुम्हाला करुन घ्यावयाची आहे. परंतु त्याबरोबरच एक महत्त्वाचा मुद्दा तुम्ही लक्षांत ठेविला पाहिजे. **अखंड व एकरस जीवनांमध्ये, लोक केवळ कल्पनेने भेद निर्माण करीत राहतात; व आध्यात्मिक कार्यकर्त्यांना देखील विश्रांति घेऊं देत नाहीत. परंतु, द्वैताच्या कल्पनेंतून त्यांची सुटका करुन, आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्याच्या कार्यात तुम्हांला त्यांना मदत करावयाची असेल, तर त्यांच्यासाठी प्रयत्न करीत असतांना, तुम्ही स्वत:मध्ये एकत्वाची जाणीव सतत जागृत ठेवण्याची आवश्यकता आहे.**

आध्यात्मिक कार्यांतील अडथळे.

मी विशद करीत असलेल्या अमृतत्वाचा आस्वाद घ्यावयाचा असेल, तर लोकांच्या मनांतून स्वार्थ व कोतेपणा पूर्णपणें नाहीसे झाले पाहिजेत. स्वार्थ व कोतेपणा सोडून देण्यास लोकांचे मन वळविणें, ही सोपी गोष्ट नाही. श्रीमंत व गरीब, सुखवस्तु व वंचित, राज्यकर्ते व प्रजाजन, नेते व बहुजनसमाज, आक्रमक व दलित, उच्च व नीच, प्रतिष्ठित व ज्यांची कुचंबणा होते असे लोक, याप्रमाणें जे भेद लोकांत निर्माण होतात, ते उगीच नाहीत. हे भेद लोक आपल्या अज्ञानामुळे निर्माण करुन टिकवितात. या भेदांना चिकटल्यामुळे, दूषित विचार व भावना यांमध्ये ते इतके स्थिर होतात, की ते विचार व त्या भावना दूषित असल्याची जाणीवहि त्यांना राहत नाही. ते जीवनाचे निरनिराळे भिन्नभिन्न विभाग करतात; व आपली **भेदवासना टाकून** देण्याची त्यांची तयारी नसते. **जेव्हा तुम्ही आपल्या आध्यात्मिक कार्यास सुरवात कराल, तेव्हा भेदांनी भरलेल्या क्षेत्रांत तुम्हाला प्रवेश करावा लागेल; व तुम्हाला आढळून येईल, की लोकांना या भेदांविषयीं इतकी आसक्ति आहे की, ते हे भेद वाढवून पक्के करण्याकरतां व कायमचे टिकवण्याकरता, न जाणतां किंवा बुद्धिपुरस्सर प्रयत्न करीत असतात.**

त्यांना सत्याकडे वळवा.

केवळ टीका केल्याने हे भेद तुम्ही नष्ट करुं शकणार

आकांक्षा एकदा जागृत झाली, म्हणजे तिला पुढे केव्हाहि पूर्णपणे दाबून ठेवतां येत नाही, किंवा टाळता येत नाही. ही आकांक्षा म्हणजे एक अंतरहित भडकणारी ज्वाला बनते; व बंधनकारक वासनांची मुळेंच भस्म करुन टाकते. ही आध्यात्मिक आकांक्षा किंचितहि मंद न होतां, व बेगुमान (uncompromising) पणे पुढे चालू राहतो; व ती **मुमुक्षूला सद्‌गुरुच्या एकरस व अविभाज्य अशा सत्यजीवना (life in the truth) मध्ये स्वत:च्या स्वतंत्र अस्तित्वाचे विसर्जन करावयास भाग पाडते, इतकेंच नव्हे, तर ती त्याला त्या सत्यजीवनांत मिळवून त्याच्याशीं एकरुप करते.** याप्रमाणे यात्रेकरु हा तीव्र आध्यात्मिक आकांक्षेच्या द्वारा, स्वत:च्या शांतिधामाप्रत अवश्यमेव पोहोचणार, हें ठरलेलेंच आहे. ज्यांच्यामध्ये ही आकांक्षा आहे, त्या सर्वांना माझा आशीर्वाद आहे.



जीवनांतील सर्व व्यक्तिगत व सामाजिक प्रश्न पूर्णपणें व खरोखर सुटतील, असा प्रयत्न केला पाहिजे.

**(३) आध्यात्मिक उन्नतीमध्ये, ज्ञानाचा उदय आंतून व स्वाभाविकपणें होतो.** जे आध्यात्मिक ज्ञान तुम्हीं इतरांना देऊं इच्छिता, तें त्यांच्यामध्येच सुप्तस्थितींत आहे. तें अनावृत्त करण्याकरता तुम्ही केवळ निमित्तमात्र आहांत, याची जाणीव, आध्यात्मिक कार्यकर्ते या दृष्टीनें तुम्हाला सतत जागृत ठेवावी लागेल. **आध्यात्मिक प्रगति ही बाहेरील वस्तूंच्या संचयांत नसून, आंतून होणाऱ्या आत्म्याच्या अनावरणामध्ये आहे. सद्‌गुरुशिवाय आत्मज्ञान कधींहि होऊं शकत नाही. परंतु, सद्‌गुरु हा इतरांच्यामध्यें सुप्त स्थितींत असलेल्या शक्ती जागृत करण्याच्या कार्यात, त्यांना मदत देतो, हेंच सद्‌गुरुच्या सहाय्याचें वैशिष्ट्य आहे.**

**(४) कांही प्रश्न उत्तराहूनहि महत्त्वाचे असतात :–** सद्‌गुरु तुमच्या द्वारां जें कार्य करुन घेऊं इच्छितात, त्याचें यथार्थ स्वरुप आध्यात्मिक कार्यकर्ते या दृष्टीने तुम्ही आपल्या दृष्टीसमोर सतत ठेवलें पाहिजे. आत्मज्ञान प्रत्येकामध्ये सुप्त स्थितींत आहेच, हें जेव्हा तुम्हाला स्पष्टपणे समजेल, त्यानंतर तुम्हांस इतरांना आयतीं तयार केलेली उत्तरें किंवा उपाय सांगण्याची उत्सुकता राहणार आहे. **लोकांच्या समोर एखादा नवीन प्रश्न मांडण्यांत, किंवा त्यांच्यासमोर असलेला प्रश्नच अधिक स्पष्टपणें मांडण्यांत, तुम्ही संतुष्ट रहाल.** एखाद्या क्रियोन्मुख (Practical) परिस्थितींत, त्यांनी स्वत:ला विचारला नसतां, असा एखादा प्रश्न तुम्ही त्याला विचारला, किंवा प्रश्न विचारुन शोध करण्याच्या वृत्तींत तुम्हीं त्यांना आणलें, व त्यामुळे ते त्यांच्या परिस्थितीबद्दल नवीन, उपयुक्त व निर्मितिक्षम क्रियेत प्रवृत्त झाले, तरी देखील तुम्ही आपलें कर्तव्य केल्यासारखें होईल. **तुमच्या बुद्धीचा निर्णय त्यांच्यावर लादण्यापेक्षा, तुम्ही जर त्यांना एखादा अधिक खोल दृष्टीकोन द्याल, किंवा एखादी फलोन्मुख विचारांची किंवा क्रियेची दिशा दाखवाल, तर त्याला अधिक महत्त्व आहे.** परंतु जे प्रश्न स्वत:समोर मांडण्यांत तुम्ही त्यांना मदत कराल, ते केवळ तार्किक किंवा गुंतागुंतीचे नसावेत. जर हे प्रश्न सरळ, साधे व मूलभूत असतील, तर लोक स्वत:च त्यांची उत्तरें देऊं शकतील. परंतु ज्याअर्थी तुमच्या कुशल मध्यस्थीशिवाय ते आपले नानाविध प्रश्न आध्यात्मिक दृष्टीने सोडवूं शकले नसते, त्याअर्थी तुम्हीं त्यांची अत्यंत आवश्यक व बहुमोल सेवाच केल्यासारखें होईल.

अडथळ्यांचे उल्लंघन

आध्यात्मिक कार्यकर्त्यांच्या मार्गात, नानाप्रकारचे अडथळे येणारच, हें आपण पूर्वीच पाहिलें आहे. परंतु सर्व अडथळे हे त्यांतून पार पडण्याकरितांच असतात. कांही अडथळे अनुल्लंघनीय वाटले, तरी फलाविषयीं किंवा परिणामाविषयीं चिंता न करतां, तुम्ही त्यांना मदत करण्याची शिकस्त कराल. **अडथळे व त्यांचें उल्लंघन, यश व अपयश,**

**हे सर्व एकरस अनंतांतील भास होत; व तुम्ही आपलें कर्तव्य मन:पूर्वक करण्यांतच त्याची परिपूर्ति आहे.** खरे अस्तित्व व अंतिम महत्व ईश्वरालाच आहे, ही जागृति मानवतेंत निर्माण करण्याच्या माझ्या कार्यांत, चिकाटीने व एकनिष्ठेने मदत करण्यास तुम्ही तयार झाला आहां; व या आध्यात्मिक कार्याकरिता, तुम्हाला पुष्कळ प्रसंग मिळतील. या क्षेत्रांत, कार्याला पुष्कळ वाव आहे. तुम्ही या कार्यात बिनशर्त पडाल, असा मला दृढविश्वास आहे.

आध्यात्मिक कार्याचे फळ

तुम्हांला स्वतंत्रपणाने देण्यांत येणाऱ्या आशा बिनतक्रार पाळण्यानेच, मला या कार्यात तुमची मदत होणार आहे.

यशापयशाविषयीं निश्चिंत राहून, तुम्हांला आपलें कार्य करावयाचें आहे. परंतु या जाणिवेने व या वृत्तीत केलेल्या कार्याची फलनिश्चिति आधीच ठरलेली आहे. आध्यात्मिक कार्यकर्त्यांच्या अविरत परिश्रमामुळे, मानवतेस नवीन शाश्वत शांति, व गतिमान सुसंवादिता (Dynamic Harmony), अचल संदेहरहित्व व न मावळणारा आनंद, अक्षय माधुर्य व निष्कलंक पावित्र्य, निर्मितिक्षम प्रेम व अनंत ज्ञान, यांचा अनुभव येईल.

# २३
# आध्यात्मिक आकांक्षेची ज्वाला *

सीमित व्यक्तीच्या अहंजीवनामध्ये, भ्रमात्मक 'मी' व 'तूं' ह्या द्वंद्वांचा परिपोष होत असतो. याप्रमाणे जीवनाच्या एकतेचे 'माझे' व 'तुझे' असे कृत्रिम खंड पडून, त्यांत द्वैताचें दूषित तत्त्व शिरतें. निराळ्या अस्तित्वाच्या मिथ्या कल्पनेमध्ये व तिच्याच द्वारां अहंभाव जगतो व त्याचें आश्रयस्थान बनणाऱ्या ह्या अज्ञानामधूनच नानाविध व सतत वर्धमान असणाऱ्या वासनांचे जीवन सुरुं होतें. **सुख व दु:ख, तृप्ति व अतृप्ति, चांगलें व वाईट, ह्या द्वंद्वांमध्ये सतत अपरिहार्यपणें हेलकावे खात बसणें, हा वासनामय जीवनाचा धर्म आहे.** पृथग्भावा (separative consciousenss) च्या अज्ञानांत उद्भूत होणाऱ्या सर्व वासना दु:खदायी व बंधनकारक बनतात. ज्या भ्रमाक्रान्त जीवनांत कधीहि फलद्रूप न होणाऱ्या आश्वासनांची अनिवार्य जुलूमशाही आहे, अशा जीवनाच्या वासना ह्या घटक होत.

परंतु अहंजीवनांतील सुखदु:खांच्या घनघोर वादळांत देखील, **सद्गुरुच्या कृपाप्रसादाने व अनुभवाच्या परिपक्व स्थितीमध्ये,** मिथ्या व क्षणिक आकारांच्या द्वारां तृप्तता शोधित असणाऱ्या वासनांची असीम विफलता (utter futility) स्पष्टपणे प्रतीत होते. **सद्गुरुच्या प्रीतिजीवनामध्ये वासनांचा किंवा द्वैताचा क्षोभ नसतो.** अशा जीवनामध्ये, खऱ्या मूल्यांचे दर्शन आत्म्याला एकदा झालें, की **तो निराळेपणा उत्पन्न करणाऱ्या अहंजीवनाच्या पिंजऱ्याला व वासनांच्या शृंखलांना तोडून टाकण्यास प्रवृत्त होतो.** हीच आध्यात्मिक आकांक्षेच्या जीवनाची सुरवात होय. खरें व खोटें, वास्तविक महत्त्वाचें व वास्तविक बिनमहत्त्वाचें, यामधील खंडरहित सारासारविचार हा ह्या नवीन जीवनाला सतत साथ देतो. ह्याप्रमाणे आध्यात्मिक

* मेहेर अध्यात्म मंडळ, सावनेर. १५-११-१९४४

**त्यांत जाणीवयुक्त व अबाध्य ईश्वरत्वाचें शाश्वत व प्रतिक्षणी नवीन होणारें असें आत्मप्रतिष्ठापन (Self-affirmation) असतें.** जाणीवरुपी नभोमंडलांत, सर्वात्मा असणाऱ्या ईश्वराचा प्रकाश सतत तळपत राहण्यासाठी, संस्काररुपी मेघ हे पूर्णपणे नष्ट झाले पाहिजेत. आत्म्यांतील ही प्रच्छन्न संपत्ति प्राप्त करण्यामध्ये तुम्हाला मदत करणें, हेंच माझें अवतारकार्य आहे. जे कोणी ह्या संपत्तीच्या शोधांत आहेत, त्या सर्वांना माझा आशीर्वाद आहे.

# २४

# मानवाचा आध्यात्मिक वारसा *

सर्व ऋतूंत व सर्व ठिकाणी, मानव हा सुखासाठी सतत तडफडत आहे. परंतु तें सुख फारच थोड्या लोकांच्या वाट्यास येतें; कारण फारच थोड्या लोकांना सुखाचें रहस्य हस्तगत झालेलें असतें. मनुष्याला सदा सर्वकाळ खंडित व सीमित असल्याची जाणीव असते. तो नेहमी व निरंतर, यातना व दुःख यांनी ग्रस्त असतो. स्वतःचे खरें स्वरुप न जाणल्यामुळे, मनुष्य स्वतःच्या देहाशीं, वासनांशीं किंवा सीमित व्यष्टिमनाशीं तादात्म्य पावतो; आणि त्यामुळे त्यांची बंधनें व त्यांचीं दुःखें तो स्वतःवर ओढवून घेतो. परंतु, तो जेव्हा स्वतःला ह्या सर्वाहून निराळा व ह्या सर्वाच्या पलीकडे असल्याचें जाणतो, तेव्हाच त्याला त्याचा अखंड आनंदाचा ईश्वरी वारसा पूर्णपणे प्राप्त होतो.

जो मनुष्य, सांस्कारिक आसक्तीमुळे, स्वतःस देह, वासना किंवा व्यष्टिमन मानतो, तो स्वतःच्याच अज्ञानरुपी पिंजऱ्यामध्ये पकडला जातो. ज्याप्रमाणे, हताश झालेला पिंजऱ्यांतील पोपट स्वतःचे पंख पिंजऱ्याच्या गजांवर फडाफड आपटतो, पण बंधमुक्त होण्याऐवजी स्वतःच्या पंखांस केवळ इजाच करुन घेण्यामध्ये यश संपादन करतो, त्याचप्रमाणे, माणसाचेहि स्वतःच्या शृंखला तोडण्याचें सर्व प्रयत्न अखेरीस त्याला त्याच शृंखलांनी अधिक दृढपणे जखडून टाकण्यास कारणीभूत होतात. खोल चिखलांत रुतलेला मनुष्य जों जों त्यातून बाहेर निघण्याचा प्रयत्न करतो, तों तों त्या प्रयत्नामुळेच तो त्या चिखलांत अधिक फसतो.

व्यक्तीने कोणाच्याहि साहाय्याशिवाय केलेले प्रयत्न कित्येक वेळा अयशस्वी होतात. कारण अशा प्रयत्नांचा उगम अज्ञानजन्य अहंभावामध्येच असतो. ह्याकरिताच, आध्यात्मिक

---

* इ. स. १९४७

मुक्ततेकरता, सद्‌गुरु हा अगदी आवश्यक आहे. **सद्‌गुरु हा सत्यस्वरुप असून, त्याची क्रियाशीलता सीमित अहंप्रेरित जाणिवेंतून न होतां, सत्यां** (Truth) **तच उत्स्फूर्त होत असते;** व कोणाचीहि मदत न घेतां मुमुक्षूने केलेल्या स्वत:च्या प्रयत्नांपेक्षा, सद्‌गुरुने दिलेलें साह्य हें अधिक प्रभावी असतें. ह्याचा अर्थ असा नव्हे, की मुमुक्षूने आध्यात्मिक मुक्ततेकरता किंवा परिपूर्णतेकरता, स्वत: प्रयत्नच करुं नये. अनुभूती (Realisation) करता, त्याने त्याची स्वत:ची पराकाष्ठा तर केलीच पाहिजे. परंतु त्याबरोबरच, त्याने सद्‌गुरुपासून त्याचेकडे येणाऱ्या अपरिहार्य व विपुल साहाय्यास सम्मुख राहून, त्याचा स्वीकार केला पाहिजे. मुमुक्षूमध्ये सुप्त स्थितींत आधीपासूनच नाही, असें कांही तरी अगदी नवीन त्याला देणे, हे कांही सद्‌गुरुचें कार्य नाही. **मुमुक्षूचाच जो खरा आत्मा आहे, त्याला सद्‌गुरु हा केवळ अनावृत्त करतो. मुमुक्षूचा ज्या ईश्वरी वारसावर हक्क आहे, त्याचीच प्राप्ति करुन घेण्याचें सामर्थ्य सद्‌गुरु त्याला देत असतो.**

# २५
# प्रच्छन्न संपत्ति *

वळणावळणाने पण अखेरीस समुद्रास मिळत नाही, अशी एकहि नदी नाही; व अखेरीस परमोच्च ध्येय गांठीत नाही, असा एकहि प्राणी नाही. परंतु, **सर्वांतर्यामीं असूनहि स्वत:मध्ये वसणारा जो परमोच्च व सत्यस्वरुप आत्मा आहे, त्याची पूर्णत: व त्याचें ऐश्वर्य व्यक्त करण्यास समर्थ असणारी पूर्ण विकसित जाणीव ही केवळ मानवदेहांतच असते.** स्वत:च जमवलेल्या सांस्कारिक अज्ञानामुळेच मनुष्य ह्या परिपूर्णता व तृप्ततारुपी अनिर्वचनीय प्रच्छन्न संपत्तीचा उपभोग घेऊं शकत नाही. उत्क्रान्तींतील विकासक्रमाच्या द्वारां मानवदेहांत व मानवी जाणिवेंत उतरण्याच्या आत्म्याच्या प्रक्रियेमध्ये, संस्काररुपी गाळ सांचत जातो. संस्कार हे मार्गस्थ यात्रेकरुच्या अंगावर सांचणाऱ्या धुळीप्रमाणे होत. सर्वश्रेष्ठ अशा मनुष्य देहांत देखील ईश्वरी जीवन हें संचित संस्कारांच्या गाळांत फसलेलें असतें. या संस्कारांच्या नानामुख व विक्षेपक (Distracting) गतिमत्तेमुळे, जाणीव ही मिथ्या व भ्रममय गोष्टींच्या क्षेत्रांत सीमित होते; व त्या जाणिवेची अभिव्यक्तीहि संकुचित व विकृत होते.

मिथ्या गोष्टींबद्दलच्या बहुरंगी वासना ह्या एकामागून एक सोडून द्याव्या लागतात. भेदप्रवण अहंतारुपी फसव्या अग्नीस पोसणाऱ्या संस्काररुपी सर्व काष्टांची सत्याच्या अजेय ज्वालेमध्ये एकामागून एक आहुती द्यावीच लागते. कारण सत्या (Truth) चा जाणिवेवरील हक्क हा नाकबूल करता येण्यासारखा नाही. केवळ ह्याच मार्गाने, **मनुष्य अमृतजीवना** (Life Eternal) **ची अंतरहित सुरुवात (Endless beginning) असणारें परमोच्च असें ईश्वरी** ध्येय गांठतो. त्याचा दुसरा मार्ग नाही. अनंततेंतील जीवनामध्ये बंधन, ऱ्हास किंवा दु:ख नसून,

* बुद्ध सोसायटी, नागपूर १६-११-१९४४

परंतु लवकरच तो शांत होऊन, मनाची पूर्वीची स्थिति कायम होते. जगांतील सर्व सुख व दुःख याप्रमाणे क्षणिक आहे. कांही मिनिटांपूर्वी, तुम्ही चॉकोलेट्स मिटक्या मारुन खाल्लींत. परंतु तो आनंद आता मावळला असून, त्याचा अवशेषहि वर्तमानकालांत राहिला नाही. त्याचप्रमाणे, सर्व सुख व दुःख अनित्य आहे. भोगलोलुप मनाला विषयसुख अत्यंत प्रिय असतें. परंतु संयोग असेपर्यंतच तें सुख राहतें. वियोग झाल्यानंतर तें नाहीसें होतें. तुम्ही जर जगांतील या नाशवंत सुखाची चिरकाल टिकणाऱ्या अध्यात्मप्रचुर आनंदाशीं तुलना केली, तर तुम्हाला त्या दोहोंतील फरक कळून येईल.''

## ७

''प्रत्येक कार्याला कारण असतेंच. या जगांतील सर्व दुःख काल्पनिक व स्वतः निर्माण केलेलें असतें. त्याला फारसें मोठें कारण नसतें. कारणच कल्पित असल्यामुळे, त्या दुःखाचा आपल्या मनावर परिणाम होऊं देण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे, जगांतील सुखाची अभिलाषा ठेवणें, म्हणजे बालिशताच आहे. तुमच्याविषयींच्या किंवा इतर जगांतील सर्व बाबतींत, तुम्ही केवळ तटस्थ साक्षी होऊन रहा. 'हे हाफीज! ऐहिक सुख व दुःख दोन्ही चंचल आहेत. सत्य ह्या दोहोंच्या पलीकडे असल्यामुळे, तूं आनंदात रहा.' या अर्थाची हाफीजची कविता आहे.''

## ८

''एखाद्या एम्. ए. पास झालेल्या शिक्षकास लहान मुलांना वर्णमाला शिकवावयाची असेल, तर त्याने मुलांच्या मनोभूमिकेपर्यंत खाली उतरलें पाहिजे. तरच तो त्यांना शिक्षण देऊन, पायरी पायरीने, आपल्या इतकी योग्यता त्यांना आणून देऊं शकेल. तो आपले पांडित्य विसरला नाही, तर त्याचे शिकविण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ होतील. त्याप्रमाणेच सद्गुरुस देखील, शिष्यांस ज्ञान देण्याकरतां, त्यांच्याच भूमिकेंत यावें लागतें. कांहीहि करण्यापूर्वी त्याला भोवतालच्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे. ह्या बाबतींत अरेबियाच्या पैगंबराचे उदाहरण पाहा. जेव्हा त्याच्या शत्रूंनी त्याचा छळ करुन त्याला ठार मारण्याची धमकी दिली, तेव्हा तो मक्केहून मदिनेस पळून गेला; व अशा बिकट परिस्थितींत, त्याने साधारण मनुष्याप्रमाणेंच वर्तन केलें. परंतु 'सलिक' किंवा सद्गुरुप्रमाणे, 'मज्झूब' यथाप्राप्त अनुवर्तन करूं शकत नाहीत. कारण ते ईश्वरीय आनंदसागरांत इतके निमग्न असतात, की त्यांना देहाचें मुळीच भान नसतें. ते इतरांना ज्ञान किंवा सत्यप्रत्यय देऊं शकत नाहीत.''

## ९

''आपले दोन डोळे सोडून, आपणास एक आणखी अंतश्चक्षु आहे. हा अंतश्चक्षु

## परिशिष्ट नं. १

## १

# फळीवरील कांही प्रवचनें *




''जीवन्मुक्त पुरुष हा जगाच्या व्यवहारांत क्वचितच लक्ष घालतो; व जेव्हा त्याला दुसऱ्याचें निरतिशय हित करावयाचें असेल, तेव्हाच तो आपलें मन व्यवहाराकडे लावतो. मुम्बई शहराच्या पूर्वभागांत राहणारे लोक जॉर्ज बादशहाचे प्रजाजन आहेत. पण ते कोठे राहतात, काय करतात, याची त्याला कांही माहिती असते काय? मुळींच नसते. परंतु त्यांच्याविषयीं माहिती मिळविण्याची बादशहाची इच्छा असल्यास, त्याला ती माहिती ताबडतोब देण्यांत येईल. त्याचप्रमाणे, जीवन्मुक्तास वाटेल, तर तो कोणतीहि गोष्ट मुळापासून जाणूं शकतो; व बादशहाप्रमाणें त्याला इतरांस त्रासहि द्यावा लागत नाही. परंतु साधारणतः तो याप्रमाणें व्यवहारांत लक्ष घालीत नाही. जगांतील प्राप्त व्यवहार करत असलेला असा तो दिसला, तरी तो त्यांत तल्लीन होत नाही.''

---

* जुलै १९२५ पासून श्रीमेहेरबाबांनी मौन धरलेलें असल्यामुळे, त्यांची सर्व प्रवचनें वर्णमाला छापलेल्या फळीवरुन देण्यांत आली आहेत. – अनुभवादक.

## २

''चवथ्या भूमिकेंत रुढ झालेला योगी देखील जन्ममरणचक्रांतून मुक्त होत नाही. कारण त्याचे कर्मजन्य संस्कार अद्याप नष्ट झालेले नसतात. चांगल्या कर्मांचे चांगले संस्कार होतात; व वाईट कर्मांचे वाईट संस्कार होतात. कर्माप्रमाणेंच विचारांमुळेहि संस्कार उत्पन्न होतात. इतकेंच काय, पण बोलणें, ऐकणें, पाहणें, खाणें, पिणें, झोप घेणें व अति सूक्ष्म चंचलता, यांचेसुद्धा संस्कार होतात. सद्गुरुने ह्या संस्कारांचे परिमार्जन केलें नाही, तर ते यंत्राप्रमाणे बिनचूक फलद्रूप होतात. तुमचें सध्याचें जीवित, सुख व दुःख, त्याचप्रमाणें सद्गुण व दुर्गुण हे सर्व तुमच्या पूर्वीच्या संस्कारांनी निश्चित झाले आहेत. यालाच सुफी पंथाचे मुसलमान 'आमाल' म्हणतात. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें, म्हणजे तुमचा हा जन्म तुमच्या सूक्ष्म संस्कारांचा स्थूल परिणाम आहे. चांगलेवाईट सर्व संस्कार नष्ट झाल्याशिवाय, मुक्ति मिळू शकत नाही. पुण्यकर्माची साखळी सोन्याची; व पापकर्माची साखळी लोखंडाची समजावी. परंतु चालु कोणतीहि असली, तरी त्यांचे बंधन नाहीसें होईपर्यंत मोक्ष नाही.

साधारण योगांतील प्रक्रियांनी चांगले संस्कार उत्पन्न होतात; पण मुक्ति मिळत नाही. तेव्हा, मोक्षाची इच्छा असल्यास, पापपुण्य रुप संस्कारांच्या जमाखर्चांचा पूर्ण परिहार झाला पाहिजे – म्हणजे 'पाटी' कोरी असावी. परंतु, पूर्ण सद्गुरुच्या अनुग्रहाशिवाय, 'पाटी' अगदी कोरी करणें शक्य नसतें. सद्गुरु कोणाचेंहि संस्कार पुसून टाकूं शकतो. प्राकृत मनुष्याच्या अनंत संस्कारांस केराच्या ढिगाची उपमा देतां येईल. तो त्या संस्कारांना काढून टाकूं शकत नाही. परंतु सद्गुरु त्यांचा एका क्षणांत नाश करुं शकतो.''

## ३

''भौतिक जगाचें ज्ञान व परमेश्वराशीं ऐक्य पावल्यावर मिळणारें दिव्य ज्ञान – असे ज्ञानाचे दोन प्रकार आहेत. आध्यात्मिक पूर्णतेस प्राप्त झालेला पुरुष जेव्हा या स्थूल जगताच्या बाबतींत बोलतो, तेव्हा त्याने या दोन्ही प्रकारच्या ज्ञानांचा जरी प्रत्यक्ष उपयोग केला नाही, तरी त्याच्या शब्दांत त्याच्या भौतिक ज्ञानाप्रमाणेंच त्याच्यांत असणारें ईश्वरत्वहि व्यक्त होतें. अशा पुरुषाच्या कृतीमध्ये व वाणींत, एक प्रकारचा सुन्दर व रहस्यमय अर्थ असतो. पण बहिर्मुख मनुष्याला तो बहुधा दिसत नाही. मूर्खाला रत्न दिलें, तरी त्याची त्याला किंमत नसते; परंतु त्याचें खरें महत्त्व त्यांतील तज्ज्ञांसच समजते....''

## ४

''तत्त्वदर्शनानंतरहि मनुष्याच्या प्रकृतिधर्मांत फरक होत नाही.

''परमेश्वर प्राप्त होण्यापूर्वी त्याच्यांत अहंकार असतो; व त्यामुळेच क्रोध, शाप व कठोरवाणी, हे त्याचं अहित करतात. अहंकार आहे, तेथे ईश्वर नाही; व ईश्वर आहे, तेथे



अहंकार नाही, हें तुम्ही पक्के ध्यानांत ठेवा. पूर्ण पुरुषाच्या ब्राम्ही स्थितींतील क्रियांत किंवा शब्दांत अहंता नसते. तरी, तत्त्वसाक्षात्कार झाला असूनहि, त्याचा मूळ स्वभाव बदलत नाही. परंतु, जेव्हा तो इतरांच्यावर रागावतो, तेव्हा त्यांचे परम कल्याणच होतें, हें विसरतां कामा नये.

''माझे मन नाना प्रकारच्या विषयांचा अभिलाष करीत होतें; पण तुला पाहिल्यापासून तुझ्या दर्शनावाचून मला कोणतीच इच्छा राहिली नाही.'' या अर्थाची हाफीजची कविता आहे.

''यावरुन स्पष्ट दिसतें की, विविध पदार्थ पाहणे, हा कवीचा स्वभाव आहे. आता प्रियतम पाहिल्यापासून इतर कांही पाहण्याची त्याची इच्छा नसली, तरी दृश्यांची प्रीति शिल्लक आहेच. पूर्वी त्यास अनेक पदार्थ पाहावेसें वाटत होते. आता फक्त परमेश्वरच पाहावासा वाटतो. अहंता नष्ट झाल्यामुळे हें वासनापरिवर्तन झालें. अहंभाव जाऊन, तेथे ईश्वरभाव आला. मनुष्याचा रागावण्याचा स्वभाव गेला नाही, तरी आध्यात्मिक पूर्णता प्राप्त झाल्यावर, त्या रागाचा परिणाम अगदीच निराळा होतो. कारण त्याच्या मागे ईश्वरत्व असतें; व ज्या मनुष्यास त्या रागाचा लाभ झाला असेल, त्याचें हितच होतें.''

## ५

''मनरुपी पडद्यामुळे, मनुष्याचं अंतरंग व बहिरंग असे दोन निरनिराळे भाग होतात. अंतरंग निर्मल करणें इतकें कठीण आहे, की साधारण मनुष्यास तें अशक्यच आहे. अगदी पवित्र अंत:करण असणें, सद्गुरुच्या कृपेशिवाय शक्य नाही. परंतु बहिरंग म्हणजे शरीर शुद्ध ठेवण्याचा प्रत्येकाने कसून प्रयत्न केला पाहिजे. धार्मिक विधी – ('शरीयत') देहशुद्धीकरिता आहेत. त्याचें पालन केल्याने, 'सालिक' किंवा सद्गुरुची भेट होते. भाग्यवशात् सद्गुरुच्या शिष्यत्वाचा लाभ होईपर्यंत, प्रत्येकाने आपलें स्वधर्मविहित आचरण केलेंच पाहिजे. देहशुद्धीमुळे अंतरंगहि थोड्या प्रमाणांत विमल होतें. प्रार्थना व विधी यांमुळे तर हटकून फायदा होतोच.

''स्वत:चा धर्म व सद्गुरु या दोहोंपैकी एकाचाच अंगीकार करावा; व योगप्रक्रियेचा तृतीय पंथ भयावह आहे.''

''गुरुकृपेने एकदा अंतरंग विमल झालें, म्हणजे बाह्यशुद्धीची आस्था ठेवली नाही तरी चालतें. पुष्कळ संत घाणेरड्या ठिकाणीं राहतात, व देहाच्या स्वच्छतेविषयीं त्यांना मुळीच पर्वा नसते, हें तुम्हाला ठाऊक असेलच.''

## ६

''इष्ट वस्तु मिळाल्यावर मनाला संतोष होतो; पण त्यानंतर लवकरच त्याची पूर्वीची स्थिति त्यास प्राप्त होते. त्याचप्रमाणे, एखादें कडू औषध इच्छेविरुध्द दिलें, तर मनस्ताप होतो;

## १९

''नाम घेण्यांतच मन एकाग्र करावें; व तसें करतांना श्वासोच्छ्वास नियिमित असावा. श्वास आंत घेण्याची व बाहेर सोडण्याची क्रिया हळूच झाली पाहिजे; व श्वास सोडतांना ईश्वराचें नाम घेत राहावें. इतर विचार येतीलच. पण ते आले तरी त्यांना बाजूला सारुन मन शांत व स्थिर ठेवावे. एकदा ह्या क्रियेची आवड उत्पन्न झाली, म्हणजे तुम्ही ती कधीहि सोडणार नाही; व या कृतींत तुम्हाला एक प्रकारचा आनंद वाटूं लागेल.''

## २०

फारच क्वचित् प्रसंगी, चतुर्थ भूमिकेंत आरुढ झालेले योगी आपल्या सामर्थ्याचा दुरुपयोग करतात; व त्यांना खनिज पदार्थांत जाऊन मनुष्यदेह मिळेपर्यंत पुन्हा उत्क्रान्ति करावी लागते. परंतु साधारणत: मनुष्याची अपक्रान्ति होत नाही. सर्व शरीरांत नरदेह श्रेष्ठ आहे, कारण त्यांतच परमेश्वप्राप्ति होऊं शकते; व ईश्वरप्राप्ति होईपर्यंत आत्म्याचें जन्ममरण चुकत नाही.

## २१

''व्यष्टिबिंदू हा जेव्हा सत्तारुप सागराच्या विधाता नामक भागांतून आत्मज्ञान होण्याकरता विभक्त झाला, तेव्हापासून संस्कार उत्पन्न होण्यास सुरुवात झाली. पुढच्या सर्व योनी व जन्म जाणीव व आत्मज्ञान होण्याकरताच होतात. संस्कार सारखे उत्पन्न होऊन इतके घन होतात, की ते मनुष्यास जिवंतपणीं व मेल्यावरहि सोडीत नाहीत; पण ईश्वर साध्य होण्यापूर्वी संस्कार मनुष्यापासून विमुक्त झाले पाहिजेत. कारण **संस्कार असेपर्यंत, व्यष्टिबिंदूला आदिसंकेताची विस्मृति राहून, संस्कारांमुळे उत्पन्न होणारी गतीच भासमान होत असते. सर्व संस्कारांचे परिमार्जन होईपर्यंत मनुष्याला ईश्वर मिळत नाही.** पण त्यांचे परिमार्जन करणें फार कठीण आहे.''

## २३

''सूक्ष्म जगताला पुढे गति देणें, हे एक आत्मज्ञान असून जगाची जाणीव कायम ठेवणाऱ्या 'सालिकांचे' (सद्गुरुंचे) कर्तव्य आहे. परंतु त्यांतील प्रमुख पुरुषास अंतरंग (circle) निर्माण करुन त्या अंतरंगांतील व्यक्तींना आत्मज्ञान घ्यावें लागतें; व शिवाय स्थूल जगतालाहि गति घ्यावी लागते. याप्रमाणे गति देण्याचें कार्य करण्याकरिता, डोक्यांतील अत्युच्च भागांत अनुभवास येणारी निर्विकल्प स्थिति सोडून, सद्गुरुंना ब्रह्मांड नांवाच्या दुसऱ्या टप्प्यांत उतरावें लागतें. हा दुसरा टप्पा म्हणजे वरील आनंदमय स्थिति व निम्नतर मानुष देह (lower human) या दोहोंतील संधिबिंदूच आहे व त्या टप्प्यांतून या देहाचे खालील सर्व भाग दिसूं शकतात.



दोन भिवयांच्या मध्ये असुन, तोच बाहेरील दोन डोळ्यांतून सर्व पाहत असतो. परंतु संत अंतश्चक्षूने ईश्वर पाहतात; व बाह्य नेत्रांनी जग पाहतात.''

## १०

''स्वरुपावस्थिति ही सर्वांच्याकरिता सारखीच असते. प्रेषित महात्मा व सद्गुरु यांच्या सामर्थ्यात फरक नसतो. फक्त त्या सामर्थ्यांचा उपयोग करण्याचा अधिकार मात्र दोघांनाहि सारखा नसतो. वास्तविक पाहतां, सद्गुरु कोणासहि कांही देत नाही. तो फक्त शिष्याच्याच अंत:करणांत असलेली आध्यात्मिक संपत्ति अनावृत करतो. देहपतनानंतर आपल्या सामर्थ्याचा उपयोग करण्याचा अधिकार सद्गुरुस नसतो. त्याला सामर्थ्य असतें; पण त्याचा उपयोग तो करुं शकत नाही. जेथे सद्गुरुची समाधी असते, तेथे त्याची शक्ति वास करतेच. परंतु त्या समाधीची पूजा करुन जर कोणाचा फायदा झाला, तर त्याचें कर्तृत्व त्या सद्गुरुकडे मुळीच नसतें, हें ध्यानात ठेवा ! भक्त त्या शक्तीचा उपयोग करुन घेतो; व स्वत:चें कल्याण करतों. स्थूल शरीराने जिवंत असेपर्यंतच सद्गुरु दुसऱ्याचें हित करुं शकतो. देहत्याग केल्यावर तो कोणाचे संस्कार नष्ट करुं शकत नाही, किंवा कोणाला एकहि भूमिका उत्तीर्ण करुन देत नाही. परंतु जे भक्त त्याच्या अनंत सद्रूपाची आराधना करतात, त्यांना त्याच्या अनंततेमुळे भक्तीस अनुरुप असलेलें फळ मिळतें.''

## ११

''जगण्यापेक्षा मरणें बरें; मरण्यापेक्षा भिणें बरें; व भिण्यापेक्षा कृति बरी.' अशी एक उर्दू म्हण आहे. – जगणें म्हणजे जगांतील बर्हिमुख जीवन; मरणें म्हणजे ईश्वराशी तादात्म्य पावणें; भिणें म्हणजे परत देहभानावर येणें; मरणें म्हणजे दुसऱ्यांच्या अंतकरणांत दैवी प्रेम उत्पन्न करणें; व कृति म्हणजे दुसऱ्यांना पूर्णावस्था देणें. तेव्हा ह्या उर्दू म्हणीचा अर्थ असा आहे, की जगांत बहिर्मुख जीवन कंठण्यापेक्षा ईश्वरदायी तादात्म्य पावलेलें बरें; एकट्यानेच ब्रम्हानंदांत निमग्न होऊन राहण्यापेक्षा, ईश्वरप्राप्तीनंतर परत देहमानावर येणें बरें; मानवजातीविषयीं उदासीन राहण्यापेक्षा त्यांच्या अंत:करणात दैवी प्रेम निर्माण करण्याहूनहि त्यांना परमात्म्याशीं एकरुप करणें, हें चांगले आहे.''

## १२

''दुसरा आपणास कितीहि वाईट तऱ्हेने वागवो, आपण शान्तच राहिलें पाहिजे. कोणी परछिद्रान्वेषी दृष्टीने तुमच्याकडे पाहो, तुम्हांस दोष देवो किंवा कसेहि कठोर शब्द बोलो, ते सर्व धीराने सहन करा. यांतच खरें धैर्य आहे. मनुष्य सर्व सैन्य आपल्यापुढे

नमवील, परंतु तो आपला क्रोध जिंकूं शकत नाही.''

## १३

''काममूलक विचार व क्रिया किंवा क्रोधाचा आवेग याविषयी सावध रहा. माझ्या म्हणण्याप्रमाणे वागा; त्यांत तुमचेंच कल्याण आहे. **सत्समागम, जनतेची सेवा व ईश्वराचें नांव घेणें, ह्या तीन साधनांत सर्वश्रेष्ठ योगांचा व धर्माचरणाचा अंतर्भाव होतो.** इतकें केले म्हणजे सर्व धर्म पूर्णपणे पाळले जातात.''

## १४

''जगांतील कोणत्याहि गोष्टीला महत्त्व नाही. **आत्मज्ञानी पुरुषाला हें जग स्वप्नाहून तुच्छ वाटतें.** शेक्स्पीअरसारख्या महाकवीला सुद्धा खऱ्या आनंदाचा व सदेकरस तत्त्वाचा अल्पहि अनुभव नव्हता. ईश्वराची स्थिति सुषुप्तीप्रमाणे आहे. ईश्वरप्राप्त मानवास पूर्ण जाणीव कायम ठेऊन सुषुप्तीचा अनुभव घेतां येतो. ही स्थिति अनिर्वाच्य आहे. 'शून्यांत शून्य मिळविलें, म्हणजे हें जग निर्माण होते', असें हाफीज म्हणतो.''

## १५

''परमेश्वरापासून मनुष्यास दूर ठेवणाऱ्या तीन गोष्टी आहेत. काम, क्रोध आणि कांचन (लोभ). काम आणि लोभ जिंकला जाईल; परंतु क्रोध ताब्यांत आणणें फार कठीण. जर या तीन शत्रूंस जिंकाल, तर काम, क्रोध आणि लोभ – यांचा संयम करणारा 'वली' च तुम्ही व्हाल.''

## १६

''ज्याप्रमाणे वाळवंटांतून चालणाऱ्या मनुष्यास मोत्यें आणि हिरे यांपेक्षा केवळ पाण्याचीच किंमत जास्त वाटते, त्याप्रमाणेच खऱ्या **प्रेमिकास केवळ ईश्वरच हवा असतो, आणि इतर सर्व वस्तू त्यास तुच्छ वाटतात.** त्याला नांव, कीर्ति अगर संपत्ति यांपैकी कांहीहि नको असतें. फक्त त्याच्या प्रियतमाचाच तो भुकेला असतो. ज्याच्या अंत:करणांत असें प्रेम नसते, तो स्वार्थातच मग्न असतो.''

## १७

''आत्मज्ञानाचा स्वल्प अंश देखील मिळाला, तरी तुम्हाला अनिर्वचनीय आनंदाची प्राप्ति होईल. **ह्या ज्ञानांत प्रत्येक वस्तु आपली हकीकत तुम्हांला सांगेल; व प्रत्येब बाह्य**



**पदार्थ तुम्हांला आनंदच देईल.** दु:खमय भासणारें हें सर्व विश्व स्वर्गाप्रमाणे शोभायमान होईल. आत्मवान सद्‌गुरुला स्वत:सारखा एकच अधिकृत पुरुष (Charge-man) असतो. त्याला तो सर्व देतो. तो अधिकृत पुरुष त्याचा पूर्णपणें वारस होतो; व त्याच्या अंतरंगात (Circle) समाविष्ट असलेल्या बारा जणांना ती सद्‌गुरुपासून मिळालेली अध्यात्मसंपत्ति वाटून देतो. तो ही अध्यात्मसंपत्ति म्हणजे निजबोध (जो सर्वांच्याकरिता सारखाच असतो) व सामर्थ्य (जें अंतरंगातील स्थान व तत्त्वप्रत्ययापूर्वी केलेले परिश्रम यांवर अवलंबून असतें) त्या बारा जणांना प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणे नेमलेल्या वेळी देतो; व मग त्या अधिकृत पुरुषाचा गुरु निधन पावतो. कधी कधी, त्या सद्‌गुरुचा बाह्य देह कायम असला, तरी तो आंतून अंतर्धान पावतो; व कांही बाबतींत, अंतर्धान पावण्याच्या आधी त्याचा देहपात होतो. संपत्ति वाटण्याचा अर्थ असा की तो अधिकृत पुरुष आपलें आंतील कार्य अंतरंगांतील घटकांच्या स्वाधीन करतो; व तो स्वत: त्या कार्यापासून मुक्त होतो.''

## १८

''मरण सर्वांनाच आहे. जीवनांतील ती एक आवश्यक स्थिति आहे. आत्मा फक्त आपलें घर बदलतो. **कोट बदलण्यापेक्षा मरणाचें महत्त्व जास्त नाही.** किंवा मरणाला झोपेची उपमा देतां येईल. झोपेंतून मनुष्य पूर्वीच्या देहांतच जागृत होतो, व मरणानंतर मनुष्य नवीन देहात जागृत होतो, हाच त्यांच्यात फरक आहे. मनुष्य रात्रीं झोप घेतो, तेव्हा तो जागा झालेला पुन्हा दिसण्याची आशा असते, म्हणून जगांतील लोक झोपेविषयीं अकांडतांडव करीत नाहीत. नवीन देहांत मृत मनुष्य हाही पुन्हा खात्रीने जागृत होतोच तेव्हा या मृत्यूरुपी निद्रेविषयीं आपण तसेंच उदासीन कां राहू नये? लोक शोक करतात, तो मरणामुळे नव्हे. आपला प्रिय मनुष्य पुन्हा आपल्या दृष्टीस पडून आपल्या मनाचें समाधान होणार नाही, म्हणून ते शोक करतात; व हा केवळ स्वार्थच आहे.

''माणूस मेला, म्हणजे सर्व बाजूंनी आक्रोश ऐकूं येतो. 'माझा प्रिय बाप मेला,' 'माझ्या जीवनांतील हिरा गेला,' 'माझा आश्रयदाता नाहीसा झाला.' 'माझा प्रियकर कोठे आहे?' इत्यादि शोकमय उद्‌गार त्या घरीं ऐकूं येतात. परंतु इतकें दु:ख व शोक दाखवीत असतांना सुद्धा, मृत मनुष्याच्या हितापेक्षाहि माझेपणाची कल्पना प्रमुख असते.

मनुष्यजीवनाच्या प्रारंभापासून मृत्यूची तलवार सारखी चालूच आहे. रोज माझ्या शेंकडों व हजारों बंधूना मरतांना मी प्रत्यक्ष पाहतों, पण त्याबद्दल मला कांहीच दु:ख वाटत नाही; व जमशेटजींचा मृत्यूहि त्याला अपवाद नाही. मृत्यू अपरिहार्य आहे हें सर्व लोक कबूल करतात. परंतु ही गोष्ट सर्वांना कबूल असली, तरी जेव्हा एखाद्याचा मृत्यू होतो, तेव्हा लोक आक्रोश करतात, हा मनाचा दुर्बलपणा किंवा वेडेपणा आहे.

**बाबा : –** ''पण कां? तुला जें पाहिजे ते तुझ्यांतच आहे; व तुला तें तेथेंच मिळेल. कोणी माझा अनुयायी असो वा नसो, तें साध्य होण्याकरता मी तुम्हाला मदत करतों.''

## ३

**प्रश्न : –** ''मला आपणांस भेटून फार आनंद झाला हल्ली माझें आयुष्य नीरस झालें असून त्यांत सुधारणा घडवून आणण्याचा मार्ग मला दिसत नाही.''

**बाबा : –** ''प्रत्येक मनुष्य सुखाच्या शोधांत आहे; व त्याला तें मिळविण्याचा उपाय सांपडत नाही. तेव्हा एका अर्थी प्रत्येकालाच आपलें आयुष्य कंटाळवाणें वाटतें. पण वस्तुत: जीवन सौंदर्यरसाने भरलेलें आहे व आनंद मिळण्याकरतांच तें आहे. मी तुम्हाला मदत करीन व तेव्हा सर्व परिस्थिती नवीनच दिसूं लागेल. मी म्हणतों तें तुमच्या अनुभवास येईल. **परिस्थितीला महत्त्व नसून आपल्या दृष्टिकोणाला महत्त्व आहे.** आज तुम्ही खिन्न आहांत; व आयुष्यांतील सर्व गोष्टी तुम्हाला रुक्ष वाटतात. पण उद्या तुमची दृष्टि बदलली, म्हणजे तुमचा विषाद जाऊन तुमची वृत्ती उल्हासित होईल. सर्वांत सोपा मार्ग म्हणजे कोणतीहि गोष्ट मनाला लावून घेऊं नये व त्यांना तात्पुरतेंच महत्त्व द्यावें. 'माझा जन्म स्वत: आनंदी राहून इतरांना आनंद देण्याकरतांच आहे' असें तुम्ही स्वत:स सुचवीत जा. म्हणजे हळूहळू तुमच्या आनंदाची वाढ होऊन तुम्ही दुसऱ्यांनाहि आनंद द्याल. 'माझे जीवन रुक्ष आहे' अशी सूचना स्वत:ला कधीहि देऊं नका. त्यामुळे वाईट परिणाम होतो. सर्व कांही उत्तम आहे व मी आनंदांतच राहणार, असें नेहमी म्हणत जा. मी तुम्हाला मदत करुं शकतों; व ती मिळत असल्याचें तुमच्या दृष्टोत्पत्तीस येईल.''

## ४

आपण पतित असून अत्यंत गोंधळलेल्या स्थितींत असल्याचें एका मनुष्याने लेखी पत्र हातीं दिल्यावर बाबा त्याला म्हणाले –

''मला हें सर्व माहीत आहे. तुम्ही जास्त सांगण्याची आवश्यकता नाही. मी तुम्हाला सर्व समजाऊन सांगतों. तुम्हीं चिंता करुं नका. जेव्हा एखाद्याची अध्यात्मिक उन्नति होणार असेल, तेव्हा त्याच्यांत कामवासना किंवा प्रेम अतिशय असतें. **ह्या कामवासनेचें प्रेमात परिवर्तन केलें पाहिजे. कामवासना स्थूल इंद्रियांची तहान आहे; व प्रेम ही आत्म्याची तहान आहे.** मला तुमच्याविषयी सर्व माहीत आहे व मी तुम्हाला अध्यात्मिक साहाय्य करीन. फिरुन उठण्याचा प्रयत्न न करुं शकण्याइतके तुम्ही पतित आहांत, असें स्वत:ला कधीहि वाटूं देऊं नका.''

## ५

**एक ख्रिश्चन धर्मोपदेशक आपल्या डॉक्टर मित्राबरोबर बाबांच्या भेटीस आला**



ह्या पाहाण्यांत ईश्वर प्राप्ती पर्यंतची सर्व जन्ममरणपरंपरा दिसते.

''आध्यात्मिक संबंधामुळे व पूर्व तयारीमुळे आत्मज्ञानाचा अधिकार प्राप्त झालेल्या व्यक्तींना वर आणून ईश्वर साक्षात्कार देण्याची जबाबदारी, ज्या आत्मज्ञ पुरुषांवर पडते, त्यांना या संधिबिंदूवर यावें लागतें. परंतु आत्मज्ञानाचा अधिकार मिळणें फार दुर्लभ आहे. अनेक युगांतून केलेला स्वार्थत्याग व आत्मज्ञ पुरुषाशी जडलेला दृढ संबंध व भोगलेलें दु:ख, यांवर आत्मज्ञानाचा अधिकार अवलंबून असतो. अनेक युगांत दु:ख भोगल्यानंतरच आत्मज्ञानाकरतां उत्पन्न होणाऱ्या अंतरंगात (Circle) प्रवेश करण्याची पात्रता मनुष्यास येते. सर्व संस्कार नष्ट करुन व मनांतील सर्व विचारांचा अस्त करुन उन्मनी स्थितींत राहिल्यास ईश्वराचा अनुभव येतो. पण हे फार कठीण आहे. कारण, मनांतील विचार बंद करण्याचा प्रयत्न केला तर गाढ झोप येऊं लागते. म्हणजे नेणीव प्राप्त होते. मोठमोठे योगी देखील मनाला सर्वकाळ पूर्णपणे स्तब्ध करुं शकत नाहीत. ध्यानांत किंवा समाधींत त्यांचे मन निष्क्रिय होतें; परंतु यामुळे देखील नवीन संस्कार उत्पन्न होतात. व समाधींतून उतरल्या बरोबर, मन आपले व्यापार करण्यास सज्ज होतें; व त्यांत उरलेल्या संस्कारांची भर पडते. हाफीजने शरीरास भांड्याची, आत्म्यास अग्नींतून निघणाऱ्या धुराची व संस्कारांना मोठ्या दगडाची उपमा दिली आहे. तो म्हणतो की, कितीहि प्रयत्न केला तरी धुराने दगड फेकला जात नाही; व म्हणूनच कोणी महात्म्याने येऊन तो दगड उचलला पाहिजे. तसेंच **एखाद्या पक्ष्याने आंतून पिंजरा उघडण्याचा प्रयत्न केल्यास तो उघडणार नाही, तर त्याचें दार उघडण्याकरता बाहेरुनच मदत आली पाहिजे.** सारांश, ज्यांना अध्यात्मिक उन्नती हवी असेल, त्यांनी अनेक आपत्तींना तोंड देण्याची तयारी केली पाहिजे; व सहनशीलता वाढविली पाहिजे.''

## २३

''**निंदा किंवा स्तुति यामुळे तुम्ही कर्तव्यपराङ्मुख होऊं नये.** आपण आपलें कर्तव्य उत्कृष्ट रीतीने बजावलें, असे तुम्हास तुमची सद्सद्विवेकबुद्धि सांगत असेल, तर बस आहे. इतर सर्व विचार सोडून द्या. तुमची अंत:प्रज्ञाच उत्तम निवाडा देईल.''

## २४

''मुमुक्षूंनी प्रात:काळी लवकर उठावें. तुम्ही उशीरा उठाल, तर तुमच्यांत व जगांतील इतर लोकांत विशेष फरक नाही. सकाळचे तीन वाजेपासून सहापर्यंतचा काल हा ध्यानास फार उत्तम आहे. पांच-सहा तासांची झोंप तुम्हाला पुरे.''

## २५

''पुष्कळ लोक अहंकार घालविण्याविषयीं बोलतात व लिहितात; पण बऱ्याच लोकांना अहंभावाचें स्वरुप न समजल्यामुळे, त्यांच्या उपायांनी अहंभावाचा क्षय न होतां, तो कायम राहून अधिक वाढतो. **अहंभावांत स्वार्थ व गर्व यांचाच केवळ समावेश होतो, असें नाही; तर तुमच्या शरीराची, मनाची, किंवा व्यष्टिजीवनाची जाणीव असणें, हा सुद्धा अहंभावच आहे.** तुम्ही काल झोपलांत ना? पण त्याविषयीं आज विचार करणें, हा अहंभावाचाच प्रकार आहे. तुम्हांला कोणी शिव्या दिल्यामुळे तुम्हांला अपमान वाटला, तर तोहि अहंभावच आहे. अहंभावाला अनंत शिरें आहेत. पण त्यांतील क्रोध, काममूलक तृप्ति, लोभ व निंदा हीं चार प्रमुख आहेत. अहंभाव नष्ट करण्याकरिता, दैवी प्रेम व सद्‌गुरुच्या ठिकाणी पूर्ण शरणागतवृत्ति हे दोन उपाय आहेत.''



## परिशिष्ट – ब

# प्रश्नोत्तरें

## १

**प्रश्न : –** ध्यानांत मनाचें नियमन करावें लागतें; व त्याकरता शक्तीचा उपयोग करावा लागतो. परंतु मनाचा व्यापार अनिर्बंध असल्याशिवाय त्यास सत्य शोधून काढतां येणार नाही. मग ध्यानाचें समर्थन कसें करतां येईल?

**बाबा :–** मी ध्यानापेक्षा प्रेमाला व कर्तृत्वाला अधिक महत्त्व देतों. एखाद्या व्यक्तींवर आपलें प्रेम असलें, तर आपण त्या व्यक्तिविषयीं सहजच स्वाभाविकपणें विचार करतों; व या व्यापारांत, मनाचा निरोध करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**प्रश्न : –** या प्रकारचें धावतें व स्वयंस्फूर्त चिंतन नि:संशय सुन्दर असतें; व त्यास समर्थनाची आवश्यकता नाही. परंतु एकाच विशिष्ट रुपावर चित्तैकाग्र्य साधण्याची आवश्यकता आहे, असें कांही तत्त्ववादी सांगतात तें कां?

**बाबा : –** कोणत्याहि वस्तूवर चित्त पूर्णपणें एकाग्र केल्यास सर्व संस्कारसमूह खिळखिळा होतो; व त्यामुळे संस्कारशृंखलांचे बंधन शिथिल होतें.

**प्रश्न : –** विश्वप्रेम व गुरुभक्ति या दोहोंचा समन्वय कसा करतां येईल?

**बाबा : –** कोणी कोणावरहि प्रेम केलें तरी ते मलाच मिळतें; कारण मी तेथे आत्मरुपाने आहेच.

## २

**प्रश्न : –** ''माझा तुमच्यावर विश्वास आहे व माझी श्रद्धा अधिक दृढ व्हावी अशी माझी इच्छा आहे.''

**बाबा :–** "स्वार्थाच्या मुळाशी वासना असते. दोन कुत्र्यांनी हाडाचा एक तुकडा पाहिला तर ते भांडतात; कारण त्यांना दोघांनाहि तो हवा असतो. दोघांनाहि तो स्वत:लाच मिळावासा वाटतो. बरें, त्यांनी दोघांनी तो हाडाचा तुकडा पाहिला नाही व म्हणून त्यांचे भांडण झालें नाही, तरी त्यांच्यांत वासना शिल्लक असतेच... लोकांच्या भीतीचें मूळ काय आहे? त्यांना हव्या त्या वस्तू निघून जातील, म्हणूनच त्यांना भीती वाटते... अंत:करणाचें आध्यात्मिक परिवर्तन हाच निर्भय होण्याकरता एक उपाय आहे. त्यानेच लोकांचे खरें समाधान होईल. लोक मद्यपान कां करतात? दिवसभर काम करुन थकलेल्या शेतकऱ्यांना कांही तरी उत्तेजक पदार्थ पाहिजे असतात. पण त्यांना त्याच्याऐवजी दुसरें कांही मिळेल, तर ते समाधान पावून उत्तेजक पदार्थांची हाव सोडून देतील. तेव्हा, **वासनेमुळे उत्पन्न होणारी भकभक शांत होण्याकरिता, आत्मा अनावृत्त झाला पाहिजे.**"

**प्रश्न :–** "पण स्वार्थ व वासना दृढमूल असतील, तर आत्मा अनावृत्त कसा होईल?..."

**बाबा :–** "हें सर्व प्रेमानेच सुसाध्य आहे. प्रेमामध्ये भिन्न अंत:करणांत ऐक्य उत्पन्न करण्याची शक्ति आहे."

## ११

बाबांच्या एका भक्ताचा मुलगा.

**प्रश्न :–** "मला सुख कसें प्राप्त होईल?"

**बाबा :–** "प्रत्येकजण नकळत किंवा मुद्दाम, कोणत्या न कोणत्या रुपामध्ये सुखाचा शोध करीत असतो. तूं आपल्याच तऱ्हेने सुख शोधीत आहेस. खुनी मनुष्य देखील सुखच शोधीत असतो. प्रत्यक्ष खुनाच्या कृत्यांत तें मिळेल असें त्यास वाटतें, म्हणूनच तो खून करतो. एखादा मनुष्य खून कां करतो? मत्सरामुळे अगर द्वेषामुळे. आणि खून केला तर सुख मिळेल असें त्यास वाटतें, म्हणून तो आपल्या द्वेषाने अगर मत्सराने प्रेरित होऊन सूड उगवितो. एखादा मनुष्य आत्महत्या कां करतो? त्यास त्यांत सुख मिळेलसें वाटतें म्हणून. एखाद्या मनुष्यास मद्यप्राशनाने सुख मिळेल असें वाटतें, म्हणून तो मद्यप्राशन करुं लागतो. परंतु त्यास असें कोणतें सुख मिळते? आणि तें किती वेळ टिकतें? केवळ जोंपर्यंत त्या मद्याची धुंदी त्यावर असते तोंपर्यंत. ती एकदा नाहीशी झाली, म्हणजे त्याला निराश, दीन व भग्नहृदय असें वाटतें. कामवासनेसंबंधी (विषय सुखा संबंधी) देखील तसेंच आहे. केवळ त्या क्षणीं जें सुख मिळतें, तेवढ्याचसाठी मनुष्य उपभोग घेण्यास प्रवृत्त होतो. परंतु कोणत्याहि कृत्यापासून जें सुख मिळतें, तें केवळ तात्पुरतेंच असतें. जेव्हा तें भोगून संपतें, तेव्हा तो पुन्हा दीन होऊन बसतो. खरें सौख्य निराळेंच असतें; व त्यांत कधी बदल होत नाही अगर तें कधी खंडतहि नाही. तें अनन्त व चिरन्तर आहे. आणि तें तुझ्यांतच आहे. तें सुप्त असून खुलें करावयास पाहिजे. एकदा



**असतां झालेली प्रश्नोत्तरे :–**

**प्रश्न : –** ख्रिश्चन लोकांच्या दृष्टीने ख्राइस्ट हा एकच महापुरुष आहे. कारण त्याच्यांत वैशिष्ट्य आहे. तुमचाहि तसाच विश्वास आहे काय?"

**बाबा : –** "त्याचें वैशिष्ट्य त्याच्या जाणीवेच्या व अवस्थेच्या दृष्टीने आहे. मुसलमान फक्त महंमदालाच मानतात व पार्शी लोक झरथुष्ट्राला, हिंदु कृष्णाला व बुद्धधर्मानुयायी बुद्धालाच ईश्वरतुल्य समजतात. प्रत्येक म्हणतो की माझ्या आदर्शातच वैशिष्ट्य आहे. पण ह्याविषयीं इतकें स्तोम का? नावांत काय आहे? खरें महत्त्व जीझसच्या चरित्राला आहे. ख्राईस्टचा उपदेश समजून त्याचें खरें महत्त्व जाणण्याकरता त्याप्रमाणें वागले पाहिजे. केवळ समारंभ, भाषणें, चर्चा व टीका यांमुळे ख्राइस्टचें खरें महात्म्य प्रत्ययास येत नाही. प्रेम करा असा एकाच साध्या गोष्टीचा ख्राइस्टने उपदेश केला. पण त्याच्या फारच थोड्या अनुयायांमध्ये प्रेमाची वाढ झालेली दिसते."

## ६

एक कलेचा प्रेमी बाबांना भेटण्यास आला असतां 'कलेंत स्वत:चा आत्मा ओतला जातो म्हणून मला कलेचे प्रेमी आवडतात' असें बाबा म्हणालें; व मग खालील संभाषण झालें.

**प्रश्न :–** "आतापर्यंत मी कल्पनेच्या साहाय्यानेच कल्पनांच्या उगमस्थानाचा शोध करीत आहे. परंतु ईश्वरी तत्त्व सापडण्याचा दुसरा कांही उपाय आहे काय? मी एका चर्चकरता चित्रें काढली आहेत; पण मला अधिक गंभीर दृष्टि यावयाला पाहिजे."

**बाबा :–** "ज्ञान हा प्रत्येकाचा हक्क आहे. कलेंतील स्फूर्तीचा उगम प्रेमांत असेल, तर ती कला मनुष्याला श्रेष्ठ भूमिका प्राप्त करुन देते. कलेवरची प्रीति कायम ठेवा. कलेमुळे तुमच्या अंतर्जीवनांतील नवीन दालन उघडेल. जेव्हा तुम्ही चित्र रंगविता, तेव्हा तुमच्या डोळ्यासमोरील विषय सोडून बाबी सर्व गोष्टी तुम्ही विसरुन जाता. जेव्हा तुमचें सर्व लक्ष कलेंत असतें, तेव्हा तुम्हाला स्वत:चेंहि मुळीच मान नसतें; व जेव्हा तुम्हाला स्वत:चें भान नसतें, तेव्हा तुमचा अहंभाव कमी होतो व अनंत प्रेमाचा उदय होतो. आणि प्रेम उत्पन्न झालें म्हणजे ईश्वर प्राप्त होतो. कलेमुळे अनंत ईश्वराची कशी प्राप्ती होते, हें आता तुम्हाला समजेल..."

## ७

एक बाई आपल्या नट मुलाला घेऊन बाबांना भेटण्यास आली त्या वेळीं झालेला संवाद.

**प्रश्न :–** "मनुष्याला आपलें ध्येय कसें साध्य करुन घेतां येईल? (मुलाकडे बोट दाखवून) हा नट आहे."

**बाबा (मुलास उद्देशून) :–** "**आत्म्याच्या अभिव्यक्तीचें कला हें उत्कृष्ट साधन असून ती इतरांना स्फूर्तिदायक होते.** परंतु तुझी अभिव्यक्ति अनिर्बंध होत नाही, असें तुला

वाटत असेल तर तूं एक गोष्ट कर. रंगभूमीवर काम करण्यापूर्वी ''मी स्वत:चा भाव पूर्णपणें व्यक्त करुं शकतों व करीन' असें स्वत:चें मन तयार कर. म्हणजे प्रत्येक वेळीं केलेल्या अभिनयाने तुझा आत्मविश्वास अधिक दृढ बनेल. बहुधा मनच बंद असतें. स्वत:स कमी समजून किंवा भितीमुळे किंवा कामांत आवड नसल्यामुळे बऱ्याचशा नटांना आपलें काम उत्कृष्ट रीतीने करतां येत नाही. कारण, ह्या न्यूनतेच्या भावनेमुळे अभिव्यक्तीस प्रतिबंध होतो. अभिनय करतांना 'मी जगांतील सर्वोत्तम नट आहे' अशी कल्पना करुन स्वत:चा भाव पूर्णपणे व्यक्त करावा. मी तुला अध्यात्मिक स्वरुपाचें साहाय्य करीन. पण तूं स्वत:स सर्वोत्कृष्ट नट समजत जा. जर ही समजूत अभिमानामुळे उत्पन्न झाली नसून स्वत:तील कर्तृत्वशक्तीच्या विमोचना करता ठेवली, तर ती योग्यच आहे...''

## ८

एक चित्रकार आपल्या दोन मुलांस घेऊन बाबांना भेटण्यास आला असतां '**मी मनुष्यांत अध्यात्मरंग भरवीत असल्यामुळे मीहि चित्रकारच आहे.**' असें त्यास बाबा म्हणाले व नंतर खालील संवाद झाला.

**प्रश्न :–** ''मला आध्यात्मदृष्टि पाहिजे.''

**बाबा :–** ''ती दृष्टि तुम्हांला येईल.. सध्या तुम्हाला योग्य वाटेल, तें तुम्ही करा. नंतर याहूनहि श्रेष्ठ भाव व्यक्त करावासा वाटेल, तेव्हा तो आपोआपच तुमच्या चित्रांत उतरेल.''

**प्रश्न :–** ''मलाहि असेंच वाटतें.''

**बाबा :–** ''हिंदुस्थानांत एक चित्रकार आहे. आम्ही दोघेहि तरुण होतो, तेव्हा तो मला आपलीं चित्रें दाखवीत असे. तीं चित्रें काहीतरीच असत. पण तीं चित्रें चांगली नाहीत, हें माहीत असूनहि मी त्याला तीं चांगली आहेत, असें म्हणून प्रयत्न चालू ठेवण्यास सांगितलें. पुढे जवळ जवळ एक वर्षाने माझ्याकडे पुन्हा येऊन त्याने मला आणखीं दुसरीं चित्रें दाखविली. ती फारच उत्तम होती. परंतु तरीहि ती फार चांगली आहेत असें मी त्याला सांगितलें नाही. मी फक्त त्यास तो उद्योग चालू ठेवण्यास सांगितलें; व आज तो तिकडील प्रख्यात चित्रकार आहे. तेव्हा तुम्हाला जशी प्रेरणा होईल, तसेंच करीत असाल व कालांतराने त्याची आपोआप वाढ होईल. (बाहेरची रमणीय निसर्गश्री हाताने दाखवून) – हें माझें चित्र तुम्हाला कसें आवडतें? हें सर्व माझें चित्र आहे.''

## ९

एक तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी.

**प्रश्न :–** ''दुर्गुणांचा अनुभव घेतल्याशिवाय मनुष्यांत सद्‌गुण उतरुं शकतील काय?''



**बाबा :–** ''दुर्गुण व सद्‌गुण या दोहोंचा अनुभव घेतल्यावरच ह्या द्वंद्वाच्या पलीकडे असलेल्या अनंताचा प्रत्यय येतो.''

**प्रश्न :–** ''चर्चनिष्ठ धर्मात व ख्राइस्टमध्ये काय फरक आहे?''

**बाबा :–** ''त्यांच्यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. ख्राईस्ट समारंभांत सापडणार नाही. तो जीवनांतच उतरला पाहिजे...''

## १०

कलेचा इतिहास लिहिणारा एक मनुष्य.

**प्रश्न :–** ''जगांतील दु:खाला कोणता उपाय आहे? आत्मदानाने तें नष्ट होईल काय?''

**बाबा :–** ''होय. बऱ्याच लोकांनी केलेल्या आत्मदानाने. परंतु हा सार्वत्रिक प्रयत्नाचा प्रश्न आहे. तुमच्या स्वत:विषयी काय?''

**प्रश्न :–** ''मला स्वत:विषयीं इतकी फिकीर वाटत नाही.''

**बाबा :–** ''इतरांची नि:स्वार्थ सेवा करण्याची तुमची इच्छा असली, तरी तुम्हांला स्वत:चा प्रश्न टाळतां येणार नाही. कारण दुसऱ्यांच्या हिताकरता तुम्ही स्वत: जो प्रयत्न करता, त्याचा सामाजिक परिणाम होतो. एखादा रक्तपितीचा रोगी निरोगी लोकांच्या गर्दीत मिसळला, तर त्या स्पर्शजन्य रोगाने सर्व वातावरण दूषित होईल. त्याचप्रमाणें ज्या मनुष्यामुळे वातावरण सुगंधयुक्त होते. तो इतरांस आनंदच देईल. तेव्हा **व्यक्तिविषयक प्रश्न म्हणजेच सामाजिक प्रश्न; व सामाजिक प्रश्न म्हणजेच व्यक्तिविषयक प्रश्न.** इतरांना मदत करण्याकरता, तुम्ही स्वत: शक्ति व ज्ञान यांनी संपन्न असलें पाहिजे.''

**प्रश्न :–** ''बरें. स्वत:चा प्रश्न थोडासा बाजूला सोडूं. आपण दुसऱ्याला मदत करण्याची पराकाष्ठा करीत असतांनाहि त्यांना प्रकाश मिळाला नाही, तर काय करावयाचें?''

**बाबा :–** ''त्याचा अर्थ असा की, तुमच्यांत आनंद ज्या मानाने सुप्रतिष्ठित आहे, तितका त्यांच्यांत नाही. परंतु प्रत्येकाचें अखिल जीवनांतील एकच ध्येय आहे; व तें म्हणजे स्वत:ला दु:ख प्राप्त झालें तरी इतरांना आनंद देत राहणें.''

**प्रश्न :–** ''केव्हा केव्हा, परिस्थिति प्रतिकूल असल्यामुळे, मनाला विषाद वाटतो.''

**बाबा :–** ''पण आता हें सर्व बदलून जाईल. तुमची अंत:करणप्रवृत्ति उत्तम आहे. मला तुम्ही फार आवडता. प्रत्येक मनुष्यांतच कांही दोष असतात. पण खरें महत्त्व अंत:करणाला आहे.''

**प्रश्न :–** ''स्वार्थाचें मूळ काय?''

तें खुलें झालें म्हणजे मग निरंतर आनंदच आहे.

''मी सौख्याचा उगम व आनंदाचा सूर्य आहे. परंतु तुझ्यांत व त्या सूर्यात पडदा असल्यामुळे तो तुला दिसत नाही. पडद्यामुळे तो दिसत नाही, म्हणून तो नाहीच असें तूं म्हणूं शकत नाहीस. सर्व जगाला प्रकाशमान करणारा तेजस्वी सूर्य तेथे आहेच. पण त्याच्या किरणांस आपल्या अज्ञानरुपी पडद्याने प्रतिबंध करुन, त्याची किरणें तूं तुझ्यापर्यंत येऊं देत नाहीस. तो पडदा तूं काढून टाक; म्हणजे तुला सूर्यदर्शन होईल. तो पडदा फाडून आनंदाची प्राप्ति होण्या करिता, मी तुला मदत करीन. मला तूं प्रिय आहेस. मी सर्वांवर प्रेम करतों.''

## १२

**प्रश्न :–** ''ज्या समग्र पूर्णतेचा व्यक्ति हा एक भाग आहे त्या पूर्णतेशिवाय दुसरें असें कांही व्यक्तीचें ध्येय असूं शकतें काय? व्यक्तीने स्वत:स एकट्यालाच मुक्ति मिळविण्याची इच्छा ठेवणें रास्त आहे काय? त्या समग्र पूर्णतेंत मिसळून जाऊन, तिच्याकरिताच जगण्यामध्ये मनुष्याच्या जीवनाची परिपूर्ति आहे; व मनुष्य हा केव्हाहि त्या पूर्णतेचा अंशच राहील असें वाटतें.''

**बाबा :–** ''व्यक्तीविषयीं विचार करतांना आपण एकदम एखाद्या मर्यादित वस्तूचीच कल्पना करतों. तेव्हा, ती व्यक्तीच अमर्याद समग्र पूर्णता असूं शकत नाही. व्यक्ति त्या समग्र पूर्णतेंत मिसळून गेली पाहिजे. हें तुमचें म्हणणें बरोबर आहे; परंतु इतक्याने सर्व भागत नाही. ती समग्र पूर्णता सागराप्रमाणें असून, व्यक्ति हा त्या सागरांतील बिंदु आहे. हा बिंदु सागरापासून विलग्न होऊन पुन्हा त्यांत मिसळून जातो. परंतु हा बिंदु पूर्वी सागरांत मिळालेला होता, त्याचप्रमाणे जर तो पुन्हा मिसळून गेला, तर तो विलग्न होण्याचा हेतु काय? **जेथून आपण निघालों तेथेच परत आलों, तर उत्क्रांति विफल होईल. तेव्हा व्यक्तीने आपलें व्यक्तित्व कायम ठेवून, समग्र पूर्णतेशीं असणाऱ्या आपल्या ऐक्याचा अनुभव जाणीवपूर्वक घ्यावयाला पाहिजे.** ह्याप्रमाणे ख्राइस्टला ईश्वराचा अनुभव ख्राइस्ट म्हणूनच येतो. तुम्हालाही स्वत:च परमेश्वर असल्याचा अनुभव येईल. हा प्रत्यय प्रत्येकाकरता स्वतंत्र राहील.''